# समाजसेवा
## तत्वें व मार्ग

पु. गं. नाईक

निबंध
सं. नं. १०५
REFBK-0008170

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नोंद दि.

# समाज-सेवा

## तत्त्वें व मार्ग

: लेखक :

पुरुषोत्तम गोविंद नाईक

आजीव सेवक, समाज-सेवा-संघ, मुंबई

REFBK-0008170

समाज-सेवा-संघ

प्रार्थना समाज नाका, गिरगांव, मुंबई.

किंमत पांच रुपये

मुद्रकः—के. एल्. एन्. राव, मुंबई वैभव प्रेस, सरदार वल्लभभाई पटेल रोड,
गिरगांव, मुंबई नं. ४

प्रकाशक–टी. ए. कुळकर्णी, जनरल सेक्रेटरी, समाज-सेवा-संघ, गिरगांव, मुंबई नं. ४

अनुक्रम १७.४... नोंदि...

# अल्प निवेदन

'समाजसेवेचीं तत्त्वें व मार्ग' ही लेखमाला प्रथम समाजसेवासंघाच्या 'समाजसेवक' मासिकांतून स. १९२५ व १९२६ मध्यें प्रसिद्ध करण्यांत आली. नंतर ती पुस्तकरूपानें स. १९२६ मध्यें प्रसिद्ध करण्यांत आली. पण अल्प काळांतच त्या पुस्तकाच्या सर्व प्रती संपल्या. पुढें त्याची दुसरी आवृत्ति काढण्याबद्दल अनेकांकडून आग्रहाच्या सूचना येत असतांहि व लेखकाची तशी इच्छा असूनहि वेळेच्या अभावीं ती काढणें शक्य झालें नाहीं. दरम्यानच्या काळांत 'वेश्या व वेश्याव्यवसाय' हें पुस्तक लिहून पुरें केलें. आतां पूर्वीच्या पुस्तकाची अद्ययावत् आवृत्ति वाचकांच्या हातीं देण्यास आनंद होत आहे. तिचें स्वागत वाचकांकडून होईल अशी आशा आहे. मूळ पुस्तकांत पुष्कळच बदल केल्यामुळें तिला दुसरी आवृत्ति असें म्हटलें नाहीं.

मुंबईतील समाजसेवासंघांत लेखक स. १९१६ सालीं एक सामान्य कार्यकर्ता म्हणून आला. त्या वेळेपासून गेलीं अडतीस वर्षें संघाच्या वेगवेगळ्या कार्यांत जबाबदारीचीं कामें करून आतां संघाचा कार्यवाह म्हणून काम करीत आहे. त्याचप्रमाणें बंधमुक्त कैदी-साहाय्यक संघ, बैरामजी जीजीभाई बालगृह, मुंबई नैतिक जागृति संघ वगैरे संस्थांत संघाच्या अनुज्ञे-प्रमाणें कार्यकर्ता म्हणून लेखकानें कमीजास्त काळ काम केलें. स. १९४९ मध्यें आंतरराष्ट्रीय मजूरसंघटनेच्या करमणूकसमितीचा एक सभासद म्हणून जिनेवा येथील परिषदेला हजर राहाण्याचा आणि त्यानंतर फ्रान्स, हॉलंड, डेन्मार्क, इंग्लंड इत्यादि देशांना धावती भेट देण्याचा योग आला. आतां भारतांत समाजसेवेच्या कार्याला महत्त्व आलें असून उत्तरोत्तर तें कार्य वाढत जाईल, अशीं चिन्हें दिसत आहेत. अशा वेळीं या महत्त्वाच्या विषयासंबंधीं आपले विचार जनतेपुढें मांडावे, त्यांचा कोणाला थोडाफार उपयोग होण्यासारखा असल्यास होऊं द्यावा, हा हें पुस्तक लिहिण्याचा एकमेव हेतु आहे.

समाजसेवासंघ, मुंबई या संस्थेला आजची स्थिति येण्याला ज्या ज्या व्यक्तींचे श्रम खर्ची पडले, त्यांत श्री. ना. म. जोशी यांचा वांटा फार मोठा आहे, हें सर्वश्रुत आहे. श्री. जोशी हे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे कामगारपुढारी म्हणून आज मुख्यतः ओळखले जात असले, तरी समाजसेवक व समाजसुधारक म्हणूनहि त्यांचें कार्य तितकेंच महत्त्वाचें आहे. लेखकाचा संघांत कार्यकर्ता म्हणून प्रवेश होण्यापूर्वी तो संघाचा एक स्वयंसेवक म्हणून मुंबईतील अन्न-छत्रांची व सदावर्तांची माहिती गोळा करीत होता. त्या वेळपासून त्याचा व श्री. जोशी यांचा

निकट संबंध आला आणि त्याला संघांत घेण्याला तेच कारण झाले. हे आपुलकीचे संबंध आजतागायत सारखे वाढतच आहेत. त्यांचें मार्गदर्शन, प्रोत्साहन आणि सर्व प्रकारचें साहाय्य लेखकाला सतत मिळत गेल्यामुळें तो जें कार्य करूं शकला, त्यांत या पुस्तकाचें लेखन हेंहि आहे. त्यांचें प्रोत्साहन आणि साहाय्य नसतें तर कदाचित् लेखकाच्या हातून या पुस्तकाचें लेखनहि झालें नसतें. हें त्यांचें ऋण कधींहि न फिटणारें आहे. शाब्दिक आभारांनीं तें फिटणार नाहीं. तसा प्रयत्न करण्याची लेखकाची इच्छाहि नाहीं. त्याचप्रमाणें संघाचे आजचे मुख्य कार्यवाह प्रा. टी. ए. कुळकर्णी यांचा तर लेखकाशीं गुरुशिष्याचा संबंध आहे. ते व संघाचे इतर पदाधिकारी यांचेंहि लेखकाला वेळोवेळीं अमूल्य साहाय्य झालें आहे. लेखक या सर्वांचा अत्यंत आभारी आहे.

पुस्तकप्रसिद्धीच्या कार्यांत मुद्रितें तपासून भाषेच्या दृष्टीनें तें शक्यतितकें निर्दोष करणें हें महत्त्वाचें आणि कटकटीचें काम असतें. आमचे मित्र प्रा. स. गं. मालशे, एम्. ए. यांनीं हें कार्य उत्साहानें, मेहनतीनें आणि आपुलकीनें केल्याबद्दल लेखक व समाजसेवा संघ त्यांचा अत्यंत आभारी आहे.

मुंबई, ता. १५ ऑगस्ट १९५४.

**पु. गो. नाईक.**

# अनुक्रमणिका


विषय — पृष्ठ

अल्पनिवेदन ... ... ...

## प्रकरण १ लें

**विषय प्रवेश** ... ... ... १

समाजाशिवाय माणसांत माणुसकी येत नाहीं—मनुष्य स्वतःसिद्ध असतो—मनुष्य परिस्थितीचा गुलाम असतो—परिस्थितीप्रमाणें माणसांत बदल व्हावा लागतो—सर्वांगीण विकासाचा मार्ग मोकळा करून देण्याच्या प्रयत्नांना समाजसेवा म्हणतात—दानाचा जुना दृष्टिकोन—समाजसेवेच्या नवयुगाला आरंभ—भारतीय व आंतरराष्ट्रीय समाजसेवा परिषदा—समाजसेवेच्या कक्षेंत येणारें कार्य—समाजसेवा व समाजसुधारणा यांचे परस्पर संबंध—मूळ शोधण्याची आवश्यकता—आदर्शभूत समाज.

## प्रकरण २ रें

**समाजसेवेची आवश्यकता** ... ... ... २३

समाजाचें ऋण—कुळाचें ऋण—देवघेवीचा व्यवहार—समाजाच्या उत्क्रांतीच्या पायऱ्या—माणसाचें परावलंबी जीवन—संस्कृति व व्यक्तीचें परावलंबन—सदोष समाजरचनेचे अनिष्ट परिणाम—प्रत्येकानें आपलें कर्तव्य केलें पाहिजे—मूलतः मनुष्य सत्प्रवृत्त असतो—समाजसेवेनें वैयक्तिक दुःख कमी करतां येतें—फुरसतीच्या वेळाचा सदुपयोग झाला पाहिजे—कामगार सुस्थितींत राहिला पाहिजे.

## प्रकरण ३ रें

**समाजसेवेचीं मूलभूत तत्त्वें** ... ... ... ४०

शिक्षणप्रसार–प्रौढ शिक्षण–मनुष्य जन्मभर विद्यार्थीच असतो–असामान्य माणसांच्याहि शिक्षणाची सोय झाली पाहिजे–अंधांचा प्रश्न–त्यांना स्वावलंबी करण्याचे प्रयत्न–लुई ब्रेल–हे प्रश्न हाताळण्याचे विधायक मार्ग–प्रमोदगृहें–मीं पाहिलेला एक क्लब–समता–जितके तुकडे अधिक तितका समाज अधिक दुर्बळ–सर्वांना सारखी संधि व सारखा न्याय–जगण्याचा हक्क सगळ्यांना सारखा आहे–नव्या परिस्थितींत नव्या साधनांचा उपयोग.

## प्रकरण ४ थें

**समाजसेवकाचें शिक्षण** ... ... ... ६२

समाजसेवेचें शिक्षण देणाऱ्या संस्था—सहानभूति व ज्ञान—आढ्यतेचा अभाव—धिम्मेपणा—सर्वांगीण विकास झाला पाहिजे—आत्मविश्वासाची आवश्यकता—समाजजीवनाचा अभ्यास—ध्येय व तत्त्वें—आवड आणि तारतम्य.

## प्रकरण ५ वें

**दान** ... ... ... ... ७८

दान म्हणजे प्रेम—समाजसुधारकांचें साहाय्य—सार्वजनिक संस्था व खाजगी संस्था यांच्यांमधील फरक—दान व समाजसेवा यांमधील भेद—धार्मिक कल्पनांचा दानावर पगडा—विश्वस्तनिधींचें उपयुक्त कार्य.

## प्रकरण ६ वें

**धर्मादाय संस्थांची संघटना** ... ... ... ८९

अपात्रीं दानाचा परिणाम—धर्मादाय संस्थांची संघटना करण्याचे प्रयत्न—दानांतले स्वार्थी हेतु—एल्बरफेल्ड पद्धति—भिक्षा घालणें नुसतें बंद केल्यानें हा प्रश्न सुटणार नाहीं—म्हणणें सोपें; पण करणें कठीण—समाजाची पेटी—दान व सामाजिक बंधनें—दानानें हित होतें; तसें अहिताहि होतें—मनुष्य आणि मनुष्येतर प्राण्यांमधील फरक—ढोंग्यांचो धन आणि दुर्बळ निराधार !—प्रत्येकानें शक्यतों स्वावलंबी व्हावें.

## प्रकरण ७ वें

**समाजाला स्वावलंबी करणाऱ्या चळवळी** ... ... १०७

इंग्लंडांतील औद्योगिक क्रांति—शेतीची कुंपणपद्धति—लोंकरीचा जोडधंदा खेड्यांतून नाहींसा झाला—गरिबांना साहाय्य करणारा सहकारी निधि—मनु पालटला—मित्रमंडळें—प्रेतसंस्कारासाठीं मदतीची याचना—साहाय्य करण्याच्या नानाविध योजना—नावीन्यपूर्ण कल्पना—विमा उतरण्याची कल्पना—सेव्हिंग्ज बँक्स्—घरें बांधून देणाऱ्या संस्था—सहकारी चळवळ—रॉकडेल शहरांतील बारा कोष्टी—ग्राहक दुकानांचा संघ—संघशक्ति, सचोटी आणि व्यापारी स्वातंत्र्य—या चळवळीच्या मुळाशीं समाजसेवेचें तत्त्व आहे—डेन्मार्कचा आदर्श—आपल्याकडे प्रथम ऋणमुक्त

संस्था स्थापण्यांत आल्या—समाजाची नवनिर्मिति करण्याचा सर्वोत्तम मार्ग—कामगार संघ—आरंभींचे अयशस्वी प्रयत्न—राजकीय सत्ता हातीं येण्यासाठीं प्रयत्न—कोणावरहि सक्ती नाहीं.

## प्रकरण ८ वें

**व्यक्तिगत समाजसेवा** ... ... ... १४१

व्यक्तिगत गुणांचा विकास—व्यक्तिवैशिष्ट्य—स्वावलंबी होण्याची आवश्यकता—तीन उदाहरणें–अनुकूल गृहस्थितीची आवश्यकता–व्यक्तिगत समाजसेवेपासून विशेष फायदे.

## प्रकरण ९ वें

**समाजसेवकांच्या वसाहती** ... ... ... १५८

ग्रामीण जीवनांतील क्रांति—समाजसेवकांच्या वसाहती—टॉयनबी हॉल—समाजजीवनाशीं प्रत्यक्ष संबंध यावा हा हेतु—निरपेक्ष समाजसेवा हें ध्येय—धार्मिक संस्थांची समाजसेवा—विद्यार्थी व समाजसेवा—मुलांकरतां होत असलेलीं कामें–कामगारांचें जीवन सुखी करण्याचे प्रयत्न—अनेक प्रकारें सहाय्य करतां येतें—सामाजिक पाहाणी—स्त्रियांनीं चालविलेल्या वसाहती —आजची स्थिति—मुंबईतील अशा प्रकारचे प्रयत्न.

## प्रकरण १० वें

**खेडीं आणि समाजसेवा** ... ... ... १७८

खेड्यांतील स्वाभाविक रहाणी—खेड्यांत समाजसेवेची आवश्यकता– –आयर्लंडमधील शेतकऱ्यांची सुधारणा—सहकारी चळवळच शेतकऱ्याची उन्नति करील—विविध कार्य करणाऱ्या पेढ्या पाहिजेत—समाजविकास–योजना—फोर्ड फाउंडेशनचें साहाय्य—शेती, आरोग्य, शिक्षण व सामाजिक संघटन यांची वाढ हें उद्दिष्ट—इतर देशांतील अनुभव मिळण्याची व्यवस्था –डेन्मार्क मधील लोकशाळा–लोकशाळांचा जगप्रसिद्ध जनक ग्रंडविग–पहिली लोकशाळा—शिक्षणखात्याचा विरोध—विद्यार्थी आपल्या खेड्यांत शिक्षण–प्रसार करतात—निरपेक्ष बुद्धीनें काम करण्याची हौस असलेले शिक्षक—साध्यासुध्या शेतकऱ्याला सोइस्कर असें शिक्षण—खेड्यांतील आरोग्य—प्राथमिक शिक्षण सक्तीचें व फुकट झालें पाहिजे.

## प्रकरण ११ वें

समाजसेवा आणि सरकार ... ... २०४

लोकहितकारी राज्य—लोकहितकारी राज्यपद्धतीला इंग्लंडांत शंभर वर्षांपूर्वी आरंभ झाला—महायुद्धें आणि कामगारांचा प्रश्न—सर विल्यम बेवरीज यांची योजना—मुख्य गरज कोणती ?— सन १९४४ मध्यें सुरू झालेली सर्वव्यापी योजना—या योजनेचें स्वरूप—लोकहितकारी राज्यांत कुटुंबाचें स्थान—कुटुंब जोडलें जात नाहीं; मोडलें जातें—कुटुंब सुखी तर समाज सुखी—लोकहितकारी सरकार व समाजसेवा करणाऱ्या खाजगी संस्था—समाजसेवेची आवश्यकता नाहीं असें कधींच होत नाहीं—स्वयंस्फूर्तीनें समाजसेवा करणाऱ्या संस्थांना साहाय्य मिळालें पाहिजे.

## प्रकरण १२ वें

उपसंहार ... ... ... २२४

समाजाच्या हितासाठीं कांहीं तरी करण्याची भावना जागृत झाली पाहिजे—माणसाच्या भावनात्मक गरजाहि महत्त्वाच्या असतात—आदिवासी लोकांची सुधारणा—शारीरिक व्यंग असलेल्या माणसांची सोय—सद्गुणांची वाढ आणि दुर्गुणांचा नाश— नराचा नारायण होण्याची शक्ति माणसांत आहे—लोकशाही समाजांत प्रत्येक घटकाला महत्त्व असतें.

# समाज-सेवा

## तत्त्वें व मार्ग

### प्रकरण १ लें

### विषयप्रवेश

माणसांची संघ करून राहण्याकडे नैसर्गिक प्रवृत्ति असते म्हणून म्हणा; संघ करून राहाण्यांत आपलें हित आहे, या जाणिवेनें म्हणा; किंवा संघ करून राहिल्याशिवाय आपण मुळीं सुखानें जगूंच शकणार नाहीं, आपलें मुळीं अस्तित्वच संपुष्टांत येईल, या भीतीनें म्हणा; तीं एकत्र येतात. या त्यांच्या एकत्र येण्यांतून, देवाणघेवाणींतून, परस्परांशीं केलेल्या वागणुकींतून, परस्परांच्या संबंधांतून, परस्परांना केलेल्या साहाय्यांतून कांहीं चालीरीति, पद्धति, रूढीरिवाज, वहिवाटी अस्तित्वांत येतात. त्यांच्या हालचाली आणि त्यांचें कार्य यांच्या मर्यादा ठरतात. त्यांनीं कसें वागावें, कोणत्या गोष्टी कराव्यात, कोणत्या करूं नयेत याचे नियम ठरतात. हे नियम, ही पद्धतशीर व्यवस्था म्हणजेच एक प्रकारें संघटना होय. ही संघटना केव्हांहि स्थिर नसते—कायम स्वरूपाची नसते. अशा या सारख्या बदलत राहाणाऱ्या, गुंतागुंतीच्या मांडणीला, व्यवस्थेला, संघटनेला समाज म्हणतात. समाज म्हणजे एक जाळेंच आहे. परस्पर संबंध आणि, सामाजिक नातें यांच्या रज्जूंनीं तें विणलेलें असतें. हें जाळें मूलतः माणसानें स्वतःच तयार केलेलें असतें; पण हळू हळू तें इतकें गुंतागुंतीचें होत जातें कीं, तें विणणारा माणूसच स्वतः त्यांत गुरफटला जातो आणि त्यांतून निसटून जाणें, त्याला सर्वस्वी अशक्य होऊन बसतें. अनेक व्यक्ति एकत्र येतील व त्यांचा परस्परांशीं निकट संबंध येईल तेव्हांच समाज होतो. पण अनेक निर्जीव वस्तू एकत्र आल्या व त्यांचा परस्परांशीं संबंध असला कीं तेवढ्यावरून तो समाज झाला असें म्हणतां येणार नाहीं. कारण समाज होण्याला घटक वस्तूंना परस्परांच्या अस्तित्वाची जाणीव व्हावी लागते. आपल्या खोलींतल्या खुर्चा, मेज, कपाट, पलंग वगैरे वस्तू घ्या त्या एकमेकांच्या शेजारींच असतात. त्यांचा एकमेकांशीं संबंधही असतो. पण त्यांना

आपल्या बाजूला कोण आहे, काय ठेवलेलें आहे, त्यांचा व आपला संबंध काय आहे, याची जाणीव असते काय ? आपलीं सुखदुःखें त्या एकमेकाला सांगूं शकतात काय ? नाहीं. त्यांना एकमेकांत मिसळतां येत नाहीं. एकमेकांचें अस्तित्व, एकमेकांचा संबंध याची जाणीव होऊन जी त्यांची वागणूक व्हावयाची, दळणवळण व्हावयाचें, तें होत नाहीं आणि ही जाणीव हें दळणवळण असल्याशिवाय सामाजिक नातें, समाजप्रियता उत्पन्न होत नाहीं, समाज अस्तित्वांत येत नाहीं. एकमेकांच्या अस्तित्वाची जाणीव होऊन जेव्हां माणसें परस्परांशीं वागूं लागतात आणि परस्परांबद्दल त्यांच्यांत जिव्हाळा उत्पन्न होतो तेव्हांच समाज जन्माला येतो आणि एकमेकांच्या अस्तित्वाची जाणीव होऊन त्याप्रमाणें वागणूक होणें, यालाच सामाजिक वागणूक म्हणतात.

पण एकमेकांच्या अस्तित्वाची जाणीव झाली आणि त्याप्रमाणें वर्तनहि घडूं लागलें तरी आपण सारे एक आहोंत, आपणां सर्वांचें हित एक आहे, आपणां सर्वांना सहकार्यानें वागावयाचें आहे, या सहकार्यावर आपणां सर्वांचा उत्कर्ष अवलंबून आहे, ही सहकार्याची भावना उत्पन्न व्हावी लागते. तेव्हांच सामाजिक वातावरण-समाज-अस्तित्वांत येतो. आपण परस्परांपासून वेगळे आहोंत असें वाटत असलें, आपली वागणूक परस्परांच्या उलट असली, ज्यांत एकाचें हित त्यांत दुसऱ्याचें अनहित अशी स्थिति असली, कोणा घटकाला सहकार्य नको असलें तर मग त्यांचा इतर रीतीनें कितीहि जवळचा संबंध असो, तो समाज होऊं शकत नाहीं. एकमेकांना पाण्यांत पाहून, एकमेकांचे गळे कापून एकमेकांच्या नाशास प्रवृत्त होणें हें समाजहिताला पोषक नाहीं. तें समाजविघातक असतें. इतकेंच नव्हे तर तसें वागल्यानें आपण एक आहोंत, आपणां सर्वांचें हित एकच आहे, हें जें समाजाचें मूलभूत तत्त्व त्याच्या मुळावरच घाव घातला जातो.

## समाजाशिवाय माणसांत माणुसकी येत नाहीं

समाजप्रियता, समाज करून राहण्याची प्रवृत्ति ही माणसांतच आढळते असें नाहीं. मुंग्या, माशा व दुसरे अनेक मनुष्येतर प्राणी यांच्यांतहि ती आढळते. पण ते या गोष्टी उपजतबुद्धीनें करीत असल्यामुळें त्यांना एकमेकांच्या अस्तित्वाची जाणीव असली, तरी ती अगदीं अंधुक असते. आणि त्यांचें सामाजिक संघटन अगदीं कमी असतें. उलट माणसें या गोष्टी समजून उमजून आपल्या हितासाठीं करितात. आपण एकेकटें राहाणें चांगलें नाहीं, तें आपल्या हिताचें नाहीं असें माणसाला वाटत असल्याचें, माणसांचे विचार लिहून ठेवण्यास आरंभ झाल्या घडीपासून नमूद करण्यांत आलेलें आहे. पण माणसाला समाज करून राहाण्याची आवश्यकता तरी कां वाटावी ? कारण समाज हाहि कांहीं बाबतींत अपुरा असतो; त्याच्यांतहि उणीवा असतात; कांहीं बाबतींत समाजाच्या घटकांवर जुलूमहि होतो; व्यक्तिस्वातंत्र्याला त्यांत मर्यादा

पडतात; पण इतकें असूनहि माणूस समाजांत राहाणें पत्करतो. कारण त्याला आत्मसंरक्षणासाठीं, सामाजिक सुख मिळविण्यासाठीं आणि आपल्या जीविताला पूर्णता आणण्यासाठीं समाजाची आवश्यकता असते.

माणसें समाज करून रहातात म्हणूनच त्यांची हितबुद्धि, त्यांच्या आकांक्षा, त्यांचीं ध्येयें त्यांच्यांत उत्पन्न झालेलीं असतात. समाज करून माणूस राहूं लागला कीं त्याची प्रेरणा, त्याचा स्वभाव, त्याच्या अंगचे गुण, त्याची स्वाभाविक शक्ति यांची वाढ होते, तीं फोफावतात, त्यांचें आविष्करण होण्यास वाव मिळतो.

माणसांच्या या स्वाभाविक गरजाच त्यांना समाज करून रहाण्याला भाग पाडतात. संरक्षण, सुख, पोषण, शिक्षण, संधि अशा एकना अनेक प्रकारच्या गोष्टींची तरतूद समाज करीत असल्यामुळें माणसांना समाजावर अवलंबून रहाणें भाग असतें. त्यांचे विचार, त्यांच्या आकांक्षा, त्यांचीं स्वप्नें हीं सारीं प्रत्यक्ष कृतींत येणें समाजामुळेंच शक्य असतें. समाजाच्या जिवावरच माणूस या सार्‍या उड्या मारीत असतो. माणूस जन्मल्यापासूनच नव्हे तर तो जन्मास येण्यापूर्वींपासूनच त्याला समाजाच्या सहाय्याची अत्यंत आवश्यकता असते. त्याला समाजाशिवाय राहाणें कठीण असल्यामुळेंच एकांतवासाची शिक्षा ही सर्व प्रकारच्या शिक्षांत अत्यंत क्रूर समजली जाते. कारण तींत मनुष्य आणि त्याची मूलभूत गरज जी समाज, त्यांची परस्परांपासून ताटातूट करण्यांत येते. म्हणूनच व्यक्तिस्वातंत्र्याच्या कोणी कितीहि गप्पा मारल्या, समाजाची मला गरज नाहीं, असें म्हणूं लागला, तरी प्रत्यक्ष तसें वागणें, माणसाला शक्य नाहीं. कारण सामान्य माणसाला आपलें जीवन सुखानें जगण्यालायक करावयाचें असल्यास त्याला समाजाशीं सामाजिक संघटण ठेवणें अपरिहार्य असतें. समाजाच्या सहाय्यावांचून माणसांत माणुसकी येत नाहीं, त्याच्या व्यक्तित्वाचा खरा विकास होऊं शकत नाहीं आणि तो होऊं शकणार नाहीं.

माणूस समाजांत नसला तर त्याची काय स्थिति होते, हें आपण पाहूं. एक एकदोन वर्षांच्या आंतली व दुसरी सुमारें नऊ वर्षांची, अशा दोन मुली एका लांडग्याच्या गुहेंतून रेव्हरंड जे. एल. सिंग नांवाच्या खिस्ती मिशनऱ्यानें स. १९२० सालीं बंगालमधील मिदनापूरच्या एका अनाथाश्रमांत आणून ठेवल्या. त्यांना लहानपणींच केव्हांतरी लांडगीनें उचलून नेऊन आपल्या गुहेंत ठेवलें असावें. या दोन मुलींचीं अमला व कमला अशीं त्यानें नांवें ठेविलीं. अमला या गुहेंतून आणल्यानंतर थोड्याच दिवसांत वारली. कमला स. १९२९ पर्यंत जगली. तिला लांडग्यांच्या गुहेंतून आणून ती माणसांत राहूं लागल्यापासून तिच्या सार्‍या हालचालींची काळजीपूर्वक नोंद करण्यांत आली. कमलेला लांडग्याच्या गुहेंतून बाहेर आणली तेव्हां माणसासारखें वागणें हें मुळीं तिला ठाऊकच नव्हतें. ती लांडग्यासारखी चार

पायांवर अत्यंत चपळाईनें चाले, लांडग्यासारखी ओरडे आणि ओरडण्याखेरीज तिला दुसरें कांहीं बोलतांच येत नसे. न माणसाळलेल्या प्राण्यांप्रमाणें ती माणसांना भीत असे. दिवसा ती प्रकाश टाळून एका कोपऱ्यांत डोळे मिटून बसलेली असे. रात्रीं ती आश्रमाच्या आवारांत इतस्ततः हिंडे आणि लांडग्यासारख्या किंकाळ्या मारी. तिच्या पुढ्यांत दूध ठेवलें कीं तें तोंड दुधांत बुडवून ती चाटून पीत असे. खातांनाहि हाताचा उपयोग न करितां ती खाई. मधून मधून ती इतरांचा डोळा चुकवून मागील आवारांत जाई आणि एखाद्या कोंबडीवर झडप घालून तिला पकडी व पळत बाजूला एखाद्या झुडपांत जाऊन कोंबडी करकरा चावून खाऊन बाहेर येई. सारांश, तिचें सारें वागणें, राहाणें, लांडग्याप्रमाणें झालें होतें.

तिला माणसांत आणण्याचे प्रयत्न सिंग पतिपत्नींनीं अत्यंत कसोशीनें केले. रोज तिचें अंगमर्दन नियमित करण्यांत येत असे. तिच्या स्नायूंना व सांध्यांना लांडग्यांच्या कळपांत राहिल्यामुळें जो विशिष्ट आकार आला होता तो नाहींसा व्हावा म्हणून प्रयत्न करण्यांत येत होते तिला बोलतां यावें म्हणूनही खटपट चालू होती. आणि या प्रयत्नांना हळू हळू यश येत होतें. ती गुडघे टेकून उभी राहूं लागली, गुडघ्यांवर चालूं लागली, इतरांच्या आधारानें पावलावर उभी राहूं लागली, पुढें कोणाच्या आधाराशिवाय उभी राहूं लागली आणि शेवटीं माणसासारखी चालूं लागली. प्रथम ती 'मा' शब्द शिकली, नंतर भाता ऐवजीं 'भा' म्हणूं लागली. आणि पुढें स. १९२७ पर्यंत तिला पंचेचाळीस शब्द चांगले बोलतां येऊं लागले. हळू हळू मानवी भावनाही तिच्यांत जागृत होऊं लागल्या. पण पशूंत गेलेला हा मानव पुनः मानव करण्याचा प्रयोग पूर्णतः यशस्वी होतो किंवा नाहीं हें पहाण्यापूर्वींच स. १९२९ सालीं ती मुलगी अल्पमुदतीच्या आजारानंतर दुर्दैवानें वारली[१] तथापि माणूस माणसांत आल्याशिवाय त्याच्यांत माणुसकी येत नाहीं. हें कळण्यास हें उदाहरण पुरेसें आहे.

समाज करून राहिल्यामुळें मनुष्य सुखी होत असला, त्याचें संरक्षण होत असलें, त्याच्या व्यक्तित्वाचा विकास होत असला, त्याची सर्वांगीण सुधारणा होण्यास साहाय्य होत असलें, तरी समाजांत राहिल्यामुळें त्याचा कसलाच तोटा होत नाहीं, असें मात्र नाहीं. समाजांत असल्यामुळें त्याला कांहीं गैरसोयी सोसाव्या लागतात, कांहीं हक्क, कांहीं स्वातंत्र्य गमवावें लागतें, देवाणघेवाण करावी लागते आणि श्रमविभागाचें तत्त्व अंगिकारावें लागतें. विशेषतः तो जर लोकशाहींत-लोकप्रतिनिधींच्या बहुमतानें चाललेल्या राज्यांत–राहात असेल तर सार्वजनिक हिताकरितां

१ वुल्फ चाइल्ड अँड ह्युमन चाईल्ड - ले. डॉ. ॲनॉंडगेसेल. सायन्स न्यूज ( पहिला अंक ) स. १९१६

कांहीं बंधनें त्यालाहि पाळावीं लागतात आणि तितक्यापुरतें त्याचें स्वातंत्र्य कमी होण्याचा संभव असतो. पण आपलें मत देऊन एकंदर राज्यकारभार चालविण्यांत तो भागीदार होत असल्यामुळें समाजावर अशीं बंधनें घालण्यांत त्याचाहि हात पर्यायानें असतो. म्हणजे हीं बंधनें पर्यायानें त्याचीं त्यानेंच आपल्यावर घालून घेतलेलीं असतात. त्यामुळें मी आणि माझें एवढ्यापुरतेंच पाहाण्याचें आपलें वैयक्तिक कार्यक्षेत्र आहे असें मानणें चूक आहे, आपलें ध्येय विशाल ठेवून आपल्या शेजाऱ्याशीं सहकार्य करून एकंदर समाजासाठीं विधायक कार्य करण्याची संधि आपल्याला प्राप्त झालेली आहे. आपण आणि आपला समाज, किंवा आपलें हित आणि समाजाचें हित यांत फरक नाहीं, समाज म्हणजेच आपण, समाजाचें हित म्हणजेच आपलें हित हें त्याच्या ध्यानांत येतें आणि या बंधनांचा आणि गैरसोयांचा तो आनंदानें स्वीकार करतो.

## मनुष्य स्वतःसिद्ध असतो

पण एखाद्या जिवंत संघटनेची ( Organised ) पेशी ( Cell ) त्या संघटनेचा भाग असली, तरी तींत एकरूप झालेली असते तिला स्वतंत्र अस्तित्व नसतें, तशीं माणसें समाजाचा भाग नसतात. समाजाचें अस्तित्व हें त्यांतील व्यक्तींचें मिळून बनलेलें असतें. समाजाची चळवळ, समाजाची भावना, समाजाचें कार्य, समाजाचा हेतु असें आपण म्हणतों तेव्हां आपल्या म्हणण्याचा अर्थ असा असतो कीं, तें सारें समाजांतील व्यक्तींचें असतें, व्यक्तींनीं केलेलें असतें. आपण समाज म्हणून जो ओळखतों, तो माणसांनीं आपला एकमेकांशीं संबंध आणून किंवा आनुवंशिकतेनें तो संबंध उत्पन्न होऊन एकत्र आलेल्या व्यक्ति होत. समाजाची प्रतीति, समाजाचा अनुभव म्हणजे त्यांतील व्यक्तींचा अनुभव, व्यक्तींची प्रतीति असते. समाजाचें खरें अस्तित्व तो ज्या व्यक्तींचा झालेला असतो त्यांच्या जीविताशिवाय वेगळें नसतें. ह्या व्यक्ति वगळून जर आपण समाजाची प्रगति, समाजाची सुधारणा, समाजाची वाढ, असें म्हणूं लागलों तर त्याला कांहीं अर्थच राहाणार नाहीं. उलटपक्षीं व्यक्तींची धडपड, त्यांचे फायदे, त्यांच्या आकांक्षा, त्यांची भीति हीं सर्व समाजाचींच असतात.

पुष्कळदां लोक समाजाला प्राण्याच्या शरीराचीहि उपमा देतात आणि शरीर आणि त्याचे वेगवेगळे अवयव यांचें जसे परस्परांशीं संबंध असतात, तसे व्यक्ति व समाज यांचे संबंध आहेत, असें मानतात. कोणी त्याला यंत्राची उपमा देतात. पण हीं उदाहरणें समाजाला लागू पडत नाहींत. यंत्रांचे भाग एकमेकांशीं सहकार्य करून सर्व मिळून कांहीं तरी तयार करितात हें खरें. पण ते काय करितात याची जाणीव एकमेकांना नसते, एकमेकांच्या अस्तित्वाची त्यांना माहिती नसते. एकमेकांशीं

त्यांना दळणवळण करतां येत नाहीं; आपले विचार, आपला अनुभव, आपला हेतु दुसऱ्याला सांगतां येत नाहीं. उलटपक्षीं समाज ज्या माणसांचा झालेला असतो त्यांची मनोवृत्ति, त्यांची दृष्टि, त्यांचें हित हीं बदलतील, त्याप्रमाणें समाज बदलतो. समाजाचें महत्त्व त्याला मिळत असलेला त्यांतील व्यक्तींचा आधार आणि साहाय्य यांच्यावर अवलंबून असतें. सारांश समाज त्यांतील व्यक्ति असतील तसाच असतो. त्याला करतील तसा तो होतो. मनुष्य समाजाचा एक भाग, एक घटक असतो हें खरें; पण या घटकाची, या भागाची योग्यता प्राण्याच्या, यंत्राच्या किंवा झाडाच्या भागापेक्षां अगदीं वेगळी असते. त्याचें साम्य दुसऱ्या कोणत्याहि घटकाशीं होऊं शकत नाहीं, असें त्याचें वैशिष्ट्य आहे. त्याचें महत्त्व केवळ एका घटकापेक्षां जास्त असतें. तो स्वतंत्र असतो. स्वतः सिद्ध असतो त्याचें म्हणून स्वतंत्र कार्य असतें. स्वतःचें भाग्य निर्माण करण्याची शक्ति त्याच्यांत असते. तो विचार करितो. वाऱ्याबरोबर वाहत जाणारा तो नसतो. त्याच्या मनांत असल्याशिवाय तो सामान्यतः दुसऱ्याच्या आहारीं जाणार नाहीं. कांहीं महत्त्वाच्या बाबतींत तरी दुसरे सांगतात म्हणून नव्हे; तर त्याला स्वतःला पटतें म्हणून तो एखादी गोष्ट करितो. त्याला स्वतंत्र मत असतें. कांहीं गोष्टींत त्याला पुढाकार घेण्याची इच्छा असते. त्याला बऱ्यावाइटांतला फरक कळतो. त्यामुळें कधीं कधीं व्यक्तिव्यक्तींत, संघासंघांत; मतभेद, स्पर्धा, विरोध, हेवेदावे, झटापटी, बंड, बळजबरी, दुष्टावा, अडथळे, पिळवणूक हीं उत्पन्न होतात आणि त्याचे परिणाम व्यक्ति आणि समाज यांच्या ऐक्यांत अडथळे येण्यांत होतात. हीं सर्व त्याची प्रगति कांहीं काळ तरी थांबवितात. तथापि व्यक्ति आणि समाज यांचें नातें मित्रत्वाचें असावें लागतें. त्यांच्यांत कायमचें शत्रुत्व असूं शकत नाहीं. कारण तीं परस्परांवर अवलंबून असतात आणि समाजांतले नानाविध परस्परविरोधी संघ किंवा व्यक्ति यांचें परस्परांशीं ज्या प्रमाणांत सख्य – सलोखा – असेल; त्या प्रमाणांत तो समाज उत्क्रांत झालेला आहे असें मानण्यांत येतें. त्यांचें पूर्ण ऐक्य असें कधींच होत नाहीं. तें होण्यासाठीं व्यक्ति व समाज यांचे प्रयत्न सतत चालू असतात. सारांश व्यक्तीच्या व्यक्तित्वाचा विकास होण्यासाठीं समाजाची आवश्यकता असते. आणि जितका तिच्या व्यक्तित्वाचा विकास होईल तितकी ती समाजावर जास्त अवलंबून राहाते आणि समाजाला अधिक साहाय्यक होते तीं परस्परांवर अवलंबून असतात, त्यांची प्रगति परस्परांवर अवलंबून असते आणि एकावर होणाऱ्या बऱ्या वाईट गोष्टींचे परिणामहि दुसऱ्यावर होतात.

समाज हा एकदम झाला किंवा एकदम तयार करण्यांत आला अशांतला भाग नाहीं. व्यक्ति, व्यक्तिसमूह, राष्ट्रें आणि वेगवेगळे समाज आपापलें कार्य करीत आले आणि तें कार्य मागें ठेवून कालगतीनें कालवश झाले. त्यांच्या पुढील पिढ्यांनीं त्यांत भर घातली आणि त्याहि गेल्या. अशाप्रकारें मंदगतीनें होत आलेल्या कार्याच

आजचा समाज हा परिपाक आहे. थोडें थोडें सांठवत व त्याची पुनर्घटना व सुधारणा होत होत आजचा समाज झालेला आहे. अशा रीतीनें मागील पिढीच्या कल्पना, आशाअपेक्षा, दर्जा, मतें, अनुभव इत्यादि पुढील पिढीला मिळाल्याशिवाय समाजाचें सामाजिक जीवन टिकूं शकत नाहीं.

## मनुष्य परिस्थितीचा गुलाम असतो

सामाजिक जीवित सारखें बदलत असतें. त्याप्रमाणें परिस्थितिहि बदलत असते. झाडाच्या वाढीला आवश्यक त्या सार्‍या गोष्टी करून बीं जर भूमींत पेरलें आणि त्याला अनकूल परिस्थिति मिळाली, तर तें चटकन रुजून येतें, त्याला पानें फुटतात, त्याचीं मुळें जमिनींत खोल जातात, तें फोफावतें आणि फुलाफळांनीं ओथंबतें. अशा रीतीनें त्याचें परिस्थितिशीं एकप्रकारचें नातें जडतें. तें अत्यंत गुंतागुंतीचें असतें. तें झाड जर आपण तोडलें आणि पूर्वीं बीं होतें त्याप्रमाणें तें भूमीपासून-परिस्थितीपासून-वेगळें केलें तर तें तत्काळ मरतें. त्याला फुलें, फळें येणें किंवा तें कायमचें सुकून जाणें, तें जोमानें वाढीस लागून पुढें त्याचा मोठा वृक्ष होणें किंवा तें निर्जीव आणि खुरटें होऊन मरणाच्या पंथास लागणें, आसपासच्या झाडांची गर्दी त्याला मारक होणें किंवा त्या गर्दीला न जुमानतां तें जोमानें वाढणें हें सारें मुख्यतः त्याच्या परिस्थितीवर अवलंबून असतें. कांहीं वृक्ष कांहीं विशिष्ट जमिनींतच चांगले होतात, कांहींना नरम भुसभुशीत जमीन, तर कांहींना दगडाळ जमीन, कांहींना सपाट वाळवंट तर कांहींना डोंगराळ प्रदेश, कांहींना उष्ण, कांहींना थंड तर कांहींना समशीतोष्ण हवा लागते. आणि त्यांना परिस्थितींत बदल करून घेतां येत नसल्यामुळें ज्या जागीं तीं असतील, तेथील परिस्थितीशीं जुळत असेल तर जगावें; नसेल तर मरावें, हे दोनच मार्ग त्यांना उपलब्ध असतात. पशुपक्षांची स्थिति त्या मानानें थोडी बरी असते. ते एका जागींच जखडलेले नसल्यामुळें त्यांना इकडे तिकडे हिंडून फिरून आपल्या परिस्थितींत थोडाफार बदल करण्यास संधि मिळते. तरी सुद्धां त्यांनाहि सभोंवारच्या स्थितीवर बहुतांशीं अवलंबून राहावें लागतें. मनुष्याला बुद्धि ही अमोल देणगी ईश्वरानें दिलेली असल्यामुळें झाडें, झुडपें, किंवा पशुपक्षी यांच्या इतकें सर्वस्वी परिस्थितीच्या आहारीं जावें लागत नाहीं. आपल्या बुद्धीच्या साहाय्यानें सृष्टिनियमांचा व इतर गोष्टींचा अभ्यास करून तो अडचणींतून निसटण्यासाठीं कांहीं तरी मार्ग काढतो. तरीपण तोहि परिस्थितीचा गुलामच असतो. त्याला एका परिस्थितींतून दुसर्‍या परिस्थितींत सामान्यतः जातां येतें, आपल्याला सोयीस्कर असा बदल परिस्थितींत करितां येतो किंवा आपल्याला अनकूल अशी परिस्थिति उत्पन्न करतां येते. पण त्या परिस्थितींत तो स्वतंत्र असतो, असें म्हणतां येणार नाहीं.

पण परिस्थिति म्हणजे आपल्या सभोंवार काय असेल तेवढेंच, असा याचा अर्थ नव्हे. असा अर्थ केल्यास तिचें खरें महत्त्व आपल्याला समजलें नाहीं असें होईल. वस्तुतः आपण आणि आपली परिस्थिति यांचा इतका निकट संबंध असतो कीं ती वेगळी दाखवितांच येत नाहीं, तिची मुळीं ताटातूटच करितां येत नाहीं. जन्मतःच माणसाबरोबर ती येते. इतकेंच नव्हे; तर पूर्व जीवन, पूर्व परिस्थिति यांचेंच माणूस हें फळ असतें. आपण वेगळे आणि आपली परिस्थिति वेगळी, असें आपण समजतों; पण वस्तुतः या दोघांची गुंतागुंत इतकी बेमालूम झालेली असते कीं, त्यांचें वेगळें अस्तित्व दाखवितांच येत नाहीं. तें अन्योन्यसापेक्ष असतें. त्याचप्रमाणें एक माणूस केव्हांहि दुसऱ्या माणसासारखा नसतो. त्या दोघांत थोडातरी फरक असतोच तशी दोन माणसांची परिस्थितिहि सारखी असूं शकत नाहीं. तींत कांहींतरी फरक हा असतोच. प्रत्येक माणसाच्या शरीराची जशी विशिष्ट प्रकारची ठेवण असते, तशी त्यांची परिस्थितिही विशिष्ट प्रकारची असते. या बाबतींत आणखी एक महत्त्वाची गोष्ट अशी असते कीं प्रत्येक माणसांत कांहीं फरक झाला कीं, त्याच्या परिस्थितींतहि थोडा फरक होतो. उलटपक्षीं परिस्थितींत फरक झाला कीं तिचें प्रतिबिंब व्यक्तीवरहि पडणें अपरिहार्य असतें. म्हणजे आपली परिस्थिति आपल्याबरोबर असते. तिची आणि आपली ताटातूट होत नाहीं, करितां येत नाहीं आणि एकावर होणारे बरेवाइट परिणाम दुसऱ्यावर होणें टाळतां येत नाहीं. हे संबंध अत्यंत गुंतागुंतीचे असतात. परिस्थितींत बदल होईल त्याप्रमाणें आपली राहाणी, आपल्या संवयी यांच्यांतहि बदल होतो. उलटपक्षीं आपली राहाणी, आपल्या संवयी बदलतात, त्याप्रमाणें आपल्या परिस्थितींत फरक पडतो.

ही परिस्थिति कशी बदलते याचें सामान्य उदाहरण द्यावयाचें असल्यास तें माणसांच्या स्थलांतराचें देतां येईल. मनुष्य खेड्यांतून शहरांत आला, शेतकऱ्याचा कामगार झाला, डोंगराळ प्रदेशांत राहाणारा मैदानांत राहावयास आला, उष्ण हवेंत राहाणारा थंड हवेंत राहावयास गेला किंवा याच्या उलट प्रकार झाला कीं त्याची परिस्थिति बदलते आणि तो गोंधळून जातो. ती बदलेल त्याप्रमाणें आपल्यांतहि बदल करून नवीन परिस्थितीशीं त्याला जुळतें घ्यावें लागतें. कांहीं माणसांना हें शक्य होत नाहीं. अशा स्थितींत त्यांना आपल्या मनाप्रमाणें वागावें असें वाटत असल्यास आपल्या परिस्थितींत तसा बदल त्यांनीं घडवून आणला पाहिजे, आपल्याला हवी तशी नवीन परिस्थिति उत्पन्न केली पाहिजे किंवा आपल्याला अनुकूल अशा परिस्थितींत जाऊन राहिलें पाहिजे. यापैकीं कोणताच मार्ग त्यांना पसंत नसेल किंवा शक्य नसेल तर शेवटीं निरुपाय होऊन 'आलीया भोगासीं असावें सादर' असें म्हणून प्रतिकूल परिस्थितीला बळी पडल्याशिवाय अन्य उपाय नाहीं. मनुष्य अगदीं रानटी स्थितींत असल्यापासून तों आजतागायत त्याला जर कोणता महत्त्वाचा प्रश्न

सारखा भेडसावीत असेल तर तो हा कीं, तो आणि त्याची परिस्थिति यांचा मेळ कसा घालावा.

आपली परिस्थिति वाईट आहे, प्रतिकूल आहे असें आपण म्हणतों, तेव्हां आपल्या पुष्कळशा गरजा आणि आपलें मनोगत पूर्ण होत नाहीं, त्यांची आपल्याला जुळवाजुळव करतां येत नाहीं, असा आपल्या म्हणण्याचा अर्थ असतो. कांहीं माणसें आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर आपल्या परिस्थितींत अनुकूल बदल करून घेऊं शकतात किंवा आपल्याला हवी तशी नवीन परिस्थिति उत्पन्न करूं शकतात, कांहीं सर्वांशीं नसलीं, तरी बहुतांशीं आपल्या परिस्थितीशीं जुळतें घेऊं शकतात; पण आपल्या परिस्थितीपुढें आपण हात टेंकले असें म्हणणारींच माणसें बहुसंख्य असतात.

## परिस्थितीप्रमाणें माणसांत बदल व्हावा लागतो.

माणसाची सुधारणा होत आहे तसें त्याचें आयुष्य अनेक प्रकारें घोटाळ्याचें, गुंतागुंतीचें, अडचणीचें, परावलंबीपणाचें होत आहे; तशी त्याची परिस्थितीहि त्रिकट, गुंतागुंतीची होत आहे आणि तिची जुळणी तितकीच कठीण होत आहे. त्यामुळें असमाधान, अस्वस्थता, अस्थिरता, हींहि वाढत आहेत. म्हणून या प्रतिकूल परिस्थितीशीं जुळतें घेण्यासाठीं, समाजांत होत असलेले बदल आत्मसात करण्यासाठीं माणसांची धडपड तो अगदीं गर्भाशयांत असल्यापासून सुरू होते, ती त्यांच्या आयुष्याचा अगदीं शेवट होईपर्यंत सारखी चालू असते. नव्हे; तसें करणें हें त्यांना भागच असतें. कारण प्रत्येक व्यक्ति जन्मतः अगदीं अपूर्ण असहाय्य, उघडी नागडी, भाषा नाहीं, कसली कल्पनाही नाहीं, सामाजिक दर्जा नाहीं, अशी जन्माला येते आणि परिस्थितीशीं तोंड देत आपलें आयुष्य आक्रमित असते. आयुष्य चालू ठेवणें-जिवंत रहाणें, म्हणजेच आपल्या परिस्थितीशीं जुळवून घेणें होय. त्याचप्रमाणें कुटुंब, लहान लहान समाजांचे गट यांचीहि अशीच धडपड चालू असते. नेहमीं बदलणाऱ्या समाजांत प्रत्येकाला दुसऱ्याशीं वागतांना नवीन नवीन अडचणी उत्पन्न होत असल्यामुळें त्याला आपल्या भावना, आपलें धोरण आणि आपली वागणूक यांत नेहमीं बदल करावा लागतो. आपल्या जुन्या गोष्टी बऱ्या आहेत किंवा वाईट आहेत, हा येथें प्रश्न नसतो. प्रश्न असतो तो हा कीं समाजाच्या गरजा आणि परिस्थिति हीं बदलत जातील-तीं सारखीं बदलतच असतात, त्याप्रमाणें त्यांच्याशीं जुळतं घेण्यासाठीं आपली वृत्ति, आपल्या कल्पना आणि आपली वागणूक हीं बदलत आहेत किंवा नाहींत. कारण ही जुळणी ज्या प्रमाणांत यशस्वी होईल, त्या प्रमाणांत समाजाचें स्थैर्य, समाजाचें सुख, समाजाची प्रगति होत राहील.

समाजांत अनेक माणसांचे अनेक प्रकारचे हितसंबंध असतात. समाज एकच

असला, तरी त्यांत शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक असे कांहीं फरक असतातच. त्यामुळें अनेक प्रकारचे बिकट वादग्रस्त प्रश्न उपस्थित होऊन निर-निराळे गट उत्पन्न होतात. म्हणून एकंदर समाजाचें हित डोळ्यापुढें ठेवून वेगवेगळ्या प्रकारचे हितसंबंध असलेल्या, परस्परविरोधी संस्था, संघ, गट यांना एकत्र आणून, त्यांच्यांत ऐक्य उत्पन्न करून, परस्परांचें हित परस्परांवर, सर्वांच्या सहकार्यावर अवलंबून आहे, याची त्यांना जाणीव करून देऊन सर्व समाजाला पोषक असें वातावरण निर्माण करण्याची व तें कायम टिकेल असे प्रयत्न करण्याची आवश्यकता असते. विशेषतः समाजांतील मागसलेले, अज्ञान अशिक्षित, दारिद्र्यानें गांजलेले, अडचणींनीं पिडलेले, नानाप्रकारें नागवणूक व पिळवणूक होत असलेले, मोठ्या समाजापासून अलग झालेले, प्रतिकूल परि-स्थितीशीं झगडतां झगडतां टेकीस येऊन अवनतीच्या मार्गास लागलेले लहानमोठे समाज सुधारून, त्यांना वरच्या पातळीवर आणणें, समान शिक्षण, समान हक्क, समान दर्जा, समान संधि देऊन ते स्वावलंबनानें आणि स्वाभिमानानें राहूं शकतील अशी सिद्धता करणें अत्यंत आवश्यक असतें. कारण तसें न झाल्यास सारा समाज मागें राहातो. शरीराचा एखादा भाग अधू झाल्यास सारें शरीर कमकुवत होतें, तसेंच अशा समाजाचेंहि होतें.

प्रत्येक देशांत कोठें ना कोठें असे कांहीं भाग, अशीं कांहीं ठिकाणें असतात कीं, तेथें अन्नाचाच नव्हे तर माणसाच्या जीवनाला अवश्य लागणाऱ्या साऱ्याच गोष्टींचा तुटवडा असतो. निसर्गानें अशी परिस्थितीच तेथें उत्पन्न केलेली असते कीं, माणसांच्या प्राथमिक गरजा प्रयत्न करूनहि भागणें शक्य नसतें. तेथें श्रमांना किंमत नसते. कारण लोकांना कामच मिळत नाहीं. श्रम करणारे पुष्कळ आणि कामाचा अभाव अशी येथें स्थिति असते. श्रम करून पैसे अधिक मिळवावे किंवा कांहीं सुधारणा करावी, असें कोणी म्हणेल तर त्याला तसें करण्याला कांहीं वावच नसतो. याला दारिद्र्य ( Poverty ) म्हणतात. ही झाली कांहीं मागासलेल्या खेड्यांची स्थिति. उद्योगधंद्यानीं गजबजलेल्या आणि श्रीमंतीबद्दल प्रसिद्ध असलेल्या शहरांतल्या कांहीं भागांत दुसऱ्या प्रकारचें दारिद्र्य असतें. तें असें कीं, राहणीची पातळी अगदीं कमी प्रतीची, गचडीची वस्ती, अतिश्रम, रोगराई, सुखी, समाधानी जीवनाला लागणाऱ्या गोष्टींचा अभाव व तदनुषंगिक अनेक प्रकारच्या अडचणी तेथें असतात. पहिल्या प्रकारची स्थिति निसर्गानें उत्पन्न केलेली असते; तर दुसऱ्या प्रकारच्या स्थितीला समाजांतील कांहीं माणसांचा स्वार्थ कारणीभूत झालेला असतो. पण त्याची कारणें कांहींही असलीं तरी एकंदर समाजाच्या स्वास्थ्याच्या दृष्टीनें त्यांची सुधारणा होणें अत्यंत आवश्यक असतें.

## विषयप्रवेश

# सर्वांगीण विकासाचा मार्ग मोकळा करून देण्याच्या प्रयत्नांना समाजसेवा म्हणतात.

वर म्हटलेंच आहे कीं परिस्थितींत आपल्याला हवा तसा बदल करून तिच्यावर कुरघोडी करणारीं, आपल्याला हवी तशी नवीन परिस्थिति उत्पन्न करणारीं किंवा आपल्याला अनुकूल अशी परिस्थिति दिसेल, तेथें प्रवेश करून आपलें बस्तान बसविणारीं कांहीं भाग्यशाली असामान्य माणसें असतात, कांहीं माणसें प्रतिकूल परिस्थितीशीं कसें तरी जुळतें घेऊन असमाधानानेंच कां होईना, कसातरी काळ कंठीत असतात, पण कांहींना तें मुळींच शक्य होत नाहीं. यांत विशेषतः अडाणी, अशिक्षित, आर्थिक स्थिति वाईट असलेल्या व्यक्ति किंवा समाज असले तर त्यांना या झगड्यांत माघार घेतल्याशिवाय दुसरा मार्गच नाहीं, असें होतें. सुशिक्षित, सज्ञान, सधन, पुढारलेले लोक व त्यांचे गट अशा लोकांना सहाय्य करण्याऐवजीं पुष्कळदां साहाय्य करण्याच्या मिषानें आपला स्वार्थ साधण्यासाठीं अनेक प्रकारें नाडतात, छळतात, त्यांची पिळवणूक करितात आणि त्यांची सुधारणा तर होऊं देत नाहींतच; पण आपलें बस्तान कायम टिकण्यासाठीं ते त्या स्थितींत कायम राहातील, असे प्रयत्न चालू ठेवतात. त्यामुळें या लोकांची अधिकच असहाय्य स्थिति होते. परिस्थिति त्यांच्या आटोक्याबाहेर जाते, आपल्या भवितव्याविषयीं ते निराश होतात आणि मग त्यांची अधिकच पीछेहाट होते. म्हणून अशा प्रतिकूल परिस्थितींत सांपडलेल्या, अडचणींत असलेल्या, आपल्या परिस्थितीला तोंड कसें द्यावें हें न कळणाऱ्या व्यक्तींना किंवा समाजांना अनेक प्रकारें साहाय्य करून त्यांचीं दुःखें, त्यांच्या अडचणी, त्यांचीं संकटें नाहींशीं करून त्यांच्या सर्वांगीण प्रगतीचा, उन्नतीचा, विकासाचा मार्ग मोकळा करून देण्याच्या प्रयत्नांना समाजसेवा म्हणतात कविश्रेष्ठ रवींद्रनाथ टागोर यांनीं आपल्या एका कवितेंत उजाडतांच आपल्या दारांतला कचरा अगदीं कसोशीनें साफ करणारा झाडूवाला हाहि एक अगदीं उच्च दर्जाचा समाजसेवक असून तो समाजाला मार्गदर्शक होतो, असें म्हटलें आहे, तें याच अर्थानें. मात्र हें कार्य समाजहितासाठीं, समाजसेवेच्या बुद्धीनें, सेवावृत्तीनें, निदान समाजाचें जरासुद्धां अनहित होणार नाहीं, अशा रीतीनें झालें पाहिजे.

समाजाच्या हिताची थोडीसुद्धां पर्वा न करितां केवळ स्वार्थासाठीं धडपडणारीं माणसें सोडल्यास समाजाची सुधारणा, समाजाचें हित, समाजाची प्रगति कोणत्या ना कोणत्या प्रकारें करणारी प्रत्येक व्यक्ति समाजसेवकच असते, यांत मुळींच शंका नाहीं. पण या कार्यांचें वर्गीकरण करून समाजसेवा हा शब्द विशिष्ट अर्थानें, विशिष्ट प्रकारच्या कार्यासाठीं, हल्लीं योजला जातो. हें विशिष्टीकरण अगदीं अलीकडेच अस्तित्वांत आलेलें असलें तरी समाजसेवा करणाऱ्या व्यक्ति किंवा संस्था पूर्वीं

अस्तित्वांत नव्हत्या किंवा समाजसेवेचें कार्य पूर्वीं होतच नव्हतें, असें मात्र नाहीं. तें फार प्राचीन काळापासून चालू आहे. त्याचें स्वरूप, त्याचें तत्त्वज्ञान, त्याच्या मागील भावना या मात्र वेगवेगळ्या काळीं वेगवेगळ्या होत्या. दानधर्म, परोपकार, दुःखपरिहार अशा नांवाखालीं भूतदयेनें किंवा धार्मिक भावनेनें प्रेरित होऊन निरनिराळ्या प्रकारचीं समाजसेवेचीं कामें फार पुरातन काळापासून भारतांत चालत आलेलीं आहेत.

समाज म्हटला कीं, त्यांत माणसांना अडचणींच्या आणि संकटांच्यावेळीं मदत करणारीं कांहीं माणसें असतातच. तसेंच एकंदर समाजावर येणारीं संकटें, दुःखें किंवा एकंदर समाजाचा संबंध असलेले प्रश्न यांना संघशक्तीनें तोंड देणें भागच असतें. शिवाय आपले लोक धार्मिक व परोपकारी वृत्तीचे असल्यामुळें भारतांत अगदीं प्राचीन काळापासून निरनिराळ्या स्वरूपांत समाजसेवेचीं कामें चालत होतीं शिवाय जातिसंस्था, एकत्र कुटुंबपद्धती, ग्रामपंचायती वगैरे संस्था या दृष्टीनें मोठें कार्य करीत होत्या. प्रत्येक खेडें स्वावलंबी करण्याचे प्रयत्न होत असल्यामुळें लोकांच्या अडचणी, दुःख आणि संकटें कमी करण्यासाठीं उपाययोजना होत होती. एकत्रकुटुंबपद्धतीमुळें मिळवत्या माणसांबरोबरच न मिळवत्या अनाथअपंगांच्याही गरजा हक्कानें भागविल्या जात होत्या. त्यामुळें कुटुंबांतील निराधार माणसें कुटुंबाच्या बाहेर जात नव्हतीं. इतकें असूनहि कोणी निराधार झाल्यास त्याची सोय त्याची जात, निदान त्याचा गांव करीत होता. त्यामुळें अशा लोकांकरितां स्वतंत्र संस्था किंवा आजच्यासारख्या निरनिराळ्या प्रकारच्या विमायोजना अस्तित्वांत नव्हत्या व त्यांची आवश्यकताही भासत नव्हती.

इंग्रजी राज्य आल्यावर वरील परिस्थितींत बदल होऊं लागला. इंग्लंडांतील औद्योगिक क्रांतीचे अनिष्ट परिणाम इकडेहि होऊं लागले. खेड्यांतील आणि शहरांतील घरगुती धंदे नाहींसे होऊन मोठे कारखाने जन्मास येऊं लागले आणि त्यामुळें खेड्यांची आणि शहरांची-विशेषतः खेड्यांची दुर्दशा होऊं लागली. एकंदर कुटुंबव्यवस्था बिघडून नाना प्रकारचे बिकट प्रश्न उपस्थित झाले. आणि सामाजिक जीवन कठीण होऊं लागलें.

## दानाचा जुना दृष्टिकोन

पूर्वीं लोकांची अशी समजूत असे कीं, अस्थिर बुद्धि, बेजबाबदार आणि उडाववृत्ति, अदूरदर्शीपणा, अशा प्रकारच्या वैयक्तिक स्वभावदोषांमुळें लोकांना दारिद्य येतें. त्यांच्या दारिद्याचा बाहेरील परिस्थितीशीं कांहींएक संबंध नसतो. म्हणून माणसाला कामधंदा नसला, तर काम मिळत नाहीं, म्हणून नव्हे; तर वर निर्दिष्ट केलेल्या त्यांच्या वैयक्तिक स्वभावदोषांमुळें त्यांना बेकार राहावें लागतें. असें

मानण्यांत येई. तसेंच एवढा मोठा समाज त्यांत कांहीं गरीब, कांहीं व्यसनी, कांहीं भिकारी, कांहीं आधळेपांगळे, कांहीं गुन्हेगार वृत्तीचे असे लोक असावयाचेच, त्यांनीं पूर्वजन्मीं कांहीं पापें केलीं असतील, त्याचे परिणाम त्यांना आज भोगावे लागत आहेत आणि त्यांनीं ते भोगलेच पाहिजेत, त्याशिवाय त्यांना सुटका नाहीं. म्हणून त्यांची कींव करून त्यांना थोडाफार दानधर्म करणें, येवढें आपलें कर्तव्य, त्यापेक्षां अधिक कांहीं करणें शक्य नाहीं व कांहीं अधिक करण्याची आवश्यकताहि नाहीं, अशा दृष्टीनें या प्रश्नाकडे पाहाण्याची व केवळ भूतदयेनें किंवा धार्मिक भावनेनें प्रेरित होऊन दान करण्याची लोकाची प्रवृत्ति असे. अशा रीतीनें दान केल्यास आपल्या पापाचें क्षालन होऊन स्वर्गांत आपल्याला मुक्ति मिळेल, असेंहि पुष्कळ श्रीमंत लोकांना वाटे. ब्राह्मण, साधु, अनाथ यांना मदत करण्यासाठीं स्थापन झालेलीं अन्नसत्रें, सदावर्तें, धर्मशाळा यांचा हेतु आणि कार्य हीं आपण पाहिलीं कीं, या जुन्या दान-पद्धतीची आपल्याला बरोबर कल्पना येते.

पण या दानपद्धतीमुळें दान घेणाऱ्या लोकांची संख्या कमी होत नव्हती, उलट ती वाढतच होती. इतकेंच नव्हे तर तिच्यामुळें खरे गरजू, दीनदुबळे, आंधळे, अनाथ, अपंग अशा दानपात्र लोकांना साहाय्य न होतां त्यांच्या हालअपेष्टा तशाच चालू होत्या आणि लबाड, ढोंगी, धटिंगण अशा लोकांना त्याचा फायदा मिळून त्यांची संख्या सारखी वाढत होती. हिंदुस्थानची राजसत्ता इंग्लंडच्या हातीं गेल्यावर हि या परिस्थितींत फारसा बदल झाला नाहीं पण इंग्लंडमध्यें दानपद्धतीला नवें वळण लावण्याचे जे प्रयत्न सुरू झाले होते, त्यांचा अभ्यास येथील सुशिक्षित लोक करूं लागले आणि इंग्लंडमधील समाजसेवा करणाऱ्या संस्थांच्या धर्तीवर इकडेहि निरनिराळ्या प्रकारें समाजसेवा करणाऱ्या संस्था निघूं लागल्या. आज मुंबई शहरांत समाजसेवेचें काम प्रामुख्यानें करणाऱ्या समाज सेवासंघ मुंबई, यासारख्या संस्थांनीं चाळीस पन्नास वर्षांपूर्वीं म्हणजे त्या संस्था स्थापन झाल्या त्यावेळीं, आपल्यापुढें जें ध्येय ठेवलें व जो कार्यक्रम आंखला तो पाहिल्यास या म्हणण्याची सत्यता पटेल.

## समाजसेवेच्या नवयुगाला आरंभ

स. १९०५ साली कै. गो. कृ. गोखल्यांच्या हिंद सेवक समाजाची (Servants of India Society) स्थापना झाली आणि तिच्या सभासदांपैकीं मुख्यतः कै. गो. कृ. देवधर, कै. ठक्करबाप्पा, श्री. ना. म. जोशी यांनीं शिक्षण, कामगार चळवळ, सहकारी चळवळ, दुष्काळनिवारणाचें कार्य, गुन्हेगार, हरिजन, वनवासी यांची सुधारणा वगैरे अनेक प्रकारच्या समाजसेवेच्या योजना हातीं घेतल्या. अनेक संस्था स्थापन केल्या आणि त्या आपल्या कारकिर्दीत यशस्वी केल्या. इतकेंच नव्हे तर आजहि त्या नमुनेदार संस्था म्हणून चालत आहेत. शास्त्रोक्तपद्धतीनें समाजसेवा

मोठ्या प्रमाणांत करण्यास भारतांत मुख्यतः वरील थोर पुरुषांनीं आरंभ केला असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं.

पाश्चात्य राष्ट्रांत, मुख्यतः इंग्लंडांत गरीब लोकांच्या स्थितीचा अभ्यास, दान देणाऱ्या संस्थांची संघटणा, दान मागणाऱ्या लोकांची कसून शास्त्रोक्त पद्धतीनें चौकशी, त्यांना तशी स्थिति येण्याला ज्या गोष्टी कारण झाल्या असतील त्यांची चिकित्सा, त्यांच्या हकीगतीची नोंद या गोष्टी आज केल्या जातात; पण इंग्लंडांत अठराव्या शतकाच्या उत्तरार्धांत आणि एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धांत औद्योगीकरण प्राथमिक अवस्थेंत असतांना समाजसेवा करण्याचे मार्ग मुख्यतः जुनेच होते. तुरुंगांची आणि वेड्यांच्या हॉस्पिटलांची सुधारणा, म्हाताऱ्या माणसांची तरतूद करणारीं गृहें, आजाऱ्यासाठीं रुग्णालयें, गरिबांना पैशाच्या आणि इतर मार्गांनीं मदत, मुलांच्या शिक्षणाची सोय व्हावी म्हणून नवीन शाळागृहें उघडणें, अशा प्रकारचीं कामें या दृष्टीनें चालत. पण एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत औद्योगीकरण जोरांत सुरू झाल्यामुळें नानाप्रकारचे नवीन नवीन प्रश्न उपस्थित होऊं लागले. शहरांतून कंगाल स्थिति, घाण, गलिच्छपणा वाढूं लागला. खाजगी व सरकारकडूनहि अधिकाधिक दानधर्म होऊं लागला. आणि त्यामुळें झालेल्या परिणामांची प्रतिक्रिया म्हणून दान करणाऱ्या संस्थांची संघटणा करणारी संस्था (Charity Organisation Society) स. १८६९ मध्यें जन्मास आली. औद्योगीकरणांतून आणखी तीन प्रकारच्या चळवळी जन्मास आल्या. त्या म्हणजे सामाजिक परिस्थितीची पहाणी, समाज सेवकांच्या वसाहती आणि शहरांतील व खेड्यांतील सुखसोई वाढविण्याचा प्रयत्न करणाऱ्या संस्था या होत. पुढें लोकांच्या राहाणीचा दर्जा वाढूं लागला, कामाचे तास थोडे कमी झाले, कामगारांना थोडी फूरसत मिळूं लागली, तेव्हां प्रौढशिक्षणाची चळवळ सुरू झाली.

लोकांना दिलेली मदत किंवा सल्ला याचे परिणाम काय होतात, हें वेळोवेळीं पाहाणें, तसेंच गरीब लोकांच्या वस्तींत राहून, त्यांच्या स्थितीचें प्रत्यक्ष निरीक्षण करणाऱ्या समाजसेवकांच्या वसाहतींची स्थापना करणें वगैरे नवीन दिशेनें प्रयत्न चालू झाले होते. दान देण्याचा दृष्टिकोन हळू हळू बदलून त्याला नवीन वळण लागलें होतें. दान देणारांपेक्षां दान घेणाराच्या दृष्टीनें विचार करण्यांत येऊं लागला होता. तथापि यांत खरा आणि मूलभूत बदल अगदीं अलीकडे म्हणजे पहिल्या महायुद्धापासून झाला. तोंपर्यंत समाजसेवा म्हणजे काय, याची व्याख्याहि अस्तित्वांत नव्हती. आणि तसें पाहिलें तर आजहि तींत इतकी प्रगति होऊनहि, ती निश्चित अशी सांगणें कठीण आहे. कारण समाजसेवेचा व्याप सारखा वाढत आहे. निरनिराळ्या सामाजिक प्रश्नांचें–रोगांचें मूळ कशांत आहे. तें उत्पन्न होण्यास कोणती परिस्थिति कारणीभूत होत आहे, तें शोधून काढून ती मुळांत नाहींशी होईल, असे शास्त्रोक्त पद्धतीने, केवळ भावनावश होऊन वैयक्तिक हितासाठीं नव्हे, तर साऱ्या

समाजाच्या हितासाठीं, प्रयत्न करणें हें आजचे समाजसेवक आपलें कर्तव्य मानतात. मनुष्याला सुखी जीवन जगतां येण्यासाठीं त्याच्या शारीरिक, मानसिक आणि सामाजिक परिस्थितीचा पूर्ण मेळ बसावा लागतो. हे व्यक्ति-व्यक्तींतील आणि व्यक्ति आणि समाज यांच्यामधील संबंध नुसते जुळवून घेणें, सुखावह करणें; इतकेंच नव्हे तर तें समाजाचें हित, समता, न्याय, सामाजिक जबाबदारी या तत्त्वांच्या पायावर करणें आणि तें कायम टिकून पुढें त्याची जुळवाजुळव करण्याची—समाजसेवेची—मुळीं आवश्यकताच उरणार नाहीं अशी परिस्थिति उत्पन्न करणें, हें समाजसेवेचें ध्येय होय.

## भारतीय व आंतरराष्ट्रीय समाज–सेवा परिषदा

आंतरराष्ट्रीय समाजसेवा परिषद बेलजियमचे डॉ. रेन सँड यांनीं स्थापन केली आणि तिचें पहिलें अधिवेशन सन १९२८ मध्यें पॅरिस येथें भरलें. त्यानंतर तिचीं आणखी तीन अधिवेशनें निरनिराळ्या देशांत भरून पांचवें अधिवेशन पुन्हा पॅरिसमध्यें सन १९५० मध्यें भरलें. सहावें अधिवेशन भारतांत मद्रास येथें सन १९५२ च्या अखेरीला झालें. भारतीय समाजसेवापरिषदेचीं आतांपर्यंत सहा अधिवेशनें झालीं. सहावें अधिवेशन हैद्राबाद येथें सन १९५३ च्या अखेरीला झालें. वरील परिषदांच्या बहुतेक अधिवेशनांत समाजसेवेची व्याख्या ठरविण्याचे प्रयत्न झाले. परंतु समाज सेवेंत अंतर्भूत होणाऱ्या अनेक प्रश्नांचें स्वरूप निश्चित करण्याच्या दृष्टीनें त्यांचा पुष्कळ उपयोग झालेला असला, तरी सर्वमान्य तर नाहींच पण एखाद्या राष्ट्राला तरी मान्य होईल, अशी समाजसेवेची व्याख्या त्यांना तयार करितां आली नाहीं. सन १९५० मध्यें पॅरिस येथें भरलेल्या आंतरराष्ट्रीय समाज सेवा परिषदेच्या पांचव्या अधिवेशनांत प्रो. पॅरिसॉट यांनीं तर असें दाखवून दिलें कीं, समाजसेवेची व्याख्या किंवा तिच्या मर्यादा ठरविणें हेंच मुळीं योग्य नाहीं. अशा व्याख्या ठरवित बसण्यापेक्षां राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिस्थितीमुळें माणसाच्या जीवनांत उत्पन्न होणाऱ्या व सारख्या बदलत राहाणाऱ्या बिकट प्रश्नांना व्यावहारिक उपाय शोधून काढणें, हें अधिक महत्त्वाचें आहे. या म्हणण्यांत खरोखरी पुष्कळ तथ्य आहे. कारण समाजसेवेचें क्षेत्र सारखें वाढत आहे आणि कोणत्या गोष्टींचा या कार्यांत अंतर्भाव होतो, हें ठरविण्यापेक्षां, कोणत्या गोष्टी त्यांत येऊं शकत नाहींत, हेंच ठरविणें आज कठीण झालें आहे.

## समाजसेवेच्या कक्षेंत येणारें कार्य

इंग्लंडमध्यें सरकारतर्फे विम्याच्या व इतर मार्गांनीं ज्या सामाजिक तरतुदी करण्यांत येत होत्या, त्यांची दुसऱ्या महायुद्धानंतर कशी पुनर्घटना करावी, हें सुचविण्याकरितां तेथील सरकारनें सन १९४१ मध्यें लॉर्ड बेव्हरीज यांची नेमणूक

केली होती. त्यांनीं आपल्या सुप्रसिद्ध अहवालांत असें म्हटलें आहे कीं "समाजाच्या प्रगतीच्या आड येणाऱ्या टंचाई, रोग, अज्ञान, घाण व आळस या पांच राक्षसांचा संहार करण्यासाठीं सरकारनें जनतेचें साहाय्य घेऊन सामाजिक सुरक्षिततेच्या व्यापक योजनेची जबाबदारी आपल्या अंगावर घ्यावी." आपल्याकडे तर या पांच राक्षसांचे थैमान अधिकच चालत आहे. त्यांचा समूळ नायनाट करणें, यापेक्षां दुसरें महत्त्वाचें समाजसेवेचें कार्य तें कोणतें ? सारांश ज्यांना आपली स्थिति कशी सुधारावी, हें कळत नाहीं, किंवा आपलें आयुष्य अधिक सुखावह करण्याकरितां आपल्या परिस्थितींत कोणते फेरफार करावे, कशी जुळवाजुळव करावी हें समजत नाहीं, किंवा समजूनहि करतां येत नाहीं असे गरीब, मागासलेले, अनाथ, दीनदुबळे, आंधळेपांगळे, मुकेबहिरे, व्यंगयुक्त, आजारी, वनवासी गुन्हेगार प्रवृत्तीचे, निर्वासित, भूकंप, दुष्काळ, अतिवृष्टि, अनावृष्टि अशासारख्या दैवी आपत्तींनीं पीडित, अज्ञान, घाण यांत खितपत पडलेले, अन्न, वस्त्र किंवा रहाण्यास जागा नसलेले लोक किंवा समाज; यांना संघटित, सोपपत्तिक आणि शास्त्रीय पद्धतीला धरून साहाय्य करणें, वेश्याव्यवसाय, दारू, गुन्हेगारी, जुगार, भिक्षा मागणें अशासारख्या व्यसनांची आणि अरिष्टांचीं कारणें शोधून काढून त्यांचा प्रतिकार करणें आणि त्यांच्या आहारीं गेलेल्या दुर्दैवी माणसांचें चारित्र्य सुधारून त्यांना समाजाचे कर्तृत्ववान् घटक बनविणें; गाजावाजा न करितां निरपेक्ष व कार्यक्षम सेवा हें ध्येय असलेल्या व पक्ष, धर्म, जात, प्रांत, सामाजिक दर्जा यापेक्षां मानवतेच्या दृष्टीनें पहाण्यास मुलांमुलींना शिकविणाऱ्या बालचमू, बालिकाचमू अशा सारख्या चळवळींना उत्तेजन देणें; प्रौढ शिक्षणाला मदत करणें; स्वावलंबन, सहकार्य, संघटना यांचें शिक्षण देणाऱ्या सहकारी चळवळी सारख्या चळवळींना पुरस्कार करून लोकांची सांपत्तिक स्थिति सुधारणें; आणि या साऱ्या गोष्टींचें शिक्षण देऊन कर्तृत्ववान; समाजाबद्दल आस्था असलेले, सेवाभावी समाजसेवक तयार करणें, थोडक्यांत समाजांतील अनाथ, अशक्त, अधू, समाजविनाशक, अशा लोकांची शक्य ती सुधारणा करून त्यांना इतर सामान्य माणसांप्रमाणें कार्यक्षम करणें, स्वावलंबी करणें, प्रतिष्ठितपणें जीवन जगतां येईल असें करणें, हा समाजसेवेचा हेतु आहे.

समाजसेवा अमुक एका वर्गाकरितां आहे किंवा अमुक एका वर्गानेंच ती करावी अशा प्रकारचे निर्बंध नाहींत. समाजघटनेंत दोष आहेत आणि ते नाहींसे करण्याकरितां समाज सेवेची आवश्यकता आहे. म्हणून तेवढीच एक गोष्ट केली कीं समाजसेवा झाली असेंहि म्हणतां येणार नाहीं. सर्वांना सारखा न्याय मिळावा, सुखाची वृद्धि व्हावी, सर्वांना स्वातंत्र्य असावें आणि आपलें सुख व स्वास्थ्य वाढविण्याला प्रत्येक माणसाला सारखी संधि मिळावी हा समाजसेवेचा हेतु आहे. म्हणून समाज सेवा एका व्यक्तीनें वर्गानें किंवा एका संस्थेनेंच केली पाहिजे किंवा

अमुक एका तऱ्हेनेंच केली पाहिजे असें मुळींच नाहीं. तसेंच अमुक एका कार्यांत समाजसेवा करण्याची संधि मिळत नाहीं, असेंहि होत नाहीं. कोणीहि मनुष्य कोणतेंहि काम करीत असला तरी त्यांत समाजसेवा करण्याची संधि त्याला मिळते. पण त्या दृष्टीनें, त्या भावनेनें, त्या श्रद्धेनें त्यानें त्या कार्याकडे पाहिलें पाहिजे. नाहींतर त्याला कशांतच समाजसेवा दिसणार नाहीं. याकरितां ज्या ज्या मार्गांनीं समाजसेवेचा उपरिनिर्दिष्ट उद्देश फलदायी होईल, असें वाटेल त्या त्या मार्गांनीं प्रयत्न करणें–सर्वोदयासाठीं–सर्वांच्या कल्याणासाठीं झटणें, हें प्रत्येक व्यक्तीचें कर्तव्य आहे. अनेकांनीं अनेक मार्गांनीं आणि निःस्वार्थ बुद्धीनें साहाय्य केल्याशिवाय समाजाची वाढ–सर्वोदय–होत नाहीं. आज भारताला मुख्यतः याच गोष्टीची अत्यंत आवश्यकता आहे.

## समाजसेवा व समाजसुधारणा यांचे परस्पर संबंध

समाजसेवा व समाजसुधारणा यांचे परस्पर संबंध कोणते आहेत हें लक्षांत ठेवणें आवश्यक आहे. भारतांत समाजसुधारणा हा शब्द इंग्लंडांतल्यापेक्षां कांहींसा निराळ्या आर्थानें वापरला जातो. समाजाला उपयुक्त अशा सुधारणा करणें हा उद्देश दोहोंकडे सारखाच आहे. तथापि इंग्लंडांतील समाजसुधारणेमध्यें सामाजिक चालीरीतींचा फारसा संबंध येत नाहीं. तिकडे स्त्रियांच्या शिक्षणाला आडकाठी नाहीं, बालविवाहाची चाल प्रचारांत नाहीं, विधवाविवाहास प्रतिबंध नाहीं, स्त्रियांना बुरख्यांत ठेवण्याची पद्धत नाहीं, जातीपोटजाती नसल्यामुळें रोटीबेटी व्यवहाराला बंदी नाहीं, स्पृश्यास्पृश्यता अस्तित्वांत नाहीं, त्यामुळें याबाबतींत सुधारणा करण्याकरितां चळवळ करण्याची तिकडे अवश्यकता भासत नाहीं. परंतु भारतांतील परिस्थिति याच्या अगदीं उलट आहे. इकडील समाजसुधारकांना वरील गोष्टींकडे विशेष लक्ष द्यावें लागतें. उलट पाश्चात्य देशांतील सुधारणेशीं सामाजिक चालीरीतींचा कांहीं संबंध येत नसल्यामुळें गरीब लोकांना स्वच्छ, हवाशीर, भरपूर जागा असलेलीं घरें स्वस्त भाड्यानें पुरविणें, म्हाताऱ्या माणसांना पेन्शन मिळण्याची व्यवस्था करणें, शिक्षण प्रसार, तुरुंगांची सुधारणा इत्यादि गोष्टींचा समाजसुधारणेंत अंतर्भाव होतो. येथें समाजाच्या प्रगतीच्या आड येणाऱ्या अनिष्ट चालीरीती कैक शतकें रूढ असून अज्ञ जनांच्या समजुतीप्रमाणें त्यांना धर्माचें पाठबळ आहे, असें समजलें जातें. इकडील परिस्थितीच्या दृष्टीनें या चालीरीतीमध्यें इष्ट तो फेरफार करणें, अगदींच वाईट असतील त्या अजिबात टाकून देणें आणि रुढी, परंपरा आणि धर्माज्ञा यांपेक्षां बुद्धिप्रामाण्यावर अधिक भर देणें हेंच इकडे समाजसुधारकांचें महत्त्वाचें काम आहे. इकडील समाजसुधारणेशीं सामाजिक चालीरीती व त्यांना आधारभूत म्हणून समजला जाणारा धर्म यांचा संबंध येत असल्यामुळें पाश्चात्य देशांतील समाज-

सुधारणेपेक्षां इकडील समाजसुधारणेचें स्वरूप भिन्न आहे. पाश्चात्य देशांतील समाजसुधारणेशीं सामाजिक चालीरीती व धर्म यांचा कांहींच संबंध येत नाहीं, असें म्हटलें तरी चालेल.

समाजसुधारणेंत जशा कांहीं अतिशय वादग्रस्त बाबी आहेत तशा समाजसेवेंत नाहींत. जुन्या व नव्या दोन्ही मतांच्या लोकांना समाजसेवेमध्यें एकत्रपणें व सहकारितेनें काम करण्यास पुष्कळ जागा आहे. शिवाय वर निर्दिष्ट केलेल्या सामाजिक प्रश्नांच्या बाबतींत गेल्या चाळीस पन्नास वर्षांपासून सुधारणा होत असून त्यांतील स्त्रीशिक्षण, बालविवाह यांसारखे कांहीं प्रश्न आज सुटल्यासारखे आहेत. आणि समाजसेवेची व्याख्याहि इतकी व्यापक होत आहे कीं निव्वळ समाजसुधारणेंत अंतर्भूत होतील असे प्रश्न अगदीं थोडे राहाणार आहेत.

खरें म्हटलें; तर समाजाची सर्वांगीण सुधारणा करावयाची म्हणजे तींत आपोआपच सामाजिक सुधारणेचाहि अंतर्भाव होतो. कारण व्यक्तिव्यक्तींतील मनुष्यकृत फरक नाहींसे करून समाज अखंड, एकसंध, एकात्म व्हावा व त्याची सर्वांगीण प्रगति व्हावी हाच कोणत्याहि सुधारणेचा आद्य हेतु असला पाहिजे. म्हणूनच गेल्या शतकांत राजकीय सुधारणा करण्याचे प्रयत्न भारतांत सुरू झाले, तेव्हां राजकीय सुधारणेबरोबरच सामाजिक सुधारणेचीहि आवश्यकता आहे, असें पुष्कळ पुढाऱ्यांना वाटले आणि स. १८८५ मध्यें कॉंग्रेसची स्थापना होऊन संघटित राजकीय चळवळीला आरंभ झाला; त्याच्या बरोबरच सामाजिक सुधारणेची चळवळहि सुरू झाली. पण राजकीय हक्क मिळाले कीं सामाजिक सुधारणा करण्यास अवधि लागणार नाहीं असें प्रतिपादन करणारा एक वर्ग तत्कालीन पुढाऱ्यांत होता. हा वाद पुढें बराच विकोपाला गेला आणि राजकीय चळवळ जशी वाढत गेली तसें सामाजिक चळवळ करणारांचें महत्त्व कमी मानण्यांत येऊन त्यांना कमी लेखण्याचेहि प्रयत्न झाले पुढें ही चळवळ थंडावत जाऊन तिचें कार्यहि थांबलें. पुढें महात्मा गांधींनाहि हीच अडचण भासली. आणि त्यांना स्त्रीशिक्षण, अस्पृश्यतानिवारण वगैरे समाजसुधारणेचीं विधायक कार्यें राजकीय चळवळीच्या आड येणार नाहींत अशा सावधगिरीनें चालवावीं लागलीं. पण तें त्यांच्या प्रभावी व्यक्तित्वामुळें शक्य झालें. तथापि आज स्वराज्य मिळूनहि – अनेक प्रकारचे सामाजिक कायदे करूनहि — समाजसुधारणेच्या अभावीं देशांत एकराष्ट्रीयतेची भावना उत्पन्न करण्यास कशा अडचणी येत आहेत, हें पाहिलें कीं राजकीय सुधारणेबरोबरच सामाजिक सुधारणा झाली पाहिजे, असें म्हणणाऱ्या तत्कालीन पुढाऱ्यांच्या दूरदर्शित्वाची बरोबर कल्पना येते. सुदैवानें समाजसुधारणेची चळवळ पुन: सुरू करण्याचे प्रयत्न चालू आहेत. महाराष्ट्र सामाजिक परिषद सन १९५३ मध्यें पुण्याला भरली आणि तिचे अध्यक्ष न्या.

प्र. बा. गजेंद्रगडकर, कै. न्या. म. गो. रानड्यांच्याप्रमाणेंच ती उत्साहानें चालवून तिचें सर्वतोपरी योग्य मार्गदर्शन करतील यांत संशय नाहीं.

सामाजिक सुधारणेचा पुरस्कार करणारांनीं प्रथम स्त्रीशिक्षणावर विशेष भर दिला. स्त्रीच्या उन्नतीच्या आड येणाऱ्या गोष्टी नाहींशा करून तिची जर सर्वांगीण सुधारणा करतां आली, ती जर उपयुक्त नागरीक झाली, तर तिच्याबरोबर तिचें कुटुंब व कुटुंबाबरोबर सारा समाज सुधारण्याला वेळ लागणार नाहीं, हें त्यांना अवगत होतें. गु. धों. के. कर्वे यांच्या पुण्यांतील स्त्रीशिक्षण संस्था, पुण्याचें सेवासदन, मुंबईचें सेवासदन, मुंबईचा समाजसेवासंघ वगैरे संस्थांचें स्त्रियांच्या बाबतींतील कार्य याच गोष्टींची साक्ष देत आहे. पण या संस्था किंवा त्यांनीं चालविलेलें विविध कार्य पाहिलें कीं, एक महत्त्वाची गोष्ट डोळ्यांपुढें येते ती ही कीं, या संस्था जशा समाजसुधारणेच्या दृष्टीनें महत्त्वाच्या आहेत तितक्याच त्या समाजसेवेच्या दृष्टीनें महत्त्वाच्या आहेत. तसेंच हरिजनांची सुधारणा, वनवासींची सुधारणा, स्त्रियांची सुधारणा व दुसरे अनेक सामाजिक प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न करणारे गु. धों. के. कर्वे, कै. ठक्करबाप्पा, कै. गो. कृ. देवधर, श्री. ना. म. जोशी वगैरे अनेक लोकप्रिय पुढारी जसे समाज सुधारक तसे समाजसेवकहि होते व आहेत. सारांश समाजसुधारणा आणि समाजसेवा यांत थोडा फरक असला, बहुजनसमाज रुढीप्रिय असल्यामुळें त्याचा समाजसुधारणेला थोडा विरोध असला तरी वस्तुतः त्यांत फरक मानण्याचें कारण नाहीं. समाजहितासाठीं - समाजाच्या कल्याणासाठीं दोहोंचीहि सारखीच आवश्यकता आहे. तीं जुळी भावंडें आहेत. त्यांत आज दिसत असलेला फरक हळू हळू नाहींसा व्हावयाचा आहे. म्हणून वरील थोर पुढाऱ्यांचें उदाहरण डोळ्यांपुढें ठेवून दोन्ही क्षेत्रांत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनीं परस्परांना साहाय्य करून एकंदर समाजाची प्रगति होईल, असें पाहावें.

## मूळ शोधण्याची आवश्यकता

मागील पिढीपेक्षां आज आपल्या ज्ञानांत पुष्कळ भर पडली आहे. समाजसेवेचें ध्येय व समाजसेवेचे मार्ग यांत आज कल्पनातीत फरक झाला आहे आणि या बाबतींत लोकमतहि पुष्कळ बदललें आहे. पूर्वींच्या काळीं सामाजिक संकटांचा प्रतिकार करण्याचा लोक प्रयत्न करीत, पण त्यांच्या कारणांचा कोणी दूरवर विचार करीत नसे. चिकित्सक बुद्धीनें त्यांचीं कारणें कोणीं शोधून काढीत नसे आणि प्रत्यक्ष दिसणाऱ्या परिणामाशिवाय त्यांसंबंधीं कोणालाच फारशी माहिती नसे; पण आज कोणत्याहि प्रकारच्या सामाजिक अन्यायांची किंवा संकटांचीं मूळ कारणें शोधल्याशिवाय त्यांवर उपाय योजणें समाजसेवेच्या दृष्टीनें योग्य समजलें जात नाहीं.

अतिशय दाटीच्या व घाणेरड्या वस्तींत अनेक प्रकारच्या रोगांचा प्रादुर्भाव लौकर होतो व तेथें राहाणाऱ्या माणसांच्या अंगीं अशक्त प्रकृतीमुळें रोगाचा प्रतिकार करण्याचें त्राण नाहींसे होऊन तीं रोगाला पटापट बळी पडतात. अनेक प्रकारचीं व्यसनें, अरिष्टें आणि गुन्हेगारी यांना बळी पडणारी बहुसंख्य माणसें अशा वस्तींतूनच येतात. म्हणून अशा अनेक संकटांचें माहेरघर झालेली ही गलिच्छ वस्ती शहरांतून नाहींशी करण्याचे प्रयत्न होत आहेत. मुबलक व मोकळी हवा मिळेल अशा प्रकारची घरांची बांधणी करण्याबद्दल कायदे होत आहेत. सारांश, समाजाच्या नाशाला कारणीभूत होणाऱ्या गोष्टींसंबंधानें अधिक विचार न करितां केवळ त्यांच्या बाह्यात्कारीं दिसणाऱ्या परिणामांना आळा घालण्याची प्रवृत्ति आतां कमी होऊन अशा गोष्टींना कायमचा पायबंद घालण्याचे हळू हळू प्रयत्न होत आहेत.

अजूनपर्यंत कारखानदारांना मजूर आपले अंकित राहाणार असें वाटे व मजुरांनाहि वाटे कीं, मजुरी करण्याकरितांच आपला जन्म आहे, धनी आपल्याला मजुरी देतो, हे त्याचे आपल्यावर मोठे उपकार आहेत आणि त्याच्या इच्छेविरुद्ध आपण गेलों तर आपला निभाव लागणार नाहीं. लोकशाही तत्त्वाचा फैलाव होऊं लागल्यामुळें उपरिनिर्दिष्ट मताचा फोलपणा उभय पक्षांनाहि आतां थोडथोडा दिसूं लागला आहे. कामगार श्रम करितात म्हणूनच कारखाने चालतात, तसेंच मालक कामगारांना मजुरी देतो ती फुकट देत नाहीं तर कामगारांच्या श्रमाचा तो मोबदला देतो, ते त्यांच्यावर उपकार नाहींत, तर ते पैसे त्यांच्या हक्काचेच असतात. कारखान्यावर उभयतांचाहि सारखाच हक्क असतो, कारण एक भांडवल पुरवितो तर दुसरा श्रम करतो, हा समज आतां मूळ धरीत आहे.

जेथें भांडलशाही आहे तेथें तिच्या अस्तित्वासाठींच मजुरीवर अवलंबून असणारा कामगारवर्गहि अस्तित्वांत असावयाचाच. आणि आपल्या राहाणीचें मान वाढविण्यासाठीं आणि तें कायम टिकण्यासाठीं कामगारसंघांसारख्या मार्गांनीं त्यांना संघटित प्रयत्न करणें भाग असतें. म्हणूनच या चळवळीचें मूळहि औद्योगिक क्रांतींतून उत्पन्न झालेल्या आधुनिक भांडवलशाहींत आहे. कामगार आणि मालक संघटित होऊन आपलें हित साधून घेण्यासाठीं जेव्हां प्रयत्न करतात; तेव्हां ते एकंदर समाजाच्या हिताचे असतातच असें नाहीं. म्हणून पक्षातीत राहून कोणाच्याहि रागालोभाची पर्वा न करितां एकंदर समाजाचें ज्यांत हित आहे, अशा गोष्टी करण्याची आवश्यकता असते. हें अवघड काम समाजसेवकांना करावयाचें असतें आणि आजच्या परिस्थितींत तर तें अधिकच कठीण झालें आहे. शिवाय आपल्या रहाणीचें मान वाढविण्यासाठीं आणि तें कायम टिकविण्यासाठीं कामगारांना संघटित प्रयत्न करणें भाग असलें, तरी तेवढ्यानें त्यांची सर्वांगीण सुधारणा होऊं शकत

नाहीं. ती होऊन ते स्वावलंबी होण्यासाठीं सहकारी चळवळीसारख्या दुसऱ्या अनेक चळवळींचें त्यांना सहाय्य घ्यावें लागतें हें इंग्लंडांतील कामगार चळवळीच्या इतिहासावरून दिसून येईल. या बाबतींत कामगारांना समाजसेवकांचें पुष्कळ साहाय्य होण्यासारखें असतें.

## आदर्शभूत समाज

समाजांतील प्रत्येक व्यक्तीला आपली सर्वांगीण सुधारणा करून घेण्याला संधि व वाव मिळाला पाहिजे, कारण समाजांतील व्यक्तींची सुधारणा होईल, तेव्हांच समाजाची सुधारणा होते. शिवाय सुधारलेला समाज म्हटला कीं, त्यांत सर्वसमाजाची सुधारणा झालेली असली पाहिजे. आदर्शभूत समाजांत एका व्यक्तीनें मात्र दुसऱ्या व्यक्तीसाठीं स्वार्थत्याग करावा किंवा एका पोटसमाजाची अतिशय सुधारणा झालेली असावी व दुसरा पोटसमाज अज्ञानांत व पारतंत्र्यांत रुतलेला असावा, असें होतां नये. आपल्या सुधारणेचे प्रयत्न न करितां केवळ वाडवडिलांची कीर्ति गाऊन समाजाची प्रगति होत नाहीं. तसेंच समाज सर्व बाजूंनीं सुधारला आहे, आतां कांहीं सुधारणा व्हावयाची राहिलेली नाहीं असेंहि होणें केव्हांच शक्य नसतें. आपली सर्व कांहीं सुधारणा झाली, असें आपण कधींहि समजतां कामा नये आणि सुधारणेचे प्रयत्न सतत चालू ठेविले पाहिजेत. सुधारणेचे मुख्य मार्ग म्हणजे व्यक्तिव्यक्तींतील कृत्रिम भेद व विषमता नाहींशी करणें, सर्वांना सारखा न्याय मिळण्याची व्यवस्था करणें, नीति-चालीरीती आणि संवयी उच्च प्रतीच्या असणें, हे होय. प्रत्येक व्यक्तीला आपली शक्य तितकी सुधारणा करून समाजाचा एक महत्त्वाचा व उपयोगी घटक होण्याला समर्थ केलें पाहिजे. याचा अर्थ असा नव्हे कीं, सर्व माणसें सारखीं करावयाचीं. तसें होणें शक्य नसतें. कारण प्रत्येकाची शक्ति व कर्तबगारी वेगवेगळी असते. याचा अर्थ इतकाच कीं, प्रत्येक व्यक्तीला आत्मोन्नति करण्याला सारखी संधि द्यावयाची; अशा संधीच्या अभावीं त्याची अवनति होऊं द्यावयाची नाहीं. समाज मंदगतीनें पुढें चाललेला आहे, प्रत्येकाला वैयक्तिक व समाजासंबंधींचें कर्तव्य करण्याला अधिकाधिक संधि मिळत आहे आणि याच गोष्टीची दिवसेंदिवस सुधारणा होऊन समाजाला त्याचें आदर्शभूत ध्येय गांठतां आलें पाहिजे. ध्येय ठरलें म्हणजे तें ताबडतोब गांठलें जातेंच असें नाहीं. पण ध्येय ठरल्याशिवाय तें गांठण्याचे मार्ग कायम होत नाहींत.

इतक्या दीर्घ प्रयत्नांनीं, नानाविध संकटांना तोंड देऊन, कैक देशभक्तांच्या बलिदानानें, मोठ्या कष्टानें भारताला आतां स्वातंत्र्य प्राप्त झालें आहे. आपला भारत देश सुखी, समाधानी आणि समृद्ध कसा होईल, हा आजचा महत्त्वाचा प्रश्न

आहे. हें आजच्या पिढीला आवाहन आहे. हें स्वातंत्र्य बळकट करून जर कायम टिकवावयाचें असेल; तर त्यांतील प्रत्येक नागरिकाची सर्वांगीण प्रगति होऊन तो कर्तृत्ववान् झाला पाहिजे. आणि याची जबाबदारी निरनिराळ्या दिशेनें कार्य करणाऱ्या लोकांइतकीच किंबहुना त्याहीपेक्षां जास्त समाजसेवकांवर पडलेली आहे. समाज जितका मागासलेला असेल तितकी त्याची सुधारणा करणारांना अधिक संधि मिळते. या दृष्टीनें आजची पिढी मोठी भाग्यवान समजली पाहिजे. कारण त्यांच्या-पुढें अफाट कार्य पडलेलें आहे. तें इतकें मोठें आणि विविध प्रकारचें आहे कीं, तें किती केलें तरी संपणें शक्य नाहीं. कार्य करणारांना ही अपूर्व संधि मिळत आहे. पण त्या बरोबरच या संधीचा योग्य फायदा घेऊन राष्ट्रां तील प्रत्येक व्यक्तील कर्तृत्ववान् करण्याचा शिकस्तीचा प्रयत्न झाला पाहिजे. हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे. प्रत्येकानें आपला वाटा स्वखुषीनें, आनंदानें, उत्साहानें, कर्तव्यबुद्धीनें उचलला पाहिजे. त्यांत कुचराई केली, आंगचोरपणा केला, तर अंतीं व्यक्तीचें, समाजाचें व राष्ट्राचें अपरिमित नुकसान होईल.

# प्रकरण २ रें

## समाजसेवेची आवश्यकता

आपल्याप्रमाणेंच आपल्या शेजाऱ्यावरहि आपण प्रेम करावें, असें सर्व धर्मांत सांगितलेलें आहे. हिंदु धर्माचेंहि असेंच मत आहे; इतकेंच नव्हे; तर प्रत्येक मनुष्यमात्रावर प्रेम करावें अशीहि त्याची आज्ञा आहे. पण एखादा मनुष्य असें म्हणेल कीं, मला शेजाऱ्यावर प्रेम करण्याचें कारण काय ? याला स्वामी विवेकानंदांनीं असें उत्तर दिलें आहे कीं, ज्या परमेश्वराचा अंश प्रत्येक माणसांत असतो त्या परमेश्वराचा अंश दारांत आलेल्या भिकाऱ्यांतहि असतो, तो भिकारी बाह्यात्कारीं भिकारी असा दिसला तरी अंतर्यामीं परमेश्वराचा अंशच असतो. त्याच्यांतील, आपल्यांतील आणि परमेश्वरांतील ईश्वरी स्वरूप एकच आहे. याकरितां भिकाऱ्यावर प्रेम करणें म्हणजेच परमेश्वरावर प्रेम करण्यासारखें आहे. त्याच्यांतील परमेश्वराची सेवा करणें म्हणजे त्याच्यांतहि परमेश्वर आहे, हें ओळखणें, इतकेंच नव्हे तर आपल्या स्वतांतहि ईश्वर आहे याची ओळख पटणें होय. कारण त्याच्या–तुझ्यांतील देवांत अद्वैत आहे, तो अखंड आहे. त्या एका देवाशिवाय दुसरा देव नाहीं, तो त्याच्यांतहि आहे व तो तुझ्यांतहि आहे. सारांश, जनसेवा ही ईश्वरसेवा हेंच तत्त्व शेवटीं खरें ठरतें. आणि या तत्त्वाचा एकदां स्वीकार केला कीं, आपलें कुटुंब, आपले आप्त आणि आपला समाज यांच्यावरच नव्हे; तर सर्व मानवजातीवर प्रेम करणें व सर्वांची सेवा करणें, हें आपलें कर्तव्य ठरतें.

## समाजाचें ऋण

मनुष्य जर थोडा विचार करील तर त्याला दिसून येईल कीं, आपण ज्या समाजांत राहातों त्याची सेवा करणें, त्याला साहाय्य करणें हें आपलें आद्य कर्तव्य आहे. कारण माणसाला समाजाशिवाय बहुतांशीं तर नाहींच; पण अल्पांशानें सुद्धां वेगळें, स्वतंत्र असें अस्तित्व नसतें. वस्तुस्थितीच मुळीं अशी असते कीं, तो आपल्या भावना, आपले हक्क, असें जें म्हणतो, तें मुळीं त्याच्या अनुभवाचें किंवा त्याच्या प्रयत्नाचें फळ नसतें. त्याच्या मागण्या आणि त्याच्या महत्त्वाकांक्षा, त्याच्या विवक्षित कुटुंबापासून तों साऱ्या राष्ट्रापर्यंतच्या ज्या एकंदर समाजांत त्याचा जन्म झालेला असतो व ज्यांत तो राहात असतो, त्यानें उत्पन्न केलेल्या असतात. कोणत्या तरी प्रकारच्या सामाजिक समूहाशिवाय माणसाचें अस्तित्वच अशक्य असतें. अशा रीतीनें त्या समूहाचें स्वरूप त्या व्यक्तींत कांहीं अंशानें

प्रतिबिंबित झालेलें असतें. तसेंच समाजाचें जीवन हें त्यांतील घटकांच्या जीवनाचें एकत्र झालेलें स्वरूप असतें. म्हणून माणसानें समाजासाठीं जें काय करावयाचें असतें, तें खरोखरी त्याचें स्वतःचें अस्तित्व टिकविण्यासाठींच असतें, समाजावर उपकार करण्यासाठीं नसतें. कारण त्यानें तसें न केलें, तर त्याच्या अस्तित्वावरच गदा येईल. समाज आहे म्हणूनच आपण सुखानें जगतों, तो नसेल तर आपलें अस्तित्वच संपुष्टांत येईल. या जाणीवेमुळेंच माणसाची समाजाला साहाय्य करण्याकडे नैसर्गिक प्रवृत्ति असते. म्हणजे मुख्यतः आपली स्वतःचीच सेवा करण्याकरितां, स्वतःचीच उन्नति करण्याकरितां, स्वतःलाच सुखी करण्याकरितां, स्वतःचेंच अस्तित्व टिकविण्याकरितां त्याला समाजाला साहाय्य करावें लागतें. अशा रीतीनें साऱ्यांच्या प्रयत्नानें एकंदर समाजाची भरभराट होऊन तो सुखी झाला तर त्याचे बरोबरच ज्या व्यक्तींचा तो बनलेला असतो, त्या व्यक्तींचीहि वैयक्तिक भरभराट होऊन त्याही सुखी होतात.

पण माणसाला नेहमीं आठवण राहात नाहीं ती या गोष्टीची कीं आपल्याला जन्म देऊन, अन्नवस्त्र देऊन, शिक्षण देऊन, सर्व कांहीं आपल्या सुखसोयीसाठीं करून व आपली सर्व प्रकारें काळजी घेऊन, जन्माला आल्या घटकेपासून आपल्यावर मोठा कर्जाचा बोजा करून ठेवण्यांत आला आहे. आपल्याला वर उल्लेख केलेल्या सर्व गोष्टींचा फायदा मिळावा म्हणून अनेकांचे श्रम अनेक प्रकारें खर्ची पडलेले आहेत, याचें त्याला स्मरण राहत नाहीं. जणुं काय आपला कोणाशींच संबंध नाहीं, आपल्यासाठीं कोणी कांहीं केलेलें नाहीं अशा बेपर्वाईच्या वृत्तीनें आपण वागतों, ही वस्तुस्थिति नाकारतां येणार नाहीं. म्हणून समाजाच्या फायद्यासाठीं, समाजाच्या प्रगतीसाठीं जें काय करणें आपल्याला शक्य असेल, तें करण्याचे शिकस्तीचे प्रयत्न करून या साऱ्या उपकारांची, या साऱ्या कर्जाच्या डोंगरांची पूर्णपणें फेड करतां आली नाहीं, तरी या बाबतींतील आपल्या कर्तव्याची जाणीव ठेवून अल्पांशानें तरी फेड करण्याचे प्रयत्न आपण केले पाहिजेत; नव्हे ती फेड करणें हें आपलें प्राथमिक अटळ कर्तव्य आहे. आणि तें दुसऱ्या कोणाच्या फायद्यासाठीं नव्हे तर मुख्यतः आपल्या स्वतःच्या वैयक्तिक फायद्यासाठींच ! जे लोक आपलें हें कर्तव्य करीत नाहींतच, उलट समाजाला जितकें लुबाडतां येईल तितकें लुबाडण्याचे प्रयत्न करितात, ते खरोखरी समाजाचे शत्रू-चोर होत. अशा रीतीनें शक्य त्या मार्गांनीं समाजाला लुबाडणारांचीच संख्या दुर्दैवानें आज फार झाली आहे !

## कुळाचें ऋण

या जगांत मनुष्य अनेकांचा अनेक प्रकारें ऋणी असतो असें वर म्हटलेंच आहे. ज्या कुळांत त्याचा जन्म झालेला असतो, त्या कुळांतील लोकांनीं

अनेक तऱ्हेनें स्वार्थत्याग करून मिळविलेली संस्कृति, संपत्ति व दुसऱ्या अनेक गोष्टी आपल्या कुळाचा चालक म्हणून जन्मतांच एक परीनें त्याच्या स्वाधीन केलेल्या असतात आणि त्यांची साहाजिकच अशी इच्छा असते कीं, पुढें त्यानेंहि आपल्याप्रमाणेंच स्वार्थत्याग करून आपली परंपरा राखावी. ज्या वाडवडिलांनीं आपल्यावर इतके अगणित उपकार केलेले असतात त्यांपैकीं कांहींच्या उपकारांची थोडीबहुत फेड करण्याला, ते जिवंत असल्यास, आपल्याला कदाचित् संधि मिळते. परंतु त्यांपैकीं कांहीं आपला जन्म होण्यापूर्वींच दिवंगत झालेले असतात. जे शिल्लक राहिलेले असतात त्यांनीं आपल्यावर केलेल्या उपकाराचें महत्त्व जाणून परतफेड करीपर्यंत बहुधा तेहि जिवंत राहात नाहींत. म्हणजे खरें पाहूं गेल्यास ज्यांनीं आपल्यावर उपकार केलेले असतात त्यांचे उपकार फेडण्याला आपल्याला प्रत्यक्ष संधि मिळत नाहीं. आणि वस्तुतः आपल्यावर उपकार करणारे लोक ते परत फेडीच्या आशेनें करीतहि नाहींत. अशा परिस्थितींत या उपकारांची फेड आपण कशी करावी, हा प्रश्न असतो. पण याचें उत्तर फारसें अवघड नाहीं. त्याचें सरळ उत्तर इतकेंच कीं, ज्याप्रमाणें आपल्या उपकारांचा मोबदला प्रत्यक्ष मिळेल किंवा नाहीं यासंबंधी विचार न करितां अनेक लोकांनीं आपल्यावर उपकार करून ठेविले त्याप्रमाणें आपणहि करणें क्रमप्राप्त आहे.

ज्या कुळांत आपण जन्मलों, त्या कुळाचे वंशज म्हणून जशीं त्या कुळासंबंधीं आपलीं कांहीं कर्तव्यें असतात, त्याचप्रमाणें ज्या पोटसमाजाचे आपण घटक असूं, त्याचेहि आपल्यावर अनेक तऱ्हेचे उपकार झालेले असतात आणि त्या उपकारांची फेड करणें हें आपलें कर्तव्य असतें. पण कुळ किंवा पोटसमाज यांच्या विषयींचीं आपलीं कर्तव्यें आपण करीत असतां एक गोष्ट आपल्याला सदैव ध्यानांत बाळगावी लागते. ती ही कीं, आपलें कुळ किंवा पोटसमाज हीं एका मोठ्या समाजाचे अत्यंत लहान भेद आहेत आणि म्हणून त्यांची सेवा करण्याकरितां जें जें काय आपण करूं, तें सर्व समाजाच्या प्रगतीच्या आड येतां कामा नये. वस्तुतः आपल्या लहान समाजाकरितां ज्या ज्या गोष्टी आपण करूं, त्या एकंदर समाजाच्या हिताच्या असावयाला पाहिजेत. पण त्या कदाचित् तशा नसल्या तथापि त्यांच्यामुळें निदान सर्व समाजाच्या हिताला बाध येतां नये. पण याचें भान पुष्कळांना रहात नाहीं. आपली चळवळ जर सर्व समाजाच्या ध्येयाला अनुसरून नसेल, ती सर्व समाजाच्या हिताला पोषक होणारी नसेल तर ती आपल्या पोटसमाजाच्याहि हिताची असणें शक्य नाहीं हें आपण लक्षांत ठेवलें पाहिजे. आपलें कुळ किंवा आपला पोटसमाज हीं आपल्याला मोठीं दिसलीं; तथापि तीं खरोखरीच एका मोठ्या समाजाचे लहानसे घटक असतात आणि ज्याप्रमाणें पायाला वेदना होतांच क्षणार्धांत त्या मेंदूपर्यंत जाऊन पोंचतात, त्याचप्रमाणें लहान लहान समाजाचे बरेवाईट परिणाम थोड्याफार प्रमाणांत मोठ्या समाजावरहि होतात.

करितां लहान लहान समाजांत होणाऱ्या चळवळी किंवा समाजप्रगतीचे प्रयत्न सर्व समाजाची वाढ खुंटविणार नाहींत किंवा सर्व समाजाच्या स्वास्थ्याला बिघाड आणणार नाहींत, याविषयीं खबरदारी घेणें हें समाजप्रगतीची आस्था बाळगणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचें कर्तव्य ठरतें.

कुळानें किंवा पोटसमाजानें व्यक्तीवर केलेल्या उपकारपेक्षां सर्व समाजानें केलेले उपकार कोणत्याहि तऱ्हेनें कमी नसतात. इतकेंच नव्हे; तर व्यक्तीची सर्व बाजूंनीं प्रगति होण्यास सर्व समाजच मुख्यतः कारणीभूत होतो, हें अल्प विचारांतीं कोणालाही दिसून येईल. याला एकच उदाहरण पुरे होईल. दळण वळणाचें जें मुख्य साधन आपली भाषा ती कशी उत्पन्न झाली, तिच्यांत कसकसे बदल होत आले, तिला आजची स्थिति कशी आली व हें भाषा सुधारण्याचें कार्य न कळत कां होईना, किती वर्षे चाललें आहे याचा इतिहास जर आपण पाहिला तर आपल्याला असें दिसून येईल कीं, भाषेला आजचें स्वरूप येण्यास कैक पिढ्यांचे परिश्रम कारणीभूत झाले आहेत. अशा रीतीनें शेंकडों वर्षें श्रम करून व भाषेंत वेळोवेळीं फेरफार करून आजची व्याकरणशुद्ध अभिजात भाषा तयार झाली व बिनमेहनतीनें तिचा फायदा आपल्याला मिळूं लागला. तसेंच व्यक्तीचें वैयक्तिक स्वरूप कायम राहावें म्हणून तिला जे हक्क दिले आहेत, व्यक्तीचे व व्यक्तीच्या स्थावर व जंगम मिळकतीचें संरक्षण व्हावें, चोरा-चिलटांपासून कोणाला कोणत्याहि तऱ्हेनें उपद्रव पोंहोचूं नये; म्हणून समाजानें जे कायदेकानू केले आहेत व त्यांची योग्य प्रकारें अम्मलबजावणी व्हावी; म्हणून जी व्यवस्था केली आहे तिचा इतिहास आपण पाहिला; तर हीच गोष्ट अधिक स्पष्टतेनें आपल्याला दिसेल. सारांश, एकना अनेक तऱ्हेनें समाजानें आपल्यावर उपकार केलेले आहेत आणि हें परोपकार करण्याचें कार्य समाजस्थापनेपासून आजतागायत अखंड चालू आहे, इतकेंच नव्हे तर वेळोवेळीं त्यांत तोड जोड होऊन परिस्थित्यनुरूप त्यांत सुधारणा होत आहे. म्हणून या सर्व गोष्टींचा विचार करून समाजांतील प्रत्येक घटकानें—स्वप्रयत्नानें समाजाच्या संपत्तींत कांहींतरी भर घालण्याचा निश्चय केला पाहिजे. समाजानें आयत्या तयार केलेल्या गोष्टींचा फायदा मात्र घ्यावयाचा, त्यांत काडीभरहि भर घालण्याचा प्रयत्नसुद्धां करावयाचा नाहीं, ही वृत्ति अमानुष होय. असा मनुष्य समाजभक्षक—समाजाचा वैरी समजावा लागेल.

## देवघेवीचा व्यवहार

देवघेवीचा व्यवहार समाजांत नेहमीं चाललेला आपण पाहातों. कारण देवघेवी-शिवाय जीवन चालणें शक्य नसतें. कांहींना पैशाची जरूरी लागते आणि तो कर्जाऊ देणारे कांहीं लोक असतात. या कर्जाला कांहीं व्याज असतें आणि कर्जाची फेड करण्यास कांहीं मुदतहि असते. व ह्याबद्दल ऋणको धनकोला करार लिहून देतो. पण

सर्वच ऋणको करारप्रमाणें कर्जाची फेड करणारे असतात, असें नाहीं. कांहीं कर्जफेडीची मुदत वाढवून घेतात, कांहीं आपल्याला कर्जाचें स्मरण आहे, हें दाखविण्याकरितां नुसतें व्याज देतात आणि कांहीं फेडीची टाळाटाळ करीत असल्यामुळें त्यांच्या बाबतींत समाजानें केलेल्या कायद्याचा फायदा घेऊन कोर्टाच्या साहाय्यानें त्याची फेड करवून घ्यावी लागते. इतकें करूनहि आपण कर्ज फेडण्यास असमर्थ असल्याचें कांहीं लोक सांगतात. पैसे नाहींत, तर नाहींत, पण अशा लुच्चा लोकांची निदान अब्रू तरी जावी म्हणून त्यांना तुरुंगांत बसवून त्यांची पोटगी आपण भरणें हा या बाबतींतला निर्वाणीचा मार्ग असतो. आपल्यावर इतरांनीं केलेल्या उपकारांचें–ऋणाचेंहि असेंच आहे. ह्याबद्दल कोणत्याहि सावकाराला आपण रोखा लिहून दिलेला नसतो, ही गोष्ट खरी आहे, पण ह्यामुळेंच या बिनरोख्याच्या कर्जाची नैतिक जबाबदारी अधिक असते, हें कोणालाहि सांगावयास नको. देणें नियमित देण्यानें देणाराचा प्रामाणिकपणा दिसून येतो आणि आपली कर्जफेड करण्याची जबाबदारी त्याला कळते हें ह्यापासून सिद्ध होतें. पण आपल्या पतीवर, इतक्या अल्प प्रयत्नांनीं–आपण न मागतां आपली गरज पाहून-मिळालेल्या कर्जाचें स्मरण ठेवून आपल्या सवडीप्रमाणें जर आपण त्याची फेड केली नाहीं व आपली पत राखली नाहीं, तर वरील कर्जदाराप्रमाणें आपली पत जाईल व प्रसंगीं कोणीच आपल्या उपयोगी पडणार नाहीं. शिवाय समाजांत जर सर्वच लोक कर्ज घेऊं लागले व त्याची फेड कोणी करीनासें झालें; तर अशा ऋणकोंची संख्या अपरिमित वाढेल, धनको नाहींसे होतील आणि सारेच कर्जबाजारी झाल्यामुळें शेवटीं समाजाचा ऱ्हास होऊं लागेल. उपकारफेडीची गोष्ट अशीच आहे. सर्वच लोक जर आपापलेंच पाहूं लागले, दुसऱ्याला मदत करणें स्वहितविरोधी अतएव त्याज्य मानूं लागले, तर समाज जिवंत राहूं शकणार नाहीं. ज्यांना मदतीची आवश्यकता आहे, त्यांना ती प्रसंगीं न मिळाल्यामुळें त्यांचे कल्पनातीत हाल होतील. आणि केव्हां ना केव्हां प्रत्येक व्यक्तीला कोणत्या ना कोणत्या प्रकारें दुसऱ्याच्या मदतीची जरूरी लागावी, अशीच समाजरचना असल्यामुळें आज आपल्याला दुसऱ्याच्या मदतीची जरूरी नाहीं, असें कांहींना अज्ञानामुळें वाटत असलें तरी तसें कदापि चालावयाचें नाहीं, हें विसरतां कामा नये.

स्वार्थाविषयीं उदासीन राहून केवळ परमार्थांत आयुष्य वेंचणारे कांहीं महात्मे असतात आणि तेच समाजांतील खरे धनको-समाजाचे आधारस्तंभ होत. उलटपक्षीं परहिताविषयीं बेफिकीर राहून सदोदित स्वार्थ पहाणारे लोक समाजाचे ऋणको होत. पहिले समाजाला भूषणभूत असतात; तर दुसरे समाजाला भारभूत असतात. पण याशिवाय समाजांत एक तिसरा वर्ग असतो आणि हा वर्ग बहुसंख्याक असल्यामुळें समाजाची वाढ होणें किंवा वाढ खुंटणें, या वर्गाच्या एकंदर वागणुकीवर अवलंबून असतें. समाजांतील या सामान्य लोकांचा परार्थाकडे जर अधिक ओढा असला, निदान

स्वार्थाबरोबरच परार्थ साधण्याकडे त्यांचें लक्ष असलें तर समाज कायम टिकून त्याची दिवसेंदिवस प्रगति होते. पण त्यांचें लक्ष स्वार्थाकडे जर अधिक असलें आणि परार्थाकडे, सर्व समाजाच्या हिताकडे ते पाहिनासे झाले तर समाजाची हळू-हळू, पुष्कळदां वरवर पाहाणाराच्या लक्षांत न येण्याइतक्या मंद गतीनें परागती होते.

## समाजाच्या उत्क्रांतीच्या पायऱ्या

अत्यंत रानटी समाज हा मृगयावृत्तिसमाज असतो. म्हणजे या समाजांतील सर्व व्यक्ति रानांतील पशुपक्षी किंवा समुद्रांतील जलचर प्राणी यांच्यावर आपली उपजीविका करतात. याच्या पुढची पायरी म्हणजे गोपालवृत्तिसमाज होय. या स्थितींत मनुष्य रानटी जनावरांना आपल्या कह्यांत आणूं लागतो व गाईम्हशींचे किंवा शेळयामेंढ्यांचे कळप बाळगून त्यावर आपली उपजीविका करूं लागतो या दोन्हीं अवस्थांत माणसांना घरेंदारें करण्याची कल्पना नसते. शिकार करणाऱ्या माण-साला शिकार मिळेल तिकडे भटकावें लागतें व गुरेंढोरें बाळगणाऱ्या माणसालासुद्धां एकच ठिकाण धरून राहतां येत नाहीं. कारण गवत चारा मुबलक आहे तोंपर्यंत त्याला एका ठिकाणीं राहतां येतें, पण तें संपलें म्हणजे तें मिळेल त्या ठिकाणीं त्याला स्थलांतर करावें लागतें. या करितां या स्थितींतील समाजाची गणना भटकणाऱ्या समाजांत करितात. समाजाची या पुढील पायरी म्हणजे कृषिवृत्ति होय. माणसाला शिकार किंवा दूधदुभतें हीं दोन उपजीविकेची साधनें अपुरीं पडूं लागल्यामुळें तो दुसऱ्या साधनाच्या प्रयत्नाला लागतो व मग त्याला शेतीचा शोध लागतो आणि माणसें शेती करून धान्य पिकवूं लागतात. समाज कृषिवृत्ति झाला म्हणजे त्याला स्थायिक व्हावें लागतें. कारण पूर्वींच्या दोन अवस्थांप्रमाणें तो वेळोवेळीं स्थलांतर करूं लागल्यास त्याला जमिनीचें कायमचें उत्पन्न मिळणें शक्य नसतें. समाज कृषिवृत्ति झाला आणि त्याचें राहाण्याचें ठिकाण कायम झालें कीं, त्याला राष्ट्राचें स्वरूप येऊं लागतें व त्याला पोषक अशा राष्ट्रीय् कल्पना उत्पन्न होऊं शकतात. यापुढील पायरी म्हणजे उद्यमवृत्ति होय. या स्थितींत माणसांच्या गरजांची व वासनांची अतोनात वाढ होते आणि या गरजा व वासना भागविण्यासाठीं हजारों उद्योगधंदे अस्तित्वांत येतात. समाज बहुविध बनतो आणि श्रमविभागाचें तत्त्व विस्तृत प्रमाणांत अस्तित्वांत येतें. हीच समाजाची शेवटची व उच्चतम अवस्था होय. या समाजाच्या स्थित्यंतराच्या वेगवेगळया पायऱ्या असल्या, तरी त्याचा अर्थ असा नाहीं कीं, समाज दुसऱ्या पायरीवर गेला कीं, पहिली अवस्था तो कायमची सोडून देतो. तसें केव्हांहि होत नाहीं. उलटपक्षीं तो उद्यमवृत्ति झाला तरी कृषिवृत्ति किंवा गोपालवृत्ति अजिबात सोडीत नाहीं. थोड्याफार प्रमाणांत तो शेती करितो, गुरेंढोरेंहि बाळगतो आणि प्रसंगविशेषीं शिकारीलाहि जातो. तसेंच प्रत्येक समाज या प्रत्येक अवस्थेंतून जातोच असें नाहीं. विशिष्ट परिस्थितींत व विशिष्ट

कारणांनीं एखादा समाज यांतील एखादी पायरी टाकून एकदम वरच्या पायरीवर जाऊं शकतो. पण समाजाचा विकास सामान्यतः वरील क्रमानें होतो असें म्हणावयास हरकत नाहीं.

## माणसाचें परावलंबी जीवन

माणसाची प्रवृत्ति निसर्गतःच समाज करून राहाण्याकडे असते आणि इतस्ततः भटकणारे लहान लहान रानटी समाज वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें पायरीपायरीनें सुधारत जाऊन त्यांचें शेवटीं प्रबळ राष्ट्र बनण्याला हीच नैसर्गिक प्रवृत्ति मुख्यतः कारणीभूत होते. या नैसर्गिक प्रवृत्तीला आपण जुमानीत नाहीं, हें दाखविण्यासाठीं क्वचित् एखादा मनुष्य समाज सोडून गिरिकंदरांत रहावयास जातो; पण तेथेंसुद्धां त्याच्यानें एकटें रहावत नाहीं. कोणाची ना कोणाची–निदान कुत्र्यामांजरांची किंवा पशुपक्ष्यांची तरी सोबत त्याला लागतेच. इतका मनुष्य संगतिप्रिय आहे. याचें कारण असें कीं, समाज करून राहाण्यांत माणूस स्वार्थ साधतो. दुसरें तिसरें कारण त्याला कांहीं नसतें. एकेकटा राहाण्यापेक्षां समाजाच्या आधारानें–माणसांच्या सहवासांत राहिल्यास सुखाचीं साधनें सहज साध्य होतील, ही स्वार्थबुद्धि त्याच्या मुळाशीं असते. कारण मनुष्याला लागणाऱ्या साऱ्याच वस्तु त्याला स्वतः करितां येणें शक्य नसतें. त्याला लागणारी वस्तु एक अमेरिकेंतून येते, तर दुसरी जर्मनींत तयार झालेली असते, तिसरीचें मूलस्थान जपान असतें, तर चौथी इंग्लंडाशिवाय दुसरीकडे चांगलीशी मिळत नाहीं. सकाळपासून संध्याकाळपर्यंत त्याला शेंकडों वस्तूंची गरज लागते आणि या शेंकडों वस्तूंपैकीं कांहीं स्वदेशांत तर बाकीच्या परदेशांत तयार झालेल्या असतात. सारांश, ज्या गोष्टींत आपल्याला दुसऱ्या लोकांना मदत करतां येईल त्या गोष्टींत आपण दुसऱ्या लोकांना मदत करावयाची व आपल्याला ज्या गोष्टी दुसऱ्या देशांतून हव्या असतील, त्या त्यांच्याकडून घ्यावयाच्या या अदलाबदलीच्या–सहकार्याच्या तत्त्वावर समजाचा डोलारा अवलंबून असतो. एतावता दुसऱ्या लोकांच्या मदतीशिवाय आपलें चालावयाचें नाहीं, आपलें जीवित कष्टमय होईल व शत्रूला तोंड देणें, आपल्या एकट्याला शक्य नसल्यामुळें आपण केव्हां संकटांत सांपडूं याचा नेम नाहीं. याकरितां संघ करून राहाणें माणसाला अत्यावश्यक आहे. पण दुसऱ्याची मदत हवी तर दुसऱ्यालाहि मदत करावी लागते. दुसऱ्याला दिल्याशिवाय आपल्याला मिळत नाहीं. या विश्वांतील प्रत्येक गोष्टीला हें सहकार्याचें तत्त्व लागू आहे, प्रत्येक वस्तु सहकार्याच्या तत्त्वाप्रमाणें चालली आहे, असें आपल्याला दिसून येईल. मात्र या सर्वच गोष्टी आपण जाणून करितों, असें नाही; कित्येकदां न जाणून निसर्गसिद्ध नियमांप्रमाणें सहजगत्या त्या आपल्या हातून घडतात. तर मग ह्या साऱ्या गोष्टी आपण जाणून केल्या, तर आपले संबंध अधिक सुखावह होणार नाहींत काय ?

## संस्कृति व व्यक्तीचें परावलंबन

मनुष्य जों जों रानटी स्थितींत असेल तों तों त्याची राहाणी साधी, कमी खर्चाची व त्याच्या गरजा थोड्या असतात. वाट मिळेल तिकडे सैरावैरा भटकणाऱ्या व शिकारीवर उपजीविका करणाऱ्या समाजाच्या गरजा अगदींच कमी असतात. इतक्या कीं, त्या त्याच्या त्यालाच भागवितां येतात; या पेक्षां समाज जरा अधिक सुधारला कीं, त्याच्या गरजा अधिक वाढतात आणि तो थोडथोडा पराधीन होऊं लागतो. गोपालवृत्ति समाजहि फारसा परावलंबी नसतो. पण समाज शेतीभाती करून उपजीविका करूं लागला कीं, समाजाच्या परस्वाधीन स्थितीला खरी सुरवात होते आणि समाज उद्यमवृत्ति झाला, समाजांतील लहानमोठीं कामें श्रमविभागाच्या तत्त्वावर होऊं लागलीं कीं, समाजाला अनेक गोष्टींसाठीं सर्वस्वी दुसऱ्यावर अवलंबून रहावें लागतें. ही परतंत्रता आज इतक्या थरास जाऊन पोंचली आहे कीं, जगांतील सर्व राष्ट्रें कोणत्या ना कोणत्या वस्तूंसाठीं परस्परांवर अवलंबून आहेत. यांपैकीं एखाद्या राष्ट्रावर दुर्दैवानें एखादी आपत्ति आली-गेल्या महायुद्धामुळें अनेक राष्ट्रांवर अशी आपत्ति आलेली आहे आणि युद्धाचा शेवट होऊन इतकीं वर्षें झालीं, तरी त्याचे अनिष्ट परिणाम अजून नाहींसे झालेले नाहींत-तर तिचा परिणाम दुसऱ्या राष्ट्रावर होतो, दुसऱ्याचा तिसऱ्या राष्ट्रावर होतो आणि शेवटीं या सर्व राष्ट्रांची स्थिति सुधारल्याशिवाय कोठेंच शांतता नांदूं शकत नाहीं, हें अनेक गोष्टींवरून आपल्या दृष्टोत्पत्तीस येईल. समाज काय किंवा व्यक्ति काय ती जों जों अधिक परतंत्र होत जाते तों तों तिला दुसऱ्याची अधिकाधिक गरज लागते आणि ही गरज वाढत गेली कीं, समाजसेवेचें क्षेत्रहि अधिकाधिक वाढत जातें.

या राहणीच्या बाबतींत दुसरी एक महत्त्वाची गोष्ट अशी आहे कीं राहणी जों जों सुधारत जाते तों तों तींत कृत्रिमपणा अधिक येतो. समाजाच्या प्रथमावस्थेंत मनुष्य जेमतेम उन्हापावसापासून आपल्याला फारसा त्रास होऊं नये, अशा तऱ्हेची झाडांच्या फांद्यांची झोपडी बांधतो किंवा एखाद्या मोठ्या वृक्षाच्या छायेखालींच आपली तात्पुरती सोय करतो; पण समाजाच्या प्रौढावस्थेंत मनुष्य आपल्या मतें सुधारलेलें पण सृष्टिनियमाच्या दृष्टीनें इतकें घाणेरडें घर बांधतो कीं, त्यांत सूर्यकिरणांचा प्रवेश होऊं शकत नाहीं, उघड्या हवेला आंत येण्याला मार्ग रहात नाहीं आणि उजेडाच्या अभावीं दिवसा विजेचे दिवे लावावे लागतात. या परिस्थितीचा माणसावर असा अनिष्ट परिणाम होतो कीं, तो जरा उन्हांत गेला कीं लगेच कासावीस होतो, जरा मोकळी हवा लागली तर त्याला सर्दी पडसें होतें आणि एखादे वेळीं चुकून जरा भिजला तर लगेच तो आजारी पडतो. उलटपक्षीं, रानटी स्थितींतील माणसाला या सर्व गोष्टींचा सराव

असतो त्यामुळें वरील गोष्टींपासून त्याच्या शरीराला अपाय होण्याऐवजी तें अधिक बळकट होतें, व कोणत्याही रोगाला सहसा दाद देत नाहीं. कपड्यालत्त्याच्या बाबतींतही असेंच स्थित्यंतर झालें आहे. कपडे घालण्याचा मूळ हेतू थंडी वाऱ्यापासून शरीराचें रक्षण करणें हाच आहे. पण कपड्यांची संख्या, तऱ्हा व पद्धत इतकी वाढली आहे कीं, डोक्यापासून पायापर्यंत आरोग्यदृष्ट्या मुळींच विचार न करितां अनेक प्रकारचे कपडे वापरावे लागतात, इतकेंच नव्हे तर एकाद्या परक्या माणसापुढें उघडे जाणें असभ्यपणाचें मानण्यांत येते. उद्योगधंद्याच्या बाबतींतहि अवनति झाली आहे. आज कैक लोकांना केवळ पोटासाठीं भूगर्भांत हजारों फूट खालीं जाऊन जेथें हवा नाहीं, सूर्यप्रकाश नाहीं, पुरेसा उजेड नाहीं, इतकेंच नव्हें तर सरळ उभेंहि रहातां येत नाहीं. अशा अडचणीच्या परिस्थितींत, केवळ निरुपाय म्हणून मनाविरुद्ध काम करावें लागतें. खाद्यपेयादि इतर बाबतींतहि असाच अनिष्ट बदल झालेला आहे. आणि त्यामुळें एकंदर राहाणी अगदीं दिखाऊ झाली आहे. या साऱ्या गोष्टींचा परिणाम असा झाला आहे कीं रानटी समाजांतील माणसाला रोगाचा प्रतिकार करण्याच्या कामीं निसर्गाची जशी वेळोवेळीं मदत होते, तशी मदत सुधारलेल्या समाजांतील माणसांना न होतां उलट पदोपदीं निसर्गाचे नियम मोडल्याबद्दल रोगांच्या रूपानें शिक्षा होऊं लागली आहे. मनुष्य कोणत्या रोगानें केव्हां आजारी पडेल याचा नियम नाहींसा झाला आहे. निसर्गाच्या रोषामुळें मनुष्य इतका परस्वाधीन होतो कीं, त्याला आप्तेष्टांकडून योग्य तऱ्हेची व योग्य वेळीं मदत न मिळाल्यास त्याची अगदीं केविलवाणी स्थिति होते. त्यामुळें प्रत्येक व्यक्तीला समाजसेवा करणें व आपली सेवा करून घेणें इच्छा नसतांहि भाग पडतें आणि ही परिस्थिति दिवसेंदिवस सुधारण्याऐवजीं अधिक बिघडत आहे व त्या प्रमाणांत समाजसेवेच्या कार्याचीहि आवश्यकता अधिकाधिक वाढत आहे.

## सदोष समाजरचनेचे अनिष्ट परिणाम

व्यक्तीच्या हातून चुकी झाल्यामुळें जशीं व्यक्तीवर संकटें येतात, त्याचप्रमाणें समाजाकडून चुकी झाल्यास–आणि त्या नेहमीं व्हावयाच्याच–त्याचा परिणाम साऱ्या समाजाला भोगावा लागतो. समाजाच्या संघटनेंत दोष उत्पन्न झाल्यास त्यापासून अनेक प्रकारचे रोग, व्यसनें व अरिष्टें उत्पन्न होतात. कंगालपणा, बेकारी, जुगार, भिक्षेकऱ्यांचा सुळसुळाट, गुन्हेगारांची वाढ, वेश्याव्यवसाय व अनेक प्रकारचीं व्यसनें, दोष व अरिष्टें समाजरचनेंतील वैगुण्यामुळेंच उत्पन्न झालेलीं असतात. कधीं कधीं रोगाच्या मोठ्या सांथी येतात आणि त्यांचा वेळींच प्रतिकार न झाल्यास त्यामुळें साऱ्या समाजाचा नाश होण्याचा संभव असतो. या रोगांचें तसेंच उपरिनिर्दिष्ट व्यसनें दोष व अरिष्टें यांचें निर्मूलन करणें एका व्यक्तीच्या हातीं नसतें.

तीं नाहींशीं करण्यास सर्व समाजानें–निदान समाजांतील बहुसंख्य व्यक्तींनीं प्रयत्न करावे लागतात. सर्व समाजाला ग्रासूं पहाणाऱ्या व्यसनांचा व साथींचा नाश समाजांतील कांहीं व्यक्तींनीं केलेल्या तुटक तुटक प्रयत्नांनीं होऊं शकत नाहीं. त्याकरितां समाजसेवकांचे संघटित प्रयत्न–समाजसेवासंघ अस्तित्वांत यावे लागतात. आणि इतकें केल्यानें या साथी व व्यसनें कायमचीं नाहींशीं झालीं नाहींत; तरी कालांतरानें व प्रयत्नाप्रमाणें पूर्ण आटोक्यांत येऊं शकतात.

पण याचा प्रतिकार करणें एका व्यक्तीच्या हातीं नाहीं म्हणून या सर्व भानगडींपासून आपलें अंग काढून घ्यावें, असें जर कोणी व्यक्ति मनांत आणील तर तें मात्र शक्य नाहीं. कारण कोणतेंहि संकट सर्व समाजावर आल्यास त्यापासून व्यक्ति सुटूं शकत नाहीं; सर्व समाजाबरोबर व्यक्तीचाहि नाश होण्याचा संभव असतो. म्हणून निदान स्वतःचा बचाव करण्याकरितां तरी व्यक्तीला वर निर्दिष्ट केलेल्या गोष्टी नाहींशा करण्याच्या कामीं समाजाला साहाय्य करावें लागतें. शरीराचा एखादा अवयव निकामी झाल्यास सर्व शरीरांत व्यंग निर्माण होतें. पण सर्व शरीराचाच नाश झाल्यास अवयवांचें अस्तित्वहि नाहीसें होतें, तद्वत् व्यक्ति नाश पावल्यानें समाज निर्बळ होतो हें खरें, पण सर्व समाजाचा नाश होण्याचा प्रसंग आल्यास व्यक्ति जगूं शकत नाहीं. याप्रमाणेंच व्यक्ति समाज करून राहात असल्यामुळें आणि व्यक्तीचें व समाजाचें हिताहित एक असल्यामुळें समाजावर आलेल्या कोणत्याहि संकटापासून बचाव होण्याकरितां व्यक्तीनें समाजाला व समाजानें व्यक्तीला मदत करावयाची असते. तेव्हांच दोघेंहि–समाज व व्यक्ति–जगूं शकतात.

दुसऱ्याची वस्तु जो चोरतो त्याचा समाजाची संपत्ति किंवा सुख वाढविणें हा उद्देश नसतो, परंतु दुसऱ्यानें पूर्वींच उत्पन्न केलेल्या संपत्तीचा त्याच्या नकळत अपहार करावा, हा त्याचा हेतु असतो. दोन माणसें जुगार खेळत असलीं आणि त्यापैकीं एक जिंकला तर त्यापासून समाजाची संपत्ति वाढत नाहीं किंवा कमी होत नाहीं. इतकेंच नव्हे तर त्या व्यवहारापासून समाजाचें कोणत्याच प्रकारचें कार्य होत नाहीं. हीं दोन माणसें जुगार खेळून आपला वेळ आळसांत घालवितात आणि त्यापैकीं प्रत्येकजण कोणत्याहि प्रकारें मोबदला न देतां दुसऱ्याला लुटण्याचा प्रयत्न करितो. हा जुगार जरा मोठ्या प्रमाणांत असला आणि तीं खेळणारीं माणसें समाजांत जरा शिष्ट म्हणून समजली जात असलीं, तर त्याला 'सट्टा' हें साळसूद नांव देण्यांत येतें. पण त्याला नांव कोणतेंहि असलें, तरी त्याच्या मुळाशीं असलेली घाणेरडी प्रवृत्ति नाहींशी होत नाहीं. सचोटीचा आव आणून ते समाजाला लुटण्याचा घाट घालतात आणि दैवानें किंवा दूरदृष्टीमुळें कोणत्याहि प्रकारें मोबदला, किंमत किंवा सेवा उलट न देतां आगाऊच उत्पन्न केलेली संपत्ति मिळविण्याचा प्रयत्न करितात. म्हणून ही प्रवृत्ति समाजहिताला पोषक नाहीं असें मानण्यांत येतें. तसेंच सर्व समा-

## समाजसेवेची आवश्यकता

जाकडे दुर्लक्ष्य करून एखाद्या व्यक्तीच्या हिताकरितां किंवा अगदीं अल्पसंख्याक लोकांच्या फायद्याकरितां जेव्हां सर्व समाजाची म्हणून समजण्यांत येणारी संपत्ति खर्च करण्यांत येते, तेव्हां तो खर्च सत्कार्यीं झाला, सर्व समाजाच्या हिताकरितां झाला, असें समजण्यांत येत नाहीं; तर ती समाजाच्या पैशाची लूट झाली, असेंच समजलें जातें. सर्वांकडून कराच्या रूपानें पैसे गोळा करावे आणि त्याचा विनियोग सार्वजनिक कार्याकडे न करितां एकाद्याला नाहक आणि मोबदल्याशिवाय ते द्यावे, त्याप्रमाणें हें होतें. सार्वजनिक पैसा सार्वजनिक सुख वाढविण्याच्या कामींच खर्च व्हावा, हें केव्हांहि न्याय्य असतें.

अधिकांचें अधिक सुख हें समाजाचें ध्येय असें मानण्यांत येतें व तें खरेंहि आहे. पण हें सुख म्हणजे तरी काय ? अधिक संपत्ति, अधिक बुद्धि, सर्वोत्कृष्ट शारीरिक सुधारणा कीं नैतिक उन्नति ? वस्तुतः यापैकीं कोणत्याहि एक गोष्टीचीच सुधारणा झाल्यानें समाजाचें सुख वाढेल असें म्हणतां येणार नाहीं. समाजोन्नति होण्याला या सर्व गोष्टींत सारखीच सुधारणा झालेली नसली; तथापि कांहीं ठराविक मर्यादेपर्यंत तरी त्या प्रत्येकाची प्रगति व्हावी लागते. नाहीं तर ज्याला संस्कृतीचा गंधहि लागलेला नाहीं असा एखादा रानटी समाजहि सुखी असतो. पण अशा प्रकारचें समाधान हें समाजाचें ध्येय होऊं शकणार नाहीं. उच्चतर राहाणीची उत्कट इच्छा आणि ती साध्य करण्याचे उपाय यांच्यावर हें सुख अवलंबून राहातें. आणि हेंच समाजाचें खरें ध्येय होय. तसेंच हें अधिकांचें सुख साधावयाचें तर हे अधिक म्हणजे तरी किती ? आणि हें अधिक सुख मापावयाचें तरी कसें ? सुखाची उपरिनिर्दिष्ट व्याख्या स्थूल मानानें खरी आहे असें धरून चाललें; तरी ही अधिक संख्या आजच्या समाजाची कीं भावी समाजाची हा प्रश्न शिल्लक राहातोच. आजचा समाज व भावी समाज या दोहोंचा वस्तुतः यांत समावेश व्हावयास पाहिजे. कारण समाजांतील एक व्यक्ति दिवंगत होते आणि दुसरी जन्मास येते. अशा रीतीनें संख्येच्या दृष्टीनें समाज नेहमीं समबळ राहतो. करितां कांहीं गोष्टींपासून समाजाचा तात्कालिक फायदा होण्यासारखा नसला; तथापि त्या भावी पिढीच्या हिताकरितां आणि सुखाकरितां करावयाच्या असतात.

सारखी संधि, सारखे हक्क दिले तरी सर्व लोकांची स्थिति सारखी राहील असें नाहीं, असें पूर्वीं एका ठिकाणीं म्हटलें आहेच. कारण कांहींचीं शारीरिक व्यंगें असतात, कांहींच्यांत मानसिक दोष असतात, कांहींची नैतिक दृष्ट्या अधोगति झालेली असते, कांहींच्यांत स्वभावदोष असतात, कांहींच्या बाबतींत परिस्थिति मात करणारी असते; सांपत्तिक किंवा सामाजिक स्थिति, अपघात हेहि कांहींची वाढ खुंटवितात. या अडचणी शक्य तितक्या दूर करून प्रत्येकाला आपली सुधारणा करण्याची संधि देणें व त्याचा मार्ग निष्कंटक करून त्याला स्वावलंबी करणें हा

समाजसेवेचा हेतु असतो. शिक्षण, कायदे व दुसरे अनेक मार्ग या साधनांनीं हा हेतु तडीस न्यावयाचा असतो. कारण नुसती संधि व हक्क दिल्यानें मनुष्य सुधारतो असें नाहीं, तर त्यांचा उपयोग करून घेण्याची लायकीहि त्याच्या अंगीं यावी लागते. ती वरील साधनांनीं येऊं शकते.

## प्रत्येकानें आपलें कर्तव्य केलें पाहिजे

व्यक्ति समाजाचा एक घटक असल्यामुळें समाजाची सेवा करणें व समाजानें यक्तीचे वैयक्तिक हक्क सांभाळणें हें उभयपक्षीं न्याय्य आहे. पण प्रत्येक व्यक्तीला हें आपलें कर्तव्य आहे, असें वाटतेंच असें नाहीं आणि पुष्कळदां तें वाटलें तरी त्याप्रमाणें कृति घडत नाहीं हें आपण पाहातोंच. परंतु इतकें खरें कीं ज्यांना या आपल्या कर्तव्याची जाणीव नसते त्यांना ती करून देण्याचे, सार्वत्रिक व आस्थापूर्वक प्रयत्न फारसे करण्यांत येत नाहींत. आणि असे प्रयत्न झाले तरी ते चिरस्थायी होत नाहींत. असे प्रसंग मुळींच येत नाहींत, असें मात्र नाहीं. राष्ट्राचें संरक्षण करण्याच्या वेळीं–लढाईच्या वेळीं अशा प्रकारची सार्वत्रिक चळवळ करण्यांत येते. अशा प्रसंगीं आपल्या राष्ट्राचें संरक्षण करणें आपलें कर्तव्य आहे, असें सांगण्यांत येतें. इतकेंच नव्हे; तर शत्रूशीं लढत असतांना रणभूमीवर मृत्यु येणें हें भूषणावह आहे, मोक्षाला जाण्याचें तें एक उत्कृष्ट साधन आहे, असें राष्ट्रांतील प्रत्येक व्यक्तीला आग्रहानें सांगण्यांत येतें. लढाईंत ज्यांना प्रत्यक्ष भाग घेतां येण्यासारखा नसतो, त्यांना दारूगोळा तयार करणें, अन्नसामुग्री गोळा करणें, लढाईंत जखमी झालेल्यांची शुश्रूषा करणें वगैरे सारखीं लढाईला अप्रत्यक्षपणें उपयोगी पडणारीं कामें देण्यांत येतात. सारांश, युद्धाच्या वेळीं देशांतील प्रत्येक व्यक्ति राष्ट्रकार्य म्हणून तिच्याकडे देण्यांत आलेलें काम करीत असते आणि कोणी कामचुकारपणा केला, तर सक्तीनें तिच्याकडून काम करून घेण्यांत येतें. पण प्रत्येक व्यक्तींत शिरलेलें हें स्वदेशसंरक्षणाचें वारें अगदींच अल्पायुषी असतें. तें जेमतेम युद्ध संपेपर्यंत टिकतें, न टिकतें. यानंतर सर्वत्र शांतता नांदूं लागते, पुन्हा स्वदेशाभिमानाच्या प्रतिक्रियेस सुरवात होते आणि परस्परांविषयींचीं सामान्य कर्तव्येंहि माणसें विसरूं लागतात. प्रत्येक मनुष्य सामान्यतः आपल्या पोटाच्यामागें लागतो आणि पोटासाठीं धडपड करतांना दुसऱ्याच्या सामान्य हक्कांची पायमल्ली करण्यास तो मागें पुढें पाहात नाहीं. आपले हक्क आपल्याला पाहिजेत; तर दुसऱ्याचे हक्कहि त्याला आपण देण्यास तयार असलें पाहिजे, याचेंहि भान त्याला राहात नाहीं. यामुळें समाजसेवेची व्याख्या अतिशय संकुचित होते, इतकी कीं, स्वतःचें कर्तव्य नीटपणें करणारा मनुष्यहि स्थूलमानानें समाजसेवक मानला जातो. कारण आपल्या स्वतःपुरतें व आपल्या कुटुंबापुरतेंहि न पहाणारे पुष्कळ लोक असतात. त्यामुळें स्वतःच्या बाहेर थोडेंबहुत पाहाणारांना अधिक महत्त्व येतें. जे

स्वतःकडे दुर्लक्ष करून समाजाचें हित पाहूं लागतात, त्यांना तर विशेषच महत्त्व येतें व त्यांचा सर्वत्र बोलबाला होऊं लागतो. पण वस्तुतः आपल्या कर्तव्यापलिकडे ते अधिक कांहीं करीत नाहींत, हें विचारांतीं आपल्या लक्षांत येईल. त्याना इतकें महत्त्व येण्याचें कारण असें कीं, स्वार्थलोलुप माणसांची संख्या समाजांत मनस्वी वाढलेली असते. प्रत्येक जण जर आपलें कर्तव्य योग्य रीतीनें करूं लागेल, तर हल्लींप्रमाणें, स्वार्थत्याग करणाऱ्या समाजांतील थोड्या व्यक्तींवर, कामाचा जबर बोजा पडणार नाहीं.

## मूलतः मनुष्य सत्प्रवृत्त असतो.

समाज करून राहाण्याकडे-समाजांत राहाण्याकडे ज्याप्रमाणें माणसाची नैसर्गिक प्रवृत्ति असते, त्याप्रमाणेंच परोपकार करणें हा माणसाचा उपजत स्वभाव आहे. शेजाऱ्याला मदत करावी, दुसऱ्याच्या उपयोगी पडावें हें सर्वांना समजतें आणि पुष्कळांकडून सामान्यतः त्याप्रमाणें कृतीहि घडते. मनुष्याच्या अंतःकरणांत दोन परस्परविरोधी प्रवृत्तींचा नेहमीं लढा चाललेला असतो. एक मन सन्मार्गाकडे जावयास सांगतें; तर दुसरें मन कुमार्गाचा रस्ता दाखवितें आणि या द्वंद्वयुद्धांत ज्याचा वरचष्मा होईल, त्याप्रमाणें माणसाच्या हातून कृति घडत असते. माणसामध्यें असलेला ईश्वरी अंश नेहमीं सन्मार्गाचा रस्ता दाखवीत असतो. आपल्याला अनेक प्रसंगीं असा अनुभव येतो कीं, एखाद्या माणसाशीं आपला कोणत्याहि तऱ्हेचा संबंध नसतो, त्याची आपली पूर्वींची ओळखहि नसते आणि असा अपरिचित मनुष्य अशा अनपेक्षित रीतीनें व चटकन् आपल्यावर उपकार करितो, त्याच्या त्या वागणुकीचा कार्यकारणसंबंध आपल्याला कांहींच कळत नाहीं आणि ईश्वरानें आपल्या अडचणीच्या प्रसंगीं उपयोगी पडण्याकरितां त्याला पाठविलें किंबहुना ईश्वरच त्या माणसाच्या रूपानें अवतरला, असें म्हणून आपण आपल्या मनाचें समाधान करून घेतों. वस्तुतः आपल्या स्वभावगुणाला अनुसरून तो ती गोष्ट सहज करतो. त्याला कांहीं विशेष कारण असतें असें नाहीं. कांहीं विशेष कारण असलें, तर तें इतकेंच असतें कीं, दुसऱ्यावर संकट आलें असतां किंवा एरवींहि त्याला दुसऱ्याला सहाय्य करावें, अशी प्रेरणा होते व त्या प्रेरणेप्रमाणें तो वागतो. तथापि समाज म्हणजे काय, समाजाचा व आपला कोणत्या प्रकारचा संबंध आहे, समाजसेवेच्या तत्त्वांत कसे कसे बदल होत आले व त्यांचें स्वरूप आज काय आहे, तसेंच समाजसेवा करतांना आपला कोणता हेतु असावा, वगैरे गोष्टींचें ज्ञान होऊन समाजकार्य होऊं लागल्यास, सद्धेतु असून समाजसेवेच्या नांवाखालीं आज ज्या अनेक अनिष्ट गोष्टी घडत आहेत, त्या पुढें घडणार नाहींत आणि समाजसेवेचें कार्य पायाशुद्ध पद्धतीनें होऊं लागेल.

## समाजसेवेनें वैयक्तिक दुःख कमी करितां येतें

समाजसेवा हें वैयक्तिक दुःखावर एक मोठें रामबाण औषध आहे. कारण दुसऱ्या दुःखी जीवांच्या दुःखांत सहभागी झाल्यानें दुसऱ्याचें दुःख कमी करण्याचा प्रयत्न केल्यानें, दुसऱ्याबद्दल सहानुभूति दाखविल्यानें त्याचें दुःख हलकें होतें, इतकेंच नव्हे तर आपणहि सुखी होतों. आपल्या मानसिक सुखांत महत्त्वाची भर पडते. अ‍ॅब्राहम लिंकननें असें म्हटलें आहे कीं आपलें दुःख हलकें करण्याचा उत्तम उपाय म्हणजे दुसऱ्याचें दुःख कमी करणें हा होय. व्यक्तिशः आपल्यावर आलेल्या संकटाचा भार कमी व्हावा किंवा दुःखाचा विसर पडावा म्हणून समाजाच्या वेगवेगळया क्षेत्रांत काम करणारीं माणसें सर्वत्र आढळतात. आपल्याकडेहि अशीं उदाहरणें आहेत. मुंबईतील श्रद्धानंद अनाथ महिलाश्रमाच्या रौप्यमहोत्सव प्रसंगीं समाजाचे अध्यक्ष डॉ. मुकुंदराव जयकर म्हणाले " माझें मन उदास झालें कीं त्या विषण्ण मनःस्थितींत मी आश्रमाला भेट देतों आणि मनाचें औदासीन्य नाहींसें करून पुनः घरीं जातों. " दुसरें उदाहरण इंग्लंडांतील जॉन ब्राईट यांचें घेतां येईल. आपल्या पूर्व वयांत पत्नीच्या निधनामुळें जॉन ब्राईट यांना इतकें दुःख झालें कीं, त्यांनीं अंथरूण धरलें व त्यांतून उठण्याची आशा नाहींशी झाली. पण सुदैवानें या वेळीं त्यांचे जिवलग मित्र कॉब्डेन हे त्यांच्या भेटीला आले व जॉन ब्राईट यांची ती केविलवाणी स्थिति पाहून त्यांना म्हणालेः " मित्रा, जी गोष्ट आपल्या हातची नाहीं त्या गोष्टीबद्दल असें निष्कारण दुःख कां करीत बसला आहेस ? विचार कर, धान्यासंबंधींच्या अन्यायकारक कायद्यामुळें आज इंग्लंडांत लक्षावधि स्त्रिया व मुलें अन्नाला मोताद झालीं आहेत. ऊठ, या कामीं मला मदत कर. आपण दोघे मिळून हा कायदा दुरुस्त करून घेण्याचा प्रयत्न करूं आणि दुःखी झालेल्या या लक्षावधि जीवांना घांसभर अन्न मिळण्याची व्यवस्था करून सुखी करूं. धीर धर, बायको मेल्याबद्दल रडत बसण्याऐवजीं मरणाच्यादारीं पडलेल्या हजारों स्त्रियांना जीवदान दे. " मरणोन्मुख होऊन पडलेल्या माणसाच्या तोंडांत अमृताचा बिंदु पडतांच तो क्षणार्धांत हिंडता फिरता व्हावा, तद्वत् ब्राईटची स्थिति झाली. मित्राच्या उपदेशाचा इष्ट परिणाम होऊन त्याची प्रकृति अल्पावधींत सुधारली आणि त्याच्या व कॉब्डेनच्या प्रयत्नांनीं धान्यासंबंधींच्या कायद्यांत सुधारणा होऊन त्यांच्या अपेक्षेप्रमाणें खरोखरीच गोरगरिबांना स्वस्त धान्य मिळूं लागलें. त्यामुळें लक्षावधि लोकांनीं त्यांना दुवा दिला; इतकेंच नव्हे तर या कृत्यामुळें त्यांचें नांव अमर झालें.

## फुरसतीच्या वेळाचा सदुपयोग झाला पाहिजे

इंग्लंडमध्यें जी औद्योगिक क्रांति झाली तिचें अनुकरण भारतांतहि झालें आणि त्यामुळें येथील लोकांच्या सामाजिक परिस्थितींत पुष्कळ बदल झाला. कारखा-

न्यांत काम करणें सोईस्कर पडावें म्हणून हजारों लोक कारखान्याच्या जवळपास राहूं लागले. त्यामुळें अर्थातच जागा गलिच्छ, अपुरी आणि गचडीची झाली. कारखान्यातील कोंदट हवा, अस्वच्छता, तासाचे तास उभें राहून काम करणें वगैरे नाना प्रकारच्या अनिष्ट गोष्टीमुळें हें वातावरण इतकें बिघडलें कीं, तें सुधारण्याचे प्रयत्न करणें व्यक्तीच्या आटोक्याबाहेर गेलें व त्यासाठीं अनेक परोपकारी माणसांनीं एकत्र येऊन संघटित प्रयत्न करणें भाग झालें. यामुळें समाजसेवेच्या क्षेत्रांत फार मोठी भर पडली आणि तें कल्पनातीत वाढलें.

वस्तुतः पुष्कळशीं कामें यंत्रांनीं होऊं लागल्यामुळें मनुष्याचे श्रम कमी होऊन तो अधिक सुखी व्हावा व त्याला आपली सुधारणा करण्यास अधिक सवड मिळावी. परंतु दुर्दैवानें वाफेच्या साहाय्यानें यंत्रें चालू झाल्याचा अगदींच विपरीत परिणाम झाला. बहुसंख्य लोक अधिक सुखी होण्याची गोष्ट तर राहोच, पण त्यांना सर्व तऱ्हेनें पिळून काढून त्यांना अधिक दुःखी करण्याकडे वाफेच्या यंत्राचा उपयोग होऊं लागला. माणसांची किंमत यंत्रापेक्षांहि कमी झाली.

आज या परिस्थितींत पुष्कळ बदल झालेला असला तथापि कारखान्यांतील कामामुळें कामगाराची शारीरिक हानि तर होतेच; पण त्याहिपेक्षां त्याची मानसिक हानि फार होते. तेंच तें काम तासन् तास, दिवसांचे दिवस आणि वर्षांची वर्षें पुनः पुनः करीत राहिल्यानें तो मंदबुद्धि होतो. त्यांच्या मेंदूला चालना मिळत नाहीं आणि हळूहळू तो कारखान्यांतील एक यंत्र बनतो. दिवसभर काम करून थकला भागलेला घरीं निघाला कीं आपण आज कांहींतरी काम पुरें केलें, असें समाधान मानावयालाहि त्याला जागा नसते. कारण एखादी वस्तु पुरी तयार करण्याचें काम त्याच्याकडे नसतें तर तिचा एखादा वेगळा भागच तो तयार करीत असतो. याचा कधीं कधीं त्याच्यावर इतका अनिष्ट परिणाम होतो कीं, एखाद्या मानसिक व्यथेमुळें तो अकालीं कामास नालायक होतो. अशा स्थितींत त्याला जो फुरसतीचा वेळ मिळतो त्यांत त्याच्याकरितां मुख्यतः दोन गोष्टी करण्याची आवश्यकता असते. त्या ह्या कीं, त्याच्या शरीराला आलेला थकवा आणि मेंदूला आलेली सुस्ती हीं नाहींशीं करणें.

या फुरसतीच्या वेळाकडे आणखी एका दृष्टीनें पाहाण्याची आवश्यकता आहे. हा रिकामा वेळ चांगल्या प्रकारें घालविण्यास जर खरोखरी कांहीं मार्ग नसेल, तर मग तो आळसांत, अनिष्ट गोष्टींत किंवा दुसऱ्याला उपद्रव करण्यांत घालविला जातो. अनेक प्रकारचे मोह, अनेक प्रकारचीं व्यसनें, अनेक प्रकारचे नाद माणसाला या फुरसतीच्या वेळांत लागतात. मनुष्य कामांत गुंतलेला असतांना त्याला असे मोह पडले, व्यसनें लागलीं, त्यानें अनिष्ट गोष्टी केल्या, असें सामान्यतः होत नाहीं. या

साऱ्या गोष्टी फुरसतीच्या वेळीं, काम नसतांना, दुसरें कांहीं करावयास नाहीं म्हणून होतात. आणि यांत त्याला स्वतःला अनहितकारक होतील अशा पुष्कळ गोष्टी असतातच; पण सर्व समाजाला हानिकारक होतील अशाहि अनेक गोष्टी तो करतो. माणूस बरावाईट होणें हें तो आपला फुरसतीचा वेळ कशा रीतीनें घालवितो, याच्यावर बहुतांशीं अवलंबून असतें असें म्हणतात, तें यामुळेंच. म्हणून हा फुरसतीचा वेळ चांगल्या रीतीनें घालविण्यास लावण्यांत त्याचें व समाजाचें हित आहे. आपला चरितार्थाचा धंदा संपल्यानंतर राहिलेल्या फुरसतीच्या वेळाचें आणखी एका दृष्टीनें विशेष महत्त्व आहे आणि त्याच्यावरच दिवसेंदिवस अधिक भर देण्यांत येत आहे. तें हें कीं, कामगार चारित्र्यसंपन्न करणें, त्याच्या व्यक्तित्वाची वाढ करणें, आधुनिक समाजाचा एक महत्त्वाचा घटक म्हणून त्याची सुधारणा करणें, राष्ट्राचा एक घटक म्हणून आपली जबाबदारी ओळखण्याला व ती पार पाडण्याला त्याला लायक करणें आणि त्याचा सर्वांगीण विकास होईल, असा प्रयत्न करणें. आपला चरितार्थ चालावा म्हणून मनुष्य जें कष्टाचें काम करीत असतो तें अपरिहार्य असतें. त्या वेळांत त्याला यांतलें कांहींही करणें शक्य नसतें. म्हणून त्याच्या फुरसतीच्या वेळांतच या गोष्टी व्हाव्या लागतात. पण त्या अशा रीतीनें व्हाव्या लागतात कीं, त्याचें स्वातंत्र्य, त्याचें स्वास्थ्य, त्याच्या दुसऱ्या वैयक्तिक जबाबदाऱ्या यांच्या त्या आड येणार नाहींत, तर उलट त्यांना त्या पोषक होतील.

## कामगार सुस्थितींत राहिला पाहिजे

कारखान्यांतील निर्जीव यंत्रसामुग्रीची घर्षणानें मोडतोड, झीज आणि नादुरुस्ती होते. तिची दुरुस्ती करून ती चालू स्थितींत ठेवण्यासाठीं; इतकेंच नव्हे तर ती सुस्थितींत सदोदित ठेवण्यासाठीं कारखानदाराकडून सतत प्रयत्न करण्यांत येतात. पण हीं सजीव यंत्रें-कारखान्यांतील माणसें-शारीरिक दृष्ट्या किंवा मानसिक दृष्ट्या सुस्थितींत राहावींत म्हणून प्रयत्न करणें हें कोणाच्या गांवींच नसतें. पण कारखानदारांनीं याची पर्वा केली नाहीं, तरी समाजाला या गोष्टीकडे कानाडोळा करून चालणार नाहीं. कामगार कामावरून सुटल्यापासून तो पुन्हा कामावर जाईपर्यंतच्या मध्यंतरीच्या काळांत कामामुळें त्याची जी शारीरिक, मानसिक आणि नैतिक हानि झालेली असते, ती भरून काढून तो पुनः ताजातवाना, उत्साही, कार्यक्षम होईल असे प्रयत्न करणें; इतकेंच नव्हे तर त्याचा सर्वांगीण विकास करून तो समाजाचा एक कर्तबगार घटक होईल, असे प्रयत्न करणें ही समाजाची जबाबदारी आहे. तिकडे समाजाचें दुर्लक्ष झाल्यास समाजाचा ऱ्हास होईल. फुरसतीचा वेळ बुद्धिपुरस्सर उपयुक्त रीतीनें खर्च करितां आल्यास तो व्यक्ति, कुटुंब आणि समाज यांना चारित्र्यसंपन्न करतो. म्हणून हें कार्य समाजसेवेचें एक अत्यंत महत्त्वाचें अंग मानण्यांत येतें. आणि त्याकरितां समाजसेवेच्या संघटित प्रयत्नाची आवश्यकता दिवसेंदिवस वाढत आहे.

पूर्वी कामगारांच्या कामाचे तास ठरलेले नसत. त्यामुळें कारखानदार त्यांचे-कडून वाटेल तितका वेळ काम करून घेत. आतां हा जमाना बदललेला आहे. सरकार, कामगारसंघ व जागतिक मजूरसंघटणा यांच्या प्रयत्नानें कामगारांच्या कामाचे तास, कारखान्यांतील कामाची परिस्थिति आणि मजुरीचे दर यांत पुष्कळ सुधारणा झाली आहे. यामुळें कामगारांची सांपत्तिक स्थिति सुधारून त्यांच्या फुरसतीच्या वेळांतहि पुष्कळ वाढ झाली आहे. पण त्याबरोबर समाजसेवकांचीहि जबाबदारी वाढत आहे. कारण हा दिवसेंदिवस अधिकाधिक वाढणारा फुरसतीचा वेळ कामगारांच्या सर्वांगीण विकासास पोषक होण्यास कसा उपयोगांत आणतां येईल, हें पाहाण्याची जबाबदारी या क्षेत्रांत काम करणाऱ्या समाजसेवकांची आहे. या कामगारांच्या वाढत्या फुरसतीचा योग्य उपयोग करून घेतां आला नाहीं, तर त्यापासून फायद्याऐवजीं तोटा होण्याचा संभव आहे.

एकत्र कुटुंबपद्धतींत दुसरे कितीहि दोष असले, तरी एक मोठा फायदा होता. तो असा कीं, कुटुंबांतील वृद्ध, आजारी, दुर्बळ अशा माणसांची सोय लाजेकाजेस्तव तरी कुटुंबांतच करावी लागे. त्यांचा समाजावर फारसा भार पडत नसे. परंतु उपरि-निर्दिष्ट औद्योगिक क्रांतीनें कुटुंबाचे शक्य तितके लहान तुकडे करण्याचें श्रेय घेतलें. इतकें कीं बाप, आई, मुलगा व मुलगी हींहि परस्परापासून अलग केलीं. घराचा लोभ साहजिकच न सुटल्यामुळें निरुपाय तितकींच माणसें खेडें सोडून शहरांत येऊं लागलीं. त्यामुळें आई गांवीं तर बाप शहरांत, मुलगा एका कारखान्यांत तर मुलगी दुसऱ्या कारखान्यांत अशी त्रिस्थळी स्थिति झाली. परावलंबी माणसांची संख्या वाढली व आजारी पडल्यास कोणींच विचारीनासें झालें. यामुळें खेड्यांत व शहरांत दोन्ही ठिकाणीं पराधीन माणसांची संख्या वाढली, अनेक प्रकारचे सामाजिक प्रश्न उपस्थित झाले आणि प्रत्येक स्थळीं—खेड्यांत व शहरांत—दुसऱ्याच्या मदतीची—समाजसेवेची आवश्यकता सारखीच भासूं लागली.

वरील विवेचनावरून समाजसेवेची किती आवश्यकता आहे व ती कशी सारखी वाढत आहे, हें लक्षांत येईल. व्यक्ति कोणतीहि असो, ती कोणत्याहि स्थितींत असो आणि समाजांत तिचा दर्जा कोणताहि असो; तिला समाजसेवा करण्याला विस्तीर्ण क्षेत्र आहे, समाजसेवा करणें हें प्रत्येक व्यक्तीचें कर्तव्य आहे आणि बदललेल्या परिस्थितीमुळें समाजसेवा करावी तितकी थोडीच, अशी परिस्थिति आज उत्पन्न झाली आहे.

# प्रकरण ३ रें

# समाजसेवेचीं मूलभूत तत्त्वें

समाजसेवेच्या मूलभूत तत्त्वांपैकीं एक तत्त्व असें आहे कीं, समाजांतील ज्या ज्या व्यक्तींना किंवा पोटसमाजांना आपली पूर्ण वाढ व उन्नति करून घेण्यास संधि मिळत नसेल व त्यामुळें त्यांची अवनति होत असेल, त्यांना त्यांच्या उन्नतीच्या मार्गांत येणाऱ्या कृत्रिम अडचणी नाहींशा करून ती संधि मिळवून देण्याचा प्रयत्न करणें; ज्या मनुष्यकृत अडचणी त्यांच्या आत्मोन्नतीच्या आड येत असतील, त्या दूर करून त्यांना वाढीस लावणें. आतां या दृष्टीनें विचार केल्यास नैसर्गिक वाढ खुंटविण्यास कारणीभूत होणाऱ्या मनुष्यकृत अडचणी आपल्या समाजांत फारच आहेत. आपलें राष्ट्र इतर राष्ट्रांच्या मानानें पुष्कळच मागासलेलें आहे आणि हा मागासलेपणा येण्यास जीं अनेक कारणें आहेत त्यांत वर निर्दिष्ट केलेलें एक मुख्य कारण आहे हि गोष्ट तितकीच खरी आहे. समाजातील कांहीं गटांच्या सभोंवार हें कृत्रिम बंधनांचें जाळें इतकें घट्ट पसरलेलें आहे कीं, त्यामुळें आज कैक वर्षें त्या पोटसमाजाची सारखी अवनति होत आहे. आणि आतां हें जाळें जरी थोडें थोडें दूर करण्याचे प्रयत्न होत असले, तरी ते अनिष्ट परिणाम नाहींसे होऊन हीं बंधनें नसणें हा "आपला जन्मसिद्ध हक्क आहे"च, असा आत्मविश्वास त्यांच्यांत उत्पन्न होण्यास पुष्कळ कालावधि लागेल.

## शिक्षणप्रसार

या अनेक कृत्रिम बंधनांपैकीं कांहींचा येथें विचार करूं. आज समाज सुधारण्याचें मुख्य साधन शिक्षण असें मानण्यांत येतें. कारण आचार हा विचारांचा परिणाम असतो. माणसाचे विचार सुधारल्याशिवाय आचार सुधारत नाहींत आणि विचार सुधारण्याचें काम शिक्षणाच्या योगानें होतें. जगांतील सुधारलेल्या राष्ट्रांचा इतिहास जर आपण पाहिला तर आपल्याला असें आढळून येईल कीं, त्यांच्या समाजसुधारणेच्या कार्यक्रमांतील पहिली बाब शिक्षणप्रसार ही होती. शिक्षणाचा फारसा प्रसार नसून राष्ट्र अतिशय सुधारलेलें आहे, असें आपल्याला कोठेंहि आढळणार नाहीं. यासाठीं प्रथम प्राथमिक शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार झाला पाहिजे. पण प्राथमिक शिक्षण मिळूं लागलें कीं लोक सुधारलेच असें म्हणतां येणार नाहीं. देशाची जर खरोखरच सुधारणा व्हावयास हवी असली; तर प्रथम प्राथमिक शिक्षण सक्तीचें, मोफत व सार्वत्रिक झाल्यानें ती होईलच असें नाहीं. तर त्याकरितां उच्च शिक्षण व प्रौढ शिक्षण

यांचाहि प्रसार अधिक व्हावयास हवा. समाजांतील सर्व साधारण व्यक्तींना अशा प्रकारचें शिक्षण मिळून समाज जितका सुसंस्कृत होईल; तितका तो प्रगतीच्या वरच्या पायरीवर चढेल. नुसती अक्षरओळख झाल्यानें फारसें कार्य होणार नाहीं. ओसाड जागा साफसूफ करावी त्या प्रमाणें साक्षरतेचा उपयोग होतो. प्राथमिक कार्य म्हणून तिची आवश्यकता आहे यांत मुळींच शंका नाहीं; पण धान्याची पेरणी करणें, शेताची मशागत करणें व उत्तम धान्य पिकविणें या गोष्टी पुढेंच करावयाच्या असतात व त्या उच्च शिक्षण व प्रौढ शिक्षण यांच्याशिवाय होत नाहींत. पण जेथें प्राथमिक शिक्षणालाच ठिकाण नाहीं – ज्या जागेवरचें अजून रानहि निघालें नाहीं – तेथें उच्च शिक्षणाची गोष्टच बोलावयास नको. जेथें अन्नच खावयास नाहीं, तेथें मिष्टान्न कोठचें ? पण या बाबतींत आतां जागृति होण्यास सुरवात झाली आहे. शिक्षणाचें महत्त्व दिवसें-दिवस लोकांना कळूं लागलें आहे. सरकारहि आतां आपलें असल्यामुळें या दिशेनें अधिक प्रयत्न करीत आहे. हें शिक्षणप्रसाराचें कार्य जितक्या अधिक लवकर करितां येईल तितकें करून समाजसुधारणेच्या मार्गांत येणारा हा प्रचंड अडथळा नाहींसा करणें, हें समाजसेवा करूं इच्छिणाऱ्या प्रत्येक नागरिकाचें कर्तव्य आहे. शिक्षण मिळणें हा प्रत्येक व्यक्तीचा हक्क आहे आणि अज्ञानामुळें आपल्या या नैसर्गिक हक्काची जाणीव पुष्कळांना नसली तरी समाजांत तितकी जागृति होण्याची वाट न पाहतां निदान प्राथमिक व प्रौढ शिक्षण सर्वांना मिळेल असे प्रयत्न करून समाजाच्या प्रगतीच्या आड येणारें हें अज्ञान नाहीसें करणें, प्रत्येक सुशिक्षित व्यक्तीचें मुख्य कर्तव्य आहे.

## प्रौढ शिक्षण

ज्यांना प्राथमिक शिक्षणहि मिळालेलें नाहीं किंवा प्राथमिक शिक्षण मिळून ज्यांच्या गरजांना आवश्यक असें प्रौढ शिक्षण मिळण्याची व्यवस्था झालेली नाहीं ( आणि असा वर्ग आपल्याकडे फारच मोठा आहे ) त्यांना तसें शिक्षण मिळण्याची सोय झाल्याशिवाय राष्ट्राची प्रगति होणार नाहीं. आज आपल्या राष्ट्राला स्वातंत्र्य प्राप्त झालेलें असून प्रत्येक प्रौढ व्यक्तीला मत देण्याचा अधिकार मिळाल्यामुळें ती राष्ट्राच्या व्यवहारांत अत्यंत अल्पांशानें कां होईना; पण भाग घेण्यास लायक झालेली आहे. पण स्वातंत्र्य प्राप्त झालें किंवा मत देण्याचा हक्क मिळाला कीं, तेवढ्यानें राष्ट्र सुखी झालें असें होत नाहीं. आज पृथ्वीच्या पाठीवर असे अनेक देश आहेत कीं, ते राजकीय दृष्ट्या स्वतंत्र असूनहि इतर दृष्टींनीं अगदीं मागसलेले आहेत. स्वतंत्र देशाचा कर्तृत्ववान् घटक म्हणून आपली जी योग्यता असावयास पाहिजे, ती अजून आपल्याला प्राप्त झालेली नाहीं;ती प्राप्त करून घेण्याला प्रौढ शिक्षण हें एक प्रभावी साधन आहे. प्रौढ शिक्षणाचें कार्य जितकें विशाल आहे, तितकेंच विविध प्रकारचें आहे. सुशिक्षितापासून अशिक्षिता-

पर्यंत कामगार, कारागीर, शेतकरी—जीवनाच्या वेगवेगळ्या क्षेत्रांत काम करणारी प्रत्येक व्यक्ति—यांना त्याची आवश्यकता आहे आणि या वेगवेगळ्या परिस्थितींतल्या माणसांना त्यांच्या विशिष्ट गरजा भागविण्याला सहाय्य होईल, अशा रीतीनें तें मिळण्याची व्यवस्था झाली पाहिजे. अशासाठीं कीं त्यांची दृष्टि अधिक व्यापक होऊन ते आपापलें काम अधिक चांगल्या रीतीनें करतील. इतकेंच नव्हे; तर तसें करण्यांत त्यांना आनंद वाटेल. बहुजनसमाजाला असें शिक्षण मोठ्या प्रमाणांत मिळून त्याचा शैक्षणिक दर्जा व कार्यक्षमता वाढल्याशिवाय समाजाची सर्वांगीण सुधारणा होणार नाहीं. नाहीं तर बेजबाबदार लोक आपल्या स्वार्थासाठीं या हक्कांचा उपयोग करून घेतील.

आज आपला बहुजनसमाज अत्यंत दरिद्री, निराश, निरुत्साही, नाउमेद असा झालेला आहे. त्याच्यांत आशा, उत्साह, उमेद उत्पन्न करून, त्याचा नैतिक, सांस्कृतिक, सामाजिक आणि सांपत्तिक दर्जा वाढवून त्याला वरच्या पातळीवर आणणें, आज अत्यंत जरूरीचें आहे. आणि तें प्रौढ शिक्षणाच्या द्वारा करणें पुष्कळ अंशीं शक्य आहे. शेतकऱ्यानें अर्धपोटीं शेतावर जाऊन राबावें आणि जें काय थोडें धान्य पिकेल त्याच्यावर कसातरी गुजारा करून कष्टानें आयुष्य घालवावें, कामगारानें कसें तरी अन्न खाऊन घाईघाईनें कारखान्यांत जावें, जें होईल तें काम करावें आणि महिन्याच्या आरंभीं हातीं पडलेला पगार दुसऱ्या महिन्यापर्यंत कसा पुरवावा, या विवंचनेंत नेहमीं असावें. इतकें झालें कीं, सारें सुरळीत चाललें आहे असें समजून आपण समाधान मानणें, योग्य होणार नाहीं. शेतकरी झाला काय किंवा कामगार झाला काय, तो मनुष्यच असतो. त्यालाहि आपली सुधारणा व्हावी, सुख मिळावें, जगांत काय घडामोडी होतात, त्या ऐकावयास मिळाव्यात, कांहीं तरी करमणूक व्हावी, चांगलें गाणें कानीं पडावें, एखादा नाटकसिनेमा पाहावयास मिळावा, कोठें तरी प्रवास करावयास जावें, श्रीमंत ज्या गोष्टी दररोज करितांना तो पाहातो; त्या त्याला सणावारीं तरी करतां याव्या, असें वाटणें स्वाभाविक आहे. हा मनुष्यस्वभाव आहे. आणि या गोष्टी त्याला करतां आल्या तर त्यांपासून त्याला स्वतःला फायदा तर होईलच पण त्याचें सुख समाजाच्या सुखांतहि भर घालील. या गोष्टी नुसती अक्षरओळख झाल्यानें होणें शक्य नाहीं आणि नुसती अक्षर ओळखही जितक्या लौकर होते, तितक्याच जलदीनें ती नाहींशी होणें संभवनीय असतें. म्हणून आंगठा लावणाराला सही करावयास शिकविणें, सही करणारास साक्षर करणें व पुढें त्याची मानसिक व बौद्धिक वाढ होईल अशा प्रकारच्या शिक्षणाची विस्तृत योजना तयार करून त्याची सर्वांगीण प्रगति करणें अवश्य आहे. शिक्षणकेंद्रें वस्तीच्या मध्यभागांत, अशा चांगल्या जागेंत असावींत कीं त्या भागांतले लोक आपल्या फुरसतीच्या वेळीं तेथें आपण होऊन येतील, आपल्या मित्रांना

भेटतील, गप्पागोष्टी, वादविवाद करतील, आपल्या आवडीच्या गोष्टी करतील आणि अशा रीतीनें तें ठिकाण त्यांच्या आवडीचें होऊन त्यांच्या प्रगतीला पोषक होईल.

## मनुष्य जन्मभर विद्यार्थीच असतो

शिक्षण हें माणसाची प्रगति करण्याचें एक साधन आहे. त्याचा अंतिम हेतु माणसाची शक्य तितकी सर्वांगीण प्रगति करणें हा आहे. म्हणून ही प्रगति अमूकच एका काळांतच होते, असें नाहीं तर माणसाच्या प्रगतीची – त्याच्या शिक्षणाची क्रिया साऱ्या आयुष्यभर चालावी लागते. मात्र माणसाच्या वयोमानाप्रमाणें त्याच्या शिक्षणाचें स्वरूप बदलावें लागतें. प्रौढ माणसाला आपल्या कामांत नैपुण्य कसें मिळवावें याचें शिक्षण लागतें. त्याला व्यावसायिक शिक्षण म्हणतात. पण त्याशिवाय ज्यांच्याबद्दल आपल्याला वेतन किंवा पैशाचा मोबदला मिळत नाहीं,केवळ स्वयंस्फूर्तीनें आपण करितों अशीं कांहीं कामें किंवा कर्तव्यें असतात. एकंदर समाजाच्या किंवा राष्ट्राच्या व्यवहाराशीं– घडामोडीशीं आपला निकट संबंध असतो, आपल्या जिव्हाळ्याचे किंवा विशेष आवडीचे कांहीं विषय असतात, या सर्व गोष्टी योग्य रीतीनें करतां याव्या, म्हणून आपल्याला शिक्षण लागतें. आपण समाजाचे एक घटक असतों, कुटुंबाचे चालक असतों, निरनिराळ्या माणसांशीं आपले निरनिराळे संबंध असतात, अशीं हीं नानाविध कर्तव्यें पार पाडण्याकरितां शिक्षणाची मदत मिळाल्यास तीं आपल्या हातून अधिक चांगल्या रीतीनें होऊं शकतात. त्याच प्रमाणें वर निर्दिष्ट केलेला आपला व्यवसाय, आपलीं कर्तव्यें, आपण खुशीनें पत्करलेलीं कामें हीं सारीं करून राहिलेला फुरसतीचा वेळ आपण कसा घालवितों हेंहि महत्त्वाचें असतें. शारीरिक, मानसिक वगैरे रीतीनें झालेली आपली झीज भरून काढण्याच्या कामीं या फुरसतीच्या वेळाचा कसा फायदा करून घ्यावा याचेंहि आपल्याला शिक्षण मिळावें लागतें. अर्थातच हें सारें शिकविणाऱ्या शाळा नसतात आणि त्या असल्या तरी प्रौढ माणसांना त्यांत जाणें अनेक कारणामुळें शक्य नसतें. म्हणून तें वेगवेगळ्या मार्गांनीं, वेगवेगळ्या साधनांनीं, वेगवेगळ्या माणसांच्या सोयीसवडीप्रमाणें मिळवावयाचें असतें. मनुष्य हा जन्मभर विद्यार्थिच असतो, असला पाहिजे. जन्मभर वेगवेगळ्या वयांत, वेग-वेगळ्या अवस्थांना आवश्यक असें शिक्षण त्याला मिळावें लागतें आणि तें इतक्या विविध प्रकारचें असतें कीं त्याचा येथें नामनिर्देशहि करणें शक्य नाहीं. अशा प्रकारचें सर्वांगीण शिक्षण देऊन माणसाला संपूर्ण व्यक्ति करण्याचे प्रयत्न प्रौढ शिक्षणाच्या द्वारें करितां येतात. यावरून प्रौढ शिक्षणाचें महत्त्व किती आहे–विशेषतः भारताच्या आजच्या परिस्थितींत किती आहे याची कल्पना येईल.

## असामान्य माणसांच्याहि शिक्षणाची सोय झाली पाहिजे

हें झालें सामान्य लोकांच्या शिक्षणासंबंधीं. पण समाजाची खरी प्रगति व्हावयाला त्यांतील सर्व सामान्य लोकांच्या शिक्षणाची सर्वतोपरी योग्य अशी व्यवस्था तर व्हावी लागतेच; पण त्याशिवाय त्यांतील असामान्य–शारीरिक, मानसिक, बौद्धिक किंवा दुसऱ्या कोणत्या तरी प्रकारें व्यंग असलेल्या माणसांना त्यांचे विशिष्ट दोष, विशिष्ट अडचणी लक्षांत घेऊन शिक्षण देण्याची व्यवस्था व्हावी लागते. यांतले कांहीं दोष रोगामुळे, अपघातांमुळें किंवा अशाच कांहींतरी दुसऱ्या कारणांमुळें जन्माला येण्यापूर्वी, जन्माला येतांना किंवा जन्माला आल्यानंतर, आनुवंशिक किंवा परिस्थितिजन्य कारणांमुळे उत्पन्न झालेले असतात. ते माणसाच्या सामाजिक आणि सांपत्तिक स्वातंत्र्याच्या आड तात्पुरते किंवा कायमचे येतात. अशीं व्यंगें असलेले लोक हेहि इतरांप्रमाणेंच समाजाचे घटक असून त्यांना शिक्षण आणि कामधंदा मिळून इतरांप्रमाणेंच तेहि सामाजिक आणि सांपत्तिक दृष्टया स्वतंत्र होण्यासाठीं त्यांना शक्य तितकी मदत मिळाली पाहिजे. अशा प्रकारच्या लोकांनीं पूर्वजन्मीं पाप केल्यामुळें परमेश्वरानें त्यांना ही शिक्षा केलेली आहे आणि म्हणून ते समाजाला कमीपणा आणणारे आहेत. यासाठीं आपण त्यांना दूर ठेवलें पाहिजे, त्यांच्या पापाचीं फळें त्यांना भोगावयास लावलीं पाहिजेत, ही विचारसरणी चुकीची आहे. ती आज कोणालाही मान्य होणें शक्य नाहीं. इतर सामान्य मुलांना शिक्षण मिळणें हा जसा त्यांचा हक्क आहे, असें आपण समजतो त्याचप्रमाणें याहि मुलांना त्यांच्या विशिष्ट परिस्थितीला योग्य असें शिक्षण मिळालें पाहिजे. किंबहुना त्यांच्यांत असे दोष असल्यामुळें त्यांचा हक्क समाजावर अधिकच आहे, असें म्हटल्यास तें वावगें होणार नाहीं. त्यांना असें शिक्षण देणें हा त्यांच्यावर आपण उपकार करीत आहोंत, असें मानणें चूक आहे. अर्थातच हें विशिष्ट प्रकारचें शिक्षण सामान्य शिक्षणाच्या मानानें फार खर्चाचें असतें. पण तें देऊन अशीं मुलें संपूर्णतः नसलीं तरी अंशतः तरी स्वावलंबी होऊन त्यांचें जीवन सुखी होतें आणि त्यांचा समाजावर पडणारा भार तितक्या प्रमाणांत कमी होतो.

अशा व्यंगयुक्त लोकांना शक्य तितकें स्वावलंबी करून समाजाचें ओझें कमी करण्यापासून आणखी एक मोठा फायदा आहे, तो असा कीं यांना यांच्या व्यंगापासून जो त्रास होतो, ज्या वेदना होतात, जो छळ होतो तो या मार्गांनीं पुष्कळ कमी करतां येण्यासारखा असतो आणि शक्य त्या मार्गांनीं तो कमी करणें हें भूतदयेच्या आणि एकंदर समाजाच्या हिताच्या दृष्टीनें फार महत्त्वाचें असतें. आज नवे नवे शास्त्रीय शोध लागत आहेत, व अशा व्यंग असलेल्या माणसांना साहाय्यभूत होतील अशीं नवीन नवीन साधनें उपलब्ध होत आहेत. त्यामुळें अशा सामाजिक बाबतींत मूलगामी बदल करणें शक्य होत आहे.

## अंधांचा प्रश्न

अशा व्यंग मानलेल्या लोकांपैकीं आंधळ्याचेंच आपण उदाहरण घेऊं. आंधळा मनुष्य पाहिला कीं त्याची परस्वाधीन स्थिति पाहून आपल्याला त्याची कींव येते. पैसा दोन पैसे खिशांत असले तर ते आपण त्याला देतों. फार झालें तर आणखी एखाद्या आपत्तींत तो सापडूं नये म्हणून त्याला हातीं धरून रस्त्याच्या पलीकडे सुरक्षित सोडतों. इतकें केलें कीं त्याला साहाय्य करून एक मोठें समाजसेवेचें कृत्य केलें म्हणून आपण समाधान मानतों. पण खरोखरी हा वरवरचा विचार असतो. ज्या एखाद्या रोगामुळें त्याला अंधत्व आलें असेल त्याचा प्रतिकार पूर्वींच करितां आला असता. कदाचित् आजहि कांहीं इलाज करून हें त्याचें व्यंग घालवितां येण्यासारखें असेल. कदाचित् दुसऱ्या कशानें तरी अंधत्व आलें असल्यास त्यालाहि शस्त्रक्रियेसारखा उपाय करून तें समूळ नाहींसें करितां आलें नाहीं तरी अल्पांशानें तरी कमी करितां येईल. निदान अशा प्रकारचे प्रयत्न तरी करून पाहाणें आवश्यक असतें. पण इतरांची गोष्ट तर राहोच पण त्याचे आईबाप किंवा पालकहि असे प्रयत्न करीत नाहींत. उलट असें कांहीं होणें शक्य नाहीं असें गृहित धरून त्याची नुसती कींव करतात आणि त्याला अधिकच निरुत्साही व असाहाय्य करितात. असें म्हणतात कीं एकंदर आंधळ्यांपैकीं एक तृतीयांश आंधळ्यांना डोळ्यांच्या रोगांशिवाय दुसऱ्या रोगांमुळें आणि एक षष्ठांश अंधांना अपघातांमुळें अंधत्व आलेलें असतें. म्हणजे वेळींच योग्य काळजी घेतल्यास या मुलांतला हा दोष बहुतांशीं मुळांत नाहींसा करतां येण्यासारखा निदान त्याचा त्रास कमी करतां येण्यासारखा असतो.

आंधळ्या मुलांना इतर मुलांप्रमाणेंच सक्तीचें आणि फुकट शिक्षण मिळावें असा कायदा इंग्लंडमध्यें सन १८९३ मध्यें करण्यांत आला. अमेरिकेंतहि असाच कायदा आहे. अशा रीतीनें या राष्ट्रांतील सरकारनें आंधळ्यांच्या शिक्षणाची जबाबदारी आपल्या आंगावर घेतली आणि साऱ्या देशभर सरकारी खर्चानें अंधशाळा चालविण्यांत येऊं लागल्या. पण आपल्या देशांत ज्या काय थोड्या शाळा आंधळ्याकरितां खाजगी प्रयत्नांनीं चालविण्यांत येत आहेत, त्यांना एक तर पैशाची पुरेशी मदत मिळत नाहीं आणि दुसरें असें कीं, पुरेसे विद्यार्थीहि मिळत नाहींत, कारण चांगला भरपूर कमाईचा भीक मागण्याचा धंदा सोडून हें शाळेंत शिकण्याचें बंधन कोण पत्करतों. युरोप अमेरीकेंत भिक्षा मागणें बेकायदेशीर असल्यामुळें व प्रत्येक अंध मुलानें शाळेंत गेलेंच पाहिजे. अशी सक्ती असल्यामुळें तेथील साऱ्या अंध मुलांना शाळेंत जावें लागतें. त्यांना घरीं ठेवावींत कीं त्यांच्यासाठीं काढलेल्या स्वतंत्र संस्थांत ठेवावींत हा एक वादग्रस्त प्रश्न तेथें उत्पन्न झाला आहे. स्वतंत्र संस्थांत ठेवल्यास तीं एकलकोंडीं होतात, त्यांना अनेक प्रकारच्या अनिष्ट संवयी लागतात,

समाजापासून तीं अलग रहात असल्यामुळें समाजांत वागावें कसें, एकंदर व्यवहार कसा करावा हें त्यांना समजत नाहीं आणि मग समाजांत राहणें त्यांना कठीण जातें. म्हणून अशा संस्थांत मुलें ठेवणें मुलांच्या एकंदर हिताच्या दृष्टीनें चांगलें नाहीं. शिवाय सामान्य शाळांपेक्षां या स्वतंत्र शाळांत मुलांना दुप्पट खर्च येतो. तसेंच या शाळा कोठें दूर असतील तेथें हीं परस्वाधीन मुलें पाठविण्यास पालकानांहि कठीण पडतें म्हणून अगदीं निरुपाय असेल तरच तीं अशा स्वतंत्र संस्थांत पाठवावींत, असें शिक्षण तज्ज्ञांचें आतां मत होऊं लागलें आहे अर्थातच या क्षेत्रांत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचेंहि हेंच मत आहे. या मुलांनाहि सामान्य शाळेंत इतर मुलांबरोबर शिक्षण द्यावें; फक्त त्यांना लागणारे विशिष्ट विषय व मानसशास्त्र यांचें मुद्दाम शिक्षण घेतलेल्या शिक्षकानें त्यांना कांहीं तास शिकवावें. हे विशिष्ट विषय शिकविणारे शिक्षक मात्र शक्यतों स्वतः आंधळेच असावेत. कारण त्यांना आंधळ्याच्या गरजा व अडचणी अधिक चांगल्या रीतीनें कळतात, त्यांच्या-बद्दल त्यांना खरी सहानूभूति वाटते आणि ते आपल्यांतलेच एक आहेत असें मुलांनाहि वाटतें. याशिवाय बाकीचा वेळ इतर मुलांबरोबर अभ्यासांत व खेळण्यांत घालविण्याची त्यांना संधि द्यावी असा या बाबतींतील आधुनिक दृष्टिकोन आहे.

## त्यांना स्वावलंबी करण्याचे प्रयत्न

अशा व्यंग मुलांना शिक्षण देऊन आर्थिक दृष्ट्या स्वतंत्र करणें हा त्यांच्यासाठीं काम करणारापुढें अत्यंत कठीण प्रश्न असतो; आणि तो यशस्वी रीतीनें सोडवितां न येऊन त्यांच्या पोषणाचा बोजा समाजावर कायमचा पडूं लागला, तर त्यांच्या शिक्षणासाटीं केलेला खर्च आणि त्यांच्या सुधारणेसाठीं घेतलेले श्रम व्यर्थ गेले, असेंच म्हणावें लागेल. म्हणून हर प्रयत्न करून ते शक्यतितके स्वावलंबी होतील असे प्रयत्न करण्यांत येतात. काहीं राष्ट्रांत यांना काम देण्याबद्दल कारखानदारावर सक्ती करण्यांत येतें. उदाहरणार्थ गेल्या महा-युद्धापूर्वी जर्मनींतील कारखान्यांत अशा व्यंग लोकांना कांहीं ठराविक प्रमाणांत कांहीं तरी काम देण्याची कारखानदारांवर सक्ती करण्यांत येत होती. तरीसुद्धां योग्य संधि न मिळाल्यामुळें, एखाद्या विशिष्ट व्याधीमुळें किंवा अंधत्वाशिवाय आणखी मानसिक किंवा शारीरीक दोष असल्यामुळें हा उद्देश पूर्णपणें साध्य होईना. म्हणून अशा लोकांना सोईवार पडेल असें काम मिळावें व कामाचीहि शाश्वति वाटावी, याकरितां त्यांच्यासाठीं सरकारचें साहाय्य असलेले स्वतंत्र कारखाने काढण्यांत आले. अमेरिकेंत धर्मार्थ संस्था आपल्या फायद्यासाठीं नव्हे; तर शारीरिक, मानसिक किंवा सामाजिक कारणांमुळें अंध झालेल्या लोकांना काम करून पैसे मिळविण्याची सोय करण्यासाठीं कारखाने चालवितात व तेथें अशा लोकांना

त्यांच्या कामाप्रमाणें मजुरी देण्याची व्यवस्था करितात; पण त्यांना कमींत कमी लागणाऱ्या खर्चापेक्षां हे मजुरीचें पैसे कमी असल्यास ही तूट भरून काढण्याकरितां वेगळे पैसे देतात. आणि अशा रीतीनें त्यांच्यातील दोषामुळें होणाऱ्या नुकसानीची त्यांना भरपाई करून देण्यांत येते; पण या खर्चापैकीं पन्नास टक्के खर्च सरकार या संस्थांना देणगी म्हणून देतें. सन १९३५ मध्यें असा कायदा करण्यांत आलेला आहे.

दृष्टि अधू असल्यामुळें पुष्कळ आंधळयांना नियमित आणि वेळेवर कामावर जाणें कठीण जातें. कामावर पोंचविण्यास एखादा वाटाड्या बरोबर घ्यावा, तर त्याचा खर्च झेपणें कठीण असतें; म्हणून हे लोक वेळेवर यावेत व त्यांच्यावर वाटाड्याचा खर्चहि पडूं नये, याकरितां कांहीं उपाय योजण्यांत आले आहेत. अशा लोकांनीं शक्य तो एकस्थानेंच प्रवास करून स्वावलंबी व्हावें. म्हणून त्यांना उत्तेजन देण्यांत येते; त्यांच्या हातीं एक पांढरी काठी देण्यांत येतें. ती त्यांचा वाटाड्याच असते. कारण ही पांढरी काठी हातांत पाहिली कीं हा आंधळा आहे. त्याला वाट दिली पाहिजे व जरूर तेथें त्याला मदत केली पाहिजे असें दुसरे वाटसरू समजतात. खांचखळगा कोठें आहे हेंहि तिच्यामुळें आंधळयाला समजतें. यांचे वाटाडे म्हणून चांगले शिकवून तयार केलेले कुत्रेहि यांच्या बरोबर देतात. ते अगदीं गर्दीतूनहि त्यांना चांगली वाट दाखवितात. साधारणपणें जेथें कुत्र्याला जाऊं देत नाहींत अशा बागा, सार्वजनिक ठिकाणें, इमारती यांतहि कुत्र्याला घेऊन जाण्याची त्यांना मुभा असते. अशा रीतीनें वाटाडे म्हणून कुत्र्यांचा उपयोग करण्याची चळवळ सुरू झाल्यास तीस पस्तिस वर्षें झालीं. पण या अल्पकाळांत हजारों अंधांना अशा शिकलेल्या कुत्र्यांचा उपयोग होऊं लागला आहे. आणि त्यांना सांपत्तिक दृष्ट्या स्वतंत्र होण्यास व आपली करमणूक करून घेण्यासहि हा प्रामाणिक प्राणी अत्यंत साहाय्यभूत होत आहे. शिवाय पाश्चात्य राष्ट्रांतील बहुतेक रेल्वे आणि बस कंपन्यांनीं अशा पराधीन लोकांना फुकट प्रवास करण्यास परवानगी दिलेली आहे. सामान्य पद्धत अशी आहे कीं, आंधळा आणि त्याचा वाटाड्या या दोघांनाहि एकाच तिकिटांत प्रवास करूं देतात. ज्यांना ज्यास्त वय झाल्यामुळें किंवा व्यंग अधिक त्रासदायक झाल्यामुळें दररोज कारखान्यांत कामास जाण्यास कठीण पडतें, त्यांना घरीं राहूनच काम करतां येईल, अशीहि योजना इग्लंडअमेरिकेंत करण्यांत आलेली आहे. या योजनेप्रमाणें कामाला लागणारीं हत्यारें आणि साहित्य अशा लोकांकडे हें काम करणाऱ्या सरकारी खात्याकडून पाठविण्यांत येतें. त्यांनीं तयार केलेला मालहि विकण्याची जबाबदारी सरकार घेतें. आणि हा माल विकून आलेल्या पैशांतून त्यांना दिलेल्या मालाची किंमत वजा करून राहिलेले पैसे त्यांना देण्यांत येतात. अशा लोकांच्या

बाबतींतहि त्यांची कमाई व त्यांचा किमान खर्च यांत कमी पडणाऱ्या पैशाची भरपाई सरकार करतें.

अमेरिकेंत आंधळ्यांना सोयिस्कर असें शिक्षण देण्याकरितां साऱ्या देशभर अठ्ठावन शाळा चालविण्यांत आलेल्या आहेत. त्यांत किंडरगार्टनपासून कॉलेजच्या पदवीपरीक्षेपर्यंत शिक्षण देण्याची व्यवस्था केलेली आहे. तेथें आंधळ्यांना शिक्षक होऊन आंधळ्यांच्या शाळेंत किंवा घरीं आंधळ्यांना शिकविण्याची संधि देण्यांत येते. याशिवाय तेथें आंधळ्यांना थोडावेळ शिक्षण देणाऱ्या अनेक संस्था आहेत.

## लुई ब्रेल

अंधांना स्वावलंबी करण्याच्या बाबतींत स्पर्शेंद्रियाच्या साहाय्यानें लिहिण्या-वाचण्याची जी विशिष्ट लिपी तयार करण्यांत आली आहे, तिनें मोठी क्रांति घडवून आणली आहे. ही लिपी शोधून काढणारा लुई ब्रेल हा स्वतः अंधच होता. त्याचा जन्म स. १८०९ मध्यें फ्रान्स मधील एका खेड्यांत झाला. तो एका गरीब जिनगराचा मुलगा होता. तो तीन वर्षांचा असतांना वडिलांची अवजारें घेऊन त्यांना मदत करीत असतांना एका डोळ्याला सुरी लागून तो फुटला. योग्य उपचार न झाल्यामुळें तो डोळा तर गेलाच; पण त्याच्याबरोबर दुसरा डोळाहि निकामी झाला. अशा रीतीनें तो पूर्ण अंध झाला. जात्याच हुशार व सर्वगुणसंपन्न असूनहि त्याचा निरुपाय झाला. पुढें तो कंटाळून पॅरिसमध्यें आला व तेथील एका अंधशाळेंत दाखल झाला. तेथील दोन वर्षांचा शिक्षणक्रम पुरा करून तो पुढें शिकवण्या वगैरे करून चरितार्थ चालवूं लागला. पण सुदैवानें लवकरच त्याला त्याच्या शाळेंतच शिक्षकाची नोकरी मिळाली आणि तेथेंच अंधांना शिक्षण देऊन स्वावलंबी करण्याचें कार्य त्यानें जन्मभर केलें. हें कार्य करीत असतांना बार्बेर नांवाच्या एका माणसानें हस्तस्पर्शानें अक्षरें जाणण्याच्या पद्धतीच्या बाबतींत कांहीं प्रयत्न केल्याचें त्याच्या आढळांत आलें. लुईनें ती त्याची पद्धत आत्मसात् केली. तो संगीताचा अतिशय शोकीन असल्यामुळें त्या कामीं तिचा तो उपयोग करूं लागला. कागदावर उठविलेल्या खुणा बोटाच्या स्पर्शानें सहज जाणतां येतात हें त्याच्या अनुभवास आल्यामुळें त्यानें अधिक प्रयत्न करून ही लिपी पूर्णत्वास नेली आणि तिला मान्यता मिळविण्याचे पुष्कळ प्रयत्न केले. पण तो जिवंत असेपर्यंत ते यशस्वी झाले नाहींत. उलट लोकांनीं त्याची थट्टाच केली. ही मान्यता त्याच्या मृत्यूनंतर मिळाली आणि तिच्याबद्दल त्याचा बोलबाला जगभर झाला व अजून होत आहे. अंधांचें जीवन सुखी व समृद्ध करणें हें त्यानें आपले जीवित कार्य असें मानलें व तें यशस्वी करण्यासाठीं जिवापाड कष्ट केले. पण ते अति होऊन त्याला क्षयरोगानें गांठलें. शेवटीं स. १८५२ मध्यें वयाच्या त्रेचाळीसाव्या वर्षी या थोर समाजसेवकाचा अत्यंत करुणाजनक स्थितींत

अंत झाला. त्याच्या ब्रेल लिपीमुळें मात्र लक्षावधि अंध साऱ्या जगभर स्वावलंबी होऊन त्याचें नांव अजरामर झालें.

भारतांत सुमारें वीस लक्ष अंध आहेत. त्यांच्याकरितां साऱ्या देशांत सुमारें पन्नास संस्था असून त्या फक्त १५०० अंधांच्या शिक्षणाची सोय करीत आहेत. यावरून या बाबतींत आपली किती वाईट स्थिति आहे याची कल्पना येईल. उत्तर प्रदेशांत डेहराडून येथें मध्यवर्ती सरकारच्या शिक्षणखात्यानें वर्षाला अडीच लाख रुपये खर्चून अंधाकरितां एक आदर्श शिक्षणकेंद्र चालविलें आहे. त्यांत १८ ते ५५ वर्षांच्या अंधांना घरगुती धंद्यांचें शिक्षण देऊन स्वावलंबी करण्याचा प्रयत्न करण्यांत येतो. ही संस्था सरकारनें स. १९५० मध्यें आपल्या ताब्यांत घेतली. येथला शिक्षणक्रम दोन वर्षांचा आहे. अशा प्रकारची आदर्श संस्था प्रत्येक राज्यांत एक तरी असणें अत्यंत आवश्यक आहे.

आपल्याकडे या समाजसेवेंतील एका महत्त्वाच्या प्रश्नाकडे जावयास पाहिजे तितकें लक्ष लोकांचें व सरकारचेंहि गेलेलें नाहीं. आंधळा म्हटला कीं त्यानें भिक्षा मागावी व आपण त्याची कींव करून सढळ हातानें ती घालावी कीं आपलें कर्तव्य संपलें, असें आपण मानतों. पण आंधळयालाहि समाजाचा एक कर्तृत्ववान् घटक बनवून त्याला इतरांप्रमाणें स्वाभिमानानें आणि स्वावलंबानें राहाण्यास समर्थ करणें हें आपलें कर्तव्य आहे, हें कोणाच्या गांवींहि नसतें. तो भीक मागूं लागल्यानें स्वाभिमान नाहींसा होऊन त्याची कल्पनातीत अवनति तर होतेच; पण एकंदर समाजाला त्यामुळें कमीपणा येऊन त्याची आर्थिक व सामाजिक हानि होते व त्याचा बोजा सर्वस्वी समाजावर पडतो, याचा विचार कोणी करीत नाहीं. या बाबतींत जनतेलाहि शिक्षण मिळण्याची अत्यंत आवश्यकता आहे.

## हे प्रश्न हाताळण्याचे विधायक मार्ग

वरीलप्रमाणेंच शारीरिक दोष असलेलीं, मानसिक दोष असलेलीं भीक मागणारीं, गुन्हेगार प्रवृत्तीचीं, पालकांनीं टाकलेलीं किंवा पालकांच्या कह्यांत न राहाणारीं, कुमार्गाला लागलेलीं मुलें यांचा प्रश्न आहे. हे प्रश्न वेगवेगळे दिसले तरी कमीजास्त प्रमाणांत त्यांचा परस्परांशीं संबंध असतो. तीं एकाच बिकट प्रश्नांचीं निरनिराळीं अंगें आहेत. या निरनिराळ्या अनिष्ट गोष्टी वस्तुतः एका प्रश्नांतच केंद्रीभूत झालेल्या असतात. मानसिक आणि शारीरिक पातळी अगदीं कमी असलेल्या अशा समाजाच्या विशिष्ट थरांतून त्यांची उत्पत्ति होते.

अशा बिघडलेल्या मुलांना पोसण्याचा भार समाजावर तर पडतोच; पण त्याशिवाय तीं समाजाच्या स्वास्थ्याला धोका उत्पन्न करितात. समाजाला नुसतें व्यक्तीचें किंवा व्यक्ति-

समूहांचेंच रक्षण करावयाचें नसतें तर स्वतःचेंहि रक्षण करावयाचें असतें. म्हणून त्यांची विशेष काळजी घेणें आवश्यक असतें. अशीं मुलें समाजाशीं जुळतें घेऊं शकत नसल्यामुळें त्याचीं शत्रू होतात. त्याची नैतिक, सामाजिक आणि आर्थिक हानि करूं लागतात, हें अजून पुष्कळांच्या लक्षांत येत नाहीं. त्यांना समाजाला पोसावें लागतें; इतकेंच नव्हे तर त्यांच्याकडून गुन्हा घडला कीं त्यांना पकडणें, त्यांच्या गुन्ह्याची चौकशी करणें, गुन्हा केल्याचें सिद्ध झाल्यास त्यांनां तुरुंगांत पाठविणें आणि तेथें त्यांची शिक्षा पुरी होईपर्यंत त्यांना पोसणें, या सान्या गोष्टी समाजाला आपल्या खर्चानें कराव्या लागतात. याशिवाय त्यांनीं कोणाची जी काय वैयक्तिक हानि केली असेल ती निराळीच. गुन्हेगार, दारुबाज, वेडे व दुसरे अशाच प्रकारचे लोक कामधंदा करण्यास नालायक असल्यामुळें समाजाचें एकंदर किती नुकसान करतात याचा नुसता अंदाज करणें कठीण असलें, तरी तें कल्पनातीत मोठें आहे, यांत संशय नाहीं. पण ही झाली सांपत्तिक हानि. तिच्याशिवाय सामाजिक आणि नैतिक हानि होते ती फार मोठी असते. आणि तिचें मोजमापहि करितां येत नाहीं. अशा लोकांना तुरुंगांत पाठविलें कीं हा प्रश्न सुटला असें पुष्कळांना वाटतें; पण तें खरें नाहीं. तुरुंगांत पाठविला कीं माणूस सुधारतोच असें नाहीं; समाजापासून कांहीं काळ तो दूर राहातो इतकेंच. शिवाय तो तुरुंगांतून सुटला कीं पुष्कळदां पुन्हा गुन्हा करतो, तो अधिकच निगरगट्ट बनतो. पोलीसला त्याला पुनः पकडावें लागतें, न्यायाधीशाला शिक्षा द्यावी लागते आणि तो पुन्हा तुरुंगाची वाट धरतो. अशा या अनिष्ट फेन्यांत तो एकदां सांपडला कीं त्यांतून त्याची सुटका होणें कठीण होतें. म्हणून तरुण मुलांना त्यांचा गुन्हा सिद्ध झाल्यास तुरुंगांत न पाठवितां एखाद्या समाजसेवकाच्या देखरेखीखालीं ठेवतात. त्यामुळें एकपरीनें गुन्ह्याचा प्रतिकार होतो व गुन्हेगारांना नीट वागविले जातें. आपली सुधारणा करून घेण्याला त्यांना संधि मिळते. त्यांना थोडी कां होईना पण शिक्षा झाल्यास त्यांची सुधारणा तर होत नाहींच; उलट दुसन्या गुन्हेगारांशीं त्यांचा प्रत्यक्ष संबंध येऊन ते अट्टल गुन्हेगार बनतात. म्हणून त्यांना समाजसेवकांच्या नजरेखालीं ठेवण्याच्या पद्धतीला विशेष महत्त्व आलेलें आहे.

अशा मुलांचें नियंत्रण, वागणूक व प्रतिबंध या संबंधीचे प्रश्न सोडवून समाज-विघातक कार्याला प्रवृत्त झालेल्या ह्या वर्गापासून समाजाचें यशस्वी रीतीनें संरक्षण करावयाचें असल्यास समाजसेवा करणान्या संस्था, पोलीसखातें, न्यायखातें, तुरुंगाची सुधारणा करण्याकरितां सरकारनें चालविलेल्या दुसन्या संस्था आणि कायदे मंडळें यांचें ध्येय, धोरण व कृति एकसूत्री असावी लागते. अशा मुलांसंबंधींचे आपल्या कक्षेंत येणारे प्रश्न प्रत्येकजण आपापल्या परीनें हाताळीत असला तरी त्या सर्वांचें अंतिम ध्येय व तें गांठण्याचा मार्ग एकच असला पाहिजे व त्याची रूपरेखा निश्चित झाली

८१६०

पाहिजे. या प्रश्नाकडे पाहाण्याची व गुन्हेगारांना वागविण्याची पोलीसांची दृष्टि एक, तर न्यायखात्याची दृष्टि दुसरी; नि त्यांची सुधारणा करणाऱ्या संस्था तिसऱ्याच दिशेनें चाललेले अशी त्रिस्थळी यात्रा असल्यास फारशी प्रगति होण्याची आशा नाहीं. आपल्याकडे अशा प्रश्नांच्या बाबतींत अशी त्रिस्थळी नेहमीं आढळून येते. प्रत्येक खातें आपल्याला स्वतंत्र आणि शहाणे समजतें. समाजाच्या अत्यंत जिव्हाळ्याच्या प्रश्नांच्या बाबतींत प्रगतिपर आणि एकसूत्री दृष्टि असणें अत्यंत आवश्यक आहे.

## प्रमोदगृहें

कसेंबसें अर्धवट शिक्षण होऊन कामाला लागलेलीं तरुण मुलें फुरसतीच्यावेळीं उनाडक्या करून वाममार्गाला जाऊं नयेत म्हणून अशा मुलांसाठीं प्रमोदगृहें (Clubs) काढून त्यांना मार्गाला लावण्याचे प्रयत्न युरोपमध्यें यशस्वी झालेले आहेत. मुलांचे, मुलींचे आणि मिश्र असे या प्रमोदगृहाचे तीन प्रकार तिकडे असतात. नियमित शाळेंत जाणारीं, चांगली शिस्त असलेलीं, सत्प्रवृत्तीचीं मुलें बालचमू, बालिकाचमू अशा प्रकारच्या चळवळींत भाग घेऊन चांगल्या मार्गाला लागतात. पण प्राथमिक शिक्षण कसेंबसें करून किंवा अर्ध्यावर सोडून कामाला लागलेलीं मुलें फावल्या वेळांत उनाडक्या करतात. अशा मुलांचें मन कोठेंतरी चांगल्या गोष्टींत गुंतवून त्यांच्या फुरसतीच्या वेळाचा सदुपयोग करितां आला नाहीं, ज्याच्या योगानें त्यांचें स्वतःचें व एकंदर समाजाचें हित होईल असा त्याचा उपयोग करतां आला नाहीं तर तीं वाममार्गाला लागतात, इतकेंच नव्हे; तर त्यांच्या आरंभीं निरुपद्रवी दिसणाऱ्या कृत्यांचें गुन्हेगार वृत्तींत रूपांतर होऊन तें दोघांच्याहि—त्यांच्या स्वतःच्या व एकंदर समाजाच्या—नाशाला कारणीभूत होतें. म्हणून अशा मुलांना या प्रमोदगृहाचे सभासद करून आरंभीं अगदीं मनास वाटेल त्याप्रमाणें वागण्याची मोकळीक द्यावयाची, त्यांच्या उत्साहाला आणि खोडकर वृत्तीला वाव मिळेल अशा एखाद्या कार्यक्रमांत भाग घ्यावयास लावावयाचें, हळू हळू एखाद्या विषयाची त्यांच्यांत आवड उत्पन्न करावयाची आणि शेवटीं एखाद्या नवीन धंद्याचें किंवा ज्या धंद्यांत ते काम करीत असतील, त्यांचें अधिक शिक्षण देऊन ते समाजाचे सत्प्रवृत्त, चारित्र्यसंपन्न, कर्तृत्ववान् घटक होतील असें करावयाचें. म्हणजे अशा मुलांमुलींना त्यांच्या फुरसतीच्या वेळांत निरनिराळ्या प्रकारें साहाय्य करून, त्यांची शारीरिक, मानसिक आणि सांस्कृतिक शक्ति वाढून, त्यांची, एक व्यक्ति व समाजाचा एक घटक म्हणून, पूर्ण वाढ करावयाची व पर्यायानें समाजांतील गुन्हेगार प्रवृत्तीच्या लोकांची विध्वंसक, हिंसात्मक अनिष्ट वृत्ति नाहींशी करावयाची, हा या क्लबांचा उद्देश असतो.

ही चळवळ कांहीं नवीन नाहीं. शंभर वर्षांपूर्वी औद्योगिक क्रांतीमुळें कारखान्यांतील तरुण कामगार मोठ्या संख्येनें एकत्र आले त्यावेळीं त्यांना फार थोडी

फुरसत मिळत होती. तरी तिचा कसा उपयोग करावा, हा एक मोठा प्रश्न होता. तिच्यामुळें कांहीं अनिष्ट गोष्टी घडण्याचा संभव आहे, असें तेव्हां वाटूं लागलें. म्हणून समाजाला व त्यांना स्वतःलाही हितकारक होईल असा त्यांच्या फुरसतीच्या वेळाचा कसा उपयोग करून घ्यावा, हा प्रश्न उपस्थित झाला. आज मितीलासुद्धां हा प्रश्न शिल्लक आहेच. शिवाय हा फुरसतीचा वेळ वाढत आहे. याला तोडगा म्हणून ही क्लबांची चळवळ प्रथम प्रौढ कामगारांकरितां म्हणून सन १८५० मध्यें इंग्लंडांत सुरू झाली. फुरसतीच्या वेळांत कामगारांच्या विश्रांतीची आणि करमणुकीची सोय करावी, हा या क्लबाचा मुख्य हेतु होता. भाड्यानें लहानशी जागा घेऊन सभासदांना अल्प वर्गणी ठेवून वाचनालय, निरनिराळ्या प्रकारच्या खेळांची सोय, चहा, कॉफी मिळण्याची व्यवस्था, आठवड्यांतून दोनतीन वेळ शैक्षणिक वर्ग; रविवारीं धर्मावर प्रवचन असा कार्यक्रम प्रारंभीं असे. कामगार संध्याकाळीं कामावरून सुटल्यावर येथें येत. परिस्थिति बदलत गेली व या क्लबाची आवश्यकता वाढत चालली, तसा त्यांच्या स्वरुपांतहि बदल होत गेला. पाश्चात्य देशांत आज प्रमोदगृहांची राष्ट्रव्यापी चळवळ झाली आहे. तिला जोडण्यांत आलेले क्लब, वेगवेगळ्या, फार दूरच्या औद्योगिक शहरांत, खाणी असलेल्या भागांत, मासेमारू लोकांची वस्ती असलेल्या समुद्रकांठच्या गावांत, निरनिराळ्या प्रकारें मार्गदर्शनाचें कार्य, निरनिराळ्या लोकांची परिस्थिति, त्यांच्या गरजा, त्यांची आवड हें सारें लक्षांत घेऊन करीत आहेत.

ही चळवळ प्रथम मुख्यतः मुलांकरितां सुरू झाली. मग मुलींकरितां सुरू झाली. पण गेल्या महायुद्धानें सारीच दुर्दशा केली. लाखों लोकांना हिंसा करण्याचें शिक्षण देण्यांत आलें. प्रत्यक्ष हिंसा करणें, हें मोठें राष्ट्रीय कृत्य आहे, असें मानण्यांत येऊं लागलें. त्यामुळें कायद्याला मान नाहींसा झाला. मुलांची तर कल्पनातीत हानि झाली, या काळांत आईबापांचा मुलांवरचा दाब नाहींसा झाला. बाप सैन्यांत नोकरीला, आई कारखान्यांत कामाला आणि बॉम्ब हल्ल्याच्या भीतीनें शाळा बंद होऊन मुलांना उनाडक्या करण्यापलीकडे दुसरें कांहीं काम नाहीं, कोणी विचारणारें नाहीं, तीं मोकाट सुटलेलीं, अशीं स्थिति झाली आणि गुन्हेगार मुलांची संख्या कल्पनातीत वाढली. आज मितीलासुद्धां या परिस्थितीचें भीषण स्वरूप तेथें विशेषसें कमी झालेलें नाहीं. यामुळें या चळवळीचें कार्य व महत्त्व अतिशय वाढलें आहे. महायुद्धापासून आणखी एक महत्त्वाचा बदल झाला आहे. तो हा कीं मुली, मुलांच्या अगदीं बरोबरीनें साऱ्या गोष्टींत भाग घेऊं लागल्या आहेत. त्यामुळें महायुद्धापासून मुलामुलींचे मिश्रक्लब फार लोकप्रिय झाले आहेत.

या क्लबांत सामान्यतः १४ ते २१ वर्षें वयाचीं मुलें असतात. इंग्लंडांत सन १९४७ मध्यें ७३८ मुलींच्या क्लबांत ३५२७१ मुली सभासद होत्या; पण १६६७ मुलामुलींच्या

मिश्रक्लबांत मुलींची संख्या ६४०३८ होती व मुलांची संख्या ६७०७६ होती. या एकंदर २४०५ क्लबांमध्यें १६६३८५ सभासद होते. अगदीं खेड्यापाड्यांतल्या लहान क्लबांत वीस सभासद असतात, तर शहरांतल्या क्लबांत ३०० ते ५०० सभासद असतात.

या क्लबांच्या बाबतींत एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट असते ती ही कीं, ते यांतल्या बहुसंख्य मुलांच्या आयुष्यांतील अत्यंत कठीण अशा काळांत त्यांना आश्रय देतात. शाळेंतलें शिस्तीचें शैक्षणिक आयुष्य त्यांनीं नुकतेंच अर्धवट सोडलेलें असतें व कामाच्या दगदगीच्या, धक्काधक्कीच्या आयुष्यांत नुकताच प्रवेश केलेला असतो. प्रौढ माणसावर पडणाऱ्या कुटुंबांतल्या जबाबदाऱ्या अंगावर घेण्यास नुकतीच त्यांनीं कोठें सुरवात केलेली असते. यांतील सर्व साधारण मुलांनीं तीं चौदा वर्षांचीं असतांनाच शाळेला सोडचिठी दिलेली असते आणि याला कोणीहि आणि कांहींहि कारणीभूत झालेलें असलें, तरी एक गोष्ट खरी असते ती ही कीं, ज्यांची मानसिक किंवा सांस्कृतिक वाढ थोडी तरी झाली आहे, अशा मुलांची संख्या यांत फारच कमी असते. कला, वाङ्मय, नागरिकशास्त्र, तत्त्वज्ञान, धर्म अशा सारखे जीवन, संपूर्ण आणि समृद्ध करणारे विषय कीं ज्यांच्याशिवाय आयुष्यांत चालण्यासारखें नसतें, त्यांचें नुसतें नांव घेतलें तरी त्यांना शिसारी येते. कारखाने, कचेऱ्या, दुकानें आणि शेतें अशासारख्या ठिकाणीं दिवसभर कष्ट केल्यानें थकून भागून आल्यानंतर या क्लबांत तीं तीन तास येतात, तेव्हां त्यांना असल्या गोष्टींचें नांवहि नको असतें. त्यांना शिक्षण देण्याची पद्धति अशी असते कीं ज्यांत त्यांना अत्यंत आनंद वाटेल, अशा गोष्टी प्रथम करूं द्यावयाच्या. उदाहरणार्थ नाटक, गाणें, चित्रकला, बाग, पक्ष्यांचें निरीक्षण, पाकशास्त्र, मैदानी आणि मर्दानी खेळ, नाच, चालू परिस्थितीविषयीं योजना वगैरे. आणि या क्लबांचें यशापयश, अशा प्रकारच्या मुलांच्या आवडीच्या योजना तयार करून त्यांचा वेळ आनंदांत सुखांत आणि हांसण्याखिदळण्यांत घालविण्यावर अवलंबून असतें.

## मीं पाहिलेला एक क्लब

अशा प्रकारचा एक क्लब प्रत्यक्ष पाहाण्याचा योग मला सुदैवानें आला होता. आंतरराष्ट्रीय कामगारसंघटनेच्या करमणूकसमितीच्या सभेला हजर राहाण्याकरितां मी सन १९५० सालीं जिनेवाला गेलों होतों. तेथून मी परत येतांना इंग्लंडमध्यें आलों आणि तेथें जीं निरनिराळ्या प्रकारचीं समाजसेवेचीं कामें पाहिलीं, त्यांत वरील पद्धतीचा मुलामुलींचा एकत्र असा एक क्लब पाहिला. त्या क्लबाचें नांव लेडी गोम क्लब असें असून तो हॉक्स्टोन रोड, एस. इ. १६ येथें होता. तेथें गेल्यावर मला मोठा आश्चर्याचा धक्का बसला. कारण या इमारतींत शिरतांच दारापाशीं जो मुलगा भेटला त्याला पाहून भीति वाटली. चांगला जाडजूड, उंच, अंगांत नुसता शर्ट,

गळयाचीं बटणें उघडीं टाकलेलीं, तोंडांत सिगारेट, यामुळें हा एखादा उनाड मुलगा असावा, असें वाटलें. आंत कचेरींत जाऊन बसलों तों जिकडे तिकडे गोंगाट, आरडाओरड, कोण धांवतो आहे. कोण गाणें म्हणतो आहे, कोणाच्या तोंडांत सिगारेट, कोणाच्या केक, कोणाच्या दुसरें कांहींतरी, कोणी कुस्ती मारतो, कोणी ठोसे मारतो, कोणी मिठी मारतो, कोणी चेष्टा करतो, असें सारें बेशिस्त वातावरण. शिस्त कशी ती कोठें नाहींच आणि हें सारें शिक्षकांच्या पुढ्यांत चाललेलें आणि ते अगदीं थंडपणाने, जणुं कांहीं होतच नाहीं अशा वृत्तीनें पहात राहिलेले. खरें पाहातां ही नगरपालिकेच्या शाळेची इमारत. दिवसा येथें शाळा चालत होती व तींत कडक शिस्त होती; पण रात्रीं सारें त्याच्या बरोबर उलट. शिक्षकांबद्दल आदर तर बाजूलाच राहिला, उलट त्यांची चेष्टा चाललेली आणि तीहि त्यांच्या तोंडावर. एका वर्गांत एक नाटक बसविण्याची तयारी चाललेली होती. तेथील एक प्रसिद्ध धर्मगुरु त्यांची तालीम घेत होता. मुलें त्याची चेष्टा करून, त्याला अनेक प्रकारें वेडेवांकडे प्रश्न विचारून नकोसें करीत होतीं. पण तो स्वस्थ बसून शांतपणानें त्यांना सांभाळून घेण्याचा प्रयत्न करीत होता. मला मात्र हें सारें पाहून त्याची कींव आली. नंतर तेथें दुसरीं वेगवेगळीं चाललेलीं कामें मला दाखविण्यांत आलीं. निरनिराळया प्रकारचे खेळ-विशेषतः शारीरिक खेळ, निरनिराळीं करमणुकीचीं साधनें, हस्तव्यवसाय, वाचनालय, नाचगाणीं, शिवणकाम, भरतकाम, स्वयंपाकगृहव्यवस्था वगैरे शिकविण्याचे वर्ग होते. यांतल्या कांहीं गोष्टी फक्त मुलांकरतां, कांहीं फक्त मुलींकरतां आणि कांहीं दोघांनीं मिळून एकत्र करण्याकरितां असतात. यांशिवाय चहा, कॉफी, इतर दुसरीं पेयें व खाण्याचे जिन्नस यांचें एक दुकान तेथेंच मुलामुलींनीं मुलांमुलींकरितां चालविलेलें होतें. व तेथें गिऱ्हाइकांची अगदीं गर्दी होती. अशा रीतीनें रात्रीं अकरा वाजेपर्यंत निरनिराळया गोष्टींत वेळ घालवून तिथलीं मुलें आनंदानें घरीं गेलीं.

अशा प्रकारें वाममार्गाला जाण्याचा संभव असलेल्या हजारों तरुणांना योग्य मार्गाला लावून ही चळवळ अत्यंत महत्त्वाचें राष्ट्रीय कार्य करीत आहे. उलटपक्षीं आपल्याकडे काय परिस्थिति आहे ती पाहा. थोड्या दिवसांपूर्वी नागपूर रेल्वे स्टेशनवर मुलें कमी दरांत हमाली करून आपल्या पोटावर पाय आणतात, म्हणून हमाली करण्याचे परवाने असलेल्या रेल्वेहमालांनीं अशा बत्तीस मुलांना पोलीसांच्या स्वाधीन केलें. अंगांत मळकट व फाटके कपडे, गळयाला हातरुमाल, तोंडांत विडीचें थोटूक, किंवा सिनेमांतलीं गाणीं, अशा स्थितींतल्या या मुलांची हात बांधून कोर्टापर्यंत मिरवणूक काढण्यांत आली. मॅजिस्ट्रेटनीं कांहींना आठ आणे दंड तर कांहींना सात दिवसांची सक्तमजुरीची शिक्षा व चार रुपये दंड अशी शिक्षा दिली. प्रामाणिकपणानें पोट भरण्याचा प्रयत्न करणाऱ्या मुलांना कायमचे गुन्हेगार करण्याचा हा मार्ग नव्हे काय ? पण याचा विचार कोण करितो !

## समाजसेवेचीं मूलभूत तत्त्वें

सारा समाज कर्तृत्ववान् करावयाचा असल्यास फक्त श्रीमंत आणि मध्यम वर्गीय लोकांच्या मुलांच्या शिक्षणाची सोय करून चालणार नाहीं. गरीब आणि श्रमजीवी लोकांकरितां त्यांना आवश्यक असें यांत्रिक, शास्त्रीय, शेतीविषयक इत्यादि प्रकारचें शिक्षण त्यांच्या फुरसतीच्या वेळांत आणि अगदीं अल्प खर्चांत मिळण्याची व्यवस्था झाली पाहिजे. पाश्चात्य कारखानदार आपल्या तरुण कामगारांना त्यांच्या कामाचा वेळ कमी करून कारखान्यांत किंवा कारखान्याच्या बाहेर असें शिक्षण आपल्या खर्चानें देण्याची व्यवस्था करतात. आपल्याकडे अशा सोयी नाहींत. सुप्रसिद्ध कामगारपुढारी श्री. ना. म. जोशी यांच्या प्रयत्नानें मुंबईतील समाजसेवासंघानें अशी एक शाळा गिरणीकामगारांकरितां गेलीं तीस वर्षें यशस्वी रीतीनें चालविली आहे. तींत ज्यांना गिरण्यांत काम करावयाचें आहे त्यांना तें शिक्षण देण्यांत येतें. तसेंच गिरण्यांत काम करीत असलेल्या सामान्य कामगारांना फुरसतीच्या वेळीं यांत्रिक शिक्षण देऊन, त्यांची काम करण्याची लायकी वाढवून अधिकाराच्या जागा व अधिक पगारहि मिळवितां येईल, असें शास्त्रोक्त पद्धतीनें शिक्षण देण्याची व्यवस्था तिथें केली आहे. भारतांत अशी ही एकच शाळा आहे. आपल्याकडील कारखानदारांची दृष्टि आपल्या फायद्यापलीकडे फारशी जात नाहीं. पण कांहींहि अडचणी असल्या, तरी अशा प्रकारें सामान्य माणसाच्या शिक्षणाची सोय झाल्याशिवाय एकंदर राष्ट्राची प्रगति होणें शक्य नसतें.

## समता

समाजसेवेच्या मूलभूत तत्त्वांपैकीं दुसरें महत्त्वाचें तत्त्व समता हें आहे. खरें पाहूं गेल्यास मी उच्च व तूं नीच, असें दुसऱ्याला म्हणण्याचा कोणाहि व्यक्तीला मुळींच हक्क नाहीं. माणसें तेवढीं सर्व सारखींच आणि त्यांचा दर्जाहि एकच. पण या समतेच्या तत्त्वाचें आपल्या लोकांना स्मरणहि राहिलेलें नाहीं. त्यामुळें अनेक पोटसमाजांचें अपरिमित नुकसान झालेलें आहे व अजून होत आहे. यामुळें आपला समाज विस्कळित झालेला आहे आणि त्याला ही आंतून कीड लागल्यामुळें तो अधिक दुर्बळ होत चालला आहे. आणि ही दुर्बलता म्हणजेच ऱ्हास. म्हणून समाजसेवेचीं सामान्य तत्त्वें ज्यांना अवगत आहेत, ते हा माणसामाणसांतील कृत्रिम भेद कधींहि मान्य करणार नाहींत व समाजांत राहूं देणार नाहींत.

जी वस्तु पवित्र आहे तिचें पावित्र्य कधींहि विटाळलें जात नाहीं. ती स्वतः पवित्र असते इतकेंच नाहीं; तर ज्या ज्या अपवित्र वस्तु तिच्या सान्निध्यांत येतात, त्या सर्व पवित्र करण्याची अद्भुत शक्ति तिच्यांत असते; म्हणूनच तिचें महत्त्व मानण्यांत येतें. एरवीं स्वतःला पवित्र मानणारे पुष्कळ लोक आढळतील; पण वरील-प्रमाणें त्यांची परीक्षा पाहूं लागल्यास त्यांच्याजवळ पवित्रपणा नसतोच उलट ते

खरोखरीच अपवित्र असलेले आपल्याला आढळून येतील. पण पवित्रापवित्रतेच्या व उच्चनीचपणाच्या खोट्या कल्पना लोकांच्या इतक्या अंगवळणीं पडल्या आहेत कीं, त्यांची सत्यासत्यता त्यांना कळेनाशीच झाली आहे.

या उच्चनीचपणाच्या भावनेमुळें हरिजन व तत्सम जातींच्या लोकांची कल्पना करतां येणार नाहीं, इतकी हानि झाली आहे. अस्पृश्य मानलेल्या व समाजापासून दूर ठेविलेल्या माणसांना शिक्षणादि साधनांच्या साहाय्यानें सुधारणें, स्वावलंबी करणें व त्यांच्यांत आत्मविश्वास उत्पन्न करणें, सारांश मनुष्यपणाला पारखे झालेल्या माणसांत मनुष्यपणा उत्पन्न करणें, यापेक्षां उच्च दर्जाची दुसरी समाजसेवा ती कोणती ?

## जितके अधिक तुकडे तितका समाज अधिक दुर्बळ

लांकडांच्या मोळींतून एक एक लांकूड कमी करीत गेल्यास त्या मोळीची शक्ति कमी कमी होत जावी आणि त्या मोळींत एक एक लाकूड अधिक घातल्यास त्या मोळीची शक्ति अधिकाधिक वाढत जावी, हें स्वाभाविक असतें. समाजाचे जितके अधिक तुकडे—जितक्या अधिक जाति—तितका समाज अधिक दुर्बळ होतो, हें सांगावयास नकोच, आणि समाजांत वावरण्याचें क्षेत्र जितकें संकुचित होत जातें; त्या मानानें व्यक्तीच्या कार्याचें क्षेत्रहि आकुंचित होतें, म्हणजे तितकी व्यक्तीची वाढ खुंटते आणि दुःखाची गोष्ट ही कीं, हे सर्व भेद नैसर्गिक नसतात; तर माणसानींच बुद्ध्या उत्पन्न केलेले कृत्रिम असतात. हे माणसांची अवनति करणारे मनुष्यनिर्मित भेद नाहींसे करण्यांत येऊन व्यक्तीच्या उन्नतीचा मार्ग मोकळा होणें, अत्यंत आवश्यक आहे.

माणसांनींच दुसऱ्या माणसांकरतां अशीं कृत्रिम कुंपणें तयार करून त्यांच्या हालचालींत नाहक अडचणी उत्पन्न कराव्यात, आपण मोठे आहोंत, आपली जात उच्च आहे, या पोकळ अभिमानानें इतरांना कमी लेखावें, त्यांची मानहानि करावी, एका जातींतील लोकांनीं दुसऱ्या जातींतील लोकांना समाजांत मोकळेपणानें वागण्याचा जन्मसिद्ध हक्क नाहींसा करावा; हें समाजाच्या दृष्टीनें अत्यंत हानिकारक आहे. हा निव्वळ जुल्म आहे आणि तो कोणीहि सहन करतां कामा नये. मी मोठा आहे असें म्हणून कोणी मोठा होत नाहीं. त्याची सेवा, त्याचे कार्य, त्याची कृति त्याला मोठा करते. अशा प्रकारचे जुल्म नाहींसे करणें व माणसांना आपल्या इच्छेप्रमाणें समाजदृष्ट्या अहितकारक होणार नाहीं, अशा रीतीनें वागण्याची मुभा देणें हें समाज सेवेचें एक तत्त्व आहे. समाजांत सर्व व्यक्तींशीं समतेनें व मोकळेपणानें वागतां यावें,

हा प्रत्येक व्यक्तीचा ईश्वरदत्त हक्क आहे. तो हिरावून घेण्याचा कोणीहि प्रयत्न करूं नये. तसा तो हिरावून घेण्याचा कोणालाहि अधिकार नाहीं.

याशिवाय समाजाच्या प्रगतीच्या आड येणाऱ्या दुसऱ्या अनेक चाली व बंधनें आहेत. त्या सर्वांचा येथें विचार करणें शक्य नाहीं, तें आवश्यकहि नाहीं पण हे सर्व कृत्रिम अडथळे नाहींसे होऊन समाजाची वाढ अप्रतिहतपणें होऊं दिल्याशिवाय समाजाची सर्वांगीण सुधारणा होणें, शक्य नाहीं. समाजरूपी शरिराची सर्व बाजूंनीं सुधारणा करावयाची असल्यास, त्याला शरीर-स्वास्थ्य लाभावें असें वाटत असल्यास त्याच्या प्रत्येक अवयवाची योग्य जोपासना व्हावी लागते. एका अवयवाची शुश्रूषा केली आणि दुसरा नासूं कुजूं दिला तर शरीर निरोगी राहूं शकत नाहीं. त्याचप्रमाणें समाजाचेंहि आहे. यासाठीं, समाजाची स्वाभाविक वाढ खुंटविणारे जे जे कांहीं रोग, कृत्रिम अडथळे असतील ते सर्व एकजात समूळ नाहींसे केल्याशिवाय दुसरा उपाय नाहीं. यांपैकीं कांहीं गोष्टी कैक वर्षें अव्याहत चालत आल्यामुळें व रूढीच्या व धर्माच्या नांवाखालीं बद्धमूल झाल्याकारणानें त्या साऱ्याच चटकन बदलणें कठीण आहे हें खरें, पण एका अवयवाला लागलेल्या विषावर औषधोपचार करितांना सर्व शरीरभर तें पसरूं नये; म्हणून अत्यंत जलद व निष्ठुरपणानें प्रयत्न करावे लागतात हा आपला नेहमींचाच अनुभव आहे.

कोणी असें म्हणेल कीं, समाजांतील सर्व माणसें समानस्थितीला आणण्याचा हा प्रयत्न आहे व तो व्यवहार्य नाहीं. पण याचा तसा अर्थ नाहीं. समाजांतील नानाविध शर्यतींत कांहीं लोक निरनिराळ्या कारणास्तव पुढें जावेत, कांहीं मध्यावर असावेत व कांहीं मागें रहावेत, हें नेहमींच घडणार. शर्यतींत सर्व माणसें एकदम धावूं लागलीं तर तीं पुढें समानरेषेंत कधींहि राहूं शकत नाहींत. कारण प्रत्येक व्यक्तींत कांहीं उपजत तर कांहीं परिस्थितिजन्य गुणदोष असतातच आणि हे गुणदोष सारेच बदलणें कोणाच्या हातीं नसल्यामुळें सर्वांना समानस्थितींत आणण्याचा प्रयत्न आजपर्यंत कोठेंही यशस्वी झाला नाहीं पण वरील म्हणण्याचा अर्थ अगदीं वेगळा आहे. प्रत्येक व्यक्तीला बरोबर धांवण्याची म्हणजेच आपली शक्य तितकी सुधारणा करून घेण्यास संधि मिळावी, तिच्या मार्गांत कोणत्याहि प्रकारचे कृत्रिम अडथळे उत्पन्न होऊं देऊं नयेत आणि अशा रीतीनें सर्वांचा मार्ग निष्कंटक केल्यानंतर शर्यतींत पहिला येणें, दुसरा येणें किंवा शेवटीं राहाणें हें सर्वस्वी ज्याच्या त्याच्या हिंमतीवर राहावें. त्यांचें नफानुकसान जें काय व्हावयाचें तें त्याचा तो करून घेईल. दुसऱ्या माणसांनीं त्यांत ढवळाढवळ करूं नये.

# सर्वांना सारखी संधि व सारखा न्याय

सर्वांना सारखी संधि व सारखा न्याय मिळून, दयाबुद्धि, मनुष्याच्या जीविताविषयीं आदर, त्याच्या उच्च भवितव्याविषयीं नितांत विश्वास हीं उत्पन्न करून जो मनुष्य आपल्या सुकृतीनें चढेल त्याला चढूं द्यावयाचा व जो आपल्या विकृतीनें मागें पडला असेल, त्यालाहि शक्यतितका हात द्यावयाचा, ज्या ज्या प्रकारचें साहाय्य त्याला हवें असेल, तें द्यावयाचें आणि त्याचीहि जितकी प्रगति होईल तितकी करूं द्यावयाची; पण कोणाहि माणसाला वरच्या पायरीवरून खालीं ओढावयाचा नाहीं किंवा खालच्या पायरीवरील मनुष्य वरच्या पायरीवर चढत असेल, तर त्याला अडथळा करण्याचा प्रयत्न करावयाचा नाहीं; मग त्याची जात, धर्म किंवा देश कोणताहि असो, हें समाज सेवेचें तत्त्व आहे.

पाणी हें जीवन आहे; पण एखाद्या ठिकाणीं सांचून, कुजून त्याचें डबकें झालें म्हणजे त्याच्यांतील जीवनशक्ति लोपून जाते. तें अनेक प्रकारच्या प्राणनाशक जंतूंचें जन्मस्थान होतें. पण तें खेळतें झालें म्हणजे पुनः त्याच्यांत जीवन येतें आणि त्याचा ओघ ज्या दिशेला असेल, त्या दिशेनें प्रसंग पडेल त्याप्रमाणें डाव्या-उजव्या मार्गानें तें मोठ्या प्रवाहाला मिळतें. मोठ्या प्रवाहांत एकजीव होऊन जाणें, हें त्याचें ध्येय असतें. आपल्या मागासलेल्या समाजाची स्थिति वरील प्रकारच्या कुजट व गढूळ पाण्यानें भरलेल्या डबक्याप्रमाणें झाली आहे. त्याचा बांधारा फोडून त्याच्या प्रवाहाच्या आड येणारे – अडथळे – दगडधोंडे दूर केले पाहिजेत आणि त्याचा मार्ग स्वच्छ झुळझुळ वाहाणाऱ्या झऱ्याप्रमाणें निष्कंटक होऊन मोठ्या प्रवाहाला मिळाला पाहिजे.

वरील ध्येय गांठावयाचें असल्यास समाजाला सर्व दृष्टींनीं कमकुवत करणारे जातिभेद आणि जातिसंस्था नाहींशा होऊन त्यांच्या जागीं कांहीं ठराविक कुटुंबें असलेला एक ठराविक भाग घेऊन सर्वांचे हितसंबंध व सुखसोई वाढतील अशारीतीनें लोकशाही तत्त्वावर स्थापन झालेल्या जनसंस्था (community centres) किंवा रहिवाशी मंडळें अस्तित्वांत आलीं पाहिजेत. आणि त्यांनीं जात, धर्म, राजकीय पक्ष अशा प्रकारचे भेदभाव न मानतां आपल्या भागांतील रहिवाशांची शारीरिक सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, सांपत्तिक, शैक्षणिक अशी लहानापासून थोरांपर्यंत सर्वांची सर्वांगीण प्रगति व सुखवृद्धि करण्याचें ध्येय आपल्यापुढें ठेविलें पाहिजे. त्या वस्तींतील वेगवेगळ्या मतांचीं, विचारांचीं, हितसंबंध असलेलीं माणसें एकत्र आणून, त्यांच्या परस्परांशीं ओळखी करून सर्वांच्या मतानें, सहकार्यानें, संघटित प्रयत्नानें त्या विशिष्ट भागांतील विशिष्ट अडचणी, गैरसोई, तक्रारी

नाहींशा करून तेथील स्त्रीपुरुषाचें जीवन पूर्ण स्वावलंबी, सुखी आणि समृद्ध करण्याचे प्रयत्न झाले पाहिजेत. त्यांच्यांत नवजीवन, नवा उत्साह उत्पन्न झाला पाहिजे. अशा प्रकारची ही संघटना अमुक एका गोष्टीसाठीं नसली, तरी तींत अमुक एका गोष्टीचा समावेश होऊं शकत नाहीं, असें म्हणतां कामा नये, इतकें तिचें कार्य व्यापक असावयाला पाहिजे. शारीरिक, मानसिक आणि आत्मिक उन्नति कीं जिच्याशिवाय मनुष्य अपूर्ण राहातो, त्याची पुरेशी वाढ होत नाहीं, तिची पूर्तता येथें करितां आली पाहिजे.

## जगण्याचा हक्क सगळ्यांना सारखा आहे

या जगांत माणसाचा सर्वांत महत्त्वाचा हक्क कोणता हें जर आपण पाहूं लागलों तर आपल्याला असें दिसून येईल कीं. जगणें, आपलें अस्तित्व राहूं देणें, हा सर्वांत महत्त्वाचा निसर्गदत्त हक्क आहे. ह्या मूलभूत हक्काची पायमल्ली कोणालाहि करितां येणार नाहीं. ह्यासाठीं व्यक्तीचें अस्तित्व अकालींच संपुष्टांत येणार नाहीं, हें पाहाणें समाजाचें कर्तव्य आहे. पण हें कर्तव्य आज बजावलें जातें, असें म्हणतां येणार नाहीं. मुंबई शहरापुरताच आपण विचार केला, तरी आपल्याला असें आढळून येईल कीं, मुंबई शहरांत जन्माला येणाऱ्या मुलांपैकीं जवळजवळ निम्या मुलांना त्यांच्या आयुष्याचें एक वर्ष भरलें न भरलें तोंच मृत्यु येतो. एखाद्या देशाचें जर कांहीं खरें धन असेल; तर तें त्या देशांतील माणसें हें होय. या जिवंत संपत्तीचें संरक्षण करणें, तिचा अपव्यय टाळणें आणि योग्य परिस्थितीच्या अभावीं त्यांतील जी संपत्ति केरकचऱ्यांत मिळून गेली असेल, ती शोधून काढून तिचा योग्य कामीं उपयोग करणें, सर्वांना आपली उन्नति करण्याची संधि व साधनें उपलब्ध करून देणें, तशी संधि व साधनें मिळण्याचा समाजांतील प्रत्येक व्यक्तीचा जन्मसिद्ध हक्क आहे, हें ध्यानांत ठेवून शक्य तितका समतेचा व न्यायाचा पुरस्कार करणें, हा समाजसेवेचा एक मुख्य उद्देश आहे. समाजसेवेच्या मुळाशीं असलेल्या तत्त्वापैकीं तें एक मुख्य तत्त्व आहे.

समाजसेवा ही तिच्या विवक्षित क्षेत्रांतसुद्धां स्वराज्याला लायक करणारी एक चळवळ आहे. जगांत ‘ बळी तो कान पिळी ’ अशी सर्वत्र स्थिति असल्यामुळें या प्रतिकूल परिस्थितींत लहान लहान व्यक्ति व पोटसमाज यांनींसुद्धां आपला बचाव कसा करून घ्यावा, स्वतःच्या पायांवर उभें राहून हरघडी येणाऱ्या नानाविध अडचणींना नानाविध संकटांना यशस्वी रीतीनें तोंड कसें द्यावें; व्यक्तिव्यक्तींनां त्यांची शक्ति, त्यांचें सामर्थ्य यांची त्यांना जाणीव करून देऊन समाजानें केलेल्या अनेक प्रकारच्या सोयींचा, साधनांचा फायदा घेऊन समाजाचा स्वावलंबी, सुखी आणि कर्तृत्ववान घटक कसें व्हावें, सारांश चांगल्या रीतीनें कसें जगतां येईल, हें शिकविणारें शास्त्र म्हणजेच समाजसेवा होय. हीं समाजसेवेचीं तत्त्वें समाजाच्या गळीं उतरल्याशिवाय स्वराज्य यशस्वी करणें कठीण आहे.

## नव्या परिस्थितींत नव्या साधनांचा उपयोग

पण उन्नतीच्या मार्गांत येणारे नानाविध अडथळे दूर करून आत्मोन्नतीचा मार्ग व्यक्तीला आणि व्यक्तिसमूहाला मोकळा करून दिला कीं, तेथें समाजसेवेचें कार्य संपलें असें मात्र नाहीं. याच्या पुढचेंच काम महत्त्वाचें व बिकट असतें. तें हें कीं उन्नतीचा मार्ग मोकळा झाल्यावर नव्या परिस्थितींत नव्या साधनांचा उपयोग करून घेऊन आधुनिक समाजाला लायक असा आधुनिक नागरिक तयार करावयाचा. समाजांतील अनेकविध बंधनांच्या जाळ्यांतून मनुष्य सुटला म्हणजे पुष्कळदां तो गांगरण्याचा फार संभव असतो. त्याला आपल्या हिताचा खरा मार्ग कोणता हें कळेनासें होतें. त्याची बुद्धया दिशाभूल करणारेहि पुष्कळ असतात. आज स्वराज्य-प्राप्तीमुळें आपलीहि अशीच कांहींशीं भांबावल्यासारखी स्थिति झाली आहे. अशा स्थितींत योग्य प्रकारें त्याचें मार्गदर्शन करून त्याला आत्मोन्नतीचा, स्वावलंबनाचा मार्ग दाखविणें व तो प्राप्त करून घेण्याचीं साधनें त्याच्या आटोक्याबाहेर असल्यास तीं आटोक्यांत आणून देणें हें अत्यंत महत्त्वाचें असतें व तें समाजसेवकाला करावयाचें असतें.

प्रत्येक व्यक्तीनें हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, आपल्याला जगावयाचें आहे, तसेंच समाजांतील प्रत्येक व्यक्तीलाहि जगण्याची इच्छा आहे. आपल्याला आपली उन्नति करून घ्यावयाची आहे, तशीच समाजांतील प्रत्येक माणसाला आत्मोन्नति हवी आहे, आपले न्याय्य हक्क आपल्याला मिळण्याकरितां आपण अधीर झालेले आहों, तसाच समाजांतील प्रत्येक माणूस आपले कायदेशीर हक्क मिळविण्याकरितां धडपड करीत आहे. म्हणून हरएक बाबतींत आपण आपल्याबरोबर समाजांतील सर्व माणसांचे हक्क त्यांना मिळतील हें पाहिलें पाहिजे. म्हणजे आपण आपल्या हक्काच्या आड दुसऱ्याला येऊं देऊं नये व आपणहि दुसऱ्याच्या हक्कांच्या आड येऊं नये. आपली उन्नति करू घ्यावी; दुसऱ्यांनाहि आपली उन्नति करावयास लावावी आपले हक्क आपण मिळविले पाहिजेत, पण त्याबरोबरच आपली कर्तव्येंहि आपण बरोबर करावयास चुकतां कामा नये.

समाजसेवेचें ज्याला यथार्थ ज्ञान झालेलें आहे त्याला आपल्या समाजाचा भाग्योदय व्हावयाला आपला समाज कोणत्या विवक्षित स्थितींत असावयास पाहिजे, याची बरोबर कल्पना असावी लागते आणि इमारत तयार होण्यापूर्वी इंजिनियर ज्याप्रमाणें प्रथम तिचा एक नकाशा तयार करितो आणि तिचें बांधकाम सुरू झाल्यावर त्या नकाशाबरहुकूम तें तयार होत आहे किंवा नाहीं व होत नसल्यास त्यांत कोठें चूक होत आहे किंवा कोठें सुधारणा झाली पाहिजे, हें लक्षपूर्वक पाहून त्यांत त्याप्रमाणें

दुरुस्ती करितो, तद्वत् हा समाजसेवक आपल्या देशाच्या आदर्शभूत स्थितीचा नकाशा आपल्या मनःचक्षूंपुढें तयार ठेवतो आणि आपल्या कार्याला सहाय्यभूत होईल अशा प्रत्येक चळवळींत प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीतीनें भाग घेत असतो आणि त्याबरोबरच ज्या चळवळी राष्ट्रहिताला पोषक होण्यासारख्या नसतील त्यांना इष्ट वळण लावण्याचा तें शक्य नसल्यास त्यांच्यापासून अलिप्त राहाण्याचा प्रयत्न करीत असतो. तो कोणत्याही पक्षाचा, जातीचा, धर्माचा किंवा पोटसमाजाचा पक्षपाती होत नाहीं. एखाद्या धर्माचा किंवा राजकीय पक्षाचा गुप्त किंवा उघड रीतीनें प्रचार करावा म्हणून हें तो करीत नसतो तर समाजसेवेची तळमळ, समाजसेवेची अत्यंत आस्था म्हणून हें तो करितो. जेथें अन्याय दिसेल तेथें तो नाहींसा करण्याचा प्रयत्न करावा; श्रीमंत किंवा गरीब, सबल किंवा निर्बल, उच्च किंवा नीच, स्पृश्य किंवा अस्पृश्य, अशा प्रकारचे भेदभाव आपल्या मार्गांत येऊन आपली सत्यनिष्ठा ढळण्यास ते कारणीभूत होऊं नयेत अशाबद्दल तो काळजी घेत असतो. आणि हें सारें करतांना कोणाच्याहि रागालोभाची मुळींच परवा करीत नाहीं

## प्रकरण ४ थें

# समाजसेवकाचें शिक्षण

*"I am only one,*
*But still I am one,*
*I cannot do everything*
*But still I can do something ;*
*And because I cannot do everything*
*I will not refuse to do the Something that I can do."*

—*Edward Everett Hale.*

पुष्कळ लोकांना समाजसेवेच्या शिक्षणाचें फारसें महत्त्व वाटत नाहीं. त्यांना समाजसेवा इतकी सोपी वाटते कीं, ती कोणालाहि सहज करतां येईल, तींत कांहीं विशेष नाहीं, अशी त्यांची समजूत असते; मग समाजसेवेच्या शिक्षणाची आवश्यकता कोठें राहिली ? पण समाजसेवेच्या मार्गांची, ध्येयाची, तत्त्वज्ञानाची व विस्तृत क्षेत्राची ज्याला माहिती आहे व समाजसेवा हें एक नवीन शास्त्रच होऊं पाहात आहे, हें ज्याला अवगत आहे, तो असें कधींहि म्हणणार नाहीं. इतर व्यवसायांत ज्याप्रमाणें त्या त्या प्रकारच्या धंद्याच्या शिक्षणाची जरूरी असते त्याचप्रमाणें याहि धंद्याचें आहे. किंबहुना इतर सर्व धंद्यांपेक्षां या धंद्याला शिक्षणाची अधिक आवश्यकता आहे असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. कारण या कामांत प्रत्यक्ष माणसांशीं संबंध येतो आणि माणसांशीं वागतांना चूक होणें इतर धंद्यांतील चुकीपेक्षां अधिक हानिकारक असतें, हें कोणीहि कबूल करील. पण शिक्षण म्हटलें कीं, नुसतें पुस्तकी शिक्षण असा मात्र त्याचा अर्थ नाहीं. नुसतें पुस्तकी शिक्षण असून या कामांत मुळीच भागावयाचें नाहीं. तर पुस्तकी ज्ञानाबरोबरच प्रत्यक्ष अनुभवाचीहि तितकीच किंबहुना त्याहिपेक्षां अधिक जरूरी असते. आपल्याकडील अगदीं पहिल्या श्रेणींतले समाजसेवक आपण घेतले तर ते प्रत्यक्ष समाजसेवेचें कार्य करूनच पुढें आले, त्यांना समाजसेवेचें विशिष्ट शिक्षण प्रथम मुळींच मिळालेलें नव्हतें असें दिसून येईल. पण चांगल्या प्रकारें समाजसेवा करूं इच्छिणाऱ्या समाजसेवकाला आधुनिक पद्धतीनें करण्यांत येणाऱ्या समाजसेवेचें शास्त्रीय ज्ञान व प्रत्यक्ष अनुभव या दोहोंचीहि सारखीच जरूरी आहे.

# समाजसेवेचें शिक्षण देणाऱ्या संस्था

आपल्याकडे अजूनपर्यंत समाजसेवेची इच्छा असणारीं आणि ती करण्यास पुरेसा फुरसतीचा वेळ असलेलीं माणसें समाजसेवेचें कार्य करीत होतीं. समाजसेवा व्यवसाय म्हणून करणारे किंवा समाजसेवेचें शिक्षण घेतलेले असे कार्यकर्ते नव्हते. दुसऱ्याच्या बऱ्यासाठीं, समाजांतील दुःखें कमी करण्यासाठीं कांहींतरी करावें अशी तळमळ असली व त्यासाठीं स्वार्थत्याग करण्याची तयारी असली कीं ती व्यक्ति समाजसेवा करण्यास लायक आहे, असें सामान्यतः मानण्यांत येई. पण आज ही स्थिति बदललेली आहे. समाजसेवा व्यवसाय म्हणून करणाऱ्या लोकांची संख्या सारखी वाढत आहे व प्रत्यक्ष कामांचा बोजा त्यांच्यावर दिवसेंदिवस अधिकाधिक पडत आहे. समाजसेवेचें कार्य कल्पनातीत वाढत आहे. समाजाच्या परिस्थितींतहि पुष्कळ बदल झालेला आहे. समाजसेवेच्या कल्पना, ध्येय, तत्त्वज्ञान, कार्यपद्धति, तंत्र यांतहि पुष्कळ बदल झालेला आहे. ज्या लोकांत समाजसेवेचें कार्य करावयाचें आहे, तीं स्वतंत्र बुद्धींचीं माणसें आहेत, त्यांना भावना आहेत, त्यांचीं म्हणून कांहीं मतें आहेत, याची जाणीव ठेवून त्यांच्या सहकार्यानें, त्यांचें मतपरिवर्तन करून, त्यांच्या कलानें, त्यांना आपलीं मतें पटवून देऊन कार्य करावयाचें आहे. आपण कोणीतरी मोठे आहोंत, त्यांच्यापेक्षां वेगळे आहोंत, आपल्याला सर्व समजतें, त्यांना कांहीं समजत नाहीं; म्हणून आपण सांगितलेलें सारें त्यांनीं निमूटपणें ऐकावें व त्याप्रमाणें करावें, असें म्हणून आज समाजसेवा करतां येणार नाहीं. आजचे अत्यंत कठीण, गुंतागुंतीचे सामाजिक, आर्थिक आणि माणसामाणसांतील परस्पर संबंधाविषयींचे प्रश्न यशस्वी रीतीनें सोडवावयाला अनुभव, समाजसेवेची आस्था, सेवाभाव, सहानुभूति आणि समाजसेवेचें शिक्षण हीं समाजसेवकांत असावीं लागतात. तथापि समाजसेवेचें क्षेत्र फार मोठें आणि विविध प्रकारचें असल्यामुळें त्याला कार्यकर्तेहि पुष्कळ, निरनिराळ्या प्रकारचा अनुभव असलेले, निरनिराळ्या प्रकारें शिक्षण घेतलेले, निरनिराळ्या प्रकारें काम करणारे—कांहीं प्रसंगविशेषीं, कांहीं—अधूनमधून, कांहीं दररोज थोडा वेळ आणि कांहीं सर्वस्वी तिला वाहिलेले—समाजसेवक लागतात. म्हणून त्यांच्या समाजसेवेच्या शिक्षणाचीहि व्यवस्था निरनिराळ्या प्रकारें करणें, आवश्यक असतें. यांच्यापैकीं समाजसेवेची आवड असणाऱ्या, फुरसतीच्या वेळीं स्वयंस्फूर्तीनें कांहीं ना कांहीं काम करणाऱ्या समाजसेवकांना सोयीस्कर असे अल्प मुदतीचे समाजसेवेच्या शिक्षणाचे वर्ग मुंबईंत सन १९२५ मध्यें समाजसेवासंघानें सुरू केले आणि त्यांत वेळोवेळीं आवश्यक तो बदल करून ते आजपर्यंत नियमित आणि यशस्वी रीतीनें चालविले आहेत. व्यवसाय म्हणून ज्यांना समाजसेवा करावयाची आहे अशा पदवीधरांना समाजसेवेचें उच्च शिक्षण देण्यासाठीं मुंबई राज्यांत सर दोराब टाटा

ग्रॅज्युएट स्कूल ऑफ सोशलवर्क ही संस्था स. १९३६ सालीं अमेरिकेंतील अशा प्रकारच्या संस्थांच्या नमुन्यावर स्थापन झाली. तिचें नांव आतां टाटा इंस्टिटयूट ऑफ सोशल सायन्सेस असें बदलण्यांत आलें आहे. त्यानंतर बडोदा स्कूल ऑफ सोशल वर्क आणि दिल्लीला देल्ही स्कूल ऑफ सोशल वर्क अशा भारतांत आणखी दोन संस्था निघाल्या. पण त्यांनीं परदेशी तंत्राचें बरोबर अनुकरण केलेलें असल्यामुळें येथील समाजसेवेचें शास्त्र व तंत्र यांचा अवश्य तो परिचय नसणें, ही त्यांच्यांत मोठी उणीव असून त्यामुळें त्यांचा एक सवतासुभा तयार व्हावा, यांत आश्चर्य नाहीं. याशिवाय समाजसेवेंतील विशिष्ट कार्यांचें परदेशांत शिक्षण घेऊन आलेल्या समाजसेवकांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. तसेंच राष्ट्रसंघ व तत्सम दुसऱ्या जागतिक संस्था आणि युरोप अमेरिकेंतील राष्ट्रें यांनीं दिलेल्या शिष्यवृत्त्या घेऊन त्या देशांतील निरनिराळ्या प्रकाराच्या समाजसेवेच्या कामांचें निरीक्षण करून येथील समाजसेवक मोठ्या संख्येनें येत आहेत. तथापि निरनिराळ्या रोगांवरील थोड्या तज्ज्ञांची नेहमींच आवश्यकता असली, तरी सर्वसामान्य रोगांची माहिती असलेल्या व त्यांच्यावर उपाय सुचविणाऱ्या सामान्य डॉक्टरांचीच समाजाला अधिक जरूरी असते, तसेंच समाजसेवेच्या बाबतींतहि आहे. समाजसेवेचें उच्च शिक्षण घेतलेलीं पदवीधर माणसें कांहीं बाबतींत मार्गदर्शनाला हवीं असलीं, तरी अगदींच कमी शिक्षण नसलेल्या, समाजसेवेची सर्व साधारण माहिती असलेल्या, कोणतेंहि कार्य अल्पकाळांत करण्यास शिकतील अशा पण अनुभवी, कार्याची तळमळ, आस्था असलेल्या कष्टाळु समाजसेवकांची आपल्या देशांत अत्यंत आवश्यकता आहे. शिवाय समाजसेवेचें उच्च शिक्षण घेतलेल्या पदवीधर लोकांना ठेवून घेण्याची ऐपत शहराबाहेरील समाजसेवा करणाऱ्या संस्थांना तर नाहींच पण मुंबईसारख्या शहरांतहि फार थोड्या संस्थांना आहे. सारांश समाजसेवेचें उच्च शिक्षण घेतलेल्या तज्ज्ञांची मार्गदर्शन करण्यासाठीं थोड्या प्रमाणांत आवश्यकता असली, तरी प्रत्यक्ष कार्य करणाऱ्या, पडेल तें काम करण्यास नेहमीं तयार असलेल्या, सामान्य लोकांत मिळूनमिसळून काम करणाऱ्या सामान्य कार्यकर्त्यांचीच आज मोठ्या संख्येनें अत्यंत आवश्यकता आहे.

## सहानुभूति व ज्ञान

समाजसेवा करूं इच्छिणाराला अवश्य लागणाऱ्या गोष्टींमध्यें ज्यांची सेवा करावयाची त्याच्याविषयीं पूर्ण सहानुभूति असणें ही एक असते. समाजसेवा करणारीं माणसें सामान्यतः वरच्या दर्जाचीं असतात, त्यांना अनेक गोष्टींची अनुकुलता असते. त्यांना चांगलें शिक्षण मिळालेलें असतें, एखादी गोष्ट हितकारक होईल कीं, अहितकारक होईल हें समजण्याइतके ते सज्ञान असतात आणि त्यांना ह्या

सर्व गोष्टी करण्याला फुरसतहि असते. परंतु ज्यांच्यांत त्यांना काम करावयाचें असतें किंवा ज्यांची सुधारणा करण्याचें त्यांनीं पत्करलेलें असतें, त्यांना या सर्व गोष्टींची अनुकूलता नसते व ते सर्व बाजूंनीं मागासलेले, पीडलेले, पिळवणूक झालेले, कष्टी जीवन जगणारे असे असतात. म्हणून अशा लोकांना साहाय्य करण्याकरितां पुढें येणारे समाजसेवक सर्व गोष्टींचा नीट विचार करणारे व त्यांच्या विषयीं पूर्ण सहानुभूति बाळगणारे असल्याशिवाय त्यांच्यानें स्वीकृत कार्य नीटसें होणार नाहीं.

समाजसेवकाला आपल्या कामांत यश येणें वा अपयश येणें हें, त्याचे प्रयत्न, ज्या लोकांत त्याला काम करावयाचें असेल त्यांच्याशीं त्याची असलेली वागणूक व त्यांच्या स्थितिविषयींचें ज्ञान यांवर बहुतांशीं अवलंबून असतें. कारण ज्यांची सेवा करावयाची असते त्यांच्याविषयींच्या पुष्कळशा समाजसेवकांच्या कल्पना कांहीं विलक्षण असतात. याचें कारण असें कीं, त्यांनीं त्यांच्या खऱ्या परिस्थितीचा मुळीं अभ्यासच केलेला नसतो. त्यांची माहिती ऐकीव गोष्टींवर, वर्तमानपत्रांत आलेल्या माहितीवर किंवा नुसत्या तर्कावर आधारलेली असते. त्यामुळें ती अर्थातच वस्तुस्थितीला धरून नसते आणि प्रत्यक्ष कामाला हात घातला कीं अनुभव वेगळा येतो, पूर्वीं ठरविलेल्या योजना टाकाऊ होतात, मग कामांत प्रगति होईनाशी झाली कीं, जीव निराश होतो आणि या नव्या परिस्थितीला आवश्यक अशा नव्या योजना तयार करण्याची अंगांत कुवत नसली तर कार्याचा बिघाड होऊन अपयश पदरीं येतें. यासाठीं समाजसेवकानें कोणतेंहि काम हातीं घेण्यापूर्वीं त्यासंबंधीं संपूर्ण माहिती प्रत्यक्ष गोळा करावी, परिस्थितीचा नीट विचार करावा, तिला अनुरूप असा कार्यक्रम आंखावा आणि मग कामाला सुरवात करावी. मग अडचणी आल्या-तरी त्या त्या मानानें कमी येतात आणि त्यांतून मार्ग काढणें सोपें जातें. भावी संकटांची कल्पना असली कीं त्यांतून मार्ग कसा काढावा तो सुचतो व त्या मानानें निराशा कमी होते. कारण संकटांना तोंड देण्याची तयारी पूर्वींच झालेली असते. एखादी गोष्ट केवळ आपल्याला करावीशी वाटते म्हणून ती घाईनें हातीं घेऊं नये. तशानें अंगीकृत कार्य यशस्वी होण्याचा संभव फार कमी असतो व ज्यांच्यांत आपण काम करतों त्यांचाहि आपल्यावरील विश्वास उडतो.

निव्वळ उपदेश करून लोकांची सुधारणा होत नाहीं. त्यांची परिस्थिति सुधारेल त्यांच्यांत शिक्षणाचा फैलाव होईल, त्यांचे विचार सुधारतील, त्यांच्या संवयी बदलतील व त्यांची सदसद्विवेकबुद्धि सतत जागृत राहील, असे प्रयत्न झाले पाहिजेत, हें उत्साही समाजसेवकांनीं लक्षांत ठेवावें.

## आढ्यतेचा अभाव

समाजसेवकानें समाजसेवा करितांना उच्चनीचभावाला कोठेंहि जागा ठेवतां कामा नये. आपण कोणी तरी मोठे गृहस्थ आहोंत, उच्च वर्गांतील आहोंत, दुसरे लोक अगदीं अडाणी आहेत, त्यांच्या फायद्याकरितां मोठा स्वार्थत्याग करून त्यांच्यावर मोठे उपकार करण्याकरितां आपण आलों आहोंत, अशी आढ्यता समाजसेवकांत असतां उपयोगी नाहीं. तसें झालें तर त्याचेकडून खरी समाजसेवा व्हावयाची नाहीं. उलट समाजसेवेच्या मार्गांत मात्र तो अडचणी उत्पन्न करील. होतकरू समाजसेवकानें हें ध्यानांत ठेवलें पाहिजे कीं, काहीं बाबतींत तो जसा त्यांच्यापेक्षां मोठा असतो, तसे कांहीं बाबतींत तेसुद्धां त्याच्यापेक्षां मोठे असतात आणि त्याला कांहीं गोष्टी त्यांना शिकवावयाच्या असतात, त्याचप्रमाणें काहीं गोष्टी त्यांचेकडूनहि त्याला शिकण्यासारख्या असतात. तसेंच कोणत्याहि बाबतींत अनुभव येण्यापूर्वींच आपण यशस्वी होणार, या कल्पनेनें उतावीळ होऊन चढून जाऊं नये व आपला दर्जा त्यांना लावून, आपल्या सांगण्याप्रमाणें ते वागत नाहींत म्हणून रागावूं नये. ते आपलेच बांधव आहेत, आपल्याप्रमाणेंच नागरिक आहेत, म्हणून त्यांच्या आशाआकांक्षा, न्याय्य हक्क त्यांना मिळवून देऊन सर्व तऱ्हेनें आपल्या बरोबरीचे करणें-उच्च पातळीवर आणणें त्यांचा व्यक्तिगत विकास होऊन त्यांना सुसंकृत जीवन जगतां येईल असे प्रयत्न करणें हें आपलें कर्तव्य आहे, हें मुख्यतः ध्यानांत बाळगावें व त्यांच्याशीं गुण्यागोविंदाने सेवाभावीवृत्तीनें वागून त्यांच्या अडचणी समजून घेण्याचा प्रयत्न करावा.

कोणत्याहि तऱ्हेच्या लोकांत काम करावयाचें असलें, तरी पहिल्या भेटीच्या अनुभवावरून त्यांच्याविषयीं अंदाज बांधूं नये. कारण पहिल्या भेटीचा अनुभव हा नेहमीं खरा नसतो. प्रथम भेटीच्या वेळीं आपले पूर्वग्रह आपल्या डोक्यांत वावरत असतात. ते बदलण्यास बराच अनुभव यावा लागतो. विशेषतः ज्या लोकांत आपण मिसळत नाहीं, ज्याच्यांत आपलें येणेंजाणें कमी असतें; ज्यांना आपण कमी समजतों; त्यांच्याविषयींची माहिती आपल्याला लोकांच्या सांगण्यावरूनच काय ती झालेली असते आणि तींत बहुतकरून अतिशयोक्तीचा भाग फार असतो. याकरितां अशा लोकांत कांहीं काळ काम केल्याशिवाय त्यांच्या स्थितीविषयीं उगाच कांहीं तरी तर्क करूं नयेत. त्यामुळें फार मोठ्या चुका होण्याचा संभव असतो. कधीं कधीं एखाद्या समाजांतील ज्या थोड्या लोकांची आपल्याला माहिती असते किंवा ज्यांची आपल्याकडे येजा असते, अशांच्या वागणुकीवरून त्या सर्व समाजाविषयीं आपण कल्पना करतो. पण एखाददुसऱ्या किंवा चारदोन माणसांवरून सर्व समाजाची परीक्षा करणें केव्हांही योग्य होणार नाहीं. अशानें एखादे वेळीं त्या समाजाला अन्याय होऊन आपल्या पदरीं दोष येण्याचा संभव असतो. गरीब लोकांत काम करूं इच्छिणारानें

त्या लोकांच्या राहाणीकडे लक्ष देऊन वागण्याची दक्षता घ्यावी. कारण पुष्कळ वेळां असा अनुभव येतो कीं, कांहीं लोक साहेबी पोषाखांत गलिच्छ वस्तींत समाजसेवा करावयास जातात. पण ज्यांना सांजसकाळ पोटभर जेवावयास मिळण्याची पंचाईत, त्यांच्याकडे अशा लोकांना बसण्याकरतां खुर्च्या असणें संभवनीय नसतें आणि असे लोक तेथें गेले, म्हणजे त्यांना बसावयास देण्यापासून अडचण भासते. त्यामुळें अर्थातच अशा समाजसेवकांचा लोकांना तिटकारा येतो व मग त्यांच्यांत मिळूनमिसळून काम करणें अशक्य होतें. वेळ पडेल त्याप्रमाणें ओट्यावर, पाटावर किंवा जमिनीवर बसून काम करण्यास तयार असणारा, लोकांना आपली उठाबस करावयास न लावणारा, बडेजाव न दाखविणारा, त्यांच्यापैकींच आपण एक आहोंत असें प्रत्यक्ष कृतीनें दाखविणारा समाजसेवक असला, तरच लोकांनाहि त्याचेविषयीं आपलेपणा, आदर वाटतो व त्याचें कार्य सुकर होतें. गोरगरिबांनाहि मानाची चाड असते, स्वाभिमान असतो, हें विसरून कामाला सुरुवात करण्यापूर्वीच 'अरेतुरे' करणारे किंवा आपण खुर्चीवर बसून लोकांना तिष्ठत उभे करून त्यांची उलट तपासणी करणारे कांहीं समाजसेवक असतात. पण अशा वागणुकीनें त्यांच्या पदरीं निश्चित अपयश येतें. लोकांशीं अहंपणानें व तुसडेपणानें वागणारे लोक ज्याप्रमाणें समाजसेवा करण्यास नालायक असतात; त्याचप्रमाणें त्यांच्यांत अगदीं मिळून जाऊन सर्व बाबतींत त्यांच्याप्रमाणें झालेले, त्यांचे दोष, त्यांच्या अनिष्ट संवयी, त्यांचीं व्यसनें यांतहि त्यांची बरोबरी करूं पाहणारे असे स्वतःची पातळी सर्वस्वी सोडणारे लोकहि समाजसेवा करण्यास योग्य नसतात. कारण लोकांची उन्नति करणें, हें समाजसेवेचें ध्येय असतें. म्हणून आपली अवनति करून आपला दर्जा कमी करून घेतलेला चारित्र्यहीन मनुष्य लोकांची सुधारणा करून त्यांचा दर्जा कसा वाढवूं शकणार ? यासाठीं समाजसेवकानें समाजसेवा करतांना, लोकांची उन्नति करितांना आपली अवनति होणार नाहीं, अशी काळजी घेणें अत्यंत आवश्यक असतें.

## धिम्मेपणा

समाजसेवकानें लक्षांत बाळगण्यासारखी एक महत्त्वाची गोष्ट अशी आहे कीं, हातीं घेतलेलें कोणतेंहि काम सुरवात करतांक्षणींच यशस्वी होणार अशी उतावीळ होणें, गैर होय. समाजसेवेच्या कामांचें स्वरूपच मुळीं असें असतें कीं, एक तर त्यांचीं इष्ट फळें बहुतकरून तत्काळ दिसत नाहींत. आणि दिसतात तींहि इतक्या मंदगतीनें दिसतात कीं, अधीऱ्या माणसाला तीं निराशाजनक वाटल्याशिवाय कधींहि राहात नाहींत. म्हणून आपल्या कामाचे इष्ट परिणाम दिसत नसले तरी आपलें काम योग्य दिशेनें होत आहे, याची खातरजमा करून धिम्मेपणानें, तात्कालिक यशाची अपेक्षा न करतां काम सतत चालू ठेवलें पाहिजे; तरच आपल्या हातून

चांगलें कार्य होईल. समाजसेवेंत कठीण असतें तें हेंच कीं, काम अखंड चालू ठेवावें लागतें. अपुरें सोडलें तर केलेलेंहि काम फुकट जाण्याचा संभव असतो. उतावळेपणानें कामाचा बिघाडहि होतो.

कांहीं समाजसेवकांना वाटतें कीं, आपण लोकांकरितां इतकें काम करीत असतांहि ते आपल्याविषयीं कृतज्ञता दाखवीत नाहींत. पण एक तर अशा कृतज्ञतेची अपेक्षा करणें म्हणजे आपण कृतज्ञतेच्याच आशेनें काम करीत आहों, असें दाखवून आपल्या कामाची किंमत कमी करून घेणें होय. दुसरें, आपण आपल्या मनाशीं असा विचार केला पाहिजे कीं, लोकांनीं आपले कृतज्ञ होण्यासारखें लोकांचें आपण कितपत हित केलें आहे ? खरोखरी लोकांनीं आपली स्तुति करण्याइतकें आपल्याकडून बहुधा कांहीं झालेलें नसतें आणि आपण कांहीं केलें असलें, तरी तें इतकें अल्प असतें कीं, त्याचा इतका बोलबाला करण्याइतकें त्याचें महत्त्व नसतें. मग अशा कामाची लोकदृष्ट्या मातब्बरी ती काय राहिली ? इतकें करूनहि लोकानीं स्तुति करण्यासारखें खरोखरीच लोकोपयोगी कार्य आपल्याकडून झालें असलें, तर त्याचें महत्त्व न जाणण्याइतके सारेच लोक कृतघ्न नसतात. त्याबद्दल सार्वजनिकरीत्या आपला गौरव करण्यांत आला नसला, तरी खाजगी रीतीनें कृतज्ञता दाखविणारे लोक नेहमीं आढळतात. पण समाजसेवा करण्याचें नुसतें ढोंगच असलें-या कार्यांत अशा ढोंगी लोकांचा सुळसुळाट फार असतो आणि तें समाजाला न रुचून त्याचा स्फोट झाला, तर त्यांत दोष कोणाचा ? मात्र असल्या बहुरुप्यांनीं अनेकदां फसविल्यामुळें पुष्कळदां खोट्या-च्या मापानें खरेंहि मापलें जातें. आणि त्यामुळें खऱ्या समाजसेवकाच्या कार्यांत अडचणी उत्पन्न होऊन त्याला आपल्या कार्याची सत्यता पटविण्याला अधिक श्रम घ्यावे लागतात. पण लोकांची खात्री होण्याइतका जर त्यांत खरेपणा असला, तर ते शेवटीं यशस्वी होऊन लोकादरास पात्र होतात.

समाजसेवकांचा एक वर्ग असा असतो कीं, त्याला समाजांतील एखाददुसराच अन्याय दिसतो आणि त्याच्यामुळेंच सारी संकटपरंपरा समाजावर आली आहे, अशी तो आपली समजूत करून घेतो. दुसऱ्या तिरस्करणीय गोष्टी त्याला दिसत नाहींत आणि दिसल्या तरी त्या कबूल करण्याची त्याची तयारी नसते. त्यामुळें तो ह्या एकाच गोष्टीचें चिंतन करीत असतो. त्याला त्या गोष्टीचें वेडच लागलेलें असतें. प्रत्येक गोष्टींत निष्कारण आपल्या आवडत्या विषयाचा संबंध आणून त्याचें म्हणणें न पटणाऱ्या लोकांना तो नेहमीं शिव्याशाप देतो. त्याच्या मतें दुसरे समाजसेवक भल-त्याच दिशेनें कामें करीत असल्यामुळें ते साऱ्या समाजाची प्रगति खुंटवीत आहेत. असा तो आपला गैरसमज करून घेतो. अशा एककल्लीपणामुळें त्याचें कोणाशीं फारसें पटत नाहीं आणि तो आपल्या विवक्षित कार्यांतहि यशस्वी होत नाहीं.

पुष्कळदां त्याचें तें विवक्षित कार्य समाजाला आवश्यकहि असतें. पण त्यांतील दोषहि गुण म्हणून त्याची निष्कारण कोणी तरफदारी करूं लागला म्हणजे गैरसमज अधिक वाढून त्या कार्याचें खरें महत्त्वहि कमी होतें. पण सामान्यतः अशीं माणसें प्रत्यक्ष काम करणारीं नसतात आणि त्यांना प्रत्यक्ष काम करावयास लावणें हाच त्यांच्या विवक्षित रोगावर रामबाण इलाज असतो. कारण 'करील तो बोलणार नाहीं' ही म्हण येथेंहि खरी ठरते. मनुष्य प्रत्यक्ष कामाला लागला, म्हणजे त्यांतले गुणदोष आणि अडीअडचणी तर त्याला कळतातच, पण वायफळ बडबड करण्याला त्याला फुरसत मिळत नाहीं आणि फुरसत मिळाली तरी बोलावेसें वाटत नाहीं.

## सर्वांगीण विकास झाला पाहिजे

समाजाचा विकास म्हटला कीं, तो सर्वांगीणच व्हावा लागतो. एका गोष्टीची सुधारणा केली, एक अडचण नाहींशी केली, एका दुःखाचा परिहार केला कीं समाज सुधारला असें मानणें चुकीचें असतें. शरीराच्या एकाच अवयवाला भरपूर व्यायाम दिला, त्याच्याच सुधारणेवर भरपूर मेहनत घेतली आणि त्याची शक्ति खूप वाढविली तर तेवढ्यानें संबंध शरीर मजबूत होईल काय ? त्याची वाढ होईल काय ? संबंध शरीराची वाढ होण्याला संबंध शरीराला व्यायाम मिळाला पाहिजे. अशी एका अवयवाची सुधारणा होऊन संबंध शरीर सुदृढ होत नाहीं; उलट एका भागाची प्रमाणाबाहेर वाढ झाल्यामुळें दुसरे भाग कमकुवत होतात आणि सारें शरीर सदोष, वेडौल होतें. समाजरूपी शरीराचेंहि असेंच आहे. त्याची एकाच गोष्टींत सुधारणा होऊन चालत नाहीं तर सर्वांगीण विकास होणें अत्यंत आवश्यक आणि महत्त्वाचें असतें. पण एखाद्या गोष्टीला तात्पुरतें अधिक महत्त्व देण्याची आवश्यकता वाटली, ती प्रथम हातीं घेण्याची जरूरी वाटली, सुरवात म्हणून तिचें अधिक महत्त्व वाटलें, विशिष्ट परिस्थितीमुळें किंवा कांहीं अडचणींमुळें तिची प्रथम निवड करणें हिताचें वाटलें, तरी तेवढ्यावरून सर्वांगीण विकासाची जरूरी आणि महत्त्व मुळींच कमी होत नाहीं. सर्वांगीण विकास झाल्याशिवाय समाजाची खरी आणि टिकाऊ सुधारणा होऊं शकत नाहीं. म्हणून समाजसेवेचें कोणतेंहि विशिष्ट कार्य आपण करीत असलों, तरी समाजाची सर्वांगीण प्रगति करणें हेंच आपलें ध्येय असलें पाहिजे आणि आपलें विशिष्ट कार्य त्या ध्येयाला पोषक होईल, असे प्रयत्न केले पाहिजेत. त्याचप्रमाणें समाजाचा सर्वांगीण विकास करण्याचा प्रयत्न करणारे किंवा आपल्याप्रमाणें दुसरीं ठराविक कामें करणारे, यांच्या कार्यांत आपण कोणत्याहि तऱ्हेनें व्यत्यय आणतां नयेच, उलट त्यांना हस्तेपरहस्तें साहाय्य करण्याचें आणि त्यांच्याबद्दल सहानुभूतीचें, स्नेहभावाचें धोरण ठेवलें पाहिजे. त्यामुळें आपल्या मार्गांत कांहीं अडचणी येणार नाहींतच; पण सर्वांचेंच काम सुकर होऊन एकंदर समाजाची प्रगति लवकर होण्यास त्याचें साहाय्य होईल.

कामाचा अनुभव नसलेल्या माणसांना नेहमीं असें वाटतें कीं साऱ्या अनिष्ट गोष्टी चुटकीसरशा नाहींशा कराव्या. पण सामाजिक अन्याय असे चटदिशीं नाहींसे करतां येण्यासारखे नसतात. कारण त्यांची पाळेंमुळें अगदीं दूरवर पोहोंचलेलीं असतात. कित्येक गोष्टी तर शतकेंच्या शतकें चाललेल्या असतात आणि त्या नाहींशा करण्याला शेंकडों वर्षें लागलीं नाहींत, तरी बराच अवधि लागतो. कांहीं गोष्टी कदाचित् अल्पावधींत नाहींशा करतां येतील; पण त्यांचे परिणाम लवकर नाहींसे होण्यासारखे नसतात. आणि त्यांची प्रतिक्रिया होऊन त्यांतून दुसरेंच एखादें नवीन अरिष्ट उत्पन्न होऊं नये, म्हणून साऱ्या गोष्टी धीरानें पण निश्चयानें कराव्या लागतात. झटपट रंगाऱ्याची हुशारी येथें अपयशी ठरते.

ज्या लोकांत आपल्याला काम करावयाचें असतें तीं सारींच माणसें सुशिक्षित किंवा अधिक समंजस असतातच असें नाहीं. म्हणून ज्या गोष्टी आपल्याला सहज समजण्यासारख्या असतात, त्या त्यांना तितक्या सहजपणानें समजतात असें नाहीं. पुष्कळदां त्या त्यांना समजावून देण्यास पुष्कळ प्रयास पडतात. म्हणून पूर्वतयारी करणें, त्यानंतर प्रत्यक्ष कामाला लागणें, पुढें त्या कामाचें महत्त्व लोकांना कळून त्याचा इष्ट परिणाम दिसावयास लागणें याला सहाजिकच बराच काळ जावा लागतो आणि हा सारावेळपर्यंत समाजसेवकाला धिम्मेपणानें सतत श्रम करावे लागतात. पुष्कळांना हा वेळ फुकट गेल्यासारखा वाटतो, पण वस्तुस्थिति तशी नसते. लोकमत तयार करण्याकरितां किंवा आपल्या कार्याची पार्श्वभूमि तयार करण्याकरितां लागणारा वेळ हा खरोखरी आपलें कार्य करण्याकरितांच लागलेला वेळ असतो. तसेंच समाज म्हटला कीं, त्यांत सर्व तऱ्हेचीं माणसें असावयाचींच. तरुण असतात, त्यांना साऱ्याच गोष्टी चुटकीसरशा व्हाव्यात असें वाटतें. वयोवृद्ध असतात त्यांचा दमानें घ्या, हा महामंत्र वेळींअवेळीं सारखाच चालू असतो, कांहीं जाणूनबुजून आपला गैरसमज करून घेतात; तर कांहीं निष्कारण हेवा करून आपल्या कार्यांत विघ्नें उत्पन्न करण्याचा प्रयत्न करितात. असे अनेक स्वभावाचे लोक असतात व त्या साऱ्यांनाच टाळून चालण्यासारखें नसतें. म्हणून प्रसंग येईल त्याप्रमाणें वागणें भाग असतें. याकरितां समाजसेवकांत सोशीकपणा असावा लागतो, त्याला न्यायान्याय व वेळप्रसंग पाहून वागावें लागतें आणि सर्वांकरितां व सर्वांपेक्षां जास्त श्रम करण्याची व कष्ट सोसण्याची त्याची तयारी असावी लागते.

## आत्मविश्वासाची आवश्यकता

विराट् स्वरूपी, बहुरूपी आणि अठरा धान्याचें कडबोळें झालेल्या समाजाची सेवा करणें हें एका तऱ्हेने सोपें असलें, तर दुसऱ्या तऱ्हेनें कठीण असतें. सोपें असें कीं, समाजांतील कोणत्याहि व्यक्तीला आपल्या सामर्थ्याप्रमाणें समाजसेवा करण्यास

वरील परिस्थितीमुळें पुष्कळ वाव मिळतो आणि कामाच्या विस्तृत क्षेत्रामुळें लहान लहान व्यक्तीलासुद्धां आपल्या आवडीप्रमाणें कामाची निवड करून त्यांतच आपल्या शक्तीचा व्यय करण्यास ठीक पडतें. कठीण अशा अर्थानें कीं, सर्व मानवजातीची सेवा करण्याची महत्त्वाकांक्षा धरणाऱ्या मनुष्याला समाजांत असे नाना पंथ असल्यामुळें सर्वांना पटेल व रुचेल असें ध्येय ठेवणें कठीण पडतें व त्यामुळें तो एका पोटसंघाला प्रिय; तर दुसऱ्या पोट संघाला अप्रिय होतो. सर्व समाजाची सुधारणा हें एक ध्येय विचारपूर्वक ठरवून त्याप्रमाणें आपला कार्यक्रम आंखणारा व कांहीं झालें तरी त्या ध्येयापासून न ढळणारा समाजसेवक, आपलें ध्येय बरोबर आहे अशी त्याची खात्री झाल्यावर, आत्मविश्वासानें कामाला लागून, लोकांच्या निंदा-स्तुतीची पर्वा करीत नाहीं आणि ध्येयाशीं एकरूप झाल्यामुळें त्याच्या कार्यांत खंड पडण्याचा संभव नसतो. पण परबुद्धीनें वागणारा व लोकप्रियता हेंच ध्येय मानणारा स्वार्थी मनुष्य लोकमत प्रतिकूल झाल्यावर त्या झंझावतांत कोठच्या कोठें उडून जातो, त्याचा ठावहि लागत नाहीं आणि तें तात्पुरतें वारें नाहीसें झालें कीं त्या व्यक्तीचें नांवहि ऐकूं येईनासें होतें, असा अनुभव आपल्याला पदोपदीं येतो.

समाजसेवक हा सार्वजनिक कार्यकर्ता असल्यामुळें व जनतेच्या सहानुभूतीची, सहकार्याची व आर्थिक मदतीची त्याला आवश्यकता असल्यामुळें त्याला आपल्या कार्याला प्रसिद्धि देणें जरूर असतें; नव्हे अपरिहार्य असतें. त्याच्या कार्याचें यशापयश बहुतांशीं जनतेच्याच साहाय्यावर अवलंबून असल्यामुळें त्याच्या कार्याला जितकी अधिक प्रसिद्धि मिळेल तितकी हवी असते. पण याचा अर्थ असा नव्हे कीं त्यानें उठल्या सुटल्या कामाचीच प्रसिद्धि करीत राहावें, प्रसिद्धि हेंच आपलें मुख्य काम असें मानून सारखें तिच्या मागें लागावें. या प्रसिद्धीच्या बाबतींत त्यानें अत्यंत काळजी घेणें जरूर असतें. कारण एकतर प्रत्यक्ष काम होत असेल, त्याच्यापेक्षां निष्कारण अधिक भडक, अतिशयोक्तियुक्त माहिती प्रसिद्ध करण्यानें निष्कारण गैरसमज उत्पन्न होऊन आपल्या कार्याची हानि होते. दुसरें असें कीं, प्रसिद्धीची हांव हें एक व्यसन असतें. तिचा मोह एकदां माणसाला पडूं लागला कीं, तो आवरेनासा होतो. त्याचें कार्य हळू हळू कमी होऊन शेवटीं नुसती प्रसिद्धीच शिल्लक राहाण्याचा संभव असतो. असे पुष्कळ कार्यकर्ते आपण पाहातों कीं, ते जर जरूर तेवढीच आपल्या कामाची जाहिरात करून बाकीचा उत्साह प्रत्यक्ष कार्य करण्यांत घालवितील तर ते आपोआप मोठे होतील. पण काम करण्यापेक्षां नांव मिळविण्याच्या मागें लागल्यामुळें शेवटीं नांवहि नाहीं आणि प्रसिद्धीहि नाहीं, अशी त्यांची अनुकंपनीय परिस्थिति होते. म्हणून खऱ्या कार्यकर्त्यानें प्रसिद्धीचा मोह सोडून आपले सर्वस्व आपलें कार्य यशस्वी करण्यांत घालवावें. कार्य खरोखरीच चांगलें आणि भरीव होत

असलें, तर प्रसिद्धि आणि नांव आपोआप वाट पुसत येतील, आपल्या मागें लागतील. पण याच्या उलट प्रयत्न केल्यास अपकीर्ति मात्र होईल.

## समाजजीवनाचा अभ्यास

समाजसेवकाला ज्या समाजांत काम करावयाचें असतें, त्या समाजाची संपूर्ण माहिती असावी लागते. यांतली पुष्कळशी माहिती पुस्तकांतून मिळण्यासारखी नसते. ती जसजशी मिळत जाईल तसतशी प्रत्यक्ष अनुभवानेंच मिळवावी लागते. एकाद्या गरीब वस्तींत सहा महिने राहिल्यानें तेथील लोकांविषयीं जो अनुभव मिळेल, तितकें ज्ञान कैक पुस्तकेंहि वाचून मिळणार नाहीं. पण पुस्तकी ज्ञानाचाहि तिटकारा करून चालणार नाहीं. कांहीं लोकांची अशी समजूत असते कीं प्रत्यक्ष माहिती मिळाल्यावर पुस्तकी ज्ञानाची आवश्यकता नाहीं. पण पुस्तकें हें अनेक वर्षांच्या आणि लोकांच्या श्रमाचें व अनुभवाचें भांडार असतें, म्हणून त्यांचा त्यानें उपयोग करून घेतला पाहिजे. शिवाय निरनिराळीं माणसें व निरनिराळे समाज आपापल्या समजुती-प्रमाणें समाजसुधारणेच्या बाबतींत वेगवेगळाले प्रयत्न व प्रयोग सतत करीत असतात. अशांचा अनुभव व आपला अनुभव यांच्या तुलनात्मक ज्ञानानें आपलें कोठें चुकत आहे किंवा दुसरा कोठें चुकतो, हें कळतें व त्याप्रमाणें आपल्या कार्य-क्रमांत बदल करण्याची संधि मिळते. तसेंच सरकारनें व नगरपालिकांनीं प्रसिद्ध केलेल्या वार्षिक व दुसऱ्या अनेक प्रकारच्या अहवालांत समाजसेवकाला उपयोगी अशी पुष्कळ माहिती असते, तिचाहि त्यानें फायदा करून घ्यावा.

समाजसेवकाला ज्या ठिकाणीं काम करावयाचें असतें तेथें चाललेल्या मुख्य उद्योगधंद्यांची माहिती असावी लागते. कारण तेथील लोकांचा त्या धंद्याशीं निकटचा संबंध असतो. व त्या धंद्याच्या तेजीमंदीवर त्यांचें बहुतेक सुखदुःख अवलंबून असतें. तसेंच तेथील सामाजिक व औद्योगिक स्थितीचा इतिहासहि त्याला अवगत असावा लागतो. कारण समाजांत जी अस्वस्थता आज आपण पाहतों किंवा ज्या अनिष्ट गोष्टी आपल्याला दिसतात, त्यांचीं पाळेंमुळें फार खोल गेलेलीं असतात. पूर्वीं घडलेल्या अनेक बऱ्यावाईट कृत्यांत त्या असंतोषाचें मूळ असूं शकतें. म्हणून आजचा समाज कोणत्या परिस्थितींतून आला, तो या स्थितींत येतांना कोणकोणतीं स्थित्यंतरें झालीं, हा विश्वसनीय पूर्वइतिहास माहीत असल्याशिवाय आज प्रामुख्यानें दिसणाऱ्या कित्येक गोष्टींचें मूळ सांगतां येणार नाहीं. आणि त्या पार्श्वभूमीची बरोबर माहिती असल्याशिवाय पुढील योजनाहि बरोबर ठरवितां येणार नाहींत. कोणत्याहि समाजाची खरी प्रगति होण्यास त्याची सर्व बाजूंनीं सुधारणा व्हावी लागते, ही वस्तुस्थिति असतांनाहि आणि स्वराज्यप्राप्ति झालेली असतांहि आज सामाजिक गोष्टींपेक्षां राजकीय गोष्टींनाच अधिक महत्त्व दिलें जात आहे. शाळांत

शिकविला जाणारा इतिहास बहुतेक राजकीय बाबींनींच भरलेला असतो. त्यांत सामाजिक गोष्टींचा क्वचित् कोठें उल्लेख असला; तरी तो अपुरा, तुटकतुटक आणि राजकीय गोष्टींना पुरवणी म्हणून असतो. सामाजिक स्थित्यंतराची संगतवार माहिती कोठेंहि दिली जात नाहीं. एखादें पोरकेंपोर असावें; त्याप्रमाणें समाजाची सामाजिक इतिहासाच्या बाबतींत स्थिति झाली आहे. मातृपितृहीन अर्भकाला आपल्या मातापित्याविषयीं माहिती काय ती लोकांनीं सांगितलेल्या खऱ्याखोट्या गप्पांवरून झालेली असते, तद्वतच आपल्या सामाजिक इतिहासाविषयीं झालें आहे.

विशेषतः सामाजिक घडामोडी कशा होत आल्या, अलीकडील मोठमोठे गिरण्याकारखाने अस्तित्वांत येण्यापूर्वी येथें कशी स्थिति होती व त्याचे समाजावर कसेकसे परिणाम होत आले, तसेंच तत्कालीन समाजसेवकांनीं सामाजिक अन्यायाचा प्रतिकार करण्याकरितां कसे कसे प्रयत्न केले व त्यांचा तत्कालीन समाजावर काय परिणाम झाला, हें आजच्या समाजसेवकाला अवगत असणें जरूरीचें आहे. कामगार व कारखानदार यांचे परस्परांशीं संबंध पूर्वी कसे होते व आज कसे आहेत अशा सारख्या प्रचलित प्रश्नांची माहिती समाजसेवकाला असणें अगदीं आवश्यक आहे. लोकांच्या राहाणींत कसकसे कमी जास्त फेरबदल होत आले आहेत व होत आहेत, हें कळण्यासाठीं अर्थशास्त्राचीहि ठोकळ माहिती समाजसेवकाला असावयास हवी.

वनवासी, गुन्हेगार वेश्या, भिकारी, निर्वासित, व्यंग अशा लोकांच्या बाबतींत, त्याचप्रमाणें भूकंप, दुष्काळ, पूर अशा राष्ट्रीय आपत्तींच्या बाबतींत व अशाच प्रकारच्या समाजसेवेच्या कक्षेंत येणाऱ्या दुसऱ्या प्रश्नांसंबंधीं सरकारनें काय केलें आहे व त्या बाबतींत त्यांचें काय धोरण आहे, याची माहिती समाजसेवा करूं इच्छिणारानें अवश्य करून घ्यावी. तसेंच या प्रश्नांसंबंधीं इतर राष्ट्रांनीं कस-कसे प्रयत्न केले आहेत व ते कितपत सफळ झाले आहेत, यांचेकडेहि समाजसेवकाचे लक्ष्य असावें. समाजसेवा करतांना नगरपालिका, सरकार व दुसऱ्या धर्मादाय संस्था यांच्याशीं समाजसेवकाचा नेहमीं संबंध यावयाचाच; म्हणून त्यानें निरनिराळ्या संस्थांशीं सहकारितेनें वागून त्यांच्या इतिहासाची माहिती घ्यावी. यामुळें सामाजिक प्रश्नांसंबंधीं लोकमत कसें तयार होत आलें, हें कळतें, इतकेंच नव्हे तर कोणत्या संस्थांनीं कोणतें ध्येय ठेवल्यामुळें किंवा मुळींच ध्येय न ठेवल्यामुळें त्यांना यश वा अपयश आलें आणि म्हणूनच आपण कोणतें ध्येय पुढें ठेवणें हितावह होईल, हें ठरविण्यास ठीक पडतें.

## ध्येय व तत्त्वें

कांहीं लोक असे असतात कीं, ते कोणतें तरी काम करीत असतात. पण त्यांच्यापुढें अमुक एक ध्येय असें नसतें. वाऱ्याप्रमाणें वाहात जाण्याचें हें धोरण

केव्हांही इष्ट नाहीं. प्रत्येक व्यक्तीला व संस्थेला कांहीं तरी ध्येय हें हवेंच व तें परिस्थित्यनुरूप बदललेंहि पाहिजे. तसें न केलें तर या सतत बदलणाऱ्या जगांत आपण केव्हां मागें पडूं, त्याचा थांगहि लागणार नाहीं. करितां आपल्याला कोठें जाऊन पोंचावयाचें आहे. आपला अंतिम हेतु काय आहे हें निश्चित केल्याशिवाय मार्गक्रमण करावयास लागणें केव्हांहि गैर-धोक्याचें-असतें. प्रत्येक व्यक्तीला किंवा संस्थेला मोठें व्यापक ध्येय आपल्यापुढें ठेवितां येईल असें नाहीं. तरी पण आपल्या परिस्थितीप्रमाणें व आपल्या सामर्थ्याप्रमाणें होतां होईल तितकें मोठें ध्येय आपल्यापुढें असावें व तें समाजाच्या एकंदर ओघाला अनुरूप किंवा समाज ज्या दिशेनें जावा असें आपल्याला वाटत असेल त्याला पोषक-प्रगतिपर असें असावें. तसेंच आजचा काल हा तज्ज्ञांचा आहे. प्रत्येक बाबीसंबंधीं थोडथोडी माहिती, पण एखाद्या विषयाविषयीं संपूर्ण माहिती असणें, हें आजच्या काळाला आवश्यक मानलें जातें. यासाठीं प्रत्येक समाजसेवकानें आपल्याला जरुर लागणाऱ्या सर्व विषयांची थोडी थोडी माहिती करून घ्यावीच; पण आपल्याला आवश्यक आणि आवडत्या अशा एखाद-दुसऱ्या जादा विषयाचा पायाशुद्ध अभ्यास करावा व त्यांत पारंगत व्हावें.

समाजसेवा ही कांहीं तरी करावें म्हणून पुष्कळ लोक करीत असले; तरी समाजसेवेचीं कांहीं ठराविक तत्त्वें आहेत व त्यांच्या अनुरोधानें प्रत्येक समाजसेवकाला आपलें कार्य करावयाचें असतें. करितां ही तत्त्वें ज्यांच्या स्वार्थाच्या आड येतात ते आपमतलबी लोक आपल्याला नडणारें तत्त्व सोडून समाजसेवक दुसऱ्या दिशेला वळावा म्हणून कधीं बऱ्या तर कधीं वाईट मार्गाचें अवलंबन करतात. स्वार्थलोलुप माणसांचे हे प्रयत्न केव्हां केव्हां दिसण्यांत इतके सरळ व साधे असतात कीं, ते धोपटमार्गानें जाणाऱ्या समाजसेवकांच्या लक्षांत पुष्कळदां येतहि नाहींत. याकरितां प्रत्येक समाजसेवकानें आपलें काम म्हणजे ईश्वरसेवा आहे हें लक्षांत ठेवून सावधपणानें, निश्चयानें पण कोणत्याहि प्रकारच्या लाभालोभाला बळी न पडतां अखंड करीत रहावें. आपण निस्वार्थ बुद्धीनें काम करितों हेंच पुष्कळांना नको असतें. कारण तें त्यांच्या स्वार्थाच्या आड येतें आणि ते आपल्या मार्गांत अनेक प्रकारच्या अडचणी उत्पन्न करतात. पण समाजसेवकानें आपल्या ध्येयाकडे अढळ दृष्टि ठेवून अशा अडचणींना न जुमानतां कार्य करीत रहावें.

खरी उच्च दर्जाची समाजसेवा केवळ समाजसेवेच्याच हेतूनें केलेली असते. तींत दुसरा कांहीं हेतु नसतो व नसला पाहिजे. पण आज अनेक माणसें अनेक प्रकारच्या हेतूंनीं समाजसेवेच्या क्षेत्रांत वावरतांना आढळतील. त्यांच्यापैकीं कांहींचें कार्यहि पुष्कळदां चांगलें असतें; पण हेतु मात्र खरी समाजसेवा करण्याचा नसतो. राजकीय धार्मिक किंवा दुसऱ्या कांहीं तरी उद्देशानें ते हीं कामें करीत असतात.

बाह्यात्कारी ते समाजसेवा करतांना दिसले, तरी त्याचें साध्य मात्र दुसरें कांहींतरी असतें. समाजसेवेच्या मिषानें लोकांत मिसळणें सोपें असल्यामुळें हा समाजसेवेचा हीन मार्ग त्यांनीं पत्करलेला असतो. पण ज्याला खरी समाजसेवा करावयाची आहे तो अशा आडमार्गांनीं जाणारा नाहीं. तो एखाद्या धर्माचा अनुयायी असेल, एखाद्या राजकीय पक्षाकडे त्याचा ओढा असेल किंवा एखाद्या विशिष्ट कार्यांत तो भाग घेत असेल. पण हे भेदभाव आपले वैयक्तिक प्रश्न समजून आपल्या समाजसेवेच्या कार्यांत त्यांना येऊं देणार नाहीं. पायाशुद्ध समाजसेवेच्या कार्याला सुरवात करणाऱ्या पूर्वी उल्लेख केलेल्या थोर समाजसेवकांनीं हें तत्त्व अत्यंत कसोशीनें पाळलें आहे असें आढळून येईल.

आपण एकटे, आपल्याला वेळ तो किती आणि या अफाट जगांत आपण समाजसेवा ती काय आणि कितीशी करणार ? असे निराशाजनक विचार कांहीं लोकांच्या मनांत येणें संभवनीय असतें. पण आपण एकटे असलों, तरी या प्रकरणाच्या शिरोभागीं उद्धृत केलेल्या कवितेंत म्हटल्याप्रमाणें ' आपण एकटे असलों, तरी पण कोणी तरी आहोंत, आपल्याला प्रत्येक गोष्ट करतां आली नाहीं तरी कांहींतरी खचित करतां येण्यासारखें आहे. आणि तें थोडें करण्यास आपण चुकतां कामा नये. ' आपण एकटे असलों तरी समाजाचे कर्तृत्ववान् घटक आहोंत. आणि समाजाच्या आपल्यासारख्या दुसऱ्या अनेक घटकांनीं थोडें थोडें कार्य केलें तरी साऱ्यांचें मिळून केवढें मोठें कार्य होईल. समाजाला या कार्याची भूक लागलेली आहे. म्हणून आपल्याला फारसें करतां येत नाहीं किंवा आपल्या एकट्याच्या प्रयत्नाला फारसें महत्त्व नाहीं, असे निराशा करणारे विचार मनांत न आणतां जें काय जास्तींत जास्त करतां येईल तें फूल नव्हे फुलाची पाकळी म्हणून समाजरूपी देवाला–जनता जनार्दनाला–मनोभावानें अर्पण करावें.

## आवड आणि तारतम्य

समाजसेवेच्या कार्यांत अत्यंत महत्त्वाची बाब जर कोणती असेल तर ती समाजसेवेची आवड ही होय. पुष्कळ गोष्टी अशा असतात कीं, त्या करावयाच्या आपल्या मनांत नसतात; पण परिस्थितीमुळें किंवा दुसऱ्या कांहीं कारणामुळें त्या आपल्याला करणें भाग असतें, म्हणून त्या कशातरी आपण करतों. पण समाजसेवेच्या बाबतींत असें करणें केव्हांहि योग्य होणार नाहीं. एखाद्या विशिष्ट समाजसेवेच्या कामाची जर आपल्याला आवड वाटत नसेल, आपल्यावर लादलेलें आहे एवढ्याकरितांच तें कसें तरी एकदाचें शेवटास पोंचविलें पाहिजे, असें जर आपल्याला वाटत असेल, तर तें कितीही महत्त्वाचें असलें तरी आपल्याकडून कधींहि चांगल्या रीतीनें व्हावयाचें नाहीं.

समाजसेवा करण्याची प्रबल इच्छा, आवड, अगदीं ओढ असल्यावांचून ती चांगली होऊं शकणार नाहीं. समाजसेवेचीं अनेक कामें कशीं तरी रडत कढत चाललेलीं आपण नेहमीं पाहातों, त्याचें कारण ही अनास्था त्यांच्या मुळाशीं असते हें होय. यासाठीं समाजसेवकाला या कामाची खरोखरीच आवड असेल, तरच तें त्यानें हातीं घ्यावें. नाहीं तर जुलमाचा राम राम म्हणून त्यानें हातीं घेतलेलें काम त्याला अर्धवट सोडावें लागेल किंवा तें अपुरें सोडण्यास त्याला भाग पाडण्यांत येईल. म्हणूनच समाजसेवा करूं इच्छिणाराच्या अंगीं वरील गुण प्रथम असावयास पाहिजे, मग बाकीच्या साऱ्या गोष्टी.

समाजसेवा करतांना अनेक गोष्टी ध्यानांत ठेवाव्या लागतात. कोणतें काम जरूरीचें आहे, कोणतें जरा अवकाशानें केलें तरी चालेल, तसेंच आज एखादी गोष्ट केल्यानें तिचे परिणाम पुढें काय होतील, आज चांगली दिसली, तरी ती शेवटीं समाजाला बाधक होईल किंवा काय, आज थोडी कळ सोसावी लागली तरी पुढें तिचा त्रास होण्याचा किंवा पश्चात्ताप करण्याचा प्रसंग येऊं नये, अशा तऱ्हेनें अनेक गोष्टी समाजसेवकाला पहावयाच्या असतात आणि त्या साऱ्या धीरानें पण निश्चयानें पार पाडणारा समाजसेवक यशस्वी होतो.

एखादा समाजसेवक जसा एका संस्थेंत किंवा एका दिशेनें समाजसेवेचें काम करीत असतो. तसेंच दुसऱ्या संस्थातील किंवा दुसऱ्या दिशांनीं काम करणारे अनेक लोक असतात. आपल्या कामाला ज्याप्रमाणें आपण महत्त्वाचें समजतों. त्याचप्रमाणें इतर लोकहि आपल्या कामाला महत्त्वाचें समजतात; म्हणून एकानें दुसऱ्याचा द्वेष करणें किंवा दुसऱ्याचें काम कमी महत्त्वाचें समजणें कधींहि चांगलें नाहीं. प्रत्येकाला आपल्या परीनें आपलें काम महत्त्वाचें व अत्यंत आवश्यक वाटणें साहाजिकच असतें व तें एका दृष्टीनें खरेंहि असतें. एकमेकांच्या कामाची निंदा व हेवा न करतां दुसरे करीत असलेल्या कामांत त्यांना प्रसंगविशेषीं शक्य ती मदत देऊन प्रत्येकानें आपलें काम करीत राहावें, हेंच खऱ्या समाजसेवकाला योग्य आहे आणि सर्वांच्या हितांचें असतें.

ज्या लोकांत किंवा ज्यांच्याकरितां आपण काम करीत असूं त्यांचा विश्वास संपादन करणें, हें आपण हातीं घेतलेलें काम यशस्वी करण्याच्या दृष्टीनें फार महत्त्वाचें असतें. म्हणून तें कार्य यशस्वी करण्याकरितां आपण किती उत्सुक आहोंत, याची खात्री पटवून व आपली वागणूक सचोटीची व सरळ ठेवून लोकांचा विश्वास संपादन केल्यास अंगीकृत कार्य करण्यास पुष्कळ सोपें जातें.

समाजसेवकाला आपलें काम चालचलाऊ करून चालणार नाहीं. आपण हातीं घेतलेल्या कामाचें मूळ कोठें आहे त्याचा छडा लावण्यासाठीं त्यानें कसून प्रयत्न

केले पाहिजेत. आणि हें मूळ शोधून काढल्यानंतरच त्यावर उपाय योजले पाहिजेत. यांतच त्याच्या कार्याचें यश असतें.

समाजसेवकाला ज्या गोष्टींची विशेष आवश्यकता आहे, असें वाटलें त्यांचा उल्लेख वर केलेला आहे. पण त्याला एवढ्याच गोष्टींची आवश्यकता असते असें कोणी समजूं नये. कारण समाजांत नाना तऱ्हेचीं माणसें असतात आणि त्याला समाजांत सर्व तऱ्हेच्या माणसांशीं वागावयाचें असतें. म्हणून सर्व तऱ्हेच्या माणसांचा संबंध येणाऱ्या गोष्टींची त्याला ओळख असावी लागते. आतां सर्व समाजसेवकांत या साऱ्याच गोष्टी असतील असेंहि नाहीं. मनुष्यस्वभावाप्रमाणें त्या कमीजास्त असावयाच्याच. पण परोपकारवृत्ति, मनमिळाऊ स्वभाव, कामाची हौस त्यागी वृत्ति, चारित्र्य, प्रामाणिकपणा आणि तारतम्य एवढी सामुग्री तरी कोणाहि समाजसेवकाजवळ आरंभीं असणें आवश्यक आहे.

१७२२४
२७.१०
२२१११ ४०

# प्रकरण ५ वें

# दान

दुःखी प्राण्यांची सेवा करण्यांत ईश्वरसेवा होतच असते. त्या सेवेंत विवेक मात्र पाहिजे. भुकेलेल्याला अन्न देण्यांत सेवाच होते असें मानण्याचें कारण नाहीं. आळशी मनुष्य दुसऱ्याच्या आश्रयावर बसून राहील आणि अन्नाची आशा करील तर त्याला अन्न देण्यांत पाप आहे आणि काम करण्यास तो तयार नसल्यास उपाशी राहूं देण्यांत, त्याची सेवा आहे.

महात्मा गांधी

पूर्वीं आणि पुष्कळ अंशीं अजूनसुद्धां दान धार्मिक बुद्धीनें करण्यांत येतें. असें दान केल्यानें आपल्याला मुक्ति मिळेल व आपलें पाप नाहींसे होईल; म्हणून दान करणें, हें आपलें कर्तव्य आहे, असें समजून स्वर्गप्राप्तीच्या स्वार्थीबुद्धीनें दान करणारे लोकच बहुतेक आढळतील. दान घेणाराच्या दृष्टीनें दाते मुळींच विचार करीत नाहींत. साधारणपणें सर्व धर्मांत दानाची हीच कल्पना आढळते. जोंपर्यंत दान करतांना दान घेणाराचें हिताहित पाहाण्याऐवजीं दान देणाराच आपल्या वैयक्तिक हिताकडे अधिक पाहातो, तोंपर्यंत त्या दानापासून समाजाचें हित होणें शक्य नाहीं. जुनी दानाची कल्पना दानाच्या आधुनिक कल्पनांशीं जुळती नाहीं. कारण उपरिनिर्दिष्ट दानाचा परिणाम अनिष्ट होतो, त्यानें दान घेणारांची संख्या कमी होण्याऐवजीं उलट वाढते व त्यामुळें हे लोक समाज आहे तो पर्यंत असणारच, अशी लोकांची भ्रामक कल्पना होते. आपलें नांव आपल्या पाठीमागें चालावें म्हणून अन्नसत्रें किंवा सदावर्तें काढणारे लोक आणि आपली दानशूर वृत्ति लोकांना दिसावी; म्हणून खिशांत बऱ्याच पया ठेवून त्या रस्त्यानें भिकाऱ्यांना वाटीत जाणारे लोक, याच्यांत कोणत्याहि प्रकारें फरक नाहीं. या दोन्हीं प्रकारच्या लोकांत दात्याला अवश्य लागणारा स्वार्थत्याग, परोपकार-वृत्ति, समाजहितबुद्धि हीं नसतात. आपल्या स्वतःला लयलूट होऊन उरलेल्या संपत्तींतून दान करणारे किंवा आपल्याबरोबर संपत्ति नेतां येणार नाहीं म्हणून दान करणारे यांच्यांतहि वरील गुणांचा अभावच असतो. त्याचप्रमाणें एखाद्या माणसाच्या दीन स्थितीचा कळवळा येऊन भावनावश होऊन दान करणारे लोक, न्यायान्यायाचा विचार न करतां धनसंचय करीत असतां कैक लोकांच्या माना मुरगळल्यामुळें त्या अपकीर्तीवर पांघरून घालण्याकरितां किंवा त्या पापाचें क्षालन करण्याकरतां दान करणारे लोक किंवा लोकांनीं आपल्याला धर्मात्मे म्हणावें म्हणून दान करणारे

लोक या सर्वांचा वरील लोकांत समावेश करतां येईल. एकंदरींत त्यांनीं वरील कृतीमुळें समाजाचें हित करण्याऐवजीं अहितच केलें, असें विचारांतीं आपल्याला म्हणणें भाग पडेल. भिकारी आपल्यापुढें आला असतां त्याला तशी स्थिति येण्याला कोणतीं कारणें घडलीं व ती स्थिति जाऊन तो स्वाभिमानी, स्वावलंबी, कार्यप्रवृत्त होऊन पुनः भिकारी म्हणून दीनवृत्तीनें आपल्या दारांत येणार नाहीं, असें होण्याला काय केलें पाहिजे, याचा सर्व तऱ्हेनें विचार करून त्याप्रमाणें स्वतः प्रयत्न करणारा मनुष्य आणि उपनिर्दिष्ट दाते यांच्यांत महदंतर असतें.

## दान म्हणजे प्रेम

दानाचा मूळ अर्थ आपल्या बांधवांकरितां प्रदर्शित करावयाचें प्रेम असा आहे आणि सर्व प्रकारच्या समाजसेवेच्या मुळांशीं हेंच तत्त्व असावें लागतें. दान म्हणजे परमेश्वराशीं केलेली एक प्रकारची मैत्री होय, असें सी. एस. लॉक यांनीं एका ठिकाणीं म्हटलें आहे तें याच अर्थानें. हें तत्त्व म्हणजे समाजसेवेचा प्राण आहे, असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं; कारण ज्याच्यावर आपण प्रेम करतों तो निरंतर सुखी रहावा, प्रभावी व्हावा अशी आपली इच्छा असणें व त्याप्रमाणें आपण प्रयत्न करणें स्वाभाविक असतें. परंतु आतांपर्यंतची दानपद्धति आपण पाहिल्यास तींत या तत्त्वाचा मागमूसहि आपल्याला कोठें आढळणार नाहीं. कसें तरी दान करावयाचें, त्याचा दूरदृष्टीनें विचार करावयाचा नाहीं, अशी स्थितीच आपल्याला आढळेल.

समाज आहे तसाच राहाणार व त्यांत आंधळे अनाथहि असणार, इतकेंच नव्हे तर आंधळे अनाथ आहेत, म्हणूनच धनिकांना दान करावयास संधि मिळते, अशा प्रकारची विचारसरणी अजूनपर्यंत होती. दात्याला दान करतांना एक प्रकारचा आनंद होत असे आणि आपण गरिबांची कींव केली असें त्याला स्वाभिमानपूर्वक वाटे. आणि या परोपकाराबद्दल दान घेणारांनीं आपल्याला धन्यवाद द्यावे अशी त्याची मनापासून अपेक्षा असे. पण दान घेणारा अशा प्रकारें उतराई व्हावा अशी इच्छा करणें म्हणजे आपल्यांत खऱ्या मैत्रीचा अभाव आहे, असें दर्शविणें; इतकेंच नव्हे तर दान मागणाराच्या अवनतींत भर घालणें होय हें त्याच्या गांवींहि नसे. त्या काळचे दाते आपल्याला धन्य मानीत व आपण आहोंत म्हणूनच गरीब लोक वांचतात, असें त्यांना मनापासून वाटे. गोरगरीबांना उपदेश करण्यांत आणि त्यांना सद्गुणी व निर्व्यसनी होण्यास सांगण्यांत त्यांना आनंद वाटे. पण स्वतः उपदेशिलेल्या गोष्टी आपल्या स्वतःच्या अंगीं आहेत किंवा नाहींत; किंवा त्या आपण आचरणांत आणीत आहोंत किंवा नाहीं, हें पाहाण्याचा विचारच त्यांच्या मनाला शिवत नसे. उलटपक्षीं ईश्वराची आपल्यावर कृपा आहे, म्हणूनच तो आपल्याला भरपूर संपत्ति देतो, मन

मानेल त्याप्रमाणें वागण्याची आपल्याला त्यानें मुभा दिली आहे, असें त्यांचें मत असे. हीं मतें आजच्या काळांत कोणालाहि पटावयाचीं नाहींत हें सांगावयास नकोच.

## समाज सुधारकांचें साहाय्य

अशा प्रकारें दान करणें हिताचें नाहीं, उलट हानिकारक आहे, म्हणून ही दानाची कल्पना बदलली पाहिजे याची समाजामध्यें जाणीव होण्यास प्रथम समाजसुधारकांचे प्रयत्न कारणीभूत झाले. सुमारें शंभर वर्षांपूर्वी कै. लोकहितवादी व त्यानंतर कै. आगरकर यांनीं लिहिलेले लेख जर आपण पाहिले तर आपल्याला असें आढळून येईल कीं, दानाची व समाजसेवेची नवीन तत्त्वें लोकप्रिय होण्यास प्रथमतः यांच्याच लेखांचा पुष्कळ उपयोग झाला. या बाबतींत सुधारणेचा पाया त्यानींच घातला. उदाहरणार्थ कै. लोकहितवादी यांनीं ता. १९ नोव्हेंबर १८४८ रोजीं 'मानास व दानास पात्र' या मथाळ्याखालीं एक पत्र तत्कालीन 'प्रभाकर' पत्रांत लिहिलें होतें. त्यांत ते म्हणतातः–"मोठा धर्म आणि दान करावयाचें झालें म्हणजे हजारो भटांस जेवण घालितात. कोणी पांच हजार खर्च लावून देऊळ बांधितात. कोणी मनास येईल तसा पैसा टाकितात. त्यांस योजना नीट कळत नाहीं. काय म्हणे अमक्यानें एक लक्ष रुपये धर्मादायास टाकिले. त्यांपैकीं देवळास पन्नास हजार गेले, पंचवीस हजार ब्राह्मण भोजन, दहा हजार खर्च देऊन लग्नें केलीं. असा व्यय केला. हें पाहून मला वाटतें कीं, मूर्खपणाची हिंदु लोकांपुढें हद्द झाली ! हे दोन लाख रुपये जर नीट खर्च केले असते तर किती उपयोगी कामें झाली असतीं बरें ? किती दरिद्राचा ऱ्हास होता, किती ज्ञान व शहाणपण पटवायास येतें ? परंतु मातींत पैसा कितीही घातला तरी त्याचा कांहीं फायदा आहे काय ? माणसें ही जिवंत माती; त्यांस कांहीं सुखाचा उपयोग व्हावा तें टाकून मातीच्या शोभेंत द्रव्य खर्च करून काय उपयोग ? जर हिंदु लोकांस वास्तविक धर्म करावयाचा असेल तर इतकाच करावा कीं, जेणें करून लोकांचें अज्ञान दूर होईल, पुस्तकें व विद्या वाढतील व जेव्हां हे लोक आपल्या मूर्खपणाच्या मार्गांतून सुटतील तेव्हांच सुखवृद्धि होईल. आयुष्याचा उपयोग कसा करावा, आपला जन्म लोकांस कोणत्या प्रकारें उपयोगी करावा, आपण पृथ्वीवर होतों त्याची मागें स्मृति रहावी याविषयीं उपाय करावा, सारासार विचार करून ईश्वराचें भय बाळगावें व खरेपणा धरावा, हें कोणी पाहात नाहीं. धर्मात्मे लोक पुष्कळ आहेत व आम्ही धर्म फार केला असें ते म्हणतात. परंतु आंधळ्यास त्यानीं जेवावयास घातलें काय ? दुर्जनांस सुजन केलें काय ? कोणता परोपकार आपले लोकांमध्यें त्यांनीं केला ? कोणी म्हणतो मी वैशाखांत मडकीं दिलीं, आंवळे दिले. हा धर्म कशाचा ? हा मूर्खपणा आहे. भटांनीं वेड लावावें आणि

गृहस्थांनीं त्याप्रमाणें नाचावें. यजमानास सांगावें कीं, उष्णकाळीं क्षीरभोजन घालावें म्हणजे यजमान पुण्य जाणून तसें करितो. पण वास्तविक यामध्यें पुण्य पुण्य म्हणून ठकवितात इतकेंच आहे. वास्तविक पुण्य हेंच कीं, यथायोग्य पात्र पाहून धर्म करावा. तान्हेला आहे त्यास पाणी द्यावें. कुंभ भरून ब्राह्मणास दिला व त्यानें तो जातांना टाकून दिला. कारण त्याचे घरीं हौद आहे. मग त्याला यजमानाच्या कुंभांतील पाण्याचें काय करावयाचें आहे ? अर्थातच तो तें मडकें ओतून टाकतो. तेव्हां हा धर्म आहे, असें जे म्हणतात, ते मूर्ख नव्हत काय ? " दुसऱ्याहि अनेक समाजसुधारकांनीं या कार्यास हातभार लावला. याशिवाय गेल्या पन्नास वर्षांत मुंबईंतील समाजसेवासंघासारख्या संस्थांनीं दानपद्धतीला इष्ट वळण लावण्यासाठीं मतप्रचार व प्रत्यक्ष कार्य पुष्कळ केलें आणि त्याचा योग्य परिणाम होऊन आज लाखों रुपयांचें दान, शिक्षण वैद्यकीय मदत वगैरे समाजाला उपकारक होतील अशा गोष्टींसाठीं होत आहे, असें आपल्याला दिसून येईल.

## सार्वजनिक संस्था व खाजगी संस्था यांच्यांतील फरक

समाजांत अनेक कारणामुळें लोक विपन्नावस्थेला पोंचलेले असतात. कांहींची मानसिक स्थिति बिघडलेली असते, कोणी शरीरानें व्यंग असतात, कांहींचे कौटुंबिक संबंध बिघडल्यामुळें ते संकटांत असतात. आणि कोणी सांपत्तिक अडचणींमुळें हीन स्थितीला पोंचलेले असतात. अशा नानाविध दुःखांनीं विव्हळणाऱ्या, अडचणींत सांपडलेल्या माणसांना आपल्या परीनें साहाय्य करणाऱ्या व त्यांचें दुःख हलकें करण्याचा प्रयत्न करणाऱ्या अनेक संस्था जनतेच्या मदतीवर चाललेल्या असतात. या सर्वांना सार्वजनिक संस्था ( Public institutions ) असें म्हणण्याची व त्यांच्यावर सर्व लोकांचा हक्क आहे, असें मानण्याची पद्धत आहे. पण वस्तुतः त्यांच्यावर सर्वांचा हक्क असतो असें म्हणतां येणार नाहीं. कारण त्या खाजगी संस्था ( Voluntary institutions ) असतात. कांहीं ठराविक लोकांनीं, कांहीं ठराविक उद्देशानें, कांहीं ठराविक अटींवर, कांहीं ठराविक कार्य करण्यासाठीं त्या चालविलेल्या असतात आणि त्यांनीं निवडून दिलेलें कार्यकारी मंडळ त्यांची व्यवस्था पाहातें आणि त्या संस्थेच्या सभासदानांच फक्त तें जबाबदार असतें आणि या संस्था चालविणारांनीं घातलेल्या विशिष्ट अटी ज्यांना मान्य असतील, त्यांनांच त्या कार्याचा फायदा मिळावयाचा असतो. इतरांना त्यांचा फायदा घेतां येत नाहीं व त्यांच्यावर आपला कांहीं हक्क सांगतां येत नाहीं. ती सार्वजनिक संस्था आहे, वाटेल त्याला तिचा फायदा मिळाला पाहिजे असें म्हणून खऱ्या अर्थानें भांडतां येत नाहीं. उलटपक्षीं सरकारी कायद्यानें आणि सरकारी खर्चानें झालेली गरिबांची तरतूद, शाळांतील मुलांना फुकट देण्यांत येणारें दूध, धर्मार्थ दवाखानें, हॉस्पिटलें वगैरे संस्था खऱ्या सार्वजनिक

संस्था होत व त्यांच्यावर लोकांचा हक्क असतो; कारण संघटित समाजाचें जें प्रतिनिधि सरकार–त्यानें सर्व लोकांकडून कराच्या रूपानें वसूल केलेल्या पैशांतून त्यांची व्यवस्था केलेली असते आणि साऱ्या नागरिकांना तिचा उपयोग हक्कानें करून घेतां येतो. सरकारचा किंवा निमसरकारी संस्थांचा अशी कामें चालविण्यांत हेतु हा असतो कीं, ज्या लोकांना गरिबीमुळें स्वतः पैसे खर्च करून औषधोपचार करितां येत नाहीं व ज्यांना अशा प्रकारची धर्मार्थ मदत न मिळाल्यास त्यांचेंच नव्हे, तर पर्यायानें साऱ्या समाजाचें नुकसान होण्याचा संभव असतो त्यांना मदत मिळावी आणि ती सुद्धां कोणाची मेहेरबानी म्हणून नव्हे, कोणाचे उपकार म्हणून नव्हे, तर आपल्या हक्काची म्हणून मिळावी. * कांहीं धर्मार्थ संस्थांच्या बाबतींत दाते अमुक जातीचा, धर्माचा किंवा लोकांचा या संस्थेवर हक्क आहे असें आपल्या मृत्युपत्रांत लिहून ठेवतात, ही गोष्ट खरी; पण तो हक्क अगदीं खाजगी स्वरूपाचाच असतो तो सार्वजनिक हक्क नाहीं. कारण तसा राष्ट्राचा कायदा झालेला नसतो, तर फक्त दात्याची तशी इच्छा असते.

## दान व समाजसेवा यांमधील भेद

दानाला आपल्याकडे अगदीं पुरातन काळापासून फार महत्त्व दिलेलें आहे आणि दान म्हणजे ज्याच्याजवळ जें नाहीं, तें त्याला ज्याच्याजवळ तें आहे त्यानें ‘समानत्वा’नें वांटून देणें असें मानण्यांत आलें आहे. या अर्थानें तें समाजसेवेचेंच एक अंग आहे असें मानणें योग्य होईल. तथापि दान आणि समाजसेवा यांच्यांतील भेद लक्षांत ठेवणें आवश्यक आहे. समाजसेवा ( social service ) म्हणजे स्वतः जातीनें केलेली सेवा होय; मग त्या वैयक्तिक सेवेशिवाय त्या माणसानें दुसऱ्या कांहीं देणग्या दिलेल्या असोत वा नसोत. पण दान ( charity ) म्हटलें म्हणजे पैसा, अन्न वस्त्र इत्यादि गोष्टींचेंच होय. त्यांत व्यक्तीच्या वेळेचा, श्रमाचा किंवा विचारांचा स्वार्थत्याग नसतो. ती नुसती देणगी असते.

समाजसेवेंत जें कार्य करण्याची आवश्यकता असेल त्यासंबंधीं विचार करणें; त्याची योजना तयार करणें व ती अमलांत आणणें हें सारें प्रत्यक्ष करावयाचें असतें; तें दुसऱ्यावर सोपवितां येत नाहीं. पण दानांत तें सामान्यतः दुसऱ्यावर सोपवितां येतें. एखादा मनुष्य आजारी पडलेला, दारिद्र्यानें गांजलेला किंवा अशाच प्रकारच्या

---

* English Social Services–Methods and Growth by Emmeline W. Cohen, P. 2–5.

Voluntary Social Services:—Their place in the modern State by A. F. C. Bourdillon.

दुसऱ्या एखाद्या आपत्तीमुळें अगदीं निराश झालेला असेल आणि त्याची ती केविलवाणी स्थिति पाहून त्याला कोणी पैसे देईल व 'आज आपण त्याच्या फार उपयोगी पडलों' असें मनाचें समाधान करून परत घरीं येईल. पण आपण त्याला दिलेली रक्कम त्या स्वरूपांत त्याला देण्याची जरूरी होती काय ? ती त्याच्या कितीशी उपयोगी पडेल, तिचा तो कशा रीतीनें उपयोग करील व त्याचें खरोखरी हित होईल अशा रीतीनें तो ती रक्कम खर्चील काय, वगैरे विचार करण्याच्या भरीस तो मुळींच पडत नाहीं. तो विचार करण्याची कल्पना त्याच्या मनाला शिवतसुद्धां नाहीं. म्हणून तींत समाजसेवेचा थोडासा भाग असला, तरी तें नुसतें दानच होय. अशा देणगीनें जें काय मिळतें ते मनाचें समाधान. पण समाजसेवा म्हणजे अशी क्षणिक प्रेरणा किंवा स्फूर्ति नव्हे. स्वतःचें शरीर झिजवून–दुसऱ्याकरितां शारीरिक व मानसिक श्रम करून दुसऱ्याची ऐहिक सुधारणा करण्याकरितां प्रयत्न करणें म्हणजेच समाजसेवा होय. तींत स्वार्थाला जागा नाहीं. म्हणूनच समाजसेवेचें महत्त्व मोठें मानण्यांत येतें. आपण जें काय जातीनें करूं तें पैसा करूं शकत नाहीं आणि म्हणूनच समाजसेवेपुढें दानाचें महत्त्व फारसें नाहीं.

समाज कितीही स्वावलंबी असला तरी अशा समाजांतसुद्धां कांहीं व्यक्ति केव्हां ना केव्हां परावलंबी होतातच. आणि अशा वेळीं त्या लोकांचें काय करावयाचें हा मोठा बिकट प्रश्न समाजापुढें असतो. एक तर त्यांच्याकडे सर्वस्वी दुर्लक्ष करण्यांत येतें किंवा संघटित समाज त्यांना हक्कानें मागतां येईल अशी कांहीं तरी व्यवस्था करतो किंवा समाजांतील परोपकारी माणसांकडे त्यांची व्यवस्था सोंपविण्यात येते. रानटी समाजांत आजारी, अधू, वयातीत अशा माणसांची कांहींच व्यवस्था नसते. त्यांना प्रसंग येईल त्याप्रमाणें तोंड द्यावें लागतें. कित्येकदां तशाच स्थितींत ते मृत्यु पावतात किंवा त्यांना बुद्धया मारण्यांतहि येतें. आणि हें कृत्य मोठें परोपकाराचें समजतात. कांहीं समाजांत तेथील परोपकारी व्यक्ति व्यक्तिशः किंवा संघटित प्रयत्नानें या परस्वाधीन लोकांची व्यवस्था करतात. परंतु अलिकडील समाजांत या परोपजीवी माणसांची व्यवस्था करण्याच्या बाबतींत सामान्यतः मिश्र पद्धतीचा अंगीकार केलेला आढळतो. समाजांतील अशा कांहीं लोकांकडे सर्वस्वी दुर्लक्ष करण्यांत येतें, कांहीं लोकांना धर्मदाय संस्थांकडून साहाय्य मिळतें आणि कांहींची व्यवस्था सरकार किंवा नगरपालिका किंवा दोन्हीं मिळून करतात. परंतु अशा प्रकारचीं कामें समाजाच्या वतीनें म्हणून स्वतः सरकारच आतां हळूहळू करूं लागलें आहे.

खाजगी प्रयत्नांनीं चाललेल्या आपल्याकडील अनेक संस्थांत लाखों रुपयांचा अनाठायीं व्यय होतो, असें अन्नसत्रें, सदावर्तें व तशाच दुसऱ्या कांहीं संस्था यांचे व्यवहार पाहून मोठ्या दुःखानें म्हणावें लागतें. या संस्था अनिष्ट गोष्टींची कारणमीमांसा मुळींच

न करितां फक्त त्यांच्या परिणामाकडे लक्ष देतात, त्यामुळें मूळ अनिष्ट गोष्टींना आळा तर नाहींच पडत; पण शुद्ध हेतूनें केलेले हे प्रयत्न मात्र व्यर्थ जातात. इतकेंच नव्हे तर अशा अनिष्ट गोष्टींना उलट त्यांची इच्छा नसतांनाहि उत्तेजन मिळतें. याचें मुख्य कारण असें कीं, हा पैसा गरिबांच्या स्थितीचा केवळ कळवळा येऊन फारसा विचार न करितां, भावनावश होऊन दिलेला असतो व त्याचा व्ययहि अविचारानेंच करण्यांत येतो.

त्याचप्रमाणें कांहीं संस्थांचें कार्य मूळ दात्याच्या इच्छेप्रमाणें चालत नाहीं, प्रत्यक्षांत कांहीं कार्यच करण्यांत येत नाहीं किंवा जें काय थोडें कार्य करण्यांत येतें तें व्यवस्थित रीतीनें करण्यांत येत नाहीं, पैशाचे व्यवहार नीट होत नाहींत, हिशोब नीट ठेवले जात नाहींत. या सार्‍या गोष्टींना आळा घालावा म्हणून मुंबई सरकारनें नुकताच मुंबई सार्वजनिकविश्वस्तनिधिकायदा ( Bombay Public Trusts Act ) पास केला आहे. त्याचा हेतु स्तुत्य आहे. पण ‘ सुक्याबरोबर ओलें जळतें ’ म्हणतात, त्याप्रमाणें वर्षानुवर्षें आपले व्यवहार सर्व तर्‍हेनें चोख ठेवणार्‍या बहुसंख्य धर्मार्थ संस्थांना तो त्रासदायक होईल किंवा काय, अशी पुष्कळांना साधार भीति वाटत आहे विशेषतः या कायद्याची अंमलबजावणी करणार्‍या खात्याच्या खर्चाकरतां जी रक्कम या संस्थांकडून वसूल करण्यांत येत आहे ती म्हणजे या संस्थांवर टाकलेलें एक निष्कारण ओझें आहे. थोड्या संस्थांतील व्यवहाराच्या गोंधळाबद्दल आपले व्यवहार चोख ठेवणार्‍या संस्थांना हा निष्कारण दंड आहे. अशा प्रकारच्या संस्थांचे व्यवहार चोख असावेत हें कोणीहि नाकबूल करणार नाहीं. पण त्यांच्या गैरवर्तणुकीबद्दल इतर चांगल्या संस्थांना शिक्षा करणें म्हणजे चोराबरोबर निरापराधी संन्याशालाहि शिक्षा करणें होय असें झाल्यास आधींच आपल्या जमाखर्चाची तोंडमिळवणी करतां करतां मेटाकुटीस आलेल्या धर्मार्थ संस्थांवर अधिक ओझें लादून त्यांना निरुत्साही करण्यासारखें होईल.

## धार्मिक कल्पनांचा दानावर पगडा

दानाच्या कल्पना धर्माच्या कल्पनेबरोबरच वाढत असतात. समाजाच्या अगदीं रानटी अवस्थेंत मनुष्याच्या ठिकाणीं विचारशक्ति व सयुक्तिकपणाची जाणीव उत्पन्न झालेली नसल्यामुळें त्याला जरा कांहीं कोठें चमत्कारिक दिसलें कीं त्याबद्दल त्याच्यांत आदर उत्पन्न होतो. ‘ चमत्कार तेथें नमस्कार ’ अशी आपल्यांतहि एक म्हण आहे. एखाद्या डोंगराचा किंवा दगडाचा आकार चमत्कारिक दिसला कीं त्याचा परिणाम लोकांवर झालाच म्हणून समजावा. त्याच्याविषयीं नाना प्रकारच्या आश्चर्यकारक दंतकथा लोक बोलूं लागतात. एखादा गुळगुळीत असा दगड दिसला कीं त्याची देव म्हणून लोक पूजा करूं लागतात. कांहीं तरी नेहमींपेक्षां वेगळें दिसलें कीं तें मोठें आहे, अशी या मनःस्थितींतल्या

लोकांची कल्पना झालीच! अशा रीतीनें अत्यंत रानटी स्थितींतील मनुष्य दगड, माती, नदीनाले, दरीखोरीं इत्यादि निर्जीव व सामान्य पदार्थ, वड-पिंपळ, आंबा फणस इत्यादि सजीव सामान्य वनस्पति; गाय बैल, कोंबडा, कावळा इत्यादि सामान्य पशुपक्षी; सर्पादि विषारी व दुष्ट जीवजंतु; सारांश, नेहमीं दृष्टीस पडणाऱ्या व त्याच्या जवळपास असणाऱ्या सर्व सजीव निर्जीव कोटींतील वस्तुजात तो देव मानूं लागतो. लोकांच्या कल्पनेंतील हीं स्थित्यंतरें धार्मिक दृष्टीनें फार महत्त्वाचीं मानलीं जातात; कारण माणसांत कांहीं तरी जागृति झाल्याचें, कांहीं तरी आपल्यापेक्षां वेगळें; पण मोठें आहे अशी भावना होऊं लागल्याचें तें द्योतक असतें. वस्तुतः तो केवळ दगड किंवा डोंगर असतो. त्यापेक्षां त्यांत कांहीं विशेष नसतें. परंतु त्यांत कांहीं तरी विशेष आहे असें मनुष्य समजूं लागतो, ती वस्तु नाहींशी झाली तर तो अस्वस्थ होतो, कांहींतरी आपलें चुकलें असें त्याला वाटूं लागतें. आपली भरभराट होणें वा न होणें त्या वस्तूंच्या हातीं आहे अशी त्याची कल्पना होते. व त्याकरितां तो त्याला नवस करितो आणि शत्रूचें अकल्याण व्हावें अशीहि याचना करण्यास कमी करीत नाहीं. कांहीं नफानुकसान झालें तरी त्याचा दोष त्या वस्तूच्याच माथीं मारतो. ती वस्तु अशा रीतीनें त्याच्या दैवाची धनी होते. यामुळें स्वतःच्या व्यतिरिक्त दुसऱ्या वस्तूंच्या शक्तीवर माणसाचा विश्वास बसतो ही गोष्ट सिद्ध होते. दगडांडोंगरांना देव मानणें, म्हणजे आपल्यापेक्षां वेगळें पण आपल्यापेक्षां शक्तिमान्, असें कांहीं तरी दुसरें आहे याची जाणीव असल्याची साक्ष होय. निर्जीव वस्तूच्या मागून मनुष्य सजीव वस्तूकडे वळतो. दगडधोंड्यांचा नाद सोडून मनुष्य झाडामाणसांना देव मानूं लागतो. मग त्याला भुतेंखेतें दिसतात. पुढें आपल्या कल्पनेप्रमाणें तो वेगवेगळाले देव मानूं लागतो. सजीव वस्तूंना देव मानतां मानतां तो निसर्गाशीं तादात्म्य पावूं लागतो. त्याच्या विचाराचें याप्रमाणें स्थित्यंतर होतां होतां पुढें त्याला सर्वसाक्षी, सर्वव्यापी, परमेश्वर एकच असावा असें वाटतें व शेवटीं सर्व शक्तिमान् परमेश्वर व आपण यांत भेद नाहीं, दोघेहि एकच आहों, अशी त्याची खात्री पटते. या धार्मिक कल्पनांचा माणसाच्या नीतीवर व सामाजिक राहाणीवर फार मोठा परिणाम होतो. या विचारांना अनुरूप अशी त्याची वागणूक असते व दानधर्मादि गोष्टी त्या त्या वेळच्या धार्मिक कल्पनांप्रमाणें होत असतात.

बौद्ध धर्माच्या पूर्वी समाजसेवेचीं कामें चालत असल्याची माहिती उपलब्ध नाहीं. बौद्ध धर्माच्या काळीं विशेषतः अशोकाच्या व त्यानंतरच्या राजांच्या कारकीर्दींत समाजसेवेचीं कामें-शिक्षण, औषधोपचाराची व्यवस्था, धार्मिक शिक्षण वगैरे—भिक्षूंनीं व जैन धर्माच्या यतींनीं ठिकठिकाणीं मठ स्थापन करून चालविलीं. हे तत्कालीन मठ म्हणजे हल्लींच्या समाजसेवकांच्या वसाहतींप्रमाणेंच होते. यानंतर

अशा प्रकारचीं कामें चालत असल्याचा उल्लेख कोठें नाहीं. बौद्ध धर्मानंतर अशाच प्रकारचे मठ अस्तित्वांत होते, पण सर्वसंगपरित्याग करून आत्मिक उन्नति करण्या-करितां आलेल्या संन्यासी लोकांची राहाण्याची व खाण्याजेवणाची तेथें व्यवस्था होत असे. परंतु पुढें ह्या मठांची व्यवस्था पहात असलेल्या संन्याशांनींच ती आपली स्वतःची मिळकत आहे असें जाहीर करून ते आपल्या ताब्यांत घेतले आणि यांपैकीं कांहीं मठ अनीतीचीं आगरें झालीं. हिंदु धर्माची अवनति होऊं लागली. यज्ञयागादि गोष्टींना अभूतपूर्व महत्त्व देण्यांत येऊं लागलें आणि प्रत्येक जण आपलें उपास्यदैवत वेगळें असें मानूं लागला. आणि लोकहिताकरितां (social welfare) खर्च व्हावयाचा पैसा वरील प्रकारच्या धार्मिक बाबींकडे खर्च होऊं लागला लोकांच्या धार्मिक कल्पना अशा रीतीनें बदलल्यामुळें दानाची दिशाहि बदलली आणि दान-धर्महि त्या कल्पनांना अनुसरून होऊं लागला. हल्लींचीं अन्नसत्रें आणि सदावर्तें हीं ह्या धार्मिक बुद्धीनें केलेल्या दानाचा शेष राहिलेला भाग होय.

## विश्वस्तनिधींचें उपयुक्त कार्य

आज समाजसेवेच्या कल्पना बदलत चालल्या आहेत त्याप्रमाणें दानपद्धतीच्या कल्पनांतहि बदल होऊं लागला आहे. अमेरिकेंतील एक कोट्याधीश अँड्रू कार्नेजी यांनीं जेव्हां कार्नेजी विश्वस्तनिधीची स्थापना केली तेव्हां लक्षाधीश हा राष्ट्रीय संपत्तीच्या एका भागाचा तात्पुरता विश्वस्त असतो, आपल्या आयुष्यांत त्यानें उत्पादन वाढवून राष्ट्रीय संपत्तींत भर घालावी हें योग्यच; पण मग ती संपत्ति समाजाची प्रगति आणि सुख यांची वाढ होईल, अशा रीतीनें खर्च होण्यासाठीं समाजाच्या स्वाधीन करावी, असें म्हटलें होतें. आजहि अशा विश्वस्तनिधींच्या मागें खाजगी संपत्ति समाजाच्या हितासाठीं खर्च करावी ही एकच भावना मुख्यतः असते. सामाजिक संशोधनासारख्या परोपकाराच्या कार्याला साहाय्य करणारे विश्वस्तनिधी ( foundations ) अमेरिकेंत ५०५ आहेत. त्यांचें भांडवल सुमारें दोनशें कोटी डॉलर्स आहे. हा पैसा अगदीं सुरक्षित ठिकाणीं गुंतविण्यांत आलेला असून या भांडवलावर जें व्याज मिळतें त्यांतून शिक्षण, आरोग्य, विज्ञान यांचें संशोधन करणें आणि मुख्यतः मानवी जीवन आणि संबंध अधिक सलोख्याचे आणि सुखाचे करणें अशा सामाजिक कार्यासाठीं खर्च करण्यांत येतो.

सामान्यतः वैयक्तिक दुःख तात्पुरतें कमी करण्याकडे या पैशाचा विनियोग करूं नये अशा नियमाची तरतूद या मोठ्या विश्वस्तनिधींत असते. समाजाला कमकुवत करणाऱ्या व त्याच्या जीवनाचा बिघाड करणाऱ्या गोष्टींचीं कारणें कोणतीं आहेत व त्यांचा प्रतिकार कोणत्या मार्गांनीं करतां येईल याचा अभ्यास व संशोधन करून ते मार्ग प्रत्यक्ष कृतींत आणण्याचा प्रयत्न करणाऱ्या कार्याला ते साहाय्य करतात त्यामुळें

शैक्षणिक व अशाच प्रकारचीं तात्पुरत्या स्वरूपाचीं कामें करणाऱ्या संस्था करूं शकणार नाहींत आणि ज्यांचें कार्य अल्पकाळांत फलदायी होण्यासारखें नाहीं अशा शास्त्रीय संशोधनांत पुढाकार घेणाऱ्या कार्याला मदत करणें हा या निधींचा उद्देश असतो. ज्यांच्या योगें मानवी संबंध अधिक सुखावह होतील अशा क्षेत्रांतील संशोधनकार्याला हातभार लावून शिक्षण, आरोग्य-वैद्यकीय शिक्षण व औषधाचें संशोधन-आणि दुसरीं समाज हिताचीं कार्यें यांना महत्त्व व उत्तेजन देणें हा या निधींचा मुख्य हेतु असतो. धी रसेलसेज फाऊंडेशन, धी फॉल्क, ग्रँट आणि हेन्स फौंडेशन्स, विकिंग फंड आणि वीस कोटी डॉलर्स भांडवल असलेला वर्तमान विश्वस्तनिधींत जास्त वजनदार असा फोर्ड फौंडेशन यांनीं आपलें सारें लक्ष मानव आणि त्यांचे सबंध या सर्वांत महत्त्वाच्या प्रश्नावर एकाग्र करण्याचें ठरविलें आहे[१]. यांपैकीं फोर्ड फौंडेशनचें भारताला आज प्रत्यक्ष महत्त्वाचें साहाय्य होत आहे. अमेरिकेंत समाजशास्त्राच्या अभ्यासाला असें पैशाचें पाठबळ असल्यामुळें त्याची प्रगति होऊन तेथील जनतेचें जीवनमान वाढण्याला त्याचा चांगला उपयोग झाला आहे.

आपल्याकडेहि विश्वस्तनिधि थोडे आहेत असें नाहीं, पण त्यांच्यापैकीं बहुतेकांची दृष्टि मात्र अत्यंत कोती असते, असें मोठ्या दुःखानें म्हणावें लागतें. एक तर समाजांतील दुःखांचा अगदीं मूलभूत विचार करून तें दुःख मुळांतच नाहींसे करण्याची प्रवृत्ति फारशी नाहीं. आणि दुसरें असें कीं, देणगीचा-दानाचा पैसा आपली लहानशी जात, पोटजात किंवा समाज यांच्याकरितांच खर्च करण्याची वृत्ति आपल्यांत फार आहे. खरें पाहिलें तर धनशेटींनीं हा जो पैसा मिळविलेला असतो तो त्यांच्या लहानशा विशिष्ट जातीकडून, पोटजातीकडून किंवा समाजाकडून मिळविलेला नसतो. आपल्या उद्योगधंद्याशीं ज्या एकंदर समाजाचा संबंध आलेला असतो, त्या एकंदर जनतेकडून त्यांनीं हा पैसा मिळविलेला असतो आणि म्हणूनच त्याचा उपयोगहि एखादी लहानशी जात, पोटजात किंवा एखादा विवक्षित समाज यांच्यासाठीं होतां कामा नये. तो एकंदर जनतेकडून मिळविलेला पैसा एकंदर जनतेच्या कल्याणासाठीं खर्च झाला पाहिजे. सर्वसाधारण जनतेकडून पैसा मिळवावयाचा आणि त्याचा फायदा मात्र एक विवक्षित जात, पोटजात किंवा समाज यांना द्यावयाचा म्हणजे जणुं एकंदर समाजाशीं जसा काय आपला कांहीं संबंधच नाहीं ! ही आप्पलपोटी वृत्ति अत्यंत तिरस्करणीय होय. आणि ही मदतसुद्धां त्या आपल्या अल्पसंख्यांक जमातीचें खरें हित कशांत आहे, याचा फारसा विचार न करतां केवळ आपली प्रतिष्ठा वाढविण्यासाठीं किंवा नांव होण्यासाठीं केलेली असल्यामुळें तिचा पुष्कळदां दुरुपयोगच होतो.

---

१ Roger Girod in social progress and organisation of social Research (International Labour Review. Vol. LXV, No. 5, May 1952.)

एकंदर मानवी समाजाचें हित तर राहोच पण निदान आपली जात, पोटजात, समाज किंवा धर्म यांच्यापुढें जाऊन एकंदर समाजाला त्याचा उपयोग होईल आणि तोहि तात्कालिक दुःख नाहींसे करण्याकरितां नव्हे; तर समाजाचें कांहींतरी खरें चिरकाल टिकणारें कल्याण होईल अशा प्रकारचें साहाय्य करणारे विश्वस्तनिधि आपल्याकडे अगदींच अपवाद म्हणून आढळतील. नाहीं म्हणावयास वर निर्दिष्ट केलेल्या अमेरिकेंतील विश्वस्तनिधींप्रमाणें आणि विश्वव्यापी नसले तरी तशाच प्रकारचे कांहीं विश्वस्तनिधी मुंबईंतील प्रसिद्ध टाटा कुटुंबियांनीं स्थापन केलेले आहेत. सबंध भारतांत कोठेंहि मोठी आपत्ति आली कीं न मागतांहि प्रथम मदत या निधींतून जाते. जातधर्म यांचा विचार न करतां समाजसेवेचें कार्य करणाऱ्या अनेक संस्थांना वेळोवेळीं त्यांतून साहाय्य मिळतें. कैलासवासी श्री. कस्तुरबा गांधी यांच्या स्मरणार्थ स्थापन झालेला ‘ धी कस्तुरबा गांधी राष्ट्रीय स्मारक निधि ’ हाहि असाच एक मोठा राष्ट्रीय कार्य करणारा निधि आहे. त्यांतून आज ८१ ग्राम–सेविका-केंद्रें व शिक्षणकेंद्रें, १३६ वैद्यकीय केंद्रें, २०६ ग्रामसेवाकेंद्रें सबंध देशांत चालू आहेत. भारताच्या आजच्या बदललेल्या परिस्थितींत दानाच्या बाबतींतील कूपमंडूक वृत्ति नाहींशी होऊन व्यापक दृष्टीनें चालविले जाणारे विश्वस्तनिधि अधिकाधिक निर्माण होणें निकडीचें आहे.

# प्रकरण ६ वें

# धर्मादाय संस्थांची संघटना.

' राजकीय, धार्मिक व सामाजिक स्थित्यंतरें, आपल्या समाजाची पुराणप्रियता, वृत्तिच्छेदाची भीति, धर्मादायाची कल्पना, धौताल कारभार आणि मागणाराची चिकाटी, स्वाभिमानशून्यता, व सतरा सोंगें करून धान्य, पैसा अगर वस्त्र उकळण्याची शिताफी ज्यांना माहित आहे, त्यांना हें सांगण्याची गरज नाहीं कीं, गांवें उकळून खाणारांची संख्या कित्येक शतकांपासून सारखी वाढतच आहे. '

**गांव-गाडा.**

धर्मादायसंस्थांच्या कार्याची व्याप्ति किती विस्तृत आहे, धर्मादाय करणाऱ्या संस्था कशा अगणित आहेत, एकच कार्य अनेक संस्था स्वतंत्र रीतीनें करीत असल्यामुळें व त्यांचा परस्परांशीं संबंध नसल्यामुळें कांहीं ठिकाणीं कशी अनावश्यक मदत केली जाते, कांहीं ठिकाणीं ती हवी असते त्यापेक्षां उगाच अधिक मदत दिली जाते आणि कांहीं बाबतींत कायमची मदत हवी असतां तात्पुरती दिली जाते, हें मागील भागांत आलेलें आहे. धर्मादायाचा हा अनाठायीं विनियोग कैक वर्षें असाच चाललेला आहे. याशिवाय कोणत्या ना कोणत्या रीतीनें दान करणाऱ्या शेंकडों जातिविशिष्ट संस्था आहेत. आणि या संस्था परस्परांशीं फटकून वागत असल्यामुळें दानाच्या बाबतींत जो कांहीं गोंधळ माजलेला आहे तो सांगण्याची सोय नाहीं. कोणत्याहि दृष्टीनें मदतीला अपात्र पण युक्तिबाज अशी व्यक्ति आपल्या जातींतील दोनदोन तीनतीन संस्थांकडून परस्परांची परस्परांना माहिती न देतां मदत घेते, इतकेंच नव्हे तर पुनः सार्वजनिक संस्थांतूनहि तिला सहज मदत मिळते, अशीं कैक उदाहरणें आढळतील. आणि मूठभर लोकसंख्या असणाऱ्या जातींत जर हा सांवळा गोंधळ आणि पैशाचा अपात्रीं व्यय, तर मग सार्वजनिक संस्थांनीं काय करावें ?

आधुनिक दानाचा हेतु दान घेणारांची संख्या वाढावी हा नसून उलट-पक्षीं ती कमी व्हावी, तिला उत्तेजन मिळूं नये इतकेंच नव्हे ती मुळीं नाहींशीच व्हावी असा असतो. दानानें दान घेणारांची संख्या कमी होण्याऐवजीं जर वाढत असेल तर हल्लींच्या विचारसरणीप्रमाणें तें खरोखरी दानच नव्हे, उद्योगी माणसांना आळशी करण्याकरितां ती लालूच आहे, असें म्हणावें लागेल. दान घेणाऱ्या विपद्ग्रस्तांची संख्या जर कमी करावयाची असेल तर त्यांना विपन्नावस्था येण्याचें कारण काय, ती नाहींशी करण्याकरितां कोणते उपाय चालू

आहेत, त्यांचा इष्ट परिणाम होत आहे किंवा नाहीं आणि होत नसल्यास त्यांत कोणत्या प्रकारची सुधारणा झाली पाहिजे याचा विचार व्हावयास हवा. अशा प्रकारच्या चौकशीच्या अभावीं अपात्रीं दान होत असल्याचें एकच ढोबळ उदाहरण घ्यावयाचें असल्यास मागील प्रकरणांत उल्लेखलेल्या अन्नसत्रांचें आणि सदावर्तांचें घेतां येईल. वस्तुतः या संस्थांच्या उत्पादकांचा हेतु निरुद्योगी लोकांना अधिक आळशी करण्याचा होता असें म्हणतां येणार नाहीं. परंतु दानाच्या तत्कालीन कल्पनेप्रमाणें त्यावेळीं हा मार्ग योग्य दिसला, तथापि आज व्यसनी, आळशी, भामट्या लोकांना अधिक दुर्व्यसनी करण्याला या संस्था कारणीभूत होत आहेत यांत मुळींच संशय नाहीं. मुंबई शहरांत अशीं अन्नसत्रें व सदावर्तें दहावीस आहेत आणि काशीपासून रामेश्वरपर्यंत सर्व हिंदुस्थानभर प्रत्येक क्षेत्रांत त्या क्षेत्राच्या माहात्म्याप्रमाणें कमी जास्त अन्नसत्रें व सदावर्तें आहेत. मुंबईच्या अन्नसत्रांत डोकीवरील केंस वाढवून साधू झालेले ढोंगी लोक राहोतच परंतु धडधाकट वाटसरू व दुसरे घटिंगण लोक कधीं कधीं सहकुटुंबसुद्धां वेळाशक शिरून तिथें जेवतात व आंधळे, पांगळे, व्याधिग्रत लोक जागेच्या अभावीं बाहेर राहून या लोकांचीं उष्टीं चाटतांना नेहमीं दिसतात. येथें आणखी एक विशेष गोष्ट दिसते ती ही कीं, ह्या अन्नसत्रांचें व सदावर्तांचें काम यंत्राप्रमाणें चालतें. तेथें अनाथ अपंगांची कींव येऊन भावनावशतेनें केलेलें दानहि दिसत नाहीं, तर नुसती दानाची क्रिया दिसते. तेथें स्वकष्टानें चरितार्थ चालविण्याचें त्राण न राहिल्यामुळें पराधीन झालेल्या भिकाऱ्यांना दोन प्रहारच्या वेळीं अन्नाचे दोन घांस घालण्याची इच्छा न दिसतां सशक्त आणि मदतीला अपात्र अशा लोकांना सरसकट अन्न वाढलेलें दिसतें. शिवाय कोणत्याहि प्रकारची देखरेख नसल्यामुळें अन्नसत्रांच्या व सदावर्तांच्या व्यवस्थेंत दुसरे अनेक प्रकारचे घोटाळे असतात ते वेगळेच.

## अपात्रीं दानाचा परिणाम

या अपात्रीं दानाचा परिणाम असा होतो कीं, राष्ट्रांतील पराधीन लोकांची संख्या कमी करण्याचा व असहाय लोकांना मदत देण्याचा जो दानाचा मुख्य हेतु तो तर तडीस जात नाहींच, पण उलट दानपात्र लोकांस दान न मिळतां दानास सर्वस्वी अपात्र अशा लोकांना मात्र तें मिळतें व त्यायोगें उद्योग करून उपजीविका करण्यासारखे पुष्कळ लोक कामधंदा करीनासे होतात व अशा धर्मादाय संस्थांचे कायमचे आश्रित होतात. यामुळें परोपजीवि माणसांची संख्या थोडथोडी वाढतच जाते व भिक्षा मागणें हा एक धंदाच होतो. पात्रापात्रतेचा विचार न करतां अशा प्रकारें दान एकदां सर्वांस मिळूं लागलें म्हणजे आळशी, निरुद्योगी लोकांची संख्या समाजांत सारखी वाढूं लागते आणि कालांतरानें हें अरिष्ट साऱ्या समाजाच्या

नाशाला कारणीभूत होतें. याचें उत्तम उदाहरण म्हणजे रोमचें देतां येईल. रोममध्यें धान्याची महागाई झाल्यामुळें गरीब लोकांचे हाल होऊं नयेत म्हणून गरिबांना प्रथम स्वस्त भावानें धान्य देण्यांत येऊं लागलें. पुढें फुकट धान्य देण्यांत येऊं लागलें आणि त्यानंतर धान्याबरोबर तेल व दारूहि फुकट देण्यांत येऊं लागली, इतकेंच नव्हे तर सरकारी पैशानें गरिबांना सर्कशी व नाटकेंतमाशेहि दाखविण्याची व्यवस्था करण्यांत आली. याचा परिणाम असा झाला कीं, फुकट खाणारांची संख्या अपरिमित वाढली आणि रोमन साम्राजाच्या ऱ्हासाला तें एक मुख्य कारण झालें असें म्हणतात. फुकट खाणारांचा इतका सुळसुळाट होण्याला एक असें कारण झालें कीं, हें सारें दान परोपकार बुद्धीनें करण्यांत येत होतें असें नाहीं, तर जो राजकीय पक्ष सत्ताधारी असेल तो लोकांनीं बंड करून आपली सत्ता उलथून पाडूं नये व आपली लोकप्रियता वाढावी, याकरितां राष्ट्राच्या किंवा गरिबांच्या हिताहिताचा विचार न करितां अविचारानें हा पैसा खर्च करीत असे.

## धर्मादाय संस्थांची संघटना करण्याचे प्रयत्न

आपापल्या राजकीय पक्षांची सत्ता अबाधित राहाण्याकरितां दान होत नसलें; तरी दानाच्या बाबतींत वरील सारखीच परिस्थिति असतांना धर्मादाय संस्थांची संघटना करून दानपद्धतींतील दोष नाहींसे करावे, विपन्नावस्थेस पोंचलेल्या लोकांची स्थिति सुधारावी, धर्मदायासंबंधींच्या योग्य कल्पनांचा फैलाव करावा, पात्रापात्र पाहून दान करणारा एक स्वतंत्र वर्ग उत्पन्न करावा आणि योग्य विचार करून प्रत्येकाला शक्य तितकी चांगली मदत मिळावी व दान मागणाऱ्या भिक्षेकऱ्यांची संख्या कमी कमी करीत आणावी, म्हणून एक धर्मदाय संस्थांची संघटना करणारी संस्था ( Charity Organisation Society ) इंग्लंडमध्यें स. १८६९ मध्यें स्थापन झाली. या संस्थेच्या संस्थापकांच्या लवकरच लक्षांत आलें कीं, या धर्मादाय संस्थांत मुख्य वाईट गोष्ट ही आहे कीं, त्यांना शिस्त नाहीं आणि परस्परांशीं स्पर्धा करणाऱ्या अनेक संस्था असल्यामुळें दान जरूरीपेक्षां अधिक दिलें जातें. इंग्लंडांत त्या काळीं नुसत्या दानावर उपजीविका करणारे हजारो लोक होते. कारण एखाद्या माणसानें एका संस्थेंतून खर्चाकरितां रोख पैसे घ्यावेत, दुसरीकडे वैद्यकीय मदत घ्यावी, तिसरीकडून कपडा घ्यावा, चौथीकडून कोळसा घ्यावा, पांचवीकडून पाव मिळवावेत आणि यांपैकीं एकाहि संस्थेला आपल्याला दुसरीकडून मदत मिळत असल्याची बातमीहि लागूं देऊं नये व त्यासंबंधीं त्यांनींहि चौकशी करूं नये असा सावळा गोंधळ सर्वत्र चाले. ही अव्यवस्था थांबविण्याचा एकच मार्ग होता तो हा कीं, या परस्परांपासून दूर राहून स्वतंत्रपणानें पण एकाच हेतूनें कार्य करणाऱ्या संस्थांचें संघटण करावयाचें. पण याचा अर्थ असा नव्हता कीं, त्या सर्व संस्था

एकत्र करावयाच्या किंवा त्या सर्वांची मिळून एक संस्था करावयाची. त्याचा अर्थ इतकाच होता कीं निरनिराळ्या धर्मार्थ संस्थांतून मदत मागणारांचे अर्ज एकत्र करावयाचे, अर्जदारांची, त्यांच्या कुटुंबांची व त्यांच्या परिस्थितीची इत्थंभूत माहिती मिळवावयाची व त्यांच्यापैकीं प्रत्येकाला कोणत्या प्रकारची व किती मदत करणें आवश्यक आहे तें ठरवून ते अर्ज त्या त्या संस्थेकडे पुढील मदत देण्याकरतां पाठवावयाचे. दरम्यान् अर्जदाराला अन्नाची किंवा कपड्यालत्त्याची अतिशयच जरूर आहे असें वाटल्यास ती त्याच्या अर्जाचा निकाल लागेपर्यंत द्यावयाची.

वरील संस्था अस्तित्वांत येण्यापूर्वी इंग्लंडमध्येंसुद्धां दान मागणारांची फारशी विचारपूस न करतां निमूटपणें दान करण्याची सरसहा पद्धति होती. सरकारीरीत्याहि अशाच तऱ्हेनें आणि अपुरें दान दिलें जाई. कारण त्यांना ठाऊक होतें कीं, दान मागणारांना इतर खाजगी संस्थांतूनहि फारशी चिकित्सा न करितां दान मिळतें. दान देणाऱ्या खाजगी संस्था म्हणत कीं सरकारकडून पुरेशी मदत मिळत नाहीं म्हणून आम्हाला दान द्यावें लागतें. तात्पर्य दानाच्या बाबतींत त्यावेळीं असा सारा गोंधळ होता. पण या नवीन संस्थेचें मुख्य तत्त्व असें होतें कीं, मागतेकऱ्यांच्या स्थितीची सर्व प्रकारची खडान् खडा माहिती मिळविल्याशिवाय त्यांना पैचीहि मदत करावयाची नाहीं. फारच झालें तर ही सारी माहिती मिळेपर्यंत त्यांचे मनस्वी हाल होतील अशी भीति वाटूं लागल्यास अगदीं तात्पुरती अन्नपाण्याची मदत दरम्यानच्या काळांत करावयाची. या संस्थेच्या चालकांनीं आरंभींच लोकांची खातरजमा केली होती कीं, दानासाठीं खर्च होणारा बहुतेक सारा पैसा फुकट जात आहे, उद्योग करून सहज पोटभरण्यासारख्या हजारों माणसांना व्यर्थ मदत केली जात आहे आणि मदतीला सर्वस्वीं पात्र असलेलीं माणसें मदतीविना मरणाच्या दारीं पडलेलीं आहेत; करितां ढोंगी लोकांना दान मिळण्याचें बंद होऊन त्या पैशाचें सत्पात्रीं दान झाल्यास सर्व प्रकारच्या असहाय लोकांची सोय होऊन लक्षावधि रुपयांची बचत होईल, व त्यांतून दुसरीं अनेक प्रकारचीं उपयुक्त कामें गरिबांकरितां करितां येतील. पैसा ज्या मार्गानें मिळेल त्या मार्गाचा अंगीकार करण्याकडे माणसाची साहाजिक प्रवृत्ति असते. भिकाऱ्याच्या बाबतींतहि असेंच होतें. अमुक एका तऱ्हेनें वागलों किंवा अमुक एका प्रकारचें वागणें दिसलें कीं दात्याला आपली कींव येऊन तो चटकन पैसे देतो असें आढळलें कीं तशा प्रकारें वागून पैसे उकळण्याचा भिकारी प्रयत्न करितात. याच्यामुळें अर्थातच ढोंग्यांचा सुकाळ होतो आणि ज्यांना खरोखरी दानाची आवश्यकता असते त्यांना तें मिळण्यास अडचण पडते. याच्यासाठीं दानाचे बाबतींत मुख्यतः रोख पैसे देतांना अत्यंत काळजी घ्यावी आणि व्यक्तिशः खात्री झाल्यावरच ते द्यावे, असें या संस्थेचें तत्त्व होतें. पण कैक वर्षें मन मानेल त्याप्रमाणें दान करण्याची संवय झाल्यामुळें वरील

सल्ला लोकांना प्रथम रुचला नाहीं व त्यांच्यावर अनेक दिशांनीं टीकेचा भडिमार होऊं लागला. पण आस्ते आस्ते या नवीन पद्धतीचे फायदे दिसूं लागल्यावर हा विरोध कमी झाला व ही संस्था जगन्मान्य झाली.

## दानांतले स्वार्थी हेतु

वरील संस्थेला आपल्या हेतूप्रमाणें धर्मादाय संस्थांची संघटना करतांना असा अनुभव आला कीं, धर्मादाय करणाऱ्या सर्वच संस्था केवळ विपन्नावस्थेस पोंचलेल्या लोकानांच मदत करण्याच्या सदिच्छेनें स्थापन झालेल्या असतात, असें नाहीं; तर त्यांपैकीं कांहींचा अंतःस्थ हेतु अगदीं वेगळा असतो. तो हा कीं, आपल्या धर्मपंथाचा प्रसार करणें. त्या गरीब लोकांच्या गरिबीचा फायदा घेऊन त्यांना आपल्या धर्मपंथाची दीक्षा देण्याचा प्रयत्न करतात. ते क्षुधितांना फुकट चहा देतात तो ते भुकेनें व्याकुळ झालेले असतात म्हणून नव्हे; तर त्यांनीं एकत्र जमून आपलें धार्मिक पुराण ऐकावें म्हणून. दुसरे कांहीं लोक आपण कोणत्या तरी जागेकरितां उमेदवार म्हणून उभे राहून त्याकरितां लोकांचीं मतें मिळविण्या करतां कांहीं तरी धर्मादाय करण्याचें ढोंग करितात. कारण कांहीं धर्मादाय संस्थांत अशी पद्धत असते कीं, त्यांत प्रवेश मिळविणें हें सभासद व देणगी देणारे यांच्या मतावर अवलंबून असतें. त्यामुळें देणग्याहि पुष्कळ मिळतात व या संस्थांत प्रवेश मिळविण्यासाठीं मोठी चढाओढ लागते. याचा परिणाम असा होतो कीं या संस्थांचे सभासद व देणग्या देणारे यांचीं मतें मिळविणें हा एक धंदाच समजतात. दान करण्यांत असे अनेक स्वार्थी हेतु असल्यामुळें वरपांगीं दान करण्याचें ढोंग नाहींसें करण्याच्या दृष्टीनें या सर्व धर्मादाय संस्थांची संघटना होणें अत्यंत महत्त्वाचें असतें.

वर उल्लेख केलेल्या संस्थेचें काम अपेक्षेप्रमाणें यशस्वी न होण्याला दुसरींहि कांहीं कारणें झाली. विपद्ग्रस्त लोकांच्या बाबतींत या संस्थेचें असें मत होतें कीं, हे सर्व लोक आपली आपणच अशी पराधीन स्थिति करून घेतात; त्याला समाज कोणत्याहि प्रकारें कारणीभूत झालेला नसतो. हें म्हणणें कांहीं बाबतींत खरें असलें तरी सर्व साधारणपणें खरें नसतें. कारण सामाजिक परिस्थितीमुळेंच यांतील पुष्कळशा अनिष्ट गोष्टी उत्पन्न झालेल्या असतात. त्यांना आणखी असेंहि वाटे कीं, आज चालू असलेली समाजरचना व समाजव्यवस्था न्याय्य आहे, संपत्तीची वांटणी योग्य प्रमाणांत होत आहे व प्रत्येकाच्या योग्यतेप्रमाणें मोबदला मिळत आहे. तसेंच म्हातारपणांत आजारीपणांत व बेकार झाल्यावर मिळणारी मदतही त्यांच्या मतें गैर होती आणि त्याला कारण दुसरें तिसरें कांहीं नसून श्रीमंतांना आपल्या फायद्यांतून

हा खर्च करावा लागतो हें होय. गरिबांना दान देऊन त्यांची दानत सुधारतां येईल अशी त्यांची कल्पना होती. गरीब लोकांचा आपल्यापेक्षां अगदीं वेगळा असा स्वतंत्र वर्ग आहे असें ते म्हणत. कामकरी वर्गाच्या झोपडींत बारीकसारीक चैनीच्या वस्तु दिसल्या; तरी तें असाह्य होऊन, पायाची तिडीक त्याच्या मस्तकाला झोंवे. कामगारांचें वेतन कमी करणाऱ्या चळवळीला त्यांची सहानुभूति असे. कामगारांना अधिक मजुरी मिळाल्यास त्याची राहणी सुधारेल आणि थोड्या चैनीच्या वस्तु त्यांच्या घरांत दिसल्या तरी त्यामुळें ते न बिघडतां उलट त्यांची दुसरी व्यसनें कमी होतील हें त्यांना खरेंहि वाटत नसे. ह्या व दुसऱ्या अनेक कारणामुळें त्यांची मूलभूत कल्पना चांगली असूनहि ती व्हावी तशी यशस्वी झाली नाहीं.

खाजगी रीतीनें कसें तरी दान होण्यापेक्षां त्याला संघटित स्वरूप येणें चांगलें आणि याच दृष्टीनें वरील संस्थेचें महत्त्व आहे. गेल्या शेंपन्नास वर्षांत वरील प्रकारच्या संस्था युरोपांतील व अमेरिकेंतील सर्व मुख्य मुख्य शहरांत काढण्यांत आल्या. मदत द्विगुणित होऊं नये, कामाची बरोबर वांटणी व्हावी व सर्वांना सारखी मदत मिळावी अशा प्रकारें प्रयत्न तिच्या चालकांकडून झाले. या प्रयत्नांमुळें दोन दोनदां मदत मिळणें बंद झालें. इतकेंच नव्हे; तर बहुतेक ढोंगी लोकांची डाळ शिजेनाशी झाली. या कामाला देणग्या देणाऱ्या लोकांचें कामहि सोपें झालें. आपला पैसा कोठें जातो, व कशा रीतीनें खर्चिला जातो, हें त्यांना कळूं लागलें व त्यामुळें पैशाचें साहाय्य अधिकाधिक मिळूं लागलें. धर्मादाय संस्थांची संघटना म्हणजे खरोखरीच धंद्याच्या तत्त्वांवर धर्मादाय करणें होय. पण या पद्धतींत त्याबरोबर कांही दोषहि येतात. या पद्धतीला यांत्रिक स्वरूप येतें व नुसत्या चौकशीलाच प्रमाणाबाहेर महत्त्व दिलें जातें. पण एकंदरींत या संघटनेमुळें हें धर्मादायाचें कार्य अधिक सुयंत्रित चालतें यांत संशय नाहीं. अशा प्रकारें धर्मादाय संस्थांची संघटना झाल्यामुळें खाजगी रीतीनें अव्यवस्थितपणानें होणाऱ्या दानांत पुष्कळच सुधारणा झाली असें मानण्यास हरकत नाहीं. अशा प्रकारच्या दानानें दान घेणारांशीं थोडा फार प्रत्यक्ष संबंधहि येतो आणि दान करतांना सारासार विचार करण्याची संधि मिळते. या पद्धतीमुळें आपण आपल्या धर्मादाय संस्थांत नेहमीं पाहातों त्याप्रमाणें कोणा एका व्यक्तीला त्या संस्थेवर आपला हक्क सांगतां येत नाहीं. एकंदरींत खाजगी रीतीनें दान करण्याच्या बाबतींत धर्मादाय संस्थांची संघटना करणें हाच सर्वोत्तम मार्ग आज समजला जातो.

धर्मादायाच्या बाबतींत परंपरागत चालत आलेल्या कांहीं अनिष्ट गोष्टी उपरिनिर्दिष्ट संस्थेनें इग्लंडमध्यें नाहींशा केल्या ही गोष्ट खरी. परंतु त्याबरोबरच दुसऱ्या कांहीं गोष्टींची शक्याशक्यता न पाहातां त्या खऱ्या आहेत, असें या संस्थेच्या चालकांनीं ग्रहित धरलें. ही वाण भरून काढण्याकरतां कालांतरानें दुसऱ्या संस्था स्थापन झाल्या व त्यांचें कामहि यशस्वी रीतीनें होऊं लागलें.

सन १८६९ मध्यें वरील संस्था जेव्हां इंग्लंडमध्यें स्थापन झाली तेव्हां धर्मादाय संस्थांची संघटणा करणें व मागतेकऱ्यांची संख्या कमी करणें एवढाच हिचा हेतु होता. पुढें एक वर्षानें ' धर्मादाय संस्थांची संघटना करणारी संस्था ' असा तिनें आपल्या नांवांत फरक केला. पुढें आणखी चाळीस वर्षांनीं म्हणजे स. १९१० मध्यें पुनः नांवांत बदल करून ' धर्मादाय संस्थांची संघटना आणि गरिबांची सुधारणा करणारी संस्था ' असें नांव घेतलें. आणखी पस्तीस वर्षांनीं म्हणजे तिच्या मूळ स्थापनेस पाऊणशें वर्षें पुरीं झाल्यावर स. १९४४ मध्यें ' कुटुंब हितकारिणी संस्था ' हें नवें नांव तिनें स्वीकारलें आहे. बदलत्या परिस्थितीप्रमाणें आपणहि बदललें पाहिजे हाच हेतु हीं नांवें बदलण्यांत तिचा होता. आज इंग्लंडांत अनाथांचा प्रश्न स्वतः सरकारच्र हाताळीत असल्यामुळें दानाची आवश्यकता कमी झालेली असली तरी वैयक्तिक व कौटुंबिक अडचणी वाढत आहेत. त्या दूर करण्याचें कार्य ही संस्था पूर्वी इतक्याच उत्साहानें आणि आस्थेनें करीत आहे. वैयक्तिक साहाय्य करून अडचणींतून मार्ग काढण्याला हजारों कुटुंबांना ती आज मदत करीत आहे.

## एल्बरफेल्ड पद्धति

धर्मादायाची संघटना करण्याचा दुसरा प्रकार म्हणजे एल्बरफेल्ड पद्धति (The Elberfeld System) होय. ही पद्धति युरोपखंडांतील बहुतेक सर्व ठिकाणीं अंमलांत आलेली आहे. इतकेंच नव्हे तर धर्मादाय संस्थांची संघटना उत्तम पायावर करण्याकरितां आजपर्यंत जे जे प्रयत्न झाले, त्यांत ही सर्वोत्कृष्ट मानण्यांत येते. ही स. १७६५ च्या सुमाराला जर्मनीमध्यें एल्बरफेल्ड नांवाच्या संस्थानांत सुरू करण्यांत आली. त्या काळीं दारिद्र्य व विपन्नावस्था यांचा साऱ्या युरोपभर कळस झालेला होता. आणि एल्बरफेल्ड संस्थानाची भरभराट असल्यामुळें हजारों भिक्षेकरी रस्त्यावर रांगेनें बसलेले तेथें दिसत व घरोघरीं मदतीची याचना करीत. अशा परिस्थितींत प्रोफेसर बुश यांना ही कल्पना सुचली. शहराचे वेगवेगळे भाग करण्यांत आले व त्या प्रत्येक भागावर देखरेख करण्याकरतां एक एक मनुष्य नेमण्यांत आला व या देखरेख करणाऱ्या सर्व अधिकाऱ्यांनीं आपल्या कामाचे अहवाल मुख्य कचेरींत पाठवावे असें ठरलें. भिक्षेकऱ्यांना व्यक्तिशः कोणी कांहींहि देऊं नये. असें ठरविण्यांत आलें. मुलांकरतां धंदेशिक्षणाच्या शाळा स्थापन करण्यांत आल्या व आजाऱ्यांकरितां रुग्णालयांची व्यवस्था करण्यांत आली. पण या सर्वांत विशेष महत्त्वाची गोष्ट त्यांनीं केली ती ही कीं, भिक्षेकऱ्यांस आपल्या पायावर उभें राहाण्यास शिकविलें. या पद्धतीमुळें लौकरच लोकांची अन्नान्न दशा कमी झाली आणि त्या संस्थानांत भिक्षेकरी दिसेनासे झाले. व या संस्थेची पुढें आवश्यकताच नाहींशी झाली. पुढें स. १८५२ मध्यें त्या पद्धतींत थोडाफार बदल करून त्या

संस्थेची पुनर्घटना करण्यांत आली. ही संस्था अगदीं अलिकडे महायुद्ध सुरू होईपर्यंत चालू होती. प्रत्येक भागावर देखरेख करण्याकरतां जो अधिकारी असे त्याला त्या भागाची व त्या भागांतील लोकांची पूर्ण माहिती असे. तो आपल्या भागांतील भिक्षेकऱ्यांची व्यवस्था करी. त्याला या कामाबद्दल कांहीं वेतन देण्यांत येत नसे; पण हें काम मात्र त्यांचेकडून सक्तीनें करून घेण्यांत येई, इतकेंच नव्हे, तर त्यानें आपल्या कामांत चुकारपणा केल्यास त्याबद्दल त्याच्यावर जादा कर बसविण्यांत येई. आणि त्याचा निवडणुकींत मत देण्याचा अधिकारहि कांहीं दिवस काढून घेण्यांत येई. परंतु ही जागा सर्व दृष्टींनीं मोठ्या मानाची समजण्यांत येत असल्यामुळें ती सहसा कोणी नाकारीत नसे. उलट चांगले कर्तृत्ववान् लोक ती मुद्दाम स्वीकारीत. हे भाग फार लहान असल्यामुळें या देखरेख करणाऱ्या माणसाकडे फार थोडीं असहाय माणसें येत. त्यामुळें त्याला व्यक्तिशः त्यांची चांगली विचारपूस करितां येई व सहानुभूति दाखवून जरूर ती योग्य मदत करितां येई. हें काम मोठ्या मानाचें व परोपकाराचें आहे असा अभिमान वाटत असल्यामुळें तें सामान्यतः उत्तम रीतीनें होई. अशा प्रकारें अनेक लहान भाग मिळून एक मोठा भाग करण्यांत येत असे आणि त्या सर्वांवर देखरेख करणारे लोक पंधरा दिवसांनीं एकदां एकत्र जमत व या सभांचा अध्यक्ष सभेची सर्व हकीकत मुख्य कचेरीकडे पाठवीत असे. मुख्य कचेरीचे नऊ सभासद असत व त्यांच्याकडे सर्व शहरांतील धर्मादायाची व्यवस्था असे. या मुख्य कचेरींत या संबंधींचें शिक्षण घेतलेला पगारी कार्यकारी अधिकारी असे व त्याला दुसरे पगारी मदतनीस असत. देखरेख करणारांना व भागाच्या मुख्य अधिकाऱ्यांना केंद्र समिति वेळोवेळीं निरनिराळ्या बाबींसंबंधीं सूचना देई, कामाची वांटणी करून देई व देखरेख करणारीं माणसें नेमी. लोकांच्या विपन्नावस्थेचीं कारणें शोधून काढी, कायद्यांत दुरुस्ती करण्याची खटपट करी आणि दारिद्र्य कमी होऊन अशा प्रकारच्या लोकांची स्थिती सुधारण्याकरितां ज्या ज्या कांहीं गोष्टींची जरूरी असे त्या सर्व करी. आपल्या देशांतील परिस्थित्यनुसार या पद्धतींत अवश्य ते बदल करून ती आपल्याकडे सुरू करण्यासारखी आहे; पण तिला जनता, नगरपालिका व सरकार या सर्वांची पूर्ण सहानुभूति व सक्रिय मदत मिळाली पाहिजे.

## भिक्षा घालणें नुसतें बंद केल्यानें हा प्रश्न सुटणार नाहीं

पात्रापात्रतेचा विचारहि न करतां, हात पुढें करील त्या माणसाला भीक मिळूं लागल्यामुळें मागतेकऱ्यांची संख्या बेसुमार वाढली आहे. तिला आळा पडावा म्हणून लोकांनीं भिक्षेकऱ्यांना पैसे देणें बंद करावें अशा प्रकारची चळवळ थोड्या दिवसांपूर्वी कांहीं लोकांनीं मुंबईत सुरू केली होती. तोंड वेंगाडून पुढें येईल, त्याची कींव करून त्याला पैसे देण्याची आपल्याकडे रीत असल्यामुळें भिकाऱ्यांची संख्या

फार वाढली आहे व त्यांत बहुसंख्य भिकारी धडधाकट असल्यामुळें भिक्षा घालण्याच्या लायकीचे नसतात ही गोष्ट निःसंशय खरी आहे; पण असे पैसे देणें साफ बंद केल्यास जे भिकारी खरोखरी असहाय स्थितींत असल्यामुळें दानास पात्र आहेत त्यांना कांहींच मदत न मिळाल्यास त्यांनीं कोठें जावें, अशा प्रकारच्या मदतीच्या अभावीं त्यांनीं काय करावें, याचा विचार करावयास नको काय? म्हणून ह्या अल्पसंख्याक पण अत्यंत पराधीन भिकाऱ्यांची कोठें तरी चांगली सोय होऊन ते रस्त्यावर दिसेनासे होत तोंपर्यंत अशा दानाचा बराचसा भाग व्यर्थ जात असला, तरी तें सहन करणें अपरिहार्य नाहीं काय? आधीं या पराधीन लोकाचें जीवन सुखी होईल, अशी व्यवस्था करून मगच वरील मार्ग अंगीकारल्यास तें सर्वतोपरी चांगलें होईल. पण नुसती एखादी खळबळजनक कल्पना काढून आपण मोठी समाजसेवा करीत आहोंत एवढेंच ज्यांना दाखवावयाचें असतें, त्यापेक्षां जास्त कांहीं करण्याचा ज्यांचा हेतूच नसतो, ते इतका विचार करतील ही अपेक्षा करणेंच चुकीचें आहे.

## म्हणणें सोपें; पण करणें कठीण

दानपद्धतींत आणि समाजसेवेच्या कार्यांत आज पुष्कळ सुधारणा होत असली तरी अशा संस्थांच्या एकीकरणाची आज आवश्यकता नाहीं, असें म्हणतां येणार नाहीं. अशा एकीकरणाची आज आवश्यकता आहे आणि तसें तें झाल्यास त्याच्यापासून पुष्कळ फायदे होतील. एखाद्या ठिकाणीं एखाद् दुसऱ्या संस्थेलाच पुरेसें काम असलें आणि तें करण्याकरितां अनेक संस्था निघाल्या, त्यांच्यांत स्पर्धा उत्पन्न झाली कीं, त्याचे अनिष्ट परिणाम त्या संस्थानांच भोगावे लागतात असें नाहीं; तर साऱ्या समाजावर त्याचे वाईट परिणाम होतात आणि कामाचा बिघाड होतो. जरूरी नसतांना एकच कार्य अनेक संस्था करूं लागल्यास कोणालाच पुरेसें काम राहात नाहीं आणि त्यामुळें पैशाचा, वेळेचा व श्रमाचा अपव्यय होतो आणि त्या संस्थांचें, त्यांचा उपयोग करून घेणारांचें व त्यांना साहाय्य करणाऱ्या समाजाचें एकंदरींत अनहितच होतें. त्यापेक्षां समाजांत जे बदल होतील त्याप्रमाणें आपल्या कार्यांतहि कोणते बदल केले पाहिजेत, हें एकेकट्यानें न ठरवितां तें कार्य करणाऱ्या संस्थांच्या प्रतिनिधींनीं एकत्र जमून, वेळोवेळीं विचारविनिमय करून ठरविल्यास सर्वांचा निश्चित फायदा होईल. अशा संस्थांच्या एकीकरणापासून असे अनेक फायदे आहेत. पण हें एकीकरण प्रत्यक्ष घडवून आणणें ही गोष्ट तितकीशी सोपी नसते. उंदिराच्या गळ्यांत घंटा कोणी बांधावी हें ठरविण्याइतकीच ती कठीण असते. यांपैकीं कांहीं संस्था नव्या, उपऱ्या आणि मागें कांहीं इतिहास नसलेल्या अशा असतात; तर कांहीं संस्थांच्या

मागें मोठा महत्त्वाचा इतिहास व अनेकांची तपश्चर्या असते. अनेकांनीं, अनेक प्रकारें अविरत श्रम करून, त्याग करून त्यांना भरभराटीच्या स्थितीला आणिलेलें असतें. व्यक्ति-वैशिष्ट्य, कांहीं विशिष्ट हितसंबंध, महत्त्व, विशिष्ट धर्म किंवा धर्मपंथ, पैसा यांचा विचार न करतां एका मोठ्या संस्थेंत त्यांचें विलीनीकरण व्हावयाचें असतें. आणि हें आत्मबलीदान करण्यास सामान्यतः कोणतीहि महत्त्वाची संस्था तयार होत नाहीं. हें कोणावर जोर जबरदस्ती करून होण्यासारखें नसतें. त्याचें महत्त्व कळून खेळीमेळीनें, स्वयंस्फूर्तीनें तें झालें तरच यशस्वी होतें. नाहींतर त्यापासून कांहीं फायदा होण्याऐवजीं उलट कलागती आणि भांडणें उत्पन्न होण्याचा संभव असतो. आणि अशीं भांडणें उत्पन्न झालीं कीं खरें कार्य मागें पडतें. म्हणून तें युक्तीनें, सावधगिरीनें आणि सर्वांच्या सहकार्यानें झालें पाहिजे.

## समाजाची पेटी

अमेरिकेंत हें एकीकरण तीनचार प्रकारें करण्यांत येतें. धर्मार्थ संस्थांच्या मदतीसाठीं पैसे मिळविण्याच्या बाबतींत असें एकीकरण करण्यांत येतें, त्याला समाजाची पेटी ( A Community Chest ) असें म्हणतात. सभासद संस्थांच्या खर्चाचें वार्षिक अंदाजपत्रक तयार करून एका वर्षांत त्यांना एकंदर किती पैशाची जरूरी आहे, तें ठरवितात व त्याची चिकित्सा करण्याकरितां एक समिति नेमतात. एक पुस्तिका तयार करून तींत प्रत्येक संस्था काय कार्य करिते त्याची माहिती देतात व तिचा सर्वत्र प्रसार करतात. प्रत्येक सभासद संस्था कोणत्या प्रकारचें कार्य करते व तिला मिळालेला पैसा कोणत्या प्रकारें खर्च होतो याची माहिती जनतेला करून देण्यासाठीं सभांत परिणामकारक भाषण करतील, असे वक्ते मुद्दाम शिक्षण देऊन तयार करण्यांत येतात. तसेंच निधि गोळा करण्याकरितां पैसे मागणारांची पथकें निधींच्या कचेऱ्यांतून तयार करण्यांत येतात. तीं घरांतून, दुकानांतून, कारखान्यांतून, कचेऱ्यांतून फिरून पैसे गोळा करतात. दररोज जमलेली रक्कम वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध करण्यांत येते. प्रत्येक भागांतून किती पैसे गोळा करावयाचे तें आगाऊ ठरवून ही मोहीम पुरी झाली कीं कोणत्या भागांतून किती पैसे गोळा झाले, ते आंकडे प्रसिद्ध करण्यांत येतात. ही पद्धति अमेरिकेंत अलीकडे इतकी लोकप्रिय झाली आहे कीं, साऱ्या शहरांतून तिचा उपयोग करून घेण्यांत येतो. या कार्याला पैसा मिळविण्याचें तें एक उत्तम साधन झालें आहे; इतकेंच नव्हे तर त्यामुळें आपल्या भागांत कोणत्या प्रकारचें समाजसेवेचें कार्य चाललें आहे, याचीहि तेथील जनतेला बरोबर माहिती होते.

दुसरी संस्था म्हणजे वर उल्लेख केलेला निधि ज्या संस्थांच्या वतीनें गोळा करण्यांत येतो, त्यांचेच प्रतिनिधि मिळून झालेलें समाजसेवा करणाऱ्या संस्थांचें मंडळ

( A Council of Social Agencies ) हें होय. सभासदसंस्थांचा दर्जा वाढविणें, जरूर नसतां एकच काम एकापेक्षां अधिक संस्था करीत असल्यास त्यापैकीं एकाच संस्थेला तें करावयास लावणें आणि सभासदसंस्थांत ऐक्य उत्पन्न करून त्यांची कार्यक्षमता वाढविणें हा या संस्थेचा हेतु असतो. अमूक एका दर्जाच्या खालीं कोणतीहि संस्था जाऊं नये, खरोखरीच कांहींतरी नवीन कार्याची जरूरी आहे, असें दिसल्याखेरीज नवीन संस्था काढण्यांत येऊं नये असेंहि हें मंडळ पाहातें. याचें एक संशोधन खातें असतें. तें समाजाच्या गरजा कोणत्या आहेत आणि त्या कोणत्या मार्गानें भागवितां येतील, याचा नेहमीं अभ्यास करीत असतें. या मंडळाचाहि खर्च अर्थातच वर निर्दिष्ट केलेल्या निधींतूनच चालतो.

ज्यांना समाजसेवा करण्याची हौस आहे, अशा नवीन स्वयंसेवकांची नोंद करणें, त्यांना शिक्षण देणें, वेळोवेळीं ज्या संस्थांकडून अशा स्वयंसेवकांकरितां मागणी येईल, त्यांच्याकडे कामाची वांटणी करून पाठविणें वगैरे कामें करणारी आणखी एक संघटना आहे. तिची या कामाकरितां एक मध्यवर्ती स्वयंसेवक कचेरी असते.

वरील संघटनांशिवाय लहान लहान वस्त्यांतून त्या त्या भागापुरतेंच सर्व प्रकारचें समाजसेवेचें कार्य करणारीं मंडळें ( Community Councils ) असतात. तींहि वरींच लोकप्रिय आहेत.

विपद्ग्रस्त लोकांना अपुरी व तात्पुरती मदत फार विचारानें करावी लागते. कारण ती संपली म्हणजे त्यांची स्थिति अधिक वाईट होण्याचा संभव असतो. तसेंच दान मागणाराला आवश्यक असेल तितकेंच दान करावें, त्यापेक्षां अधिक केल्यास त्यामुळेंहि त्याचें अनहित होण्याचा संभव असतो. एकाला, हवें त्यापेक्षां जास्त देण्यापेक्षां पुष्कळांना जरूरीप्रमाणें देणें अधिक हितकारक असतें. यासाठीं दान करण्यापूर्वी आपल्या दानाचा काय परिणाम होईल, याचा विचार करणें महत्त्वाचें असतें. दान करण्याची प्रवृत्ति होणें हा माणसाचा स्वभावधर्म आहे आणि तो चांगला आहे. तो मनाला मोठें करतो, आनंदी करतो. म्हणून ही दान करण्याची प्रवृत्ति नाहींशी होतां नये; उलट वाढली पाहिजे. तिला उत्तेजन मिळालें पाहिजे. पण इतर मनोविकारांप्रमाणें यालाहि स्वैरसंचार करूं न देतां योग्य वळण लावलें पाहिजे.

## दान व सामाजिक बंधनें.

द्वेषानें द्वेष वाढतो, त्याचप्रमाणें भिक्षेनें भिक्षेकऱ्यांची संख्या वाढते; असा अनुभव आहे. पुरवठा जास्त होऊं लागल्यानें केव्हां केव्हां मागणीहि वाढते; त्याप्रमाणें जे स्वकष्टानें मिळविलेल्या अर्ध्या भाकरींत संतुष्ट राहात असतात, ते भिक्षा मिळूं लागल्यानें ते कष्टहि सोडून देतात. भिक्षेनें सामाजिक बंधनें शिथिल होऊं लागतात. एखादा मनुष्य उपाशी असला व त्याला धर्मार्थ संस्थेंतून मदत मिळत असली तर शेजारी पाजारी

किंवा त्याचे नात्याचे लोक त्याला मुळींच विचारीनासे होतात. आणि हीं सामाजिक बंधनें—आपल्या शेजाऱ्याला किंवा आपल्या आप्तेष्टाला आपल्या शक्तीप्रमाणें मदत करणें हें आपलें कर्तव्य आहे, ही जाणीव एकदां नाहींशी झाली कीं ती कायमची नाहींशी होते; एवढेंच नव्हे तर अशा आपत्काळीं सर्व लोक त्याला धर्मार्थ संस्थेचें नांव सांगतात. आणि मनुष्य एकदां स्वाभिमान सोडून दानावर पोट भरूं लागला म्हणजे स्वकष्टानें चरितार्थ चालविण्याची अंगीं कुवत आल्यावरसुद्धां तो धर्मार्थ संस्थांचा आश्रय सोडीत नाहीं, उलट तो बंद होऊं नये म्हणून नाना तऱ्हेचीं सोंगें करितो. हा दानाचा खरोखरीच हेतु नव्हे. मनुष्य उपाशी तर राहूं नये, पण दान घेण्यापूर्वी शेजाऱ्यापाजाऱ्यांकडून व नातेवाईकांकडून मिळण्याजोगी मदत त्याला प्रथम मिळावी. मोठ्या प्रमाणांत धार्मिक संस्था असणें व त्याशिवाय दुसरी किरकोळ अल्पस्वल्प मदत मिळणें वरील कारणामुळें फारसें हितावह नाहीं. सामाजिक बंधनें बळकट होतील व शक्यतोंपर्यंत धर्मार्थ संस्थांची आवश्यकताच राहाणार नाहीं, हें अंतिम ध्येय आहे. तशांतूनहि धर्मार्थ संस्थांची जरूरी लागली; तरी ती उपरिनिर्दिष्ट हेतु तडीस जाईल; इतक्या बेतानें असावी. यासाठीं दुसरी कोणतीहि आवांतर मदत, कारखानदार, नातेवाईक व मित्र यांनीं दिलेल्या मदतीला पुरवणी म्हणून द्यावी. त्या मदतीऐवजीं म्हणून कधींही देऊं नये. यांत योग्य चौकशीची व देखरेखीची भर पडली, म्हणजे ती योजना उत्तम रीतीनें फलदायी होते. तसेंच सरसकट सर्वांना मदत करणें, वेगवेगळ्या वयाच्या लोकांना त्यांच्या कुटुंबांकडे किंवा स्थितीकडे लक्ष न देतां व्यक्तिशः निरनिराळ्या लोकांनीं मदत करणें याचा थोड्याफार प्रमाणांत अनिष्ट परिणाम होतो असा अनुभव आहे. याकरितां साऱ्या कुटुंबाचीच स्थिति लक्षांत घेऊन त्याला मदत केल्यास त्याचा परिणाम साऱ्या कुटुंबालाच अधिक फलदायी होतो. कौटुंबिक व्यवस्थेच्या ध्येयाला अनुरूप असा हा प्रयत्न होतो व त्यामुळें साऱ्या कुटुंबाची शक्ति वाढते. यामुळें, कुटुंबांतील प्रत्येक व्यक्तीचें सुखदुःख परस्परांवर अवलंबून असतें, या तत्त्वाकडे डोळेझांक होत नाहीं आणि साऱ्या कुटुंबाची परिस्थिति पाहून तें जोडलें जाईल; मोडलें जाणार नाहीं, असे प्रयत्न करतां येतात.

## दानानें हित होतें; तसें अहितहि होतें

आईबापांच्या अभावीं पोरक्या झालेल्या मुलांना दानामुळें शिक्षण मिळून व सर्व प्रकारें त्यांची जोपासना होऊन समाजांतील दुसऱ्या दुर्दैवी मुलांप्रमाणें सुखी जीवन जगण्याला तीं सर्वतोपरी लायक होतात. कोणत्या ना कोणत्या कारणामुळें म्हातारपणीं निराधार व परावलंबी झालेल्या माणसांना कसेतरी अन्नाचे दोन घांस मिळतात. अब्रू झांकण्याइतकें वस्त्र मिळतें व कोठेंतरी निवाऱ्याची जागा मिळते. वेडे झालेल्या

दा. ८१७० १०१

# धर्मादाय संस्थांची संघटना

लोकांना त्यांच्या स्थितीच्या मानानें जितकें सुखांत ठेवितां येईल तितकें ठेवण्याची व्यवस्था करण्यांत येते. मनुष्य आजारी पडला व पैशाच्या अभावीं त्याला वैद्यकीय मदत मिळेनाशी झाली तर अल्प पैशानें किंवा निव्वळ फुकटसुद्धां औषधोपचाराची व्यवस्था करण्यांत येते किंवा रुग्णालयामध्यें जाऊन बरें वाटेपर्यंत राहातां येतें. शरीरानें व्यंग असल्यामुळें जे आपलें पोट भरूं शकत नाहींत पण ज्यांना अनुरूप असें काम दिल्यास ते अर्धेमुर्धे पोट भरूं शकतील, अशांना धर्मार्थ संस्थांतून बाकीची मदत मिळाल्यास किंवा धर्मार्थ संस्थेंत सोय झाल्यास त्यांची पराधीन स्थिति जाऊन ते स्वावलंबी होऊं शकतात आणि त्यामुळें त्याची अधोगति टळते. या व दुसऱ्या नानाविध गोष्टी आहेत कीं ज्यांच्यामुळें असहाय माणसांचें आयुष्य सुखावह होतें व तीं अधिक सुशील व कर्तबगार होतात. या साऱ्या गोष्टी दानामुळेंच शक्य होतात. गोरगरिबांकरितां चाललेलीं हॉस्पिटलें, आंधळे, पांगळे, वेडे व दुसऱ्या अनेक प्रकारचे व्यंग लोक यांच्याकरितां चाललेल्या अनेक संस्था व त्यांच्या पायीं होत असलेला लाखों रुपयांचा खर्च मानवी प्राण्याच्या सुखासाठीं परोपकाराच्या भावनेनें चाललेल्या या संस्थांचें, दान देण्याची प्रवृत्ति माणसांत नसती, तर काय झालें असतें ही नुसती कल्पनाच असह्य होते.

पात्रापात्रतेचा विचार करून योग्य दिशेनें जर दान करण्यांत आलें; तर वर निर्दिष्ट केलेले फायदे होऊं शकतात. पण दुर्दैवानें त्याचा जर अनाठायीं उपयोग करण्यांत आला तर त्यापासून अपरिमित अहित होण्याचा संभव असतो. अल्प प्रयत्नांनीं दान मिळूं लागल्यास मनुष्य आळशी, परावलंबी आणि अदूरदर्शी होण्याचा संभव असतो. स्वतः निरुद्योगी राहून पोटासाठीं दुसऱ्याच्या तोंडाकडे पाहण्याची संवय जडल्यामुळें मनुष्याचा स्वाभिमान नाहींसा होतो आणि त्याची उद्योगी वृत्ति कमी होऊन त्यांच्यांत मनुष्यपणा येण्याऐवजीं तो मनुष्यकोटींतून पशुकोटींत जाऊं लागतो, त्याच्यांतील सारे सद्गुण नाहींसे होतात आणि महासागरांत सांपडलेला एखादा ठोकळा जसा इतस्ततः हेलखावे खात असतो त्याप्रमाणें निराशेनें बेभान होऊन, सैरावैरा भटकत मन मानेल त्याप्रमाणें तो वागत असतो आणि शेवटीं एखादें अघोर कृत्य करून बहुधा तुरुंगांत जातो किंवा रस्तोरस्तीं भटकत असतां तेथेंच हाल हाल होऊन त्याचा अंत होतो. अशा रीतीनें परावलंबीपणामुळें आयुष्य कवडीमोल होतें. पण हाहि परिणाम दानाचाच असतो हें लक्षांत ठेवण्यासारखे आहे!

गरीब ( Poor ) आणि विपन्न–नादार ( Paupers ) या दोन स्थितींत फरक फारच थोडा आहे. पण स्वतः श्रम न करितां दुसऱ्याच्या श्रमावर राहाण्याचा माणसाला मुळींच हक्क नाहीं आणि म्हणून धर्मादाय संस्था व दानशूर लोक जें दान करितात त्यांतील बहुतेक भाग गरिबाला आळशी आणि परावलंबी करण्यांत खर्च

होतो, असें म्हणणें भाग आहे. विशेषतः आजमितीला जो खाजगी व सार्वजनिक पैसा धर्मादायांत खर्च होतो त्यांतला निदान कांहीं भाग तरी अनाठायीं जात आहे. यावरून सहजच असें सिद्ध होतें कीं, हल्लींची दानाची पद्धति बहुतांशीं चुकीची आहे व तिच्यापासून मागतेकरी लोक कमी न होतां वाढतच आहेत. कारण योग्य विचारपूस केल्याशिवाय, आपल्या मदतीनें त्या माणसाची गरज भागून तो स्वावलंबी होईल किंवा नाहीं, याचा विचार केल्याशिवाय खऱ्या भिकाऱ्यालासुद्धां मदत करणें, योग्य होणार नाहीं. रस्त्यांत किंवा दारावर पुढें येणाऱ्या निर्ढावलेल्या भिकाऱ्याला रोकड पैशाची मदत करणें तर अगदींच वाईट. कारण जो कोणत्या ना कोणत्या प्रकारें काम करून पोट भरण्यास सर्वस्वी लायक आहे, त्याला अशी मदत करणें म्हणजे ' तूं काम करण्यास लायक असलास; तरी काम न करितां मी दिलेल्या मदतीवरच रहा ' असें अप्रत्यक्ष रीतीनें सांगणेंच होय. अशानें त्याच्या आयुष्याचें मातेरें होतें आणि त्याबरोबरच अशी ऐतखाऊ माणसांची संख्या वाढूं लागल्यास समाजाचाहि ऱ्हास व्हावयास लागतो.

दान करण्याची पद्धत मूळ कशी निघाली याचा जर आपण विचार करावयास लागलों, तर आपल्याला असें आढळून येईल कीं कोणत्याहि देशांत आणि कोणत्याहि समाजांत सर्वच लोक सुदृढ आणि सशक्त असूं शकत नाहींत, अगदीं अल्प प्रमाणांत कां होईनात पण कांहीं आजारी व अशक्त–मनानें किंवा शरीरानें असावयाचेच. जगण्यासाठीं धडपड ही सर्वांसच सारखी करावी लागते. पोटाला व शरीराला अवश्य लागणाऱ्या वस्तु मिळवून आणाव्या लागतात, त्या मिळविण्याकरतां श्रम करावे लागतात. श्रमानें माणसाला विश्रांतीची आवश्यकता भासते आणि श्रम करतांना कधीं कधीं संकटेंहि येतात. शिवाय ' ये रे दिवसा आणि भर रे पोटा ' असेंहि करून माणसाचें चालत नाहीं, तर आपल्या वृद्धापकाळाकरतां. आजारीपणाकरतां, अडीअडचणीकरतां अनपेक्षित संकटांकरतां व मुलांबाळांकरतां कांहीं तरी तरतूद करून ठेवावी लागते. याचा परिणाम असा होतो कीं, या जीवनकलहाच्या धक्काधक्कींत जगण्याला लायक असेल, या साऱ्या गोष्टींचा विचार करून सावध रीतीनें वागेल त्याचें आयुष्य सुखावह होतें आणि या परिस्थितीशीं स्वतःच्या दोषामुळें, बेसावधपणानें किंवा कधीं कधीं स्वतःचा काहीं दोष नसूनहि नैसर्गिक किंवा परिस्थिति-जन्य अडचणींमुळें टक्कर देण्याचें ज्याच्यांत त्राण नसतें, त्याचें आयुष्य अर्थातच दुःखांत जातें.

## मनुष्य आणि मनुष्येतर प्राण्यांमधील फरक

खालच्या दर्जाच्या प्राण्यांच्या आयुष्याचें आपण निरीक्षण केल्यास आपल्याला असें आढळून येईल कीं, आजारीपणांत किंवा दुसऱ्या कांहीं अडचणींच्या प्रसंगीं

त्यांना परस्परांना मदत करून त्या संकटांतून वांचवितां येत नाहीं. त्यामुळें लहान सहान अपघात किंवा तात्पुरता आजारीपणा त्यांना नेहमीं प्राणनाशक होतो. कारण त्यांना स्वतःला किंवा त्यांच्या सहकाऱ्याला या संकटांना तोंड देण्याचें उपजतच सामर्थ्य नसतें. यांपैकीं प्रत्येकाला जगण्याला अवश्य लागणारी अनुकूल परिस्थिति दुर्दैवानें नसल्यास जन्माला येतांक्षणींच मरणाची वाट पाहावी लागते.

पण मनुष्यप्राण्याची स्थिति अशी नाहीं. माणसांना समाज करून राहावें लागतें, परस्परांबद्दल सहानुभूति वाटते व ती कृतींत आणण्याची संधि मिळते. त्याचें कारण त्यांचें सुख व सुरक्षितता परस्परावलंबी असते. खालच्या दर्जाचे प्राणी ज्याप्रमाणें हरएक बाबतींत स्वतःवरच अवलंबून असतात व दुसऱ्याशीं तुटकपणानें वागणें निसर्गतःच त्यांना प्राप्त असतें तसें माणसांविषयीं आपण पाहात नाहीं. माणसाला स्वतःच्या हिताकरितांच समाज करून व समाजाला धरून राहिल्याशिवाय गत्यंतर नसतें. अगदीं रानटी जातींतसुद्धां अगदीं अशक्त, अगदीं लहान, शरीरानें व्यंग असलेल्या अशा माणसाला त्याच स्थितींत असलेल्या खालच्या जातीच्या प्राण्यापेक्षां पुष्कळच कमी दुःख सहन करावें लागतें. यावरून एक गोष्ट स्पष्ट होते, ती ही कीं, मनुष्य समाज करून आणि सहकारितेनें राहिल्यानें ज्या अनेक गोष्टी सहकारितेच्या अभावीं मनुष्येतर प्राण्यांच्या नाशाला कारणीभूत होतात, त्यांचें माणसांच्या बाबतींत कांहीं चालेनासें होतें. मनुष्य सहकारितेनें आणि समाज करून राहिल्यानेंच या जगांत टिकाव धरूं शकतो आणि परिस्थितीशीं झुंजण्याची ज्याच्या अंगीं अधिक शक्ति आहे तोच अधिक काळ जगतो, हा जो सृष्टीचा सामान्य नियम त्याचाहि तो पाडाव करूं शकतो. नाहींपेक्षां समाजाशीं तुसडेपणानें वागून एकटा राहिल्यास इतर प्राण्यांसारखीच त्याची स्थिति होते.

सारांश, मनुष्य एकटा राहिल्यानें ज्या अडचणी येतील त्या टाळण्याकरितां तो समाज करून राहिला व त्यामुळेंच समाजांत स्वतःचें पोटहि भरतां येणार नाहीं अशीं शरीरानें व मनानें दुबळीं असलेलीं माणसें जिवंत राहूं लागलीं आणि धर्मार्थ हॉस्पिटलें, दवाखाने, अनाथबालकाश्रम, अन्नसत्रें, सदावर्तें व दुसऱ्या अनेक प्रकारच्या धर्मार्थ संस्था, सहकार्यानें सृष्टीचा उपरिनिर्दिष्ट नियम बाऱ्यावर बसविण्याकरितांच उत्पन्न झाल्या. मनुष्य एकटा राहात असता-समाज करून परस्परांच्या मदतीनें राहाण्याचें त्यानें ठरविलें नसतें, तर या संस्था काढण्याचें काहींच प्रयोजन राहिलें नसतें. ज्याला आपलें स्वतःचें संरक्षण करतां आलें नसतें, तो सृष्टिनियमांप्रमाणें जगताच ना. मनुष्याच्या आपलेपणाच्या प्रवृत्तीमुळेंच सर्व माणसांना अगदीं अशक्त, दुबळया अशा लोकांनाहि या जगांत सुखानें जगण्याची संधि मिळूं लागली आणि त्यांना पोसण्याची जबाबदारी समाजांतील इतर सशक्त व सामर्थ्यवान् व्यक्तींवर अंशतः किंवा सर्वतोपरी पडूं लागली.

# ढोंग्यांची धन आणि दुर्बळ निराधार !

अशक्त, व्यंग, पराधीन अशा माणसांनाच समाजांतील सशक्त व स्वावलंबी लोकांनीं मदत केली असती तर दुसऱ्याच्या मदतीची अपेक्षा करणारे वरच्यासारखेच लोक समाजांत दिसते. जे कोणत्याहि प्रकारें दुबळे नाहींत व स्वतःचें पोट भरण्याला सर्वस्वी लायक आहेत असेहि लोक भिक्षेची याचना करितांना दिसतेना व त्यामुळें ज्या अनेक प्रकारच्या आपत्ति ओढवतात व पैशाचा दुरुपयोग समाजांत दिसतो, त्यांचा मागमूस लागताना. परंतु दुर्दैवाची व आश्चर्याची गोष्ट ही कीं, अशाच लोकांचा समाजांत सुळसुळाट झाला. इतकेंच नव्हे तर त्या लोकांचा एक स्वतंत्र वर्गच उत्पन्न झाला. याचें कारण असें कीं, खरोखरीच ज्याला गरज असेल त्यालाच दान करावें, हें धोरण दान देतांना ठेवण्यांत येईनासें झालें. त्यामुळें समाजांत आज खऱ्या भिकाऱ्यांपेक्षां ढोंगी भिकाऱ्यांची संख्या कैक पटीनें वाढली आहे व त्यामुळें साऱ्या समाजाची अपरिमित हानि होत आहे. परिस्थिति अशा प्रकारची असल्यामुळें आतां असा प्रश्न उद्भवतो कीं, याला आळा कसा घालावा ? या ढोंगी लोकांचा स्वैरसंचार संपुष्टांत कसा आणावा ? समाज संघटित करून वैयक्तिक प्रयत्नांत असलेले दोष कांहीं अंशीं आपण नाहींसे करूं ही गोष्ट खरी आहे; पण तेवढ्यानें या अन्यायाचें निर्मूलन होणें शक्य नाहीं.

संघ स्थापावयाचे व संघ करून राहाण्यांतच सुख मानावयाचें, हा माणसांचा स्वभावधर्म आहे. अशी माणसाची नैसर्गिक प्रवृत्ति आहे. या निसर्गतः थोर गुणामुळेंच सशक्त तेवढा ठेवावयाचा व अशक्त तेवढा नाहींसा करावयाचा या सृष्टीच्या नियमावर मनुष्य कुरघोडी करूं शकला व अगदीं अशक्तांतील अशक्तालासुद्धां समाजांत गुण्यागोविंदानें जगतां येईल, अशा प्रकारची ध्येयभूत परिस्थिति उत्पन्न करून आपल्या प्रेमानें, आपल्या दयेनें व मनुष्यमात्राविषयींच्या-आपल्या कळकळीचें अति उच्च ध्येय त्यानें गांठलें. ज्या शक्तीच्या साहाय्यानें मनुष्य वरील गोष्टी करूं शकला, त्याच शक्तीच्या जोरावर, सद्गुणांचा अतिरेक झाल्यामुळें जे अनेक प्रकारचे अनिष्ट परिणाम झाले आहेत त्यांचा नायनाट करितां येईल. म्हणजे अशक्त आजारी वगैरे दुर्बळ लोक एकाच समाजाचे घटक आहेत, असें मानून सर्वांच्या संमतीनें आणि मदतीनें त्यांचे कष्ट कमी करितां येतील व त्यांचें आयुष्य होतां होईल तों सुखावह करतां येईल. त्याचप्रमाणें हें सार्वजनिक ओझें घेण्यास कोणी चुकवीत असेल, कांकूं करीत असेल किंवा दुसऱ्याचें ओझें घेण्याऐवजीं आपलेंच ओझें बुद्ध्या समाजावर लादून सर्व समाजाला लांच्छन लावीत असेल, तर आपलें सर्व सामर्थ्य एकत्र करून त्याच्या त्या अन्याय्य कृतीचा निषेध करणें व इतरांप्रमाणें त्याला राबावयास लावणें समाजाला शक्य आहे व आवश्यकहि आहे. असे प्रयत्न होतील

तेव्हांच समाजाची अधोगति थांबेल. धर्मादाय संस्थांची संघटना करण्याचा मूलभूत हेतु हाच. ढोंग्याचें ढोंग काढून टाकण्याचा सरळ मार्ग हाच. या मार्गानींच धर्मार्थ दिलेल्या द्रव्याचा योग्य रीतीनें विनियोग करितां येईल व जे खरोखरीच दुर्बळ असतील त्यांची स्थिति अधिक सुधारतां येईल.

सुसंघटित समाजांत सशक्त अशक्तांना पोसतात, इतकेंच नव्हे तर त्या समाजाची घटनाच अशी केली जाते कीं, समाजाचे सबळ व दुर्बळ सांधे एकजीव होऊन त्यांत परस्परांची सोय आपोआप केली जावी. लंगडा डोळस असतो पण त्याचा पाय अधू असल्यामुळें त्याला चालता येत नाहीं आणि आंधळा चालण्यांत पटाईत असतो पण त्याला मार्ग दिसत नाहीं. या दोघांची मैत्री जमते. ते एकमेकांचे व्यंग काय आहे तें समजून घेतात व एकमेकांना साहाय्य करून दोघांचाहि फायदा कसा करून घेतां येईल हें परस्परांच्या विचारानें ठरवितात. लंगडा आंधळ्याच्या खांद्यावर बसतो व लंगडा दाखवील त्या मार्गानें आंधळा चालूं लागतो. अशा रीतीनें त्या शरीरानें व्यंग असलेल्या दोन माणसांची जोडी जमून ते व्यक्तिशः जें करण्यास असमर्थ असतात त्या गोष्टी परस्परांच्या साहाय्यानें सहज करूं शकतात. हें मनुष्येतर प्राण्यांना शक्य नसतें. जें ह्या दोन माणसांना करतां येतें तें सर्व समाजालाहि करतां येण्यासारखें आहे आणि संघटित समाजाचें हेंच ध्येय असावयास पाहिजे. पण समाज इतका सुसंघटित होईल आणि विपद्ग्रस्तांविषयीं त्याचें मन द्रवतें; तसेंच ढोंग्यांविषयींहि त्याचें मन कठोर होईल, परोपकारवृत्ति चांगली असली तरी तिचा-दुरुपयोग होणार नाहीं अशी तो काळजी घेईल, तेव्हांच ह्या साऱ्या गोष्टी होऊं शकतील.

## प्रत्येकानें शक्यतों स्वावलंबी व्हावें

कोणतेंहि सुधारलेलें राष्ट्र पहा, त्याला लागणारें अन्नवस्त्र व दुसऱ्या सहस्रावधि वस्तु तेथले लोक आपल्या देशांतच तयार करतात, असें नाहीं; तर त्या देशांतील परिस्थितीप्रमाणें ज्या वस्तु अधिक सुलभ रीतीनें तयार करितां येण्यासारख्या असतील त्या ते स्वतःकरितां व दुसऱ्या देशाकरितांहि तयार करितात व त्यांच्या मोबदला दुसऱ्या वस्तु इतर देशांतून आणतात. अशा रीतीनें श्रमविभागाच्या तत्त्वावर हें सारें चालतें. मनुष्येतर प्राण्यांना आवश्यक असणाऱ्या वस्तु-त्यांच्या गरजा थोडक्या असतात व त्या दुसऱ्याच्या मदतीशिवाय त्यांच्या त्यांनाच मिळ-वाव्या लागतात. पण माणसालासुद्धां सर्वच गोष्टी कराव्या लागत नसल्या, तरी ज्या त्याला अधिक सुलभ रीतीनें करतां येण्यासारख्या असतात, त्यांचें उत्पादन अधिक प्रमाणावर करावें लागतेंच. निव्वळ आळशी राहून त्याची उपासमार होण्याचा संभव असतो. आजारी, अशक्त, व्यंग यांनासुद्धां हाच कायदा लागू करितां येईल. त्या प्रत्येकाच्या परिस्थितीप्रमाणें किंवा मगदुराप्रमाणें थोडेफार श्रम हे त्यांनीं

केलेच पाहिजेत. एखाद्या शेतकऱ्याप्रमाणें किंवा मजुराप्रमाणें दिवसभर काम करून आपल्या पोटापुरतेंहि कदाचित् त्यांना मिळवितां येणार नाहीं. पण स्वतःला लागणारा अर्धामुर्धा खर्च तरी त्यांना मिळवितां येईल व बाकी राहिलेला खर्च त्यांनीं समाजाकडे मागणें व समाजानें आनंदानें देणें उभयपक्षीं न्यायाचें व योग्य होईल. शिवाय अशा व्यंग लोकांना त्यांच्या परिस्थित्यनुरूप कांहीं तरी काम दिल्यास तें त्यांच्या शरीरस्वास्थ्याच्या दृष्टीनेंहि चांगलें असतें, अशा कामांत त्यांचें लक्ष गेलें कीं ते निदान त्या वेळेपुरते तरी आपलें दुःख विसरतात, केवळ दयेचा किंवा गंमतीचा विषय न होतां त्यांना स्वतःलाहि आपल्याबद्दल अभिमान वाटतो असा अनुभव आहे. सारांश व्यंग माणसानें आपल्या शक्त्यनुसार कांहीं तरी काम केलेंच पाहिजे. आपलें ओझें निष्कारण समाजावर टाकणें, हा अन्याय आहे आणि समाजानें तो सहन करतां कामा नये.

श्रमविभागाच्या तत्त्वाप्रमाणें आपण चाललों, तरच या जगांत आपला टिकाव लागेल हें जर खरें, तर दान अनाठायीं करून समाजांत परोपजीवि माणसांची-अशा बांडगुळांची संख्या वाढविण्यापेक्षां प्रत्येक माणसाला आपल्या चरितार्थाकरितां जितके श्रम करणें अवश्य आहे; तितके करावयास लावून, प्रत्येक माणसाचा दर्जा वाढविणें, स्वावलंबी लोकांवर पडणारें इतर लोकांचें ओझें कमी करणें व ज्यांना ज्या मदतीची आवश्यकता असेल त्यांना ती देणें हें आपलें कर्तव्य नव्हे काय ?

कांहीं तरी कमी, कांहीं तरी दोष, कांहीं तरी व्यंग असलेल्या माणसांची सुधारणा करून त्यांना सांपत्तिकदृष्ट्या शक्यतों स्वावलंबी करण्याचे प्रयत्न पाश्चात्य राष्ट्रें तर करीत आहेतच. पण त्याशिवाय परस्पर साहाय्य, स्वावलंबन, संघटना, सचोटी यांचा अंगीकार करून अगदीं सामान्य माणसेंसुद्धां आपली सुधारणा करण्याचे कसे प्रयत्न करीत आहेत, याची माहिती पुढील प्रकरणांत देऊं.

# प्रकरण ७ वें

# समाजाला स्वावलंबी करणाऱ्या चळवळी

माणसाची सर्वांत महत्त्वाची जर कोणती संपत्ति असेल तर ती म्हणजे त्याचें जीवित ही होय. त्याचा जीव हीच त्याची मुख्य संपत्ति, म्हणून प्रथम जीव जगविण्याकरितां तो नाना तऱ्हांनीं धडपड करतो आणि जिवापलीकडे दुसऱ्या कोणत्याहि गोष्टीचें त्याला स्वभाविकच महत्त्व वाटत नाहीं. आणि जीव जगण्याचीं साधनें प्राप्त झाल्यानंतर तो दुसऱ्या संपत्तीकडे हळूहळू लक्ष देऊं लागतो. माणसाला या अत्यंत महत्त्वाच्या जिंदगीचें संरक्षण करण्याला—सुखानें जगण्याला—शुद्ध हवा, राहण्याला पुरेसें आणि हवाशीर घर, खाण्याला पथ्यकर आणि पोटभर अन्न, ऋतुमानाप्रमाणें अंगावर कपडे, शिक्षण, आजारी पडल्यास औषधोपचाराची सोय, करमणुकीचीं साधनें एवढ्या गोष्टींची किमानपक्षीं जरूरी असते. म्हणूनच या गोष्टींवर त्याचा जन्मसिद्ध हक्क आहे असें मानण्यांत येतें. दिवसभर भरपूर श्रम केल्यानंतर जीविताचें संरक्षण करण्याला आवश्यक असलेल्या या किमान गोष्टी जर त्याला प्राप्त झाल्या नाहींत तर त्याची कर्तृत्वशक्ति हळुहळू कमी होऊं लागते. म्हणून त्याच्या श्रमानें जी संपत्ति उत्पन्न होईल, तींतून त्याची कर्तृत्वशक्ति कायम रहाण्याकरतां जरूर असलेला भाग—त्याचा जन्मसिद्ध हक्क असलेला भाग—प्रथम त्याला मिळाला पाहिजे, हें निर्विवाद आहे. परंतु तत्त्वतः तें खरें असलें तरी त्याची अंमलबजावणी अद्यापि चांगल्या प्रकारें होऊं लागली नाहीं. तथापि या तत्त्वाचा प्रसार दिवसें दिवस अधिक होत आहे आणि ज्या गोष्टींवर ज्यांचा न्यायसिद्ध हक्क आहे; त्या त्यांना मिळाव्यात, असे प्रयत्न होत आहेत. संघटित समाजांत प्रत्येक व्यक्तीला भरपूर काम मिळणें व तिच्या आवश्यक गरजा भागतील, इतका तरी तिच्या कामाबद्दल किमान मोबदला तिला मिळणें, अत्यंत आवश्यक असतें तसें न झाल्यास समाजांत अनेक प्रकारचे असंतोष माजून राहातात व ते समाजाला दुर्बल करण्यास कारणीभूत होतात.

पण या साऱ्या गोष्टी सरकार करूं शकतेंच, असें नाहीं. म्हणून लोकांनीं सरकारवर सर्वस्वी अवलंबून न राहातां संघटना व सहकार्य यांच्या साहाय्यानें आपली सुधारणा करण्याचे प्रयत्न करावे. या बाबतींत इंग्रज लोकांचें उदाहरण अत्यंत अनुकरणीय आहे. मित्रमंडळे ( Friendly Societies ), सहकारी चळवळ व कामगार संघटना या मुख्यतः तीन दिशांनीं तेथील अगदीं सामान्य लोकांनीं—विशेषतः कामगारांनीं—स्वावलंबनाची चळवळ सुरू केली, ती फोफावली आणि आज इतकी कल्पनातीत यशस्वी झाली आहे कीं, या चळवळीच्या जोरावरच इंग्लंडचें राज्ययंत्रहि

कामगारांनीं आपल्या हातीं घेतलें आणि तें यशस्वी रीतीनें चालविलें. पण ही चळवळ मूळ धरावयाला, जोमानें वाढावयाला आणि आज कल्पनातीत यशस्वी होण्याला जर कोणती गोष्ट प्रामुख्यानें कारण झाली असेल तर ती म्हणजे 'एकमेकां साह्य करूं । अवघे धरूं सुपंथ ' हें तिच्यामागें असलेलें तत्त्व होय. गरिबाजवळ पैसा नसला तरी स्वाभिमान आहे, माणुसकी आहे, परस्परांना साहाय्य करण्याची तळमळ आहे, आपला व्यवहार चोख, सचोटीचा ठेवण्याची बुद्धि आहे, हें त्यांनीं या चळवळी यशस्वी करून सिद्ध केलें. अत्यंत हलाकीच्या स्थितींत आत्मोद्धाराचा हा एकच मार्ग म्हणून ही समाईक भूमिका शोधून त्यांनीं या चळवळीची कांस धरली, ती पक्षातीत ठेविली, मनोभावानें तिचा पाठपुरावा केला, अत्यंत प्रामाणिकपणानें तिची जोपासना केली आणि या तपश्चर्येनें ती प्रसन्न होऊन त्यांच्या बहुतेक आशाआकांक्षा तिनें पूर्ण केल्या. हा आत्मोद्धाराचा मार्ग जो कामगारांनीं पत्करला त्यापासून आणखी एक फायदा झाला. तो हा कीं, लोकशाहीच्या तत्त्वाप्रमाणें राज्यकारभार चालविण्याचें प्रत्यक्ष शिक्षण जें शाळांत किंवा महाविद्यालयांतहि मिळणें शक्य नव्हतें, तें या चळवळीच्या द्वारें सामान्य लोकांना मिळालें. आपल्या पायावर उभे रहाण्याचे हे जे प्रयत्न जनतेनें केले त्यांची माहिती देण्यापूर्वीं असे प्रयत्न करणें त्यांना कां भाग पडलें, कोणत्या परिस्थितींत त्यांनीं हें कार्य हातीं घेतलें, या कार्याची पार्श्वभूमि कशी होती, हें समजून घेणें अत्यंत महत्त्वाचें आहे.

## इंग्लंडांतील औद्योगिक क्रांति

इंग्लंडमध्यें स. १७६० तें स. १८३० या सत्तर वर्षांच्या कालखंडांत जी औद्योगिक क्रांतीची लाट आली, तिच्यामुळें तेथें कल्पनातीत बदल झाला. इंग्लंड हें एक शेतीप्रधान राष्ट्र होतें त्याला जगाच्या कारखान्याचें स्वरूप आलें. खेड्यांतील जीवन आधींच असह्य झालें होतें, म्हणून लोक खेडीं सोडूं लागले. खेडीं ओसाड पडलीं. शहरें वाढूं लागलीं. परमेश्वरनिर्मित निसर्गरम्य प्रदेश जाऊन त्या जागीं मानवनिर्मित शहरें सर्वत्र दिसूं लागलीं. गरिबांची पिळवणूक, त्यांना राबवून घेण्याची वृत्ति, सर्वत्र दिसूं लागली. उच्चनीचभाव उत्पन्न झाला. श्रीमंत, गरीब असे भेदभाव दिसूं लागले. स्थिर झालेलीं सामाजिक बंधनें आणि सामाजिक संस्था मुळापासून उखडल्या गेल्या. खेड्यांतली जुनी राहाणी नाहींशी झाली, नवीन नवीन अडचणींचे प्रश्न उत्पन्न करणारीं औद्योगिक शहरें उभीं करण्यांत आलीं आणि वेतनासाठीं शारीरिक श्रम विकणारा मजूरवर्ग जन्माला आला. हें सारें भांडवलशाहीनें उत्पन्न केलें आणि ही भांडवलशाहीची बैठक आतां हालत नाहीं, ती कायम झाली, असें पाहून तिला शह देण्यासाठीं कामगारचळवळ व तदंगभूत स्वावलंबी करणाऱ्या चळवळी सुरू झाल्या.

## शेतीची कुंपणपद्धति

या वेळपर्यंत खेड्यांत शेतकऱ्याच्या जमिनीचे लहान लहान तुकडे गांवभर विखुरलेले असत. एकमेकांच्या कुंपणांत आणि गांवांतील पडीत कुरणांत सर्वांची गुरें चरत. ज्यांच्या स्वतःच्या जमिनी नसत किंवा अगदींच थोडी जमीन असे तेहि ह्या पडीत जमिनींत आपलीं गुरें चरवीत आणि त्याला सामान्यतः कोणी आडकाठी करीत नसे. पण अशा प्रकारची शेती फायदेशीर होईना. म्हणून सर्वत्र विखुरलेलीं शेतें एकत्र करून, त्यांना कुंपण घालून दुसऱ्याचें गुरूं त्यांत येणें बंद करावें, त्यांतील जमीन चांगली साफसूफ ठेवून, त्यांतील पाणी नाहींसें करून तेथें शेती करावी व राहिलेल्या भागांतहि गुरेंढोरें भरपूर बाळगून, त्यांच्या चरण्याची विपुल व स्वतंत्र व्यवस्था करावी, असे प्रयत्न होऊं लागले. अशा रीतीनें केलेलीं शेतें चांगलीं फायदेशीर होऊं लागलीं. त्यामुळें श्रीमंत लोक अशा कुंपण घातलेल्या शेतांत आपलें भांडवल गुंतवूं लागले आणि अशा प्रकारें शेतांना कुंपण घालण्याची मोहीम (Enclosure movement) सुरू झाली. याचा परिणाम असा झाला कीं लहान लहान शेतकरी किंवा ज्यांची मुळींच शेती नव्हती पण गुरेंढुकरें बाळगून तीं सार्वजनिक किंवा मोकळ्या जागांत चरवून जे आपला चरितार्थ चालवीत अशा लोकांना चरितार्थाचें साधन गेल्यामुळें खेड्यांत राहाणें अशक्य होऊं लागलें. या पद्धतीमुळें लहान लहान शेतकऱ्यांची कुचंबणा होऊन त्यांना आपलीं शेतें मोठ्या शेतकऱ्यांना विकण्याखेरीज दुसरा मार्ग नाहींसा झाला आणि जनावरें चरविण्याला सार्वजनिक किंवा मोकळी जागा नसल्यामुळें नुसतीं जनावरें बाळगून पोट भरणाऱ्या लोकांनाहि तो धंदा करणें अशक्य झालें. त्यामुळें मोलमजुरी करून चरितार्थ चालविणें त्यांना भाग पडूं लागलें पण शेती करण्याच्या या नवीन पद्धतीमुळें शेतीला मजूरहि कमी लागूं लागले. त्यामुळें मजुरीचे भाव कमी झाले आणि खेड्यांत बेकारी येऊन गरीब लोकांचे हाल वाढूं लागले. खेड्यांत राहणें हळूहळू अशक्य झालें.

## लोंकरीचा जोडधंदा खेड्यांतून नाहींसा झाला

याच सुमाराला वरील प्रश्नाशीं प्रत्यक्ष संबंध नसलेला पण तितकाच महत्त्वाचा दुसराहि एक बदल झाला. इंग्लंडमध्यें अठराव्या शतकापर्यंत खेड्यांत, झोंपड्यांतूत हातमागावर कापड निघे व खेड्यांतील लोकांची एकंदरींत समाधानकारक स्थिति असे. या वेळीं इंग्लंडमध्यें मोठा धंदा म्हणजे लोंकरीचा होता. लोंकरीचें उत्पादन शेतकरी फार मोठ्या प्रमाणांत करीत, तिचें सूत काढीत व तें विणून कापडहि तयार करीत. लोकरीचें उत्पादन करणें व तिचें सूत काढणें हें मोठें कसबाचें काम आहे

असें त्या काळांत समजलें जाई. तो एक जोडधंदा म्हणून शेतकरी, विशेषतः त्यांचीं बायकामुलें करीत. लोंकर विणून तिचें प्रत्यक्ष कापड तयार करणें हें मात्र विशेष कौशल्याचें काम असल्यामुळें शेतकरी स्वतः करीत. हीं कामें शेतकऱ्यांच्या घरांत, पडवींत किंवा परसांत एखादें छप्पर उभारून तेथें चालत असत. या कामाशिवाय ते थोडीफार शेतीहि करीत. या धंद्यांत भांडवलदारांचा शिरकाव झालेला नव्हता व त्यांनीं भांडवल घालून मोठे कारखानेहि काढलेले नव्हते. लोंकर तयार करणाराकडून ती घेऊन तिचें सूत काढणारा कडे ती द्यावी, सूत तयार झाल्यावर तें कापड विणणाराकडे द्यावें आणि कापड तयार झाल्यावर तें व्यापाऱ्यांनीं बाजारांत विकावें, असा व्यवहारविनिमय चाले. फक्त कपडा तयार झाल्यावर त्याला रंग देऊन तो सफाईदार व सुबक दिसून त्याला चांगली किंमत यावी, यासाठीं कांहीं विशिष्ट प्रयत्न करावे लागत व त्याला मोठें भांडवल लागे, तेवढें काम भांडवलदार करीत. बाकीच्या सर्व गोष्टी शेतकरी दुसऱ्यांच्या मदतीशिवाय स्वतंत्र रीतीनें आपल्या घरांत आपलें शेतीचें काम सांभाळून जोडधंदा म्हणून करीत. वाफेच्या जोरावर यंत्रें चालूं लागेपर्यंत, लोंकर तयार करण्यापासून तिचा कपडा तयार होईपर्यंत ज्या अनेक गोष्टी कराव्या लागत, त्या साऱ्या एका ठिकाणीं करणें फायदेशीर नव्हतें. म्हणून फक्त तयार मालाचा व्यापार आपल्या हातीं ठेवून बाकीचें उत्पादनाचें सर्व कार्य त्या त्या कसबी लोकांच्या हातीं ठेवण्यांत भांडवलदार समाधान मानीत. पण वाफेचें यंत्र निघाल्यापासून त्यांत एकदम मोठी क्रांति झाली. वरील सर्व कामें कारखान्यांत होऊं लागलीं. सारा कच्चा माल एका ठिकाणीं आणून एका कारखान्यांत त्याचें सूत काढणें, सुताचें कापड विणणें, रंग देणें वगैरे कामें एकत्र करणें, हें पूर्वीं पत्करत नव्हतें पण आतां तसें करणेंच अधिक फायद्याचें होऊं लागलें. माणसें अगदीं कमी लागून उलट भरमसाट फायदा होऊं लागला आणि वर निर्दिष्ट केलेल्या शेतीच्या कुंपणपद्धतीमुळें आधींच हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांच्या हातचा हा जोडधंदाहि नाहींसा होऊं लागला. त्यामुळें त्यांची अधिकच शोचनीय स्थिति झाली. त्यांना खेड्यांत राहाणें सर्वस्वी अशक्य झालें. तेव्हां ते शहराची वाट धरूं लागले आणि खेडीं ओसाड पडूं लागलीं. पण सारेच शहरांत जाऊं लागले तर त्यांना काम तरी कोठून मिळणार ? वाफेचीं यंत्रें आल्यामुळें त्यांनीं मुळांतच काम करणारांची संख्या कमी केली. जरूरीपेक्षां मजूर पुष्कळ अधिक मिळूं लागल्यामुळें त्यांच्या मजुरीचे दर भरमसाट कमी झाले. त्यांतहि आणखी काटकसर करतां यावी म्हणून पुरुषांच्या ऐवजीं स्त्रिया आणि स्त्रियांच्याऐवजीं कोंवळीं मुलें कामावर घेऊं लागले. त्यामुळें मुलांना मागणी वाढली. आम्ही सांगूं तें व तितका वेळ काम; देऊं ती मजुरी आणि करूं तो न्याय, अशी चढेल, अमानुष वृत्ति होऊन, फायदा हें एकच कारखानदारांचें

ध्येय झालें आणि स्वार्थलोलुपतेला ऊत आला. कामगारांची स्थिति मात्र इतकी वाईट झाली कीं, तिचें वर्णन करणेंहि कठीण आहे!

## गरिबांना साहाय्य करणारा सरकारी निधि

ज्यांना मजुरी इतकी कमी मिळत असे कीं, तींत त्यांच्या कुटुंबाचा गुजारा होणें शक्य नाहीं अशांना, किंवा जे बेकार असत त्यांच्या कुटुंबाची उपासमार होऊं नये म्हणून त्यांना, कुटुंब लहानमोठें असेल त्याप्रमाणें गरिबाला साहाय्य करणाऱ्या सरकारी कायद्यान्वयेंच ( Poor Law ) स. १७९५ पासून मदत करीत. पण वर निर्दिष्ट केलेल्या परिस्थितीमुळें हा खर्च इतका वाढला कीं स. १८३४ मध्यें सरकारला माणशीं नऊ शिलिंग खर्च येऊं लागला. हा मनस्वी खर्च गरिबांकरितां होतो, असें सांगण्यांत येत असलें; तरी वस्तुतः तो खर्च म्हणजे मजुरांना अपुऱ्या पडत असलेल्या मजुरीची भरपाईच होती. त्यामुळें मजुरांचा कांहीं फायदा होत नव्हता. उलट त्यांच्या मजुरींत वाढ होण्याला तो एक अडथळा झाला होता. पण ते या मदतीमुळें कसेतरी जगूं शकत होते इतकेंच. यांत खरा फायदा कारखानदारांचा होता. कारण कराच्या रूपानें रयतेकडून वसूल झालेल्या पैशांतून अपुरी मजुरी मिळणाऱ्या कामगारांना अशा रीतीनें मदत मिळत होती व त्यामुळें कारखानदारांच्या पैशाची बचत होत होती. पण जनतेच्या पैशाची उधळपट्टी होत आहे, अशी शेवटीं ओरड होऊं लागली आणि याच सुमारास इंग्लंडांत कामगार व मध्यमवर्ग यांनीं आपल्या हातीं सत्ता यावी म्हणून जी मोठी चळवळ केली. तिच्यामुळें पार्लमेंटचीहि सुधारणा होऊन स. १८३४ मध्यें गरीबाला साहाय्य करणाऱ्या सरकारी निधीसंबंधीच्या कायद्यांत दुरुस्ती करण्यांत आली. याचा परिणाम या कायद्याची अंमलबजावणी पूर्वीं होत होती, तिच्या ती अगदीं उलट होण्यांत झाला. या दुरुस्त कायद्याप्रमाणें गरिबांना मदत करण्याचें काम सरकारनें धर्मगुरूंच्या हातून काढून घेऊन त्याकरतां नेमलेल्या सरकारी नोकरांच्या हातीं दिलें. मजुरांना अपुरी मजुरी मिळते; म्हणून त्यांना या निधींतून जी मदत मिळत होती ती साफ बंद केली. इतकेंच नव्हे; तर कोणाहि सशक्त माणसाला कोणत्याही प्रकारची मदत करणें गैर ठरवून जे स्त्रीपुरुष अशा मदतीची याचना करतील पण काम करण्यास तयार नसतील, त्यांना उद्योगगृहांत राहाण्याची शिक्षा देण्यांत येऊं लागली. पण या उद्योगगृहांची स्थिति इतकी वाईट होती कीं नरकवास पत्करला पण या उद्योगगृहांत राहाणें नको, असें लोकांना वाटूं लागलें. सारांश या कायद्याची अंमलबजावणी इतक्या कडक रीतीनें करण्यांत येऊं लागली कीं, त्याच्यामुळें मदतीची आशा वाटण्याऐवजीं त्यानें एक प्रकारचें भीतीचें वातावरण उत्पन्न केलें. ‘ भीक नको; पण कुत्रा आवर ’ या म्हणीप्रमाणें खरोखरच स्थिति झाली. आपल्या धोरणांत आपण एकदम बदल

करीत आहोंत, पण त्याचा गरीब, असहाय कामगारांवर कसा अनिष्ट परिणाम होईल, त्यांच्यावर अनपेक्षितपणें कसें संकट ओढवेल, याचीहि पर्वा करण्यांत आली नाहीं. त्यामुळें कांहीं काळ गरिबांचे खरोखरीच कल्पनातीत हाल झाले, उपासमारीचा प्रसंग आला आणि निदान जिवंत राहाण्यास सरकारी निधीचा उपयोग होत होता तोहि अशा रीतीनें नाहींसा झाला. या कायद्याची अशी कडक अंमलबजावणी नंतर शंभर वर्षें चालली आणि पुढें ज्या घडामोडी झाल्या त्याच्यावरून पाहातां एकंदरींत हा बदल गरिबांच्या हिताचाच झाला यांत संशय नाहीं.

या औद्योगिक क्रांतीच्या काळांत कामगारांची कल्पनातीत पिळवणूक झाली. अल्पवयी मुलांना व स्त्रियांना अनिष्ट परिस्थितींत कामाला लावून त्यांना अमानुषपणानें वागविण्यांत आलें, कामगारांनीं किती वेळ काम करावें याला मुळीं सीमाच राहिली नाहीं, कारखान्यांत आणि शहरांत कमालीचा गलिच्छपणा आला, कडक शिस्त, दडपशाहीवृत्ति, भीतीचें वातावरण, कामगारांच्या हालअपेष्टा; अडचणी; तक्रारी यांच्याबद्दल बेपर्वाई, शक्यतों कमी मजुरी आणि अधिक काम करून घेण्याचे प्रयत्न अशी एकंदर स्थिति झाली.

## मनु पालटला

या परिस्थितींत एकोणिसाव्या शतकाच्या मध्याच्या जरा पूर्वीं हळूहळू बदल होण्यास सुरवात झाली. कारखान्यांची वाढ चालू असल्यामुळें बेकारी कमी होऊं लागली. सुधारलेल्या पार्लमेन्टनें पहिली महत्त्वाची गोष्ट ही केली कीं कारखान्यासंबंधींचा कायदा स. १८३३ मध्यें प्रथम पास केला. त्यांत नऊ वर्षांच्या आंतल्या मुलांना कारखान्यांत कामाला लावणें बेकायदेशीर ठरविलें. तेरा वर्षांच्या आंतील मुलांना नऊ तासांपेक्षां जास्त वेळ कामास लावूं नये, तरुणांना रात्रीं काम देऊं नये असें ठरवून या साऱ्या गोष्टींची अंमलबजावणी बरोबर होते किंवा नाहीं हें पाहाण्यासाठीं एक सरकारी देखरेखखातें काढण्याचें ठरविलें. मजुरींत वाढ होऊं लागली, कारखान्यांच्या परिस्थितींत थोडा बदल होऊं लागला, कामगारांनाहि वाटूं लागलें कीं ज्या यंत्रामुळें ही परिस्थिति उत्पन्न झाली, त्या यंत्रांवर राग काढून, त्यांची आदळआपट करून, त्यांचा नाश करून किंवा 'या हालअपेष्टा कमी करूं,' असें नुसतें जोरानें सांगणाऱ्या पुढाऱ्यांच्या नादीं लागून, अविचारी कृत्यें करण्यानें फारसा फायदा होणार नाहीं. तेव्हां आहे ही स्थिति वाईट असली, तरी ती अपरिहार्य आहे असें मानून तींतूनच मार्ग काढला पाहिजे, हा समजुतीचा विचार स्थिरावला. गरिबांना मदत करणाऱ्या सरकारीनिधीच्या कायद्यांत मूलग्राही बदल करून त्याची अंमलबजावणीहि कडक रीतीनें होऊं लागल्यामुळें निरुपाय म्हणून अडीअडचणीच्या प्रसंगीं त्याच्या मदतीची अपेक्षा करावी; तर तीहि आशा आतां नाहींशी झाली होती. या कायद्याची

दुरुस्ती मुळीं याच हेतूनें करण्यांत आली होती कीं, आपला चरितार्थ चालविणें आणि आपल्यावर येणाऱ्या संभाव्य आर्थिक संकटाची आगाऊ तरतूद करणें ही प्रत्येक माणसाची नैतिक जबाबदारी आहे आणि भिक्षेवर जगणें हें लाजिरवाणें जिणें आहे. म्हणून या कायद्यान्वयें मिळणाऱ्या मदतीच्या अटी इतक्या कडक करण्यांत आल्या होत्या कीं, जो अगदीं पराकाष्ठेच्या विपन्नावस्थेंत असेल त्यानें या मदतीची याचना करावी आणि इतरांना या औद्योगिकगृहांचें नांव घेतलें कीं, अंगावर शिसारी यावी.

अशा स्थितींत जें औद्योगीकरण घडून आलें आहे, तें अनिष्ट असलें तरी तसेंच राहाणार असें गृहीत धरून त्याला प्रतिकार करण्यापेक्षां आपलें बळ एकवटून व संघटित करून आपल्या पायावर उभें राहाण्याचा प्रयत्न केला पाहिजे, असें लोकांना वाटूं लागलें आणि कामगारांच्या राहाणीचें मान वाढविण्यासाठीं व त्याचें संरक्षण करण्यासाठीं कामगारसंघ, सहकारी चळवळ, मित्रमंडळें वगैरे मार्गांनीं आपली सुधारणा करण्याकडे त्यांची विशेष प्रवृत्ति झाली. बचत करण्याची चळवळ सुरू झाली. तिच्यावर वाङ्मय तयार झालें. नीतिशास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ बचत करण्यापासून कसे फायदे होतात, हें समजावून देऊं लागले; इतकेंच नव्हे, तर या संचयीपासून इहलोकीं तर सुख लागेलच पण परलोकींहि आनंद होईल, असें सांगण्यापर्यंत मजल गेली आणि अडीअडचणीच्या दिवसांसाठीं, म्हातारपणासाठीं, बेकारीच्या दिवसांतील उपासमार टाळण्यासाठीं जी काय थोडीबहुत बचत करतां येईल ती करून स्वावलंबी होण्याची चळवळ जोरांत उत्साहानें सुरू झाली. अर्थातच यांतल्या कांहीं चळवळी सुरू करण्याचे प्रयत्न पूर्वी पुष्कळ वर्षांपासून करण्यांत आले होते; पण ते अनेक प्रकारच्या अडचणींमुळें मूळ धरूं शकले नव्हते. आतां निरनिराळ्या चळवळी एकमेकांना जोडून, परस्परांच्या साहाय्यानें, प्रोत्साहनानें सुरू झाल्या आणि पुढें त्यांची इतकी वाढ झाली कीं परस्परांच्या सहानुभूतीची आवश्यकता असली, तरी प्रत्यक्ष मदतीची जरूरी नाहींशी झाली आणि स्वतःच्या स्वतंत्र प्रयत्नांवर त्यांनीं आपला संसार कल्पनातीत वाढविला. मित्रमंडळांसारख्या संस्थांनीं चालविलेलें कार्य आज जरी सरकारनें आपल्या हातीं घेतलेलें असलें तरी त्यांच्या यशाचें मूळ देशांतील आर्थिक प्रश्नांचें सखोल ज्ञान, पैशाची चोख व्यवस्था आणि व्यवहार करतांना अनुसरलेलें सहानुभूतीचें धोरण, यांत होतें आणि आजहि या गोष्टींची तितकीच आवश्यकता आहे; हें विसरतां नये. आणि या साऱ्या चळवळींचा हेतु एकच—परस्परांना स्वयंस्फूर्तीनें, निस्वार्थ बुद्धीनें साहाय्य करून सर्वांना स्वावलंबी, सुखी, सामर्थ्यवान् आणि कार्यप्रवण करणें, हा होता. वर म्हटल्याप्रमाणें यांतलीं कांहीं कामें आतां सरकार स्वतःच चालवीत असलें तरी ज्या प्रेरणेनें या योजना लोकांनीं हातीं घेतल्या आणि आपलें तनमनधन त्यांना अर्पण करून त्या यशस्वी केल्या, ती प्रेरणा यांतून नाहींशी होतां कामा नये.

इंग्लंडचा उज्ज्वल भूतकाळ भविष्यकाळांतहि कायम राहावयास हवा असल्यास कोणत्या ना कोणत्या मार्गानें हा स्फूर्तीचा झरा पुढेंहि असाच झुळझुळ वाहात राहिला पाहिजे; आटतां कामा नये, असें तज्ज्ञाचें मत आहे.*

## मित्रमंडळें

औद्योगिक क्रांतीमुळें अगदीं असहाय स्थितींत असतांना आत्मोन्नतीसाठीं कामगारांनीं जे प्रयत्न केले त्यांत मित्रमंडळाच्या ( Friendly Societies ) चळवळीचा समावेश होतो. सरकारच्या मदतीशिवाय चाललेल्या या चळवळीला उत्तेजन, साहाय्य आणि सवलती देण्यांत याव्यात म्हणून स. १७९३ सालीं इंग्लंडमध्यें एक कायदा करण्यांत आला. जॉर्ज रोझ या पार्लमेन्टच्या सभासदानें या कामीं पुढाकार घेतल्यामुळें याला ' रोझ कायदा ' असेंहि म्हणतात. त्यांत या मित्रमंडळाची व्याख्या अशी दिली आहे कीं, " सभासदांना म्हातारपणांत, आजारीपणांत किंवा दुसऱ्या कांहीं शारीरिक कमकुवतपणांत मदत मिळावी तसेंच त्यांच्यामागें त्यांच्या विधवा व मुलें यांना मदत मिळावी किंवा त्यांचा चरितार्थ चालावा म्हणून सभासदांनीं वेळोवेळीं स्वखुशीनें दिलेली वर्गणी गोळा करून एक निधि जमविण्याकरतां सद्गृहस्थानीं काढिलेली संस्था. " पण हा कायदा पास झाला किंवा सरकारनें मदत केली म्हणून हीं मंडळें जन्माला आलीं असा मात्र कोणी आपला गैरसमज करून घेऊं नये. हा कायदा होण्यापूर्वी कैक वर्षें–दोन तीनशें वर्षें ही चळवळ सुरू झाली होती आणि ती जन्मास येण्यास परस्परांविषयीं वाटणारा बंधुभाव आणि सांपत्तिक अडचणींतून कांहींतरी मार्ग काढण्याची प्रबळ इच्छा हीं कारण झालीं होतीं. हीं मंडळें ग्रेट ब्रिटनच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत सर्व देशभर सामान्य लोकांत पसरलीं होतीं. परंतु औद्योगिक क्रांतीमुळें उत्पन्न झालेल्या नवीन परिस्थितींत, त्यांतल्या त्यांत कामगारांना त्यांचा उपयोग फार झाला.

या क्रांतीच्या स्थित्यंतरांत लोक आपलीं खेडीं सोडून शहरांत जाऊं लागले होते. लहान लहान खेड्यांचीं मोठमोठीं शहरें होण्यास नुकताच आरंभ झाला होता. आणि त्याबरोबरच शेजारधर्माचें नातें तुटल्यामुळें लोकांत आपलेपणाचा भाव नाहींसा होत होता. मूळच्या गांवीं कैक पिढ्यांचे रहिवाशी असल्यामुळें वाण्याउदम्यांकडे त्यांची पत असे आणि म्हणून त्यांचेकडून दाणागोटा उधार मिळण्याला त्यांना केव्हांहि अडचण पडत नसे. अडीअडचणीला गांवांतील कोणीहि मनुष्य–प्रसंगीं वैरीसुद्धां–उपयोगी पडत असे आणि कोणत्याहि वेळीं कसलीहि अडचण आली, तरी ती या शेजारधर्मामुळें निभावून नेण्यास फारसें कठीण पडत नसे. गांव सोडतांच हे सारे

* Voluntary Action by Lord Beveridge p. 117.

स्नेहसंबंध नाहींसे होतात आणि परगांवीं व वेगळ्या परिस्थितींत संकट आल्यास–अशा परिस्थितींत संकटांची संख्या कमी होण्याऐवजीं नेहमीं वाढतच असते–त्यांतून निभावणें माणसाच्या शक्तीच्या बाहेरचें होतें. अशा वेळीं मित्रमंडळांची मदत म्हणजे खरोखरीच आकाशांतून पडल्याप्रमाणें होती. पूर्वपरंपरा तुटल्यामुळें मनुष्य अगदीं निराधार झालेला असतो; परंतु या नवीन ठिकाणीं त्याला आवश्यक असलेले मित्र व प्रसंगीं उपयोगी पडणारे शेजारी या मित्रमंडळामुळें मिळत. हें मित्रमंडळ म्हणजे खरोखरीच मित्राचा पुरवठा करणारी संस्था असे आणि हे सारे लोक सामान्यतः सारख्याच परिस्थितींतले असल्यामुळें हा स्नेहसंबंध चिरस्थायी होई. हीं मित्रमंडळें म्हणजे जरा मोठ्या प्रमाणांत कुटुंबेंच असत. याशिवाय या संस्थांपासून दुसरा प्रत्यक्ष फायदा हा असे कीं, विमा कंपन्यांच्या तत्त्वाप्रमाणें दर आठवड्याला थोडे पैसे ठेवून आयुष्याच्या विम्याप्रमाणें आकस्मिक येणाऱ्या पैशाच्या अडचणींचा विमा या मंडळांत उतरतां येई. म्हणजे हे पैसे नियमित देत गेल्यानंतर घरांतील एखादें मनुष्य मृत्यु पावल्यास त्याच्या उत्तरक्रियेकरितां, अथवा आजारीपणाकरितां किंवा अशाच अन्य प्रकारें अनपेक्षित रीतीनें येणाऱ्या खर्चाकरितां या संस्थेंतून पैसे मिळत आणि ते धर्मार्थ किंवा उसने मिळत नसत तर आपले स्वतःचे–आपल्या हक्काचे म्हणून मिळत. अगदीं अल्पमजुरी मिळविणाऱ्या कामगाराला एकदम दत्त म्हणून उभ्या रहाणाऱ्या मोठ्या खर्चाकरितां आगाऊ पैसे सांठवून ठेवणें शक्य नसतें. त्याच्या ओढघस्तपणामुळें त्याची अशी स्थिती असणें अपरिहार्य असतें. परंतु आठवड्याची मजुरी हातीं पडतांच तींतून भावी संकटाची तरतूद करण्याकरितां लहानशी रक्कम अशा संस्थेकडे भरणें फारसें कठीण जात नाहीं. आणि दर आठवड्याला लक्षावधि लोकांकडून अशा रकमा नियमितपणें येत असल्यामुळें अडचणींत पडलेल्या थोड्या लोकांना सांपत्तिक मदत देणें संस्थेलाहि फार जड जात नाहीं. अशा संस्था सुरळित चालण्यास व लोकप्रिय होण्यास आस्थेवाईक, स्थिर बुद्धीचीं व संस्थेच्या सभासदांच्या विश्वासास पात्र अशीं चालक माणसें असावीं लागतात. इंग्लंडांतील कामगारवर्गाच्या सुदैवानें अशा स्वार्थत्यागी पण विश्वासू माणसांची त्यांना कधीं वाण पडली नाहीं. हीं माणसें या आपल्या संस्था उत्तम रीतीनें चालवितात यांत कांहीं आश्चर्य नाहीं; पण याच नमुन्यावर सरकारद्वारें विमा उतरण्याचा कायदा (National Health Insurance Act) सरकारनें जेव्हां पास केला, तेव्हां तो यशस्वी करण्याला कामगारांचेंच सरकारला मुख्यतः साहाय्य झालें. यावरून या संस्थांकडून इंग्लंडांत आज समाजसेवेचें केवढें कार्य होत आहे याची कल्पना येईल. शिवाय अशा प्रकारच्या संस्था चालविल्यानें, त्यांच्या कमिट्यांत व पोटकमिट्यांत कामें केल्यानें, त्यांच्या कार्यकारी मंडळांचे सभासद झाल्यानें लोकशाहीच्या तत्त्वावर संस्था चालविण्याची माहिती होते ती वेगळीच. हा लाखों रुपयांचा द्रव्यनिधि अगदीं सामान्य कामगार स्त्रीपुरुषांच्या हातीं देण्यांत

यावा; त्याची त्यांनीं बिनबोभाट, यथानियम विल्हेवाट लावावी, यावरून कामगारांची कार्यक्षमता निःसंशय दिसून येते. पण याशिवाय एवढ्यातेवढ्याकरितां दुसऱ्यावर –दुसऱ्या वर्गांतील लोकांवर अवलंबून न राहातां आपला कारभार आपण स्वतःच पहावयाचा हें त्यांच्या आत्मविश्वासाचें व जनतेच्या त्यांच्यावरील विश्वासाचें खचित द्योतक होय.

जुन्यांतली जुनी पण आजपर्यंत अस्तित्वांत असलेली क्लार्कनवेल येथें निघालेली गोल्डस्मिथस् फ्रेंडली सोसायटी स. १७१२ मध्यें स्थापन झाली. स. १९४५ मध्यें तिचे ७४ सभासद व ४४३५ पौंडांचें भांडवल होतें. आजहि अशा अनेक संस्था आहेत कीं ज्या स. १५५५ पासून अस्तित्वांत असून त्यांना फ्रेंडली सोसायटी हें नांव नसलें तरी याच उद्देशानें त्या निघालेल्या आहेत व हेंच कार्य आजतागायत अखंड व यशस्वी रीतीनें करीत आहेत. पण स. १७९३ सालीं पास झालेल्या कायद्या मुळें त्यांना सरकारी मान्यता मिळाली, साहाय्य मिळालें आणि कांहीं विशेष सवलतीहि मिळाल्या. स. १८२९ मध्यें या कायद्यांत दुरुस्ती होऊन कांहीं अनपेक्षित आणी-बाणीच्या प्रसंगींहि या निधींतून सभासदांना पैसे मिळण्याची तरतूद करणारी सवलत मिळाली. स. १८५० मध्यें पुनः या कायद्यांत दुरुस्ती करण्यांत आली आणि स्वतः सभासदांच्या व त्यांच्या बायकामुलांच्याच नव्हे तर इतर संबंधी माणसांच्याहि अंत्य-विधींना या निधींतून मदत मिळविण्याची परवानगी मिळाली.

घरांतलें मुख्य मिळवतें माणूस आजारी पडलें आणि घरांत पैसे येणें बंद झालें कीं मुख्यतः या निधींतून पैसे घेण्याची आवश्यकता भासते. अशा अडचणीच्या प्रसंगीं मदत मिळविण्याचें एखादें खात्रीचें एकमेव ठिकाण असावें हेंहि या निधीची स्थापना करण्याची आवश्यकता भासण्याचें मुख्य कारण होतें. वर्षाकांठीं अगदीं अड-चणीच्या वेळीं एकदम मोठी रक्कम मिळते आणि मृत्यूनंतर अंत्य संस्कारासाठीं कोणतीहि अडचण न पडतां किंवा कोणाकडेहि तोंड वेंगाडण्याचा प्रसंग न येतां चटकन आपली हक्काची म्हणून रक्कम मिळते हींहि दोन कारणें या निधीची आव-श्यकता भासण्यास कारणीभूत झालीं, असें मानण्यांत येतें. सामान्य माणसाच्या आयुष्यांत अनपेक्षितरीत्या नेहमीं येणाऱ्या पैशाच्या अडचणींच्या प्रसंगाची तीव्र जाणीव, त्यांची तरतूद करण्याची प्रबळ इच्छा, यामुळें नियमित हप्ता देण्याची स्वयं-प्रेरणेनें लावून घेतलेली संवय, निधीच्या हिशोबाची ठेवण्यांत आलेली चोख व्यवस्था, या गोष्टी या चळवळीच्या कल्पनातीत यशाला कारणीभूत झाल्या.

## प्रेतसंस्कारासाठीं मदतीची याचना

मनुष्य मेला कीं त्याचा अंत्यसंस्कार करणें ही अत्यंत महत्त्वाची तशीच बऱ्याच खर्चाची बाब सर्व धर्मांत आहे. ख्रिस्ती धर्म याला अपवाद नाहीं. गरीब स्थितींतील

मनुष्य किंवा त्याचा एखादा नातेवाईक वारला कीं अंत्यसंस्कारासाठीं खर्च तर करावयाला हवा पण जवळ तर कांहीं नाहीं अशी दीन स्थिति पुष्कळांची असते. विशेषतः पैशाच्या अभावीं हा विधि मनासारखा झाला नाहीं तर ती गोष्ट मृताच्या नातेवाईकांच्या मनाला सारखी जन्मभर टोंचत राहाते. बरें मृत्यु कधीं येईल कोणाला कांहीं सांगतां येत नाहीं. शिवाय मनुष्य मेला आणि त्याच्या घरांत दुसरें मिळवतें माणूस नसलें कीं निदान कांहीं दिवस तरी त्याच्या मुलामाणसांच्या पोटाची व्यवस्था होणें अत्यंत आवश्यक असतें. म्हणून इंग्लंडमध्यें पूर्वी एखादा गरीब कामगार मृत्युमुखीं पडला कीं, त्याच्या प्रेतसंस्काराला आणि त्याच्या कुटुंबाला अल्पस्वल्प मदत मिळावी म्हणून त्याचे आप्तमित्र आपली टोपी पुढें करून लोकांकडे मदतीची याचना करीत आणि अशा रीतीनें जे काय पैसे त्या टोप्यांत पडतील ते त्याच्या बायकोच्या स्वाधीन करीत. अशा प्रकारें पुष्कळदां रुपया बारा आणेच मिळत. कारण साऱ्यांचीच अगदीं गरीब स्थिति असावयाची. पण अशा रीतीनें तहान लागली कीं विहीर खणावयास निघणें चांगलें नाहीं. शिवाय त्यामुळें अंत्यविधीला खोटी लागून गैरसोय फार होते. याकरितां निदान एका माणसाच्या प्रेतसंस्काराला पुरे होतील एवढे पैसे तरी आपल्याला नेहमीं तयार ठेवतां यावेत म्हणून आपसांत वर्गणी काढून असा एक निधि काढण्याची कल्पना कांहीं लोकांना सुचली. ती प्रत्यक्ष अमलांतही आणण्यांत आली. प्रेतसंस्काराची व्यवस्था करणारे असे कांहीं क्लबही निघाले, पण ते फार दिवस टिकूं शकत नाहींत असा अनुभव आला. आपल्या अंत्यसंस्काराच्या खर्चाची व्यवस्था कशी करावी ही एकच विवंचना कामगारांना होती असें नाहीं; तर आजारीपणांत उत्पन्न थांबल्यामुळें त्यांचे फार हाल होत. दुसऱ्याहि अडचणी होत्या. म्हणून शहरांत किंवा खेड्यांत आसपास राहाणाऱ्या आणि चांगल्या संवयी असलेल्या दहाबारा लोकांनीं कामावरून आल्यानंतर एखाद्या सार्वजनिक घराच्या मागें काळोख असलेल्या खोलींत किंवा दुसऱ्या कोणत्या मिळेल त्या जागेंत एकत्र जमावें, आपसांत विचार-विनिमय करावा, कांहींतरी ठराविक अडचणींच्या वेळीं मदत मिळावी म्हणून आठवड्याला, महिन्याला किंवा तिमाहीला कांहीं वर्गणी देण्याचें ठरवून त्यासंबंधीं कांहीं नियम करावेत व प्रत्यक्ष कार्यास आरंभ करावा आणि आपल्या मैत्रींत कोणत्याहि तऱ्हेनें बिघाड होणार नाहीं याची काळजी घेऊन परस्परांना मदत करावी. अशी अगदीं लहान प्रमाणांत या बहुतेक मित्रमंडळांची सुरुवात झालेली आढळते. अडीअडचणीच्या वेळीं आपल्याला पैशाची गरज लागते तशी आपल्या शेजाऱ्यालाहि लागते, आपल्या अडचणी आहेत तशा आपल्या शेजाऱ्याच्याहि आहेत, आपलें काम व्हावें, तसें दुसऱ्याचेंहि काम व्हावें असा बंधुभाव, दुसऱ्याला साहाय्य करण्याची उत्कट इच्छा, पैशाची बचत आणि अडचणींच्या प्रसंगाची तरतूद अशी

यांत चार महत्त्वाचीं तत्त्वें गोवलेलीं आहेत आणि म्हणूनच मित्रमंडळ हें अन्वर्थक नांव या संस्थांना दिलेलें आहे. अत्यंत लहान प्रमाणांत आरंभ आणि आपल्या अगदीं शेजारच्या, आळींतल्या किंवा लहानशा गांवांतल्या ठराविक लोकांपुरतेंच लहान प्रमाणांतच कार्य हें या चळवळीचें आणखी एक वैशिष्ट्य होतें. अशा प्रकारची लहान लहान मित्रमंडळें अगदीं एका बाजूला दूरदूरच्या ठिकाणीं वर्षानुवर्षें कार्य करीत आलीं आहेत. या मंडळांचा इतिहास मोठा आश्चर्यकारक आहे. पुष्कळ मंडळांचे नियमच असे आहेत कीं अमुक इतके-पुष्कळदां शंभरापेक्षांही कमी-सभासद असावेत.

## साहाय्य करण्याच्या नानाविध योजना

मुख्यतः आजारीपणांत किंवा प्रेतसंस्काराला मदत करण्यासाठींच म्हणून हीं मंडळें प्रथम निघालेलीं असलीं तरी दुसऱ्या अनेक प्रकारची मदत तीं हळूहळू करूं लागलीं. कांहीं मदत सभासदांकडून हप्त्याहप्त्यानें पैसे घेऊन जो सर्वसामान्य निधि जमला असेल त्यांतून करीत; तर कांहीं मदत त्या विशिष्ट गोष्टीसाठीं जो निधि जमविला असेल त्यांतून करीत. या मदतींत सामान्यतः बाळंतपणांत, म्हातारपणांत किंवा ठराविक वय झालें कीं मिळणाऱ्या रकमेचा अंतर्भाव होतो. हीं सर्व मंडळें सभासद आजारी पडला कीं डॉक्टरची फी, औषधाचे पैसे व मंडळाच्या निधींतून मदत मिळण्यासाठीं लागणारा दाखला याचा खर्च देतात. कांहीं मंडळें सभासदांना याशिवाय विशेष अडचणीच्या वेळींहि मदत देतात. कांहीं मोठीं मंडळें सभासद आजारांतून बरा झाला कीं त्याला हवेवर पाठविण्याची व्यवस्था करितात. हीं आरोग्य-मंदिरें त्यांनीं आपल्या निधींतून बांधलेलीं असतात. सभासदांना बचत करण्याची संवय लागावी म्हणून कांहीं मंडळें त्यांच्या ठेवी घेतात आणि कांहीं ठराविक मुदतीनंतर, ठराविक वय झाल्यावर किंवा मंडळाचें सभासदत्व सोडल्यानंतर व्याजासह त्या परत करतात. कांहीं मंडळांनीं कांहीं ठराविक बाबींसाठीं मदत करण्याची योजना तयार केलेली असते. उदाहरणार्थ विधवा, आईबाप किंवा दोहोंपैकीं एक जिवंत नसलेल्या माणसांची मुलें यांना पैशाची मदत करण्याची व्यवस्था करतात, कधीं अपघात झाल्यास मदत करतात. तसेंच ठराविक वेळीं ठराविक रक्कम सतत कांहीं वर्षें मिळण्याची व्यवस्था, पेन्शन मिळण्याची व्यवस्था, रुग्णालयासारख्या एखाद्या संस्थेंत कांहीं कारणास्तव राहाण्याचा प्रसंग आपल्यास ती व्यवस्था, अशीं नानाविध प्रकारें व्यवस्था करतात. याशिवाय सभासदांना ठराविक वेळीं वार्षिक रक्कम देणारीं मंडळें आहेत. तींहि फार लोकप्रिय आहेत. त्यांची व्यवहार करण्याची पद्धति अशी असते कीं सभासदांना वेळोवेळीं येणाऱ्या वरीलसारख्या अडचणींच्या प्रसंगीं पैशाचें साहाय्य तर करावयाचेंच; पण हें सारें करून वर्षाच्या शेवटीं जे पैसे शिल्लक राहातील त्यांतून पुढील वर्षाच्या खर्चासाठीं थोडी रक्कम शिल्लक ठेवून बाकीचा निधि

सभासदांना सारखा वांटून टाकावयाचा. पण या पद्धतींत असा एक धोका असतो कीं सभासद जर तेच राहिले तर त्याचें वय वाढत जातें आणि त्यामुळें त्यांना द्यावयाची आजारपणाची मदत जास्त जास्त वाढत जाते आणि हप्ते तेच राहिले व नवीन तरुण सभासद येऊन याचें सर्वसामान्य प्रमाण वाढलें नाहीं; तर वर्षाकांठीं मिळणारी रक्कम कमी होते. आणि तसें झालें तर त्याबरोबर मंडळाची लोकप्रियताहि कमी होऊन तें संपुष्टांत येण्याची भीति असते. पण सामान्यतः नवीन तरुण सभासद ठराविक प्रमाणांत घेऊन ही आपत्ति टाळतां येण्यासारखी असते. सोमरसेटमधल्या स्टीपल फिट्झपेन या नांवाच्या अगदीं दूरच्या खेड्यांतल्या रे. मि. पोर्टमन या धर्मोपदेशकांनीं स. १८७४ त इंग्लंडांतील रॉयल कमिशनपुढें साक्षी देतांना आपल्या गांवच्या मंडळासंबंधीं सांगितलें, "वर्षाच्याशेवटीं असे पैसे वांटणें शहाणपणाचें नाहीं असें कांहीं माणसें म्हणतात; पण लोकांना ही पद्धत आवडते. आपल्या पसतीस वर्षांपेक्षां जास्त वर्षांच्या अनुभवावरून आपण कसें सांगूं शकतों कीं, वर्षाशेवटीं मिळणारी ही पंचवीस तीस शिलिंगांची रक्कम इतरांना क्षुल्लक वाटली; तरी गरीब शेतकऱ्यांच्या दृष्टीनें ती फार मोठी आणि महत्त्वाची असते. सामान्यतः तिचा ते गैर उपयोग करीत नाहींत असा अनुभव आहे. पुष्कळदां बूट, कपडे, डुकरासारखे प्राणि अशा जरूरीच्या वस्तु विकत घेण्यांत हे पैसे ते खर्च करतात." या प्रकारचीं मंडळें फार लोकप्रिय झालीं आहेत आणि तीं जनतेची एक महत्त्वाची गरज भागवीत असल्यामुळें नाहींशीं होण्याचा संभव नाहीं. विशेषतः आजारीपणांत मदत मिळावी आणि कांहींतरी बचत होऊन वर्षाच्या शेवटीं पुन्हा कांहींतरी रोख रक्कम मिळावी ही जी त्यांतील विशेष सोय आहे, तीमुळें त्यांची लोकप्रियता वाढत आहे. यांतलीं पुष्कळ मंडळें अठराव्या शतकापूर्वी अस्तित्वांत आलीं पण आज विसाव्या शतकांतहि त्यांची लोकप्रियता वाढत आहे व त्यांमध्यें सारखी प्रगति होत आहे.

'नॅशनल डिपॉझिट फ्रेंडली सोसायटी' म्हणून या मंडळाच्या योजनेचा एक प्रकार आहे. तींत सभासद जो हप्ता देतो, त्यांतून कांहीं भाग सोसायटीच्या व्यवस्थेसाठीं जातो, कांहीं भाग आजारीपणांत देण्यांत येणाऱ्या मदतीच्या निधींत जातो आणि राहिलेला भाग सभासदांच्या बचत खात्यांत जमा होतो. समासदांच्या बचत खात्यांतली ही रक्कम चक्रवाढ व्याजानें वाढत जाते. आपल्या गरजा आणि आपली परिस्थिति यांच्याप्रमाणें प्रत्येक सभासद आरंभींच आपल्या मासिक हप्त्याची रक्कम दोन ते वीस शिलिंगपर्यंत ठरवितो. आजारीपणांत मिळवावयाच्या मदतीसाठीं तो जो हप्ता महिन्याला देतो तेवढीच रक्कम तो आजारी पडल्यास त्याला दररोज मिळते. याशिवाय सभासदाला दर वर्षाला तीन पेन्सांपासून तीस पौंडांपर्यंत रक्कम आपल्या बचत खात्यांत भरावयास लावण्यांत येते. त्यामुळें आजारीपणांत त्याला मिळणाऱ्या

रकमेंत फरक पडत नाहींच; उलट ती अधिक दिवस मिळत राहाते. कारण आजारीपणाची मदत कांहीं प्रमाणांत आजारीपणाच्या स्वतंत्र निधींतून आणि कांहीं प्रमाणांत वैयक्तिक बचत निधींतून देण्यांत येते. पण सुदैवानें तो फारसा आजारीच पडला नाहीं तर तो सेवानिवृत्त होईपर्यंत किंवा तो सभासदत्व सोडीपर्यंत त्याच्या वैयक्तिक खात्यांत मोठी रक्कम जमा होते. दैववशांत याच्या उलट स्थिति झाली; तर त्या प्रमाणांत त्या दोन्ही निधींवर त्याचा अनिष्ट परिणाम होतो. पण कांहीं झालें तरी या पद्धतीनें सभासदाच्या आजारीपणाची समाधानकारक व्यवस्था होते आणि त्याच्याशिवाय पैशाची बचत करण्याचीहि संवय लागते. त्यामुळें एकंदरींत ही योजना विशेष फायदेशीर ठरली आहे.

## नावीन्यपूर्ण कल्पना

आणखी कांहीं नावीन्यपूर्ण कल्पना असलेलें एक मंडळ स. १८७४ मध्यें मि. जार्ज हॉलोवे यांनीं काढलें आणि पुढें हीं मंडळें त्याच नांवानें ओळखलीं जाऊं लागलीं. त्यांत आजारीपणांत पैसे मिळण्याची सोय आणि वैयक्तिक बचत या दोन्ही गोष्टींचा संयोग करण्यांत आला, पण तो जरा निराळ्या रीतीनें. या नवीन मंडळांत महत्त्वाचा फरक हा होता कीं सभासदाला आजारीपणांत लागणाऱ्या मदतीपेक्षां बरीच मोठी रक्कम हप्ता म्हणून त्याच्याकडून घ्यावयाची आणि ती प्रथम एकाच निधींत जमा करावयाची. वर्षाच्या शेवटीं मंडळाचा खर्च आणि सभासदांना आजारी-पणांतली मदत देऊन जो निधि शिल्लक राहील तो सर्व सभासदांत सारखा वांटावयाचा. अशा रीतीनें प्रत्येक सभासदाच्या वाटणीला आलेली रक्कम त्याच्या वैयक्तिक खात्यांत जमा करावयाची आणि तो मंडळ सोडील, तेव्हां त्याला ती व्याजासह द्यावयाची. या पद्धतींत आणखी एक वैशिष्ट्य हें होतें कीं, यांत तीस वर्षांच्या वयापर्यंत साऱ्या सभासदांना हप्त्याची रक्कम सारखी असे पण त्यानंतर आजारीपणाचा धोका वाढत्या प्रमाणांत असल्यामुळें हप्त्यांत थोडी वार्षिक वाढ करण्यांत येई शिवाय शक्य असल्यास दहापर्यंत भाग प्रत्येकाला घेतां येत आणि वर्षाला मिळणारा फायदा भागाच्या प्रमाणांत सर्व सभासदांना सारखा वांटण्यांत येई. सारांश आजारीपणाची व म्हातारपणाची अशा दोन्ही प्रकारच्या सोयी एकदम करण्यांत येत. अशा रीतीनें हॉलोवे सोसायटींचें सामाजिक आणि सांपत्तिक अडचणींच्या वेळीं लोकांना फार मोठें साहाय्य होत असे या नवीन कल्पनेमुळें अशीं मंडळेंहि बरींच लोकप्रिय झालीं. या पद्धतीला थोडें धंद्याचें स्वरूप आलेलें दिसलें तरी तिचा हेतु फायदा मिळवणें हा नसून जनतेच्या त्यांच्या अडचणींच्या वेळीं उपयोगी पडणें हाच होता.

## समाजाला स्वावलंबी करणाऱ्या चळवळी

१०२२० आनुक्रम १२१ नों. दि.

# विमा उतरण्याची कल्पना

इंग्लंडांत आपल्या किंवा आपल्यावर अवलंबून असलेल्या माणसांच्या अंत्यविधीची तरतूद करणें, हें आजारीपणांत लागणाऱ्या मदतीची व्यवस्था करण्याइतकेंच जरूरीचें मानण्यांत येतें म्हणून अंत्यविधीची तरतूद, आजारीपणांत मदत मिळण्याची व्यवस्था आणि कार्यप्रस्थांत खर्चासाठीं एकदम मोठी रक्कम मिळण्याची सोय या तीन प्रकारच्या गरजा भागविणें हाच हीं मित्रमंडळें काढण्याचा मूळ उद्देश होता आणि याच प्रयत्नांतून औद्योगिक विम्याची–धंद्याच्या एका आधुनिक प्रकाराची–कल्पना निघाली. स. १७७४ सालीं पार्लमेन्टचें लक्ष या मित्रमंडळांच्या चळवळींकडे जेव्हां प्रथम गेलें, तेव्हां विम्याला जुगाराचें स्वरूप येऊं नये, म्हणून विमा उतरणें–एक मनुष्य मेल्याबद्दल दुसऱ्या माणसाला पैसे देणें-हें त्यावेळच्या कायद्याप्रमाणें बेकायदेशीर मानण्यांत येत होतें. फक्त आपल्या मागें ज्या माणसांच्या चरितार्थाची कायद्याप्रमाणें व्यवस्था करणें आवश्यक तेवढ्यापुरताच आणि त्या करतांच विमा उतरतां येत होता. या कायद्याच्या चमत्कारिक अर्थामुळें, एक प्रकारच्या अडवणुकीमुळें श्रीमंतांची कांहीं गैरसोय होत नव्हती पण गरिबांची मोठी अडचण होत होती. विशेषतः अंत्यविधीच्या बाबतींत त्यांना आपली किंवा आपल्या नातेवाईकांची कायदेशीर रीत्या कांहीं व्यवस्था करितां येत नव्हती. आणि जिवंतपणीं एखाद्या भिकाऱ्यासाठीं बांधलेल्या गृहांत राहिलेलें पुरवलें; पण निदान मेल्यावर तरी आपल्या प्रेतसंस्कारासाठीं अशा एखाद्या धर्मार्थ संस्थेंतून खर्च होऊं नये, असें फार लोकांना मनापासून वाटे. तसा खर्च घ्यावा लागणें ही अत्यंत लाजिरवाणी, खंत वाटण्यासारखी गोष्ट होय, अशी खरोखरी त्यांची भावना असे. जिवंतपणीं पारतंत्र्यांत असलेलें पुरवलें, पण मरणोत्तर तरी स्वातंत्र्य असावें, असें अनेकांना वाटे. अशा प्रकारें अत्यंत प्रतिकूल परिस्थितींत महत्त्वाचें समाजसेवेचें कार्य करणाऱ्या या मित्रमंडळाला वर उल्लेख केलेल्या स. १७७४ सालच्या कायद्यानें कांहीं सवलती दिल्या. पुढें पाऊणशें वर्षांनीं म्हणजे स. १८५० मध्यें या कायद्यांत दुरुस्ती करून बायको, मुलें, नातेवाईक यांच्या अंत्यविधीचा विमा उतरण्याची परवानगी या मंडळांना देण्यांत आली. त्यामुळें आजारीपणाचा विमा उतरण्याचें काम करणाऱ्या मंडळांना हेंहि हातीं घेणें सोपें झालें व त्यांनीं तें घेतलेंहि.

वर वर्णन केलेली स्थिति साधारणपणें खेड्यांत होती. शहरांत आणि विशेषतः औद्योगिक शहरांत अंत्यविधीच्या खर्चाची अडचण नाहींशी करण्याचे प्रयत्न व्यापारी तत्त्वांवर करण्यांत येत होते. तो एक नवीनच धंदा अस्तित्वांत आला होता. आठवड्याला कामगारांच्या घरीं जाऊन अंत्यविधीच्या विम्याच्या हप्त्याच्या लहान लहान रकमा गोळा करणें आणि जी रक्कम जमा होईल, तीमधील कांहीं भाग

आपली दलाली म्हणून घेणें, हा कांहीं लोकांचा धंदाच झाला होता. अशा संस्था जोडधंदा म्हणून एकोणिसाव्या शतकाच्या मध्यावर मोठ्या प्रमाणांत अस्तित्वांत आल्या आणि त्यांची सत्ता हळूहळू हप्ते देणारांच्या हातांतून हप्ते वसूल करणाऱ्या धंदेवाईक लोकांच्या हातीं गेली. हा बदल त्यांची चौकशी करणाऱ्या रॉयल कमिशनला पसंत पडला नाहीं. अशा प्रकारें अंत्यविधीचा विमा उतरणाऱ्या संस्थांबद्दल त्यांचें फार वाईट मत झालें. त्यांचा ग्रह असा झाला कीं, लहान मुलांचा विमा उतरला कीं तीं लौकर मृत्युमुखीं पडतात. आणि हें आपलें म्हणणें बरोबर आहे हें सिद्ध करण्यासाठीं त्यांनीं तसे आंकडेहि दाखविले. निदान तीन वर्षांच्या आंतल्या मुलांचे तरी असे विमे उतरूं नयेत, अशी त्यांनीं शिफारस केली ! अंत्यविधीचा विमा उतरण्याचें काम करणाऱ्या संस्थांच्या व्यवस्थेला खर्च फार होतो व हप्ते मध्यें थकल्यामुळें विम्याच्या पॉलिसी फार बुडतात, म्हणून सरकारनेंच हें काम आपल्या हातीं घ्यावें अशी त्या कमिशननें शिफारस केली.

पुढें स. १९११ मध्यें कामगार व कारखानदार यांच्याकडून सक्तीनें हप्ते घेऊन त्यांतून कामगारांना आजारीपणांत मदत देण्याची योजना एक कायदा करून इंग्लंडांतील सरकारनें आपल्या हातीं घेतली. तथापि ही गोष्ट येथें नमूद केली पाहिजे कीं, अशा प्रकारच्या निरनिराळ्या योजना सरकारच्या मदतीशिवाय, सरकारची सहानुभूतीहि नसतांना, केवळ स्वयंस्फूर्तीनें, परस्परांना साहाय्य करणाच्या भावनेनें लोकांनीं प्रथम तयार केल्या, लोकप्रिय होण्यासाठीं त्यांत वेळोवेळीं आवश्यक तो बदल केला, शेंकडो वर्षें त्या यशस्वी रीतीनें चालविल्या आणि नंतर त्या सरकारनें आपल्या हातीं घेतल्या. पण त्या चालविण्याला लागणारी यंत्रणा सरकारपाशीं नव्हती. म्हणून या नवीन योजनांची अंमलबजावणी, पूर्वी अस्तित्वांत असलेल्या व हें कार्य करीत असलेल्या संस्थांच्याच हातीं देणें त्याला भाग पडलें. कारण या सरकारी योजनेंत अंतर्भाव होणाऱ्या एक कोटि वीस लक्ष कामगारांपैकीं पन्नास लक्ष कामगारांनीं पूर्वींच या खाजगी संस्थांत आपले विमे उतरले होते. पण हा बदल झाला, त्याच्याबरोबरच पूर्वी हें काम करणाऱ्या मित्रमंडळांच्या कार्याच्या स्वरूपांतहि बदल झाला. समाजसेवा करणाऱ्या खाजगी संस्था म्हणून त्यांचें अस्तित्व संपुष्टांत आलें आणि विम्याचें काम करणाऱ्या सरकारी खात्यांत त्या अंतर्भूत झाल्या. पुढें यांतहि बदल झाला आणि हें सारेंच कार्य स. १९४६ मध्यें सरकारनें आपल्या हातीं घेतलें. अशा प्रकारें लोकसेवा करणाऱ्या, जनतेच्या जिव्हाळ्याचे प्रश्न आपुलकीनें, निस्वार्थ बुद्धीनें सोडविणाऱ्या, उभ्या राष्ट्राच्या कोनाकोपऱ्यांत विखुरलेल्या संस्था आपली कीर्ति मागें ठेवून सरकारी कार्यांत विलीन झाल्या.

## सेव्हिंग्ज बँक्स

अठराव्या शतकाच्या शेवटीं सेव्हिंग्ज बँकेची चळवळ सुरू होऊन स. १७९८ मध्यें रे. जोसेफ स्मिथ यांनीं ब्रिटनमधली पहिली सेव्हिंग्ज बँक वेनडोव्हर येथें सुरू केली. पण ती एक धंदा म्हणून नव्हे; तर समाजसेवेचा एक मार्ग म्हणून. आरंभीं तिचे नियम चांगला विचार करून केलेले होते व तिच्या व्यवस्थेंत पैसे ठेवणारांना भाग घेतां यावा, अशी तरतूद होती. पैसे ठेवणारे लोक बँकेचे खातेदार होण्यास योग्य आहेत किंवा नाहींत, नैतिकदृष्ट्या चांगले आहेत कीं नाहींत वगैरे चौकशी करण्यांत येई. पैसे काढणारांवर कांहीं बंधनें असत त्याचप्रमाणें पैसे अनियमित ठेवणारांना दंड होत असे. या योजनेचा मुख्य हेतु हा होता कीं गरीब लोकांपाशीं शिल्लक राहणारी लहानशी रक्कम कोठें तरी सुरक्षित व चटदिशीं ठेवतां यावी व अडचण येईल, तेव्हां जरूर ती रक्कम चटकन काढतांहि यावी आणि अशा रीतीनें त्यांना आपल्या स्वतःच्या पायांवर उभें राहाण्यास समर्थ करून त्यांच्यावर अकस्मात येणारी सांपत्तिक आपत्ति टाळतां यावी. कारण त्या वेळीं इतर बँका अस्तित्वांत असल्या; तरी थोडथोडी बचत करणाऱ्या गरीब लोकांची त्यांत सोय होत नव्हती. शिवाय अशा प्रकारच्या सेव्हिंग्स बँक्स सुरू करण्यांत लोकशाहीच्या हक्कापेक्षां परोपकारबुद्धि प्रभावी होती. ही कल्पना लोकांनीं स्वतः होऊन स्वतःच्या फायद्यासाठीं काढलेली नव्हती, तर ती परोपकारबुद्धीनें प्रवृत्त होऊन निस्वार्थ हेतूनें समाजसेवेचें एक कार्य म्हणून काढलेली होती. आपला पैसा अगदीं सुरक्षित आहे अशी जनतेची खात्री व्हावी व गैरव्यवस्थेला जागा राहूं नये म्हणून हिला कायद्याचें साहाय्य घ्यावें लागलें. पण तसें करतां करतां ती शेवटीं सरकारच्या पूर्णपणें ताब्यांत गेली. ब्रिटिश सरकारनें स. १८६१ सालीं आपली स्वतःची पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज बँक सुरू केली आणि आज या बँकेपासून सरकारी तिजोरींत पैशाची थोडी भर पडत असली तरी पहिलीं पाऊणशें वर्षें पदरमोड करूनच ती सरकारला चालवावी लागली. तथापि वर उल्लेख केलेल्या मित्रमंडळांनीं चालविलेल्या बचत मोहिमेवर त्याचा अनिष्ट परिणाम होऊं शकला नाहीं. दोन्ही चळवळींची झपाट्यानें वाढ होऊन दोहोंनाहि लाखों ठेवीदार मिळाले आणि क्रोडों रुपयांच्या ठेवी मिळाल्या.

## घरें बांधून देणाऱ्या संस्था

अशाच प्रकारचें समाजसेवेचें कार्य करणारी आणखी एक महत्त्वाची चळवळ अठराव्या शतकाच्या शेवटीं सुरू झाली. तिचा उद्देश गरीब लोकांना आपलीं स्वतःचीं घरें बांधण्यास साहाय्य करणें, हा होता. या संस्था सभासदांना स्वतःकरतां घरें बांधण्यास किंवा घरें विकत घेण्यास कर्जाऊ पैसे देत आणि सर्व सभासदांचीं स्वतःचीं

घरें झालीं व त्यांना दिलेले कर्जाऊ पैसे वसूल झाले कीं त्या आपोआप बंद करण्यांत येत. अशी आरंभीं स्थिति होती. पुढें घरें बांधण्याला पैसे देणाऱ्या व कर्जाऊ पैसे घेणाऱ्या निरनिराळ्या संस्था स्थापन झाल्या आणि कामगार व मध्यम स्थितींतील लोकांना आपली बचत त्यांत ठेवींच्या रूपानें ठेवण्याला एक नवीन मार्ग उपलब्ध झाला व त्यामुळें लोकांची एक सामाजिक गरज भागण्याला या पैशाची चांगली मदत झाली. पुढें स. १८३६ मध्यें यासंबंधीं कायदाहि झाला.

## सहकारी चळवळ

औद्योगिक क्रांतीनें जी भयानक परिस्थिति उत्पन्न केली तीवर तोडगा म्हणून बचत करून स्वावलंबी होण्याचे जे मार्ग योजण्यांत आले, त्यांत सहकारी चळवळींतील रॉकडेल पद्धति विशेष यशस्वी झाली. कारण तिचें बचत करण्याच्या चळवळीला फार मोठें साहाय्य झालें आणि समाईक भांडवलावर कारखाने चालविण्याची भांडवलशाहीनें जी नवीन युक्ति काढली होती, तिला तोंड देण्याला हा एक सोयीस्कर मार्ग मिळाला. सहकारी चळवळ यापूर्वीं अस्तित्वांत नव्हती किंवा सहकारी चळवळीच्या या विशिष्ट पद्धतीचा यापूर्वीं लोकांनीं अनुभव घेतलेला नव्हता असें नाहीं. ज्याला या चळवळीचा जनक मानण्यांत येते, त्या रॉबर्ट ओवेननें या बाबतींत पूर्वीं पुष्कळ प्रयत्न केले होते. औद्योगिक क्रांतीनें उत्पन्न केलेल्या दुर्दशेंतून मार्ग काढण्याचें जर कोणतें साधन असेल, तर तें ही सहकारी चळवळ होय असें त्याला वाटे. माणसामाणसांतील स्पर्धा नाहींशी करून त्यांचीं दुःखें कमी करण्याचा जर कोणता मार्ग असेल तर तो सहकारी चळवळ होय, असें त्याचें मत असल्यामुळें भांडवलशाही आणि स्पर्धा नाहींशी करून मालाचें उत्पादन आणि वांटप यांच्यावर कामगारांचा ताबा राहाण्यासाठीं सहकारी पद्धत अंमलांत आणावी, तिची वाढ करून हळूहळू सारेच धंदे तिच्या अंमलाखालीं आणावेत आणि शेवटीं सारें सहकारी तत्त्वाप्रमाणें चालून राज्यहि कामगारांच्या हातीं द्यावें, असें तो प्रतिपादन करी. सहकारी चळवळ कामगारसंघ, बचत मंडळें या सर्वांचें एकच उद्दिष्ट असून एकाच मोठ्या चळवळीचीं तीं वेगवेगळीं अंगें आहेत, असें त्याचें मत होतें. आणि या साऱ्या चळवळीला लोकशिक्षणापासून आरंभ व्हावा म्हणून शिक्षणावर-बालशिक्षण व प्रौढशिक्षण त्यानें फार भर दिला होता. या कल्पनेप्रमाणें स. १८१८ ते १८३४ पर्यंत त्यानें मोठी राष्ट्रव्यापी चळवळ सुरू केली आणि ती यशस्वी होऊन एकदम मोठी क्रांति होईल असें वाटूं लागलें होतें, पण दुर्दैवानें या साऱ्या कल्पना फलदायी झाल्या नाहींत आणि त्याच्या पदरीं अपयश आलें. तथापि त्याचे प्रयत्न सर्वस्वी फुकट गेले, असें म्हणतां येणार नाहीं. कारण त्यानें घातलेल्या पायावरच पुढील चळवळीची उभारणी झाली आणि ती पूर्ण यशस्वी झाली.

## रॉकडेल शहरांतील बारा कोष्टी

पोटापुरतें अन्न नाहीं, अंगावर धड वस्त्र नाहीं, मनाला उत्साह नाहीं अशा सर्व दृष्टींनीं निरुत्साही परिस्थितींतील लँकेशायर परगण्यांतील रॉकडेल शहरीं बारा कोष्ट्यांनीं एका रविवारीं संध्याकाळीं एकत्र बसून आपली स्थिति सुधारण्याकरितां काय मार्ग काढावा याचा विचार केला आणि 'रॉकडेल सोसायटी ऑफ इक्वीटेबल पायोनिअर्स' ही संस्था ता. २४ आक्टोबर १८४३ रोजीं जन्माला आली. एक पौंडाचा भाग व तो दोन पेन्साच्या हप्त्यानें द्यावयाचा असें ठरलें. लोक दूरदूर राहात असल्यामुळें दोनदोन तीनतीन मैल फिरून अठ्ठावीस पौंड भांडवल जमल्यावर या अठ्ठावीस सभासदांनीं तेथील टोड गल्लींत एका जुन्या घराचा तळमजला वर्षाला दहा पौंड भाड्यानें तीन वर्षांच्या करारानें घेतला आणि आज ज्याचा जगभर लौकिक पसरलेला आहे त्या सहकारी भांडाराचीं तेथें स्थापना केली. दुकानांत प्रथम आटा, साखर, लोणी, मेणबत्त्या, ओट एवढे पांचच जिन्नस ठेवण्यांत आले. या दुकानांत कोणी नोकर नव्हता. कारण नोकरास पगार द्यावयास पैसे नव्हते. म्हणून आरंभीं हें दुकान फक्त रात्रींच उघडें राही अणि समितीचे सभासदच खरेदी विक्रीचें सारें काम स्वतः करीत. पुढें एक वर्षानें तंबाकूचा व चहाचा परवाना काढण्यांत आला. वर्षाच्या शेवटीं ऐंशीं सभासद व १८१ पौं. १२ शि.३ पै. एवढें भांडवल झालें आणि चोवीस पौंड नफा झाला. त्यांतून अडीच टक्के इतकी रक्कम, सभासदांना भागांवर नफा देऊन शिल्लक राहिलेली रक्कम भांडवलांत मिळविण्यांत आली. पहिल्या वाढदिवसाचे दिवशीं आनंद प्रदर्शित करण्याकरतां एका शिलिंगाची वर्गणी काढून मोठें जेवण करण्यांत आलें.

पण वर निर्दिष्ट केलेलें ग्राहकांचें सहकारी दुकान आणि पूर्वीं या बाबतींत केलेले काहीं प्रयत्न, यांत बराच फरक होता. पूर्वीं निघालेलीं कांहीं सहकारी भांडारें, दुकानांतला माल मूळ किंमतीला विकत असल्यामुळें तोटा होई व मूळ भांडवलच घटूं लागे. त्यामुळें शेवटीं अपयश येऊन दुकानच बंद करण्याची पाळी येई. दुसऱ्या कांहीं दुकानांत बाजारभावाप्रमाणें माल विकीत आणि जो फायदा होई, तो सहकारी तत्त्वांवर उभारावयाचीं खेडीं किंवा अशाच कांहींतरी समाजकार्याकरितां खर्च करीत किंवा सहकारी तत्त्वें धाब्यावर बसवून, ज्याचें जितकें भांडवल असेल त्या प्रमाणांत सारा फायदा वांटून टाकीत. पण रॉकडेलमधील या चळवळीच्या मूळ प्रेरकांनीं लोकांच्या अनुभवावरून शहाणे होऊन अगदीं वेगळया पद्धतीचें अवलंबन केलें. त्यांनीं या नवीन दुकानांतील माल बाजारभावानेंच विकण्यास सुरुवात केली आणि वर्षअखेर जो नफा मिळूं लागला, तो ज्या सभासदांचे जितके भाग असतील; तितक्या प्रमाणांत त्यांना न देतां त्यांनीं त्या वर्षांत जितका माल खरेदी केला असेल; त्या प्रमा-

णांत त्यांना वांटण्यास सुरुवात केली. त्याशिवाय भागांवरहि योग्य प्रमाणांत व्याज दिलें. पण हें व्याज न घेतां पुन्हां संस्थेंत ठेव म्हणून ठेवणारांना त्याच्यावरहि पुन्हां व्याज मिळेल व संस्थेचें भांडवल वाढून तिची सारखी प्रगति होत राहील अशी व्यवस्था केली. पण अशा रीतीनें ही रॉकडेल पद्धति यशस्वी होण्याचें कारण खरेदीच्या प्रमाणांत फायदा किंवा भागावर ठराविक व्याज देणें एवढेंच नसून, या दोहोंचा यशस्वी संयोग, हें होतें. तथापि एवढी गोष्ट खरी कीं रॉबर्ट ओवेन यांच्या कामगार शिष्यांनीं जी लहानशी संस्था स्थापन केली, ती पुढें एवढें जगड्व्याळ स्वरूप धारण करील, अशी अर्थातच त्यांना त्यावेळीं कल्पना नव्हती. त्यांनींसुद्धां इतरां-प्रमाणेंच हा एक लहानसा प्रयोग म्हणून सुरवात केली. पण तो कल्पनेबाहेर यशस्वी होऊन त्या चळवळीचा जगभर प्रसार झाला व त्याबरोबर या चळवळीच्या बारा आद्य प्रणेत्यांचें नांव अजरामर झालें. हा प्रयोग यशस्वी होण्याला या चळवळींत अंगभूत असलेल्या दुसऱ्याहि कांहीं गोष्टी कारण झाल्या होत्या. या चळवळींमागें संघशक्ति, सचोटी आणि सांपत्तिक स्वातंत्र्य ह्या गोष्टी होत्या. तसेंच शक्य तितके मध्यस्थ नाहींसे करणें, हा या चळवळीचा आणखी एक हेतु असल्यामुळें माल निर्भेळ, स्वस्त, चांगल्या परिस्थितींत तयार झालेला व खऱ्या मोजमापानें मिळे. रॉकडेलपद्धतीच्या संस्थापकांनीं आरंभापासूनच वरील तत्त्वाचा स्वीकार केला होता. कोणताहि मादक पदार्थ दुकानांत ठेवावयाचा नाहीं व या चळवळीला प्रोत्साहन देऊन तिचा प्रसार होण्यासाठीं प्रयत्न करावयाचे असेंहि त्यांनीं ठरविलें होतें. तसेंच कोणालाहि या संस्थेचा सभासद होतां यावें पण त्यानें कितीहि भाग विकत घेतले तरी मत मात्र एकच असावें, ही लोकशाही तत्त्वें स्वीकारण्यांत आलीं होतीं.

या लहानशा दुकानाची विक्री वाढत चालली. तें मोठें करणें भाग आहे, असें वाटूं लागलें. लौकरच ते कांहीं माल स्वतःच तयार करूं लागले. दुसऱ्याही अशा संस्था निघाल्या. त्यांनीं आपला एक संघ केला. त्याच्या वतीनें घाऊक मालाच्या वखारी काढल्या. त्यांनीं स्वतःचे कारखाने काढले. त्यांतील नोकरांना मजुरी मिळून त्याशिवाय फायद्यान्त्रा कांहीं भाग व व्यवस्थेंत प्रतिनिधित्व मिळावें अशीहि व्यवस्था करण्यांत आली. कांहीं अशाहि संस्था निघाल्या कीं त्यांत कांहीं कामगार एकत्र होऊन त्यांनीं स्वतः सहकारी तत्त्वांवर कारखाने काढले व आपण स्वतः समाईक मालक झाले. अशा रीतीनें निरनिराळ्या मार्गांनीं व निरनिराळ्या तऱ्हेनें सहकारी तत्त्वांचा उपयोग करून अनेक प्रयोग करण्यांत आले. त्यांतले कांहीं अयशस्वीहि झाले. पण रॉकडेलपद्धतीनें चाललेल्या ग्राहकांच्या सहकारी संस्था कल्पनातीत यशस्वी झाल्या. घाऊक विक्रीच्या बाबतींतहि अनेक प्रयोग केल्यानंतर हीच पद्धति यशस्वी ठरून सर्व ग्राहक दुकानांचा एक संघ (Cooperative Wholesale Society) काढण्यांत आला व तो ‘सी. डब्लू. एस.’ या नांवानें प्रसिद्धीस आला.

वैयक्तिक सभासदांच्याऐवजीं हीं ग्राहकांचीं दुकानें या संघाचीं सभासद करण्यांत आलीं. लहान प्रमाणांत सुरवात करणें, बाजार भावानें माल विकणें, माल खरेदी करतील त्या प्रमाणांत फायद्याचा वांटा देणें, तो फायदा व भागावर मिळणारें व्याज आपल्याकडे ठेव म्हणून ठेवावयास लाऊन आपलें भांडवल वाढविणें व सभासद कायम राहील असें पाहाणें म्हणजेच भांडवल आणि ग्राहक वाढविणें हा दुहेरी हेतु साधणें, हे ग्राहकांचीं दुकानें चालविण्याच्या बाबतींत स्वीकारलेले नियम, येथेंहि लागू करण्यांत आले. हाहि प्रयोग यशस्वी झाला. त्याची हळूहळू वाढ होत गेली आणि आज 'सी. डब्लू. एस.' (Co-operative Wholesale Society) हा शब्द इंग्लंडमध्यें आबाल-वृद्धांच्या तोंडीं झालेला आहे.

इंग्लंडमध्यें सहकारीसंस्थांचे सभासद एक कोटी दहा लक्ष आहेत. ते बहुतेक ग्राहकमंडळाचे सभासद आहेत. अशीं ग्राहकमंडळें तेथें एक हजारावर आहेत. त्यांतलीं कांहीं मंडळें अगदीं लहान असून दूरदूरच्या खेड्यांत स्थापन झालेलीं आहेत. यांतलें अगदीं मोठें मंडळ लंडन शहरांत असून त्याच्या सभासदांची संख्या दहा लाखांवर आहे. यांतलें मंडळ कितीहि लहान असलें किंवा कितीहि मोठें असलें; तरी तें या चळवळीच्या प्रवर्तकांनीं स्थापन केलेल्या रॉकडेलसोसायटीच्या तत्त्वाप्रमाणें चालत असतें. या मंडळांचें भांडवल सभासदांनीं भागाच्या रूपानें दिलेल्या पैशाचें झालेलें असतें. सभासदांना या भागांच्या पैशांवर ठराविक दरानें व्याज देण्यांत येतें. प्रत्येक भागाची किंमत एक पौंड असते. या मंडळांपैकीं तीन चतुर्थांश मंडळें अन्न व घरांत लागणाऱ्या इतर जरूरीच्या वस्तू यांची विक्री करतात. सरासरी प्रत्येक सभासदाकडे बावीस पौंडाचे भाग असतात. स. १९५० च्या अखेरीला या संस्थांचें एकंदर भागाचें भांडवल २३,१७,०८,८२१ पौंड होतें. यांतलीं पुष्कळ मंडळें स्वतः मालहि तयार करतात आणि पावबिस्किटें तयार करणें, कपडे धुणें, दूधदुभतें पुरविणें, प्रेत-संस्काराला लागणारें सामान देणें, बुटांची दुरुस्ती करणें, अशांसारखीं कामें करतात. इंग्लंडांत ज्या वस्तूंचें सरकारी रीत्या वांटप होतें, त्यांतलें पंचवीस टक्यांपेक्षां जास्त वांटप या मंडळांच्या मार्फत होतें. त्याचप्रमाणें एक तृतीयांश दूध, एक षष्ठांश पाव, एक अष्टमांश मांस आणि एक षष्ठांश कोळसा, या मंडळांच्यामार्फत विकला जातो. स. १९५१ सालीं साधारणपणें एक पौंड चार शिलिंग किंमतीचा माल प्रत्येक सभा-सदानें दर आठवड्याला या भांडारांतून विकत घेतला. आणि या सर्व मंडळांचा मिळून एकंदर व्यापार ६६,३८,५७,००० पौंड झाला.

## ग्राहक दुकानांचा संघ

वर उल्लेख केलेल्या सहकारी दुकानांचा एक संघ स. १८६३ सालीं स्थापन होऊन त्याच्या प्रत्यक्ष कार्याला दुसऱ्या वर्षी सुरुवात झाली. ग्राहकदुकानें या संघाला

भांडवल पुरवितात व याची व्यवस्था पाहाण्यासाठीं सबंध दिवस काम करणारें व्यवस्थापकमंडळ नेमतात. या संघाला वर्षअखेर जो फायदा होईल; तो ग्राहक दुकानांना वाटण्यांत येतो व तीं पुनः तो आपल्या ग्राहकांना वांटतात. हिशेब व इतर बाबींचा विचार करण्यासाठीं ग्राहक दुकानांच्या व्यवस्थापकमंडळाची साधारणतः आठवड्यांतून एकदां सभा होते व या संघाच्या भागीदारांची सभा वेळोवेळीं जरूरी-प्रमाणें होते. बहुतेक किरकोळ विक्री करणारीं ग्राहक दुकानें, कांहीं मालाचें उत्पादन करणाऱ्या सहकारी मंडळया व शेतकऱ्यांच्या सहकारी संस्था, आणि कांहीं या देशा-च्या बाहेरील सहकारीसंस्थासुद्धां या संघाच्या सभासद आहेत. स. १९५० सालीं या संघाचे १०५७ सभासद होते, २,०६,६९,७८८ पौंडाचें भांडवल होतें आणि ११,६४,३५,४४४ पौंडाचें कर्ज सभासदसंस्थांकडून त्यानें घेतलें होतें. चहा, कॉफी, कोको, चॉकलेट वगैरे जिनसांचा हा संघ फार मोठ्या प्रमाणांत व्यापार करतो. त्याच्या स्वतःच्या मालकीचे चहाचे मळे भारतांत व सिलोनमध्यें आहेत. या संघाच्या नोकरांची एकंदर संख्या ५२,९९० आहे. त्याचें एक मोठें बँकींग खातें, सव्वीस हजार एकर शेतजमीन, छापखाने वगैरे अनेक मोठ्या प्रमाणांत चाललेलीं कामें आहेत. त्याच्या छापखान्यांत त्यांनीं स्वतः चालविलेलीं तीन साप्ताहिकें छापतात. व दुसरीं अनेक छपाईचीं कामें करतात. इतर देशांतील सहकारी तत्त्वाप्रमाणें चाललेल्या अनेक संस्थांशीं त्याचा व्यापारी संबंध असून कॅनडा व न्यूझीलंड या देशांतील सहकारी संस्थामार्फत गहूं व दुधदुभत्याचे पदार्थ मोठ्या प्रमाणांत ही संस्था खरीदते.

सहकारीविमासंस्थेची इंग्लंडांत प्रसिद्धि आहे. स. १९५० सालीं तिचें विम्याच्या हप्त्याचें उत्पन्न दोन कोटी साठ लक्ष पौंड होतें. शेतकऱ्यांनीं सहकारी चळवळीचा उपयोग वाढत्या प्रमाणांत करावा, म्हणून इंग्लंडांत दिवसेंदिवस अधि-काधिक प्रयत्न करण्यांत येत आहेत. हे प्रयत्न दोन प्रकारें करण्यांत येतात. एक शेत-कऱ्याला मालाचा पुरवठा करून आणि शेतकऱ्यांनीं पिकविलेल्या मालाची विक्री करून. पण अशाहि कांहीं संस्था तेथें आहेत कीं, त्या हीं दोन्हीं कामें स्वतःच करतात. त्यांना सभासदांकडून भांडवल मिळतें आणि त्याच्यावर ठराविक दरानें व्याज देऊन शिल्लक राहिलेला नफा सभासदांनीं या संस्थांकडून ज्या प्रमाणांत माल घेतला असेल, त्या प्रमाणांत तो त्यांना वांटण्यांत येतो. स. १९५० सालीं ग्रेट ब्रिटनमध्यें अशा ३६४ शेतकऱ्यांच्या सहकारीसंस्था होत्या. त्यांचे २,२४,९७२ सभासद होते, ४१,९७,६४९ पौंड भांडवल होतें आणि एकंदर ८,१७,३८,१६५ पौंड किंमतीच्या मालाची त्यांनीं उलाढाल केली. येथील सुमारें दोनतृतीयांश शेतकरी सहकारी चळवळीचा फायदा घेत आहेत.

---

१ The Co-operative Movement by Jack Bailey, Labour Party Educational Series.

अशा विविध प्रकारें सहकारी चळवळीचा फैलाव ब्रिटनमध्यें होत असला, तरी ज्याप्रमाणें डेन्मार्क शेतकऱ्यांच्या सहकारी चळवळीबद्दल, स्वीडन घरें बांधणाऱ्या सहकारी संस्थांबद्दल, आईसलंड मासे मारणाऱ्यांच्या सहकारी चळवळीबद्दल, विशेष प्रसिद्ध आहे, तसें इंग्लंड ग्राहकांच्या सहकारी चळवळीबद्दल विशेष प्रसिद्ध आहे.

## संघशक्ति, सचोटी आणि व्यापारी स्वातंत्र्य

सहकारी चळवळ ही चांगला माल मिळावा, चांगल्या परिस्थितींत तो तयार केला जावा व खऱ्या मापानें व माफक दरानें मिळावा, म्हणून त्याचा वापर करणारांनीं–गिऱ्हाईकांनींच–चालविलेली असते. मालाचा नाश होऊं नये, त्यांत कोणत्याहि प्रकारची भेसळ होऊं नये आणि संघशक्ति, सचोटी आणि व्यापारी स्वातंत्र्य यांच्या अभावीं असंतोष उत्पन्न होतो तो होऊं नये, म्हणून कांहीं प्रामाणिक लोकांनीं आपली सांपत्तिक स्थिति सुधारावी व सांपत्तिक स्वातंत्र्य मिळावें म्हणून संघशक्तीच्या जोरावर हा प्रयत्न–ही चळवळ सुरू केली. जगाचा सर्व व्यवहार अदलाबदलीवर चाललेला असतो आणि अदलाबदलीला मुख्यतः पतीची जरूरी असते. करितां मालाची पैदास करणारा व तिचा उपभोग घेणारा या उभयतांची पत वाढवून त्यांचे संबंध दृढतर करणें हाहि या चळवळीचा एक मुख्य उद्देश आहे.

या चळवळीचे उत्पादक रॉबर्ट ओवेन यांचें या चळवळीच्या बाबतींत काय ध्येय होतें, ह्या चळवळीनें मूळ धरण्याच्या पूर्वीं यासंबंधीं कसकसे प्रयत्न झाले, रॉकडेल येथील मूठभर कोष्टयांनीं ही चळवळ प्रथम कशी सुरू केली, जितका माल विकत घेईल त्या प्रमाणांत गिऱ्हाईकाला फायदा वांटून देण्याची युक्ति काढिल्यामुळें सभासदांनीं दुकानाशीं कसें इमान राखलें, ही चळवळ अल्प प्रमाणांत सुरू होऊन व्यापारी दृष्टया यशस्वी झाल्यामुळें तिचें पाऊल कसें जोरानें पुढें पडत गेलें व तिला आजची स्थिति कशी आली; शिवाय हजारों सभासद, भव्य इमारती, मोठमोठे कारखाने, शिलाईखातीं, कोळशाच्या वखारी वगैरे गोष्टींची अधिक माहिती येथें देण्याची आवश्यकता नाहीं. इतकें सांगितलें म्हणजे पुरे कीं, या चळवळीचा प्रसार एका इंग्लंड देशांतच झाला आहे किंवा विशेषतः पतपेढ्यांच्या रूपानें हिंदुस्थानांतच झाला आहे असें नाहीं, तर जगांतील सर्व लहान-मोठ्या देशांत तेथील परिस्थित्यनुरूप थोड्याफार प्रमाणांत झालेला आहे. कांहीं देशांत कांहीं विशिष्ट बाबतींतच तिचा प्रसार फार झाला आहे. इंग्लंडांतील सहकारी तत्त्वावर घाऊक विक्री करणाऱ्या संस्थेची ( Co-operative Wholesale Society ) स्थिति तर इतकी भरभराटीची आहे कीं, तिच्या स्वतःच्या जमिनी स्वतःच्या इमारती, स्वतःचे कारखाने, स्वतःच्या वखारी, स्वतःचीं वाहतुकीचीं साधनें इंग्लंडांत तर आहेतच, पण इतर देशांतहि आहेत. तिचे लक्षावधि

सभासद असून ती कोट्यवधि रुपयांचा व्यापार चालवीत आहे. या चळवळीचीं सूत्रें तिकडे बहुतेक कामगारांच्याच हातीं आहेत आणि हिचा फायदाहि मुख्यतः कामगारांनाच मिळत आहे. या एकाच गोष्टीवरून तिकडील कामगारांची कार्यक्षमता आणि समाजसेवेबद्दल आस्था दिसून येईल. पुष्कळ लोकांची अशी समजूत आहे कीं, व्यापारधंद्यांत लागणारीं नोकर माणसें मोठ्या पगाराची लालूच असल्याशिवाय चांगलीं मिळत नाहींत व मिळालीं तरी तीं टिकत नाहींत. परंतु वरील संस्थेचा अनुभव तसा नाहीं. यांतील कामगारांना पगार अगदीं बेताबाताचाच मिळतो, तथापि दुसरीकडे अधिक पगार मिळण्याचा संभव असतांहि या संस्थेंतील नोकरांना आपली नोकरी सोडण्याची बुद्धि सहसा होत नाहीं. यांतील वेगवेगळ्या खात्यांच्या मुख्याधिकाऱ्यांना तर दुसरीकडे त्याच हुद्द्यावर असलेल्या माणसांच्या पगाराच्या दृष्टीनें फारच कमी पगार मिळतो. पण तेवढ्यांतच ते संतुष्ट असतात. कारण या चळवळीच्या मुळाशीं असलेलें समाजसेवेचें तत्त्व त्यांच्या दृष्टीसमोर असतें. शिवाय पैसा न घेतां या चळवळीला अनेक तऱ्हेनें मदत करणारेहि कैक लोक आहेत. ते सर्व दिवसभर कोठेंतरी काम करून जो थोडा फुरसतीचा वेळ मिळतो, तो या कामीं खर्च करतात.

## या चळवळीच्या मुळाशीं समाजसेवेचें तत्त्व आहे.

या चळवळीचें मूलभूत तत्त्व असें आहे कीं व्यापार हा वैयक्तिक फायद्याकरितां करावयाचा नसून समाजाच्या गरजा भागविण्यासाठीं समाजाच्या उपयोगाकरितां करावयाचा असतो. सार्वजनिक उपयोगाच्या वस्तूवर सार्वजनिक ताबा असावा, हें या चळवळीचें उद्दिष्ट आहे. कोणाहि माणसाला दररोज उपयोगीं पडणाऱ्या वस्तूंचाच—अन्न, वस्त्र, सर्पण यांचा—मुख्यतः या संस्था व्यापार करतात. दररोजच्या उपयोगाच्या वस्तूंवर, स्वतःची तुंबडी अमानुषपणानें भरणारांचा ताबा नसावा, अशाकरितां हा प्रयत्न चाललेला असतो. जनतेच्या प्रत्यहीं उपयोगीं पडणाऱ्या वस्तु योग्य मोबदला घेऊन पुरविणें, स्वतःला बेसुमार फायदा मिळावा म्हणून मागणीपेक्षां पुरवठा बुद्ध्या कमी न करणें, ही एक समाजसेवाच आहे. मालाची पैदास करणारा व त्याचा उपभोग घेणारा या उभयतांच्याहि तोंडाला पानें पुसून आणि दोघांच्याहि पराधीन स्थितीचा फायदा घेऊन मधल्यामध्यें आपण गबर होणें हें समाजद्रोह करण्यासारखें आहे. म्हणून हे मध्यस्थ शक्यतितके नाहींसे करावे व अन्नवस्त्रादि माणसाच्या अस्तित्वाला अत्यावश्यक असलेल्या वस्तूंचा पुरवठा समाजसेवेच्या तत्त्वावर करावा, या उच्च भावनेनें ही चळवळ अस्तित्वांत आली व तिच्या हेतूला अनुसरून तिचें कार्य दिवसेंदिवस यशस्वी होत आहे.

पतपेढी किंवा भांडार हें अनेक चळवळींचें केंद्र असतें. परस्परांना साहाय्य करणाऱ्या अनेक चळवळी तेथें केंद्रीभूत झालेल्या असतात. या पेढीचे किंवा

भांडाराचे सर्वच सभासद या चळवळींत मन घालणारे असतात किंवा सर्वांनाच या चळवळीचें रहस्य कळलेलें असतें, असें नाहीं. मनुष्यस्वभावाप्रमाणें कांहीं लोक आपल्या स्वतःच्या फायद्यापुरतेच या चळवळीकडे पाहाणारे असतात. तथापि ज्या मूलभूत तत्त्वावर या चळवळीची उभारणी झाली, तीं तत्त्वें अजूनहि ही चळवळ करणारांच्या दृष्टिआड झालेलीं नाहींत. शिक्षणप्रसाराला शक्यतितकी मदत करावयाची हें या चळवळीचें प्रथमपासून धोरण आहे. शिक्षणप्रसाराकडे लक्ष्य देण्याकरितां सामान्यतः प्रत्येक पेढीची किंवा भांडाराची एक पोटकमिटी नेमलेली असते. वार्षिक सभेच्या वेळीं नफ्याची वांटणी करितांना शिक्षणप्रसाराप्रीत्यर्थ म्हणून कांहीं रक्कम प्रत्येक संस्थेंतून वेगळी काढण्यांत येते. शिवाय कांहीं पेढ्यांचीं व भांडारांचीं स्वतःचीं वाचनालयें असतात आणि सभासदांची बौद्धिक उन्नति व करमणूक करण्याकरितां दुसऱ्या अनेक प्रकारच्या सोयी करण्यांत येतात. सभासदांकरितां वेळोवेळीं व्याख्यानें, वर्ग, सहली, सम्मेलनें करण्यांत येतात आणि या संधीचा फायदा घेऊन, ही चळवळ बाल्यावस्थेंत असतांना तिच्या पुरस्कर्त्यांनीं कसे अविश्रांत श्रम केले व कशीं संकटें सहन केलीं आणि निराधार व निर्धन कामगाराला किंवा शेतकऱ्याला स्वतःच्या पायांवर उभा करणाऱ्या या चळवळीचें ध्येय कायम राहण्याकरितां तदनंतर कसे प्रयत्न करण्यांत आले, हें सांगण्यांत येतें आणि या चळवळीचा अधिक प्रसार होण्याकरितां प्रयत्न करणें आपलें कसें कर्तव्य आहे, याचीहि आठवण सभासदांना देण्यांत येते.

सहकारी भांडारांतून सभासदांना जो माल विकला जातो, तो बाजारभावापेक्षां कमी दरानें कधींहि विकला जात नाहीं. अशा रीतीनें झालेला फायदा वर्षअखेरीला प्रत्येक गिऱ्हाईकानें जितका माल खरेदी केला असेल, त्या प्रमाणांत त्याला देण्यांत येतो. त्यामुळें गिऱ्हाइकाच्या पैशाचीहि बचत अगदीं न जाणून होते व पैसा आणीबाणीच्या प्रसंगीं उपयोगांत आणतां येतो किंवा भांडारांत ती त्या सभासदाची ठेव म्हणून राहाते; आणि सहकारी घर किंवा अशाच कोणत्या तरी दुसऱ्या सहकारी कार्याकडे पण स्वतःचे पैसे म्हणून ह्या सभासदाला त्या रकमेचा उपयोग करितां येतो. अशा रीतीनें जेथें सहकारी चळवळीच्या तत्त्वाप्रमाणें दर एक गोष्ट चाललेली आहे अशीं कांहीं गांवें व शहरें आहेत. तेथें सभासदांना लागणारी प्रत्येक गोष्ट सहकारी तत्त्वावरच पैदा केली जाते व विकली जाते.

इंग्लंडांत सहकारी भांडारांच्या द्वारें, कामगारांना प्रत्यहीं लागणारा माल अनुत्पादक मध्यस्थ नाहींसे झाल्यामुळें निर्भेळ, चांगला व चांगल्या परिस्थितींत तयार झालेला, स्वस्त असा मिळूं लागला आहे व त्यामुळें त्यांची राहाणी सुधारली आहे. शेतकऱ्यांना आपल्या स्वतःच्या बळावर भांडवल गोळा करून सर्वांकरितां मालाचें उत्पादन, घाऊक मालाची खरेदी एकत्र करतां येऊं लागली आहे. त्यामुळें साऱ्या

जिनसा किफायतशीर रीतीनें एकत्र विकतां येऊं लागल्या आहेत. आणि कांहीं ठिकाणीं तो माल विकत घेणाऱ्याहि सहकारी संस्था असल्यामुळें माल तयार करणारांचें व गिऱ्हाइकांचें सहकार्य होऊन सर्व तऱ्हेनें हित होऊं लागलें आहे.

तथापि एका गोष्टीचा येथें मुद्दाम उल्लेख केला पाहिजे कीं हा काळ लोकांनीं बचत करावी या मोहिमेचा असल्यामुळें सहकारी तत्त्वावर वांटप करण्याची चळवळ विशेष लोकप्रिय झाली. कारण तिच्यामुळें सामान्य लोकांची पैशाची बचत तर होऊं लागलीच; पण हा जो थोडासा पैसा शिल्लक टाकतां येऊं लागला, तोहि कोठेंतरी सुरक्षितपणें गुंतवून, त्याच्यावर योग्य व्याज मिळावें व जरूरीच्या वेळीं थोडी आगाऊ सूचना देतांच मूळ रक्कमहि परत मिळावी, अशी ठेविदारांना अत्यंत सोयीची व्यवस्था यांत होती. म्हणून आपल्या भागावरील नफा किंवा विकत घेतलेल्या मालावरील फायदा चालू खर्चासाठीं सगळा परत न घेतां त्यांतला कांहीं भाग तरी अडीअडचणीच्या वेळीं उपयोगी पडावा म्हणून परत त्यांतच ठेवावा, असें सभासदांना स्वाभाविकच वाटे. पण सहकारी तत्त्वांवर मालाचें उत्पादन करणारांची स्थिति तशी नव्हती. कारण त्यांना आपण तयार केलेला बराचसा माल भांडवलदारांशीं स्पर्धा करून, उघड्या बाजारांत, मिळेल त्या गिऱ्हाइकाला विकावा लागे. शिवाय त्यांचीं कामें लोकशाही तत्त्वांप्रमाणें चाललेलीं असल्यामुळें त्यांतील कामगार आपली स्थिति चांगली असावी अशी साहाजिकच अपेक्षा करीत. त्यांच्याकडे नेहेमींच पुरेसें भांडवल असे असें नाहीं आणि त्यांना ज्यांच्याशीं स्पर्धा करावयाची असे ते व्यापारी जसे आपला माल खपण्यासाठीं वाटेल त्या बऱ्यावाईट मार्गांचा अंगीकार करीत, तसा यांना करितां येत नसे. शिवाय धंद्यांत गुंतविलेलें भांडवलहि हवें तेव्हां परत करणें शक्य नसतें. अशा स्थितींत मोठ्या मिनतवारीनें केलेली बचत अशा धंद्यांत गुंतविण्याचा धोका पत्करण्यास सामान्य लोक कचरले, तर त्यांत आश्चर्य नाहीं. अशा रीतीनें उत्पादक धंद्यांना उत्तेजन देऊन भांडवलशाहीशीं टक्कर देण्याचा प्रयत्न करण्यापेक्षां बचत व परस्परांना साहाय्य करण्याचा उत्तम मार्ग म्हणून सहकारी ग्राहक चळवळीला साहाय्य करून आत्मोद्धार करण्याचा मार्ग इंग्लंडांतील लोकांना साहाजिकच अधिक पसंत पडला.

लोकांना बचत करावयास लागून त्यायोगें बचत करण्याची व परस्परांना साहाय्य करण्याची प्रवृत्ति वाढवावी या हेतूनें वर निर्दिष्ट केलेल्या मित्रमंडळें, सेव्हिंग्स् बँकस्, घरें बांधणाऱ्या संस्था, सहकारी चळवळ वगैरे कामें निव्वळ कामगारांसाठीं किंवा त्यांतील कांहीं अपवाद सोडल्यास अगदीं खालच्या वर्गांतील कामगारांसाठीं केवळ काढण्यांत आलीं होतीं असें नाहीं. तर साऱ्या मध्यम आणि खालच्या वर्गांसाठीं तीं काढण्यांत आलीं होतीं. यांतील कांहींनीं लोकांची निव्वळ सांपत्तिक स्थिति सुधारण्याचा प्रयत्न केला; पण सहकारी चळवळीनें जशी एक

सामाजिक शक्ति उत्पन्न करून आर्थिक क्रांति घडवून आणली; तशी इतर संस्थांना घडवून आणतां आली नाहीं.

## डेन्मार्कचा आदर्श

औद्योगिक क्रांतीमुळें इंग्लंडमधील कामगारवर्गाचे जे कल्पनातीत हाल झाले त्यांतून मार्ग काढण्याकरितां त्यांनीं अनेक उपाय योजले, त्यांतील सहकारी ग्राहक चळवळ हा एक उपाय होता व तो यशस्वी होऊन त्यांची असहाय्य स्थिति नाहींशी होण्यास तिचा चांगला उपयोग झाला. डेन्मार्क हाहि देश या चळवळीबद्दल प्रसिद्ध आहे. तेथें कामगारांना आवश्यक अशा अनेकविध वस्तूंचें उत्पादन आणि वांटप रॉकडेल चळवळीचें उदाहरण डोळ्यापुढें ठेवून सहकारी तत्त्वावर कामगारांनीं सुरू केलें आणि तीहि चळवळ कल्पनातीत यशस्वी झाली. पावाच्या भट्टया, दुभत्याचा पुरवठा, घरें आणि तदंगभूत धंद्यातील गंवडी, सुतार वगैरे निरनिराळ्या प्रकारचीं कामें करणारे कारागीर, विटा सिमेंट, पाण्याचे व गटारांचे नळ व त्यांचीं कामें करणारे लोक, रंगारी, बिजलीचीं कामें करणारे लोक, तशींच फराळाचीं दुकानें, बुटांचीं दुकानें, केंस कापण्याचीं दुकानें, छापखाने, बँका, हिशोब तपासणाऱ्या संस्था अशा एक ना दोन, अनेक धंद्यांतील लोकांच्या सहकारी संस्था काढून त्या तेथें उत्तम प्रकारें चालविण्यांत येत आहेत. त्यांचे लाखों सभासद आहेत; हजारों नोकर आहेत. व त्या क्रोडो रुपयांची उलाढाल करीत आहेत. यांतल्या बहुतेक संस्था पन्नास साठ वर्षांपूर्वीं निघालेल्या आहेत. मालकांनीं टाळेबंदी पुकारावी, त्यामुळें कामगारांची उपासमार होऊन फार हाल व्हावेत आणि इतर धंद्यांतील कामगारांच्या सहकारी संस्थांनीं साहाय्यास धांवून त्यांची सहकारी संस्था स्थापून, त्यांना भांडवल पुरवावें व स्वावलंबनाचा मार्ग दाखवावा आणि मालकांना किंवा मक्तेदारांना वटणीवर आणावें इतकेंच नव्हे; तर तो सारा धंदाच आपल्या हातीं घेऊन सहकारी तत्त्वांवर यशस्वी रीतीनें चालवावा अशी स्थिति येथें बऱ्याच धंद्यांत झालेली आढळेल, डेन्मार्कमधील सहकारी चळवळीसंबंधीं एक दोन महत्त्वाच्या गोष्टी लक्षांत ठेवण्यासारख्या आहेत. त्यांनीं या साऱ्या चळवळी अगदीं लहान प्रमाणांत सुरू करून जसजसा अनुभव येईल, जम बसेल तसतसा आपल्या एकंदर धोरणांत बदल करून सावधगिरीनें वाढविल्या. त्याचप्रमाणें सहकारी चळवळीच्या शिक्षणाचा प्रसार करण्याची त्यांनीं अगदीं आरंभापासून काळजी घेतली. त्यामुळें जनतेला सहकारी तत्त्वांची माहिती होऊन त्याप्रमाणें प्रत्यक्ष कृति करण्याची संवय लागली. तसेंच संकटाच्या व अडचणींच्या वेळीं स्वावलंबी होण्यासाठीं त्यांनीं ज्या या संस्था काढल्या, त्या तीं संकटें आणि अडचणी नाहींशा झाल्यावरहि तितक्याच उत्साहानें आणि इमानानें पुढें चालू ठेवल्या. तसेंच एकंदर कामगारवर्गानेंहि ही चळवळ आपली आहे, आपल्या हिताची

आहे, आपल्या कल्याणाची आहे हें जाणून राजकीय व इतर प्रकारचे भेदभाव बाजूला ठेवून इंग्लंडांतील कामगारवर्गाप्रमाणें मनोभावानें तिला सहाय्य केलें.

वरील माहितीवरून सहकारी चळवळ कामगारांच्याच फायद्याची असते आणि ती कामगारांनींच केली, असा कोणी गैरसमज करून घेऊं नये. कारागीर, शेतकरी, लहान लहान धंदे करणारे लोक यांनाहि तितकाच फायदा तिच्यापासून निःसंशय होण्यासारखा असतो आणि तो वरील देशांतील अशा प्रकारच्या लोकांनीं करूनहि घेतलेला आहे. कारण यांत संघशक्ति, सचोटी, बचत व आर्थिक स्वातंत्र्य असतें व त्याचा कोणालाहि फायदा होण्यासारखा असतो. तसेंच मध्यस्थ नाहींसे करणें हा या चळवळीचा एक हेतु असल्यामुळें माल निर्भेळ, स्वस्त व चांगल्या परिस्थितींत तयार झालेला असल्यामुळें त्यांची सर्वांनाच अवश्यकता असते. पण हे प्रयत्न स्वयंस्फूर्तीनें स्वतःच्या संरक्षणासाठीं झाले पाहिजेत. दुसऱ्यानें ते लादल्यास यशस्वी होण्यासारखे नसतात. वर निर्दिष्ट केलेल्या लोकांना अशा प्रयत्नांची मनापासून जरूरी वाटत होती, सहकार्याचें महत्त्व त्यांना पटलें होतें व त्याप्रमाणें कृति करण्याचा त्यांचा निश्चय होता म्हणूनच ते यशस्वी झाले.

## आपल्याकडे प्रथम ऋणमुक्तसंस्था स्थापण्यांत आल्या

या चळवळीचा प्रसार आज जगांतील साऱ्या देशांत थोड्या फार प्रमाणांत झालेला आहे. परंतु प्रत्येक देशांतील परिस्थिति वेगळी असल्यामुळें तिची जीं अनेक अंगोपांगें आहेत; त्यांपैकीं कोणतें तरी एक परिस्थितिवैशिष्ठ्याप्रमाणें विशेष यशस्वी झालेलें आहे. इंग्लंडांत सहकारी भांडारें, आयर्लंडमध्यें व डेन्मार्कमध्यें शेतकऱ्यांची सहकारी चळवळ अधिक लोकप्रिय झाली आहे. आपल्याकडे पतपेढ्यांचा प्रसार अधिक झाला आहे. पतपेढ्या हा सहकारी चळवळींतला ओनामा आहे. तो सहकारी चळवळीचा पाया आहे. आपला देश शिक्षणांत व दुसऱ्या अनेक गोष्टींत मागासलेला असल्यामुळें सहकारी चळवळ सुरू करितांना ती पायापासून करावी, हें क्रमप्राप्तच होतें. शिवाय अशिक्षित वर्गांत सहकार्याचा प्रसार करण्याचा सोपा मार्ग म्हणजे पतपेढ्या स्थापन करणें हाच होय. भारत हा इतर देशांच्या मानानें अत्यंत दरिद्री देश आहे, आणि यांतील बहुसंख्य लोक अत्यंत कर्जबाजारी आहेत. त्यामुळें मांजरानें उंदराला पकडलें कीं त्याला पूर्णपणें न मारतां अर्धमेला करून त्याला खाण्यापूर्वीं तें जसें त्याला पुनःपुनः चावा घेऊन आपली स्वतःची करमणूक करून घेतें, तद्वत् देणेकरी अर्धमेल्या स्थितींत रहावा, तो पुरा मरूंहि नये व जगूंहि नये या करितां सावकार ऋणकोकडून नेहमीं फक्त व्याज मिळविण्याची खटपट करीत असतो. ऋणको मुद्दल देऊन ऋणमुक्त व्हावा, अशी त्यांची कधींच इच्छा नसते. मुद्दल देण्याबद्दल धनकोचा तगादा नसला तरी कर्जबाजारीपणामुळें मनुष्य विवेकशून्य,

परस्वाधीन व निरुत्साही होतो; त्याच्यांतील जीवंतपणाच नाहींसा होतो. हिंदुस्थानांतील जनतेची कर्जबाजारी स्थिति सारखी वाढत असल्यामुळें तिच्याबरोबर लोकांची दुर्बलताहि वाढत आहे. अशा निराशाजनक परिस्थितींत या साऱ्या संकटपरंपरेला कारणीभूत झालेला कर्जबाजारीपणा नाहींसा करण्याकरितां सहकारी पतपेढ्यांची चळवळ प्रथम हातीं घेण्यांत आली यांत कांहींच आश्चर्य नाहीं. पण कर्ज निवारण्याच्या चळवळीबरोबरच बचत करण्याची संवय लागण्याची आवश्यकता असते ती जर लागली नाहीं तर सावकाराच्या ऐवजीं अशा पेढ्या काढल्यानें लोकांचा खरा फायदा होत नाहीं. हाच अनुभव आपल्याकडेही येऊं लागला आहे. जमाखर्चाची कशी तरी तोंडमिळवणी करणारांना बचत करणें अर्थातच कठीण असतें, हें खरें. परंतु अशी संवय लागून कांहींतरी शिल्लक टाकल्याशिवाय त्याला आपल्या पायावर उभें राहाणें किंवा आपल्या शेजाऱ्याला साहाय्य करणें, कसें शक्य आहे ? शिवाय अत्यंत काटकसरीनें केलेली बचत या संस्थांत ठेवल्याशिवाय त्यांच्या व्यवस्थेबद्दल काळजी कशी वाटणार ! म्हणून अशा पतपेढ्यांच्या सभासदांना काटकसर करण्याची संवय लागून जी काय थोडी बहुत शिल्लक जवळ असेल, ती किंवा जिच्यांत कांहीं वाढ होत नाहीं अशी कांहीं ठेव जवळ ठेविलेली असल्यास ती, अशा पतपेढ्यांत ठेवण्याची संवय लागल्याशिवाय अशा लोकांची कांहीं सुधारणा होणें शक्य नाहीं. नाहींतर उठल्यासुटल्या कर्ज काढावें, हप्ते ठकवित रहावें आणि शेवटीं जामिनावर पैसे भरण्याचा प्रसंग यावा किंवा जामिन आणि कर्जदार दोघेहि नाहींसे व्हावेत, ही स्थिति आज बहुतेक ठिकाणीं आढळून येत आहे, ती पुढेंहि तशीच चालू राहील तर या चळवळीचें पाऊल पुढें पडणार नाहीं. सभासदांना बचत करण्यास-कर्ज घेण्यास नव्हे, उत्तेजन देणें हें या चळवळीचें उद्दिष्ट आहे.

## समाजाची नवनिर्मिति करण्याचा सर्वोत्तम मार्ग

एकोणिसाव्या शतकांत जी भयानक आर्थिक आणि सामाजिक परिस्थिति उत्पन्न झाली, तींत आपणां सर्वांचें संरक्षण करावें व त्या आपत्तीचा सहकार्यानें प्रतिकार करावा, या सामान्य इच्छेंतून, स्वयंस्फूर्तीनें सहकारी चळवळ पाश्चात्य देशांत जन्माला आली आणि तिची वाढहि अशीच, स्वाभाविक, सरकारी मदत किंवा मार्गदर्शन यांच्या शिवाय, एवढेंच नव्हे तर केव्हां केव्हां सरकारी विरोधाला न जुमानतांहि, अप्रतिहतपणें होत गेली. अशा रीतीनें स्वातंत्र्याची एक परंपरा तिनें निर्माण केली. तिला सरकारी मदतीची किंवा ढवळाढवळीची कल्पनाहि असह्य आणि चळवळीच्या स्वयंस्फूर्तीच्या भावनेला विरोधक होईल अशी भीति वाटली. म्हणून त्यांनीं सरकारला कोणत्याहि प्रकारें या चळवळींत हस्तक्षेप करूं दिला नाहीं. आपल्याकडे याच्या अगदीं उलट प्रकार झाला. सरकारच्या आणि त्यांतही परकी सरकारच्या पंखा-

खालीं तिचा जन्म झाला. त्यामुळें ती येथें सुरू झाली, पण पाश्चात्य राष्ट्रांप्रमाणें मूळ धरूं शकली नाहीं. आजहि तिची व्हावी तितकी वाढ झालेली नाहीं. सरकारची मदत किंवा देखरेख यांच्याशिवाय ती चालूं शकत नाहीं असें सामान्यतः आढळेल. अर्थात् बाह्यात्कारी पाहूं गेल्यास तिची वाढ होत आहे, असें भासेल–आंकड्यांनीं तसें सिद्धही करून दाखवितां येईल–पण वस्तुस्थिति तितकीशी समाधानकारक नाहीं, हें मात्र खरें !

या चळवळीपासून बंधुभाव, शील, स्वाभिमान, परस्परांबद्दल अभिमान व परस्परांच्या हिताची जाणीव, काटकसर, आपला व्यवहार चोख ठेवण्याची संवय, आपल्या बरोबरच आपल्या शेजाऱ्याची जबाबदारी सांभाळण्याची आवश्यकता वगैरे समाजाच्या उत्कर्षाला अत्यंत आवश्यक असणाऱ्या गुणांची वाढ होते. समाजाची एकंदर रचनाच सहकार्याच्या तत्त्वावर झालेली आहे. " जीवनसहकारामुळें परस्परांशीं जखडलेल्या व्यक्तींचा समुदाय " अशी समाजाची व्याख्या करतात. समाजाचें किंवा समाजांतील कोणत्याहि घटकांचें जरासुद्धां अनहित न करितां आपलें व आपल्या शेजाऱ्यांचें आणि पर्यायानें एकंदर समाजाचेंहि या चळवळीच्या मदतीनें हित साधतां येतें. लोकशाहीचा एक उपयुक्त घटक होण्याची लायकी येण्यासहि या चळवळीचा अनेक प्रकारें उपयोग होतो. म्हणून हीं तत्त्वें लोकांच्या गळीं उतरवून, त्यांना तीं पटवून, त्याप्रमाणें कृति घडूं लागली, सहकार्याची वृत्ति त्यांच्यांत उत्पन्न झाली; तर त्यापासून समाजाची प्रगति निःसंशय होईल. नव्हे समाजाची पुनर्घटना करण्याचा समाजाची नवनिर्मिति करण्याचा, तो एक सर्वोत्तम मार्ग आहे. पण तसे प्रयत्न मात्र झाले पाहिजेत.

## कामगार–संघ

औद्योगिक क्रांतीमुळें जो हाहाःकार उडाला आणि तिला शह देण्यासाठीं जे मुख्यतः तीन प्रकारें प्रयत्न करण्यांत आले; त्यांत कामगार संघांना फार महत्त्वाचें स्थान देण्यांत आलें होतें. वर उल्लेख केलेलीं मित्रमंडळें आणि सहकारी चळवळ, यांच्याप्रमाणें याहि बाबतींत स्थिति होती. हीहि चळवळ सुरू केली आणि ती लगेच यशस्वी झाली, असें मुळींच झालें नाहीं. पुन्हां पुन्हां प्रयत्न करून, अनेक वेळां अपयश येऊन, अनुभव येईल व प्रसंग पडेल त्याप्रमाणें कार्यपद्धतींत बदल करून शेवटीं ती यशस्वी झाली आणि तिनें कामगारांचें कल्पनातीत हित केलें. ती भांडवलशाही धंद्यांतूनच जन्माला आली. कारण अठराव्या शतकांत जेव्हां धंद्यांना कारखान्यांचें स्वरूप आलें, ते वाफेच्या साहाय्यानें चालूं लागले आणि मजुरी घेऊन काम करणारा स्वतंत्र मजूरवर्ग अस्तित्वांत आला, त्यावेळीं त्याबरोबरच या बदललेल्या परिस्थितीला तोंड देण्याकरितां कामगारांना आत्मविश्वास आणि संघशक्ति यांची आवश्यकता

वाटून कामगारसंघहि जन्मास आले. जेथें भांडवलशाही आहे, तेथें ती टिकविण्यासाठीं मजुरीवर अवलंबून असणारा मजूरवर्गहि अस्तित्वांत असतो आणि आपल्या जीवनपातळीचें ( Standard of living ) संरक्षण व्हावें व ती वाढावी म्हणून कामगारांना संघटित होणें अपरिहार्य असतें.[1] पण संघटित होण्याचा हा स्वाभाविक हक्क मिळविण्यासाठीं कामगारांना पराकाष्ठेचे हाल सोसावे लागले. त्यांचे हे प्रयत्न हाणून पाडण्यासाठीं एकापेक्षां एक आणि एकामागून एक अनेक कायदे करण्यांत आले आणि शेवटीं स. १८०१ मध्यें इंग्लंडच्या पहिल्या पार्लमेन्टनें पास केलेल्या कायद्यानें तर या बाबतींत कळसच केला. सभा भरणें, वर्गणी देणें किंवा गोळा करणें, कोणत्याहि कामासाठीं एकत्र जमणें वगैरे कामगारांच्या जीवनाला अवश्य लागणाऱ्या अगदीं सामान्य गोष्टीहि त्यानें बेकायदेशीर ठरवून कायदा मोडणारांना जबर शिक्षा ठेवण्यांत आली. तथापि कडक कायदेहि कामगारांचे संघटित होण्याचे प्रयत्न थांबवूं शकले नाहींत. सर्व बाजूंनीं प्रतिकूल परिस्थितींतहि त्यांनीं आपलें संघटनेचें कार्य चालू ठेवलें. कामगारसंघांना आपले पैसे सेव्हिंग्ज् बँकेमध्यें ठेवण्याची बंदी होती. म्हणून ते खाणावळींच्या मालकांकडे किंवा ज्या ठिकाणीं त्यांच्या सभा भरत, त्या घराच्या मालकांकडे आपले पैसे ठेवीत.

## आरंभींचे अयशस्वी प्रयत्न

त्यावेळीं जमीनदार, भांडवलदार व बडे लोक यांच्या हातीं सर्व सत्ता होती. मतदार थोडे आणि तेहि नांवाचेच होते. पैशाच्या व सत्तेच्या जोरावर मत विकत घेणें, मतदारांची व मतांची अदलाबदल करणें, जागांचीहि अदलाबदल करणें, असें वाटेल तें करून पार्लमेंटमध्यें निवडून येणें, त्यांना शक्य होत होतें. आणि अशा लोकांच्या हातीं राजसत्ता होती. एकोणिसाव्या शतकाच्या सुरवातीनंतर या परिस्थितींत थोडा थोडा बदल होऊं लागला. स. १८२४ मध्यें जो कायदा पास करण्यांत आला त्यानें संघ स्थापणें किंवा संघाचा सभासद होणें यांच्यावरील बंदी उठविली आणि संघ, सहकारी चळवळ व राजकीय हक्क मिळविण्याची चळवळ, या तीन दिशांनीं प्रयत्न सुरू झाले. पण या साऱ्या प्रयत्नांचें मूळ एकच होतें. त्यामुळें ते परस्परांना साहाय्यकारी व पूरक होत होते. मालाचें उत्पादन आणि वांटप सहकारी तत्त्वांवर करून तें कामगारांच्या हातीं राहावें या तत्त्वाचा प्रवर्तक पूर्वी उल्लेख केलेला रॉबर्ट ओवेन हा या मूळ कल्पनेचा जनक होता आणि या त्याच्या कल्पनेंतून संघ, सहकारी चळवळ व कामगारांना राजकीय हक्क मिळविण्याची चळवळ या तीन मोठ्या

1 A Short History of the British Working Class Movement by G. D. H. Cole P. 6.

चळवळी उगम पावल्या होत्या. आणि पुढें शंभर वर्षांपेक्षां अधिक काळ त्या एकत्र वाढत गेल्या.* पण ओवेनच्या वेळीं ह्या चळवळी शिस्तीनें एकोप्यानें आणि सर्वांच्या म्हणून चालविणें, तसेंच मालाचें उत्पादन आणि वांटप सहकारी तत्त्वावर करून सहकारी चळवळ, आणि बचत करणाऱ्या संस्था यांचें जाळें देशभर पसरविण्याला अनुकूल परिस्थिति नव्हती. म्हणूनच ओवेननें महान् राष्ट्रीय संयुक्त संघ स्थापण्याचें केलेले शिकस्तीचे प्रयत्न आणि त्याच्या यशासाठीं केलेली जिवापाड मेहनत फुकट जाऊन तो संघ इ. स. १८३४ मध्यें अयशस्वी ठरला. तथापि त्यानें प्रतिपादलेल्या तत्त्वांचा अत्यंत हितकारक परिणाम झाला होता. सहकारी चळवळ, कामगार संघ व समाजवाद (Socialism) हीं सामाजिक व आर्थिक बदल करून घेण्याच्या चळवळीचीं तीन अंगें असून त्यांचें एक केंद्र झालें पाहिजे अशी ओवेनची कल्पना होती आणि ती फलद्रुप होण्याला त्या विशिष्ट काळाची अनुकूलता मिळाली नसली तरी पुढें ती यशस्वी झाली. आणि कामगार व इतर गरीब वर्ग यांची सामाजिक व आर्थिक सुधारणा होऊन त्यांना राजकीय हक्कहि मिळण्यास ती कारणीभूत झाली. संघ काढण्यांत आले. संघांच्या सभासदांना अवश्य लागणाऱ्या वस्तू, मध्यस्थ नाहींसे करून, योग्य भावांत व खऱ्या मापानें मिळून पुनः या व्यवहारांत राहिलेला नफाहि त्यांना मिळावा, म्हणून सहकारी भांडारें काढण्यांत आलीं. माल चांगल्या परिस्थितींत तयार करून स्वस्त भावानें मिळावा, बेकार कामगारांना काम मिळावें आणि कारखानदार जो नफा खातात, तो कामगारांना मिळावा यासाठीं प्रत्येकानें थोडथोडी बचत करून गोळा झालेल्या भांडवलांत माल तयार करणें व तो घाऊक भावानें विकणें यासाठीं सहकारी संघ निघाले. त्यांना आपल्या बचत झालेल्या पैशांतून भांडवल पुरवून, त्यांनीं तयार केलेला माल विकत घेऊन व दुसऱ्या अनेक तऱ्हेनें कामगारसंघानीं त्यांना साहाय्य केलें. असें हें चळवळीचें जाळें पुढें सारखें वाढत जाऊन राष्ट्रव्यापी झालें. महान राष्ट्रीय संयुक्त संघ काढण्यांत ओवेनचा हेतु हाच होता. पण त्याला अवश्य असलेली दूरदृष्टि, निष्ठा आणि स्वार्थत्याग त्यावेळीं नव्हता. त्यामुळें ही प्रचंड योजना आपसांतील दुही आणि मजबूत मध्यवर्ती संघटना यांच्या अभावीं दोनतीन वर्षांतच ढांसळली. ओवेनहि स्वतः निराश होऊन शैक्षणिक, नैतिक आणि धार्मिक बाबतींतील सुधारणाचा उपदेशक बनला.

## राजकीय सत्ता हातीं येण्यासाठीं प्रयत्न

यानंतर दहाबारा वर्षांनीं या चळवळी पुनः डोकें वर करूं लागल्या. पण त्या स्वतंत्र झाल्यास अधिक यशस्वी होतील, असें वाटून त्या परस्परांपासून वेगळया करण्यांत आल्या. तथापि त्या एकमेकांना सारख्या साहाय्य करीत राहिल्या. त्यांची सारखी वाढ होऊं लागली. कामगारसंघांना एकत्र आणणारी पहिली ट्रेड युनियन

* Trade Unionism, its origins, growth, and Role in modern society. By Herbert Tracey P. 17

कॉंग्रेस स. १८६८ मध्यें भरली. तिनें राजकिय प्रतिनिधित्व मिळावें म्हणून एक पार्लमेन्टरी कमिटी नेमली. पार्लमेन्टपुढें येणाऱ्या कायद्याचें कामगारांच्या हिताच्या दृष्टीनें निरीक्षण करणें, नवीन बिलाचे मसुदे तयार करणें, पार्लमेन्टचे सभासद व मंत्री यांच्या गांठीभेटी घेणें आणि कॉंग्रेसचें पुढील अधिवेशन भरेपर्यंत दरम्यानच्या काळांत कामगारसंघटनांची आवश्यकता प्रतिपादन करणें हें या समितीचें मुख्य काम असे. एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापासून पार्लमेन्टमध्यें आपले प्रतिनिधी असणें आवश्यक आहे, असें या चळवळीच्या पुढाऱ्यांना वाटूं लागलें. पूर्वीच्या जमिनदार, भांडवलदार व उमराव यांच्यांत आतां आणखी बड्या कारखानदारांची भर पडली होती. तथापि कामगारांच्या चळवळीचा व संघशक्तीचा परिणाम होऊं लागला होता. त्यांच्या संबंधीच्या कायद्यांत त्यांना हितकारक अशा सुधारणा होऊं लागल्या होत्या. पुढें स. १८७४ मध्यें कामगार व उदार मतवादी हे दोन पक्ष एक होऊन त्यांच्या मतावर अलेक्झंडर मॅकडोनल्ड व थॉमस बर्ट हे दोन खाणी-कामगारांचे पुढारी पार्लमेन्टचे सभासद म्हणून प्रथम निवडून आले. पुढें पार्लमेन्टमध्यें कामगारांच्या प्रतिनिधींची संख्या हळूहळू वाढून कामगारपक्षाच्या हातीं राजकीय सूत्रेंहि आलीं, हा अलीकडील इतिहास सर्वांच्या परिचयाचा आहे.

कामगारांच्या या साऱ्या चळवळींचा ओघ शेवटीं एका ठिकाणीं मिळावा, अशी या चळवळींचा जनक रॉबर्ट ओवेन याची जी महत्त्वाकांक्षा होती त्या दिशेनें आजहि प्रयत्न होत आहेत. कामगारसंघांच्या प्रतिनिधींची बनलेली ट्रेड युनियन कॉंग्रेस, सहकारी संस्थांची कॉपरेटिव्ह युनियन व कामगारांच्या पार्लमेन्टमधील सभासदांची लेबर पार्टी या कामगारांच्या तीन प्रकारच्या चळवळींच्या प्रतिनिधींची मिळून नॅशनल कौन्सिल ऑफ लेबर ही संस्था झालेली आहे. ती या साऱ्या संघटनांचा संबंध असलेल्या सामान्य अडचणी, मतभेद, उद्दिष्टें इत्यादि गोष्टींसंबंधीं विचार विनिमय करून हें एकीकरण प्रत्यक्ष अंमलात येईल, असें पाहाते. या तीनहि चळवळींची वाढ आज फार मोठी झालेली आहे आणि त्या आपापल्या मार्गानें जात असल्या तरी त्या एकमेकांना पूरक होण्याची, सांवरण्याची, एकमेकांच्या हितानहिताची इतकी काळजी घेतात कीं, कोणाच्याहि चळवळीला अपाय होईल असा तीव्र मतभेद होण्याचा त्या प्रसंग आणूं देत नाहींत. आपण सारीं भावंडें आहोंत, आपलें मूळ एकच आहे आणि आपण वेगवेगळ्या मार्गानें जात असलों, तरी आपलें उद्दिष्ट एकच आहे ही भावना त्यांच्यांत नेहमीं जागृत असते आणि हे संबंध अधिक सलोख्याचे होतील असा ते सारखा प्रयत्न करीत असतात.

## कोणावरहि सक्ती नाहीं

या संघाचे सभासद होण्याची कोणावरहि सक्ती करण्यांत येत नाहीं; तें सर्वस्वी त्यांच्या इच्छेवर अवलंबून असतें. इंग्लंडांत आज २,२०,००,००० कामगार आहेत.

त्यांपैकीं बहुतेक या संघाचे सभासद होण्यासारखे आहेत. पण तेथें जे एकंदर ७०० संघ आहेत व त्यांचे सुमारें नव्वद लक्ष सभासद आहेत; त्यांपैकीं फक्त १८६ संघ आणि त्यांचें ८०,००,००० सभासद ट्रेड युनियन कॉंग्रेसला जोडलेले आहेत.[1] या कॉंग्रेसला न जोडलेल्या तसेंच कोणत्याहि संघाचे सभासद नसलेल्या कामगारांना कोणत्याही प्रकारें सक्ती न करितां आपल्यांत कसें ओढून घ्यावें, हा मोठा बिकट प्रश्न आज इंग्लंडमधील कामगारांपुढें आहे.

आपल्या स्वतःच्या सुधारणेबरोबर व राजकारणांत व राज्यकारभार चालविण्यांत कामगार वाकबगार व्हावेत, म्हणून कामगार वर्गानें ज्या संस्था चालविल्या, त्यांत कामगारसंघाची चळवळ मुख्य होय. लोकशाहीच्या तत्त्वाप्रमाणें राज्यकारभार चालविण्याचें प्रत्यक्ष शिक्षण जें शाळेंत, महाविद्यालयांत किंवा विश्वविद्यालयांतहि मिळणें शक्य नव्हतें, तें या चळवळीमुळें अगदीं सामान्य कामगारांनाहि मिळूं लागलें हें या चळवळीचें वैशिष्ट्य आहे.

इंग्लंडांतील कामगारांच्या चळवळीची वर जी कांहींशी विस्तृत माहिती दिली आहे, तिचा हेतु तेथील कामगारांनीं अत्यंत अडचणीच्या, आपत्तीच्या प्रसंगीं परस्परांना साहाय्य करून आणि बचत, स्वावलंबन व संघटना यांच्या द्वारें आपली शक्ति कशी वाढविली, सर्वांगीण सुधारणा कशी करून घेतली, याची बरोबर कल्पना यावी हा आहे. लोकशाही समाजाची सारी सुधारणा त्याच्या घटकांवर–व्यक्तीवर–अवलंबून असते. त्यांची ज्या प्रमाणांत सुधारणा होईल; त्या प्रमाणांत तोहि सुधारतो. म्हणून केवळ टीकाकारांची भूमिका स्वीकारून किंवा साऱ्या सुधारणासाठीं सरकारच्या तोंडाकडे पाहून आपली प्रगति होणें शक्य नाहीं. याबाबतींत आपल्या स्वतःलाच जें काय करितां येईल; तें प्रत्येकानें प्रथम केलें पाहिजे. असे सुधारण्याचे प्रयत्न करतांना आपल्याहिपेक्षां वाईट परिस्थितींत असतांना इंग्लंडांतील अगदीं सामान्य लोकांनीं आपल्या उन्नतीसाठीं कसे प्रयत्न केले, याची रूपरेखा आपल्यासमोर असावी, स्वतःच्या प्रयत्नानें उन्नतावस्थेस आलेल्या एखाद्या समाजाचें नमुनेदार उदाहरण आपल्या डोळ्यांपुढें असावें, म्हणून इंग्लंडांतील मित्रमंडळें, सहकारी चळवळ व कामगार संघ यांची माहिती वर दिली आहे. त्यांचें अनुकरण करण्याचे आपण प्रयत्न करीत आहोंत. नाहीं असें नाहीं. पण त्यांची शिस्त, स्वावलंबी होण्याची धडपड, संघटित होण्याचे प्रयत्न, आपल्याबरोबर आपल्यासारख्या स्थितींत असलेल्या आपल्या बांधवांनाहि, कोणत्याहि प्रकारचे मतभेद आपल्या प्रयत्नांच्या आड येऊं न देतां, साहाय्य करण्याची प्रबळ इच्छा, राष्ट्रहितबुद्धि इत्यादि अनेक गुणांचें आपण अनुकरण करीत नाहीं, ती वृत्ति आपल्यांत आणण्याचा प्रयत्न होत नाहीं. आपल्याकडे नुसतें बाह्य अनुकरण होतें. त्या बाह्य अनुकरणाबरोबर त्यामागील वृत्तीचेंहि अनुकरण झालें पाहिजे. तरच आपलाहि समाज प्रगतीच्या मार्गाला लागेल.

---

1. Trade Unionism, its Origins, Growth and Role in Modern Society by Herbert Tracey P. 27.

# प्रकरण ८ वें

# व्यक्तिगत समाजसेवा

ईश्वराची पूजा करण्यासाठीं जर एखादी प्रतिमा शोधून काढावयाची तुमची इच्छा असेल तर त्या भरीस तुम्हीं पडूं नका. तुमच्या कल्पनेतून निघणाऱ्या सर्वोत्कृष्ट प्रतिमेपेक्षांहि चांगली अशी ईश्वराची प्रतिमा अगोदरच अस्तित्वांत आहे. सजीव मनुष्य ही ती प्रतिमा होय. देवाची पूजा करण्यासाठीं एखादे देऊळ बांधावें असें तुम्हांला वाटत असेल तर त्या देवळाचा नकाशा तयार करण्याचें कारणच नाहीं. तुमच्या कल्पनेचें देऊळ चांगलें असेल, पण त्याच्याहि पेक्षां चांगलें—त्याहून अतिशय उच्च प्रतीचें देऊळ अगोदरच अस्तित्वांत आहे. हें देऊळ म्हणजे 'आत्मारामाचें मंदिर' जें मानवी शरीर तेंच होय.

**—स्वामी विवेकानंद**

"मी नुकताच विठोबारखुमाईचें दर्शन घेऊन आलों. युगान्‌युगाच्या त्या देवतांचें मी दर्शन घेतलें. पूजाअर्चेच्याविषयीं मला गोडी वाटत नाहीं. पण मी एका विराट मंदिरांत प्रार्थना करतों. तें मंदिर भारताचें. त्या मंदिरांत ३३ कोटी देवतांच्या प्रतिमा आहेत."

**— पंतप्रधान पं. नेहरू, पंढरपूर.**

दि. ३०-५-१९५३

सर्वसाधारण जनतेच्या सुखासाठीं व सुधारणेसाठीं प्रयत्न करतांना समाजांतील असामान्य ( abnormal ) शारीरिक, मानसिक, बौद्धिक किंवा दुसऱ्या कोणत्याही प्रकारें विशेष व्यंग असलेल्या माणसांना त्यांचे विशिष्ट दोष, विशिष्ट अडचणी, विशिष्ट परिस्थिति, विचारांत घेऊन शिक्षण देण्याची किंवा सुधारणा करण्याची व्यवस्था करावी लागतेच. पण असे ढोबळ दोष असलेले व समाजांतील दुसरे गाळीव, टाकाऊ मानलेले लोक वगळले, तरी बाकीची सारींच माणसें सारखी असतात, असें थोडेंच आहे. समाजांतील कोणतीहि एक व्यक्ति हुबेहुब दुसऱ्या व्यक्तीसारखी नसावी, अशी निसर्गाची योजना आहे. व्यक्ति तितक्या प्रकृति असें म्हणतात तें यामुळेंच. जशा समाजांतील दोन व्यक्ति रूपानें सारख्या असूं शकत नाहींत, तशा त्या इतर बाबतींतहि सारख्या होऊं शकत नाहींत. दोन व्यक्तींत कांहीं तरी फरक हा असतोच. आणि व्यक्तिव्यक्तींत असा फरक असतो, असें आपण एकदां मान्य केलें कीं, त्यांच्या शिक्षणाच्या किंवा सुधार-

णेच्या बाबतींतहि हें व्यक्तिवैशिष्ट्य लक्षांत ठेवून तसे प्रयत्न करणें आवश्यक असतें. समाजाची सर्वांगीण सुधारणा करण्याचे प्रयत्न करतांना या व्यक्तिगत गरजांकडे लक्ष द्यावें लागतें. आणि तसें तें दिलें तरच समाजाची सर्वांगीण सुधारणा करणें शक्य असतें. सर्व समाजांत किंवा राष्ट्रांत महात्मा पदाला चढलेली व्यक्ति एखाददुसरीच असावयाची. पण ती एखाददुसरी व्यक्ति म्हणजे सारा समाज होऊं शकत नाहीं. समाजांत एकदोन माणसें मोठीं झालीं कीं सर्व समाज सुधारला असें मानलें जात नाहीं. समाजाचा सर्वांगीण विकास होण्यास समाजांतील सर्वसाधारण जनतेची सुधारणा होईल असे सामुदायिक प्रयत्न तर करावे लागतातच; पण त्याबरोबरच ज्या व्यक्तींत अशीं कांहीं व्यंगें असतात कीं तीं तिच्या प्रगतीच्या आड येतात, तिची वाढ होऊं देत नाहींत, तेव्हां तिच्या या विशिष्ट वैयक्तिक गरजांकडे लक्ष देऊन तिचा मार्ग निष्कंटक होईल असे प्रयत्न करावे लागतात. ज्यांच्यांत असें शारीरिक, मानसिक, बौद्धिक किंवा अशाच प्रकारचें दुसरें व्यंग नसतें पण कांहीं सामाजिक अड-चणीमुळें म्हणा किंवा वैयक्तिक असामान्यतेमुळें म्हणा, ज्यांची आणि ज्यांच्या परिस्थि-तीची नीटशी जुळणी होत नाहीं आणि त्यामुळें ज्यांची प्रगति खुंटते, अशा व्यक्ति आणि त्यांची सामाजिक परिस्थिति यांची समाजसेवक व वैद्यकीय शास्त्रज्ञ यांच्या साहाय्यानें बुद्धिपुरसर नीट जुळवाजुळव करून त्यांच्या प्रगतीचा मार्ग मोकळा करणें याला व्यक्तिगत समाजसेवा ( Social Case Work ) असें म्हणतात. याचा इतिहास, याचे मार्ग, याची कार्यपद्धति हीं भिन्न असलीं, तरी तो समाजसेवेचा एक महत्त्वाचा मार्ग आहे.

## व्यक्तिगत गुणांचा विकास

व्यक्तिगत समाजसेवा म्हणजे व्यक्तिमत्त्वाचा ( Personality ) विकास असें म्हणतां येईल. यांत व्यक्तीचें शरीर व त्याचें व्यक्तिवैशिष्ट्य ( Individuality ) इतकेंच नव्हे तर शिक्षणानें, अनुभवानें, समाजाच्या संगतीनें उत्पन्न झालेले गुण म्हणजे तिच्या आनुवंशिक व स्वसंपादित अशा दोन्ही प्रकारच्या गुणांचा अंतर्भाव होतो. हे गुण सदोदित बदलत असतात. त्यांना अनुकूल परिस्थिति मिळाल्यास त्यांची वाढ होते. ती न मिळाल्यास त्यांची वाढ खुंटते, इतकेंच नव्हे तर कालांतरानें त्यांचा क्षयहि होतो. यासाठीं एकेक व्यक्ति आणि तिच्या सभोंवारची सामाजिक परिस्थिति ( social environment ) यांच्यांत जरूर ती तोंडमिळवणी करण्याकरितां जे सहेतुकपणें मार्ग योजावे लागतात, ती व्यक्तिगत समाजसेवा होय. व्यक्ति आणि तिची परिस्थिति यांच्यामध्यें जी अनुकूल क्रियाप्रतिक्रिया घडत असते, तिच्यावर व्यक्तिगत गुणांची वाढ अवलंबून असते. यासाठीं व्यक्तीच्या गुणांत फरक करण्यास परिस्थितीचें साहाय्य घ्यावें लागतें. कितीहि सद्गुणी मनुष्य झाला तरी त्याच्यांत जसे

थोडे तरी दुर्गुण असतातच; त्याप्रमाणें कितीहि जरी दुर्गुणी मनुष्य झाला तरी त्याच्यांत थोडे सद्गुणहि असतातच. चांगल्या गुणांत नेहमीं प्रकाशमान होण्याची शक्ति असते. या गुणांवर भर देऊन, त्यांची प्रकाश देण्याची शक्ति वाढवून, त्यांच्याच साहाय्यानें दुर्गुण नाहींसे करण्याचा प्रयत्न समाजसेवक करितो. या कामीं त्याला मानसिक व शारीरिक रोग बरे करणारे डॉक्टर; शिक्षक, धर्मगुरु, नातेवाईक, मित्र, सामाजिक संस्था, औद्योगिक शिक्षण देणाऱ्या संस्था, बागा, क्रीडांगणें वगैरे अनेक संस्थांचें व व्यक्तींचें साहाय्य घ्यावें लागतें. व्यक्तिगत समाजसेवा करणाऱ्या माणसाच्या ताब्यांत जी व्यक्ति दिलेली असेल तिला त्याचें अशील म्हणतात. आपल्या अशिलाला सर्वोत्कृष्ट सल्ला मिळाला आहे व त्याबरहुकूम तो वागत आहे अशी प्रथम खात्री करून घ्यावी लागते.

व्यक्तिगत समाजसेवा करणाऱ्या माणसाचें मुख्य काम मध्यस्थपणा करावयाचें असतें. आरोग्य सुधारण्यासंबंधींच्या नियमांत जी प्रगति झाली आहे व ज्या संघटित सार्वजनिक संस्था आहेत, त्यांचा योग्य तऱ्हेनें उपयोग करून घेतां आल्यास समाजसेवकाचें हें काम पुष्कळच हलकें होतें. टेलिफोनच्या मध्यवर्ती यंत्राजवळ बसून जरूरीप्रमाणें एका यंत्राचा सांधा दुसऱ्याला जोडणें व काम संपतांच पूर्ववत् तें जाग्यावर ठेवणें हें जसें घडतें तशासारखें हें असतें. यामुळें जो समाज अत्यंत संघटित असतो, ज्यांत अनेक प्रकारें समाजसेवा करणाऱ्या खाजगी व सार्वजनिक संस्था असतात, अनेक प्रकारचे तज्ज्ञ असतात, तेथें व्यक्तिगत समाजसेवा करणें अत्यंत सोपें असतें. पण जेथें या गोष्टींचा अभाव असतो तेथें व्यक्तिगत समाजसेवेला अवश्य लागणाऱ्या अनेक प्रकारच्या संस्थांची उणीव भरून काढणें फारच कठीण पडतें. कांहीं कांहीं बाबतींत तर तें अशक्य असतें. कारण व्यक्तिगत समाजसेवा करणाराचें, अशील व त्याची परिस्थिति यांची नुसती तोंडमिळवणी करून कित्येकदां भागत नाहीं, तर कधीं कधीं ती परिस्थिति साफ बदलावी लागते आणि हा बदल कधीं कधीं तात्पुरता असतो तर केव्हां केव्हां कायमचा असतो. कारण व्यक्तिगत गुणांची वाढ होण्यास परिस्थिति मुख्यतः कारणीभूत होते. तेव्हां ती अशिलाच्या व्यक्तिगत गुणांना पोषक होण्यासारखी नसल्यास कायमची बदलणें अपरिहार्य असतें. शिवाय नवीन ठिकाणीं नवीन संवयी लागणें सोपें असतें. त्यामुळेंहि व्यक्ति लवकर सुधारते.

आपल्या अशिलाचें कोठें चुकतें आहे, हें समजून घेण्यासाठीं त्याची प्रथम शारीरिक व मानसिक तपासणी करून घ्यावी लागते; पण एवढ्यानेंच त्याचें काय बिघडलें आहे तें आपल्याला समजतेंच असें नाहीं. यासाठीं त्याची घरची राहाणी, धंद्याच्या ठिकाणची वागणूक, आप्तमित्रांशीं वर्तन व दुसऱ्या अनेक गोष्टी यांचा विचार करावा लागतो. आणि या गोष्टींची माहिती झाल्यास कार्य सुकर होतें. तसेंच

इष्ट दिशेनें प्रयत्न झाल्यास मनुष्य कोणत्याहि स्थितींतून सुधारूं शकतो, या तत्त्वावर हें काम हातीं घेणाराचा पूर्ण विश्वास असावा लागतो. लहान मूल जें जें कांहीं पाहातें त्याचा, त्याच्यावर मोठ्या माणसापेक्षां जास्त परिणाम होतो. त्याच्या स्वतःविषयींच्या कल्पना सारख्या बदलत असतात आणि त्यामुळेंच त्याच्यांतील गुणांचा विकास होत असतो. तसें नसल्यास हा विकास होणें शक्य नसतें. म्हणजे क्षणोक्षणीं कोणतीतरी गोष्ट त्याच्या डोक्यांत असते, दुसऱ्या कोणत्यातरी वस्तूशीं तें तादात्म्य पावलेलें असतें, जणूं त्या वस्तूचा तें भागच झालेलें असतें आणि या भावना त्याच्या विकासाला कारणीभूत होतात. लहान मूल जें कांहीं पाहातें तें कसें एकाग्रतेनें पाहातें व त्याचा त्याच्यावर कसा परिणाम होतो, याचें एक आश्चर्यकारक उदाहरण लेखकाला माहिती आहे. त्याचे घरीं एक थोडा वयातीत मनुष्य नेहमीं येत असे. तो आला कीं परत जाईपर्यंत सारखा एका मागून एक विड्या ओढीत असावयाचा. आमच्या घरीं विड्या ओढणारें कोणी माणूस नव्हतें. आमच्या घरांतली एक लहान मुलगी तो आला कीं त्याच्या शेजारीं गोष्टी करीत बसावयाची व तो विडी कशी ओढतो हेंहि मोठ्या उत्सुकतेनें पाहावयाची. आम्ही त्या गृहस्थाला आप्पा म्हणत असूं. एके दिवशीं तो अशी विडी ओढीत असतां जवळपास कोणी नाहीं असें पाहून ती मुलगी त्याला हळूच म्हणाली " आप्पा, मला पण एक विडी आणि काड्यांची पेटी द्या. मला पण विडी ओढून पाहावयाची आहे. " त्यांनीं अर्थात् तिला दावली आणि मागाहून ही गोष्ट आम्हांला सांगितली. मनुष्येतर प्राणी जन्मतः सर्व गोष्टींनीं पूर्ण असतात. पण मनुष्य प्राणी अनेक दृष्टींनीं अपूर्ण असतो. आणि त्यानें स्वतःच्या प्रयत्नांनीं आपल्यांतील उण्या गोष्टींची पूर्तता करावी असा सृष्टीचा उघड हेतु दिसतो. यासाठीं व्यक्तिगत समाजसेवा करणारा आपल्या अशिलाचे सामाजिक संबंध ( social relationships ) कोणत्या तऱ्हेचे आहेत हें शोधून काढण्यांत यशस्वी झाल्यास त्याला त्याच्याविषयीं पुष्कळ माहिती मिळते व त्यांच्या अडचणी कोणत्या आहेत व त्याची सुधारणा होणें कितपत शक्य आहे हें समजण्याचें साधन त्याला उपलब्ध होतें, असें मानावयास हरकत नाहीं. त्याच्या घरांतील माणसें त्याच्याशीं कशीं वागतात व तो त्याच्याशीं कसा वागतो, त्याच्या मित्रांना त्याच्यांत कोणते गुणदोष दिसतात. कारखान्यांत त्याच्याबरोबर काम करणारे व त्याचे वरिष्ठ यांचें त्याच्याविषयीं काय मत आहे, तो कोणत्या क्लबचा सभासद आहे, धार्मिक बाबतींत तो कोणत्या मताचा आहे; सारांश त्याची राहाणी, त्याचें काम, करमणुकीची ठिकाणें, उठण्याबसण्याच्या जागा, जातीच्या संस्था व एकंदर देशाविषयींच्या कल्पना यांचा त्याच्या सामाजिक बंधनांत अंतर्भाव करावा लागतो आणि समाजसेवकाला तीं विचारांत घ्यावीं लागतात.

## व्यक्तिवैशिष्ट्य

एकादा मनुष्य अगदीं निराश झाला असला, त्याला आपल्या जीविताचाहि कंटाळा आला असला, तर नुसत्या उपदेशाचा त्याच्यावर कांहींसुद्धां परिणाम होत नाहीं. उलट उपदेशानें तो अधिक वैतागी बनतो. आपलें अशील अशा विषण्ण मनःस्थितींत असतां, त्याचा ओढा कोणत्या गोष्टीकडे आहे–कोणती गोष्ट त्याला परिस्थितीचा विसर पाडूं शकेल हें शोधून काढण्याची कला समाजसेवकाला अवगत असावी लागते आणि त्या गोष्टीच्या साहाय्यानें त्याची नैराश्यवृत्ति नाहींशी करावी लागते. दुर्गुणानें दुर्गुण वाढतात, तसे सद्गुणानें सद्गुण वाढतात; पण तसा योग घडवून आणण्याची शक्ति समाजसेवकांत असावी लागते. मेरी ई. रिचमॉंड यांनीं आपल्या या विषयावरील पुस्तकांत[1] याचें एक उदाहरण दिलें आहे. तें असें: त्यांच्या दोन मैत्रिणींनीं आपलें कॉलेजांतील शिक्षण पुरें झाल्यावर आपापल्या शहरीं कुटुंबहितवर्धक संस्थांत काम करण्याचें ठरविलें. त्यांपैकीं एकीची लवकरच नवऱ्यानें टाकलेल्या एका बाईशीं गांठ पडली. तिला लहानलहान तीन मुलें होतीं, व तिची गृहस्थिति कल्पनातीत वाईट होती. यासाठीं या असहाय कुटुंबाची शारीरिक व सांपत्तिक स्थिति सुधारण्याचें व त्या कुटुंबाच्या चालकाचा शोध लावण्याचें काम तिनें हातीं घेतलें. सुदैवानें तिची मैत्रीण जिथें राहात होती, त्या शहरीं लवकरच त्याचा तपास लागला. तो तेथें धंदा शोधण्यासाठीं गेला होता; परंतु काम मिळाल्यावर हळुहळू आपल्या कुटुंबाकडे दुर्लक्ष करूं लागला आणि कुटुंबाच्या पोटाला पैसे पाठविण्याऐवजीं स्वतःच्या चैनीसाठीं ते खर्च करूं लागला. या उभयतां मैत्रिणींनीं त्यानें आपली जबाबदारी ओळखावी व आपल्या निराधार झालेल्या बायकोमुलांची दैन्यावस्था नाहींशी करावी म्हणून अनेक तऱ्हानीं प्रयत्न करून पाहिले, पण त्यांपैकीं एकहि प्रयत्न यशस्वी झाला नाहीं. शेवटीं अप्रत्यक्ष रीतीनें त्याला समजावायचा त्यांनीं प्रयत्न केला, तो फलद्रूप होऊन तें कुटुंब पूर्ववत् गुण्यागोविंदानें नांदूं लागलें, इतकेंच नव्हे तर त्याची पूर्वीपेक्षांहि अधिक भरभराट झाली. तो एका कामगारसंघाचा सभासद झाला आणि संघाच्या कामांत तो अतिशय मन घालूं लागला. वरील बाईची मैत्रीणहि या संघाची सभासद होती व तिला त्या चळवळीची इत्थंभूत माहिती होती. त्यामुळें त्यांची मैत्री जुळली, एकमेकांच्या खाजगी गोष्टींचीहि चर्चा होऊं लागली आणि मुलांच्या शिक्षणाविषयीं व भवितव्याविषयीं प्रश्न निघाल्यावर आपण आपल्या स्वतःच्या मुलांच्या बाबतींत फार मोठी चूक करीत आहों, हें त्यानें कबूल केलें. पुढें आपल्या कुटुंबाचें पोषण करण्याचें त्यानें आश्वासन दिलें आणि त्याप्रमाणें तो वागूंहि लागला.

---

1. What is Social Case Work? By Mary E. Richmond, Director, Charity Organisation Department; Russell Sage Foundation, New York.

मनुष्याचें एकंदर चारित्र्य बनण्याला ज्याप्रमाणें शिक्षण व परिस्थिति हीं कारणीभूत होतात त्याचप्रमाणें आनुवंशिक संस्कारहि कारणीभूत होतात. परंतु यांपैकीं प्रत्येक किती प्रमाणांत कारणीभूत होतें हा प्रश्न अजून वादग्रस्त आहे. तथापि कांहीं तज्ज्ञाचें मत असें आहे कीं, मनुष्याचें हित वा अहित बहुतांशीं त्यांच्या स्वतःच्याच हातीं असल्यामुळें परिस्थितीचा व शिक्षणाचा परिणाम मनुष्येतर प्राण्यापेक्षां माणसावर अधिक होतो आणि स्वतःची उन्नति करून घेण्याची साधनें मनुष्येतर प्राण्यांना फारशीं उपलब्ध नसल्यामुळें आनुवंशिक संस्कारांचा परिणाम त्यांच्यावर अधिक होतो.

प्रत्येक माणसाला आपापली सुधारणा करून घेण्याला अवश्य ती संधि मिळावी, किंबहुना तशी संधि मिळविण्याचा प्रत्येकाला हक्कच आहे, असें आपण म्हणतों. आणि तें कांहीं खोटें आहे अशांतला भाग नाहीं. परंतु सारख्या परिस्थितींतील माणसें नेहमीं सारखींच असतात असें तरी कोठें आहे? जगांतील कोणत्याहि एका व्यक्तीचा चेहरा दुसऱ्या व्यक्तींशीं जुळण्यासारखा नसतो, त्याप्रमाणेंच कोणत्याहि एका माणसाचा स्वभाव तंतोतंत दुसऱ्या माणसाच्या स्वभावाशीं कधींहि जुळण्यासारखा नसतो. याकरितां व्यक्तिगत समाजसेवेंत जर कांहीं विशेष असेल तर तें हेंच आहे कीं, प्रत्येक व्यक्तींत जो कांहीं विशेष असेल त्याचा छडा लावावयाचा व त्याच्या आधारानें व्यक्तीची उन्नति करावयाची. दुसऱ्याबद्दल भ्रातृभाव-प्रेम व तज्जन्य परहितबुद्धि हीं अशा प्रकारच्या विधायक भावनेला प्रेरणा देतात आणि म्हणून व्यक्तिगत समाजसेवा करणारांत हा गुण उपजत असावा लागतो. त्यांत विशिष्ट प्रकारच्या शिक्षणाची व अनुभवाची भर पडली म्हणजे तो आपल्या कामांत पूर्ण तरबेज होतो. सर्वांकरितां एक सांचा तयार करण्याची आवश्यकता असली; तरी तें या विवक्षित कार्याचें ध्येय नाहीं. जे एका साच्यांत बसत नसतील, बसले तरी कोणत्याहि प्रकारें संस्कार न होतां जसेच्या तसे निसटून बाहेर पडत असतील, त्यांपैकीं प्रत्येकाची परिस्थिति, त्या एकट्यालाच सोईस्कर होईल, अशा प्रकारची साधनसामुग्री तयार करणें व तिचा आपल्या अशीलाचें शीलसंवर्धन करण्याच्या कामीं उपयोग करणें हें अत्यंत नाजुक व दुर्धर काम व्यक्तिगत समाजसेवा करणाराचें असतें.

## स्वावलंबी होण्याची आवश्यकता

इच्छाशक्तीच्या प्रयोगांत एक गोष्ट विशेष दिसते ती ही कीं, त्यांत प्रयोग करणाराची शक्ति जितकी बलवत्तर दिसते; तितकाच ज्यांच्यावर ते प्रयोग केले जातात, त्यांच्या इच्छाशक्तीचा पराधीनपणा दिसतो. अंधता नाहींशी करण्याकरितां आणि आंधळ्यांची स्थिति सुधारण्याकरितां ज्यांनीं जिवापाड प्रयत्न केले आहेत त्यांचें असें ठाम मत आहे कीं, आंधळ्यांची पराधीनता वाढविण्याला सद्बुद्धीनें कां होईना; पण त्यांच्या कुटुंबांतील लोक, इष्टमित्र व सर्वसाधारण जनता हींच मुख्यतः कारणीभूत

होतात. सर् ऑर्थर पिअर्सन हे स्वतः आंधळे असल्यामुळें त्यांचा या बाबतींतील अनुभव विशेष महत्त्वाचा आहे. ते लिहितात, "एखाद्या माणसाला जर तुम्ही सांगितलेंत कीं, अमुक अमुक रोगानें तुला पछाडलें आहे, तर त्या रोगाच्या कल्पनेचा परिणाम त्याच्यावर इतका कल्पनातीत होतो कीं स्वतः निरोगी असूनसुद्धां आपण रोगी आहोंत, असें त्याला वाटूं लागतें आणि कांहीं दिवसांनीं तो रोग त्याला खरोखरच जडतो. माझी दृष्टि कायमची नाहींशी झाली अशी जेव्हां माझी खात्री झाली; तेव्हां अधिक परतंत्र न होण्यासाठीं पहिली गोष्ट मीं केली ती ही कीं, कैक वर्षें माझी व्यक्तिशः सेवा करण्याकरितां ठेविलेल्या माझ्या सेवकाला मी माझ्यापासून दूर केलें. आंधळेपणांत जर कोणती अत्यंत महत्त्वाची व अंतीं उपयोगी पडणारी गोष्ट असेल तर ती ही कीं, जें जें कांहीं आपल्याला स्वतःला करतां येण्यासारखें असेल तें आपल्या आपण स्वतः केलें पाहिजे, दुसऱ्याकडून कधींहि करून घेतां कामा नये." आंधळा तर पराधीनच असतो पण डोळस माणसें तरी सर्वच कोठें स्वावलंबी असतात? वस्तुतः वरील नियम आंधळ्याच्या दृष्टीनें जितका महत्त्वाचा आहे. तितकाच किंबहुना त्यापेक्षां जास्त डोळस माणसाच्या दृष्टीनेंहि महत्त्वाचा आहे. हरएक गोष्टींत दुसऱ्यावर अवलंबून राहाण्यापेक्षां ज्या कांहीं गोष्टी आपल्या स्वतःला करतां येण्यासारख्या असतील, त्या केल्यानें एक प्रकारचा आनंदच वाटतो, शरीराला वळण लागतें आणि कायमचा स्वावलंबीपणा येतो. उलट पक्षीं आपलें काम दुसऱ्यावर सोपवावें, तितका मनुष्य अधिक परावलंबी होतो. व्यक्तिगत समाजसेवेच्या दृष्टीनें आपल्या अशिलांतील अशा प्रकारचा परावलंबीपणा नाहींसा करणें हें अत्यंत महत्त्वाचें असतें. म्हणून त्यांची सुधारणा होण्यासाठीं जें काय त्याला स्वतःला करतां येईल तें करण्याला त्याला उत्तेजन दिलें पाहिजे. कारण मनुष्य आपल्या सुधारणेसाठीं जें काय करतो, तें दुसऱ्यानें त्याच्यासाठीं कांहीं करण्यापेक्षां अधिक कायम स्वरूपाचें असतें.

प्रकृति बरी नसली, एखाद्यानें फसविलेलें असलें, जावें तिकडे यश येईनासें झालें, कांहीं करण्याला कोठें संधि मिळेनाशी झाली कीं, मनुष्य अगदीं निराश व्हावा, हें अगदीं साहाजिकच असतें. अशा विषण्ण मनःस्थितींत त्याच्या भावी उत्कर्षाचें कितीहि भडक चित्र रंगविलें तरी तें परिणामकारक होत नाहीं. अशा वेळीं त्याच्या मार्गातले अडथळे दूर करणें व त्याला हताश करणाऱ्या गोष्टींपासून परावृत्त करणें हें जरूर असतेंच; पण त्याशिवाय त्याच्या त्याला भागवितां येतील, अशा त्याच्या गरजा वाढविणें, हाहि या बाबतींत त्याला सुधारण्याचा एक मार्ग आहे.

आपण जें जें काय सांगूं त्याला आपला अशील होकार देईल आणि त्याबरहुकूम वागेल असे प्रयत्न करणें हा समाजसेवेचा खरा मार्ग नव्हे. प्रसंगविशेषीं कांहीं बाबतींत आपल्या अशिलाला त्याच्या हिताच्या कांहीं गोष्टी करावयास लावणें व त्या

तो करीत नसल्यास त्याबद्दल त्याला पुनः पुनः स्मरण देणें हें वेगळें. मात्र आपली प्रत्येक गोष्ट त्यानें मान्य करावी व आपलें मत तें त्याचेंहि मत असावें, अशी अपेक्षा करणें उभयतांनाहि अहिताचें व हानिकारक असतें.

## तीन उदाहरणें

मेरी ई. रिचमॉंड यांनीं आपल्या "व्यक्तिगत समाजसेवा म्हणजे काय ?" या पुस्तकांत कांहीं उदाहरणें दिलीं आहेत. व्यक्तिगत समाजसेवेची यथार्थ कल्पना येण्यासाठीं त्यांतील तीन उदाहरणें खालीं देत आहे:—

१ मेरिया बिलोस्की ( Maria Bielowski ) ही मुलगी पंधरा वर्षें वयाची असतांना कारखान्यांत कामाला जाऊं लागली. आपल्या मजुरीपैकीं किती पैसे घरीं द्यावयाचे व किती पैसे आपल्या स्वतःच्या खर्चासाठीं ठेवावयाचें याबद्दल ती व तिची सावत्र आई यांच्यामध्यें नेहमीं भांडण चालत असे. मेरिया फार अपरात्रीं घरीं येत असे, हेंहि एक त्यांच्या भांडणाला कारण झालें होतें. शेवटीं हें भांडण विकोपास जाऊन मेरियानें घर सोडलें व ती एका हॉटेलमध्यें राहूं लागली. परंतु लवकरच आपल्या खोलींतील दुसऱ्या मुलीचे कांहीं पैसे चोरल्याच्या आरोपावरून तिला कोर्टांत खेंचण्यांत आलें. त्या वेळीं तिची स्थिति कोणालाहि कींव येण्यासारखी होती. तिचा वर्ण थोडा काळसर होता व तिच्या डोळ्यांवर थोडी धुंदी दिसे. अंगावरील सारे कपडे फाटलेले, घाणेरडे आणि अनेक प्रकारचे डाग जागोजागीं पडलेले असे होते. तिच्या केंसांना कैक दिवस फणी लागलेली नव्हती आणि केसांवरून उवा चालतांना स्पष्ट दिसत होत्या. तिची जास्त अधोगति शक्य तर टाळावी म्हणून न्यायाधीशानें तिला शिक्षा न देतां सुधारण्याची संधि देण्याचें ठरविलें व तिला या कार्याला वाहिलेल्या समाजसेवकाच्या (probation officer) ताब्यांत दिलें. तिच्या माठीमागच्या इतिहासांत असें उघडकीस आलें कीं, पूर्वीं काम करीत असलेल्या दोन ठिकाणीं ती अगदीं अनियमित होती. तिची शारीरिक व मानसिक तपासणी केली तेव्हां असें आढळून आलें कीं, ती बुद्धिवान् आहे पण तिची नैतिक अधोगति झालेली आहे. तिच्या कौटुंबिक स्थितीविषयीं अशी माहिती लागली कीं हें कुटुंब-बाप, त्याची दुसरी बायको व चार मुलें—पांच वर्षांपूर्वीं पोलंडमधून अमेरिकेंत आलें. नंतर तीन वर्षांनीं बाप वारला आणि मुलें सावत्र आईचें ऐकेनाशीं झालीं. पुढें दोन मोठे मुलगे परांगदा झाले, धाकट्या दोघांना उनाड मुलांना सुधारणाऱ्या शाळेंत ठेवण्यांत आलें. मुलीचीहि तीच गत होणार होती. ही मुलगी कामकाजाला जाऊं लागेपर्यंत चांगली होती. शाळेंतील तिची वागणूक व अभ्यासक्रम यांत नांव ठेवण्यासारखें कांहीं नव्हतें. म्हणूनच उनाड मुलांना ताळ्यावर आणणाऱ्या शाळेंत तिला पाठविण्याची आवश्यकता न्यायाधीशाला वाटली नाहीं. पण

त्याच कुटुंबांत तिला राहूं दिल्यास ती सुधारेल असेंहि वाटेना. करितां जेथें व्यक्तिशः तिच्यावर लक्ष ठेविलें जाईल अशा एखाद्या खाजगी कुटुंबांत तिला ठेवण्याचा निश्चय ठरला व तिचा कायदेशीर पालक कोर्ट झालें. परिस्थितींत असा फरक पडल्यामुळें तिची सावकाशीनें पण सारखी सुधारणा होऊं लागली. प्रथमतः तिच्या शारीरिक सुधारणेकडे लक्ष देण्यांत आलें. तिचे केंस साफ धुऊन त्यांतील उवा नाहींशा करण्यांत आल्या. त्याचप्रमाणें तिचे दांतहि साफ करण्यांत आले व तिला जे अनेक प्रकारचे विकार होत होते व कांहींचीं पूर्वचिन्हें दिसत होतीं, ते सारे तिला हॉस्पिटलमध्यें शारीरिक तपासणीसाठीं सतत दोन वर्षें पाठवून बरे करण्यांत आले व तिची प्रकृति निकोप राहील अशी व्यवस्था करण्यांत आली. तिला ज्या शाळेंत ठेवण्यांत आलें होतें तेथें स्वतःची सर्व स्वच्छता राखणें, आपली खोली साफसूफ करणें, आपले कपडे धुणें शिवणें व दुरुस्त करणें, आपल्याबरोबर इतरांचीहि निगा राखणें वगैरे गोष्टींचें शिक्षण देण्यांत येई. प्रत्येकीला आपल्या खर्चापुरते पैसे मिळत आणि कोणापासूनहि पैसे उसने घेण्याची सक्त मनाई असे. येथील स्वयंपाकघरांतून एके दिवशीं दोन केक चोरीला गेले व ते नेल्याचें कोणीहि मुलगी कबूल करीना; म्हणून सर्व मुलींनीं मिळून शहरांत सहल करावयास जावयाचें ठरलें होतें तोहि कार्यक्रम रहित करण्यांत आला; पण चोरीचा थांग लागेना. परंतु अशा प्रकारच्या शुद्ध वातावरणाचा परिणाम कांहीं विलक्षण होतो ! पुढें तीन दिवसांनीं मेरियानें आपण ते केक चोरून खाल्याचें आपल्या मुख्य शिक्षकिणीला स्वतः होऊन सांगितलें. या लहानशा गोष्टीचा परिणाम तिच्यावर इतका झाला कीं, त्या घटकेपासून तिनें चोरी करण्याचें सोडलें. इतकेंच नव्हे तर पुढें ती ज्या ज्या कुटुंबांत राहिली त्यांनीं तिच्या प्रामाणिकपणाची फारच शिफारस केली.

उपर्युक्त शाळेंत आठ महिने राहिल्यावर तिला निरनिराळया वेळीं पांच कुटुंबांत ठेवण्यांत आलें. त्या त्या घरचें काम सांळाळून ती आपला अभ्यासहि नियमितपणें करीत असे. तिला ठेवावयाच्या कुटुंबाची निवड मोठ्या काळजीपूर्वक करण्यांत येत असे. शिवाय तिच्यावर व्यक्तिशः नजर ठेवण्याचें काम पत्करलेली समाजसेविका आपल्या कामांत फार वाकबगार होती. या दुहेरी प्रयत्नामुळें तिची सारखी प्रगति होत होती. तिची मैत्री संपादन करणाऱ्या वरील समाजसेविकेचे या मुलीच्या बाबतींतील अनुभव ऐकण्यालायक आहेत. ती लिहिते, “ एकादी गोष्ट निश्चयपूर्वक तिच्या अहिताची असल्याशिवाय ती तूं करूं नकोस, असें मी तिला कधींही सांगत नसे. हेतु हा कीं, प्रत्येक गोष्ट आपल्या हिताची आहे वा अहिताची आहे हें तिचें तिला अनुभवानें कळावें व ठरवितां यावें. तसेंच होतां होईल तों कोणतीहि गोष्ट तिच्यापासून चोरून ठेवावयाची नाहीं अशी माझी संवय असे. एकादी गोष्ट करूं नको म्हणून आपण कां सांगतों, याचीं कारणेंहि मी तिला स्पष्ट सांगत असें आणि त्या बाबतींत तिच्या ज्या कांहीं शंका कुशंका असत त्यांचेंहि निवारण मी करीत असें. बरें, एखादे वेळीं माझी

स्वतःची चूक झाली असली तर ती प्रांजलपणें कबूल करण्यास मी कधींहि माघार घेत नसें. एके दिवशीं तिचे फाटलेले पायमोजे शिवावयास मीं तिला सांगितलें, पण इतक्यांत माझ्या स्वतःच्या फाटक्या पायमोज्यांकडे माझें लक्ष गेलें. घाईघाईनें पायांत घालतांना त्याच दिवशीं ते फाटले होते. मला याचें हसूं आलें आणि फार काम असल्यामुळें रात्र थोडी आणि सोंगें जास्त, अशी माझी स्थिति कशी होते, तें मीं तिला सांगितलें. तिला त्या गोष्टी पटल्या. प्रत्येक प्रश्नाचें खरें आणि सरळ उत्तर मी देत असल्यामुळें ती माझ्याशीं इतक्या मोकळ्या मनानें वागे कीं, कोणतीहि गोष्ट मग ती क्षुल्लक असो, कीं महत्त्वाची असो, मला सांगितल्याशिवाय तिच्यानें रहावत नसे. आई बाहेरून घरांत येतां क्षणींच, घरांत घडलेल्या बारीकसारीक गोष्टीसुद्धां मूल अगदीं उतावीळपणानें आईला सांगतें, तशी ती माझ्याशीं वागे. त्यामुळें कोणत्या वेळीं कोणते विचार तिच्या मनांत चालले अहेत, त्याचा ठाव मला बरोबर लागे व त्यामुळें माझें कार्य सुलभ होई." आपल्या अशिलाशीं एकजीव होऊन त्याचें प्रेम इतक्या विलक्षण रीतीनें संपादन करणें ही गोष्ट अत्यंत कठीण आहे, हें सांगावयास नकोच. ही हातोटी बेमालूम साधण्याला या कामांतील अनुभव व शिक्षण हीं थोडींबहुत उपयोगी पडतात हें खरें, पण याला लागणारे कांहीं गुण उपजतच अंगीं असावे लागतात; ते शिक्षणानें किंवा अनुभवानें येत नाहींत, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. वरील प्रयत्नामुळें मेरिया निर्दोष झाली, तिच्यांत दुर्गुण म्हणून कांहीं राहिले नाहींत, अशी कोणीं समजूत करून घेऊं नये. तसें होणें शक्य नाहीं व तशी अपेक्षाहि कोणीं करूं नये. पण चोरी केल्याबद्दल शिक्षा होऊन ती कायमची गुन्हेगार होणार होती व अधोगतीच्या मार्गाला लागणार होती. तें न होतां तिनें उत्तम शिक्षण संपादन केलें; ती उत्तम नागरिक झाली आणि स्वतःची व समाजाची उन्नति करण्यास लायक झाली, हा कोणत्याही दृष्टीनें कमी फायदा नव्हे.

२ अमेरिकेंतील एका शहरांत कांहीं वर्षांपूर्वीं मिस्टर आणि मिसेस रुपर्ट यंग (Rupert Young) नांवाचें अनुक्रमें पंचवीस व वीस वर्षें वय असलेलें एक जोडपें राहात होतें. त्यांना दोन वर्षांचें एक मूल होतें. एके दिवशीं या पति-पत्नीचें भांडण विकोपास गेलें आहे, असा टेलिफोन त्या भागांतील कुटुंबहित-वर्धक संस्थेच्या चिटणीसाला आला. त्यानें लगेच आपला प्रतिनिधि पाठविला, तों त्याला असें आढळून आलें कीं घरांतील सामानसुमान ज्याच्याकडून विकत आणिलें होतें, त्या व्यापाऱ्याचा हप्ता ठरल्याप्रमाणें न दिल्यामुळें तो घरांतील सर्व खुर्च्या टेबलें परत घेऊन गेला होता. मिसेस यंग आपल्या मुलीसह माहेरीं निघून गेल्या होत्या. मिस्टर यंग हे बेहोष होईपर्यंत दारु प्याल्यामुळें अगदीं गलितगात्र होऊन एका मेजावर पडलेले होते. शेवटीं या उभयतां नवराबायकोनीं दुसऱ्या दिवशीं उपरि-निर्दिष्ट चिटणिसांना एक तासाच्या अंतरानें भेटावें असें ठरलें. या बाईच्या

मुलाखतींत असें आढळून आलें कीं, तिला तीन महिने गेलेले आहेत आणि ह्या एकंदर प्रसंगामुळें ती अगदीं गांगरून गेलेली आहे. कारण आप्तेष्टांनीं या छाकट्या नवऱ्याशीं इतःपर संबंध ठेवूं नको व त्याच्यावर कोर्टांत फिर्याद करून अन्नवस्त्राची मागणी कर असा सल्ला दिला होता. तिची सर्व हकीगत ऐकून नवऱ्याची मुलाखत झाल्यावर पुढील कार्यक्रम ठरवूं असें चिटणिसानें सांगितलें. मिस्टर यंग यांनीं आपल्या गैरवर्तणुकीबद्दल आपल्याला अनुताप होत आहे असें सांगितलें, दारूला पुनः शिवणार नाहीं असें आश्वासन दिलें, आणि हिल्डाला-बायकोला दारूच्या नशेंत मारहाण केल्याची कबुली दिली. पण प्रत्येकजण आपल्या विरुद्ध आहे, बायको आपल्याला फार छळते, तथापि ती अगदीं साध्वी आहे, घरच्या कोणत्याहि बाबतींत आपल्याला पहावें लागत नाहीं, आपल्या मुलीवर आपला अत्यंत जीव आहे व तिच्याबद्दल आपल्याला अभिमान वाटतो असें त्यांनीं सांगितलें. या सर्व संकटपरंपरेला बहुतांशीं आपण कारण असलों; तरी आपली सासू तोंडाळ असल्यामुळें तिचाहि यांत दोष आहे, असें तो म्हणाला. त्याच्या जेवणखाणाची तेथेंच व्यवस्था करण्यांत आली व शारीरिक तपासणी करण्याकरितां डॉक्टरकडे पाठविण्यांत आलें. दुसरे दिवशीं वरील संस्थेचे चिटणीस व तीं उभयतां नवराबायको यांनीं एकत्र भेटण्याचें ठरविलें. दुसऱ्या दिवशीं आपण कॅथोलिक पंथाचे अनुयायी असल्यामुळें दारूला स्पर्शहि करणार नाहीं, अशी धर्मगुरूकडे आपण स्वतः होऊनच शपथ घेतल्याचें यंग यांनीं सांगितलें. यानंतर त्यांचा कार्यक्रम असा ठरविण्यांत आला कीं (१) त्या उभयतां नवराबायकोनीं कांहीं दिवसपर्यंत परस्परांपासून दूर राहावें; (२) मिसेस यंग यांनीं आपल्या मुलीसह महिनाभर बाहेरगांवीं जाऊन विश्रांति घ्यावी; (३) मिस्टर यंग यांनींहि शक्य तर कांहीं आठवडे हवापालट करावा; (४) उभयतांनींहि वरील संस्थेच्या चिटणिसाशिवाय दुसऱ्या कोणत्याहि माणसांशीं किंवा आप्तेष्टांशीं घरगुती गोष्टींबद्दल एक ब्रहि काढूं नये; आणि (५) मिसेस यंग यांनीं आपल्या पतीशीं हटवादीपणा करण्याचें टाळावें. चौवीस तासाचे आंतच चौथी आणि पांचवी अट मिसेस यंग यांनीं मोडली व मिस्टर यंग यांच्याहि बारक्यासारख्या गोष्टीबद्दल तक्रारी चालूच होत्या. त्या दिवशीं कुटुंबहितवर्धक संस्थेच्या कचेरींतील खिडक्यांचीं तावदानें धुऊन साफ करण्याचें काम त्यांना देण्यांत आलें होतें. त्यांच्या खाण्यापिण्याची यथास्थित व्यवस्था करण्यांत आली होती. त्यांची मानसिक तपासणी करण्यांत येऊन डॉक्टरच्या सल्ल्याप्रमाणें थंड व ऊन पाण्याची आळीपाळीनें आंघोळ, खाण्याला पातळ पदार्थ, मित प्रमाणांत धूम्रपान पण दारू दृष्टीसमोरहि येत नये, अशी व्यवस्था तिथें करण्यांत आली होती. पुढें एकदोन आठवड्यांतच त्यांना दारुड्यांना सुधारावयाच्या एका आश्रमांत ठेवण्यांत आलें. दारूबाजीचे परिणाम साफ नाहींसे झाल्यावर मिस्टर रूपर्ट यंग यांच्यांत दारूचें व्यसन हा एकच दोष नाहीं तर दुसरेहि

कांहीं स्वभावदोष असल्याचें दिसून आलें. त्यांचा स्वभाव पोरकट, कानभरू व अस्थिर असल्याचें आढळलें. त्या आश्रमांतील फळें वेंचून तो तीं उपर्युक्त चिटणीसाच्या मातुःश्रीला पाठवी व तीं सुरक्षित पोंचल्याचें उत्तर लगेच गेलें नाहीं तर तो अगदीं उतावळा होई. दोन महिन्यांनीं तीं उभयतां पुनः शहरांत आलीं त्यांना लहानसें घर पाहून देण्यांत आलें. व त्यांचें सामानसुमानहि परत मिळण्याची व्यवस्था करण्यांत आली. रूपर्ट यांना तात्पुरतें कामहि मिळालें. कांहीं दिवसांनीं पूर्वी परिचित असलेल्या कामावर ते कायम झाले व तीं दोघेंहि आपला संसार पुनः थाटण्याचा उत्साहानें प्रयत्न करूं लागलीं. तरी पण अजून पुष्कळ गोष्टी व्हावयाच्या होत्या. त्यांची सुधारणा योग्य दिशेनें होण्याला नुकतीच कोठें सुरवात झाली होती. क्षुल्लक बाबीसंबंधीं वादविवाद वाढून तो विकोपास जाऊं नये, म्हणून लहानसहान गोष्टींकडे दुर्लक्ष केल्याशिवाय आणि सहनशीलतेनें व सहकारितेनें वागल्याशिवाय कोणतेंहि कुटुंब नांदूं शकत नाहीं, याची मिसेस यंग यांना वेळोवेळीं आठवण द्यावी लागे. मिस्टर यंग यांची वागणूक केव्हां केव्हां तर अगदीं पोरासारखी असे. दुसऱ्या मुलीच्या खेपेला बायकोच्या आजारीपणाचें निमित्त करून तो वरचेवर घरीं राहूं लागला; त्यामुळें त्याची नोकरी पुनः गेली. परंतु कुटुंबहितवर्धक संस्थेच्या चिटणिसांनीं नेहमीं सल्ला देऊन, संकटप्रसंगीं धीर देऊन, आपलीं दोन सुंदर मुलें चांगल्या तऱ्हेनें वाढविणें, त्यांना चांगला कपडालत्ता घालणें, त्यांना चांगलें शिक्षण मिळण्याची तजवीज करणें यांतच उभयतांचेंही सुख आहे, मुलांकरितां वाटेल तो स्वार्थत्याग करणें हें मातापित्याचें कर्तव्य आहे वगैरे प्रकारच्या गोष्टी सांगून त्यांना मार्गावर आणिलें. क्वचित् प्रसंगीं या नवराबायकोची बोलाचाली होई व ते प्रसंग अपवाद म्हणून सोडून दिल्यास त्या कुटुंबाची उत्तरोत्तर भरभराट होत गेली, असें म्हणावयास हरकत नाहीं. तो नोकरीवर स्थिर झाला आणि तें कुटुंब मोडण्याची एका काळीं वाटत असलेली भीति साफ नाहींशी झाली. पुढें सहा वर्षांनीं हें कुटुंब दोन खोल्यांऐवजीं चार खोल्यांत सुखानें नांदत असल्याचें वरील संस्थेच्या चिटणिसांना दिसलें.

२ मिसेस ॲलिग्री ( Allegri ) या बाईला वैधव्यस्थिति प्राप्त झाल्याला सुमारें नऊ वर्षें झालीं होतीं. हिच्या नवऱ्याची प्राप्ति चांगली असल्यामुळें हें कुटुंब एका काळीं मोठया सुखांत आणि चैनींत राहात होतें. परंतु हा सुखाचा काळ कायम टिकणारा नसतो, या गोष्टीचें त्यांना विस्मरण पडलें व भावी संकटें टाळण्याकरितां त्यांनीं कोणत्याहि प्रकारें तरतूद करून ठेविली नाहीं. पुढें कुटुंबाची अत्यंत दैन्यावस्था झाली. मोठीं चार मुलें लग्नें होतांच एका मागून एक त्या शहरापासून दूर राहावयास गेलीं. त्यांपैकीं एकहि आईची किंवा आपल्या धाकट्या बहिणीची विचारपूस करीनासें झालें. त्यांचा ठावठिकाणाहि आईला कळेनासा झाला. त्यामुळें मिसेस ॲलिग्री आणि तिची अल्पवयी मुलगी टेरेसा ( Teresa ) यांची स्थिति अत्यंत केविलवाणी झाली.

शिवाय त्या बाईला इंग्रजी भाषा समजत नसल्यामुळें मुलीच्या साहाय्याशिवाय तिच्याशीं कोणाला बोलतां येत नसे. पण मुलगी शाळेचें निमित्त करून कोठेंतरी भटकूं लागली होती. एका काळीं ऐषआरामांत कालक्षेप करणाऱ्या या बाईला घाणेरड्या वस्तींत, ओलसर व काळोखाच्या जागेंत राहाण्याचा प्रसंग आला. अन्न कधीं मिळालें तर कधीं मिळालें नाहीं, अशा स्थितींत संधिवातानें ती अंथरुणाला खिळली. सुदैवानें अशा प्रसंगीं या बाईची स्थिति कुटुंबहितवर्धक संस्थेला कळली आणि त्या संस्थेनें क्षणाचाहि वेळ न लावितां तिला साहाय्य केलें. पुढें तिची कोणत्या तऱ्हेनें व्यवस्था करावयाची हें निश्चित होईपर्यंत तिला तात्पुरती मदत देण्यांत आली. या संस्थेच्या वतीनें काम करणाऱ्या समाजसेविकेनें तिच्या सर्व मुलांचा पत्ता शोधून काढण्याचा निश्चय केला आणि मोठ्या मुलाशिवाय बाकीच्यांचा पत्ता मोठ्या शिकस्तीनें तिला मिळाला. मोठा मुलगा उनाडच आहे असें मागाहून समजलें. प्रत्येकाला या बाईची इत्थंभूत माहिती सांगून या बाईची पुढें काय व्यवस्था करावयाची तें ठरविण्याकरितां तिच्या मोठ्या जांवयाच्या घरीं तिच्या साऱ्या जवळच्या नातेवाईकांची सभा करण्याचें ठरलें. या सभेला वरील समाजसेविकेशिवाय दुसरें कोणीही बाहेरचें मनुष्य हजर नव्हतें आणि तिनेंसुद्धां या वादविवादांत प्रत्यक्ष भाग घ्यावयाचा नाहीं, जें कांहीं होईल तितकें ऐकावयाचें असें ठरविलें होतें. मिसेस ॲलिग्री या सभेला हजर होत्याच. सभेंत पुष्कळ गोष्टींचा खल झाला व समाजसेविकेला पूर्वी माहिती नसलेल्या अशा पुष्कळ गोष्टी उजेडांत आल्या व त्यांच्या सत्यासत्यतेबद्दल पुष्कळ वाद झाला. शेवटीं असें ठरलें कीं, या बाईची मोठी मुलगी कारमेल ही तिची स्थिति फारशी चांगली नसतांहि आईला वेळोवेळीं मदत करीत असल्यामुळें व परस्परांचें परस्परांवर विशेष प्रेम असल्यामुळें मिसेस ॲलिग्री यांनीं कारमेलाकडेच रहावें व टेरेसा हिनें आपल्या दुसऱ्या बहिणीकडे राहावें. या व्यवस्थेंत दोन्ही पुत्रांवर कोणत्याहि प्रकारची जबाबदारी पडली नाहीं याचें कारण असें कीं कोणतीहि जबाबदारी घेण्याची त्यांची तयारी नव्हती. उलट, या जबाबदारींतून निसटण्याकरितां ते सारखे पळवाटा शोधीत होते. अशा स्थितींत त्यांचेवर कोणतीहि जबाबदारी टाकल्यास ती त्यांनीं कधींहि पत्करली नसती, म्हणून झाली यापेक्षां दुसरी अधिक चांगली व्यवस्था करणें शक्य नव्हतें. या व्यवस्थेंतहि पुढें पुढें कांहीं अडचणी निघाल्या; पण त्या विकोपास न जातां तीं दोन्हीं माणसें सुखानें राहूं लागलीं.

## अनुकूल गृहस्थितीची आवश्यकता

कौटुंबिक स्थिति बिघडली कीं तिचा अनिष्ट परिणाम साहजिकच त्या कुटुंबांतील व्यक्तींवर होतो. मूल बरेंवाईट निपजणें बहुतांशीं आईबापांवर अवलंबून असतें.

याचा अर्थ असा कीं, मुलाची सर्व तऱ्हेनें सुधारणा होण्यास आई व बाप या उभयतांच्या साहाय्याची आवश्यकता असते. कांहीं दिवसांपूर्वी मुंबईतील एका मोठ्या रस्त्यावर मालाच्या पेट्यांनीं भरलेला एक खटारा बाजूला उभा होता व त्या पेट्यांच्या ढिगावर ५।६ वर्षांचा एक मुलगा झोपीं गेला होता. झोंपेंत तो मुलगा एकदम दुसऱ्या कुशीवर वळला आणि तो पेट्यांच्या अगदीं कडेवर निजलेला असल्यामुळें तोल जाऊन एकदम रस्त्यावर पडला. रस्ता रहदारीचा असल्यामुळें अनेक लोक त्याचे सभोंवार गोळा झाले व त्याचे डोक्यावर बर्फ वगैरे ठेऊन त्याला सावध करण्याचा प्रयत्न करूं लागले. कांहींनीं त्याला उचलून जवळच्या डॉक्टरकडेहि नेलें. पण इतकें झालें तरी गाडीवाल्याचा पत्ता लागेना. अमळशानें मालाच्या मालकाचा पत्ता शोधण्याकरितां आजूबाजूला फिरत असलेला गाडीवाला आपल्या गाडीपाशीं हा काय प्रकार आहे हें पाहाण्यासाठीं परत आला व मुलाची अत्यवस्थ स्थिति पाहून रडूं लागला. तेव्हां मुलाला आपल्याबरोबर कां फिरवितोस, घरीं कां ठेवीत नाहींस असें लोकांनीं त्याला पुनः पुनः विचारून भंडावून सोडलें. गाडीवाला म्हणाला, “ त्याची आई वारली, त्यामुळें त्याला घरीं पहाणारा कोणी नाहीं म्हणून मी त्याला आपल्याबरोबर फिरवितों. मी घरीं राहीन तर पोट कसें भरणार ? पूर्वी एक दोन वेळां तो असाच गाडीवरून पडला आणि आतां तर तो जगण्याची आशाच दिसत नाहीं. ” हें गाडीवाल्याचें उत्तर ऐकून मुलगा बरोबर फिरवितो म्हणून त्याला मूर्ख ठरविणारे प्रेक्षकही निरुत्तर झाले. आई नसल्यामुळें ही जशी मुलाची आबाळ होते; तसेंच बाप नसल्यानेंहि मुलाचें अपरिमित नुकसान होतें. मुलाला जशी अन्नवस्त्राची जरूरी असते त्याचप्रमाणें त्याची भावनात्मक वाढ होण्याला आईबापाचें आणि भावंडाचें प्रेम, लडिवाळपणा लागतो. तो नसल्यास मुलें तिरसट, लहरी, चमत्कारिक स्वभावाचीं बनतात व हे त्यांचे दुर्गुण त्यांना व समाजाला बाधक ठरतात. परंतु आईबाप नुसते जिवंत असल्यानेंच मुलांचें संगोपन व शिक्षण उत्तम तऱ्हेनें होतें असें मात्र नाहीं. तर मुलांची सर्वांगीण सुधारणा होण्याला आईबापांचा परस्परांशीं संबंध अत्यंत जिव्हाळ्याचा असावा लागतो. आईबापांचें परस्परावर प्रेम असलें आणि त्या उभयतांचें मुलावर प्रेम असलें तर मुलाच्या वाढीला अत्यंत आवश्यक असणारी अनुकूल परिस्थिति उत्पन्न होते. मुलाच्या सुखाकरितां वाटेल तो स्वार्थत्याग करण्यास तीं मागेंपुढें पाहात नाहींत. परंतु असें कुटुंब असण्याला दोघेंही सारख्या दर्जाचीं असावीं लागतात. त्यांत विषमता फारशी असून चालत नाहीं. लग्नाला अयोग्य अशा व्यक्तींचे विवाह झाल्यास, दोन व्यक्तींच्या संस्कृतींत महदंतर असल्यास किंवा जुलमानें विवाह घडवून आणल्यास कुटुंबांत अंदाधुंदी, लाथाळी आणि जुलूम हा असावयाचाच. याकरितां विवाहाला सर्वतोपरी लायक अशा माणसांच्या लग्नाला शक्यतितके अडथळे कमी करण्याचे, तसेच वयानें अगदीं अल्प असतील; अथवा ज्यांच्यावर लग्नाचा जुलूम होत असेल किंवा विवाह झाल्यास कोणता तरी

शारीरिक किंवा मानसिक रोग पुढील पिढींत शिरण्याचा संभव असेल, तर असे विवाह न होण्याबद्दलचे प्रयत्न झाले पाहिजेत.

आजारी मुलें, खोडकर मुलें, उशिरां येणारीं मुलें, अनियमित येणारीं मुलें व ज्यांची घरीं अगदीं वाईट स्थिति आहे अशीं मुलें, यांची व्यक्तिशः चौकशी करून त्यांची सुधारणा करण्याकरितां अमेरिकेंत घरीं भेटणाऱ्या (visiting) शिक्षकिणी नेमण्यांत येतात. यांना शिकविण्याचाही चांगला अनुभव असतो आणि त्या प्रत्येकीच्या ताब्यांत ठराविक मुलें देऊन त्यांपैकीं प्रत्येकाचा मुख्यतः कशानें बिघाड झाला आहे, तें पाहून कोणत्या उपायांनीं ते दोष नाहींसे करितां येतील तें पाहाण्याचें व ते उपाय अमलांत आणण्याचें काम दिलेलें असतें. या कामीं ती आपलें स्वतःचें वजन खर्च करिते, पालकांशीं सहकारिता करिते, शारीरिक व मानसिक तपासणी करणाऱ्या डॉक्टरांचा वेळोवेळीं सल्ला व प्रत्यक्ष मदतहि घेते, वेगवेगळ्या सामाजिक संस्थांचा उपयोग करून घेते, निरनिराळ्या खेळांचा व क्रीडांगणांचा फायदा घेते आणि जरूर तेथें त्या मुलांची आजूबाजूची परिस्थिति बदलते. सारांश, व्यक्तिगत समाजसेवेला अवश्य लागणाऱ्या सर्व साधनांचा उपयोग करून ती त्या मुलांची सुधारणा करिते.

## व्यक्तिगत समाजसेवेपासून विशेष फायदे

वरील प्रकारच्या शिक्षकिणींच्या ताब्यांत दिलेल्या एका नऊ वर्षांच्या मुलाची तो अत्यंत बुद्धिवान् असूनसुद्धां शिक्षणांत फारशी प्रगति होईना, असें दिसून आलें. चौकशी अंतीं शिक्षकीण बाईला असें आढळून आलें कीं रात्रीं अकराअकरा वाजेपर्यंत तो वाचीत असतो आणि अगदीं क्वचित् बाहेर जातो, शेजारींपाजारींसुद्धां फारसा जात नाहीं. असें असतां तो अभ्यासांत इतका मागें कां राहावा ? या शिक्षकिणीनें त्याच्या आईच्या मदतीनें त्याला उघड्या हवेंत दररोज खेळावयास लाविलें आणि त्याचा कार्यक्रम अशा रीतीनें तयार केला कीं, सायंकाळीं तो शरीरानें अगदीं दमून जावा; पण त्याच्या मनाला ताजेंतवाने वाटावें आणि तो लवकर झोंपीं जावा. यामुळें त्या मुलांत अल्पावधींत इतका बदल झाला कीं अपेक्षेबाहेर त्याचा अभ्यास होऊं लागला. तो नेहमीं झोपाळू व आळशी दिसावयाचा, तें नाहींसें झालें आणि तो अगदीं उत्साहपूर्ण दिसूं लागला. सदोष मुलाची व्यक्तिगत सुधारणा करूं लागल्यास मुलांत अशा प्रकारचे दोष उत्पन्न होण्याची सर्वसाधारण कारणें कोणतीं व तीं नाहींशीं करण्याला कोणते उपाय योजावेत हें कळूं लागतें, असा न्यूयार्क-सार्वजनिकशिक्षणसंस्थेचा अनुभव आहे. शिवाय कोणत्याहि परिस्थितीचा इष्ट वा अनिष्ट परिणाम मुलांवरच प्रथम होतो. कारण त्यांची ग्रहणशक्ति मोठ्या माणसांपेक्षां अधिक असते. त्यामुळें एकंदर समाजांत कोणत्या गोष्टींचा कसा परिणाम होत आहे, हें अजमावण्याचें व्यक्तिगत

समाजसेवा हें एक साधन झालें आहे. अशा रीतीनें प्रत्येक शाळेंतील प्रत्येक मूल कर्तव्यतत्पर होण्याकरितां इतके प्रयत्न करण्यांत आल्यावर सर्व राष्ट्र कर्तृत्ववान् व्हावें यांत आश्चर्य नाहीं. आपल्याला अनेक राष्ट्रें सुधारणेच्या शिखराला पोंचलेलीं दिसतात. पण ती स्थिति प्राप्त करून घेण्याकरितां त्यांची जी अविश्रांत धडपड चाललेली असते, याचा आपल्या मागासलेल्या राष्ट्रांत मागमूसहि लागत नाहीं.

घर, शाळा, कारखाना, हॉस्पिटल, तुरुंग या ठिकाणींच व्यक्तिगत समाजसेवेची आवश्यकता असते व याच ठिकाणीं ती यशस्वी होते, अशांतला भाग नाहीं; तर दुसऱ्या अनेक स्थळीं व अनेक प्रसंगीं तिची जरूरी लागते व राष्ट्राची भवितव्यता ठरविण्यांत तिची मदत होते.

व्यक्तिगत समाजसेवा करणारांचा अनेक व्यक्तींशीं व कुटुंबांशीं संबंध येत असल्यामुळें व त्यांना अगदीं जवळून सूक्ष्म निरीक्षण करण्याची संधि मिळत असल्यामुळें सामाजिक सुधारणा कोणत्या दिशेनें झाली पाहिजे, कोणते सामाजिक कायदे अमलांत आले पाहिजेत, अस्तित्वांत असलेल्या कायद्यांमुळें कोणते अन्याय होत आहेत व कोणत्या प्रकारें त्यांची सुधारणा झाली पाहिजे, हें ते स्वानुभवानें सांगूं शकतात व त्याच्या पुष्ट्यर्थ भरपूर पुरावाहि त्यांच्यापाशीं तयार असतो. जनतेच्या सामाजिक परिस्थितीचें निरीक्षण करण्याची अशी संधि दुसऱ्या कोणालाहि मिळत नाहीं. व्यक्तिगत समाजसेवा करितांना ज्या ज्या गोष्टी घडतात, त्यांची क्रमशः नोंद ठेवण्यांत येते. त्यामुळें त्यांत ज्या व्यक्तीचा संबंध येतो तिचा पुढील कार्यक्रम ठरविण्यास त्या माहितीचा उपयोग होतोच, पण त्याशिवाय दुसऱ्या समाजसेवकांना शिक्षण देण्याच्या कामीं व दुसऱ्या अनेक तऱ्हांनीं उपयोग होतो.

व्यक्तिगत समाजसेवा झाली तरी ती एकंदर समाजसेवेचें एक अंग आहे आणि म्हणून एकंदर समाजसेवेचें महत्त्व केव्हां झालें तरी तिच्या एका भागापेक्षां अधिकच असणार. एकंदर समाजसेवेचें ध्येय व्यक्तिगत गुणांची वाढ करणें हेंच आहे. पण तिच्या प्रत्येक भागाचें कार्यक्षेत्र निराळें असतें. व्यक्ति आणि तिची सामाजिक परिस्थिति यांचा मेळ घालण्याचें काम व्यक्तिगत समाजसेवेचें असतें. सामुदायिक समाजसेवेचे प्रयत्न व्यक्तिसमूहाची सुधारणा करण्याकरितां चाललेले असतात. ते एकेकट्या व्यक्तीसाठीं नसतात. एकंदर समाजाची सुधारणा करण्याकरितां सामाजिक कायदे व अन्य तऱ्हेनें चळवळ करण्यांत येते आणि सामाजिक संशोधना ( social research ) मुळें समाजाच्या स्थितीची पाहाणी होऊन अश्रुतपूर्व माहिती उपलब्ध होते आणि तिचा एकंदर समाजावर काय परिणाम झाला व पुढें काय होईल हें दाखविण्यांत येतें. ही पाहाणी समाजसेवेच्या दुसऱ्या अंगांना अत्यंत आवश्यक असते. व्यक्तिगत समाजसेवा करणाराला या सर्व प्रकारच्या समाजसेवेच्या कामाची

थोडीफार माहिती असावी लागते. जितकी अधिक माहिती असेल, तितकी चांगलीच. आपलें विवक्षित कार्यसुद्धां त्याला अशा रीतीनें करावें लागतें कीं, त्या योगें त्याचें स्वतःचें कार्यहि होईल व वर निर्दिष्ट केलेल्या इतर प्रकारच्या समाजसेवकांनाहि त्याची मदत होईल आणि अशा रीतीनें समाजसेवेचें एकंदर कार्य सुकर होईल. कारण एकंदर समाजसेवेपासून व्यक्तिगत समाजसेवा जर अलग केली, तर तें कार्य अगदींच अपुरें दिसेल. परंतु वस्तुस्थिति अशी आहे कीं, हे समाजसेवेचे प्रकार परस्परांपासून वेगळे करितांच येत नाहींत. ते परस्परावलंबी आहेत. एक प्रकार दुसऱ्याला पूरक आहे आणि प्रत्येक प्रकारच्या कामाची वाढ होईल, तेव्हांच एकंदर समाजसेवेचें कार्यक्षेत्र वाढेल व सर्व समाज कार्यक्षम होईल.

पहिलें हॉस्पिटल निराश्रित आजाऱ्याकरितां निघालें व पहिली सेव्हिंगज् बँक परावलंबी लोकांकरितां निघाली, तद्वत् परावलंबी झालेल्या माणसांची सुधारणा करण्याकरितां व्यक्तिगत समाजसेवा अस्तित्वांत आली. आणि आतां तिची जरूरी कोणत्या ना कोणत्या रूपानें कोर्टांत, तुरुंगांत, शाळांत, हॉस्पिटलांत, कारखान्यांत आणि दुसऱ्या शेंकडों ठिकाणीं भासत आहे. व्यक्तिगत समाजसेवेचें हें क्षेत्र असेंच सारखें वाढत जाणार, यांत मुळींच शंका नाहीं.

व्यक्तिगत समाजसेवा हें समाजसेवेच्या कार्याचें एक अत्यंत महत्त्वाचें अंग असलें तरी या दृष्टीनें आपल्याकडे अजून फारसे प्रयत्न झालेले नाहींत.

नों. दि.

## प्रकरण ९ वें

# समाजसेवकांच्या वसाहती

गरीब व कामगार लोकांना प्रत्यक्ष दान करण्यापेक्षांसुद्धां योग्य सल्ला देणें व त्यांना कोणता मार्ग हितकर होईल याविषयीं मार्गदर्शन करणें हें त्यांच्या अधिक उपयोगाचें असतें. पण हें नुसतें चांगल्या वस्तींत व्याख्यानें दिल्यानें किंवा गरीब लोकांच्या वस्तींत सवडीप्रमाणें जाऊन त्यांना उपदेश केल्यानें होण्याजोगें नसतें. त्यासाठीं गरीब लोकांच्या वस्तींत प्रत्यक्ष राहून तेथील परिस्थितीचा अभ्यास करून, जणूं आपण त्यांचे शेजारी किंवा मित्र आहोंत, अशा रीतीनें त्यांच्याशीं समरस व्हावें लागतें. तसेंच एकाच ठिकाणीं काम करणारे, पण निरनिराळ्या ठिकाणीं पसरलेले लोक असतात, त्यांना एकत्र करून त्या सर्वांच्या हिताच्या प्रश्नांचा विचार करणें जरूर असतें. अशा गोष्टी ते लोक स्वतः करूं लागेतोंपर्यंत सुशिक्षित वर्गांतील लोकांनींच त्या केल्या पाहिजेत; आणि कामगारवस्तींत कामगारांच्या शेजारीं राहूनच त्या करणें शक्य असतें. लोकांच्या अनेक अडचणी असतात, अनेक तऱ्हेच्या गाऱ्हाणीं असतात. अनेक तऱ्हेच्या मदतीची त्यांना आवश्यकता असते आणि अनेक तऱ्हेनें त्यांची सुधारणा होणें जरूर असतें. हें सर्व करण्यास त्यांच्यांत मिळूनमिसळून, आपण त्यांच्याच पैकीं एक आहोंत, अशा भावनेनें वागून त्यांचा विश्वास संपादन करावा लागतो. या हेतूनें कामगार व गरीब लोकांच्या वस्तींत राहून समाजसेवा करणाऱ्या सेवकांच्या ठिकाणाला समाजसेवकांची वसाहत, असें म्हणतात.

औद्योगिक युगाला सुरवात होण्यापूर्वी प्रत्येक खेड्यांतील समाजसेवेचें काम तेथील लोक आत्मस्फूर्तीनें करीत. गांवांतील सार्वजनिक स्वरूपाचीं कामें मोफतच होत. हीं कामें करून घेणारे किंवा करावयास लावणारे अधिकारी गांवानेंच निवडलेले व कोणत्याहि प्रकारचा मोबदला न घेतां गांवकीचें म्हणून काम करणारे असत. त्यामुळें दुसऱ्या गांवचे लोक या गांवची चौकशीहि करीत नसत व ती करण्याची आवश्यकताहि नसे. आपल्या गांवांतील सार्वजनिक कामांची तक्रार दुसरीकडे जाऊं द्यावयाची नाहीं व दुसरीकडील तक्रारींचा आपण विचार करावयाचा नाहीं, अशा तऱ्हेनें प्रत्येक खेड्यांतील सार्वजनिक कामें बिनबोभाट होत. कांहीं गांवांचें मिळून कार्य असलें, तरी त्या गांवचे पुढारी मिळून तें करीत. आणि शहरांतील कामेंहि अशींच पण थोड्याबहुत फरकानें चालत.

## ग्रामीण जीवनांतील क्रांति

या सर्व गोष्टी बदलण्याला एकोणिसाव्या शतकांत आरंभ झाला. यांत्रिक युगाला सुरवात झाली, यंत्रें वाफेच्या साहाय्यानें चालूं लागलीं, मालाची पैदास कल्पनातीत

मोठ्या प्रमाणांत करण्याची कल्पना निघाली आणि त्याकरितां हजारों माणसें शहरांत येऊं लागलीं. अर्थात्च हीं माणसें एका ठिकाणाहून येत नसत; तर अगदीं दूरदूरच्या, कधीं कधीं परस्परांची भाषा परस्परांना न कळण्याइतक्या दूरच्या वस्तींतून तीं येत असत. त्यामुळें ज्याप्रमाणें चार ठिकाणचे चार वाटसरू एकत्र झाले म्हणजे पूर्वपरिचयाच्या अभावीं परस्परांकडे कुतूहलपूर्वक पाहतात, तात्पुरते कां होईना; पण एकमेकांच्या संगतीनें राहावयाचें असल्यामुळें त्या घटकेपासूनच ते एकमेकांची ओळख करून घेऊं लागतात, त्याप्रमाणेंच या लोकांचेंहि झालें. ते भिन्न परिस्थितींत येऊन पडले व त्यांचीं पूर्वींचीं सर्व बंधनें नाहींशीं झालीं. या स्थलांतराचा आणखी एक असा अनिष्ट परिणाम त्यांचेवर झाला कीं, ज्या खेड्यांतून हे लोक आले तेथें त्यांना वरच्या दर्ज्याच्या, सुस्थितींतील लोकांच्या शेजारींच राहाण्याचा, प्रसंगविशेषीं त्यांच्यांत मिसळण्याचा योग येई व चांगल्या राहाणीचा, चांगल्या परिस्थितीचा व चांगल्या शिक्षणाचा परिणाम काय होतो, हें प्रत्यक्ष पाहाण्याची संधि मिळे. परंतु या नवीन ठिकाणीं त्यांच्या शेजारीं त्यांच्याच-सारख्या मजूरवर्गाशिवाय दुसरें कोणी रहावयाचें नाहीं; हें ठिकाण चांगल्या वस्तीपासून अगदीं दूर, कारखान्यांच्या शेजारीं घाणेरड्या वस्तींत असावयाचें. शिवाय कारखाने सर्वत्र पसरलेले असल्यामुळें व कांहीं कारखान्यांत मजुरी कमी व कांहींत जास्त असल्यामुळें, अडीअडचणीलासुद्धां कामावरून गैरहजर राहिल्यास नोकरी जाण्याचा संभव असल्यामुळें, आणि कामगार व कारखानदार यांना परस्परांविषयीं आपलेपणा वाटण्यास किंवा एकत्र येण्यास कांहींच साधन नसल्या-मुळें कामगारांचें राहाण्याचें ठिकाण नोकरीबरोबरच वरचेवर बदलत असे. सारांश, इतर समाजापासून अगदीं अलग राहाण्याचा प्रसंग कामगारवर्गावर हा प्रथमच येऊं लागला होता. हा समाज कोणत्याहि प्रकारें संघटित नव्हता आणि मूलतः पंगू असलेल्या या वर्गाला इतर लोकांच्या संगतीचा कांहीं थोडाबहुत फायदा होईल म्हणावा, तर तीहि आशा या नवीन घडामोडीनें नाहींशी झाली होती. या नवीन परिस्थितींत कामगारवर्ग अधिक खालावत जाण्याचा संभव होता. ही कामगार-वर्गाची अधोगति कशी थांबवावी, या विचारानें कामगारांच्या हितचिंतकांना भांबावून सोडलें होतें. अमूक एका भागांत कामगार लोक राहातात असें म्हणावयास आज आपल्याला बरें वाटतें. परंतु निरनिराळ्या वर्गांचे लोक परस्परांपासून दूरदूर राहून समाजाचे असे तुकडे पडूं लागल्यास एकंदर समाजाची अवनति होऊं लागते. एकंदर समाजापासून अलग राहावें लागल्यामुळें कामगारवर्गांत किती अनिष्ट गोष्टी शिरल्या आहेत, याचा विचार केल्यास हें समाजाचें वर्गीकरण किती घातक आहे, हें ध्यानांत येईल. याचें विशेष उग्र स्वरूप मुंबई सारख्या शहरांत पाहावयास मिळतें. समाजांतील बहुसंख्य वर्ग, पिढ्यान्‌पिढ्या ज्यांत नांदल्या तें आपलें खेडें सोडून

शहरांत आल्यामुळें, परिस्थितीमुळें कां होईना; इतर वर्गापासून दूर राहिला. व स्वतःची सुधारणा करण्याइतकें स्वतःमध्यें सामर्थ्य नाहीं व दुसऱ्याच्या संगतीनें सुधारणा करून घ्यावी, तर कैक पिढ्या शेजारीं राहिलेल्या शेजाऱ्यांचा शेजार सुटलेला. अशा परिस्थितींत या वर्गाची शारीरिक, बौद्धिक व नैतिक अवनति दिवसेंदिवस व्हावी यांत आश्चर्य तें कसचें ?

बरें, कोणी असें म्हणतील कीं वस्तुस्थिति जर अशी आहे, तर त्याच लोकांपैकीं ज्यांना अनुकूल परिस्थिति असेल, त्यांनीं आपल्या बांधवांची उन्नति करण्याचा प्रयत्न करावा. पण अशी अपेक्षा करणें म्हणजे कामगारांच्या स्थितीविषयींचें आपलें अज्ञान प्रदर्शित करणें होय. कारण ते अशिक्षित असल्यामुळें आपल्याला काय हवें व आपली सुधारणा कोणत्या दिशेनें झाली पाहिजे, हेंहि त्यांना सांगतां येत नाहीं. त्यांची सांपत्तिक स्थिति इतकी हलाखीची असते कीं, नवऱ्याची मजुरी कुटुंबाला पुरेशी होत नाहीं, म्हणून बायकोलाहि कारखान्यांत कामाला जावें लागतें व तेवढ्यानेंहि पुरें पडत नाहीं, म्हणून मूल हिंडतेंफिरतें होतांच त्यालाहि कामाला लावण्याची त्यांची तयारी असते. पैशापायीं मुलांच्या शरीरहानीकडेहि ते दुर्लक्ष करतात. सरकारला कारखान्यांत काम करणाऱ्या मुलांच्या वयाबाबत कायदा करून मर्यादा ठरवावी लागली. कामगारांची शारीरिक हानीहि फार होत होती. अशा स्थितींत आपली परिस्थिति सुधारण्याचे प्रयत्न करण्याऐवजीं कामाचा शीण घालविण्याकरितां त्यांना अनेक प्रकारच्या व्यसनांचा आश्रय करणें भाग पडे. अर्थातच आज या परिस्थितींत पुष्कळ बदल झालेला आहे.

## समाजसेवकांच्या वसाहती

खरें पाहिलें तर, अमुक इतकीं समाजसेवेचीं कामें करावीं किंवा एकादें समाजसेवेचें विशिष्ट कार्य करावें, हा या वसाहतीचा हेतु नसतो. निरनिराळ्या वर्गांतील लोकांनीं विशेषतः विश्वविद्यालयांत अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांनीं आपले लहानलहान गट करून सुटींत किंवा एरवींसुद्धां गरीब लोकांच्या वस्तींत राहून त्यांच्या उपयोगीं पडावें, त्यांच्यांत किंवा त्यांच्या जवळपास राहून त्यांच्या स्थितीचा प्रत्यक्ष अभ्यास करावा व त्या लोकांच्या परिस्थितीचें जातीनें ज्ञान मिळवावें, सारांश चांगल्या स्थितींतील लोकांचा गरिबांच्या राहाणीशीं प्रत्यक्ष संबंध येऊन त्यांच्या अडचणी त्यांना जातीनें समजून घेतां याव्यात; दुसरीकडे एवढी श्रीमंती, एवढा पैसा दिसत असतां, येथेंच अशी स्थिति कां असावी, या प्रश्नाचें उत्तर मिळवावें; हा या चळवळीचा हेतु होता. श्रीमंत-सुखवस्तु आणि गरीब-कामगार असे भेद करून शहराचे जे पृथक् भाग पडलेले असतात, त्यांना परस्परांची ओळख पटवून एकत्र आणण्याचें एखादें स्थळ असावें, विशेषतः उच्च शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना असे प्रयत्न

करण्याची संधि द्यावी, हा या नवीन उपक्रमाचा उद्देश होता. कामगारवस्तींत अनेक प्रकारचे लोक असतात. ते निरनिराळ्या कारखान्यांत काम करणारे असतात. त्यांच्या निरनिराळ्या सामाजिक व धार्मिक चळवळी चाललेल्या असतात. म्हणून त्यांची राहाणी, त्यांचे विचार व त्यांच्या अडचणी समजून घ्यावयाच्या असल्यास त्यांच्यांत राहाणें आवश्यक असतें. तेथें राहिल्यानें सर्व लोकांना स्वच्छतेचें महत्त्व कळत नसल्यामुळें एखाद्या कुटुंबाला स्वतःपुरती कां होईना, स्वच्छता ठेवणें कसें अशक्य असतें, जागेच्या अभावीं गचडी करून आपल्या सर्व कुटुंबाचा व्यवहार एका लहानशा खोलींत कसा चालवावा लागतो, लोकांच्या आरोग्यासाठीं, राहाण्यासाठीं, शिक्षणासाठीं आणि करमणुकीसाठीं कोणत्या सोयी कराव्या; वाचनालयें, व्यायामशाळा, क्रीडांगणें, आंघोळीच्या जागा, धुण्याच्या जागा कोठें व कशा असाव्यात, हें समजतें व या गोष्टी प्रत्यक्ष अंमलांत येण्यासाठीं सरकार, नगरपालिका व जनता यांचें साहाय्य कसें मिळवावें, तेंहि तो शिकतो.

समाजांत रूढ असलेल्या कल्पनांत क्रांति घडवून आणून नवीन कल्पनांचा फैलाव करण्याची कोणतीहि चळवळ अमुक वेळीं सुरू झाली असें आपण म्हटलें; तरी ती त्यापूर्वीं पुष्कळ काळ सुरू झालेली असते, कारण त्याकरितां प्रास्ताविक गोष्टी पुष्कळ करावयाच्या असतात आणि ही पूर्वतयारी फारसा गाजावाजा न करतां करण्यांत येत असल्यामुळें तिची फारशी प्रसिद्धी होत नाहीं. इंग्लंडमध्यें समाजसेवकांच्या वसाहती काढण्याच्या बाबतींत असेंच झालें. त्या अस्तित्वांत येण्यापूर्वीं पुष्कळ दिवस त्यांची रूपरेषा तयार झालेली होती. इतकेंच नव्हे तर एडवर्ड डेनिसन आणि आर्नोल्ड टॉयन्बी या उभयतां समाजसेवकांनीं या कल्पनांप्रमाणें गरीब लोकांच्या वस्तींत स्वतः राहावयास जाऊन या कल्पनांना मूर्तस्वरूप दिलें होतें. तथापि वरील कल्पनांप्रमाणें पहिली वसाहत स्थापण्याचें भाग्य कॅनन बार्नेट यांनाच लाभलें. पण रे. बार्नेट यांनासुद्धां पूर्वतयारी करावी लागली. त्यांनीं स. १८७५ च्या सुटींत गरीब लोकांच्या वस्तींत एक खोली भाड्यानें घेतली होती व तेथें शाळा काढिली होती आणि त्या शाळेंतील मुलांच्या आईबापांची ओळख करून घेऊन सणवारीं ते त्यांच्यांत मिळूंमिसळूं लागले होते. त्यांनीं त्यांच्या स्थितीविषयीं माहिती गोळा केली आणि घरोघर फिरून गरीब लोकांच्या स्थितीची प्रत्यक्ष ओळख करून घेतली, इतकेंच नव्हे तर त्यांनीं त्यांच्या क्लबांत जाऊन त्यांच्या राजकीय मतांचीहि चांचणी करून पाहिली आणि त्यावरून असा सिद्धांत बांधला कीं, लोक सुशिक्षित झाले नसल्यास लोकशाहीची चळवळ त्यांना खात्रीनें हानिकारक होईल. या कामीं सौ. बार्नेट यांची त्यांना पुष्कळ मदत झाली.

# टॉयन्‌बी हॉल

टॉयन्‌बी हॉल नांवाची पहिली वसाहत इंग्लंडमध्यें वर म्हटल्याप्रमाणें कॅनन बार्नेट यांनीं टॉयन्‌बी यांच्या पहिल्या पुण्यतिथीच्या दिवशीं ता. ९ मार्च इ. स. १८८४ रोजीं स्थापन केली. गरीब लोकांच्या स्थितिविषयीं सांगोपांग विचार करून त्यांची स्थिति सुधारण्यासाठीं अशा प्रकारच्या वसाहती काढण्याची मूळ कल्पना टॉयन्‌बी यांचीच. त्यांनीं आपल्या व्यक्तित्वामुळें ऑक्सफर्डमधील सर्व प्रकारच्या आस्थेवाईक विद्यार्थ्यांवर आपली छाप बसविली आणि इंग्लंडमधील गलिच्छ वस्ती व तिच्यासंबंधींचे विकट प्रश्न यांचेकडे त्यांचें लक्ष वेधलें व अशा प्रकारची वसाहत काढण्याची त्यांनीं सर्व सिद्धता केली. पण अशक्त प्रकृति व अल्पायुष्य यांच्यामुळें त्यांना त्या कल्पनेला मूर्त स्वरूप देतां आलें नाहीं. याकरितां त्यांच्या स्मरणार्थ त्यांचें नांव या वसाहतीला द्यावें असें सौ. बार्नेट यांनीं सुचविलें व ती कल्पना सर्वमान्य झाली. ही वसाहत काढण्याची कल्पना स. १८८३ मध्यें आपल्या पतीच्या डोक्यांत कशी आली यासंबंधीं रे. बार्नेट यांच्या पत्नी हेनरीटा बार्नेट लिहितात कीं, केंब्रिजमधील सेंट जॉन्स कॉलेजमधून यांना एक पत्र आलें कीं, त्या कॉलेजमधील कांहीं विद्यार्थी गरीब लोकांसाठीं कांहीं काम करूं इच्छितात. पण कॉलेजमधून अशीं कांहीं मुलें नेहमीं जाऊन कांहींतरी करून परत येतात, तसें मात्र त्यांना करावेंसें वाटत नाहीं. या पत्राप्रमाणें लंडनहून केंब्रिजला जाण्यासाठीं रे. बार्नेट निघाले, पण वाटेंत गाडी नादुरुस्त झाली म्हणून रेल्वेच्या बाजूला बसले असतां त्यांना ही कल्पना सुचली. यानंतर इंग्लंडांत व इंग्लंड देशाच्या बाहेर ज्या ज्या अशा प्रकारच्या वसाहती स्थापन झाल्या त्या सर्वांत आजपावेतों टॉयन्‌बी हॉल हीच वसाहत आदर्शभूत मानण्यांत येते. या वसाहतीनें विशेष गोष्ट ही केली कीं, केंब्रिज येथील विश्वविद्यालयांत अभ्यास करणाऱ्या ज्या विद्यार्थ्यांना, अर्थातच आपला अभ्यासक्रम पुरा झाल्यानंतर, आपल्या हातून कांहीं तरी समाजसेवा व्हावी अशी प्रबळ इच्छा असेल, त्यांना कामगारवस्तींत स्वतः राहून तेथील लोकांच्या स्थितीचें सूक्ष्म निरीक्षण करण्याची व त्यासंबंधींच्या प्रश्नांचा विचार करण्याची संधि दिली. हे विद्यार्थी ह्या वसाहतींतच राहत, तेथेंच जेवणखाण करीत आणि फुरसतीप्रमाणें कामगारांना हितकारक अशीं नाना प्रकारचीं कामें करीत. ही संस्था अद्यापि चांगल्या रीतीनें चालत आहे. या संस्थेचा मुख्य अधिकारी पगारी मनुष्य असतो. तो ह्यांना नेहमीं प्रोत्साहन देऊन या लोकसेवेच्या पूर्वतयारींत त्यांचा उत्साहभंग होऊं नये, असे प्रयत्न करतो. आपल्या आवडीप्रमाणें व सवडीप्रमाणें कोणीं कोणतें काम करावें, तें तो सांगतो व दरएक गोष्टींत तो त्याचें मार्गदर्शन करितो. माणसाची परिस्थिति समजून घेण्याला त्याच्या प्रत्यक्ष परिचयाइतका दुसरा उत्तम मार्ग नाहीं. आपण लोकांना शिकविण्यासाठीं आलों नाहीं; तर शिकण्यासाठीं आलों आहोंत. मोठे-

पणाच्या भावनेनें आलों नाहीं; तर मित्रत्वाच्या भावनेनें आलों आहोंत, मैत्री दुरून वाढत नाहीं, तर जवळून वाढते, हें तो त्यांना समजावून देतो.

## समाजजीवनाशीं प्रत्यक्ष संबंध यावा हा हेतु

या विद्यार्थ्यांपैकीं एखाद्याला प्रौढ शिक्षणाबद्दल आस्था वाटे, दुसऱ्याला वसतिगृहांत राहणाऱ्या मुलांबद्दल कळकळ वाटे, तिसऱ्याला सोशल क्लब असावेत, असें वाटे कोणाला स्थानिक स्वराज्य, कोणाला धर्मार्थ संस्थांची संघटना, कोणाला सहकारी चळवळ, कोणाला बेकारांना साहाय्य, कोणाला कला, कोणाला गाणें, असें त्याला ज्यांत कांहींतरी आपण करावें; अशी तळमळ असेल; तेवढेच तेथें रहावयाला लायक आहेत, असें मानण्यांत येई. आरंभीं या वसाहतीला अगदीं क्लबाचें स्वरूप आलेलें होतें. तेथें एखाद्याला प्रवेश मिळणें वा न मिळणें, हें तेथें राहाणाऱ्या सभासदांच्या मतांवर अवलंबून असे. परंतु थोडया दिवसांच्या अनुभवानंतर तेथें राहून कांहीं तरी समाजकार्य करूं शकेल, असें वाटेल; तेव्हांच एखाद्या विद्यार्थ्याला सभासद करून घेण्यांत येऊं लागलें. आरंभीं या सभासदांचा स्वतःचा म्हणून वेगळा धंदा असे. कोणी शिक्षक असत, कोणी वकील असत आणि कांहीं सधन असून अशा एखाद्या समाजसेवेच्या कार्याला त्यांनीं वाहून घेतलेलें असे. येथील कामेंसुद्धां आपसांत वांटून घेऊन कोणी व्यवस्थापक, कोणी चिटणीस, असे ते असत. अशा रीतीनें ही वसाहत म्हणजे प्रौढ शिक्षण, सोशल क्लब, मुलांच्या सहली, परिषदा, सभा, गाण्याचे जलसे, प्रदर्शनें, अशा समाजसेवेच्या अनेकविध कार्यांचें केंद्र असे. पण या वसाहतीचा मुख्य हेतु येथें कांहीं तरी कार्य करावें हा नव्हता; तर अशा विशिष्ट परिस्थितींत राहून, या वातावरणाचा सभासदांच्या व्यक्तित्वावर परिणाम व्हावा, त्यांना हें विशिष्ट प्रकारचें वळण व शिक्षण मिळावें हा होता,

## निरपेक्ष समाजसेवा हें ध्येय

दुर्दैवानें याच सुमाराला कामगार लोकांत आपल्या धर्मपंथाचा प्रसार करण्याचा परपंथांतील लोकांना आपल्या पंथांत ओढण्याचा प्रयत्न करणाऱ्या व धर्मोपदेशकांना समाजसेवेचें शिक्षण देणाऱ्या धार्मिक वसाहती स्थापन होऊं लागल्या. या दोन प्रकारच्या वसाहतींत वरवर पहाणाराला फारशी तफावत दिसणार नाहीं. पण वस्तुतः या दोन प्रकारच्या संस्थांत महदंतर आहे. बाहेरून समाजसेवेचें निमित्त करून येनकेनप्रकारेण आपल्या धर्मपंथाचें घोडें पुढें ढकलण्याचा एका प्रकारच्या संस्थेचा अंतःस्थ हेतु होता; तर कोणत्याही प्रकारें धर्म, पंथ, पक्ष असे भेद किंवा दुसऱ्या कोणत्याही प्रकारचें बंधन न ठेवतां आपल्याला योग्य दिसेल त्या मार्गांनीं समाजाची उन्नति करण्याकरितां उत्सुक झालेल्या तरुणांना जातीनें समाजसेवा करण्याची संधि

द्यावयाची व समाजाचें ऐहिक सुख वाढवावयाचें हा दुसरीचा अंतर्बाह्य हेतु होता. टॉयनबी हॉलचे संस्थापक रे. कॅनन बार्नेट हे स्वतः धर्मोपदेशक असूनही याच मताचे होते आणि विशेष आनंदाची गोष्ट ही कीं, या चढाओढींत कोणत्याहि प्रकारच्या विशिष्ट धर्मपंथाचे अंकित न होतां समाजसेवा हाच आपला धर्म असें मानणारी वरील संस्था इतर संस्थांप्रमाणेंच आपल्या कामांत यशस्वी झाली; इतकेंच नव्हे तर तिचें मतच सांप्रत विशेष मान्य झालें आहे. या सर्व संस्थांच्या कामाची दिशा सामान्यतः एकच असली तरी त्यांचे प्रयत्न मात्र एकाच दिशेनें होत असतात, असें नाहीं. कांहीं तर एखाद्या कामांतच निष्णात झालेल्या असतात. उदाहरणार्थ, कांहीं लहान मुलांच्या करमणुकीच्या बाबतींत तरबेज झालेल्या असतात, कांहींचीं वयातीत लोकांना वृद्धापकाळचें वेतन मिळावें म्हणून चळवळ चाललेली असते, कांहीं फक्त मुलां-संबंधींच्याच बाबी हातीं घेतात, कांहीं विपद्‌ग्रस्त लोकांचें दुःख कमी करणें, आणि त्या विवक्षित भागांतील लोकांना अडीअडचणीच्या वेळीं मदत करणें एवढेंच काम आपल्याकडे घेतात. दुसऱ्या कांहीं वसाहती कामगार लोकांच्या स्थितीसंबंधीं माहिती गोळा करितात. अशा एक ना अनेक तऱ्हांनीं या वसाहती समाजसेवेचीं कामें करितात. पण धर्मप्रसाराची चळवळ यशस्वी करण्याकरितां समाजसेवेची कामें हातीं घेणाऱ्या समाजसेवकांच्या वसाहतींचे प्रयत्न व त्यांचें धोरण, सतत सारखें राहाणें जितकें सोपें असतें तितकें, आपल्या बांधवांची उन्नति करण्याच्या एकाच हेतुनें प्रेरित होऊन अशा प्रकारचीं कामें हातीं घेणाऱ्या वसाहतींच्या बाबतींत सोपें नसतें. त्यांचे मार्ग व ध्येय हीं नेहमीं एकसूत्री राहूं शकत नाहींत. कारण पहिल्या प्रकारच्या वसाहतींचें ध्येय कधींच बदलण्याजोगें नसतें. फार झालें तर तें गांठण्याच्या मार्गांत परिस्थितीप्रमाणें थोडा फार बदल होण्याचा संभव असतो. उलटपक्षीं दुसऱ्या प्रकारच्या वसाहतीचें ध्येय कधींच कायम राहूं शकत नाहीं. त्यांनीं हातीं घेतलेल्या प्रश्नासंबंधीं जसजसें लोकमत बदलत जाईल व सुधारणा होईल तसतसे त्यांचे मार्ग व त्या प्रश्नांसंबंधींचें धोरण बदलत जाणें अपरिहार्य असतें. समाजसेवकांची वसाहत म्हणजे त्या भागांत होणाऱ्या सर्व प्रकारच्या समाजसेवेच्या चळवळीचें केंद्रस्थान होय. म्हणून तेथें राहणाऱ्या समाजसेवकांचें ध्येय हें असावयास पाहिजे कीं, निरनिराळ्या प्रकारें सेवा करणाऱ्या अनेक व्यक्तींशीं व संस्थांशीं सहकार्य करून हरएक बाबतींत साहाय्य करणें. अर्थात् भूतदयेनें प्रेरित होऊन केलेली समाजसेवा हें अशा वसाहतीचें ब्रीदवाक्य असतें. पहिलीचा धर्मप्रसार हा हेतु असल्यामुळें हें काम तिच्याकडून नीटसें तडीस जात नाहीं; पण दुसरी निरपेक्ष बुद्धीनें अंगीकृत कार्य करीत असल्यामुळें ती यशस्वी होणें क्रमप्राप्तच असतें. या दोन प्रकारच्या वसाहतींतील हा महत्त्वाचा फरक ध्यानांत ठेवण्यासारखा आहे.

## धार्मिक संस्थांची समाजसेवा

धार्मिक संस्थांनीं चालविलेल्या वसाहती कोणत्या तरी एका धर्मपंथाच्या पक्षपाती असतात. त्या धर्मपंथाचा प्रसार व्हावा, धर्मपंथाच्या अनुयायांची संख्या वाढावी म्हणून नाना प्रयत्नांनीं इतर पंथाच्या लोकांना त्या पंथाची दीक्षा द्यावी व त्या पंथाचीं मतें प्रमाण मानणाऱ्या लोकांचें सर्व प्रकारें हित व्हावें व त्यांना साहाय्य करावें, हें या वसाहतीचें मुख्य पाहाणें असतें. म्हणून या संस्थांनीं आपण उदार मताचे आहोंत, म्हणून बहाणा केला तरी तें सारें औपचारिक असतें आणि त्यांची या बाबतींतील कोती बुद्धि व स्वार्थ लपला जात नाहीं. यदाकदाचित् या वसाहतींतील समाजसेवक उदारबुद्धि असला तरी त्या वसाहती चालविण्याकरितां ज्यांनीं पैसा दिलेला असतो, ते तितके उदारबुद्धि असणें मुळींच शक्य नसतें. त्यांनीं तो पैसा आपल्या विवक्षित धर्मपंथाचा प्रसार होण्याकरितां व त्या मताच्या लोकांच्या हिताकरितांच दिलेला असतो. त्यामुळें प्रत्यक्ष काम करणारांनाहि या गोष्टी बंधनकारक झालेल्या असतात. आणि एका विवक्षित धर्मपंथाचे हे लोक आहेत अशी एकदां प्रसिद्धि झाली कीं, दुसऱ्या पंथाचे लोक मदतीकरितां या संस्थांकडे सहसा येत नाहींत. यासंबंधीं दूरवर विचार करून इंग्लंडमधील टॉयन्बी हॉल या जगप्रसिद्ध समाजसेवकाच्या वसाहतीचा मूलसंस्थापक स्वतः एका मिशनरी संस्थेचा मुख्य चालक असूनसुद्धां त्यानें आपल्या वसाहतींत प्रवेश करण्याला कोणाहि माणसाला कोणत्याहि प्रकारचें धार्मिक बंधन ठेविलें नाहीं. यासंबंधीं त्यानें एकदां असे उद्गार काढिले कीं, मी जर या वसाहतींत धार्मिक बंधनें ठेविलीं असतीं, तर माझ्या कित्येक जिवलग सहकारी समाजसेवकांना मला मुकावें लागलें असतें. समाजसेवेच्या चळवळींत या वसाहतीचें उच्चस्थान आज मितीलाहि कायम आहे, याचें मुख्य कारण तिच्या संस्थापकाचें हें दूरदर्शी धोरणच होय. इंग्लंडमधील सर्व वसाहतींत टॉयन्बी हॉलनें आपली परंपरा उत्तम रीतीनें राखिली आहे. समाजोन्नतीचें उच्चतर ध्येय पुढें ठेवून ती जन्मास आली आणि तिची ही ध्येय दृष्टि अद्यापहि बदललेली नाहीं. ज्यांना समाजसेवेची हौस होती त्यांना येथें प्रत्यक्ष शिक्षण मिळून घरीं बसल्या देणग्या देऊन आपण समाजसेवा करितों असें समाधान मानण्यापेक्षां, आपला देह प्रत्यक्ष जनतेच्या सेवेला लावून तिच्या सुखदुःखाचा अंशभागी होणें, हीच खरी लोकसेवा हें त्यांनीं जगाच्या निदर्शनाला आणिलें.

समाजसेवा करणाऱ्या प्रत्येक संस्थेनें आपल्या कामांत कोणत्या तरी धर्माचें साहाय्य घ्यावें अशा प्रकारचा ध्वनि आपल्याकडेहि नेहमीं ऐकूं येतो. पण येथें हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, समाजसेवा कोणत्याहि एका धर्ममताच्या लोकांची करावयाची नसते. इतकेंच नव्हे, तर खऱ्या समाजसेवेंत धर्मभेद, वर्णभेद, जातिभेद,

राष्ट्रभेद, किंवा दुसऱ्या कोणच्याहि प्रकारचा भेद मानला जात नाहीं. ज्याला खरोखरी समाजसेवा करावयाची आहे, तो ती करितांना हा मनुष्य आपल्या धर्माचा आहे कीं परधर्मीय आहे, आपल्या जातीचा आहे कीं परजातीचा आहे, आपल्या राष्ट्रांतील आहे कीं परराष्ट्रांतील आहे, अशा प्रकारचें वर्गीकरण कधींही करणार नाहीं. जनसेवा हाच त्याचा धर्म, भूतदया आणि भ्रातृभाव हेंच त्याच्या धर्माचें सारसर्वस्व. या व्यतिरिक्त कोणत्याहि धर्माचें श्रेष्ठत्व तो मान्य करणार नाहीं. मदतीची याचना करणाऱ्या व्यक्तीची परिस्थिति समजावून घेण्यासाठीं वरील गोष्टीची तो बारकाईनें चौकशी करील, पण त्यामुळें त्याच्या कामांत कोणत्याहि प्रकारें उणेपणा किंवा पक्षपातीपणा येणार नाहीं.

धर्म म्हटला कीं त्याबरोबर स्वधर्मवेड आणि परधर्मद्वेष हीं आलींच. आणि त्यांच्या पायीं जगाची जितकी हानि झाली आहे; तितकी दुसऱ्या कशानेंहि झाली नसेल. सर्व धर्मसंस्थापक महात्मे असले तरी एका धर्माचे अनुयायी दुसऱ्या धर्माच्या अनुयायांना पाण्यांत पाहातात, यांत विशेषसें आश्चर्य नाहीं पण एकाच धर्माचे अनुयायी आपल्या देवाची पूजा किंवा प्रार्थना, त्याच धर्माच्या पण त्यांच्या मतें कमी मानलेल्या लोकांना करूं देत नाहींत. हिंदुधर्माचे अभिमानी त्यांनींच अस्पृश्य मानलेल्या लोकांना आपल्या देवळांत घेण्याला कुरकुरतात. महमदीधर्माच्या अनुयायांतील एका पंथाच्या लोकांना आपल्या मशिदींत दुसऱ्या पंथाचे लोक आलेले खपत नाहींत, आणि जगांतील सर्वश्रेष्ठ धर्म म्हणून शेखी मिरवणाऱ्या ख्रिस्तानुयायी लोकांची धर्माच्या बाबतींत, आपसांतील उच्चनीचपणाच्या भांडणांत एकमेकांना जिवंत जाळण्यापर्यंत मजल गेली होती. ‘जनसेवा ही ईश्वरसेवा’ असें मानणाऱ्या माणसानें अशा परिस्थितींत कोणत्याहि एका धर्माचा पक्षपाती होऊन कसें चालेल ? फार झालें तर आपला धर्म आपल्या घरीं पाळावा, सार्वजनिक कार्यांत त्याचा उपसर्ग इतरांना पोंचूं देऊं नये, हें उत्तम. शिवाय समाजसेवेच्या गोड नांवाखालीं धर्मप्रसार करण्याची ही क्लृप्ति मागसलेल्या राष्ट्रांतच यशस्वी होते, सुधारलेल्या राष्ट्रांत ती मूळ धरूं शकत नाहीं, हें इतर राष्ट्रांतील समाजसेवेच्या चळवळीचें निरीक्षण करणाराच्या सहज ध्यानांत येईल.

## विद्यार्थी व समाजसेवा

सदरील वसाहतींचा मुख्य उद्देश असा होता कीं, कॉलेजांमध्यें शिकत असलेल्या विद्यार्थ्यांनीं सुटींत किंवा एरवींसुद्धां कामगारांच्या वस्तींत येऊन राहावें, अभ्यास करून राहिलेल्या वेळांत या लोकांत मिळून मिसळून त्यांच्या अडचणी समजावून घ्याव्या व या अनुभवाचा उपयोग आपली विद्यार्थीदशा संपल्यानंतर आपल्या पुढील आयुष्यांत लोकहिताचीं कामें हातीं घेऊन करावा. अशा प्रकारच्या उद्देशामुळें या वसाहतींत काम करणारीं माणसें सामान्यतः विद्यार्थीच असतात व त्यामुळें त्यांचें

तेथील रहाणें व त्यांनीं चालविलेलीं कामें हीं अगदीं अल्पकाळ टिकणारीं असतात. तेव्हां या वसाहतींतील कामें पूर्ण विचारानें व आगाऊ ठरवून त्याबरहुकूम तीं होतातच अशांतला भाग नाहीं. ज्याला जशी फुरसत असेल व ज्या प्रकारच्या कामाची आवड असेल, तशा प्रकारचीं कामें तो हातीं घेतो व कांहीं दिवस तीं मोठ्या हौसेनें चालवून मग तीं तशींच अर्धीं टाकून स्थलांतर करितो. पुढें तशाच प्रकारच्या मनोवृत्तीचा दुसरा विद्यार्थी आला तर तो तीं पुढें चालू करतो. तसा कोणी नसल्यास तीं आपोआप बंद पडतात. येथील रहिवाशी असे उपरे असल्यामुळें येथील कामेंहि अशींच अल्पायुषी होतात. यामुळें या वसाहतींचा कार्यक्रम कायम स्वरूपाचा नसतो व तसा तो करणेंहि शक्य नसतें. स्थूल मानानें वस्तुस्थिति अशी असली, तरी कांहीं कामें ठराविक स्वरूपाचीं असतात. लोकांची शारीरिक, बौद्धिक, नैतिक, सामाजिक व शैक्षणिक उन्नति करण्याचा या संस्था प्रयत्न करितात. आपल्या मतांच्या द्वारें, अर्जांच्या द्वारें, आपल्या भागाच्यातर्फे कायदेमंडळांत असलेल्या प्रतिनिधींवर वजन पाडून आपल्या हक्काची दाद लावून घेण्याचे व आपलें मत प्रदर्शित करण्याचे मार्ग सुधारलेल्या देशांत जनतेला मोकळे झाले आहेत. पण नागरिक या दृष्टीनें आपलीं कर्तव्यें व आपले हक्क समजण्याला व आपल्या देशाची किंवा प्रांताची काय स्थिति आहे, त्यांना कोणत्या गोष्टींची आवश्यकता आहे व त्या प्राप्त करून घेण्याचे मार्ग कोणते हें समजण्यास साधारण जनतेंत शिक्षणाचा फैलाव व्हावा लागतो व तें शिक्षणहि इष्ट दिशेनेंच मिळावें लागतें. माणसाचें बहुतेक यशापयश अशा रीतीनें शिक्षणावर अवलंबून असल्यामुळें नाना उपायांनीं शिक्षणप्रसार व शिक्षणसुधारणा करून वैयक्तिक व सामुदायिक सुख वाढविणें आणि व्यक्तीच्या अप्रतिहत विकासाच्या व समाजाच्या प्रगतीच्या आड ज्या गोष्टी येत असतील त्या दूर करणें, हें अशा संस्था आपलें आद्य कर्तव्य समजतात. ज्या मुलांना प्राथमिक शिक्षण मिळालें नसेल किंवा ज्या प्रौढ माणसांना तें संपादन करण्याची संधि मिळाली नसेल, त्यांच्याकरितां प्राथमिक शिक्षणाचे वर्ग काढून, ज्यांना दुय्यम शाळांतील शिक्षण अर्धवट मिळालें व तें पुरें व्हावें अशी ज्यांची मनीषा आहे, त्यांना त्या प्रकारच्या शिक्षणाची व्यवस्था करून, ज्यांना कॉलेजमध्यें प्रवेश करण्याची संधि मिळाली; पण तेथील अभ्यासक्रम पुरा करतां आला नाहीं आणि अभ्यासक्रम पुरा करितां आला नाहीं तरी आपल्या आवडत्या विषयाची माहिती पुरी करून घेण्याची बळकट इच्छा आहे; त्यांच्याकरितां पुरवणी वर्ग काढून, रात्रींचीं कॉलेजें स्थापून किंवा वेगवेगळया विषयावर त्या त्या विषयाच्या तज्ज्ञांचीं व्याख्यानें करवून, त्यांची महत्त्वाकांक्षा पुरी करतात. या कामीं त्यांना दुहेरी प्रयत्न करावे लागतात. मुख्यतः पैशाच्या किंवा दुसऱ्या कांहीं अडचणींमुळें ज्यांना इच्छा असूनहि शिक्षण मिळालें नाहीं किंवा अर्धेमुर्धें मिळालें, त्यांचे मनोरथ फलद्रूप झाले नसल्यामुळें अगदीं निराशा झालेली असते व ते चरितार्थापलीकडे मुळींच पाहीनासे होतात.

अशांच्या आयुष्याचें मातेरें करणारी नैराश्यवृत्ति घालवून त्यांच्यांत पुनः महत्त्वाकांक्षा उत्पन्न करावी लागते आणि ती उत्पन्न झाल्यावर तिच्या पूर्णतेसाठीं लागणाऱ्या साधनांची जमवाजमव करावी लागते. हें दुर्घट कार्य बहुतेक वसाहती यशस्वीपणें करितात. परंतु कांहीं ठिकाणीं केवळ शिक्षणालाच वाहिलेल्या स्वतंत्र संस्था निघालेल्या असल्यामुळें आणि शिक्षणप्रसाराचें सर्व कार्य त्यांनीं आपल्या हातीं घेतल्यामुळें कांहीं वसाहतींनीं स्वतः चालविलेली शिक्षणविषयक कामें या संस्थांच्या स्वाधीन केलीं आहेत आणि समाजसेवेच्या दुसऱ्या कार्यक्रमाकडे आपलें लक्ष अधिक लाविलें आहे.

## मुलांकरतां होत असलेलीं कामें

मुलांचें शीलसंवर्धन शाळेपेक्षां क्रीडांगणावरच सहजगत्या होतें, ही गोष्ट आज सर्वमान्य झालेली आहे. म्हणून यांतील बहुतेक वसाहती शिक्षणाप्रमाणेंच लोकांच्या शारीरिक सुधारणेला व करमणुकीला अधिक महत्त्व देतात. कांहीं कांहीं वसाहती तर एवढें एकच कार्य करितात. गरीब लोकांच्या गलिच्छ राहाणीच्या दृष्टीनें विचार करितां अल्पवयी मुलें घरीं राहाण्यापेक्षां शाळेंत गेल्यानेंच चांगल्या हवेंत राहतात, असें म्हणावयास हरकत नाहीं. परंतु हें शाळा सुरू असल्या म्हणजेच शक्य असतें. शाळांना सुट्टी झाली म्हणजे या गलिच्छ वस्तींत इतस्ततः फिरण्यापलिकडे मुलांना दुसरें गत्यंतर नसतें. व त्याचा त्यांच्या प्रकृतीवर अनिष्ट परिणाम होतो. या रजेच्या दिवसांत या मुलांचें घाणेरड्या वस्तींत फिरणें बंद करण्याकरितां यांतील कांहीं वसाहतींनीं रजेच्या दिवसांत मुलांकरितां वर्ग काढलेले असतात. त्यांना रजेंतील शाळा ( Vacation Schools ) असें म्हणतात. अशा प्रकारची पहिली शाळा पॅसमोर एडवर्डस् वसाहतीमध्यें ( Passmore Edwards Settlement ) मिसेस वॉर्ड यांनीं प्रथम इ. स. १८९७ मध्यें काढिली. त्यांना असें दिसून आलें कीं, हे रजेचे दिवस मुलांना व त्यांच्या पालकांना सुखाचे जाण्याऐवजीं साऱ्या वर्षांत ते अत्यंत वाईट जातात. कारण मुलें शाळेंत असलीं म्हणजे त्यांचा तेवढा तरी वेळ स्वच्छ, चांगल्या हवेंत जातो. परंतु त्यांना शाळा नसली; म्हणजे तीं सारा दिवस पालकांच्या दृष्टीआड घाणेरड्या बोळांतून खेळत असतात व आईबापांच्या धाकदपटशालाहि भीक घालीत नाहींत. म्हणून वरील प्रकारची शाळा स्थापून हा रजेचा काळ मुलांना शक्यतितका आनंददायी व उपयोगी कामांत घालवितां यावा अशी त्यांनीं योजना केली. मुलांनीं मोकळ्या हवेंत मनसोक्त खेळावें, फेरफटका करावा व एका दिवसांत करतां येतील अशा मोकळ्या हवेंतील सहली कराव्या, मुलींनीं सोपें शिवण व भरत काम करावें, आणि मुलांनीं आपले कपडे विशेषतः आपले बूट दुरुस्त करावे. कांहींनीं कागदावरचीं किंवा मातीचीं चित्रें तयार करावीं, स्वयंपाक वगैरे करावयास शिकावा, इत्यादि अनेक

गोष्टींचा या शाळेंतील अभ्यासक्रमांत अंतर्भाव झालेला असतो. याशिवाय निरनिराळ्या प्रकारचे खेळ व हस्तकौशल्याचीं कामें यांचीहि माहिती या वर्गांतून देतात. पण मुख्य हेतु हा असतो कीं, मुलांना भरपूर खेळावयास व आपली करमणूक करावयास मिळावी व त्याबरोबरच व्यवहारांत उपयोगी पडेल, असें कांहीं तरी शिक्षण मिळावें. ह्या शाळेंत दररोजच्या हजेरीचें प्रमाण सरासरी १००० वर असतें. ही शाळा सुटीच्या दिवसांत आठवड्यांतून पांच दिवस दररोज संध्याकाळीं व शनिवारीं सकाळीं भरते. हा सुटींतील शाळेचा प्रयोग यशस्वी झाल्यामुळें पुढें दुसऱ्या शाळा निघूं लागल्या आणि आतां तर अशा कैक शाळा इंग्लंडांत आहेत.

याशिवाय कांहीं वसाहती मुलांचे क्लब किंवा मेळे काढतात. बालवृत्तीला योग्य वळण द्यावें, हा मुलांच्या क्लबांचा-मेळ्यांचा मूलभूत हेतु आहे. लहान मुलांच्या हुल्लडखोर टोळीला ताळ्यावर आणण्याला हा एकच उपाय आहे. या क्लबांत नेहमींच्या टोळींत ज्या गोष्टी ते करितात, त्याच त्यांना करूं द्यावयाच्या, मात्र कायदा व नीति यांच्या नियमांचा भंग होणार नाहीं व मुलांच्या प्रगतींत खंड पडणार नाहीं, इतकेंच त्यांत पाहावयाचें. बाकी मग त्यांच्या क्लबांत त्यांना वाटेल तें करूं द्यावयाचें. " मी माझें वर्तन सरळ ठेवीन, प्रत्येक गोष्टींत शिकस्तीचा प्रयत्न करीन आणि केव्हांहि कपटाचा खेळ खेळणार नाहीं; कारण कांहीं तरी मोठ्या कार्याकरितां ईश्वरानें मला जन्मास घातलें आहे. " हें या क्लबांचें ब्रीदवाक्य असतें. या क्लबाचें महत्त्व आणि ते चालविण्याची गरज हीं सार्वजनिक अनुभवानें इतकीं खरीं ठरलीं आहेत कीं, पाश्चात्य राष्ट्रांत समाजसेवेच्या कार्यांत कोणत्या ना कोणत्या रीतीनें त्यांचें महत्त्व गायिलेलें आपल्याला आढळेल. या क्लबांची आवश्यकता फक्त गरीब लोकांच्या मुलांनाच असते असें नाहीं, तर गरीब आणि श्रीमंत या दोघांनाहि ते सारख्याच महत्त्वाचे असतात. क्लब मोठा असल्यास त्याच्या स्वतःच्या मालकीची इमारत असते. त्यांत तालीमखाना, पोहण्याकरितां पाण्याचीं तळीं, निरनिराळया प्रकारचे खेळ खेळण्याकरितां सर्व प्रकारच्या साधनसामुग्रीनें सज्ज अशा त्या त्या प्रकारच्या खेळाला योग्य अशा जागा, मुलांकरितां मुद्दाम प्रसिद्ध होणाऱ्या नियतकालिकांचें वाचनालय व पुस्तकालय, धंदेशिक्षण देणाऱ्या औद्योगिक शाळा व त्याला लागणारीं अनेक प्रकारचीं उपकरणें, व्याख्यानांकरितां व वादविवादाकरितां स्वतंत्र खोल्या व सभासदांना आवडतील व अवश्य लागतील अशा दुसऱ्या अनेक वस्तु या इमारतींत संग्रहित केलेल्या असतात. धंदेशिक्षणाकडे मुलांचा स्वाभाविक कल असतो. म्हणून या क्लबांतून वेगवेगळ्या प्रकारच्या धंदेशिक्षणाची सोय केलेली असते. त्यानें एक तर मुलांची आजची हौस भागते आणि दुसरें असें कीं, त्यांच्या भावी आयुष्याला एक प्रकारची ठराविक दिशा लागते. या क्लबांतून धार्मिक शिक्षण देण्याचा फारसा प्रयत्न करीत नाहींत. नैतिक शिक्षण मात्र बेताबातानें आणि अप्रत्यक्ष रीतीनें देतात. हे क्लब

चालविण्याचें काम अत्यंत अवघड असतें. तें धीरानें आणि निराश न होतां करावें लागतें. या प्रयत्नावर भावी पिढीचा उत्कर्ष वा अपकर्ष अवलंबून असतो आणि तो यशस्वी झाल्यास त्यापासून कल्पनातीत फायदे होतात. ज्यांना मुलें अत्यंत प्रिय असतात, ज्यांना मुलांत काम करण्याची हौस असते, अशा माणसांना हा क्लब म्हणजे एक कल्पतरू होय. ते याला सद्यःफलदायी करितात व पुढेंहि तो फलद्रूपच होतो.

चौदापंधरा वर्षांपेक्षां लहान वयाचीं मुलें असलेल्या क्लबांत त्यांच्या सभा वगैरे दुसऱ्यांच्या सहाय्यानें चालतात; पण यापेक्षां जास्त वयाचीं मुलें असलेल्या क्लबांत सभा वगैरे सर्व स्वतः मुलेंच अगदीं पार्लमेन्टच्या धर्तीवर चालवितात. त्यांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, चिटणीस, खजिनदार, कार्यकारी मंडळ आणि पोटसमित्या या सर्वांची निवड मुलांतूनच करितात. नेहमीं सभा, व्याख्यानें, वादविवाद होतात आणि सर्व पार्लमेन्टरी पद्धतीनें चालतात. अध्यक्षापासून तो समितीसभासदापर्यंत प्रत्येकाला आपल्या हुद्द्याप्रमाणें आपापलीं कामें पूर्णपणें माहीत असतात. त्यांच्या सभांची सर्व हकीगत व्यवस्थित रीतीनें लिहिलेली असते, त्यांचे अहवाल नियमितपणें तयार होतात आणि त्यांचीं नियतकालिकें ठराविक वेळीं प्रसिद्ध होतात. बाळपणापासून अशा प्रकारचें शिक्षण असल्यावर मोठेपणींहि कर्तबगार माणसें निपजावीं यांत आश्चर्य नाहीं.

## कामगारांचें जीवन सुखी करण्याचे प्रयत्न

गरीब लोकांची स्थिती सुधारण्यासंबंधीं हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, पाश्चात्य देशांत स्वच्छता, आरोग्य, शिक्षण वगैरे बाबतींत सरकारनें किंवा नगरपालिकांनीं सामान्यतः सर्व प्रकारच्या तजविजी केलेल्या असतात, परंतु गरीब लोकांच्या वस्तीकडे स्वभावतःच कोणाचें फारसें लक्ष नसल्यामुळें या सर्व गोष्टी नीट रीतीनें अंमलांत येत नाहींत. म्हणून हें देखरेख करण्याचें काम गरिबांच्या वतीनें कोणी तरी करावें लागतें आणि तें मुख्यतः या वसाहतींतील कार्यकर्त्यांवर पडतें. हलगर्जीपणाची तक्रार वरिष्ठ अधिकाऱ्याकडे करावी लागते. तोहि लक्ष देईनासा झाल्यास म्युनिसिपॅलिटीमध्यें किंवा कायदेमंडळांत त्या भागाच्या वतीनें जे प्रतिनिधी गेले असतील, त्यांच्या कानावर त्या गोष्टी घालाव्या लागतात आणि त्यांनीं या बाबतींत लक्ष घालण्याचें आश्वासन दिलें तरी ती गोष्ट त्यांचेकडून करून घ्यावयाची असल्यास त्या बाबतींतील सर्व माहिती त्यांना गोळा करून द्यावी लागते. त्या लोकवस्तींतील नागरिकांना एखाद्या घाणीपासून उपसर्ग पोंचत असेल, भरपूर पाण्याचा पुरवठा होत नसेल, किंवा दुसऱ्या कोणत्या तरी गोष्टीमुळें अतिशय गैरसोय होत असेल, तर दाद लावून घेण्यासाठीं जोराची चळवळ करावी लागते आणि इतक्या प्रयत्नांतीं आपल्याला अवश्य ती गोष्ट घडून आली कीं, ती लोकप्रिय करण्याच्या बाबतींतहि अंमलदारांना साहाय्य करावें लागतें; नाहींपेक्षां कित्येक गोष्टी अंमलांत येऊनहि त्यांचा

लोकांना फारसा उपयोग होत नाहीं. हें सर्व करण्याला किती श्रम, विशेषतः शारीरिक श्रम करावे लागत असतील, याचा विचार वाचकांनींच करावा.

कामगारांचीं घरें, कामगारांची राहाणी, कामगारांचें खाणेंपिणें, मजुरी व दुसऱ्या अनेक गोष्टी यांसंबंधीं लोक नेहमीं नाना प्रकारचे तर्कवितर्क करीत असतात. यांतील कांहीं बाबींची थोडी फार माहिती परिश्रमपूर्वक मिळविलेली असते, पण दुसऱ्या कांहीं बाबतींत अशी माहिती मुळींच गोळा केलेली नसते. करितां कामगारांच्या राहाणीवर प्रकाश पाडणाऱ्या या नाना प्रकारच्या प्रश्नांसंबंधीं विश्वसनीय माहिती गोळा करून ती प्रसिद्ध केल्यास त्या बाबतींत वस्तुस्थिति काय आहे व ती सुधारण्याचे मार्ग कोणते हें समजतें. पुष्कळ वसाहती हें माहिती गोळा करण्याचेंच काम हातीं घेतात.

या समाजसेवासंघांच्या वसाहतींत ज्याप्रमाणें संघटित प्रयत्नांनीं पुष्कळ कामें होण्यासारखीं असतात; त्याचप्रमाणें वैयक्तिक प्रयत्नानेंहि पुष्कळ गोष्टी करण्यासारख्या असतात. समाजांत अशीं पुष्कळ माणसें असतात कीं, त्यांना एखाद्या कलेचा नाद असतो किंवा एखाद्या कलेविषयीं विशेष आवड उत्पन्न करतां येण्यासारखी असते. कोणी गाण्याबजावण्याचे शोकी असतात; त्यांना गाण्यावजावण्याचा क्लब हवा असतो, कांहींना नाटकांचा नाद असतो; त्यांना नाट्यकलोत्तेजक समाज पाहिजे असतो, कोणाला वाङ्मयाची विशेष गोडी असते; ते वाङ्मयविषयक क्लबासाठीं तळमळत असतात. कांहींना तालमीची आवड असते; त्यांना तालमीचा आखाडा हवा असतो. याशिवाय दुसऱ्या अनेक प्रकारच्या क्लबांची आवश्यकता असते. यामुळें त्या कलेंत लोकांची प्रगति तर होतेच. पण त्याशिवाय कामगारांची योग्य तऱ्हेनें करमणूक होऊन त्यांचा काळ उपयुक्त कार्यांत खर्च होतो, व त्यांची त्या त्या कलांविषयींची आवड वाढते. दिवसेंदिवस कामगारांच्या कामाचे तास कमी करण्याची चळवळ वाढत आहे व तिचा मुख्य उद्देश कामगारांना आत्मोन्नति करण्यास अधिक फुरसत मिळावी हाच आहे. अशा वेळीं त्यांना सर्व दृष्टींनीं हितप्रद होतील अशा वर निर्दिष्ट केलेल्या गोष्टींचा उपक्रम करून त्यांच्या कामाव्यतिरिक्त इतर बाबतींतील आवडींना उत्तेजन दिलें पाहिजे. कामगारांच्या उन्नतीला पोषक होतील अशा वर निर्दिष्ट केलेल्या गोष्टी अंमलांत आल्यास त्यांचा, कामगारांचीं मनें अनेक प्रकारच्या अनिष्ट गोष्टींपासून परावृत्त करण्याला चांगला उपयोग होतो असा अनुभव आहे. आज समाजसेवकांच्या अनेक वसाहती अशा प्रकारचीं कामें यशस्वी रीतीनें करीत आहेत.

## अनेक प्रकारें साहाय्य करतां येतें

कामगार लोकांच्या वस्तींत राहावयाचें म्हणजे त्यांच्याशीं शेजारधर्मानें वागून, त्यांच्या अडीअडचणी व सुखदुःखें समजावून घेऊन त्यांना योग्य वेळीं सल्ला देण्याचें

काम करावें लागतें. पुष्कळ वसाहती हीं कामें करितात. ज्या भागांत अशी वसाहत नसेल त्या भागांतील लोक कांहीं कमी जास्त झालें, शेजाऱ्याशेजाऱ्यांत भांडण झालें, कुटुंबांतल्या कुटुंबांतच बाचाबाची किंवा बेबनाव झाला किंवा दुसरी कोणचीहि अडचण आली किंवा संकट उत्पन्न झालें तर या बाबतींत सल्ला विचारण्याकरितां जवळपासच्या वसाहतींत हेंच काम पहाणाऱ्या बाईकडे जातात आणि त्यांच्या मनासारखा सल्ला मिळून हीं भांडणें ती बाई पुष्कळदां मिटविते. याशिवाय बहुतेक सर्व वसाहतींत गरिबांना कायद्याचा सल्ला फुकट किंवा माफक पैसे घेऊन देण्यांत येतो. अनेक कायदे-पंडित आठवड्यांतून एक दोन दिवस येऊन फुकट सल्ला देतात. वकील बॅरिस्टरांची मोठी फी भरण्याला पैसे तर जवळ नाहींत आणि कायद्याचा सल्ला तर मिळाला पाहिजे, अशा दुहेरी अडचणींत सांपडलेल्या गरजू कामगारांना यापासून चांगलाच फायदा होतो.

मोठ्या लोकवस्तीच्या शहरांत विशेषतः कामगारांच्या वस्तींत अशीं पुष्कळ माणसें व कुटुंबें असतात कीं त्यांच्या जातीपातीचा किंवा गांवचा तेथें कोणी नसतो. बरें, या नव्या ठिकाणीं येऊन त्यांना फारसे दिवसहि झालेले नसतात. त्यांना शिक्षण नसतें, त्यांना ध्येय असें कांहीं नसतें व त्यांना जातीचीं किंवा समाजाचीं कांहीं बंधनेंहि नसतात. त्यामुळें ते अगदीं उपरी रहिवाशी झालेले असतात. ते ज्या वस्तींत राहतात तीबद्दल त्यांना आपलेपणा मुळींच वाटत नाहीं, आणि नागरिक या दृष्टीनें आपलीं कांहीं कर्तव्यें आहेत हें त्यांच्या गावींहि नसतें. अशा अस्थिर लोकांना स्थिर करण्याच्या व त्या स्थळाबद्दल आपलेपणा उत्पन्न करण्याच्या कामीं या वसाहतींचा फार उपयोग होतो. आपण कोठेंहि असलों व तेथें आपल्याला तात्पुरतें राहावयाचें असलें तरी समाजाचे घटक या नात्यानें आपल्याला कांहीं गोष्टी करावयाच्या असतात, त्या कधीं चुकत नाहींत हें समजावून देण्याचें काम या वसाहती करितात व त्य कामीं त्यांना अवश्य ती मदत करितात.

जातीजातींत, पक्षापक्षांत, समाजासमाजांत, धर्माधर्मांत, राष्ट्राराष्ट्रांत भांडणें होऊं लागल्यानें सर्व समाजाची संघटना विस्कळित होते व सत्यनिष्ठ लोक मागें राहून दांभिक, गुंड व भांडखोर लोकांचें स्तोम माजतें. म्हणून हे परस्परांपासून अलग झालेले व एकमेकांना शत्रुत्वानें लेखणारे लोक एकत्र यावेत, बंधुभावानें वागावेत, आपल्या पायावर उभे राहून त्यांनीं आपलीं कर्तव्यें करावीं व आपली जबाबदारी ओळखावी आणि सर्व समाजाची उन्नति व्हावी हा या वसाहतींचा उद्देश असतो. यासाठीं या वसाहती लहानापासून थोरापर्यंत व दुर्बलापासून समर्थांपर्यंत सर्वांच्या मदतीची याचना करितात. हेतु हा कीं, या कार्यांत सर्वांना आपलेपणा वाटावा, सर्वांनीं मनःपूर्वक साहाय्य करावें व व्यक्तिशः व संघशक्तीनें हें सर्वतोपरी सहकार्यावर अवलंबून असलेलें कार्य सुयंत्रित चालावें.

आजपावेतों, मध्यम व श्रीमंत लोकांची अशी समजूत होती कीं, कामगार लोक हे अगदीं रानटी स्थितींतील लोक आहेत, ते दूर ठेवण्यालाच लायक आहेत आणि त्यांच्या वस्तींत जाणें म्हणजे एखाद्या भयंकर ठिकाणीं जाण्यासारखें आहे. अशा परिस्थितींत या वस्तींत जाण्याचा किंवा राहाण्याचा हिय्या केल्यास तें मोठें धैर्याचें व परोपकाराचें कार्य मानलें जात असे व कांहीं अंशीं हें खरेंहि होतें. परंतु आतां ही स्थिति बदलत चाललेली आहे. कामगार दिवसेंदिवस सुशिक्षित होत आहेत. त्यांची राहाणी, त्यांची घरें व त्यांचे विचार यांत प्रत्यहीं सुधारणा होत आहे आणि त्यामुळें कामगार वस्तीला पूर्वीचें भयप्रद स्वरूप राहिलेलें नाहीं. कामगारांची स्थिति अशीच दिवसेंदिवस सुधारत जाईल व इतर वर्गांतील लोकांना त्यांच्यांत मिसळणें अधिक सोपें होईल आणि कालांतरानें या वर्गावर्गांतील फरकांची तोंडमिळवणी होईल अशी आशा आहे. यांतच समाजाचा तरणोपाय आहे.

## सामाजिक पाहाणी

दारिद्य नाहींसें करून त्यानें पिडलेल्या लोकांची स्थिति सुधारावयाची असल्यास तें उत्पन्न होण्याची कारणें प्रथम शोधून काढणें आवश्यक असतें हें इंग्लंडमध्यें अठराव्या शतकाच्या शेवटीं लोकांच्या लक्षांत आलें आणि सर थॉमस बर्नार्ड यांनीं ‘ गरीबांची स्थिति सुधारणारी आणि त्यांच्या सुखाची वाढ करणारी संस्था ’ स्थापन करून या कार्यास सुरवात केली. पुढें नव्वद वर्षांनीं चार्लस बूथ यांनीं पुष्कळ श्रम करून ‘ लंडनमधील लोकांचें जीवन आणि श्रम ’ या नांवाखालीं पुस्तकें प्रसिद्ध करून सर्वांना आश्चर्याचा धक्का बसण्यासारख्या गोष्टी उजेडांत आणल्या. तथापि या शंभर वर्षांच्या काळांत तेथील परिस्थितींत पुष्कळ बदल झालेला होता. पूर्वीं शेती बुडाल्यामुळें आणि महागाई वाढल्यामुळें लोकांना वाईट स्थिति आलेली होती. आणि गरीब वर्ग हा नेहमींच समाजांत असावयाचा असा लोकांचा समज झालेला होता; पण नंतर शंभर वर्षांनीं शहरांत आढळणारें दारिद्य आणि गलिच्छ राहाणी हे औद्योगिक क्रांतीचे परिणाम होते. आणि एवढे उद्योगधंदे वाढले, मालाची पैदास वाढली आणि त्यामुळें इतकी संपत्तीची वाढ झाली तरी इतकें दारिद्य, इतक्या हालअपेष्टा कां असाव्यात, हा लोकांपुढें मोठा बिकट प्रश्न होता. आणि त्याच्यावर विदारक प्रकाश पाडण्याचें कार्य चार्लस बूथ यांच्या सामाजिक पाहाणीनें केलें. पुढें सामाजिक पाहाणीचें महत्त्व वाढत जाऊन आतां तर प्रत्येक विश्वविद्यालयाचें हें कार्य करणारें एक स्वतंत्र खातेंच असतें. पण याचें खरें श्रेय सर थॉमस बर्नार्ड व चार्लस बूथ यांना आहे. त्यांच्यासंबंधीं आणखी एक विशेष गोष्ट ही होती कीं या दोघांनींहि आपल्या धंद्यांत आपल्या चरितार्थाला पुरतील एवढे पैसे मिळवून अगदीं तरुणपणीं या कार्यास वाहून घेतलें. इतकेंच नव्हे तर चार्लस बूथ यांनीं आपल्या पदरचा पुष्कळ पैसा या कामीं

खर्च केला. या निरपेक्ष आणि निःपक्षपाती पाहाणीमुळें एकंदर परिस्थितीची लोकांना यथार्थ कल्पना आली, इतकेंच नव्हे तर तिच्यावर बरोबर कोणत्या उपाययोजना करावयास हव्यात याचीहि कल्पना आली. या परोपकारी माणसांनीं आणि संस्थांनीं केलेल्या या सामाजिक पाहाण्या सरकारच्या तर इतक्या उपयोगी पडल्या, कीं त्यांनीं वेळोवेळीं या बाबतींत केलेले कायदे आणि अनेक प्रकारच्या सामाजिक तरतुदी या पाहाण्यांवर आधारलेल्या आहेत. अशा प्रकारच्या पाहाण्या करण्याच्या कामीं या वसाहतींचा फार मोठा उपयोग झाला आहे.

समाजसेवा करावी असें पुष्कळांना वाटतें. कांहीं तसें कार्य थोडें फार करतातहि, पण नेटानें, कोणत्याहि प्रकारच्या अडचणींना न जुमानतां केवळ समाजाचें हित डोळ्यांपुढें ठेवून निःस्वार्थ बुद्धीनें सतत कार्य करणारीं वरच्यासारखीं माणसें फार थोडीं असतात. तीं आपल्या साहाय्यकर्त्यांचें एक वर्तुळ तयार करतात, संस्था, संघटना तयार करितात आणि आपलें कार्य चालू ठेवतात. अशा थोर समाजसेवकां-मुळेंच आज समाजसेवेचें कार्य अस्तित्वांत राहिलें आहे.

## स्त्रियांनीं चालविलेल्या वसाहती

कामगारांच्या वस्तींतील पुरुषांची व मुलांचीच सुधारणा करूं लागल्यास त्यापासून फार झालें तर अर्धा समाज सुधारेल; पण घर आणि राहाणी हीं स्त्रियांवर अवलंबून असल्यामुळें त्यांची सुधारणा झाल्याखेरीज सर्व समाज सुधारणें शक्य नाहीं. यासाठीं पुरुषांनीं चालविलेल्या वसाहती स्थापन झाल्यानंतर स्त्रियांनीं चालविलेल्या वसाहतींची आवश्यकता भासूं लागली आणि स्त्रियांच्या स्वतंत्र वसाहती व कांहीं ठिकाणीं स्त्रीपुरुषांच्या मिश्र वसाहती स्थापन झाल्या. स्त्रियांनीं चालविलेल्या वसाहती व पुरुषांनीं चालविलेल्या वसाहती यांत कामाच्या बाबतींत विशेष फरक असतो असें नाहीं, पण कामगारांच्या वस्तींत प्रवेश करितांना पहिल्या वसाहतींतील माणसें मुली व स्त्रिया यांच्या मार्फत प्रवेश करितात तर दुसऱ्या वसाहतींतील लोक मुलगे व पुरुष यांच्या मार्फत करितात, म्हणजे या वसाहती परस्परांच्या साहाय्यानें सर्व समाजांत प्रवेश करूं शकतात. स्त्रियांच्या वसाहतींत काम करण्यास समाजसेवक पुष्कळ मिळत असल्या-मुळें व कामगार कामावर गेल्यानंतर स्त्रियांना घरीं भेटून पुष्कळ कार्य करितां येण्या-सारखें असल्यामुळें समाजसेविकांच्या वसाहतींना पुष्कळ काम असतें. यामुळें अशा प्रकारच्या वसाहती स्थापण्याची चळवळ मागाहून सुरू होऊनसुद्धां त्यांची संख्या व त्यांत काम करणाऱ्या स्त्रियांची संख्या पुरुषांनीं चालविलेल्या वसाहतींच्या संख्येपेक्षां पुष्कळच जास्त आहे. शिवाय स्त्रीपुरुषांनीं चालविलेल्या वसाहती आहेत त्या वेगळ्याच. पण समाजाची सर्वांगीण सुधारणा होण्याच्या दृष्टीनें पाहतां स्त्रीपुरुषांच्या मिश्र वसाहती असणेंच श्रेयस्कर आहे, असें तज्ज्ञांचें मत आहे.

अनुक्रम ७.५.२.२ दिनांक २१.१८ १८५ क्र. नं. दि. २१.७

## आजची स्थिति

इंग्लंडमध्यें आज जवळजवळ पन्नास अशा वसाहती आहेत पण त्यांच्या कार्याची दिशा, काम करण्याचे मार्ग, संस्था चालविण्याचे हेतु एकच आहेत असें नाहीं. खरें पाहिलें तर प्रत्येक वसाहतीचें कांहीं तरी वैशिष्ट्य आहे, कांहीं तरी विशिष्ट हेतूनें, कांहीं तरी विशिष्ट कार्य करण्यासाठीं ती चालविण्यांत आलेली आहे, असें आढळून येईल. कांहींचा संबंध धर्मसंस्थांशीं आहे आणि बहुतेक संस्था, शाळा, महाविद्यालयें आणि विश्वविद्यालयें यांना जोडलेल्या आणि त्यांच्या साहाय्यानें चाललेल्या आहेत. पण दिवसें दिवस त्यांना धंद्याचें स्वरूप येत आहे. साऱ्या समाजसेवेच्या कार्याप्रमाणेंच त्या आर्थिक अडचणींत असतात. महायुद्धामुळें ज्यांचें मोठें नुकसान झालें त्यांत या वसाहती आहेत. हवाई हल्ल्यामुळें कांहीं वसाहतीचा अर्धा भाग पडलेला आहे आणि राहिलेल्या अर्ध्या भागांत त्यांनीं आपली कामें कशीबशीं चालविलेलीं आहेत. टॉयनबीहॉल या प्रथम स्थापन झालेल्या वसाहतीच्या मूळ रूपांतसुद्धां कांहीं बदल झालेले आहेत.

गरीब व श्रीमंत लोक वेगवेगळ्या ठिकाणीं राहूं लागल्यामुळें आर्थिक आणि सामाजिक संबंध जे दुरावलेले आहेत. ते सांधण्याचें काम अर्थातच या वसाहती करूं शकल्या नाहींत. तशी अपेक्षाहि कोणी करित नव्हता. तथापि गरीब वस्तींत राहाणाऱ्या लोकांशीं आपलें दळणवळण वाढवावें, ज्यांच्याबद्दल आपल्याला सहानुभूति वाटते, त्यांच्याबद्दल आपण कांहीं तरी करावें, संकटांत, अडचणींत, दुःखांत असतील त्यांना कोणत्याना कोणत्या मार्गानें उपयोगी पडावें, प्रौढ शिक्षण आणि दुसरीं अनेक प्रकारचीं सुखें वाढविणारीं साधनें त्यांना प्राप्त करून द्यावींत आणि आपल्या सदिच्छेला कृतीचें स्वरूप द्यावें, म्हणून हे प्रयत्न आहेत. या दोन वर्गांना जवळ आणण्याचा निःसंशय हा एक मार्ग आहे. या दृष्टीनें या चळवळीचें महत्त्व नाकारतां येणार नाहीं. तसेंच समाजसेवेच्या शास्त्रांची वाढ करण्याच्या बाबतींत या वसाहती विश्वविद्यालयांचा एक अत्यंत महत्त्वाचा भाग झालेल्या आहेत. समाजसेवेची अत्यंत हौस असलेल्या माणसांना अशा प्रकारचें प्रत्यक्ष काम देऊन त्यांना खरे समाजसेवक करण्याच्या या खरोखरी शाळाच आहेत. सामाजिक अरिष्टांचे परिणाम चवाठ्यावर आणून जनतेचें लक्ष त्यांच्याकडे वेधण्यास लावणारीं तीं केंद्रें आहेत. या वसाहती नसत्या, तर असे कार्यकर्ते दिसले नसते. म्हणून अशा प्रकारच्या वसाहतींची समाजाला अत्यंत जरूरी आहे.

ज्यांना गरीब लोकांच्या वस्तींत राहून त्यांच्याकरितां कांहींतरी परोपकाराचें काम करावयाचें आहे, त्यांना तसें करणें अशक्य असतें असें नाहीं. आणि या वसाहती स्थापन होण्यापूर्वीं एडवर्ड डॅनिसन् यांच्यासारख्या समाजसेवकांनीं तसें केलेंही. पण कामगार

लोकांच्या वस्तींत असें रहाण्याजेवण्याला सोयीस्कर असें ठिकाण असलें तरी आपल्या सारखेच पूर्वीचा अनुभव असलेले सर्व तऱ्हेनें आपल्याला मार्गदर्शन करण्याला तयार असलेले एकच ध्येयानें प्रेरित झालेले कार्यकर्ते एकत्र असले तर ते सर्वदृष्टीनें फायदेशीरच होणार. शेवटीं गरीब व श्रीमंत हा भेद नाहींसा होऊन सर्वांची जीवन-पातळी सारखी झाली तर कदाचित् अशा वसाहतीची आवश्यकता नाहींशी होईल पण तोंपर्यंत मात्र त्यांची जरूरी आहे हें निर्विवाद खरें आहे.

अमेरिकेंतल्या जगप्रसिद्ध समाजसेविका मिस् जेन ॲडॅम्स् या स. १८८७ मध्यें कॅनन बार्नेट यांना भेटल्या, या वसाहतींची जातीनें त्यांनीं माहिती करून घेतली आणि अमेरिकेंत शिकागो येथें 'हल हाऊस' ही वसाहत त्यांनीं स्थापन केली. तिची प्रसिद्धी आज जगभर आहे. या वसाहतींत स्त्री व पुरुष कार्यकर्ते एकत्र राहातात व एकत्र काम करितात.

## मुंबईतील अशा प्रकारचे प्रयत्न

मुंबई येथील समाजसेवासंघानें अशा प्रकारचे प्रयत्न केलेले आहेत. संघाचे सरचिटणीस श्री. ना. म. जोशी यांना ही कल्पना पस्तीस वर्षांपूर्वी सुचली व परळ येथील कामगारवस्तीच्या एका गलिच्छ भागांत स. १९१७ मध्यें भाड्यानें एक घर घेऊन तेथें अशी एक वसाहत टॉयन्बी हॉलचें ध्येय पुढें ठेवून प्रथम सुरू करण्यांत आली. वाचनालय व ग्रंथालय, रात्रीची शाळा, पतपेढी, धर्मार्थ दवाखाना, स्वच्छतेची मोहीम वगैरे कामें करण्यांत येऊं लागलीं. या पहिल्या वसाहतींतील पहिल्या रहिवाशांपैकीं लेखक एक होता. यानंतर एक वर्षानें मुंबईच्या दुसऱ्या एका कामगार-वस्तीच्या भागांत, मदनपुऱ्यांत अशी दुसरी वसाहत काढण्यांत आली. पुढें स. १९२२ मध्यें परळ येथील कामगारवस्तीच्या मध्यभागांत कामगारसंस्था स्थापून स्वतःच्या जागेंत स्वतःच्या इमारतींत वेगवेगळीं समाजसेवेचीं कामें मोठ्या प्रमाणावर संघानें सुरू केलीं. त्या काळांत मुंबईचे हे भाग अत्यंत गलिच्छ, घाणेरडे, धूळीचिखलानें भरलेले असे असत. त्यामुळें त्यावेळच्या कार्यकर्त्यांना स्वच्छतेचें काम प्रथम हातीं घ्यावें लागलें आणि त्यांच्या प्रयत्नानें कांहीं भागांत या बाबतींत कायमची सुधारणा झाली. स्वच्छतेप्रमाणेंच शिक्षणांतही हे भाग फार मागासलेले होते म्हणूनच रात्रीचें हायस्कूल, गिरणींतील काम ज्यांना गिरणींत प्रवेश मिळवावयाचा आहे त्यांच्यासाठीं वेगळें व जे आधींच गिरणींत काम करीत आहेत पण ज्यांना बढती मिळवावयाची आहे, अशांना वेगळें; अशा पद्धतीनें चाललेली शाळा, व्यायाम शाळा, स्त्रियांकरितां औद्योगिक शाळा वगैरे शैक्षणिक प्रयत्न सुरू करण्यांत आले. याशिवाय वैद्यकीय मदतीची या भागांत अत्यंत आवश्यकता होती, म्हणून गरिबांना मोफत वैद्यकीय मदत मिळण्याची व्यवस्था केली. कामगारांकरितां सद्भिरुचि पोषक अशा करमणुकीची सोय व्हावी म्हणून

सहकारी मनोरंजनमंडळ काढून व सभागृहाचें नाटकगृहांत रूपांतर करून तीहि सोय करण्यांत आली. या मुख्य कार्याशिवाय आणखी कांहीं लहानलहान कार्येंहि हातीं घेण्यांत आलीं. नुसतें शैक्षणिक कार्य पाहिलें तरी आज हजारबाराशें प्रौढ स्त्रीपुरुषांना वेगवेगळ्या प्रकारचें शिक्षण दररोज देण्याचें कार्य हें एकच केंद्र करीत आहे. यावरून या संघाच्या कार्याच्या व्यापाची कल्पना येईल.

इंग्लंडांतील वसाहतीशीं वरील कार्याची बरोबरी करितां येईलच असें म्हणतां आलें नाहीं; तरी परिस्थिति, पैसा व कार्यकर्ते यांची येथील उणीव, एकंदर समाजाचा मागसलेपणा यांचा विचार करितां समाजसेवासंघाचें हें कार्य अत्यंत प्रशंसनीय आहे, ही गोष्ट कोणालाहि नाकारतां येणार नाहीं.

# प्रकरण १० वें

# खेडीं आणि समाजसेवा

Villages are the homes of our people. It is there that the bulk of the nation lives and lives in a rather very miserable condition, devoid of all ideas of sanitation, civic co-operation, business and education. Illiterate, ignorant insufficiently fed, insufficiently clothed, very poorly housed, surrounded by insanitary conditions, given to litigiousness, oppressed by petty officials whose number is legion, exploited by their own countrymen, landlords, their condition is simply pitiable.

LALA LAJPAT RAI.

मोठमोठ्या वस्तीचीं शहरें हीं अलीकडेच अस्तित्वांत आलीं. विशेषतः औद्योगिक क्रांतीपासून यांची वाढ बेसुमार झाली. आपल्या मुंबई शहराची वस्ती इ. स. १८०० मध्यें १,५०,००० होती ती थोडथोडी वाढत जाऊन बृहन्मुंबईची वस्ती इ. स. १९५१ मध्यें २८,३९,२७० झाली आहे. गांव सोडून शहरांत येण्याची ही प्रवृत्ति अलीकडे तर इतकी वाढली आहे कीं कांहीं दिवसांनीं खेडीं साफ ओसाड पडतील कीं काय, अशी आतां भीति वाटूं लागली आहे. कारण खेडेगांवांची हल्लीं अशी स्थिति झाली आहे कीं, त्यांत म्हातारीं माणसें, स्त्रिया व मुलें हींच सामान्यतः राहूं लागलीं आहेत. साधारणपणें मुलगा वयांत आला कीं तो शहराची वाट धरतो. त्यामुळें तरुण व कर्तृत्ववान् माणसें खेड्यांत दुर्मिळ होऊं लागलीं आहेत आणि याचा परिणाम दिवसेंदिवस कमी होणारें शेतीचें उत्पन्न अधिक कमी होण्यांत व्हावा, हें अपरिहार्य आहे, विशेषतः हिंदुस्थानदेश कृषिप्रधान असल्यामुळें या परिस्थितीचा परिणाम शेतीवर फारच अनिष्ट होत आहे आणि दारिद्य सारखें वाढत आहे.

खेडें सोडून शहरांत जावें, असें खेड्यांतील लोकांना वाटण्याला अनेक कारणें झालीं आहेत. खेड्यांतल्या खेडयांत करितां येण्यासारखे लहान लहान धंदे वाफेच्या यंत्रांच्या स्पर्धेमुळें नाहींसे झाले आहेत आणि व्यवहारोपयोगी बारीकसारीक वस्तु ज्या आजपर्यंत खेडेगावांत तयार होत होत्या, त्याहि आतां शहरांतूनच येऊं लागल्या आहेत. यामुळें खेड्यांतील रहाणी इतकी परावलंबी झाली आहे

कीं, खेड्यांत रहाणाऱ्या लोकांना हरघडीं लागणारी कोणतीही वस्तु शहरांतून आणल्याशिवाय दुसरें गत्यंतर उरलेलें नाहीं. अशा रीतीनें घरगुती धंदे बुडून खेड्यांतील लोकांची उपासमार होऊं लागली आहे. शिवाय शहरांतील भपकेदार रहाणी दूरच्या लोकांना आकर्षित करिते आणि प्रवासाच्या सोयी वाढत चालल्यामुळें शहरांतील सुखसोयीचा अनुभव प्रत्यक्ष घेणें कोणालाहि सोपें झालें आहे. अनेक कारणामुळें शेती दिवसेंदिवस कमी होत चालली आहे आणि त्यामुळें केवळ पोट भरण्याकरितां, इच्छा नसतांनासुद्धां शहराची वाट धरणें अनेक शेतकऱ्यांना भाग पडत आहे. अशा रीतीनें चरितार्थ चालविण्याकरितां माणसानें एकदां स्थलांतर केलें कीं पोटाला मिळेल तेंच स्थल आपलें घर, असें तो मानूं लागतो आणि ह्या नवीन जागीं आपल्या सुखसोयी पाहूं लागतो. त्याच्या मनाप्रमाणें साऱ्या गोष्टी जुळल्या तर त्याला पूर्वींच्या स्थलाचें विस्मरण पडतें. पण तो तेथें स्थिरस्थावर होऊं शकला नाहीं तर त्याचा ओढा पूर्वींच्या ठिकाणाकडे असतो. त्याचा कौटुंबिक जीवनावरहि अनिष्ट परिणाम होत आहे. खेड्यांत स्त्रियांची संख्या वाढत आहे तर शहरांत पुरुषांची संख्या जास्त होत आहे. बृहन्मुंबईंत १००० पुरुषांमागें ५९६ स्त्रिया आहेत.

## खेड्यांतील स्वाभाविक रहाणी

परंतु उपरिनिर्दिष्ट स्थित्यंतर समाजहिताला फारसें पोषक होत नाहीं. खेड्यांतील रहाणी आणि शहरांतील रहाणी ह्या दोहोंत महदंतर असतें. पहिली स्वाभाविक असते तर दुसरी कृत्रिम असते. खेड्यांतील घरें आंत सूर्यप्रकाश घेण्याइतकीं आरोग्यदृष्ट्या चांगलीं बांधलेलीं नसलीं तरी त्यांच्या सभोंवार विपुल मोकळी जागा असते व तेथें सर्व दिवसभर सूर्यप्रकाश असतो; त्यामुळें तेथील हवा फारशी वाईट होत नाहीं. उलटपक्षीं, शहरांतील घरांची बांधणी एकाच हेतूनें केलेली असते. तो हेतु हा कीं, अधिक भाडें कसें मिळवितां येईल. त्या घरांना साधी हवाच मिळणें कठीण तर मोकळी हवा कोठून मिळणार? खाण्याच्या जिन्नसांपैकीं भाजीपाला हा ताजा म्हणावयाचा पण तो ताजा असणेंच शक्य नाहीं. कारण तो कोणत्या तरी दूरच्या ठिकाणाहून कैक दिवसांचा प्रवास करून आणि कैक माणसांनीं चढउतार केल्यानंतर मग तो तेथें येतो. फार काय, पण पाणीसुद्धां पिण्यायोग्य होण्यासाठीं अनेक प्रकारचीं औषधें त्यांत मिसळून तें शुद्ध करण्यांत येतें. खाद्यपेयांचे जिन्नस शरीराला उपकारक नाहींत, हवा मोकळी व शुद्ध नाहीं, राहण्याला पुरेशी जागा नाहीं आणि उद्योगधंदा वाईट परिस्थितींत करावा लागतो. याचा परिणाम असा होतो कीं, शहरांत अनेक प्रकारचे रोग होतात, समाजांत असंतोष उत्पन्न होतो, अनेक प्रकारचे अन्याय होतात, समाजाच्या नाशाला कारणीभूत होणारीं अनेक व्यसनें माणसाला लागतात, कायदे मोडणारांची संख्या अतोनात वाढते, माणसांची आयुर्मर्यादा कमी होते, आणि

एकंदरीनें समाजाची प्रगति होण्याऐवजीं समाजाची अवनति होण्याला सुरवात होते. नैतिक दृष्ट्या शहरांतील राहाणी तर अगदींच हानिकारक असते. सांपत्तिक अडचणी-मुळें शहरांत सहकुटुंब राहणें पुष्कळ लोकांना शक्य नसतें. एकटा राहिल्यानें मनुष्य व्यसनाधीन होतो आणि एकटे राहणारांची संख्या वाढल्यानें वेश्यागारांसारखीं स्थळें अस्तित्वांत येतात. उलटपक्षीं खेड्यांत सहकुटुंब राहाणें सोपें जातें व सांपत्तिक दृष्ट्या फायद्याचें असतें. कारण शेतकऱ्याला घरांत माणसें अधिक असतील तेवढीं हवींच असतात. त्यांचा त्याला शेतीच्या कामीं उपयोग होतो. त्यामुळें खेड्यांतील परिस्थिति कुटुंब जोडण्याला व कुटुंबाच्या वाढीला कारणीभूत होते, तर शहरांतील परिस्थिति कुटुंब मोडण्याला व कुटुंबाच्या नाशाला कारणीभूत होते. समाजाच्या सुखाचा नाश करणारें हें वातावरण शहरांत उत्पन्न होऊन किंवा केवळ शहरांतील-माणसांनाच पीडा देऊन थांबत नाहीं; तर त्याचा फैलाव थेट खेड्यापर्यंत होतो. कोणत्या तरी भयंकर रोगानें शहरांत आजारी पडावें आणि बरें होण्याचे सर्व उपाय हरले कीं, गांवचा रस्ता धरावा. गांवीं औषधपाण्याशिवाय नुसत्या हवेनेंच पुष्कळ लोक बरे होतात हें खरें; पण या नवीन रोगांची साथ तेथें पसरते आणि तेथील हवा दूषित करते. सारांश यांत्रिक युगानें उत्पन्न केलेली ही नवीन परिस्थिति शहरांबरोबर खेड्यांच्याहि अधो-गतीला कारणीभूत होत आहे. तरुण लोक आपली महत्त्वाकांक्षा पुरी करण्याची साधनें खेड्यांत नसल्यामुळें शहरांत जातात. त्यामुळें खेडीं अधिकाधिकच उजाड होऊं लागलीं आहेत. खेड्यांच्या सुधारणेकडे कोणीच लक्ष देईनासें झालें आहे. म्हणजे एकीकडे तरुणांना आकर्षित करणारीं साधनें वाढत आहेत तर दुसरीकडे असलेलीं साधनें कमी होत आहेत. हल्लीं स्वराज्यप्राप्तीनंतर या गोष्टींना हळूहळू आळा पडण्याची चिन्हें दिसत आहेत.

शहरांत स्थायिक झालेले लोक पुनः खेड्यांत राहावयास जातील, हें शक्य नाहीं, असें गृहीत करून चाललें तरी खेड्यांतून शहरांत जी माणसांची वाहती लागली आहे, ती बंद झाल्याशिवाय खेड्यांची सुधारणा होणार नाहीं. तरुण लोकांची दृष्टि शहराकडे जाण्याऐवजीं खेड्यांकडे फिरल्याशिवाय; खेड्यांतच राहावें, खेड्यांचीच सुधारणा करावी, आपल्याला हव्या त्या सुखसोयी खेड्यांतच घडून आणाव्या, अशी तेथल्या बहुसंख्य लोकांची महत्त्वाकांक्षा असल्याशिवाय, खेडीं ऊर्जितावस्थेस पोंचणार नाहींत. कांहीं वर्षांपूर्वी अमेरिकेची स्थिति अशीच झाली होती. बहुतेक सारे तरुण लोक खेडीं सोडून शहरांत जाऊं लागल्यामुळें खेडीं निर्जन होतात कीं काय, अशी लोकांना भीति पडली होती. परंतु लवकरच ह्या अनिष्ट गोष्टीकडे पुढाऱ्यांचें लक्ष गेलें आणि अनेक प्रकारें खेड्यांची सुधारणा होऊं लागली. त्यामुळें तरुणांचें लक्ष तेथें खेड्याकडे आतां इतकें वेधलें आहे कीं, शेतकी कॉलेजां-तील विद्यार्थी आपलें शिक्षण पुरें झाल्यानंतर आपल्या गांवीं शेती करण्याकरितां जातो

आणि असे शेतकी कॉलेजांतील शिक्षण पूर्ण केलेले पण स्वतः शेती करणारे पुष्कळ शेतकरी तिकडे आहेत व शेतीसंबंधीं पूर्ण माहिती देणारीं कॉलेजेंहि जागोजागीं आहेत. तेथें शेतीची अनेक प्रकारें सुधारणा झालेली आहे. अगदीं खेड्यापाड्यांत सुद्धां शेतीच्या आणि दुसऱ्या अनेक बाबतींत विजेचा उपयोग करण्यांत येतो. लोकांच्या करमणुकीचीं अनेक साधनें जागोजाग असतात आणि एखादा मनुष्य फारच महत्त्वाकांक्षी असल्याशिवाय आपला गांव सोडून सहसा शहरांत जात नाहीं. जपानमध्येंहि घरबैठे धंदे अनेक असल्यामुळें खेड्यांतील लोकांची अशी उपासमार होत नाहीं आणि प्रत्येक माणसाला पोट भरण्यासाठीं शहरांत जावें लागत नाहीं. परंतु आपल्याकडे गांव सोडून शहरांत जाणारांची संख्या सारखी वाढत आहे, खेडीं ओसाड पडूं लागलीं आहेत, शेतीकडे पूर्णपणें दुर्लक्ष्य होऊं लागलें आहे. लहान लहान हातमागाचे धंदे जवळ जवळ नाहींसे होऊन गांवकरी लोक परावलंबी आणि परोपजीवी होऊं लागले आहेत. अर्धपोटीं उघड्या अंगानें काळ कंठणाऱ्या दीन विपद्ग्रस्त शेतकऱ्यांचें पोट भरूं लागल्याशिवाय ही वाहती थांबणें शक्य नाहीं.

## खेड्यांत समाजसेवेची आवश्यकता

वरील स्थित्यंतरामुळें समाजघटनेवर विलक्षण परिणाम होऊन व्यक्तिसुख, कौटुंबिक आनंद आणि सामाजिक सुव्यवस्था यांचा बिघाड झाला आहे. शहरांतील अपुऱ्या जागांत लोकवस्ती बेसुमार वाढल्यामुळें समाजाला हानिकारक अशा अनेक गोष्टी उत्पन्न झाल्या आणि हे अनेकविध सामाजिक प्रश्न सोडविण्याकरितां कैक समाजसेवक पुढें आले व समाजसेवा करणाऱ्या कैक संस्था स्थापन झाल्या. पण ह्या सामाजिक संकटांची वाढ अजून खुंटलेली नाहीं, इतकेंच नव्हे तर कैक वर्षें सतत प्रयत्न करूनसुद्धां ह्यांपैकीं कांहीं प्रश्न कोणत्या उपायानीं सोडवितां येतील याबद्दल एकमत झालेलें नाहीं. शिवाय कांहीं सामाजिक संकटांच्या बाबतींत त्यांचा प्रतिकार करण्याचे अजून कांहींच प्रयत्न झालेले नाहींत. पण खेड्यांतले लोक शहरांत येऊन खेड्यांतील वस्ती कमी झाल्यानें व शहरांतील समाजसेवा करणाऱ्या संस्थांची संख्या वाढल्यानें खेड्यांतील समाजसेवेची आवश्यकता कमी झाली आहे, अशांतला मुळींच भाग नाहीं. उलट कर्ती माणसें तेथें राहात नसल्यामुळें खेड्यांतील समाजसेवेचा प्रश्न फारच बिकट झाला आहे. शिवाय, पाण्याचे अनेक झरे मिळून ज्याप्रमाणें विहीर होते त्याचप्रमाणें सहस्रावधी खेड्यांतील लोक एकत्र मिळून एक शहर होतें आणि शहरांतील लोक ज्याप्रमाणें अनेक प्रकारच्या अनिष्ट गोष्टी खेड्यांत नेतात त्याचप्रमाणें खेड्यांतले लोकहि अनेक प्रकारच्या अनिष्ट गोष्टी शहरांत आणतात. करितां शहरांच्या हिताच्या दृष्टीनेंसुद्धां खेड्यांतील समाजसेवेची वाढ होणें आवश्यक आहे. म्हणजे खेडीं व शहरें हीं परस्परावलंबी असल्यामुळें या दोन्ही ठिकाणीं समाजसेवेची

सारखीच जरूरी आहे. खेड्यांची सुधारणा करावयाची असली, गांव सोडून शहरांत जाणाऱ्या लोकांचें लक्ष पुनः खेड्याकडे लागावें, असे उपाय योजावयाचे असले, तर ग्रामसेवामंडळेंहि अस्तित्वांत यावीं लागतील. मात्र समाजसेवेच्या दृष्टीनें शहरांत ज्या गोष्टींची जरूरी असते, त्याच गोष्टी खेड्यांतहि हव्या असतील असें म्हणतां येत नाहीं. तथापि कांहीं गोष्टींची दोहोंकडेहि सारखीच जरूरी आहे.

खेड्यांची सुधारणा करणें हा अत्यंत सुधारलेल्या देशांतहि मोठा कठीण प्रश्न मानला जातो, तर आपल्यासारख्या सर्व बाजूंनीं मागसलेल्या देशांत तो कठिण वाटावा यांत कांहींच आश्चर्य नाहीं. भारताच्या पस्तीस कोटी लोकसंख्येपैकीं काय ते शेंकडा बारा लोक शहरांत राहतात. खेड्यांची सुधारणा करावयाची म्हटल्यास अनेक प्रकारचे प्रश्न उपस्थित होतात. कारण पूर्वींचे स्वतः जमीन कसणारे जमीनदार नाहींसे होऊन त्या जागीं दूरस्थ जमीनदारांचा वर्ग वाढत आहे, जमिनीचे लहान लहान तुकडे पडत आहेत, एकाच्याच मालकीची जमीन दूरदूरच्या अनेक ठिकाणीं पसरलेली असते, शेत करणारा एक व मालक दुसरा, अशी बहुतांशीं स्थिति असल्यामुळें शेतीची सुधारणा करण्याबद्दल कोणालाच कळकळ वाटत नाहीं, हे व दुसरे अनेक शेतीसंबंधीचे प्रश्न सुटावयास हवेतच आणि त्या दिशेनें आज प्रयत्नहि होत आहेत. पण त्याशिवाय शेतकऱ्यांची सांपत्तिक स्थिति सुधारली पाहिजे. खेड्यांतल्या खेड्यांत करितां येण्यासारख्या जोडधंद्यांचें नुसतें पुनर्जीवन करून चालावयाचें नाहीं; तर व्यापारी दृष्टीनें ते कसे यशस्वी करतां येतील यांसंबंधीं विश्वसनीय माहिती देणारे व तदंगभूत हरएक बाबतींत सल्ला देणारे व मार्गदर्शक होणारे प्रचारक यांचें साहाय्य कोणाहि शेतकऱ्याला बिनपैशानें आणि विनप्रयासानें सहज मिळूं लागल्याशिवाय या गोष्टी यशस्वी होणें शक्य नाहीं. समायिक पत व समायिक भांडवल यांची शेतकऱ्यांना आज ओळखहि नाहीं. लहान लहान घरबैठ्या धंद्यांची माहिती करून दिल्यानंतर त्यांनीं तयार केलेला माल कसोशीनें विकला जाईल, अशा प्रकारची व्यवस्था व्हावयास हवी. मोठे शेतकरी किंवा व्यापारी लहान लहान शेतकऱ्यांचा माल पाडून घेऊन त्यांची उपासमार करणार नाहींत, याकरितां समायिक पत वाढवून गरीब शेतकऱ्यांचें रक्षण करावयास हवें. हें ध्येय सहकारी चळवळीच्या साहाय्यानेंच गांठतां येण्यासारखें आहे. सहकारी चळवळीविषयीं लिहितांना पत-पेढ्यांची वाढ आपल्याकडे कशी होत आहे, हें पूर्वीं दाखविण्यांत आलेंच आहे. परस्पर साहाय्यकारी पतपेढ्यांची चळवळ पूर्ण यशस्वी झाल्यास शेतकऱ्यांना ती कर्जमुक्त करूं शकेल. पण ही चळवळ अजून इतकी यशस्वी झालेली नाहीं. आज या चळवळीपासून कामगारांना व शेतकऱ्यांना इतकाच फायदा होत आहे कीं, त्यांना या संस्थांतून अगदीं अल्पव्याजानें कर्ज मिळूं शकतें आणि त्यांना द्यावें लागणारें थोडें व्याजहि परक्यांच्या खिशांत न जातां पुनः त्यांच्या स्वतःच्याच खिशांत परत

येतें. परंतु शेतकऱ्यांची स्थिति खरोखरीच सुधारावयाची असल्यास त्यांच्या ऋणमुक्ततेबरोबरच त्यांची समायिक पत व समायिक भांडवल वाढून त्यांना लागणारा कच्चा माल शक्य तितका कमी दरानें मिळण्याची व त्यांनीं तयार केलेला माल शक्य तितक्या अधिक दरानें विकला जाण्याची व्यवस्था सहकारी तत्त्वावर व्हावयास हवी. ही केवळ कल्पनाच आहे असें कोणाला वाटेल; परंतु डेन्मार्क, आयर्लंड वगैरे कृषिप्रधान देशांतील लोकांनीं हीं तत्त्वें प्रत्यक्ष अमलांत आणून आपली कल्पनातीत सुधारणा केली आहे. या चळवळीच्या पायीं त्या देशांतील शेतकऱ्यांची अतोनात भरभराट झालेली आहे. आयरिश लोक हे तर मूळचे शेतकरीहि नव्हत. ते मूलतः व स्वभावतः धनगर होत. परंतु सहकारी चळवळीच्या साहाय्यानें त्यांनीं आपला मूळचा दूधदुभत्याचा धंदा कल्पनातीत वाढविला, इतका कीं मोठमोठ्या राष्ट्रांनाहि या बाबतींत त्यांच्यापुढें हार खावी लागली. शेतीच्या बाबतींतहि त्यांनीं पुष्कळ सुधारणा केली.

## आयर्लंडमधील शेतकऱ्यांची सुधारणा

साठपांसष्ठ वर्षांपूर्वीं आयर्लंडमधील शेती व शेतकरी यांची स्थिति अत्यंत निकृष्ट होती. म्हणून शेतीचा धंदा सहकारी तत्त्वावर चालवून आयरिश शेतकऱ्यांची सांपत्तिक स्थिति सुधारावी, या थोर आकांक्षेनें कांहीं परोपकारी पुढाऱ्यांनीं ही चळवळ इ. स. १८८९ सालीं हातीं घेतली. या आरंभीं पुढाकार घेणाऱ्या लोकांची संख्या हाताच्या बोटांवर मोजतां येण्याइतकीच होती. यांतले पहिले पुढारी मि. आर. ए. अँडर्सन हे होत. दुसरे एक परोपकारी जमीनदार लॉर्ड मॉन्टेगल हे होते. आयर्लंडमधील सहकारी चळवळीचे सुप्रसिद्ध पुरस्कर्ते आणि कर्तृत्ववान् पुढारी सर हॉरेस प्लंकेट हे तिसरे पुढारी होत. या व आणखी तीनचार लोकांच्या मदतीनें ही चळवळ सुरू झाली आणि पुढें अनेक प्रकारच्या संकटांना तोंड देऊन व पायाशुद्ध पद्धतीनें चालून पूर्ण यशस्वी झाली. आयर्लंड मध्यें सहकारी चळवळ सुरू होण्याच्या सुमाराला शेतकऱ्यांना जमीनदारांच्या पारतंत्र्यांतून मोकळें करणारें एक बिल पास झालें होतें व त्यांत वाजवी खंड, कुळांच्या वहिवाटहक्काची शाश्वति व धान्य कोणालाहि विकण्याची मुभा या तीन अटी होत्या. याच सुमाराला शेतकऱ्यांना त्या वेळपर्यंत नसलेला एक शत्रु–परराष्ट्रीय स्पर्धा–उत्पन्न झाला होता. शिवाय आयर्लंडमधील शेतें अगदीं लहान लहान असल्यामुळें त्यांची मशागत चांगल्या रीतीनें करणें शक्य असलें तरी शेतांची लागवड व धान्याची विक्री मोठ्या प्रमाणांत संघशक्तीनें केल्याशिवाय तीं आर्थिक दृष्ट्या यशस्वी होणें शक्य नव्हतें. आयर्लंडमधील शेतीचा धंदा, कला या दृष्टीनें अगदीं मागासलेला होता व त्यापेक्षां व्यापार या दृष्टीनें अधिक मागासलेला होता. कैक दिवसांच्या आपसांतील कलागतीमुळें आयरिश शेतकऱ्यांचें आयुष्य अगदीं कष्टमय झालें होतें. इतकें कीं खेड्यांतील शेतकऱ्यांना उमेद कशी ती

राहिलीच नव्हती. आपल्या आर्थिक दुःखाचें आदिकारण सरकार आहे, अशी आयरिश लोकांची समजूत झाली होती. आणि आपल्याला स्वराज्य मिळालें तर आपली आर्थिक व सामाजिक स्थिति चुटकीसरशी सुधारेल, असेंहि त्यांना वाटत होतें. यामुळें राजकीय पुढारी म्हटला म्हणजे तो सर्व बाबतींत आपला मार्गदर्शक असें ते मानीत. शिवाय व्यापाऱ्यांचा या चळवळीला विरोध होताच. या स्थितीशीं आपली आजची स्थिति तंतोतंत जुळत नाहीं असें कोण म्हणेल? एकंदर परिस्थिति अशा प्रकारें प्रतिकूल होती तरी पण या चळवळीच्या बाबतींत प्लंकेटसाहेबांचा आत्मविश्वास दांडगा होता. आपण हातीं घेतलेलें काम आर्थिक दृष्ट्या मजबूत पायावर उभारलेलें आहे आणि तें यशस्वी होण्यास काय तो कालावधिच लागणार आहे, असा प्लंकेटसाहेबांचा विश्वास होता. त्यांच्या अपेक्षेप्रमाणें आयर्लंडमध्ये शेतकऱ्यांची सहकारी चळवळ कालांतरानें पूर्ण यशस्वी झाली. तेथें दूधदुभत्याच्या कारखान्यांत ही चळवळ प्रथम सुरू करण्यांत आली. कारण हा धंदा तेथें फार पुरातनकाळापासून चालू होता. आयर्लंडमध्यें इ.स.१८९१ च्या वसंतऋतूंत सहकारी तत्त्वावर चाललेला दुधालोण्याचा पहिला कारखाना अस्तित्वांत आला. इ. स. १९१९ मध्यें या सहकारी तत्वावर चाललेल्या कारखान्यांची संख्या ३८० झाली, ५३,२४० सभासद झाले आणि रु. १०,५०,००,००० चें लोणी विकण्यांत आलें. आयर्लंडांत सहकारी चळवळ करणाऱ्या मंडळीनें प्रथम जरी लोण्याचाच धंदा सहकारी तत्त्वावर चालविण्याचें ठरविलें तरी केवळ दुधालोण्याचाच धंदा नव्हे तर शेतीच्या इतर शाखा आणि शेतकऱ्यांचा संबंध येणारा प्रत्येक जातीचा धंदा सहकारी तत्त्वावर चालवावा, अशी त्या मंडळीची मनीषा होती; पण अंडीं गोळा करणें, त्यांची प्रत ठरविणें आणि तीं बाजारांत विकणें अशा क्षुल्लक बाबीपासून तों अत्यंत कौशल्यानें करावयाच्या व्यापारापर्यंत सर्व धंद्यांची प्रगति आयर्लंडांतील विशिष्ट परिस्थितीमुळें अगदींच मंदगतीनें होत होती. तथापि सहकारी चळवळीचीं तत्त्वें आयरिश शेतकऱ्यांच्या मनावर बिंबलेलीं असल्यामुळें सर्व आयरिश शेतकरीवर्ग सहकारी चळवळींत सामील होणें, हा काय तो कालावधीचाच प्रश्न होता.

डेनमार्कमधील कामगार, कारागीर, शेतकरी, लहान लहान धंदे करणारे लोक या सर्वांनीं सहकारी चळवळीच्या साहाय्यानें आपली उन्नति कशी करून घेतली याची माहिती मागें सातव्या प्रकरणांत दिलेली आहे.

## सहकारी चळवळच शेतकऱ्याची उन्नति करील

या दृष्टीनें पाहतां खेड्यांतील लोकांच्या सर्वांगीण विकासाला साहाय्यभूत होईल ,अशी जर कोणती चळवळ असेल तर ती सहकारी चळवळ होय. स्वावलंबन, परस्परांना साहाय्य, लोकशाही तत्त्वाचें पालन, सचोटीचा व्यवहार, मध्यस्थांचा अभाव हीं या चळवळीचीं वैशिष्ट्यें आहेत. तिच्या साहाय्यानें खेड्यांतील अनेक प्रश्न सुटण्या-

सारखे आहेत. वर उल्लेख केल्याप्रमाणें दुसऱ्या अनेक देशांतले असे प्रश्न तिचा अंगिकार केल्यामुळें यशस्वी रीतीनें सुटले आहेत. आपल्या देशांत या चळवळीमुळें गेल्या अर्धशतकांत थोडीफार सुधारणा झालेली आहे. भारतांत सन १९४७–८ मध्यें तिचा शेंकडा सोळा लोकांशीं संबंध आलेला होता. व तीन खेड्यांना एक पतपेढी असें तिचें प्रमाण होतें. भारतांत ही चळवळ प्रथम सुरू झाली ती लोकांना कर्ज देण्याची व्यवस्था करून त्यांना सावकारांच्या कचाट्यांतून सोडवावें या हेतूनें झाली, याचा उल्लेख पूर्वी केलेलाच आहे. त्यामुळें आरंभापासून आजतागायत या चळवळीच्या या अंगावरच सारा भर देण्यांत येत आहे. आज शेतकऱ्यांसाठीं ज्या पेढ्या आहेत; त्यांत शेंकडा ८५ फक्त कर्ज देणाऱ्याच पेढ्या आहेत. त्यांचें स. १९४५–६ मध्यें तेहतीस कोटी रुपये भांडवल होतें आणि या वर्षी त्यांनीं शेतकऱ्यांना १४·६ कोटी रुपये नवीन कर्ज दिलें. तथापि शेतीसाठीं दरवर्षी २००० कोटी रुपयांची जरूरी असते असा अंदाज आहे. म्हणजे फक्त ०.७५ टक्केच शेतकऱ्यांची गरज या पतपेढ्या भागवितात असें झालें. सारांश इतके प्रयत्न करूनही खेड्यांतल्या लोकांच्या तात्पुरत्या किंवा दीर्घकालीन गरजा योग्य रीतीनें त्या भागवूं शकत नाहींत.[1] ही झाली शेतीच्या बाबतींतील खर्चाची स्थिति. शेतकऱ्याला कर्जमुक्त करण्याबाबतींतहि अशीच निराशाजनक स्थिति आहे. सहकारी चळवळीनें या बाबतींत कांहीं कार्य केलें असलें, तरी तें दर्यामें खसखस याच स्वरूपाचें आहे. त्यामुळें सावकाराच्या पकडींतून बहुसंख्य शेतकऱ्यांची अजून सुटका झालेली नाहीं. व काटकसरीची संवयहि लागलेली नाहीं. अत्यंत कंगाल स्थितींतील लोकांना या चळवळीचा फारसा उपयोग होऊं शकत नाहीं. ज्यांचा आदा आणि खर्च यांची कधींच तोंडमिळवणी होत नाहीं अशा स्थितींतील माणसानें पतपेढींतून नेहमींच्या खर्चाकरतां कर्ज घेतल्यास तें देतां न आल्यामुळें त्याची पतहि जाते आणि पेढीही बुडते. पत हा सहकारी चळवळीचा प्राण आहे आणि ती टिकण्याला माणसाचा आदा आणि खर्च यांची निदान तोंडमिळवणी तरी व्हावी लागते. म्हणून अशा लोकांची सांपत्तिक स्थिति या पातळीपर्यंत आल्याशिवाय सहकारी चळवळीचा खरा उपयोग होणार नाहीं.

## विविध कार्य करणाऱ्या पेढ्या पाहिजेत

आतां ही चळवळ नवीन दिशेनें चालविण्याकडे लोकांचा कल होत आहे. कांहीं ठराविक गरजाच पुरविण्याचें ठरवून संस्था सुरू केली आणि तींत अपयश आलें कीं, साराच बाजार आटपतो किंवा ती कशीबशी जिवंत राहाते, पण व्यापक दृष्टि ठेवून

---

1 Dr. B. Natarajan, Economic Adviser to Government, Madras in a paper on Co-operation and Rural Welfare submitted to the Indian Conference of Social Work, Forth Annual Session, Jamshedpur, 1950.

जींत सर्व प्रकारच्या गरजा पुरवितां येतील, अशी विविध कार्यकारी पेढी सुरू केल्यास सभासदांना तिच्याबद्दल अधिक आस्था वाटून त्यांचें सहकार्यहि अधिक मिळण्याचा संभव असतो. पण नुसत्या कर्ज देणाऱ्या पतपेढीपेक्षां अशा प्रयत्नांना अधिक भांडवल, ज्ञान, अनुभव आणि कर्तृत्व लागतें. भारतांत स. १९४७-८ मध्यें अशा २१००० संस्था होत्या.

सभासदांचा माल विकत घेऊन तो बाजारांत विकणाऱ्या सहकारी संस्था, सहकारी तत्त्वावर मालाचें उत्पादन आणि शेतीची शास्त्रोक्त पद्धतीनें सुधारणा करणाऱ्या संस्था, लहान लहान शेतें एकत्र करून त्यांची लागवड सहकारी तत्त्वावर करणें, जमिनीची सुधारणा, जंगलांची व्यवस्था आणि वाढ, गुरांची निपज, सहकारी भांडारें, घरगुती धंदे वगैरे अनेक बाबतींत भारताच्या निरनिराळ्या भागांत सहकारी तत्त्वावर प्रयत्न झालेले आहेत आणि ते कमी जास्त प्रमाणांत यशस्वीहि झाले आहेत. तथापि त्यांची प्रगति एकंदरींत अगदीं मंद आहे. शिवाय त्यांत जोम, प्रामाणिकपणा, उत्साह, सहकाऱ्याची वृत्ति, समाजसेवेची भावना हींहि तितकींशी नाहींत.

सहकारी चळवळ यशस्वी झालेल्या वर उल्लेख केलेल्या राष्ट्रांतही सहकारी चळवळ समाजसेवेच्या कार्याला विशेष महत्त्व देते. एकमेकांना साहाय्य करून सर्व समाजाचा विकास करण्याचा प्रयत्न तर करण्यांत येतोच, पण त्याशिवाय रुग्णालयें, आजारांतून उठलेल्याकरितां हवेचीं ठिकाणें, शिष्यवृत्या, अनेक प्रकारें समाजसेवा करणाऱ्या संस्थांना देणग्या, सहली, करमणूक, वाचनालयें वगैरेसाठीं आपल्या वार्षिक फायद्यांतून लाखों रुपयांची मदत करण्यांत येते.

हिंदुस्थानची पहिली खानेसुमारी इ. स. १८७१ मध्यें झाली. तदनंतर प्रत्येक दहा वर्षांनीं खानेसुमारी करण्यांत येत असते. या खानेसुमारीच्या आंकड्यांवरून असें आढळतें कीं लोकसंख्येच्या वाढीच्या मानानें उद्योगधंदा करणाऱ्या लोकांची संख्या प्रत्येक खानेसुमारीला सारखी कमी होत असून शेतीवर अवलंबून राहाणारांची संख्या सारखी वाढत आहे. याचा अर्थ असा नव्हे कीं हिंदुस्थानांतील शेतीची सारखी भरभराट होत आहे आणि म्हणून बाकीच्या धंद्यांतील लोक दिवसेंदिवस अधिकाधिक शेती करूं लागले आहेत. शेतीवर अवलंबून राहाणारांची संख्या वाढण्याचें कारण असें कीं गेल्या पाऊण शतकांत मोठ्या उद्योगधंद्यांची वाढ झालेली नसल्यामुळें कामाच्या अभावीं लोक शेतीकडे वळत आहेत. बरें एका शेतकरी कुटुंबाकडे असलेल्या जमिनीचे प्रत्येक पिढीला अनेक वांटे होऊन ते अनेकांकडे जात असल्यामुळें आणि शेवटीं वांटणीला आलेल्या लहानशा शेतावर शेतकरी कुटुंबाचा गुजारा होत नसल्यामुळें तो तुकडाही शेवटीं गहाणदाराच्या ताब्यांत जातो. अशा रीतीनें शेताचा मालक असून स्वतः शेती करणारा शेतकरी वर्ग बदलत जाऊन वर म्हटल्याप्रमाणें दूरस्थ लोकांच्या ताब्यांत शेतें जात आहेत आणि शेतकऱ्यांची परंपरा तुटत आहे. जे शेती

करतात त्यांना अर्धपोटीं राहाण्याइतकेंहि उत्पन्न त्यांतून मिळत नसल्यामुळें कर्तीसवर्ती माणसें परागंदा होतात आणि म्हातारीं कोतारीं मागें राहतात. त्यांना शेतीची मशागत मेहनत घेऊन करणें शक्य नसतें. परागंदा झालेले लोक वर्षांतून कांहीं दिवस गांवीं येतात हें खरें, परंतु ते उपरे असल्यामुळें शेतीच्या कामीं त्यांचा मुळींच उपयोग होत नाहीं. त्यांचें मन नेहमीं द्विधा झालेलें असतें; तें त्यांच्या गांवाबाहेरील कामावरहि स्थिर होत नाहीं आणि गांवीं शेतीकडेहि स्थिर होत नाहीं. अशा रीतीनें दोन घोंडींवर ते उभे राहिल्यामुळें दोहोंकडेहि निराधार होतात. शेतीला जितक्या माणसांची आवश्यकता आहे त्यापेक्षां कैक पटीनें अधिक; पण अगदीं वृद्ध माणसें शेतीवर अवलंबून राहिल्यामुळें शेतीहि धड होत नाहीं व तिच्यावर अवलंबून राहिलेल्या लोकांचें पोटहि धड भरत नाहीं. अशा स्थितींत शेतीला अवश्य तितकीं लायक माणसें शेतीवर अवलंबून राहून बाकीच्यांनीं उद्योग पाहिला तर सर्वांचेंच हित होईल.

## समाज-विकास—योजना

"भारत मुख्यतः खेड्यांत राहात आहे आणि अलिकडे जरी शहरांतली लोकसंख्या वाढत असली; तरी अजूनहि हें खरें आहे कीं, भारत बहुतांशीं खेड्यांतच राहात आहे. म्हणून खेडीं आणि त्यांतील लोक यांचा सर्वांगीण विकास करण्याकरितां जे जे प्रयत्न होतील; त्यांचें नुसतें स्वागत करून चालणार नाहीं, तर त्या प्रयत्नांना सरकारनें व एकंदर जनतेनें शक्य तें सारें साहाय्य दिलें पाहिजे." असे उद्गार श्री. राजेंद्र प्रसाद यांनीं गांधीजयंतीच्या शुभदिनीं ता. २ ऑक्टोबर १९५२ रोजीं, दिल्लीजवळील अलिपूर खेड्यांत अखिल भारतीय समाज विकास योजनेचें उद्घाटन करतांना काढले.

धान्य व दुसऱ्या आवश्यक वस्तूंचें उत्पादन वाढवावें, एकंदर उत्पादनाचें वांटप सारखें करून बहुसंख्य लोकांच्या राहाणीचें मान वाढवावें व अशा रीतीनें जनता सुखी करावी; म्हणून भारत सरकारनें नियोजन समिति नेमली. त्या नियोजन समितीनें वरील योजना तयार केली व ही योजना हातीं घेण्यापूर्वीं बरेच दिवस या योजनेचीं अग्रगामीं केंद्रें प्रत्येक राज्यांत सुरू करण्यांत आलीं. महात्मा गांधींच्या ८४ व्या जन्म दिवशीं सुरू करण्यांत आलेली ही योजना काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत भारताच्या सर्व भागांतील निवडक खेड्यांत सुरू करण्यांत आलेली आहे. हीं एकंदर ५५ विकास मंडळें आहेत. या योजनेंत १८४६४ खेड्यांचा समावेश झालेला असून दीड कोटीपेक्षां अधिक खेडुतांचा त्यांच्याशीं संबंध येत आहे. या योजनेला अडतीस कोटी रुपये खर्च होतील असा अंदाज आहे. नवीन जमीन लागवडीखालीं आणणें, पाटबंधाऱ्यांची तरतूद करणें, चांगलें बीं-बियाणें पुरवणें, आधुनिक पद्धतीचीं शेतीचीं

अवजारें मिळण्याची व्यवस्था करणें, गुरांची पैदास व जोपासना करण्यास उत्तेजन देणें, खेड्यांतील स्वच्छता व आरोग्य यांची सुधारणा करणें इत्यादि या योजनेचे उद्देश आहेत. ही योजना सरकारी असली तरी खेडुतांना आपल्या पायावर उभें राहाण्यास साहाय्य करणें हा तिचा मुख्य हेतु आहे.

## फोर्ड फाउंडेशनचें साहाय्य

वरील योजना सुरू करण्याची कल्पना नियोजनसमितीकडून निश्चित केली जात असतांना फोर्ड फाउंडेशननें या समाजहिताच्या कार्यास साहाय्य करण्याचें ठरविलें. फोर्ड या जगप्रसिद्ध असलेल्या अमेरिकन मोटर कारखान्याचे मालक हेन्री फोर्ड यांनीं दोन पिढ्यांत जी अमाप संपत्ति मिळविली तिचा बराचसा भाग मानवी हितासाठीं खर्च व्हावा म्हणून त्यांनीं फोर्ड फाउंडेशन नांवाचा एक विश्वस्त निधि स्थापन केला. या निधीच्या विश्वस्तांनीं स. १९४८ मध्यें समाजसेवा, विज्ञान, व्यापार व उद्योगधंदे यांतील तज्ज्ञांची एक समिति नेमली व मानवी कल्याण होईल, अशा रीतीनें या निधीचा कसा विनियोग करतां येईल, याविषयीं सल्ला विचारला. या समितीच्या सल्ल्यानुसार विश्वस्तांनीं असा निर्णय घेतला कीं, जेणेंकरून जागतिक शांततेंत भर पडेल, लोकशाही स्वरूपाच्या संस्था वाढीस लागतील, आर्थिक स्थैर्य प्राप्त होईल अशा सर्व कार्यक्रमांना या निधींतून मदत द्यावी. ता. १ जानेवारी १९५१ रोजीं पॉल जी. हॉफमन हे या फाउंडेशनचे अध्यक्ष आणि मार्गदर्शक झाल्यानंतर त्यांनीं भारतांत फाउंडेशनचे कांहीं प्रतिनिधि पाठवून भारतांतील जनतेच्या हितासाठीं फाउंडेशननें ठरविलेल्या उद्दिष्टानुसार कांहीं निधि देतां येईल कीं काय याबद्दल विचारविनिमय केला. प्रामुख्यानें या बाबतींतील सर्व विचारविनिमय पं. नेहरूंच्याबरोबर झाला. जुलै १९५१ चे ते दिवस होते. नियोजन समितीचा कच्चा खर्डा तयार होऊन अन्नधान्य उत्पादन व त्याबाबतींत स्वयंपूर्णता यांवर त्यांत सर्वांत जास्त भर देण्यांत आला होता. १९५६ सालीं अन्नधान्य दृष्ट्या स्वावलंबी बनावयाचें, हें लक्ष्य ठरविण्यांत आलें होतें. भारतांतील कांहीं निवडक भाग हातीं घेऊन तेथें अधिक जमीन लागवडीखालीं आणावी, अधिक पाणी निर्माण करण्याची व्यवस्था करावी, चांगलीं खतें व बींबियाणें उपलब्ध करून द्यावें व अद्यावत् शेतीची पद्धति शिकवावी, हे चार मुद्दे नियोजनसमितीनें डोळयांपुढें ठेवले होते. निवडक क्षेत्रांतील प्रयोगांचें यश मग इतर क्षेत्रांनाहि आदर्श म्हणून अधिक आत्मविश्वासानें वापरतां येईल हें ओळखूनच नियोजनसमितीनें ही कल्पना स्वीकारली होती. उत्तर प्रदेशांतील इटावा येथील प्रयोगापासून जो अनुभव मिळाला, त्यांतून नियोजन समितीनें एक तत्त्व ठामपणें अंगिकारलें होतें. ग्रामीण विकास व्हावयाचा तर तेथें मूळापासून सर्व प्रश्नांना हात घातला पाहिजे. खेड्यांतील परिस्थितीस पेलतील अशा ज्या सुधा-

रलेल्या उत्पादनपद्धति आहेत, त्या खेडूतांना समजून देणें, त्यांचा वापर कसा करावयाचा हें शिकविणें यावर भर द्यावयास हवा. मोठीं धरणें, सुधारलेलीं अवजारें, भारी किंमतीचीं औषधें या गोष्टी अनावश्यक आहेत, असें नव्हे; पण त्यांना सुरवातीलाच भांडवली खर्च अफाट लागतो. त्यापेक्षां तांत्रिक मदत आणि अन्य प्रोत्साहन दिल्यास नव्या उत्पादन पद्धति शेतकरीच आपणहून स्वीकारतील, बियाणें वापरतील, कंपोस्ट खड्डे करूं लागतील, शेण व पालापाचोळा यांतून खतें तयार करूं लागतील व त्यामुळें त्यांचा उत्पादन खर्च वाढणार नाहीं. एकदां हा मार्ग फलदायी आहे, याची त्यांना जाणीव झाली कीं, ग्रामीण विकासाचा पाया घातला जाईल, अशी नियोजनसमितीची विचारसरणी होती.

संघटित रीत्या ग्रामविकास कार्य हातीं घेतल्यास शेतीचें उत्पादन वाढूं शकतें याचा प्रत्यय फाउंडेशनच्या प्रतिनिधींना अमेरिकेंत आलेलाच होता. त्यांनीं पं. नेहरू व नियोजनसमित्ति यांच्या कल्पना तत्काळ स्वीकारल्या. पुढें भारत सरकारचे प्रतिनिधी व या फाउंडेशनचे प्रतिनिधी यांच्या दरम्यान वाटाघाटी होऊन कांहीं अटींवर फाउंडेशननें भारताच्या समाजविकास योजनांना साहाय्य देण्याचें ठरविलें. या अटी भारताला बंधनकारक नसून उपकारकच आहेत. उदाहरणार्थ खालील अटी पहाः—

( १ ) भारत सरकारतर्फे अथवा सरकारी मान्यता असलेल्या खाजगी संस्थेतर्फे जीं केंद्रें सुरू करण्यांत येतील, त्यांनांच फाउंडेशन मदत देईल. यांत भारत सरकारला जबाबदार धरण्यांत आलें असल्यानें मदतीचा पैसा नक्की त्याच कामीं खर्च होईल, अशी शाश्वती फाउंडेशनला मिळाली आहे.

( २ ) निवडलेलीं विकासक्षेत्रें कालांतरानें भारतीय अर्थव्यवस्थेंत एकरूप होतील अशीं हवींत. कालांतरानें बाहेरची मदत बंद झाली तरी स्थानिक उपक्रम, राज्यसरकार व केंद्रीय सरकार यांची मदत एवढ्या बळावर तीं सतत प्रगमनशील व विकासी रहावींत अशी अपेक्षा आहे.

वरील मार्गदर्शक तत्त्वांखेरीज फोर्डफाउंडेशननें आणखी एक भूमिका ठामपणानें स्वीकारलेली आहे. फाउंडेशन फक्त समाजविकास योजनांना आर्थिक मदत करणार आहे. त्या योजनांच्या अंमलबजावणींत तें मुळींच हस्तक्षेप करणार नाहीं. अमुक एक मंजूर झालेली मदत अमुक एका मान्य झालेल्या योजनेच्या गरजा पूरवूं शकेल असें ठरलें कीं, ती योजना पार पाडण्याची संपूर्ण जबाबदारी: भारतसरकारची अगर त्या सरकारनें मान्यता दिलेल्या संस्थेची आहे. अंमलबजावणीसाठीं जो नोकरवर्ग नेमण्यांत येईल तोहि भारतसरकारकडूनच नेमण्यांत येईल. फोर्ड फाउंडेशन त्यांत जराहि लुडबुडणार नाहीं.

फाउंडेशननें पुढील प्रकारच्या सप्तविध कार्यक्रमासाठीं २३ कोटि ३० हजार रुपये मंजूर केले आहेत. त्यांत १५ अग्रगामी समाजविकास योजनांचा अनुक्रम

पहिला आहे. नंतर अनुक्रमें —(२) प्रकल्पांची अम्मलबजावणी करणाऱ्या विकास अधिकाऱ्यांचे शिक्षणवर्ग (३) जपान व अमेरिका येथें विकासकार्याचें तंत्र शिकण्यासाठीं दोन महिनेपर्यंत पाठविण्यांत यावयाच्या विकासअधिकाऱ्यांवर होणारा खर्च. (४) सहा शेतकी कॉलेजें निवडून त्यांतील शेती विभागाचा विकास करणें आणि तदनुषंगानें व्हावयाच्या कृषिविषयक तीन गोष्टी येतात. निधिरूप मदतीबरोबरच भारतसरकारच्या अन्नखात्यास एक शेतीतज्ज्ञ सल्लागार, नियोजन समितीस मदत करण्यासाठीं दोन समाजशास्त्रज्ञ चिकित्सक व समाज-विकास-योजना-क्षेत्रांतील गरजा लक्षांत घेऊन कोणत्या प्रकारचें वैद्यकीय शिक्षण द्यावयाचें, याचा सल्ला देणारा वैद्यक-शिक्षण-तज्ज्ञ मिळणार आहे. या तज्ज्ञांची भूमिका फक्त सल्लागारांचीच राहील.

## शेती, आरोग्य, शिक्षण व सामाजिक संघटन यांची वाढ हें उद्दिष्ट

भारतांतील एकूण १५ राज्यांत फोर्ड फाउंडेशनची मदत घेऊन प्रत्येकीं एक याप्रमाणें १५ अग्रगामी समाजविकास योजना सुरू झाल्या आहेत. या प्रत्येक योजनेंत २० ते ४० हजार क्षेत्रफळाखालील २०० खेडीं येतात. साधारणतः या क्षेत्रफळांतील वस्ती एकूण ५० हजार व्हावी. शिक्षण देऊन तयार केलेल्या ग्रामविकास कार्यकर्त्या-कडून या क्षेत्रांत शेती संशोधन, आरोग्य, शिक्षण व सामाजिक संघटना या विषयींचे नवे अनुभव खेडूतांना प्रात्यक्षिकांच्या द्वारें दाखविण्यांत येतात. सुधारलेल्या पद्धतींचा अवलंब करण्यासाठीं खेडूतांना मदत देण्यांत येते. या ज्ञानाचा परीघ वाढतां वाढतां सर्वच खेड्यांना तें मिळावें, अशी आज आकांक्षा आहे. मुख्य उद्दिष्ट अधिक धान्य उत्पादन हें असल्यामुळें या केंद्रांतील कार्यक्रमआंखणीचें व केंद्रांच्या कारभाराचें सर्व ओझें केंद्रीय शेतकीखात्याकडे आहे. राज्यांतर्गत शेतीखात्यानें या बाबतींत खेड्यांत सहकार्य द्यावयाचें आहे. पहिल्या दोन वर्षांचा सर्व खर्च फोर्ड फाउंडेशन करणार असून तिसऱ्या वर्षी तें अर्धा खर्च देणार आहे. त्यानंतर मात्र फाउंडेशन मुळींच आर्थिक मदत देणार नाहीं. भारतसरकार व संबंधित राज्यसरकार यांच्या विनंतीवरून अमेरिकन शेतीविकास तज्ज्ञ देण्यांत आले आहेत; पण त्यांची भूमिका फक्त सल्ला-गारांची आहे. मुंबई प्रांतांत आनंद येथें अशाप्रकारचें अग्रगामी समाजविकासयोजना-केंद्र आहे. तेथील कार्यपद्धतींत कांहीं थोडे फेरफार करून राज्यांतील इतर ठिकाणचीं, पंचवार्षिक योजनेच्या कार्यक्रमांतील समाजविकासयोजनाकेंद्रें वरील गांधीजयंतीच्या दिवशीं सुरू झालीं. अग्रगामी योजनेंत नलिकाकूप नाहींत. खेडीं फक्त १०० च आहेत. मुख्य विकासयोजनांत खेडीं ३०० आहेत. ट्रॅक्टर्स व इतर रासायनिक खतें वापरलीं जाणार आहेत.

खेडुतांची या नव्या उपक्रमाबद्दल व पद्धतीबद्दल जो खात्री पटवूं शकेल व जो त्यांना प्रोत्साहित करूं शकेल, तोच ग्रामविकास अधिकारी यशस्वी होईल. यासाठीं

आधीं त्याच्या शिक्षणाची तरतूद हवी. खेड्यांत काम करण्याची त्याची पात्रता हवी. त्याच्या अंगीं खेडुतांचा विश्वास संपादन करण्याची कला हवी. हें सर्व शिकविण्यासाठीं १९५२ च्या सुरवातीस भारतसरकारनें पांच शिक्षणकेंद्रें काढलीं. हीं केंद्रेंहि तीन वर्षे चालणार असून खर्च फोर्ड फाउंडेशन करणार आहे. शिक्षण देण्याची जबाबदारी केंद्रीय शेतकीखात्याकडे आहे.

अमेरिकेंतील याबाबतचा अनुभव शिक्षण घेणाऱ्यांना मिळावा म्हणून या क्षेत्रांतील कांहीं तज्ज्ञ फाउंडेशननें पुरविले आहेत. शिकाऊ लोकांना अनुभव मिळावा म्हणून विकास-योजना क्षेत्राच्या नजिकच अशीं शिक्षण-केंद्रें काढलीं आहेत. त्यामुळें प्रत्येक केंद्रास ५० शिकाऊ विद्यार्थी कामाला मिळतात. अभ्यासक्रम सहा महिन्यांचा असतो. कांहींजण नापास होतील, असें धरून चाललें तरी दर वर्षी शिक्षणकेंद्रांतून समाजविकास योजनांना ८० कार्यकर्ते मिळावयास हरकत नाहीं. या कार्यकर्त्यांच्या शिक्षणांत प्राधान्यानें शेतीशिक्षणावर भर देण्यांत येत असला, तरी आरोग्य, गांवांतील सांडपाणी वगैरे बाबींची सुधारणा, शिक्षण आणि ग्रामसंघटना आदि गोष्टी, अनुषंगानें तितकाच भर देऊन शिकविण्यांत येतात. समाजविकास–योजनांचें काम दरेक राज्यांत जसजसें वाढत जाईल, तसतशी योग्य प्रकारचे खेडूत कार्यकर्ते व खेडूत पर्यवेक्षक यांची वाणहि तीव्रतेनें भासूं लागेल. म्हणून अशींच आणखी २५ शिक्षण-केंद्रें सुरू करावींत, असा निर्णय भारत सरकारनें घेतला आहे. हीं केंद्रें लवकर सुरू व्हावींत म्हणून फाउंडेशननें भारतसरकारला जरूर तें द्रव्यबळ देऊं केलें आहे. त्यांतून शिक्षणाधिकाऱ्यांचे पगार, शिकाऊ लोकांना विद्यावेतन वगैरे देण्यांत येईल. या मदतीच्या अटी अशा आहेत कीं पहिलीं दोन वर्षे खर्चाचा सगळा भार फाउंडेशन उचलील; तिसऱ्या वर्षी निम्मा भार आणि चौथ्या वर्षी एकतृतीयांश बोजा फाउंडेशन उचलील. या केंद्रांतून एका वेळीं दोन वर्ग चालू राहातील. प्रत्येकांत ४० विद्यार्थी घेण्यांत येऊन पहिले चाळीस प्रत्यक्ष शेतावर आणि खेड्यांत काम करीत असतां दुसरे ४० वर्गांत पुस्तकी ज्ञान घेत रहातील. आलटून पालटून अनुभवाचें क्षेत्र बदलून पुस्तकी व प्रात्यक्षिक ज्ञानांत ही ८० कार्यकर्त्यांची तुकडी तयार करण्यांत येईल. कार्यक्रम तीन महिन्याचा असल्यामुळें कांहीं बाद विद्यार्थी जमेस धरून दर तिमाहीस ७० खेडूत कार्यकर्ते तयार होतील, अशी अपेक्षा आहे.

## इतर देशांतील अनुभव मिळण्याची व्यवस्था

इतर देशांत ग्रामविकासाचे कार्य कसें चालतें याचा अनुभव मिळाल्यास भारतांतील समाजविकास कार्यास फार मोलाचें मार्गदर्शन होईल. प्रत्येक राज्यांत नुकतीच जी विकास–दिग्दर्शकांची नेमणूक करण्यांत आली आहे व दिल्लीस जो केंद्रीय विकास कमिशनर भारत–सरकारनें नेमला आहे, त्या सर्वांना अमेरिका व जपान येथील

विकासकार्याचा अनुभव मिळवण्यासाठीं फाउंडेशनच्या खर्चानें दोन महिन्यापर्यंत दौऱ्यावर पाठविण्यांत येणार आहे. अमेरिकेंतील दौऱ्यांत त्यांना पुढील गोष्टी अगत्यपूर्वक दाखविण्यांत येतील. अमेरिकेंतील दक्षिणी व पश्चिमी संस्थानांतील बरीच शेती दाखविण्यांत येईल. शेतकऱ्यांशीं चर्चा करून प्रश्न विचारण्याची त्यांना संधि मिळेल. त्यांतून कोणती विकासपद्धति भारताला उपयोगी पडेल व फायदेशीर होईल, हेंहि त्यांना कळून येईल. जपानमधील या दिग्दर्शकांचा दौरा फारच कमी दिवसांचा आहे. तरी पण तेवढ्या अवधींत भारतीय परिस्थितीशीं सदृश अशा परिस्थितींत शेतीविकासाचें जें कार्य झालें आहे, तें पहाण्यास मिळेल. भारतांत ग्रामीण विकास होण्यामागची मुख्य अडचण तो करण्याची पात्रता असलेले व खेडूतांना शिकवूं शकतील असे लोक कमी आहेत, ही आहे. विशेषतः खेड्यांतील घरबांधणी व आरोग्य या बाबतींत तांत्रिक ज्ञान असलेले लोक फारच थोडे आहेत, कॉलेजांतून पुरेसे तज्ज्ञ बाहेर पडत नाहींत व जे पडतात त्यांची पात्रता प्रत्यक्ष शेतांत काम करण्यापेक्षां शहरांत काम करण्याचीच असते. शेतकी कॉलेजें शेती तज्ज्ञ काढण्यास अपात्र आहेत असें नाहीं, पण ग्रामविकास कार्यांत तज्ज्ञ असणारी मंडळी तयार करण्याची त्या कॉलेजांतून व्यवस्थाच नाहीं. यावर उपाय म्हणून भारतांतील सहा प्रमुख शेतकी कॉलेजांत विकासकार्याची एकेक शाखा सुरू करावी, असें फाउंडेशननें सुचविलें असून त्यासाठीं निधिची तरतूद केली आहे. मुंबई राज्यांतील पुण्यांतील शेतकी कॉलेजांत अशी शाखा उघडण्यांत आली आहे.

वरील माहितीवरून ही राष्ट्रव्यापी समाजविकास-योजना यशस्वी झाल्यास भारतांत विशेषतः भारतांतील खेड्यांत मोठी क्रांति घडून येईल, असें वाटतें.

## डेन्मार्कमधील लोकशाळा

शेती आणि शेतकरी यांची सुधारणा करण्याच्या दृष्टीनें डेन्मार्कमधील लोकशाळांचें उदाहरण अनुकरण करण्यासारखें आहे. या शाळा गेल्या शंभर वर्षांपेक्षां अधिक काळ तेथें लोकशिक्षणाचें कार्य करीत आहेत आणि डेन्मार्कसारखा लहान आणि शेतीप्रधान देश जो आज एवढ्या भरभराटीच्या स्थितीला पोंचला आहे त्याचें बरेंचसें श्रेय या शाळांना आहे असें तेथील लोक मोठ्या अभिमानानें सांगतात. खेड्यांतील अगदीं साध्यासुध्या शेतकऱ्याला हें शिक्षण सहज घेतां येईल, त्याच्या परिस्थितीला तें जमेल, त्याच्या सर्वांगीण विकासाला साहाय्यभूत होईल, अशा रीतीनें देण्यांत येत असल्यामुळें शिक्षणाच्या अन्य मार्गापेक्षां तें अधिक यशस्वी झालें आहे. या शाळांचा मुख्य हेतु शेतकऱ्याला अधिक ज्ञान मिळावें हा तर असतोच; पण त्या शिवाय तो चारित्र्यसंपन्न नागरिक व्हावा व त्याची सांस्कृतिक सुधारणा व्हावी हा असतो.

स. १९४९ मध्यें लेखकाला युरोपला भेट देण्याचा योग आला. त्यावेळीं डेनमार्कलाहि त्यानें धांवती भेट दिली. त्यावेळीं लोकशाळेचा अत्यंत अभिमान असणाऱ्या एका प्राथमिक शाळेंतल्या शिक्षकानें आपल्या स्वतःच्या मोटारमधून अशी एक शाळा ता. १२ नोव्हेंबर १९४९ रोजीं लेखकाला दाखविली व तिचें कार्य प्रत्यक्ष पाहाण्याचा सुयोग आला. कोपनहेगनपासून पन्नास साठ मैल दूर असलेल्या एका खेड्यांत ती शाळा होती.

वाटेंत एकंदर देखावा सुंदर होता. प्रथम कांहीं वेळ आम्ही समुद्र किनाऱ्यानें गेलों, पुढें आम्हाला गर्द झाडी लागली, लहानलहान शहरें लागलीं, खेडीं लागलीं, त्यांत लहानलहान सुंदर घरें, जागोजाग शेतें, घोडे, गाई, डुकरें, कोंबड्या, बदकें, भाजीपाला, पाहावें तिकडे सारें हिरवेंगार. हें सृष्टिसौंदर्य पाहून मनाला अत्यंत आनंद वाटला. शिवाय माझा सोबती वाटेंत जें जें काय दिसेल, त्याची मला माहिती देत होता. त्यानें बऱ्याच वर्षांपूर्वीं ही शाळा एकदां पाहिली होती, पण तो आतां रस्ता विसरला होता. म्हणून चौकशी करीत करीत, साडेसहाच्या सुमारास आम्ही या शाळेंत येऊन पोंचलों. तिन्हीसांजांची वेळ होती. शाळेचें विस्तीर्ण परसू होतें. त्यांत बऱ्याच गाई दिसत होत्या. दारांत एक भलामोठा केसाळ कुत्रा होता. शाळेची इमारत अगदीं जुनी, सामान्य होती. मुख्य दरवाजा शोधून काढून शाळेचे प्रिन्सिपल सी. पी. ओ. ख्रिश्चनसेन यांना भेटलों. सदर गृहस्थ अगदीं उमदा गडी होता. त्यानें मुलांची खाण्याची, झोंपण्याची, व्यायामाची सारी व्यवस्था दाखविली आणि शेवटीं मुलें बसलीं होती, त्या खोलींत नेलें. समोरच लोकशाळेच्या चळवळीचा आद्य पुढारी ग्रंडविग याची तसबीर लावलेली होती. दुसऱ्या दिवशीं रविवार असल्यामुळें मुलांना सहलीला जावयाचें होतें. तिचा कार्यक्रम शिक्षक त्यांना समजावून देत होता. मुलगे व मुली एकत्रच बसलीं होतीं. त्यांत १२५ मुलगे व ३५ मुली अशीं एकशें साठ मुलें होतीं. तीं तारुण्यानें मुसमुसलेलीं, तरुणबांड, धिप्पाड आंगलट असलेलीं, सुदृढ मुलें पाहून लेखकाच्या मनांत विचार आला कीं, जेथें असे सर्वतोपरी सुखी, मेहनती आणि राष्ट्राभिमानी शेतकरी आहेत, त्या राष्ट्राची उन्नति झाली नाहीं, तरच आश्चर्य! हीं सारीं मुलें जवळपासचींच होतीं असें नाहीं; तर डेनमार्कच्या दूरदूरच्या प्रदेशांतलीहि मुलें त्यांत पुष्कळ होतीं.

## लोकशाळांचा जगप्रसिद्ध जनक ग्रंडविग

डेनमार्कमधील जगप्रसिद्ध लोकशाळांचा जनक बिशप निकोलाय फेडरिक सवेरिन ग्रंडविग हा सन १७८३ मध्यें जन्मला आणि ८९ वर्षांचा होऊन सन १८७२ सालीं वारला. ग्रंडविग एक उत्तम कवि होता. पण नुसत्या कविता करून त्याचें समाधान होईना. त्याला उदंड आयुष्य लाभलें. ह्यांत त्यानें धर्मोपदेशक, इतिहासकार राजकारणी आणि एक लोकप्रिय शिक्षक अशा निरनिराळ्या स्वरूपाची अत्यंत

महत्त्वाची कामगिरी बजावली. शिक्षणाच्या बाबतींत लोकशाळांचा संस्थापक म्हणून त्यानें एवढें मोठें कार्य केलें कीं गेलीं शंभर वर्षें डेनमार्कमधील लोकशाळा 'ग्रंडविग्स फोक हायस्कूल्स' म्हणूनच ओळखल्या जात आहेत. या शाळांची मूळ कल्पना त्याच्याच डोक्यांत आली आणि तिला मूर्त स्वरूपहि त्यानेंच दिलें. विद्यार्थ्याला सर्वतोपरी सोईचें आणि त्याच्या नैसर्गिक कर्तृत्वशक्तीला चालना देईल, असें शिक्षण मिळालें पाहिजे, असें त्याचें मत होतें. या लोकशाळा निघण्यापूर्वीं त्याच्यासंबंधीची कल्पना त्यानें आपल्या एका व्याख्यानांत विशद केली, ती अशी कीं, "शक्यतितक्या लवकर पण उद्यां नव्हे; आजच, एक लोकशाळा निघाली पाहिजे. तींत राष्ट्रांतील कोणाहि तरुणाला प्रवेश मिळूं शकला पाहिजे. सारें शिक्षण अर्थातच मुलांच्या मातृभाषेंत मिळालें पाहिजे आणि तिचें साधें पण महत्त्वाचें कार्य हें असलें पाहिजे कीं लोकांचा स्वभाव, त्यांचा मायदेश आणि त्यांची राज्यघटना, त्यांत उपलब्ध असलेलीं उत्पन्नाचीं आणि इतर साधनें आणि त्याच्या खऱ्या गरजा यांची, त्यांचें हित होईल अशा रीतीनें जाणीव करून देणें." ग्रंडविगचें म्हणणें असें होतें कीं, लोकांचें मन आणि लोकांच्या भावना आपल्याकडे आकर्षित करून घ्यावयाच्या असल्यास त्या फक्त बोलण्यानेंच, जिवंत शब्दांनींच करितां येतात.

## पहिली लोकशाळा

कोपनहेगनमधील देशाभिमानी लोकांकडून पैसे गोळा करून रेडिंगजवळ एक शेत विकत घेण्यांत आलें आणि तेथें ता. ७ नोव्हेंबर १८४४ रोजीं पहिली लोकशाळा उघडून ग्रंडविगच्या कल्पनेला मूर्त स्वरूप देण्यांत आलें. पण या आणि यानंतर निघालेल्या लोकशाळांत पुष्कळ महत्त्वाचे फरक पडत गेले. या शाळेंत येणारे पुष्कळ विद्यार्थी श्रीमंत शेतकऱ्यांची मुलें होतीं. तसेंच या शाळेंत जाणें बरेंच खर्चाचें होतें. या विद्यार्थ्यांकरितां सुखसोई पण तशाच चांगल्या करण्यांत आल्या होत्या. त्यांच्या खोल्या ऊबदार रहाण्याची व्यवस्था करण्यांत आली होती. आणि त्यांचे बूटहि स्वच्छ करण्याकरितां नोकर ठेवलेले होते. शाळेंत शिकवितांना प्रत्यक्ष दाखवितां याव्यात म्हणून पौराणिक वस्तू ठेवण्यांत आल्या होत्या. मुलांच्या परीक्षा घेण्यांत येत नव्हत्या. पण त्यांना खरी ज्ञानप्राप्ति व्हावी म्हणून कसून प्रयत्न करण्यांत येत होता. शिक्षणक्रमांत जमिनीची मोजणी, वनस्पतिशास्त्र आणि शेती या विषयांचा अंतर्भाव करण्यांत आला होता. कांहीं हुशार मुलांनीं स्कॉटलंडमध्यें जाऊन तेथील शेतांत आपला प्रात्यक्षिक अभ्यास चालू ठेवावा अशीहि योजना होती. पुढें युद्धामुळें ही शाळा तात्पुरती बंद करण्यांत आली. ती पुढें सहा वर्षांनीं पुनः उघडण्यांत आली.

यानंतर शैक्षणिक बाबतींत अनेक नव्या कल्पना डोक्यांत असलेले परिणामकारक रीतीनें शिकविणारे आणि स्वतंत्र विचाराचे शिक्षक चळवळीला येऊन मिळाले.

यांत ख्रिस्टन कोल्ड हा एक शिक्षक होता. तो एक चांभाराचा मुलगा होता. पण त्यानें शिकवावें कसें याचें शिक्षण घेतलें होतें. तो श्रीमंत शेतकऱ्याच्या मुलांच्या खाजगी शिकवण्या करून पोट भरीत असे. त्याचा असा अनुभव होता कीं, ज्या मुलांना पाठांतर होत नाहीं, त्यांना तेच विषय वर्णन आणि संभाषण रूपानें शिकविल्यास त्या मानानें त्यांच्या चटकन् लक्षांत राहतात. पण शिक्षणखात्याचे अधिकारी याच्या अगदीं उलट होते. शाळेंत लावलेलीं पुस्तकें मुलांनीं तोंडपाठच केलीं पाहिजेत, असा त्यांचा हुकूम होता. या परिस्थितीला कंटाळून त्यानें कांहीं काळ शिक्षकाचा धंदाही सोडून दिला होता. पण कर्मधर्मसंयोगानें त्याची आणि ग्रंडविगची भेट होतांच त्या दोघांची मैत्री जमली. ती आमरण कायम टिकली. कोल्ड लोकशाळांच्या चळवळींत धडाडीनें शिरला आणि तींत त्यानें मोठी क्रांति घडवून आणली.

सन १८५० मध्यें फुनेन बेटांत रिसलींज येथें कोल्डनें एक हायस्कूल काढण्याचें ठरविलें. वर उल्लेख केलेल्या रेडींग येथील शाळेंतलें शिक्षण फार खर्चाचें झालें होतें. त्यामुळें अशा शाळेची गरजच होती. रेडिंग येथील इमारत फार मोठी अणि बरेच पैसे खर्च करून बांधलेली होती, पण येथें लहानशी जमीन घेऊन तिच्यावर ४५ फूट लांब व २५ फूट रुंद अशी एक आटोपशीर इमारत बांधण्यांत आली. तींतच मुलांना शिकविण्याचे वर्ग शिक्षक आणि त्याचें कुटुंब आणि मुलें यांच्या राहाण्याचीही सोय करण्यांत आली. तेथील रहाणी अगदीं काटकसरीची करण्यांत आली. मुलांची फी रेडींग येथील शाळेंत होती, तिचा अल्पांश घेण्यांत येऊं लागली. हिवाळ्यांतील पांच महिन्यापुरतें वीसवीस मुलांचे दोन वर्ग चालवावे असें ठरलें. दोन शिक्षकांनीं जगाचा इतिहास, बायबल, चर्चचा इतिहास, पौराणिक काळांतील गोष्टी, डेनमार्कचा इतिहास आणि डेनमार्कचें वाङ्मय हे विषय शिकवावयाचे आणि शालेय शिक्षण देतांना तें प्राथमिक शाळांत देतात, तसेंच न देतां मुलाच्या दररोजच्या व्यवहाराला उपयोगी पडेल, या दृष्टीनें द्यावें असें ठरलें.

## शिक्षणखात्याचा विरोध

पण शिक्षणाच्या बाबतींतील ही नवी योजना शिक्षणखात्याला रुचली नाहीं. ती पाहून त्याच्या अंगाची आग झाली. ही शेतकऱ्यांच्या तरुण मुलांची स्वाभाविक आणि हितकर वाढ व्हावयास उपयोगी पडावयाची नाहीं, असें त्याचें मत पडलें. पण शिक्षणाच्या बाबतींत शिक्षणखातें कसें नाहक अडथळे आणतें, याचा अनुभव कोल्डला पूर्वीच आलेला असल्यामुळें त्यानें शिक्षणखात्याच्या रागाला न जुमानतां आपलें कार्य पुढें चालू केलें. अगदीं तरुण अशा दहा मुलांना घेऊन कोल्डनें शाळेची सुरवात केली. पण हीं सारींच मुलें शेतकऱ्यांचीं नव्हती. शिकविण्याचीं साधनेंहि पुरेशीं

नव्हतीं. पण सर्वांगीण शिक्षण द्यावें हा मुळीं या चळवळीचा हेतूच नव्हता. ख्रिस्ती धर्मतत्त्वाप्रमाणें जीवन जगण्याची इच्छा त्यांच्यांत उत्पन्न करून त्याप्रमाणें प्रत्यक्ष कृति करावयास त्यांस लावावें, हा या प्रयत्नांच्या मुळाशीं हेतु होता. पुढें तीन वर्षांनीं कोल्डनें ही शाळा येथून हालवून दुसरीकडे नेली. या तीन वर्षांच्या अवधींत त्याला असा अनुभव आला कीं, लहान मुलांपेक्षां अठरा वर्षांवरील शेतांत काम करणाऱ्या तरुण शेतकरी मुलांचीच आपल्या प्रयत्नानें अधिक लवकर प्रगति होते. तो क्वचितच कांहीं वाचीत असे आणि शिकवितांनासुद्धां काय शिकवावयाचें, तें आगाऊ ठरवून पद्धतशीर रीतीनें, असें बहुशः कधीं शिकवीत नसे. पण दररोजच्या व्यवहारांतील लहान सहान गोष्टींचीं उदाहरणें देऊन ऐतिहासिक, धार्मिक आणि नैतिक विषय खुलविण्याची व मुलांच्या मनावर ठसतील, अशा रीतीनें शिकविण्याची त्याची अशी कांहीं विलक्षण हातोटी होती कीं, ती त्याच्याइतकी या चळवळींतील दुसऱ्या कोणाहि शिक्षकाला साधत नसे. तो शिकवितांना प्रत्यहीं घडणाऱ्या गोष्टींची उदाहरणें पटापट देई आणि त्यामुळें एखादा कठीण प्रश्नहि मुलांना चटकन् कळे. तो शिकवितांना मुलांचें लक्ष आपल्याकडे असें वेधून घेई कीं जणुं त्याची मूर्ति त्यांच्या अंतःकरणांत प्रवेश करून त्याचें साधें भाषण श्रोत्यांच्या अगदीं हृदयाला जाऊन भिडत आहे. तो पाठांतराच्या अगदीं विरुद्ध असला तरी त्याच त्या गोष्टी पुनः पुनः सांगत असल्यामुळें मुलांच्या चांगल्या लक्षांत रहात. आपल्या भाषणांतल्या बारीक सारीक गोष्टी तो इतक्या निश्चयपूर्वक आणि स्पष्ट सांगे कीं, त्यामुळें त्याच्या व्यक्तित्वाची श्रोत्यांवर छाप बसे. त्याची उभें राहाण्याचीहि अशी कांहीं ढब होती कीं त्यामुळेंहि त्याचें मुलांवर वजन पडे.

या काळांत या शाळा प्रयोगावस्थेंतच होत्या आणि कोणत्याही गोष्टींत त्यांचें परस्परांत साम्य नव्हतें. या शाळा चालविण्याचा हेतूविषयीं आणि योग्यतेविषयीं अज्ञान असल्यामुळें शिक्षणखात्याच्या अधिकाऱ्यांशीं यांचे नेहमीं खटके उडत आणि ते यांच्या कार्यांत शक्यतों अडथळे उत्पन्न करण्याचे प्रयत्न करीत. त्यांना अशी भीति वाटे कीं अशारीतीनें या शाळांना स्वातंत्र्य दिल्यास आपला मान कमी होईल. कधीं कधीं हे अडथळे वाईट थराला जाऊन पोंचत. कोल्डसारखा परीक्षा घेण्याच्या अगदीं विरुद्ध असलेला आणि निश्चयी मनुष्य पण त्यालाहि त्यांनीं एका वर्षीं परीक्षा घेण्यास भाग पाडलें. पण मौज ही कीं, या सरकारी अधिकाऱ्यांच्या लुडबुडीमुळें ही चळवळ थांबण्याऐवजीं ती अधिकच बळावली. या चळवळीच्या मागें अशीं निस्वार्थी, देशाभिमानी आणि शेतकऱ्याचें खरें हित पाहाणारीं माणसें होतीं आणि त्यांचा हेतु इतका शुद्ध होता कीं, कोणत्याहि प्रयत्नांनीं ती दडपून टाकणें शक्य नव्हतें. उत्साही आणि धाडशी तरुण या चळवळीला येऊन मिळूं लागले. ते परस्परांना साहाय्य आणि धीर देऊं लागले आणि विद्यार्थ्यांची आणि शाळांची संख्या भराभर वाढूं लागली.

हळूहळू या शाळेचें कार्य एका पातळीवर येऊं लागलें आणि सन १८७० पासून तरुणांकरितां हिंवाळ्याच्या, नोव्हेंबर ते मार्च पांच महिन्यांचा आणि तरुणींकरितां मे ते जुलै तीन महिन्यांचा अभ्यासक्रम, सगळ्या शाळांतून सारखा सुरू करण्यांत आला. या सुमाराला या शाळांतील एकंदर मुलांपैकीं शेंकडा तीन इतक्या स्त्रिया होत्या. बहुतेक मुलें शेतकऱ्यांचीं आणि खेड्यांतील कामगारांचीं आणि फारच थोडीं शहरांतील होतीं. यांतल्या कांहीं शाळा लहान होत्या आणि कांहीं मोठ्या होत्या. कांहीं शेतांत झोपड्यावजा घरांत होत्या. तर कांहीं किल्ल्यांत किंवा मठांत होत्या. हें जसें त्यांच्या बाह्य स्वरूपांत वैचित्र्य होतें, त्याचप्रमाणें त्यांतील मुलांना येणारा खर्च, त्यांचें शिक्षण आणि त्यांतील तरुण विद्यार्थ्यांच्या ग्रहणशक्तीवर वजन पाडण्याची कुवत यांच्यांतहि विविधता होती.

## विद्यार्थी आपापल्या खेड्यांत शिक्षण-प्रसार करतात

या शाळांतून आपला अभ्यासक्रम संपवून मुलें गेलीं कीं जीं शाळेच्या जवळपास रहात असतील, तीं शाळेंतच आपले नानाविध कार्यक्रम पुढें चालू ठेवीत. दूर रहाणाऱ्यांपैकीं कांहीं आपल्या शेतांतील माळांवर कांहीं कार्य करीत, कांहीं खेड्यांत गांवकरी एकत्र जमवून सर्व प्रकारचीं कामें करितां येतील, असें एखादें सार्वजनिक गृह बांधून त्यांत धार्मिक, राजकीय, शेतीविषयक, शारीरिक आणि करमणुकीचे असे विविध कार्यक्रम करीत. तथापि त्यांत या मुलांना या शाळांत ज्या प्रकारचें शिक्षण मिळालें असेल तशा प्रकारचे कार्यक्रम म्हणजे व्याख्यानें, वादविवाद, सार्वजनिक वाचन, गाणें, लोकनृत्य आणि व्यायामविषयक कार्यक्रम, हेच मुख्यतः असत. या शाळांमध्यें लहान लहान अभ्यासमंडळें स्थापन करण्यांत येत. यांत एक मुलांचा लहानसा गट एखाद्या विषयाची निवड करून त्यासंबंधीं माहिती मिळविण्याकरितां एकत्र जमे, त्या विषयावरील पुस्तकें गोळा करी. शिक्षक त्यांचें मार्गदर्शन करीत आणि मग त्यावर वादविवाद होत. याचा एक विशेष फायदा हा असे कीं, हीं मुलें परत आपल्या गांवीं गेलीं कीं, तीं तेथें अशीं अभ्यासमंडळें स्थापन करीत.आज मितीलाहि अशीं निरनिराळ्या विषयावर चालविलेलीं कैक मंडळें साऱ्या देशभर अस्तित्वांत आहेत हीं मुलें परत आपल्या गांवीं जाऊन आपल्या खेड्यांची व त्याच्या आसपासच्या भागाची सुधारणा करण्याबाबत प्रयत्न करीत असलीं तरी त्यांना अशा रीतीनें कार्यक्रम करण्यास ज्यांनीं मुळांत शिक्षण दिलें, त्या त्यांच्या शिक्षकांना आणि शाळांना तीं कधीं विसरत नाहींत. त्यांच्या व त्यांच्या शिक्षकांच्या नेहमीं गाठीभेटी होत असतात. इतकेंच नव्हे तर शाळेच्या ज्या ज्या अडचणी असतील किंवा शाळेला ज्या गोष्टींची आवश्यकता असेल त्या पुरविण्याच्या कामींहि हे माजी विद्यार्थी आपुलकीनें मदत करितात. मी पाहिलेल्या, वर उल्लेख केलेल्या लोकशाळेंत माजी विद्यार्थ्यांच्या प्रयत्नानें एक वाचनालय अस्तित्वांत आलें होतें व त्याला वेळोवेळीं नवीन पुस्तकेंहि

त्यांच्याकडून मिळत होतीं. अशा रीतीनें ग्रंडविग लोकशाळांतील शिक्षणाचा, शाळा, चर्च, घर आणि खेड्यांतील सार्वजनिक गृह या चार ठिकाणांतून प्रसार होतो.

सन १८९१ सालीं या शाळांचा एक संघ स्थापन करण्यांत आला. त्यामुळें या शाळांतल्या बऱ्याच गोष्टी नियंत्रित करण्यांत आल्या. बहुतेक शाळांची फी सारखी करण्यांत आली. आणि विद्यार्थ्यांच्या खाण्यारहाण्याचा खर्चहि कमी करण्यांत आला. या शाळांतून म्हटल्या जाणाऱ्या गाण्यांचें एक पुस्तक छापण्यांत आलें. या संघाच्या प्रयत्नामुळें या शाळांतील शिक्षकांचा प्रवास-खर्च आणि तरुण शिक्षकांच्या पुढील शिक्षणाकरितां काढण्यांत आलेले वर्ग, यांच्यासाठीं सरकारी मदत मिळूं लागली.

हल्लीं या शाळांतील विद्यार्थ्यांपैकीं शेंकडा ऐशीं ते नव्वद विद्यार्थी १८ ते २५ वर्षें वयाचे असतात. आणि मुली सामान्यतः मुलांपेक्षां थोड्या लहान असतात. मी पाहिलेल्या शाळेंत तीस वर्षांचेहि विद्यार्थी होते, गेल्या पन्नाससाठ वर्षांत साधारणपणें शेतकऱ्यांच्या मुलांइतक्याच शेतकऱ्यांच्या मुलीहि या शाळांत येऊं लागल्या आहेत. याचें कारण असें आहे कीं दुसऱ्या प्रकारच्या शाळांत गेल्यानें शेतकऱ्यांच्या मुलांचा जसा फायदा होतो तसा मुलींचा होत नाहीं. उदाहरणार्थ शेतीचें शिक्षण देणाऱ्या शाळांत मुलांच्या मानानें मुली अगोदरच कमी असतात. तसेंच इतर शाळांच्या मानानें या शाळांत राहाण्याजेवण्याचा खर्च फार कमी असतो आणि अगदीं कमी उत्पन्न असलेल्या शेतकऱ्याच्या मुलाला सरकारकडून मदत मिळते. सन १८९२ ते १९३५ या दरम्यान या शाळांत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांपैकीं एक तृतीयांश मुलांना अशा प्रकारें सरकारकडून पैशाचें सहाय्य मिळे. पुढें तर ही संख्या शेंकडा ५७ पर्यंत वाढविण्यांत आली. आतां विद्यार्थ्याला त्याच्या खर्चाचा २५ ते ८० टक्के खर्च सरकार देतें. हा खर्च कमीजास्त मिळणें मुलाच्या व त्याच्या पालकाच्या सांपत्तिक परिस्थितीवर अवलंबून असतो. या शाळांची फीसुद्धां राहणीच्या मानाप्रमाणें कमीजास्त होते. ती दरमहा सुमारें शंभर सवाशें रुपये असते आणि तींत त्याचें शिक्षण, राहाणें व जेवणें या साऱ्या गोष्टींचा समावेश होतो. याशिवाय कैक विद्यार्थ्यांना कामगारखात्याकडूनहि पैशाची मदत मिळते. याचा परिणाम असा झाला आहे कीं या शाळांतील लहान शेतकऱ्यांच्या मुलांचें प्रमाण पूर्वीं शेंकडा वीस होतें, तें आतां शेंकडा चाळीस झालें आहे.

## निरपेक्ष बुद्धीनें काम करण्याची हौस असलेले शिक्षक

या शाळांत शिकविणाऱ्या शिक्षकांचा दर्जाहि वाढत आहे. त्यांच्यापैकीं शेंकडा वीस स्त्रिया आहेत. पण त्या मुख्यतः उन्हाळ्यांत चालणाऱ्या तीन महिन्यांच्या मुलींच्या वर्गांत शिकवितात. यांतील शिक्षकांचे दोन प्रकार आहेत. एक शाळेंतले कायमचे शिक्षक आणि दुसरे बाहेरचे स्थानिक शाळांतले शिक्षक किंवा चर्चमधले पाद्री. हे बाहेरचे शिक्षक आठवड्यांतून एकदां किंवा दोनदांच शिकवितात. दुसरे शिक्षक

कायम असले तरी त्यांच्या या शाळेंतून त्या शाळेंत, नेहमीं बदल्या होतात, बाहेरच्या शिक्षकांच्या अशा फारशा बदल्या होत नसल्यामुळें त्यांचा संबंध शाळेशीं बरेच दिवस राहातो. आणि शिक्षक किंवा विद्यार्थी यांच्यापैकीं कोणाच्याहि दृष्टीनें विचार केला तरी निरपेक्षबुद्धीनें काम करण्याची हौस हीच शैक्षणिक संस्थाबद्दल प्रेरणा उत्पन्न करणारी शक्ति असते. त्यामुळेंच या चळवळीच्या आरंभापासून आजतागायत या हायस्कूलांतील पुष्कळ शिक्षकांनीं आपल्या शैक्षणिक पूर्वतयारीकडे तुलनात्मक दृष्ट्या फार थोडें लक्ष दिलेलें असतें. शिक्षकांची शैक्षणिक लायकी वाढविण्याचे प्रयत्न होत असले, तरी एकंदर शिक्षकांपैकीं एक अष्टमांश शिक्षक कोणत्याहि प्रकारची शैक्षणिक मान्यता नसलेले असतात. या शाळांत इतर शाळांच्या मानानें तरुण शिक्षकांची संख्या अधिक असते, पुरुष शिक्षकांपैकीं शेंकडा २६ आणि स्त्री शिक्षकांपैकीं शेंकडा ३६ शिक्षकांची तिशीहि उलटलेली नसते. त्याचप्रमाणें इतर शाळांपेक्षां येथील शिक्षकांना पगारहि फार कमी मिळतो. त्यामुळें तेथें कायम राहाणाऱ्या शिक्षकांची संख्या कमी असते. तथापि या बाबतींतसुद्धां आतां बरीच सुधारणा झाली आहे.

या शाळांत गाण्याला फार महत्त्वाचें स्थान देण्यांत येतें. एक समाजाविषयीं गाणें असतें. तें सकाळीं उठल्याबरोबर, रात्रीं झोंपीं जातांना आणि प्रत्येक व्याख्यानाच्या आरंभीं म्हणण्यांत येतें. त्याचप्रमाणें येथें व्यायाम घेण्याची सोय केलेली असते, भरतकामाचे वर्ग घेण्यांत येतात. त्यांत जुन्या काळची कला, रीतीरिवाज, राहणी, समजुती, परंपरा वगैरे प्राचीन विषय व त्यांचें आजचें स्वरूप यांची माहिती देण्यांत येते. या शाळांत देण्यांत येणारें शिक्षण दिवसेंदिवस सर्वांगीण करण्याचा प्रयत्न चालू आहे. त्यांत नवा उत्साह येऊन विविधता आणण्याचे तसेंच शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यांत अधिकाधिक सहकार्य उत्पन्न होईल असे प्रयत्न करण्यांत येत आहेत. आणि या साऱ्या खटपटीचा हेतु शेतकऱ्याला अधिक ज्ञान मिळावें हा तर आहेच; पण त्याशिवाय तो चारित्र्यसंपन्न व्हावा व त्याची सांस्कृतिक सुधारणाहि व्हावी हा आहे.

## साध्यासुध्या शेतकऱ्याला सोईस्कर असें शिक्षण

खेड्यांतील अगदीं साध्यासुध्या शेतकऱ्याला हें शिक्षण सहज घेतां येईल. त्याच्या परिस्थितीला तें जुळेल, त्याला तें पटेल आणि त्याच्या सुधारणेला साह्यभूत होईल अशा रीतीनें देण्यांत येत असल्यामुळें शिक्षणाच्या अन्य मार्गापेक्षां तें अधिक यशस्वी झालें आहे. त्याला यांत्रिक शिक्षणाचें किंवा केवळ शेती शिक्षणाचें स्वरूप येऊं नये म्हणून अगदीं आरंभापासून काळजी घेण्यांत आली. डेन्मार्कमध्यें शेती, औद्योगिक आणि यांत्रिक शिक्षण देणाऱ्या वेगळ्या शाळा आहेत. आणि त्या आपल्या परीनें महत्त्वाचें कार्य करीत आहेत. तसेंच अगदीं घरगुती वातावरण हें या लोकशाळांचें ठळक वैशिष्ट्य

आहे. या शाळांतील शिक्षकांची राहाण्याजेवण्याची येथेंच व्यवस्था करण्यांत येते. निम्म्यापेक्षां अधिक शाळांत मुख्य शिक्षकांची बायकोहि शिकविते. आणि शाळेंतील मुलें व मुख्य शिक्षकांचें कुटुंब एकत्र बसून जेवतात.

गेल्या महायुद्धांत, सन १९३९ ते १९४५, जेव्हां जर्मन सैन्यानें डेन्मार्क देश आपल्या ताब्यांत घेतला, तेव्हां या शाळांची मोठी कठीण स्थिति आली होती. लोकांना अनेक तऱ्हेनें हाल अपेष्टा सोसाव्या लागल्या. कैक शिक्षकांना कारागृहांत वास करावा लागला. तेव्हां या शाळांतील शिक्षक व विद्यार्थी यांनींच परसत्तेला खरा प्रतिकार केला. तथापि ज्याप्रमाणें सर्व चळवळींना चढता पडता काळ येतो त्याप्रमाणें या चळवळीलासुद्धां बऱ्यावाईट परिस्थितींतून जावें लागलें. सन १८४४ मध्यें पहिलें फोक हायस्कूल स्थापन झालें. त्यानंतर या शाळांची संख्या १६० पर्यंत वाढत गेली. पण त्यापैकीं वेळोवेळीं आलेल्या संकटांमुळें १०० शाळांचें आयुष्य संपुष्टांत आलें. कैक शाळा उघडण्यांत आल्या आणि कैक शाळा बंद झाल्या. या चळवळीच्या भरभराटीच्या काळांत म्हणजे १८६२ ते १८८१ पर्यंत ७६ नव्या शाळा उघडण्यांत आल्या; पण पुढें लढाईमुळें उत्पन्न झालेली अस्थिरता व सांपत्तिक मंदी यामुळें बऱ्याच शाळा बंद झाल्या. आतां सुमारें साठ शाळा अस्तित्वांत असून त्यापैकीं निम्म्या साठ वर्षें किंवा त्यापेक्षां जुन्या आहेत. वैद्यकीय शाळांच्या बाबतींतहि असेच चलतीमंदीचे दिवस येतात आणि त्यांच्यावरून एक गोष्ट स्पष्ट होते कीं इतर प्रकारच्या शाळांपेक्षां या शाळांचें यशापयश त्यांच्या वैयक्तिक पुढाऱ्यांचें व्यक्तित्व आणि जनतेनें स्वयंस्फूर्तीनें दिलेलें साहाय्य यांच्यावर अवलंबून असतें. संस्था कोणा व्यक्तीच्या व्यक्तित्वावर अवलंबून नसणें किंवा वारंवार बदल न करणें या ज्या इतर शाळांच्या बाबतींतल्या दोन महत्त्वाच्या गोष्टी त्यांना या शाळेंत फारसें महत्त्व नसतें. सद्यःस्थितींत शेतकऱ्यांना या शाळांचा जास्तींत जास्त कसा उपयोग करून घेतां येईल, याच गोष्टीकडे मुख्यतः अधिक लक्ष देण्यांत येत असल्यामुळें स्वाभाविकच त्यांच्या टिकाऊपणाकडे दुर्लक्ष होतें. या साऱ्या शाळा खाजगी रीतीनेंच चालविण्यांत येतात.

मागसलेपणा, शैथिल्य, निरुत्साह या रोगांनीं आपल्याकडे खेड्यांतील जनता आज ग्रासलेली आहे. हे रोग नाहींसे करून आशा, उत्साह आणि आनंद त्यांच्यांत उत्पन्न करणें हें नवसमाज निर्मितीला अत्यंत आवश्यक आहे. पोटभर अन्न मिळूं लागलें किंवा शरीराच्या प्राथमिक गरजा भागूं लागल्या तरी तेवढें माणसाला पुरेसें नसतें. आपल्याला महत्त्व आहे, समाजाला आपली जरूरी आहे, समाजाचा एक उपयोगी घटक आपण आहोंत असें त्याला वाटलें तर त्याची आणि त्यांच्याबरोबर समाजाची प्रगति होते. तें कार्य वरीलसारख्या लोकशाळा करूं शकतील.

# खेड्यांतील आरोग्य

भारतांत जमीन विपुल आहे, हवाहि उत्तम आहे आणि बाराहि महिने सूर्यदर्शन होत असतें. त्यामुळें खेड्यांतील आरोग्य उत्तम राहणें फारसें कठीण पडूं नये. शिवाय कोणत्याहि प्रकारें प्रयत्न केल्याशिवाय वरील कारणांमुळें आरोग्य आपोआप पुष्कळ सुधारतें. परंतु एकंदरींत आरोग्यदृष्ट्या आपल्याकडील खेड्यांची स्थिति अत्यंत वाईट आहे. कोणत्याहि ठिकाणचें आरोग्य बिघडण्यास मुख्यतः दोन गोष्टी कारणीभूत होतात, त्या म्हणजे हवा आणि पाणी या होत. मनुष्याचा जीव जगण्याला प्रथम शुद्ध हवेची जरूरी असते, त्यानंतर शुद्ध पाणी हवें असतें, त्यानंतर खाणें व इतर गोष्टी लागतात. खेड्यांत घरांतील कचरा, गुरांढोरांच्या पायांखालील कचरा व मळमूत्र हीं घरानजीक टाकण्यांत येतात व तीं तेथेंच कुजूं देण्यांत येतात. खेड्यांत कोठेंहि पायखाने बांधण्यांत येत नाहींत; घराच्या आसपासची सर्व जागा त्या कामीं उपयोगांत आणण्यांत येते आणि मुलांना तर वाटेल तेथें बसण्याची मुभा असते. यामुळें विहिरीचें पाणी बिघडतें, आरोग्य तात्काळ बिघडतें व अनेक प्रकारची रोगराई उत्पन्न होते. करितां पिण्याच्या पाण्यापासून निदान १०० यार्डांवर तरी अशा प्रकारची घाण नसावी.

घाणीमुळें जितकें आरोग्य बिघडतें, तितकेंच किंबहुना त्यापेक्षां जास्त आरोग्य बिघडण्याला सदोष पाणी कारणीभूत होतें. खेड्यांत पाणी मिळण्याचीं मुख्य ठिकाणें म्हटलीं म्हणजे नद्या, झरे, तळीं आणि विहिरी हीं होत. यांतील पाणी दूषित होण्याचीं मुख्य कारणें हीं असतात कीं ह्या पाण्याच्या जागा लोकवस्तींत असल्यामुळें घरांतील केरकचरा व माणसांजनावरांची एकंदर घाण या पाण्यांत जाते. माणसें याच पाण्यांत आंघोळ करितात व आपले कपडेलत्ते धुतात. गुरांना पाणी पाजण्याचें हेंच ठिकाण असतें व म्हैशी, रेडे याच पाण्यांत बसविण्यांत येतात. अशा नाना प्रकारांनीं या नदीनाल्यांतील पाणी खराब होतें. विशेष आश्चर्याची गोष्ट ही कीं, नदीच्या कांठीं वसलेल्या प्रत्येक खेड्यांतील लोक नदीच्या वरच्या भागांतील पाणी शुद्ध आहे असें समजून त्याचा खाण्यापिण्याच्या कामीं उपयोग करितात व नदीच्या खालच्या भागांत वाटेल त्या प्रकारें घाण करण्यास कचरत नाहींत. परंतु त्यांच्या समजुतीप्रमाणें नदीचा खालचा भाग म्हणजे वस्तुतः शेजारच्या गांवचा वरचा भाग असतो आणि अशा प्रकारचे सहस्रावधि गांव एका नदीच्या दुतर्फा असतात आणि त्या सर्वांना परस्परांनीं दूषित केलेलें पाणी प्यावें लागतें. खरें पाहतां विहीरीचें पाणी नदीच्या पाण्यापेक्षां स्वच्छ रहावें; परंतु बहुतेक ठिकाणीं विहीरीचें पाणी दोरीनें न काढितां विहिरींतून पाणी नेण्याकरितां पायऱ्या असल्यामुळें त्यांत नाना प्रकारची घाण जाते. तसेंच अनेक ठिकाणीं विहीरीच्या कांठावरील घाण पाणी पुनः विहिरींत जातें पुष्कळदां विहिरी झाडाखालीं असल्यामुळें झाडांचीं पानें व पक्ष्यांची विष्ठा पाण्यांत पडते आणि विहिरीचें पाणी वाहतें नसल्यामुळें ही एकंदर घाण पाण्यांत कुजून हें पाणी नारूसारख्या त्रासदायक रोगाचें माहेर घर बनतें.

वरील परिस्थितीमुळें अनेक प्रकारचे रोग खेड्यांत उद्भवतात. शिवाय शहरांतील कांहीं माणसें तेथील आरोग्यनाशक हवेमुळें अत्यवस्थ आजारी पडून पुनः खेड्यांत येत असल्याचें वर म्हटलेंच आहे. या दुहेरी कारणामुळें खेड्यांत आजारी माणसांची संख्या अपरिमित वाढते. हिंवतापासारख्या कांहीं रोगांचा बराच फैलाव खेड्यांतून झालेला आहे. या रोगांचा इतका फैलाव होण्याला अशुद्ध पाणी, दूषित हवा व आरोग्याला अपायकारक जागा हीं तर कारणें असतातच; पण ह्याशिवाय आणखी एक कारण असें असतें कीं, खेड्यांत औषधोपचार होण्याला फार कठीण पडतें. एक तर जवळपास वैद्य नसावयाचा आणि दुसरें असें कीं वैद्य असला, तरी त्याला द्यावयाला रोग्याजवळ पैसे नसावयाचे. फार तर जाण्यायेण्याची व्यवस्था केली कीं घरीं येऊन फुकट औषध देणारे वैद्य आतां राहिले नाहींत. निदान रुपया दोन रुपये खर्च केल्याशिवाय आतां घरीं वैद्य, डॉक्टर येत नाहींत. त्यामुळें लोक होतां होईल तितकें करून घरगुती उपचारांवर भागविण्याचा प्रयत्न करितात आणि अगदीं अत्यवस्थ झाल्याशिवाय रोग्याला वैद्याचें औषध मिळत नाहीं. आणि तें सुद्धां तीनचार मैलांवर वैद्यांच्या घरीं जाऊन, वैद्य घरीं भेटून, रोग्याला औषध मिळेपर्यंत दोनदोन तीनतीन दिवस जातात. तोंपर्यंत रोगी मरणोन्मुख होतो. औषधोपचाराच्या बाबतींत खेड्यांतील लोकांचे इतके हाल होत आहेत कीं त्याची कल्पनाहि करितां येणार नाहीं. खेड्यांतील लोकांना वैद्यकीय मदत मिळावी म्हणून सरकारनें एक नवीन योजना तयार केली होती. तिचा हेतु असा होता कीं, मेडिकल कॉलेजमधून पास झालेल्या विद्यार्थ्यांनीं आपल्या गांवीं जाऊन दवाखाने काढावे व त्या कामीं सरकारनें त्यांना पैशाची मदत द्यावी. पण या योजनेचा फारसा उपयोग झाला नाहीं. यापेक्षां तीच मदत देशी वैद्यांना देऊं केल्यास स्वदेशी वैद्यकाला उत्तेजन दिल्याचें श्रेय सरकारला मिळेल व गोरगरिबांना त्याचें साहाय्य अधिक सुखावह होईल व कमी पैशांत घेतां येईल.

## प्राथमिक शिक्षण सक्तीचें व फुकट झालें पाहिजे

खेड्यांतील लोकांच्या सुधारणेच्या आड आणखी एक गोष्ट येत आहे ती म्हणजे प्राथमिक शिक्षणाचा अभाव. शेतीची सुधारणा कशी करितां येईल याविषयींची सामान्य माहिती शेतकऱ्यांना द्यावयाची असली, आरोग्याविषयींचे कांहीं नियम शेतकऱ्यांना समजावून द्यावयाचे असले, पाणी व जवळपासची जागा स्वच्छ राखिल्यानें त्यांचें आरोग्य कसें सुधारेल व वारीकसारीक रोग कसे टाळतां येतील, असे रोग झाल्यास घरच्या घरीं ते कोणत्या उपायानें बरे करितां येण्यासारखे असतात, वगैरे गोष्टींची माहिती शेतकऱ्यांना करून द्यावयाची असली; तर शिक्षणाच्या अभावीं ती करून देतां येत नाहीं. या दृष्टीनें विचार करतां शहरापेक्षां खेड्यांतच खरोखरी प्रथम सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची अधिक आवश्यकता आहे.

आजारीपणा किंवा वाईट प्रकृति हीं घाणीमुळेंच उत्पन्न होतात असें नाहीं; अज्ञान, दारिद्र्य, निसत्व आणि अपुरें अन्न, वाईट संवयी हींही त्याचीं कारणें असूं शकतात. यासाठीं शिक्षणाचा प्रसार करून त्याच्या द्वारें निरनिराळ्या प्रकारच्या रोगांच्या प्रतिकारार्थच नव्हे; तर एकंदर आरोग्याच्या दृष्टीनें खाणेपिणें, पाणी, स्वच्छता यांच्या बाबतींत कोणते नियम पाळणें किंवा कोणत्या गोष्टी करणें आवश्यक आहे, याची माहिती लोकांना मिळाली पाहिजे. त्यांच्यांत उत्साह उत्पन्न होऊन त्यांनीं आपले अनिष्ट ग्रह, संवयी, या साऱ्या प्रश्नांकडे पहाण्याची एकंदर दृष्टीच बदलली पाहिजे. हें सारें शिक्षणाच्या द्वारें होऊं शकेल.

प्रत्येक खेड्यांतील लोकांना लागणारा दाणागोटा, कपडालत्ता व व्यवहारांत लागणाऱ्या दुसऱ्या वस्तु खेड्यांतल्या खेड्यांत तयार होत असल्यामुळें प्रत्येक खेडें म्हणजे पूर्वीं जवळ जवळ एक स्वतंत्र संस्थानच असे आणि या एकराष्ट्रीयत्वाच्या भावनेला पोषक असें एकंदर वातावरण असे. धंद्यांवरून जात अस्तित्वांत आलेली असल्यामुळें एकाच खेड्यांत अनेक जातींचे लोक असत; इतकेंच नव्हे तर नेहमींच्या व्यवहारांत स्पृश्यास्पृश्यताहि मानली जात असे. पण वर्षांतून कांहीं सार्वजनिक प्रसंग असे असत कीं, त्यावेळीं हा उच्चनीचपणाचा भाव विसरून जाऊन सर्व गांवकरी खांद्याला खांदा लावून तें कार्य साऱ्या गांवाचें आहे असें समजून करीत आणि ही वहिवाट कैक पिढ्या चाललेली असल्यामुळें अशा प्रकारें एकत्र जमण्यांत कमीपणा तर कांहीं नाहींच; पण उलट तें एक प्रकारें मानाचें समजण्यांत येई. त्यामुळें कोणाहि सामान्य बुद्धीच्या माणसाला स्पृश्यास्पृश्यता किती फोल आहे हें सहज दिसे. परंतु आपल्याला उच्च समजणाऱ्या दुरभिमानी लोकांनीं या पुरातन चालींना कोणत्या ना कोणत्या सबबीवर फांटा देऊन या प्रसंगीं सर्वांत मिसळण्याचें सोडून दिलें आहे. त्यामुळें जातीजातींतील लवचीकपणा नाहींसा होऊन गांवांतील एकोपा मोडत चालला. धंदे नाहींसे झाले, पण धंद्यांच्या पायीं उत्पन्न झालेली जात तशीच राहिल्यामुळें वरिष्ठकनिष्ठभाव मात्र कायम राहिला आहे.

# प्रकरण ११ वें

# समाजसेवा आणि सरकार

औद्योगिक क्रांतीमुळें जें मोठें अरिष्ट समाजावर कोसळलें तें म्हणजे विषमता. या क्रांतीमुळें समाजाचें घातुक वर्गीकरण झालें. समाजांतला बहुसंख्य वर्ग अगदीं हीन दशेला पोहोंचला. त्याचे सारे न्याय्य हक्क पायदळीं तुडविले गेले. सर्व बाजूंनीं या वर्गाची नागवणूक होऊं लागली. उलटपक्षीं मूठभर लोकांच्या हातीं इतकी अनियंत्रित सत्ता दिली कीं तिला कांहीं बंधनच राहिलें नाहीं. या अल्पसंख्य भांडवलदार वर्गाला सत्तेची आणि संपत्तीची धुंदी चढली. आपल्या स्वार्थापलीकडे या वर्गाला कांहीं एक दिसेनासें झालें. इतर सारीं माणसें ईश्वरानें आपल्या दिमतीसाठींच जन्मास घातलीं आहेत, अशीच ह्या वर्गाची समजूत होऊन बसली. पैसा मिळविणें आणि स्वतः चैनींत आणि विलासांत आयुष्य घालविणें एवढेंच ह्या वर्गाचें ध्येय !

औद्योगिक क्रांतीनंतरच्या त्या विषम परिस्थितींत कामगारवर्गाचे हाल कुत्रा खाईनासा झाला. तेव्हां हा वर्ग इतका भांबावून गेला कीं, आपलें अस्तित्व टिकविण्याच्या प्रयत्नांत आपले न्याय्य हक्क मिळविण्यासाठीं आणि आपलें जीवन सुसह्य करण्यासाठीं कोणते प्रयत्न करावेत हेंहि त्याला सुचेनासें झालें. अशा त्रिकट आणि असहाय्य स्थितींत ही यांत्रीकरणाची लाट मागें परतविणें अशक्य आहे, असें जाणून इंग्लंडांतील कामगारवर्गानें स्वयंस्फूर्तीनें आपल्या हिताच्या, अनेक प्रकारच्या योजना हातीं घेतल्या व संघटना, सहकार्य, प्रामाणिकपणा, समाजहितबुद्धि, कार्यक्षमता इत्यादि गुणांच्या जोरावर त्या यशस्वी केल्या. त्या चालवीत असतांना लोकशाही तत्त्वाप्रमाणें कार्य करण्याचें जें त्यांना शिक्षण मिळालें व वळण लागलें त्यामुळें त्यांची कार्यक्षमता इतकी वाढली कीं पुढें इंग्लंडचें राज्य मजूरपक्षाच्या हातीं गेलें व तें तितक्याच कार्यक्षमतेनें त्यांनीं पांच वर्षें चालविलें, हा आधुनिक इतिहास सर्वांच्या परिचयाचा आहे.

## लोकहितकारी राज्य

इंग्लंडांत प्रत्येक प्रौढ व्यक्तीला मत देण्याचा अधिकार हळूहळू प्राप्त झाल्यामुळें राज्यसत्ता काबीज करणें व ती चालविणें यांत भागीदार होण्याचा हक्क सामान्य जनतेला मिळाला आणि अशा रीतीनें इंग्लंडची राजकीय सत्ता कामगारांच्या, बहुजनसमाजाच्या हातीं गेली. त्यामुळें सामान्य जनतेच्या प्रत्यक्ष मदतीवर आणि सहकार्यावर तिचा प्रतिनिधि म्हणून जो कामगार-

अनुक्रमांक ९६२२७
विभाग
क्रमांक २०५
नों. दि.

पक्ष सत्ताधारी झाला, त्याला ज्यांनीं आपल्याला सत्तारूढ केलें, त्यांची सर्वांगीण प्रगति करण्यासाठीं प्रयत्न करणें क्रमप्राप्त झालें. या प्रयत्नांतूनच लोकहितकारी राज्याची ( Welfare state ) विशिष्ट कल्पना जन्मास आली. पण सामान्य लोकांचें हित करावयाचें म्हणजे तरी काय ? याचा या विशिष्ट कल्पनेप्रमाणें अर्थ असा कीं सामान्य लोकांची कमाई एकाएकीं थांबून त्यांच्यावर जीं अनेक अनपेक्षित संकटें येतात व राहाणीचा दर्जा एकदम खालावून जी संकटपरंपरा उत्पन्न होते, तिला आळा घालणें. त्यांची कमाई एकदम थांबण्याला आजारीपण, बेकारी, वृद्धापकाळ या गोष्टी मुख्यतः कारणीभूत होतात म्हणून त्यांच्या राहाणीची किमान पातळी ठरवून अशा सांपत्तिक अडचणींच्या वेळीं ती राहाणीची किमान पातळी कायम राखतां यावी, कांहीं झालें तरी तिच्या ती खालीं जाऊं नये याकरितां वरील प्रसंगीं ज्या कारणामुळें असा प्रसंग येतो, त्या कारणाकरितां म्हणून कांहीं ठराविक हप्त्यानें व ठराविक मुदतीपर्यंत त्या माणसाला रोख पैशाची मदत करण्याची व्यवस्था सरकारनें करावयाची आणि अशा रीतीनें त्यांच्या राहाणीचें मान ठराविक पातळीच्या खालीं जाऊन त्यांच्यावर येणारा अनवस्था प्रसंग येऊं द्यावयाचा नाहीं. एवढेंहि करून एखादा त्या किमान पातळीच्या खालीं जाऊं लागला, तर त्याच्या स्थितीबद्दल पूर्ण चौकशी करून आवश्यक तर त्याला राष्ट्रीय निधींतून सहाय्य द्यावयाचें, अशा तरतुदी लोकहितकारी सरकार करीत असतें.[1] याशिवाय वैद्यकीय मदत, शिक्षण, मुलांना मधल्यावेळचें खाणें व दूध, गरोदर स्त्रियांना सर्व प्रकारची मदत वगैरे अन्य प्रकारें फुकट साहाय्य करण्यांत येतें आणि हें सारें करणें हें लोकहितकारी सरकारचें कर्तव्य, त्याची नैतिक जबाबदारी आहे असें मानण्यांत येतें. जनहितकारी राज्याची ही कल्पना मुख्यतः पश्चिम युरोप, अमेरिका, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड आणि कानडा या देशांत कमीजास्त प्रमाणांत आज अस्तित्वांत आहे. तथापि इंग्लंड देशच या बाबतींत आज आदर्श राष्ट्र असें मानण्यांत येतें. इंग्लंड आणि भारत यांचा गेलीं जवळ जवळ दोनशें वर्षें निकट संबंध आलेला आहे. आणि आजहि भारत स्वतंत्र राष्ट्र असलें, तरी दुसऱ्या अनेक बाबतींत भारत इंग्लंडच्या पावलांवर पाऊल टाकीत आलेलें असल्यामुळें याबाबतींत इंग्लंडचें अनुकरण करून आपणहि लोकहितकारी सरकार आहोंत असें भारतानें म्हणावें व त्या दिशेनें कांहीं पावलें टाकण्यास सुरवात करावी, यांत आश्चर्यकारक असें कांहीं नाहीं. तथापि अन्न, वस्त्र, आश्रयाचें ठिकाण, आरोग्य आणि शिक्षण या ज्या माणसाच्या मूलभूत गरजा मानण्यांत येतात, त्या पुरविणें हें सरकारचें पहिलें कर्तव्य

---

1. The Welfare State by Mark Abrams, The Bureau of Current Affairs, 117 Piccadilly, London, W. I.

The Welfare State by T. W, Kent, Eastern Economist Pamphlets.

मानण्यांत येतें. लोकांना या गोष्टी मिळूं लागल्या म्हणजे मगच लोकहितकारी सरकारच्या कार्याला आरंभ होतो.

वर निर्दिष्ट केलेली लोकहिताची कल्पना एकदम नवीन सुचली, असें नाहीं. तिच्यामागें मोठा इतिहास आहे. आपल्या राज्यांतील माणसांचें आणि त्यांच्या मालमत्तेचें संरक्षण करून शांतता राखणें हेंच सरकारचें मुख्य कर्तव्य, असें पूर्वी मानण्यांत येई. आर्थिक व्यवहारांतहि सरकारची भूमिका तटस्थपणाची असे. ज्याला जसा पाहिजे तसा त्यानें पैसा मिळवावा व त्याचा विनियोगहि आपल्या मनाप्रमाणें करावा. तसेंच मजुरीवर अवलंबून असणारांनीं आपली मजुरी वाढवून घेण्याच्या बाबतींतहि सर्व प्रकारचे प्रयत्न करावे. अशा बाबतींत कोणावर कसलेंच बंधन नसावें, अशी राज्यव्यवस्थेची जुनी कल्पना होती. पण तिचा परिणाम असा झाला कीं, समाजांतील अल्पसंख्य माणसांनीं इतरांवर जुलूम करून त्यांची पिळणूक करून पुष्कळ पैसा केला. उलट समाजांतील बहुसंख्य लोकांची स्थिति खालावत जाऊन त्यांना दारिद्र्यांत आणि हालअपेष्टांत राहावें लागलें. आजहि ह्या गोष्टी संपूर्णपणें बंद झाल्या आहेत, अशांतला भाग नाहीं. पण त्याला कांहींतरी बंधनें घालण्यांत येत आहेत हें खरें.

## लोकहितकारी राज्यपद्धतीला इंग्लंडांत शंभर वर्षांपूर्वी आरंभ झाला

माणसाला आपल्या वैयक्तिक फायद्यासाठीं वाटेल तें करण्याची पूर्णपणें मुभा दिल्यानें जो अनर्थ झाला, त्याच्या प्रतिकारार्थ कसे प्रयत्न करण्यांत आले, कसे झगडे झाले आणि शेवटीं त्याला कसा हळूहळू पायबंद घालण्यांत आला, त्याची माहिती येथें देण्याची आवश्यकता नाहीं. येथें इतकें सांगितलें म्हणजे पुरे कीं इंग्लंडांत शंभर वर्षांपूर्वी सातवे अर्ल ऑफ शॅफ्टस्बरी यांनीं कारखान्यासंबंधींचे कायदे ( Factory Acts ) पार्लमेंटमध्यें आणून या बाबतींतील प्रयत्नांना सुरवात केली. या कायद्यांनीं कारखानदारांवर अनेक प्रकारचीं बंधनें घालून त्यांच्या अनियंत्रित सत्तेला व स्वार्थाला पायबंद घालण्यास आरंभ केला. कामगारांच्या कारखान्यांतील परिस्थितीसंबंधीं व कारखानदारांनीं मिळवावयाच्या फायद्यासंबंधीं नियम झाले आणि या सार्‍या गोष्टींची अंमलबजावणी योग्य रीतीनें होते किंवा नाहीं, हें पाहाण्याची जबाबदारी सरकारवर टाकण्यांत आली. त्याचप्रमाणें इंग्लंडांतील एक उदारमतवादी गृहस्थ डब्लू इ. फॉस्टर यांनीं सार्वजनिक कार्यांत भाग घेतां यावा म्हणून दर्जा किंवा उत्पन्न ध्यानांत न घेतां शिक्षण मिळणें हा प्रत्येक व्यक्तीचा हक्क आहे व तसें शिक्षण देणें, हें सरकारचें कर्तव्य आहे, असें ठरविणारें एक बिल सन १८७० मध्यें पार्लमेंटमध्यें आणलें. ह्यालाहि सामाजिक सुधारणेच्या दृष्टीनें तितकेंच महत्त्व आहे, असें मानण्यांत येतें. लोकांचें दारिद्र्य आणि तें नाहींसें करण्याची सरकारची जबाबदारी यासंबंधींची चळवळ याच सुमाराला तिकडे सुरू झाली. ऑक्सफर्डचे एक प्राध्यापक टी. एच. ग्रीन यांनीं

'नैतिक तत्त्वज्ञान' या विषयावर एक व्याख्यानमाला गुंफली आणि "व्यक्तीचें जीवन सर्वस्वी समाजाच्या जीवनावर अवलंबून असतें. म्हणून तिचें स्वातंत्र्य व सुख समाजाच्या स्वातंत्र्यापासून किंवा सुखापासून वेगळें आहे, असें मानणें अगदीं चूक आहे. आपलें जीवन जगण्याला योग्य करण्यासाठीं व्यक्ति समाजावर अवलंबून असते, म्हणून व्यक्तीच्या शरीराचें व वित्ताचें संरक्षण करणें एवढेंच समाजाचें, म्हणजेच पर्यायानें सरकारचें काम नाहीं तर तिला सुखी जीवन जगतां यावें म्हणूनहि त्यानें व्यवस्था केली पाहिजे. स्वातंत्र्य म्हणजे वाटेल तें करण्याची मुभा नव्हे; तर ज्या गोष्टी करण्यालायक आहेत व ज्यांचा उपभोग घेण्यासारखा आहे, त्या करण्याचा व त्यांचा उपभोग घेण्याचा पूर्ण हक्क असणें, हाच खरा स्वातंत्र्याचा अर्थ होय, असें त्यांनीं प्रतिपादन केलें. हीच विचारसरणी पुढें वाढत जाऊन वेब पतिपत्नींनी नागरिक कार्यक्षम होण्यासाठीं त्याच्या किमान गरजा ठरवून त्या प्रत्येकाला मिळण्याची हमी देणें जरूर आहे, या तत्त्वाचा प्रसार केला. अशा प्रकारची स्थिति इंग्लंडमध्यें एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीला होती.

## महायुद्धें आणि कामगारांचा प्रश्न

पुढें दोन महायुद्धें झालीं आणि त्यांत एकंदर सर्व समाजाच्या हितासाठीं कामगार व मालक या दोघांचेहि हक्क संपुष्टांत येऊन सर्वांनाच अनेक प्रकारच्या सरकारी नियंत्रणाखालीं राहावें लागलें. पुढें हीं नियंत्रणें आंगवळणी पडून प्रत्येक गोष्टीसाठीं सरकारच्या तोंडाकडे पाहाण्याची लोकांना संवय झाली. नगरपालिकांचें कार्यक्षेत्र वाढवून त्यांच्याकडून सामुदायिक रीत्या होणाऱ्या कार्यानें कामगार व गोरगरिब यांचे प्रश्न सुटूं शकतील, असेंहि मानणारा त्या काळीं एक वर्ग होता. त्याचप्रमाणें समाजवादाचा स्वीकार करून खाजगी मालकीचे दुष्परिणाम नाहींसे केल्यानें व समानतेचा प्रसार केल्यानें या वर्गाच्या अडचणी नाहींशा करतां येतील, असेंहि कांहींचें मत होतें. निसर्गानें उत्पन्न केलेल्या संपत्तीवर सर्वांचा सारखा हक्क असल्यामुळें तिची व्यवस्था समाजाच्या हातीं असावी आणि तिचें सारखें वांटप होऊन प्रत्येकाला सारखे हक्क आणि सारखी संधि मिळावी, असें ते प्रतिपादन करीत. पण या प्रयत्नांमुळेंहि हे सारे प्रश्न नीट सुटतील, असें वाटेना. समाजांतील बहुसंख्य लोकांचा हा प्रश्न असल्यामुळें सर्व उद्योगधंदे राष्ट्राच्या मालकीचे करणें, सर्वांची मिळकत समान करणें किंवा सामुदायिक होणाऱ्या कार्याची वाढ करून समाज सुखी करणें अशासारखे प्रयोग यशस्वी होतील, तेव्हां होवोत. पण मूलभूत गरजा कोणत्या त्या ठरवून, प्रत्येकाला त्या भागवितां येतील इतक्या उत्पन्नाची हमी देणारें लोकहितकारी सरकार असणें हा निकडीचा प्रश्न आहे, हा विचार ठाम झाला. त्या दिशेनें इंग्लंडमध्यें स. १९१४ सालीं वृद्धापकाळ, आजारीपण व बेकारी या तीन प्रकारच्या विम्याची सोय करून प्रारंभ करण्यांत आला.

आज या योजनेंत पुष्कळ वाढ होऊन कोणाचें किति उत्पन्न आहे, हें विचारांत न घेतां सर्वांना सर्व प्रकारची वैद्यकीय मदत फुकट होत असते. कांहीं ठराविक उत्पन्ना-पर्यंतच्या लोकांना शिक्षण फुकट मिळण्याची व्यवस्था आहे. अन्न, वस्त्र, घर या बाबतींत सरकार तोटा सोसून लोकांची सोय करीत असतें. या सोयींच्या पायीं सरकारला वार्षिक दोनशें कोटींवर खर्च येत असतो. उत्तरोत्तर हा खर्च वाढतच आहे. दुसऱ्या महायुद्धापूर्वी ज्या निरनिराळ्या प्रकारच्या पहाण्या करण्यांत आल्या त्यांवरून असें आढळून आलें कीं इंग्लंडमध्यें शेंकडा दहा कुटुंबें अत्यंत दरिद्री स्थितींत होतीं. इतकीं कीं शरीर सुदृढ ठेवण्यास सर्वसामान्यतः ज्या प्रकारच्या अन्नाची जरूरी होती, तशा प्रकारचें अन्न विकत घेण्यास त्यांच्यापाशीं पैसे नव्हते. कारण पाहातां असें दिसून आलें कीं बेकारी, आजारीपणा किंवा म्हातारपणा यांच्यामुळें त्यांच्या घरांत पैसे येणें बंद झालें होतें. परंतु इंग्लंडमध्यें आज असें असाहाय्य स्थितींत असलेलें कुटुंब आढ-ळणें ही अशक्य कोटींतली गोष्ट आहे. तेथील प्रत्येक नागरीकाला आज हें ठाऊक आहे कीं कोणतीहि अडचण येऊन आपली मिळकत थांबली, तरी आपण व आपलें कुटुंब यांना अन्न, वस्त्र, आश्रयाचें ठिकाण वैद्यकीय मदत आणि शिक्षण यांची तरतूद होण्याकरितां अवश्य लागणारी कमींत कमी मदत सरकारकडून दिली जाईल. नाग-रीकाला असा विश्वास वाटणें हेंच लोकहितकारी सरकारच्या यशाचें गमक होय.

## सर विल्यम बेव्हरीज यांची योजना

एक लोकहितकारी राज्य म्हणून आज इंग्लंडमध्यें ज्या तरतूदी करण्यांत आलेल्या आहेत त्या सार्‍या आतांच सुरू करण्यांत आलेल्या नाहींत हें वर म्हटलेंच आहे. त्यांतल्या कांहीं पुष्कळ वर्षांपासून अंमलांत आलेल्या आहेत. पहिल्या महायुद्धांत त्यांना चालना मिळाली आणि दुसऱ्या महायुद्धांत त्या अमलांत आणणें अपरिहार्य आहे असें वाटूं लागलें. म्हणून इंग्लंडमध्यें अस्तित्वांत असलेल्या या बाबतींतील कायद्यांचें निरीक्षण करून आणखी कोणत्या गोष्टींची तरतूद करणें आवश्यक आहे, त्याची शिफारस करण्याचें काम सरकारनें सर विल्यम बेवरीज यांचेकडे जून १९४१ मध्यें म्हणजे दुसरे महायुद्ध संपण्यापूर्वीच दिलें. त्यांनीं आपला अहवाल नोव्हेंबर १९४२ मध्यें पार्लमेन्टला सादर केला. त्यांनीं केलेल्या शिफारसी स. १९४४ मध्यें पार्लमेन्टनें मान्य केल्या आणि सर्वांत पुरोगामी लोकहितकारी देश म्हणून सध्यां इंग्लंडमध्यें ज्या निरनिराळ्या प्रकारच्या सामाजिक योजना अंमलांत आलेल्या आहेत, त्या सार्‍या याच अहवालावर आधारलेल्या आहेत. या बाबतींत मार्गदर्शक म्हणून तीन तत्त्वें मानण्यांत यावींत, अशी त्यांची शिफारस होती. तीं अशीं कीं आजचा काळ क्रांतिकारक असल्या-मुळें ज्या योजना अंमलांत आणावयाच्या त्या अमुक एका वर्गाकरितां किंवा लोकांकरितां म्हणून नसाव्यात. त्या तात्पुरत्या स्वरूपाच्याहि नसाव्यात. तसेंच विमा हें सामाजिक

प्रगतीच्या व्यापक योजनेचें एक अंग आहे असें समजण्यांत यावें. कारण सामाजिक विम्याची योजना संपूर्णपणें अंमलांत आल्यावर उत्पन्नाची हमी मिळेल. सामाजिक पुनर्घटनेला अडथळा करणारे जे पांच राक्षस आहेत त्यांपैकीं गरज ही एक आहे. मात्र तिला पायबंद घालतां येईल. तिच्यावर हल्ला करणें कांहीं दृष्टींनीं सोपें असतें. पण रोग, अज्ञान, गलिच्छपणा आणि आळस हे बाकीचे चार राक्षस जास्त प्रबळ असून त्यांचें निर्दाळण करणें, वाटतें तितकें सोपें नाहीं. सामाजिक विकासाची हमी द्यावयाची असल्यास सरकारला जनतेचें साहाय्य असलें तरच ती देतां येईल. सरकारनें नोकरीची आणि विम्याच्या हप्त्याची हमी घ्यावी; पण ही हमी घेतांना लोक कार्यप्रवृत्त होतील, त्यांना पुढाकार घेऊन प्रयत्न करण्याची संधि मिळेल आणि ते आपली जबाबदारी ओळखतील असें पाहिलें पाहिजे. ती हमी या गोष्टींना मारक होईल, लोकांना ऐदी बनवील असें होतां कामा नये. राष्ट्रांतील प्रत्येक व्यक्तीच्या किमान गरजा भागल्या कीं समाधान झालें, मग अधिक कांहीं मिळविण्याची किंवा प्रयत्न करण्याची आवश्यकता नाहीं, अशी वृत्ति उत्पन्न होतां कामा नये. या मूलभूत गरजा भागल्या तरी तेवढ्यावर संतुष्ट न राहातां, माणसाला आपल्यासाठीं व आपल्या कुटुंबासाठीं स्वयंस्फूर्तीनें कांहीं तरी अधिक करण्याला हुरूप येईल, वाव मिळेल, उत्तेजन मिळेल, अशी परिस्थिति निर्माण झाली पाहिजे.

## मुख्य गरज कोणती ?

वरील तत्त्वें ठरविण्यापूर्वीं लॉर्ड बेवरीज यांनीं त्या वेळीं अस्तित्वांत असलेल्या सामाजिक विम्याच्या व तत्सम इतर योजनांचें निरीक्षण केलें. दुसऱ्या महायुद्धाच्या जरा पूर्वीं व्यक्ति व कुटुंब यांना, चांगल्या राहाणीला आवश्यक अशा गोष्टींची वाण कोणत्या परिस्थितीमुळें पडत होती, याची त्यांनीं चिकित्सा केली. इंग्लंडांतील मुख्य मुख्य शहरांतील लोकांच्या जीवनाच्या, निःपक्षपातीपणानें आणि शास्त्रोक्त पद्धतीनें ज्या पाहाण्या करण्यांत आल्या होत्या, त्या विचारांत घेतल्या. चांगल्या रीतीनें जीवन जगविण्यासाठीं ज्या गोष्टींची आवश्यकता आहे, त्या मिळत नसलेल्या लोकांचें प्रमाण प्रत्येक शहरांत किती आहे, हें निश्चित केलें आणि असें होण्याला कोणतीं कारणें होतात आणि त्यांचें स्वरूप किती मोठें आहे, याची छाननी केली. हें सारें केल्यावर या प्रत्येक गोष्टींतून एकच निष्कर्ष निघतो असें त्यांना आढळून आलें. तो असा कीं यांतील तीनचतुर्थांश ते पांचषष्ठांश गरजा कमाईंत अडथळा आल्यामुळें किंवा निर्वाहाचें साधन अकस्मात् नाहींसें झाल्यामुळें उत्पन्न होतात आणि बाकीच्या एक चतुर्थांश ते एक षष्ठांश गरजा, कुटुंबांतील माणसें आणि कुटुंबांची मिळकत यांचा मेळ बसत नसल्यामुळें उत्पन्न झालेल्या असतात. याकरतां मुख्य गरज जर नाहींशी करावयाची असली तर बेकारी, आजारीपणा आणि अपघात यांच्यामुळें जेव्हां कमाई थांबते किंवा तींत व्यत्यय येतो, तेव्हां अत्यंत आवश्यक तितकी रोख पैशाची मदत मिळेल, अशी व्यवस्था झाली

पाहिजे, म्हातारपणामुळें काम करण्यास जे असमर्थ असतील त्यांच्या चरितार्थाची तरतूद झाली पाहिजे, पोशिंदा मृत्युमुखीं पडल्यामुळें जे अडचणींत सांपडले असतील, त्यांना साहाय्य मिळालें पाहिजे आणि जन्म, विवाह आणि मृत्यु अशा अपवादात्मक नैमत्तिक प्रसंगीं लागणाऱ्या खर्चाची तजवीज झाली पाहिजे. अशा प्रकारची प्राथमिक स्वरूपाची सामाजिक सुरक्षितता निर्माण करणें म्हणजे अगदीं आवश्यक अशा गरजा भागविण्याकरितां लागणाऱ्या पैशांची हमी देणें होय. पण ही हमी देतांना ज्या कारणांमुळें कमाईत व्यत्यय येत असेल किंवा ती अजिबात थांबत असेल, तीं कारणें शक्यतितक्या लवकर दूर होण्याची व्यवस्था झाली पाहिजे. सामाजिक विम्याच्या मार्गानें जी मदत दिली जाते, ती वाढविली पाहिजे. ती ज्या दृष्टीनें दिली जाते, ती दृष्टि अधिक व्यापक, दूरगामी झाली पाहिजे. नव्या परिस्थितींतून निर्माण झालेल्या नव्या गरजांचा या योजनांत समावेश झाला पाहिजे. आर्थिक मदत पूर्वींपेक्षां वाढली पाहिजे. त्याचप्रमाणें मुलें असलेल्या कुटुंबांना त्यांच्यावर पडणारा भार कमी करण्याकरितां आणि मुलांकरितां म्हणूनहि कांहीं तरी वेगळी मदत मिळण्याची व्यवस्था झाली पाहिजे. याशिवाय दुसऱ्याहि अनेक महत्त्वाच्या सूचना बेवरीज यांनीं केल्या आहेत; पण या योजनेची सर्वसाधारण कल्पना येण्यास वरील माहिती पुरेशी आहे.

## सन १९४४ मध्यें सुरू झालेली सर्वव्यापी योजना

बेकारी, अपघात, वृद्धापकाळ अशा अडचणीमुळें मिळकतींत व्यत्यय आला किंवा ती थांबली; जन्म, विवाह, मृत्यु यांच्यासारखे विशेष प्रसंग आले; गर्भारपण, बाळंतपण, नवीन मुलाची भर, वैधव्य, घटस्फोट वगैरे गोष्टी घडल्या; सारांश मनुष्य जन्मास आल्यापासून त्याला मृत्यु येईपर्यंत कोणत्याहि परिस्थितींत त्याला अडचण उत्पन्न झाली, तरी अत्यंत आवश्यक ती पैशाची मदत राष्ट्रीय-विमा-निधींतून मिळून या अडचणींचें निवारण करतां यावें; मग ती व्यक्ति कांहीं मिळवीत असो वा नसो; तिच्या मूलभूत गरजा भागविण्याला तिला केव्हांहि अडचण पडूं नये, अशी ही लॉर्ड बेवरीज यांनीं सुचविलेली योजना जुलै १९४४ पासून इंग्लंडमध्यें अंमलांत आली. तिच्या पायीं आज तेथें कोट्यावधि रुपयांचा खर्च होत आहे. हा राष्ट्रीय निधि मुख्यतः लोकांनीं हप्त्याच्या रूपानें दिलेले पैसे, मालकांनीं दिलेला आपला भाग आणि बाकीचा सरकारी पैसा ( म्हणजे लोकांनीं कराच्या रूपानें दिलेला पैसा ) मिळून होतो.

या निधीची उभारणी करण्याच्या बाबतींत वर उल्लेख केलेल्या अहवालांत एका विशिष्ट गोष्टीवर जोर देण्यांत आलेला आहे, तिचा येथें उल्लेख करणें आवश्यक वाटतें. या अहवालांत नमूद केलेल्या जनतेच्या बहुतेक अडचणींची तरतूद आपण आपल्या स्वतःच्या प्रयत्नांनीं स्वावलंबनाच्या तत्त्वावर करावी, म्हणून अनेक प्रकारच्या छोट्या-

मोठ्या योजना, वरील सर्वव्यापी सरकारी योजना अंमलांत येण्यापूर्वी कैक वर्षे अस्तित्वांत होत्या. त्यांची त्रोटक माहिती पूर्वी दिलेलीच आहे. अपेक्षित किंवा अनपेक्षित प्रसंगांना आपल्या स्वतःच्या प्रयत्नांनीं तोंड देण्याची व्यवस्था करावी, अडचणींच्या वेळीं दुसऱ्याच्या तोंडाकडे पाहाण्याचा मानहानिकारक प्रसंग आपणांवर येऊं नये, म्हणून बहुसंख्य लोकांनीं अशा अनेक प्रकारच्या योजना सरकारी मदतीशिवाय अंमलांत आणून स्वावलंबी होण्याचे प्रयत्न आधींच यशस्वी रीतीनें चालविले होते. वरील योजना सरकारी रीत्या अंमलांत आणण्याचें ठरल्यास सरकारी पैसा हा जरी जनतेचा पैसा असला, तरी या कामासाठीं एक विशिष्ट निधि उभारून सामान्य लोकांना जड पडणार नाहीं असा विम्याचा अल्प हप्ता आपला भाग म्हणून या निधीकरतां द्यावा, तो देण्यास जनता आनंदानें तयार होईल, इतकेंच नव्हे तर अशा प्रकारें थोडा तरी प्रत्यक्ष स्वार्थत्याग केल्याशिवाय, अल्पस्वल्प तरी मोबदला दिल्याशिवाय अशा प्रकारची मदत अडचणीच्या प्रसंगींसुद्धां घेण्यास लोक खुशीनें तयार होणार नाहींत, निव्वळ देणगी म्हणून अशी मदत स्वीकारणें लोकांना पसंत पडणार नाहीं, इंग्लिश लोकांचा तसा स्वभावधर्म नाहीं, असें या अहवालांत बेवरीजसाहेबांनीं बजावलें होतें. आणि कांहीं अपवाद सोडून जनता, कारखानदार व सरकार या प्रत्येकानें या निधीचा एकतृतीयांश भाग सोसावा व निधीची व्यवस्था सरकारी खर्चानें व्हावी, अशी शिफारस या अहवालांत करण्यांत आली होती व तीच आज अंमलांत आहे.

## या योजनेचें स्वरूप

या योजनेप्रमाणें आईबाप वारले असले किंवा आजारी पडले तर त्या मुदतींत त्यांच्याबरोबर त्यांच्या मुलांनाहि मदत मिळते. नवरा वारला तर वैधव्यपणाची आईला व मुलाला मदत मिळते. नंतर तिला मुलाची विधवा आई म्हणून मदत मिळते. मुलाचे आईबाप हयात नसले तर त्यांचें पालन करणाऱ्याला त्याचा पालक म्हणून मदत मिळते. इतकें करूनहि मुलाची आबाळ होत असली तर अशा मुलांवर मुद्दाम देखरेख करण्याकरितां नेमलेला अधिकारी ती आपली वैयक्तिक जबाबदारी आहे असें मानून त्यांच्या योग्य व्यवस्थेची काळजी घेतो. घरांतलें मिळवतें माणूस बेकार झाल्यास तें, त्याच्यावर अवलंबून असलेलीं माणसें व एक मूल यांना मदत मिळते. त्याचप्रमाणें आजारीपणांत आजारीपणा नाहींसा होईपर्यंत आजारीपणाची मदत मिळते. काम करीत असतांना अपघात झाल्यास त्याबद्दल सव्वीस आठवडे व नंतर कांहीं अधूपणा शिल्लक राहिल्यास तो नाहींसा होईपर्यंत मदत मिळते. शिवाय अपघातामुळें त्यांची कमाई वर्षाला बावन पौंडापेक्षां कमी झाल्यास त्याला कायमचा बेकार समजून किंवा दुसऱ्या कांहीं विशेष कारणाबद्दल मदत मिळते. ज्यांचा या राष्ट्रीय विमायोजनेंत अंतर्भाव होऊं शकत नसेल त्यांनीं राष्ट्रीय साहाय्यसमितीकडे मदतीकरतां अर्ज केल्यास त्यांनाहि मदत मिळते. ज्यांना राहावयास जागा नसेल असे

अधू, अंध, मुके, बहिरे, वृद्ध व कांहींतरी व्यंग असलेले दुसरे गृहहीन लोक, कीं जे आपली स्वतःची काळजी सर्वस्वी घेऊं शकत नाहींत, त्यांच्या राहाण्याची, खाण्यापिण्याची, वस्त्रप्रावरणाची, कपडे धुण्याची, त्यांच्यावर नजर ठेवण्याची व त्यांच्या दुसऱ्या सुखसोईंची काळजी घेण्याची सारी जबाबदारी नगरपालिकांवर सोंपविण्यांत आलेली आहे. पण या साऱ्या गोष्टी अगदीं फुकट मात्र करण्यांत येत नाहींत. जे आपला सारा खर्च देण्यास समर्थ असतील त्यांच्याकडून किती पैसे घ्यावयाचे तें ठरविण्यांत येतें. ज्यांना सारा खर्च देतां येत नाहीं त्यांनीं आपल्या शक्तीप्रमाणें पण आठवड्याला निदान एकवीस शिलिंग तरी द्यावयाचे असतात. याच्याशिवाय प्रत्येकाला हातखर्च म्हणून आठवड्याला पांच शिलिंग लागतात असें गृहीत धरण्यांत येतें. अशा रीतीनें ज्याला कामांतून निवृत्त झाल्याची सव्वीस शिलिंग मदत मिळते, तो एकवीस शिलिंग आपल्या सर्व व्यवस्थेबद्दल देतो व बाकीचे पांच शिलींग आपल्या किरकोळ खर्चाकरितां ठेवितो. ज्याचें उत्पन्न सव्वीस शिलिंगापेक्षां कमी असेल त्यांना कमी पडत असलेली रक्कम राष्ट्रीय मदतयोजनेंतून देण्यांत येते. इंग्लंडांतील नगरपालिका, अशा लोकांची राहण्याची व इतर सुखसोईंची व्यवस्था करण्याचें काम आपल्या वतीनें करण्याकरितां समाजसेवा करणाऱ्या खाजगी संस्थांचें नेहमीं साहाय्य घेतात.

इंग्लंडांत आज कोणाहि माणसाला, कोणत्याहि प्रकारची, कोणत्याहि अटीशिवाय वैद्यकीय मदत फुकट मिळते. पुरुषांना पांसष्ट वर्षांनंतर व स्त्रियांना साठ वर्षांनंतर कार्यनिवृत्त होऊन कार्यनिवृत्तीची मदत मिळते. पण त्यांना वाटल्यास आणि शक्य असल्यास तसेंच आणखी पांच वर्षें काम करून कार्यनिवृत्तीची अधिक वाढीव मदत मागतां येते. त्यानंतर त्यांना विम्याचा हप्ता भरण्याची आवश्यकता राहात नाहीं. त्याचप्रमाणें वार्षिक उत्पन्न १०४ पौंडापेक्षां कमी असलेल्या बेकार, आजारी, विद्यार्थी, आपल्या चरितार्थासाठीं नवऱ्यावर सर्वस्वी अवलंबून असलेली बाई, अशा लोकांना सामाजिक विमानिधीचा हप्ता न देण्याची सवलत देण्यांत आलेली आहे. या योजनेची अंमलबजावणी करण्याचें काम तीस हजार माणसें करीत आहेत. हीं बहुतेक माणसें पूर्वी अशाच प्रकारच्या पण खाजगी प्रयत्नांनीं चाललेल्या संस्थांत काम करीत होतीं. त्यांच्या अनुभवाचा उपयोग ही योजना यशस्वी करण्याच्या कामीं फार होत आहे. या सामाजिक विमा व तत्सम योजना व त्यांची अंमलबजावणी यांच्यासाठीं इंग्लंडला सालीना दोनशें कोटी पौंडावर खर्च येत आहे व तो सालोसाल आणखी वाढत जाणार आहे, असें सांगण्यांत येतें.

## लोकहितकारी राज्यांत कुटुंबाचें स्थान

मुलाला जन्म देऊन, त्याचें पालनपोषण करून, त्याला वाढवून तो समाजाचा एक नवीन नागरिक तयार करण्याचें काम कुटुंब करीत असल्यामुळें, कुटुंब हा

समाजाचा अत्यंत महत्त्वाचा प्राथमिक घटक समजला जातो. तें समाज अस्तित्वांत ठेवण्याचेंच नव्हे, तर तो कायम टिकविण्याचें अत्यंत महत्त्वाचें कार्य करतें. व्यक्ति आणि तिची परिस्थिति यांची बरोबर जुळवाजुळव करून देण्याचें प्राथमिक कार्य कुटुंबच यशस्वी रीतीनें करतें. त्यामुळें समाजांतील साऱ्या लहानमोठ्या संघटनांत कुटुंबसंस्थे-इतकी दुसरी महत्त्वाची संघटना नाहीं असें मानण्यांत येतें. कुटुंब ही मानवी संस्थांमध्यें सर्वांत जुनी संस्था आहे. ती सरकारच्या, मालमत्तेच्या इतकेंच नव्हें; तर मानवाच्याहि पूर्वी जन्मास आलेली आहे. तिचें वजन समाजावर असंख्य मार्गानीं पडतें आणि तींत होणाऱ्या बदलाचें प्रतिबिंब साऱ्या समाजाच्या रूपांत दिसतें. तिच्यांत अनेक प्रकारचे बदल होत आलेले आहेत तथापि तिचें मूलभूत कार्य बदललेलें नाहीं. कारण सामाजिक गरजा आणि नैसर्गिक प्रवृत्ति यांच्या पायावर तिची उभारणी झालेली आहे. कुटुंब करण्याची वृत्ति ही माणसामध्यें असलेल्या अनेक निसर्गदत्त प्रवृत्तींचा परिणाम आहे. समाजांतील साऱ्या संघटनांचें तें केंद्र असतें. त्याचे दोन मुख्य घटक-स्त्री आणि पुरुष-एकंदर कुटुंबाच्या सुखासाठीं पराकाष्ठेचा स्वार्थत्याग करून त्याची सर्व प्रकारें जोपासना करतात. आणि हे श्रम, हे कष्ट, हा स्वार्थत्याग केवळ स्वयंस्फूर्तीनें ते आपल्या कुटुंबा-साठीं करीत असले, तरी त्याचा एकंदर समाजावर अत्यंत हितावह परिणाम होतो.

अशी ही कुटुंबसंस्था, अत्यंत जुनी, कायम टिकणारी आणि सर्वत्र आढळणारी असली तरी एखादें वैयक्तिक कुटुंब घेतल्यास तें अगदीं अल्पजीवी आणि अगदीं तात्पुरत्या स्वरूपाचें असतें. पण त्यांतूनच नवीन कुटुंबें जन्मास येतात. तींहि बऱ्या-वाईट परिस्थितींतून मार्ग काढीत काढीत, नवे अनुभव घेत घेत, नव्या अडचणींना तोंड देत, नवीन कुटुंबाचें मार्गदर्शन करीत, आपलें कार्य संपुष्टांत आणतात. अशा रीतीनें हें राहाटगाडगें नित्य सुरू असतें. प्रत्येक वेळीं मागचे संसार मागें पडतात आणि नवे संसार त्यांची जागा घेतात.

समाज हा त्यांतील व्यक्ति त्याला करतील तसा होतो आणि व्यक्तीची सुधारणा तिच्या बालपणापासून सुरू होते. म्हणून कुटुंबांत जन्माला येणाऱ्या बालकाची त्याचे आईबाप आपलें मूल म्हणून मनोभावानें जोपासना करीत असले, तरी खरोखरी ते समाजाच्या एका भावी नागरिकाची जोपासना करीत असतात. म्हणून समाजांतल्या आद्य घटकाचें समाजांतील महत्त्वाचें स्थान ओळखून त्याची कोणत्याहि प्रकारें आबाळ होऊं नये, कुटुंबांत त्याला जें सुख आणि संरक्षण मिळतें तें इतरत्र कोठेंहि मिळण्या-सारखें नसल्यामुळें त्याला तो मुकूं नये, म्हणून गरजू कुटुंबांना बालसंगोपनाच्या कामीं खाजगी संस्थांनीं अनेक प्रकारें साहाय्य करण्यास आरंभ केला. अगदीं गर्भसंभवापासून मूल आपल्या पायावर उभें रहाण्यास समर्थ होईपर्यंत आई, मूल व आवश्यक तर सारें कुटुंब यांना प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीतीनें अनेक प्रकारें मदत करण्यांत येऊं लागली. रोख पैसे, राहाण्याला जागा, अशाच दुसऱ्या आवश्यक वस्तु, घरकामांत मदत करण्यास

माणसाचें साहाय्य अशा, एक ना अनेक प्रकारें कुटुंबाला साहाय्य करून भावी नागरिकांना वाढविण्याचें महत्त्वाचें काम सुकर व्हावें म्हणून सर्व प्रकारें प्रयत्न सुरू झाले. हे प्रयत्न करतांना कुटुंबाच्या मूलभूत कार्याला अडथळा येणार नाहीं, उलट तें कार्य अधिक कार्यक्षमतेनें करण्यास कुटुंब समर्थ होईल, कुटुंब मोडण्यास किंवा तें शक्तिहीन करण्यास कोणत्याहि रीतीनें मदत न होतां तें जोडण्यास निश्चित साहाय्य होईल आणि अशा रीतीनें समाज कायम टिकण्याला कुटुंब हें आवश्यक व योग्य आहे; त्याचेच द्वारें समाज टिकूं शकेल, ही गोष्ट सर्वमान्य झाली. कुटुंबाला साहाय्य करण्यांत मुख्यतः हाच हेतु होता. पण लोकहितकारी सरकार याच्या अगदीं उलट प्रयत्न करतें; तें वैयक्तिक स्वातंत्र्य देऊन कुटुंब फोडण्याचा, तें कमकुवत करण्याचा प्रयत्न करतें, असा एक मोठा आक्षेप लोकहितकारी सरकारवर करण्यांत येतो. या आरोपाची आपण छाननी करूं या.

## कुटुंब जोडलें जात नाहीं; मोडलें जातें

ब्रिटिश पार्लमेंटचे एक सभासद राईट ऑनरेबल जेम्स ग्रिफिथस् यांच्या पत्नी मिसेस विनिफ्रेड ग्रिफिथस् जे. पी. या मॅजिस्ट्रेट असून स्वतः चार मुलांच्या माता आहेत. त्यांना साउथ वेल्स व लंडन येथील कोर्टांच्या कामाचा चांगला अनुभव आहे. त्या लिहितात, "आज आमच्या देशांत मुलांच्या सुखसोयीसाठीं जेवढे प्रयत्न करण्यांत येत आहेत, तेवढे प्रयत्न यापूर्वी कधींच करण्यांत आले नव्हते. मुलांच्या शारीरिक सुखाची काळजी तीं जन्मास येण्यापूर्वीपासूनच सुरू होते. आणि फुकट दूध व जीवनसत्त्वयुक्त अन्न, फुकट वैद्यकीय मदत, शाळांत फुकट दूध व जेवण आणि दांत व डोळे चांगले रहावे म्हणून आवश्यक त्या साऱ्या फुकट सोयी, सर्वांना प्राथमिक आणि दुय्यम शिक्षण फुकट मिळण्याची व्यवस्था, मानसिक आणि शारीरिक दोष असलेल्यांची फुकट विशेष सोय, ज्यांना अधिक शिक्षण घेण्याची इच्छा असेल त्यांच्या मदतीकरतां अनेक प्रकारच्या देणग्या आणि शिष्यवृत्त्या अशी एकंदर मुलांकरतां व्यवस्था आहे. तरुण कामगारांच्या ज्ञानांत आणि सुखांत भर पडावी म्हणून अर्ध्या-दिवसाच्या आणि रात्रीच्या शाळा, सार्वजनिक वाचनालयें, क्लब्स, विहारोद्यानें, बगीचे, क्रीडांगणें वगैरेंच्या सोयी आहेत. त्यांची दृष्टि विशाल होण्यासाठीं, सिनेमा, रेडियो, टेलिव्हिजन अशासारख्या आधुनिक साधनांचा भरपूर पुरवठा आहे. पगारांत वाढ झालेली असल्यामुळें देशांत व देशाबाहेर प्रवास करण्यास संधि मिळत आहे. या गोष्टींमुळें तरुणांच्या जीवनांत समृद्धता आणि विविधता आली आहे. पण येवढें करूनहि आमच्या पदरीं निराशा कां येत आहे ? आमचें कोठें चुकतें आहे ? तरुणांकडून आणि मुलांकडून होणाऱ्या गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यांच्या प्रमाणांत अशी भयानक वाढ कां होत आहे ? आणि या परिस्थितीला जबाबदार कोण ? मी आव्हानपूर्वक सांगतें कीं याची जबाबदारी मुख्यतः आईबाप आणि जनता यांच्यावर आहे. कारण मुलांच्या

बाबतींत या साऱ्या सोयी सरकार करीत असल्यामुळें पुष्कळ आईबापांना वाटतें कीं मुलांच्या बाबतींत आतां आपली कांहींसुद्धां जबाबदारी राहिलेली नाहीं. तीं कोर्टांत येऊन खुशाल सांगतात कीं मुलावर आपला कांहीं ताबा राहिलेला नाहीं आणि पुष्कळदां हें मूल म्हणजे दहा किंवा त्याच्याहिपेक्षां लहान वयाचा मुलगा किंवा बारा वर्षांची मुलगी असते. तें मुलाला शाळेंत जाण्याला भाग पाडूं शकत नाहींत. आपला मोकळा वेळ मुलें कोठें घालवितात याची त्यांना दादहि असत नाहीं. मूल त्यांच्या हुकमांत नसतें व त्यांना तें जुमानीतहि नाहीं. बाप म्हणतो, मुलाला मारूनहि पाहिलें पण कांहीं उपयोग होत नाहीं. याच्यावरून हें अगदीं उघड दिसतें कीं, आईबाप आणि मूल यांच्यांत जें ममत्वाचें आणि सहकार्याचें नातें पाहिजे तें मुळींच नसतें. असतें तर हा प्रसंग येताच ना. मी असें सुचवूं का कीं, कांहीं कुटुंबें साधारणपणें समाधानकारक दिसत असूनसुद्धां योग्य प्रकारचें ममत्व आणि काळजी यांचा त्यांच्यांत अभाव असतो. पुष्कळ घरांत ममता आणि काळजी हीं आई-बापांच्या लहरीवर अवलंबून असतात. दुर्दैवानें आपली लहर आणि आपलें सुख यांच्यापुढें त्यांना मुलाची मातब्बरी वाटत नाहीं. कांहीं लोक याच्या अगदीं उलट असतात. तें मुलांचे इतके लाड करतात कीं त्यामुळें मूल समाजांत वागण्यास नालायक होतें. मुलाच्या जीवनावर जर कसला अतिशय परिणाम होत असेल तर तो त्याच्या घराचा होय. पूर्ववयांत ममता आणि काळजी हीं लाभलीं नसल्यामुळें मुलावर जे अनिष्ट परिणाम होतात, ते नाहींसे करणें अत्यंत कठीण काम असतें. आपल्याला नेहमीं सांगण्यांत येतें कीं बहुतेक गुन्हेगार हे दुभंगलेल्या किंवा असमाधानकारक वातावरण असलेल्या कुटुंबांतून आलेले असतात. दुभंगलेलीं लग्नें आणि दुभंगलेला संसार यांची संख्या सारखी वाढत आहे. निदान आपल्या मुलांकरितां तरी ही अवनति कशी थांबवावी हा मोठा बिकट प्रश्न नव्हे काय ?”[1]

तरुण गुन्हेगारांच्या बाबतींत अमेरिकेंतसुद्धां हाच अनुभव आहे. तेथेंहि अनेक प्रकारचे प्रतिबंधक उपाय करूनहि बालगुन्हेगारांची संख्या वाढत आहे. म्हणून या राष्ट्रांत ज्या गोष्टी अगदीं प्रयोगावस्थेंत आहेत किंवा ज्यांच्या उपयुक्ततेविषयीं अजून अनिश्चितता आहे, अशा गोष्टींचें अनुकरण करतांना आपण अत्यंत सावधगिरीनें पावलें टाकलीं पाहिजेत.

पाश्चात्य राष्ट्रांतील कुटुंबसंस्थेवर, यांत्रिक सुधारणा आणि सांपत्तिक बदल याशिवाय आणखी एका गोष्टीचा परिणाम झाला आहे. ती गोष्ट ही कीं कुटुंबनियोजनामुळें प्रजोत्पत्ति घटत आहे. ही घट विशेषतः श्रीमंत, अतिशिक्षित, शहरांतील

1. Who is responsible for the young criminals ? by Mrs. Winifred Griffiths, J. P. in ‘ Labour Woman ’ Vol. X L1 Number 8 Aug–Sept. 1953.

रहिवाशी आणि ज्या वर्गांत पैशासाठीं कामधंदा करणाऱ्या स्त्रिया अधिक आहेत असे वर्ग, यांच्यांतच मुख्यतः आहे. याचा परिणाम असा होत आहे कीं कुटुंबाचें, विशेषतः स्त्रियांचें सुख आणि स्वातंत्र्य वाढलें आहे, कुटुंबाचें काम कमी झालें आहे. घरांतल्या कटकटी पुष्कळ कमी झाल्या आहेत, पुष्कळ स्त्रियांना मोकळा वेळ मिळूं लागला आहे आणि मोजकीं मुलें आणि तींसुद्धां मध्यें बराच कालावधि जाऊन जन्मास येऊं लागलीं आहेत. या आणि दुसऱ्या अनेक प्रकारच्या बदलामुळें कुटुंबाचें स्वरूपहि बदलूं लागलें आहे. त्यामुळें कांहीं नवीन प्रश्नहि उत्पन्न झाले आहेत.

## कुटुंब सुखी; तर समाज सुखी

भागीदारीनें चालणाऱ्या इतर अनेक संस्थांपेक्षां लग्नसंस्थेवरच सरकार अधिक नियंत्रण कां ठेवतें, हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. कोणालाहि कांहीं ठराविक अटी पाळल्याशिवाय लग्न करतां येत नाहीं. लग्नाचे कामांत वय किती असावें, लग्न करणाऱ्या जोडप्यानें परस्परांच्या नात्याच्या बाबतींत कोणत्या गोष्टी वर्ज्य कराव्यात, बायकोच्या व मुलांच्या बाबतींत पुरुषाची सांपत्तिक जबाबदारी किती असावी, कुटुंबाचें उत्पन्न आणि वडिलार्जित मिळकत यांच्यावर कोणाचा, किती, केव्हां, कशा प्रकारचा हक्क असावा वगैरे अनेक निर्बंध असतात. यावरून इतकें सिद्ध होतें कीं वरील गोष्टी ठरविण्याच्या बाबतींत सरकार आपल्याकडे हक्क ठेवण्यास उत्सुक असतें. याचें कारण उघडच असें आहे कीं, समाजाचें सातत्य टिकविण्याचें जें कार्य कुटुंब करतें तें समाजाच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचें असतें. प्रजोत्पत्ति करणें आणि तिचें संगोपन करणें हें मोठें जबाबदारीचें काम समाजाच्या दृष्टीनें अत्यंत उपयोगी असतें. त्याची तुलना दुसऱ्या कोणत्याहि भागीदारींत चाललेल्या कामाशीं करतां येण्यासारखी नसते. म्हणून विवाह हा एका परीनें दोन जिवलग व्यक्तींचा खाजगी संबंध असला, त्याच्याइतका दुसरा महत्त्वाचा संबंध नसला, तरी तो दोन व्यक्तींचा निव्वळ खाजगी संबंध राहूं शकत नाहीं. एकंदर समाजाचा प्रतिनिधि या नात्यानें सरकारचाहि त्याच्याशीं अत्यंत जिव्हाळ्याचा संबंध असतो. आणि भावी नागरिकाची जन्मदाती संस्था या दृष्टीनें पाहातां सरकार कुटुंबसंस्थेवर असा ताबा चालवितें, हें सर्वस्वी न्याय्यच आहे असें म्हणावें लागेल. या संबंधांतून जन्मास येणारें मूल हें आईबाप आपलें समजत असले, त्याच्या जोपासनेसाठीं आपलें सर्वस्व अर्पण करीत असले; तरी अपत्यजन्म ही पतिपत्नींची केवळ खाजगी अगर वैयक्तिक गोष्ट होऊं शकत नाहीं. तो समाजाचा एक भावी घटक म्हणून आपला समजून, ती एक कर्तृत्ववान् व्यक्ति कशी होईल, हें पाहाणें हें सरकार आपलं कर्तव्य मानतें. कारण या प्रयत्नांच्या यशस्वितेवर कुटुंबाचेंच नव्हे; तर राष्ट्राचेंहि भवितव्य अवलंबून असतें. म्हणून हें कार्य यशस्वी रीतीनें पार पाडण्याची जबाबदारी सर्वांचीच असते, आणि सरकार कुटुंबाशीं अनेक प्रकारें सहकार्य

करून, कांहीं गोष्टींत सक्ती करून तर कांहीं गोष्टींत साहाय्य करून, त्याला आवश्यक तें स्वास्थ्य लाभेल व तें आपलें कार्य यशस्वी करण्यास समर्थ होईल असें पाहातें. सरकारच्या या मदतीचा अव्हेर केल्यास कुटुंबाला आपलें अपत्यसंगोपनाचें कार्य समाधानकारक रीतीनें करतां येईल किंवा नाहीं, हा प्रश्नच आहे. उलटपक्षीं हें साहाय्य दिवसेंदिवस वाढूं लागल्यामुळें वैयक्तिक जबाबदारी कमी होऊन त्याचा अनिष्ट परिणाम कुटुंबावर होऊं लागतो कीं काय, अशी शंका आतां ज्या नवनवीन समस्या उत्पन्न होत आहेत, त्या ध्यानांत घेतां वाटूं लागते.

लोकहितकारी राज्य (Welfare State) म्हणजे काय तें समाजाच्या हितासाठीं काय करतें, त्याच्यासाठीं किती पैका खर्च होतो, त्याच्यासाठीं जनतेलाहि किती स्वार्थत्याग करावा लागतो, याची कल्पना येण्यासाठीं या बाबतींत आदर्श मानलेल्या ब्रिटिश राष्ट्राची माहिती वर विस्तारानें दिली आहे. भारत आज आपल्याला लोकहितकारी राज्य म्हणून म्हणवीत असला; तरी त्याची लोकसंख्या, भौगोलिक आकार, उद्योगधंदे, सांपत्तिक स्थिति, जनतेचा मागासलेपणा आणि एकंदर प्रतिकूल परिस्थिति याचा विचार करतां आज तर नाहींच; पण नजीकच्या कालांत तरी खऱ्या अर्थानें त्याला तसें म्हणतां येईल किंवा काय, हा प्रश्नच आहे, तथापि इतक्या व्यापक स्वरूपांत नसली तरी पुष्कळ मर्यादित स्वरूपांत इंग्लिश कायद्याच्या नमुन्यावर हिंदी कामगारांकरितां राष्ट्रीय-विमा-योजना सन १९४८ मध्यें पास होऊन कांहीं भागांत तिची अंमलबजावणीहि सुरू झाली आहे. मुंबईशहर आणि त्याच्या लगतच्या भागांतील १६८० कारखान्यांतील सुमारें ४२५००० कामगारांकरतां ही योजना २ ऑक्टोबर १९५४ पासून सुरू व्हावयाची आहे. या योजनेप्रमाणें कामगारांना आजारीपणांत, अपघातांत, स्त्रीकामगारांना बाळंतपणांत, पैशाची व वैद्यकीय मदतीची तरतूद केली आहे. शेवटीं एकंदर पंचवीस लाख कामगारांना तिचा फायदा मिळेल अशी सरकारची अपेक्षा आहे. आपल्या देशांतल्या योजनेंत व अशा प्रकारच्या इंग्लंडमधील योजनेंत मुख्य फरक हा आहे कीं कामगारांनीं द्यावयाचा हप्ता व त्यांना मिळावयाची मदत ही इंग्लंडमध्यें सर्वांना सारख्या प्रमाणांत असते; तर येथें ती कामगारांच्या पगाराप्रमाणें कमीजास्त ठरविण्यांत आलेली आहे. तसेंच इंग्लंडमध्यें प्रत्येक नागरिकाला ही योजना लागू करण्यांत आलेली आहे; तर येथें ती विसापेक्षां अधिक कामगार असलेल्या कारखान्यांतील दरमहा चारशें रुपयापेक्षां कमी पगार असलेल्या कामगारानांच लागू आहे. मात्र इंग्लंडमध्यें ही योजना सर्वव्यापी करण्यास चाळीस वर्षें लागलीं, हेंहि येथें ध्यानांत ठेविलें पाहिजे.

## लोकहितकारी सरकार व समाजसेवा करणाऱ्या खाजगी संस्था

अशा प्रकारें लोकसेवेचीं कार्यें सरकारनें मोठ्या प्रमाणांत आपल्या हातीं घेतलीं, सरकारच स्वत: एक मोठी समाजसेवा करणारी संस्था झाली कीं स्वयंस्फूर्तीनें समाजसेवा

करणाऱ्या संस्थांना त्यांनीं करण्यासारखें कांहीं काम शिल्लक राहतें किंवा काय, असें काम करणारीं सरकारी खातीं व समाजसेवा करणाऱ्या खाजगी संस्था यांचे परस्पर संबंध कसे असावेत वगैरे अनेक प्रकारचे महत्त्वाचे प्रश्न उपस्थित होतात. त्यांचा विचार करण्यापूर्वी एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे ती ही कीं, इंग्लंडांत काय किंवा भारतांत काय, आपल्याप्रमाणेंच आपला एकंदर समाज सुखी व्हावा, समाजाच्या अनेक प्रकारच्या अडचणी, दुःखें, संकटें कमी करावींत आणि तो स्वावलंबी आणि समृद्ध व्हावा म्हणून अनेक प्रकारच्या समाजसेवेच्या कार्यांची मुहूर्तमेढ स्वयंस्फूर्तीनें कार्य करणाऱ्या खाजगी संस्थांनींच प्रथम रोंवली, त्यासाठीं जनतेची सहानुभूति मिळविली, अनेक प्रकारच्या अडचणी, दोषारोप सोसून आत्मविश्वासानें सतत प्रयत्न करून आपापल्या संस्था चांगल्या नांवारूपास आणल्या व त्यानंतर सरकारनें त्या हातीं घेतल्या व तें त्या आपल्या म्हणून चालवूं लागलें. इंग्लंडांत सामाजिक सुरक्षिततेसाठीं आज ज्या योजना अंमलांत आहेत, त्यांतील प्रत्येकीचा इतिहास पाहिल्यास हीच गोष्ट प्रामुख्यानें लक्षांत येते. तेथील सरकारनें त्या संस्था व त्या चालविण्याची यंत्रणा आपल्या हातीं घेतली, पण त्या बरोबरच त्या चालविणारीं माणसेंहि त्याला आपल्याकडे घ्यावीं लागलीं. आज ह्या योजना तेथें यशस्वी रीतीनें चालण्याचें मुख्य श्रेयहि याच जुन्या कार्यकर्त्यांना देण्यांत येत आहे.

आपल्याकडेहि यापेक्षां वेगळा अनुभव नाहीं. आपलें सरकारहि आपण 'लोक कल्याणकारी सरकार' आहोंत असें म्हणवतें आणि त्या दिशेनें प्रयत्न करतांना कांहीं खाजगी प्रयत्नांनीं चाललेलीं व यशस्वी आणि लोकप्रिय झालेलीं कार्येंच त्यानें आपल्याकडे घेतलीं. याचें मुंबईतलें एखादें ठळक उदाहरण द्यावयाचें झाल्यास समाज-शिक्षण-समितीच्या कामाचें देतां येईल. लोकांना विशेषतः कामगारांना साक्षर करण्याची मोहीम मुंबईच्या समाजसेवासंघानें स. १९३८ मध्यें मोठ्या प्रमाणांत सुरू केली. तिला शहरांतल्या साऱ्या लोकांनीं व संस्थांनीं मनःपूर्वक साहाय्य केलें. या मोहिमेंत दोन हजार स्वयंसेवकांनीं मदत केली. एकंदर शहरांत ५९६ वर्ग (५४४ पुरुषांकरतां आणि ५२ स्त्रियांकरतां) उघडण्यांत आले. त्यांत एकंदर १२५६४ प्रौढ माणसांना (११५६९ पुरुष व ९९५ स्त्रिया) साक्षर करण्यांत आलें. ही मोहीम एक मे ते एकतीस मे अशी एक महिना चालली. प्रौढ माणसांनाहि साक्षर करण्याची आवश्यकता आहे हें जनतेला पटवून त्यासंबंधीं जनतेंत उत्साह उत्पन्न करावा, हा या मोहिमेचा मुख्य उद्देश होता आणि तो कल्पनेबाहेर यशस्वी झाला. इतका कीं हें जनसेवेचें महत्त्वाचें कार्य असेंच पुढें चालू ठेवावें, अशी एकमुखी मागणी सर्वांकडून आली. पण समाजसेवासंघासारख्या समाजसेवेचें कार्य करणाऱ्या खाजगी संस्थेला हें एवढें मोठें कार्य चालू ठेवण्याची जबाबदारी पत्करणें शक्य नव्हतें. पुढें हें कार्य सरकारनें आपल्याकडे घेतलें. आतां सरकारतर्फे समाज-शिक्षण-समिति हें कार्य पार

पाडीत आहे. अशीं खाजगी चाललेलीं समाजसेवेचीं कामें सरकारनें आपल्या हातीं घेतलीं म्हणजे कांहीं बिघडलें असें म्हणण्याचा येथें हेतु नाहीं. उलटपक्षीं अशीं कांहीं कामें सरकारनें आपल्या हातीं घेऊन चालविण्यांतहि कांहीं विशेष फायदे आहेत. सरकार अशा कामासाठीं पुरेसा पैसा खर्च करून जरूर तर त्यासाठीं वेगळा करहि बसवून तीं कामें मोठया प्रमाणांत चालवूं शकतें. तसेंच सरकारी पैसाही एकंदर जनतेचा पैसा असतो. त्याच्यावर सर्वांचा सारखा हक्क असतो. त्यामुळें जात, धर्म, पक्ष किंवा अशाच प्रकारचे दुसरे भेदभाव न करतां त्याला सर्वांना सारखें साहाय्य करतां येतें. अशी मिळणारी सरकारी मदत लोकांनाहि हक्कानें मागतां येते. पण खाजगी संस्थांना लोकांच्या दारोदार जाऊन, त्यांना आपल्या कार्याचें महत्त्व पटवून, कार्य लोकप्रिय करून, कार्याला लागणारा पैसा गोळा करावा लागतो. ही मदत सालोसाल मिळेल याची खात्री नसते. अशा स्थितींत खाजगी संस्थांच्या कार्याला विशिष्ट मर्यादा पडतात; नव्हे तशा मर्यादा घालून घेणें भाग पडतें. त्यांना आपलें कार्य व्यवस्थित पण शक्य तितक्या काटकसरीनें चालवावें लागतें. त्यामुळें कार्य लोकप्रिय असलें, तरी विशेष मर्यादेपलीकडे तें जाऊं शकत नाहीं. अशा कार्याला सरकारी मदत नेहमीं मिळते; किंवा मिळाली तरी पुरेशी मिळते असेंहि नाहीं. शिवाय या संस्था विशिष्ट हेतूनें, विशिष्ट ध्येय पुढें ठेवून निष्ठेनें चालविण्यांत येत असल्यामुळें त्यांना कांहीं निर्बंध पाळणें अपरिहार्य असतें आणि सरकारी सार्वजनिक कार्याप्रमाणें सर्वांना त्यांच्यावर सारखा हक्कहि सांगतां येत नाहीं. पण वर्षेच्यावर्षे सतत प्रयत्न करून लोककल्याणासाठीं लोकाश्रयावर चांगलीं नांवारूपास आणलेलीं कामें सरकारनें हातीं घेतलीं कीं त्यांना पुष्कळदां यांत्रिक स्वरूप येऊन लोकाश्रय कमी होण्याचा संभव असतो, हेंहि तितकेंच खरें. कारण सरकार हें एक मोठें यंत्रच असतें आणि तें आधुनिक अजस्त्र यंत्राप्रमाणें घाऊक माल मोठ्या प्रमाणांत काढूं लागतें. त्यामुळें स्वयंस्फूर्तीनें काम करणाऱ्या खाजगी संस्थांप्रमाणें एखाद्या गोष्टीच्या मुळापर्यंत जाऊन, लोकांच्या भावनांशीं एकजीव होऊन, त्यांच्या पैकींच आपण आहोंत हा विश्वास उत्पन्न करून एखाद्या गोष्टीवर उपाययोजना करणें आणि परिस्थितीप्रमाणें आपल्या धोरणांत आणि मार्गांत अवश्य तो बदल वेळोवेळीं करून समाजसेवा करण्याची अवघड कामगिरी करणें, हें त्याला होत नाहीं. आणि लोकांच्या गरजेंतून लोकहितासाठीं लोकांनींच स्वयंस्फूर्तीनें चालविलेलें कार्य म्हणून लोकप्रियता मिळवितां येत नाहीं. तें सरकारच्या आवांक्याबाहेर असतें. हा या दोन प्रकारच्या कामांतील महत्त्वाचा फरक कायमचा जाणवतो, असा सर्वत्र अनुभव आहे. लोकांच्या अडचणींचें आपुलकीनें निरीक्षण करून वेळोवेळीं परिस्थिति बदलेल तशी आपल्या कार्याची दिशाहि बदलून, कार्याबद्दल लोकांची आस्था, उत्साह कायम ठेवण्याचा प्रयत्न खाजगी संस्था करूं शकतात. पण सुस्त, थंड, निरुत्साही, निर्जीव सरकारी यंत्रणा, आपल्या रुळलेल्या मार्गानें ना आस्था, ना भावना, ना कदर, अशी गजगतीनें चाललेली असते. लोक-

मताच्या अंकुशाचा प्रहार होऊन या हत्तीनें कधीं मान किंवा कधीं कान हालविले तरी त्याचा स्वभावधर्म बदलूं शकत नाहीं.

## समाजसेवेची आवश्यकता नाहीं असें कधींच होत नाहीं.

समाजसेवेचें कार्य इतकें व्यापक आहे कीं तें संपावें असें आपल्याला वाटत असलें–आणि हेंच समाजसेवकांचें ध्येय असावयास पाहिजे-तरी तें संपलें, असें कधीं होत नाहीं. इंग्लंडांत आज एवढी सर्वोपयोगी आणि सर्वव्यापी सामाजिक योजना अंमलांत आहे तरीदेखील तेथील समाजसेवेचे सर्व प्रश्न सुटले आहेत, नवीन उपस्थित होत नाहींत, किंवा समाजसेवेची आतां आवश्यकता उरलेली नाहीं. असें झालेलें नाहीं. उलट अनेक निकडीचे प्रश्न अजून सुटावयाचे आहेत आणि त्यांत नवीन प्रश्नांची भर सारखी पडत आहे. उदाहरणार्थ म्हाताऱ्या माणसांना कार्यनिवृत्तीनंतरची मदत कायद्यानें मिळत असली तरी त्यांच्या संबंधींचे अनेक प्रश्न अजून सुटलेले नाहींत. कारण निव्वळ पैशाची मदत मिळून ते सुटण्यासारखे नाहींत. एवढें खरें कीं पैसा नसला तर त्यांची अगदींच अनुकंपनीय स्थिति झाली असती. पण त्यांना पैशाशिवाय दुसऱ्या अनेक गोष्टींची जरूरी असते. त्या गोष्टी स्वयंस्फूर्तीनें परोपकार बुद्धीनें दुःखिताला सुखी करण्यासाठीं, त्यांचे दुःख हलकें करण्यासाठीं कांहीं तरी करावें, ही तळमळ असणाऱ्या खाजगी संस्थाच करूं शकतात. म्हाताऱ्यांच्या परावलंबी स्थितीला, लोकवस्तीपासून दूर नाहीं, पण गर्दीगडबडीच्या वस्तींत नाहीं, बाजारहाट करण्याला सोईचें, जवळ वाहानांची सोय असलेलें, औषधोपचाराची चटकन् व्यवस्था करतां येईल असें घर हवें असतें. ही माणसें अगदीं परस्वाधीन असल्यामुळें त्यांच्या दुसऱ्या अनेक प्रकारच्या गरजा भागविण्याची व्यवस्था व्हावी लागते. ती जवळ पैसा असूनहि होऊं शकत नाहीं. सर विल्यम बेवरीज हे आपल्या अहवालांत म्हणतात. कीं अशा वृद्ध माणसांच्या संख्येचें प्रमाण एकंदर लोकसंख्येशीं सतराला एक असें या शतकाच्या आरंभीं होतें. स. १९३१ मध्यें तें दहाला एक असें झालें. १९६१ मध्यें सहाला एक होईल. आणि त्यानंतर तें असें वाढत जाईल.[1] या वरून हा प्रश्न तेथें दिवसेंदिवस कसा बिकट होत जाणार आहे हें दिसून येईल.

म्हातारें माणूस आपल्या आयुष्यांतलें कार्य संपवून समाजाचा अखेरचा निरोप घेण्याच्या बेतांत असतें. म्हणून त्याच्या आयुष्यांत त्यानें काय केलें आणि काय केलें नाहीं, याचा फारसा विचार न करतां, त्याच्या उर्वरित आयुष्यांत त्याचा हा अत्यंत कठीण पराधीन काळ सुखानें जाईल, त्याला नुसती पैशाचीच नव्हे तर खाण्यापिण्याची, औषधपाण्याची, राहाण्याची व दुसऱ्या अनेक प्रकारची मदत मिळून त्याचे हे शेवटचे

---

1. Voluntary Action–A Report on Methods of Social Advance by Lord Beverage. P. 233.

दिवस सुसह्य होऊन त्याला सुखानें मरण येईल असें पाहणें, समाजाचें कर्तव्य आहे. अशी व्यवस्था करणाऱ्या खाजगी संस्था सुदैवानें इंग्लंडमध्यें आहेत.

म्हातारा माणूस ज्याप्रमाणें समाजाची जोपासना करून कार्यनिवृत्त झालेला असतो तसेंच मूल समाजाचा कार्यभाग उचलण्याची पूर्वतयारी करीत असतें. एक समाजाचे ओझें वाहून थकला भागलेला असतो तर दुसरा ताजातवाना असून तो भार स्वतःच्या डोक्यावर घेण्याच्या तयारींत असतो. म्हणून मुलाला आईबाप असोत किंवा तें पोरकें असो; तें समाजाचा एक भावी नागरिक असतें. त्याच्या कर्तृत्वावर समाजाचें भवितव्य अवलंबून असतें. म्हणून त्याचा कोण आहे आणि कोण नाहीं, हा फारसा महत्त्वाचा प्रश्न नसतो. तर त्याची सर्व दृष्टीनें योग्य अशी व्यवस्था होत आहे किंवा नाहीं, हा समाजाच्या दृष्टीनें फार महत्त्वाचा प्रश्न असतो. विशेषतः असहाय, आईबाप नसलेल्या किंवा असूनहि पोसण्यास असमर्थ असलेल्या, आबाळ होत असलेल्या मुलांचा प्रश्न मोठा बिकट असतो. सार्वजनिक संस्था, सरकारनें चालविलेल्या संस्था, अशा मुलांच्या अन्नपाण्याची आणि शारीरिक जोपासनेची व्यवस्था पाहतात. पण नुसत्या शारीरिक जोपासनेनें हा प्रश्न सुटण्यासारखा नसतो. माणसाला विशेषतः मुलांना आपलें म्हणणारें, त्यांना जवळ ओढणारें, प्रेम करणारें त्यांच्या भावनात्मक गरजा पुऱ्या करणारें कोणीतरी असावें लागतें. तसें नसल्यास आपल्याला आपलें असें कोणी नाहीं, आपण निराधार आहोंत, या विवंचनेनें त्यांचें मन व्यथित होतें व त्यामुळें समाजाला त्रासदायक होणारे अनेक बिकट प्रश्न उत्पन्न होतात. आईबाप मुलांची जोपासना करतात, ती पैशासाठीं करीत नाहींत; तर मुलांची आवड, त्यांच्यासाठीं वाटणारी नैसर्गिक आस्था व प्रेम यांच्यासाठीं. म्हणून अशा पोराबाळांची व्यवस्था करूनहि त्यांच्या भावनात्मक गरजा भागविणारीं, त्यांच्यासाठीं जीव तोडणारीं, त्यांचे मानलेले पालक या भावनेनें काम करणारीं, त्यांना आपल्या घरीं ठेवण्यास तयार असलेलीं माणसें, विशेषतः कुटुंबें हवीं असतात. हें कार्य सरकारी संस्था करूं शकत नाहींत. म्हणून सरकारी संस्थांत हीं मुलें न ठेवतां त्यांना बाळगण्याला उत्सुक असलेल्या खाजगी कुटुंबांत त्यांना ठेवणें सर्व दृष्टींनीं इष्ट असतें, असा रशियासुद्धां जगांतील सर्व राष्ट्रांचा अनुभव आहे.[1]

समाजांत शारीरिक, मानसिक, बौद्धिक अशीं अनेक प्रकारचीं व्यंगें, व्याधी अधूपणा किंवा दोष असलेल्या माणसांचा मोठा वर्ग असतो. त्यांचीं दुःखें अनेक प्रकारचीं असतात. तीं सारीं पैशानें नाहींशीं होण्यासारखीं नसतात. त्यांना पैशाच्या

---

1. Children in Need by Melitta Schmideberge, M. D. ( Berlin ) Psychiatrist, Institute for the Scientific Treatment of Delinquency, London.

लोभानें नव्हे, तर त्यांची पराधीन स्थिति, परावलंबीपणा पाहून ज्यांचा जीव तळमळतो, त्यांच्यासाठीं कांहींतरी करणें हें आपलें कर्तव्य आहे, असें वाटतें, अशींच माणसें साहाय्य करूं शकतात आणि असें करण्यांत मुख्यतः दुसऱ्याचें दुःख कमी करून त्याला होणाऱ्या सुखांत आपण आनंद मानावा, एवढाच त्यांचा हेतु असतो.

## स्वयंस्फूर्तीनें समाजसेवा करणाऱ्या संस्थांना साहाय्य मिळालें पाहिजे

यासाठीं ज्यांनीं स्वतः समाजसेवक होऊन समाजसेवेचीं कामें नाना प्रकारच्या आपत्तींना, अडचणींना तोंड देऊन, स्वार्थत्याग करून, अनेक प्रकारच्या प्रयत्नांनीं यशस्वी केलीं व आजतागायत चालू ठेवलीं त्यांना जणूं काय या कार्याशीं त्यांचा संबंधच नाहीं असें मानून, विसरून, दूर करून किंवा असहाय्य स्थितींत ठेऊन सरकारच कधीं चालवयाचें नाहीं, असें आज इंग्लंडांतील अस्तित्वांत असलेल्या सामाजिक योजनेची रूपरेखा तयार करणारे लॉर्ड बेवरीज यांनीं आपल्या अहवालांत पुनः पुन्हा बजावलें आहे. आणि इंग्लंडांतील सरकार या सल्ल्यानुसार चालत आहे. सरकारकडे पैसा असतो (अर्थात् जनतेचा) आणि पुष्कळशा गोष्टी पैशानें होतात, हें खरें असलें तरी अनेक गोष्टी पैशानें होऊं शकत नाहींत हेंहि खरें आहे. आणि ज्या पैशानें होऊं शकत नाहींत त्या सरकार करूं शकत नाहीं. या दृष्टीनें सरकारी यंत्रणा कांहीं बाबतींत निरुपयोगी असते. अशा बाबतींत समाजसेवेला भरपूर वाव आहे. त्या भावनेनें क्वचित् थोडीं माणसें आज काम करीत असलीं; तरी तीं अपवादात्मकच म्हणावीं लागतील.

समाजसेवा ही दुसऱ्याच्या उपयोगी पडण्याच्या नैसर्गिक प्रवृत्तींतून उत्पन्न झालेली असते. अशा प्रवृत्तीच्या माणसांना एकत्र आणून उत्तेजन देऊन, जरूर ती संधि देऊन, मार्गदर्शन करून, समाजसेवा करणाऱ्या संस्था संघटित प्रयत्न करतात. आणि आपल्या संघटनेच्या द्वारें समाजांतील अडचणी, अन्याय, संकटें, उणीवा यांच्यासंबंधीं माहिती गोळा करून त्यांच्या प्रतिकाराचे, त्या दूर करण्याचे मार्ग शोधून, त्याला लोकमत अनुकूल करून घेऊन त्या नाहींशा करण्याचा प्रयत्न करतात. कधींकधीं सामाजिक अडचणींना सरकारच कारण असण्याचा संभव असतो. अशा वेळीं तिऱ्हाईत या दृष्टीनें या संस्था महत्त्वाचें कार्य करूं शकतात. म्हणून सरकारनें विशेषतः लोकशाही सरकारनें समाजाच्या सर्वांगीण सुधारणेला त्यांची आवश्यकता आहे, याची जाणीव ठेवून खाजगी संस्थांचें स्वातंत्र्य व वैशिष्ट्य यांच्या आड न येतां, त्यांना सढळ हातानें साहाय्य केलें पाहिजे, त्यांच्या कार्याला वाव दिला पाहिजे, प्रोत्साहन दिलें पाहिजे, त्यांच्या मार्गांतील अडचणी दूर केल्या पाहिजेत. सरकारी आणि खाजगी किंवा सार्वजनिक आणि स्वयंस्फूर्तीनें काम करणाऱ्या संस्था या प्रत्येकाचें वेगळें विशिष्ट कार्यक्षेत्र असल्यामुळें दोघांनाहि वाव

आहे. पण प्रश्न आहे तो परस्परांच्या साहाय्याचा. दोघांनींहि आपापल्या क्षेत्रांत आपल्या परिस्थितीप्रमाणें, पण एकमेकांचे पूरक आहों, शत्रू नाहीं याची जाणीव ठेवून कार्य करणें हें उभयतांच्या हिताचें नव्हे; तर ज्याचें आपण भलें करूं इच्छितों, त्या एकंदर समाजाच्या हिताचें आहे.

कोणतेंहि सरकार झालें तरी समाजसेवेच्या सार्‍या गोष्टी करूं शकेल असें नाहीं. विशेषतः आपलें भारतीय सरकार अनेक प्रकारच्या अडचणींत आहे. अन्न, वस्त्र आश्रयाचें स्थान, शिक्षण अशा अगदीं प्राथमिक स्वरूपाच्या गरजा कीं, ज्यांची तरतूद करणें हें लोकहितकारी सरकारची प्राथमिक अशी पूर्वतयारी आहे, त्याहि आज पुर्‍या होऊं शकत नाहींत. अशा स्थितींत खाजगी संस्था आपल्या कुवतीप्रमाणें जें काय कार्य करीत आहेत, तें अधिक कार्यक्षमतेनें होईल असें सरकारनें पाहिलें पाहिजे. सरकारनें 'लोकहितकारी राज्य' हें ध्येय पुढें ठेविलें असलें; तरी समाजसेवा करणार्‍या खाजगी संस्थाची आवश्यकता मुळींच नष्ट झालेली नाहीं. तेव्हां अशा संस्थांना त्यानें अगत्यानें सर्वतोपरी मदत केली पाहिजे.

# प्रकरण १२ वें

# उपसंहार

अगदीं रानटी स्थितींतला, शिकारीवर उपजीविका करणारा मनुष्य आपल्या दिवसभराच्या पोटापाण्याची सोय झाली कीं तेवढ्यावर समाधान मानतो. त्याच्यापेक्षां अधिक दिवसांची तरतूद करण्याकडे त्यांचें फारसें लक्ष नसतें. पण पुढें तो शेतीभाती करूं लागला, झाडांची लागवड करूं लागला कीं, धान्याचा पुरवठा करणें, मांस सुकवून ठेवणें, अशांसारख्या गोष्टी करून आपल्या पुढील काळाची तजवीज करण्यास सुरुवात करतो. त्याला दुष्काळ, पूर, रोगराई अशा आपत्ति येण्याची भीति वाटते. म्हणून तो त्या बाबतींतहि थोडी फार व्यवस्था करूं लागतो. आणि अशा रीतीनें हळुहळू तो स्वतःला सामाजिक सुरक्षितता आणण्याचा प्रयत्न करूं लागतो.

## समाजाच्या हितासाठीं कांहीं तरी करण्याची भावना जागृत झाली पाहिजे

तो जों जों सुधारूं लागतो तों तों त्याच्या गरजा वाढूं लागून त्या भागविण्यासाठीं त्याला दुसऱ्याच्या मदतीची अधिकाधिक आवश्यकता भासूं लागते. पण दुसऱ्याच्या साहाय्याची अपेक्षा करावयाची तर आपणहि दुसऱ्याला सहाय्य करावयास तयार असलें पाहिजे. आपलें सारें जीवन, सारें सुख, इतकेंच नव्हे तर आपलें अस्तित्वहि अशा परस्परांच्या साहाय्यावर अवलंबून आहे, हें त्यांच्या अनुभवास येतें आणि माणूस दुसऱ्याला मदत करूं लागतो, दुसरेहि त्याला मदत करूं लागतात. या परस्परांना साहाय्य करण्याच्या प्रयत्नांतून सामाजिक जबाबदारीची जाणीव उत्पन्न होते. एकंदर समाजाची उन्नति झाली कीं तींत आपलीहि उन्नति होते, हें माणसाला कळूं लागतें आणि ज्यांत समाजाचें–साऱ्यांचेंच हित आहे, अशा गोष्टी करण्याकडे त्याची अधिकाधिक प्रवृत्ति होऊं लागली कीं सामाजिक जीवनाला महत्त्व येऊं लागतें. रोजच्या गरजा भागून त्याचें समाधान होत नाहीं. अन्नवस्त्रादि प्राथमिक गरजांची तरतूद झाली, रोगराईचा प्रतिकार करण्याचीं साधनें उपलब्ध झालीं, समाज संघटित होऊं लागला, शांतता व सुव्यवस्था नांदूं लागली आणि सामाजिक सुरक्षितता प्राप्त झाली; तरी तेवढ्यानें सारें झालें, असें मानलें जात नाहीं त्यामुळें मूलभूत गरजा पुरवल्या जाऊन आरोग्य व सुरक्षितता प्राप्त होईल. पण पुढें ज्या समाजानें आपलें संगोपन व संरक्षण करून सर्व प्रकारच्या सुखसोईंची तरतूद करून ठेवली, आपल्यांत आशाआकांक्षा उत्पन्न करून त्यांची पूर्तता करण्याचे मार्ग उपलब्ध करून ठेवले, त्या समाजाची परतफेड करण्याकरतां आपण कांहीं तरी केलें पाहिजे, त्या समाजाच्या

हिताकरतां, निव्वळ आपल्या स्वार्थासाठीं नव्हे, कांहीं तरी करण्याची जबाबदारी आपल्यावर आहे, तें आपलें कर्तव्यच आहे, ही भावना व्यक्तीच्या व्यक्तित्वाचा पूर्ण विकास होण्यास माणसांत जागृत व्हावी लागते. व्यक्ति प्रथम आपल्यापुरतें पाहूं लागली, नंतर ती स्वार्थैक दृष्टीनें कां होईना समाजाशीं सहकार्य करूं लागली व त्यांतील व्यक्तींचें सुख पाहूं लागली आणि शेवटीं समाजाचें हित तेंच आपलेंहि हित आहे; समाजाच्या हिताव्यतिरिक्त आपलें हित नाहीं, हें तत्त्व पटून, स्वार्थापेक्षां परहिताकडे लक्ष देऊन ती समाजाची काळजी वाहूं लागली, आपल्या वैयक्तिक सुखापेक्षां किंवा सोयीगैरसोयीपेक्षां समाजाच्या सुखाला व सोयींला व्यक्ति अधिक महत्त्व देऊं लागली कीं सामाजिक दृष्टया अंतिम साध्य तिनें गांठलें, असें मानावयास हरकत नाहीं.

## माणसाच्या भावनात्मक गरजाहि महत्त्वाच्या असतात.

पण माणसाची दृष्टि इतकी व्यापक व्हावयाला समाजांतले अनेक कृत्रिम भेदभाव, उच्चनीचपणाच्या कल्पना, जातीपोटजाती, धर्म-पंथ यांनीं उत्पन्न केलेले माणसांमाणसांतील, समाजासमाजांतील भेद नाहींसे होऊन बहुतांशीं तरी तो समाज एका पातळीवर यावा लागतो. कांहीं सुधारलेले, कांहीं मागासलेले, कांहीं स्पृश्य, कांहीं अस्पृश्य, कांहीं अर्धवट रानटी तर कांहीं पूर्णपणें रानटी, अशा निरनिराळ्या सामाजिक पातळीवर असलेले, एकमेकांपासून दुरावलेले, एकाला दुसऱ्या समाजांत काय चाललें आहे याची दाद नाहीं, त्यांत काय चाललें आहे तें समजून घेण्याची इच्छाहि नाहीं, कोणाची कोणाला पर्वा नाहीं, असें असलें तर तो समाज संघटित तरी कसा होणार, त्याचें ऐक्य कसें होणार, तो एका समान दर्जाचा कसा होणार ? आणि ही समता नुसती आर्थिक बाबतींतच होऊन चालणार नाहीं. कारण आर्थिक प्रगति झाली आणि ती महत्त्वाची असली तरी सामाजिक प्रगतीहि तितकीच महत्त्वाची आहे. माणसाच्या भावनात्मक गरजाहि इतर गरजांइतक्याच महत्त्वाच्या असतात आणि त्या आर्थिक मार्गांनीं भागूं शकत नाहींत. मनुष्य समाजप्रिय प्राणी आहे. त्याला समाजाचा सहवास लागतो; तो समाजांत राहाण्यासाठीं धडपड करतो; तो केवळ त्याला समाजांत मिळणारें शारीरिक संरक्षण किंवा आर्थिक फायदा यासाठीं नव्हे; तर या सर्व गोष्टींबरोबर समाजापासून त्याला जें भावनात्मक सुख, स्फूर्ति, उत्तेजन मिळतें त्यासाठीं. हें उत्तेजन देणारें सहवाससुख जर खऱ्या अर्थानें त्याला मिळत नसलें, कृत्रिम भेदभावाच्या भिंती त्याच्या आड येत असल्या, तर तो अस्वस्थ होऊन त्याला इतरांचा राग येतो, संताप येतो आणि त्यामुळें तो इतर समाजांशीं सहकार्य तर करीत नाहींच; उलट त्याला विरोध करण्यास प्रसंगीं आततायी कृत्येंहि करण्यास उद्युक्त होतो. या भेदभावामुळें लहानलहान समाज परस्परांच्या जवळ येण्याऐवजीं अधिकाधिक दुरावतात.

इंग्रजी राज्यांत सरकारच्या ‘ फोडा आणि झोडा ’ या नीतीमुळें हे लहानलहान समाज एकमेकांच्या जवळ येण्याऐवजीं अधिकच दुरावले. इतकेंच नव्हे; तर परस्परांना पाण्यांत पाहूं लागले. आतां स्वराज्य आल्यावर या फुटीर वृत्तीला उत्तेजन देण्याचें सरकारनें कमी केलें, त्यासंबंधीं कायदेकानू केले व अजून नवीन कायदे होत आहेत. कायद्याच्या दृष्टीनें जें काय करणें आवश्यक आहे, तें सारें सरकार करीत आहे. पण या बाबतींत कायद्याचा उपयोग एका ठराविक मर्यादेपर्यंतच होतो. याला खरा उपाय म्हणजे याचे अनिष्ट परिणाम कळून लोकांच्या वृत्तींत बदल झाला पाहिजे.

समाजाच्या एकीकरणाच्या दृष्टीनें आज निराशाजनकच स्थिति आहे. शहरांत राहाणारे आणि आपल्याला सुधारक म्हणविणारे थोडे लोक सोडले, तर जातीपोटजाती, पोटजातींत पुन्हा पोटजाती, मागासलेले वर्ग हे भेदाभेद अद्याप मानले जातात. कोणत्याहि प्रकारच्या आधुनिक सुधारणेचा स्पर्शहि न झालेल्या जाती व जमाती यांची सुधारणा करून त्यांना एका पातळीवर आणणें, सर्वांना सारखें साहाय्य मिळून ते प्रगतीच्या मार्गाला लागतील असे प्रयत्न होणें, आज अत्यावश्यक आहे. असे प्रयत्न करून व्यक्तीव्यक्तींतील, व्यक्ति आणि समाज यांतील आणि भिन्न समाजासमाजांतील परस्परसंबंध अधिक सलोख्याचे करणें हें समाजसेवेचें एक महत्त्वाचें अंग आहे.

## आदिवासी लोकांची सुधारणा

आदिवासी जातींचाच प्रश्न घ्या. भारतांत त्यांची संख्या दोन कोटीवर आहे, आसाम, ओरिसा, मध्यप्रदेश आणि मुंबई राज्यांतील खानदेश, नाशिक, सुरत, भडोच, पंचमहाल, ठाणें आणि कुलाबा या भागांतील डोंगरी प्रदेशांत मुख्यतः त्यांची वस्ती आहे. यांतील बहुसंख्य लोक इतक्या रानटी स्थितींत आहेत कीं, आधुनिक सुधारणेचा त्यांच्यावर थोडासुद्धां परिणाम झालेला नाहीं. ते जंगलांत भटकत राहून कंदमुळें, फळें, शिकार यांच्यावर उपजीविका करतात. ते रानटी स्थितींत असले तरी त्यांच्यांत कांहीं चांगल्या गोष्टीहि आहेत. त्यांच्यांत शिस्त आहे. लोकशाहीशीं संबंध आलेला नसतांहि लोकशाहीचीं कांहीं तत्त्वें ते कसोशीनें पाळतात. आपल्या जमातीची किंवा वडीलधाऱ्या लोकांची आज्ञा मान्य करतात. लोकवस्तीपासून फार दूर, रस्ते नाहींत, रहदारी नाहीं, वाहनांची सोय नाहीं, पराकोटीचें अज्ञान, वैद्यकीय मदतीचा अभाव, आर्थिक स्थिति अत्यंत हलाखीची अशा परिस्थितींत ते आहेत. अशा सर्वतोपरी प्रतिकूल परिस्थितींत बाहेरचे जे काय थोडे लोक त्यांच्या वस्तींत प्रवेश करतात, त्यांचा हेतु त्यांना लुबाडणें, त्यांची पिळवणूक करणें हाच असतो. फार काय त्यांची सुधारणा करण्याकरतां, त्यांना साहाय्य करण्याकरतां म्हणून जे समाजसेवक तेथें जातात, त्यांपैकीं बहुतेकांचा खरा हेतु समाजसेवा करणें हा असेल असें म्हणवत नाहीं. कै. ठक्करबाप्पांनीं काढलेलें भिल्ल-सेवा-मंडळ अशासारख्या अगदीं अपवादात्मक संस्था

मात्र त्यांना निस्वार्थबुद्धीनें साहाय्य करण्याचें कार्य करीत आहेत. पण या लोकांच्या स्थितीकडे सरकार आतां अधिक लक्ष देऊं लागलें आहे.

उपरिनिर्दिष्ट परिस्थितीमुळें यांच्या सुधारणेचा प्रश्न हातीं घेतांना अशा लुबाडणाऱ्या व दिशाभूल करणाऱ्या लोकांपासून त्यांना सावध करण्याचे, त्यांचा बचाव करण्याचे प्रयत्न प्रथम करणें आवश्यक असतें. तसेंच मित्रत्वाच्या नात्यानें त्यांचा विश्वास संपादन करून, त्यांच्या अडचणी समजावून घेऊन, सहानुभूतीनें त्यांच्याशीं सहकार्य करून त्यांच्या त्या अडचणी, त्यांच्यावर दडपण आणणाऱ्या गोष्टी, नाहींशा करून शेवटीं ते एकंदर समाजाशीं एकजीव होतील, या दृष्टीनें त्यांची हळुहळू सुधारणा करण्याचे प्रयत्न झाले पाहिजेत. हें अत्यंत महत्त्वाचें व फार मोठें कार्य आहे.

या लोकांत कार्य करण्यासाठीं नेमावयाचीं माणसें किंवा समाजसेवक कसे असावेत, याची बरोबर कल्पना भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनीं दिली आहे. ती याच कामांत नव्हे तर समाजसेवेच्या इतर कामांतहि मार्गदर्शक होण्यासारखी आहे. पंडितजींच्या मतें या जमाती असलेल्या भागांत सरकारी अधिकारी किंवा समाजसेवक नेमतांना फार काळजी घेणें आवश्यक असतें. कोठेंहि सरकारी अधिकारी आणि समाजसेवक नेमतांना थोडीफार काळजी घ्यावीच लागते; पण या भागांत ते नेमतांना दुप्पट काळजी घेणें आवश्यक आहे. कारण या क्षेत्रांत काम करणारा अधिकारी नुसता परीक्षा पास झालेला किंवा चालू कामाचा मामुली अनुभव असलेला असा असून चालत नाहीं. अशा अधिकारी व्यक्तीला–पुरुषाला किंवा स्त्रीला–ह्या प्रश्नाचें संपूर्ण आकलन व्हावयास पाहिजे. हा प्रश्न तिला जिव्हाळ्याचा वाटावयास हवा. तिचें मन ह्या कामांत हवें. ठरलेल्या वेळापुरती कांहीं तास, जुलूम म्हणून कचेरींत बसणारी आणि नंतर आपणांस कुठें या भलत्याच गैरसोयीच्या ठिकाणीं आणून टाकलें असें म्हणून नशिबाला दोष देत बसणारी अशी व्यक्ति या कामाला उपयोगीं पडणार नाहीं. अशा एखाद्या परीक्षा पास झालेल्या सुशिक्षित व्यक्तीपेक्षां अगदीं अशिक्षित पण अशा लोकांबद्दल आस्था वाटणारी, त्यांच्याशीं मैत्री करण्यास उत्सुक असलेली, त्यांच्यांत जाऊन राहाण्यास तयार असणारी अशी एखादी सामान्य व्यक्ति तिथें नेमणें अधिक चांगलें ! असा आत्मीयतेनें काम करणारा माणूस, अत्यंत बुद्धिमान पण ज्याचें अशा प्रकारच्या कामांत मन नाहीं अशा माणसापेक्षां, पुष्कळच चांगला. अशा ठिकाणीं अधिकारी किंवा समाजसेवक म्हणून जाणारी व्यक्ति त्या वनवासी लोकांच्या जीवनाशीं एकजीव होण्यास तयार असली पाहिजे. त्यांच्या झोपडींत जाण्यास, त्यांच्याशीं बोलण्याचालण्यांत, त्यांच्या-बरोबर खाण्यापिण्यांत, जरूर तर विडी सिगारेट ओढून त्यांच्याशीं खेळीमेळीनें वागण्यांत तिला कमीपणा वाटतां कामा नये. आपण कोणी अधिकारी आहोंत किंवा त्या

वनवासी लोकांहून वेगळे आहोंत असें न दाखवितां, त्यांचा विश्वास संपादन करून त्यांना सल्लामसलत देण्यास तत्पर असणारी व्यक्तीच या कामाला लायक होय.[1]

समाजांत असे जे वर्ग आहेत त्यांची सुधारणा किंवा सेवा करतांना, त्यांतील बहुसंख्य लोकांचा अंतर्भाव होणाऱ्या व बहुसंख्य लोकांना उपयोगी पडतील अशा सामुदायिक स्वरूपाच्या योजना प्रथम हातीं घेणें आवश्यक असतें. त्यांतील बहुसंख्य लोकांच्या ज्या सामान्य अडचणी, सामान्य दोष, सामान्य संवयी असतील त्या सामुदायिक मार्गांनीं, सामुदायिक उपायांनीं, सामुदायिक प्रयत्नांनीं नाहींशा कराव्या लागतात. सामुदायिक प्रयत्न यशस्वी होऊन बहुसंख्य लोक एका पातळीवर येऊं लागले कीं मग वैयक्तिक प्रयत्नांचें क्षेत्र सुरू होतें. लोक अशिक्षित असले तर त्यांना शिक्षण देणें जरूर असतें; पण बहुसंख्य मुलांना असें शिक्षण मिळूं लागलें कीं, या सामुदायिक प्रयत्नांत कांहीं विशिष्ट कारणांमुळें, विशिष्ट अडचणीमुळें, विशिष्ट अंगभूत दोषांमुळें जीं मुलें इतरांच्या पातळीवर येऊं शकत नाहींत, त्यांच्यासाठीं काय करावें हा प्रश्न उपस्थित होतो. त्यांच्यासाठीं मग त्यांच्या विशिष्ट परिस्थितीला योग्य असे कांहींतरी वेगळे वैयक्तिक प्रयत्न करावे लागतात.

## शारीरिक व्यंग असलेल्या माणसांची सोय

एखादा मनुष्य शरीरानें अधू असला तर तो धडधाकट माणसाप्रमाणें सामान्यतः काम करूं शकणार नाहीं ही गोष्ट खरी; पण अशा शारीरिक व्यंग असलेल्या माणसाला आपलें कर्तत्व आणि कौशल्य दाखवितां येईल असें सोईवार काम मिळाल्यास, तो अव्यंग माणसाइतकी आपली कर्तबगारी दाखवूं शकतो, असा अनुभव आहे. अशा शारीरिक व्यंग असलेल्या माणसांना चांगल्या रीतीनें आणि निर्धास्तपणें काम करतां येईल अशी व्यवस्था पाश्चात्य राष्ट्रांतील कारखान्यांत करण्यांत येते. अशी व्यवस्था झाल्यास हीं माणसें स्वावलंबी होऊं शकतात; इतकेंच नव्हे तर त्यांचें ओझें समाजावर न पडतां उलट तीं समाजालाच साहाय्य करतात. कोणालाहि प्रत्येक काम चांगलें करतां येण्यासारखें नसतें. त्याचप्रमाणें प्रत्येक कामाला सगळ्या प्रकारचे गुण लागतात असेंहि नाहीं. कौशल्य आणि वैयक्तिक कर्तृत्वशक्ति हीं लक्षांत घेऊन जर अधू माणसाला त्याच्या सोईस्कर असें काम मिळालें तर त्याचा अधूपणाहि त्याला जाणवत नाहीं. त्याच्या व्यंगामुळें त्याच्यांत आलेला दुबळेपणा आणि परावलंबीपणा जाऊन त्याच्या प्रगतीचा मार्ग मोकळा होतो. तो स्वावलंबी आणि स्वाभिमानी जीवन जगूं शकतो. अमेरिका, कानडा, स्वीडन, नॉर्वे,

---

1 Speech delivered by Pandit Jawaharlal Nehru at the opening session of the Scheduled Tribes and Scheduled Areas Conference at New Delhi on 7 th June 1952.

इंग्लंड इत्यादि सुधारलेल्या राष्ट्रांनीं या गोष्टींकडे विशेष लक्ष दिलें आहे. या देशांत या कामासाठीं स्वतंत्र सरकारी अधिकारी नेमलेले असतात. ते अशा शारीरिक व्यंग असलेल्या लोकांची इत्थंभूत चौकशी करतात. वेगवेगळ्या तज्ज्ञांच्या सहाय्यानें प्रथम त्याचें व्यंग साफ नाहींसें करतां येईल काय तें पाहातात; तसें नच झालें तर तें व्यंग ते शक्यतितकें कमी करण्याचे सर्वतोपरी प्रयत्न करतात. नंतर त्याला शालेय शिक्षण व धंदेशिक्षण देण्याची व्यवस्था करतात. त्यासाठीं जी जी साधनसामुग्री लागेल ती ती पुरवितात. त्याला काम करून स्वावलंबी होण्याला प्रवृत करतात. दिवसभर नेटानें काम करतां यावें, तसा त्याच्यांत विश्वास उत्पन्न करावा, तशी त्याची मानसिक तयारी व्हावी, तशी त्याला संवय लागावी आणि कामास एकदां लागला कीं तो निश्चित यशस्वी व्हावा अशी त्याची सर्व प्रकारें तयारी करतात आणि मग कारखान्यांत त्याला योग्य असें काम शोधून देतात. इतकेंच नव्हे तर तो कामास लागल्यावर त्यांत अयशस्वी होऊं नये म्हणून तो व त्याचा कारखानदार या दोघांशींहि सारखा संबंध ठेवून तो सतत काम करीत राहील, त्याची सारखी प्रगति होईल असे प्रयत्न करतात. अशा प्रकारच्या शारीरिक व्यंग असलेल्या लोकांना कारखानदारांनीं ठराविक प्रमाणांत नोकरी देण्याची व्यवस्था करावी असा कायदाहि या राष्ट्रांनीं केला आहे. जर्मनींत स. १९२३ मध्यें अशा प्रकारचा कायदा प्रथम झाला. युरोप अमेरिकेंतील बहुतेक राष्ट्रांत हा कायदा आतां अमलांत आहे. या गोष्टी आज आपल्या देशांत करतां येतील असें नाहीं. कारण धट्टयाकट्टया माणसालाहि आज जेथें काम मिळण्याची अडचण आहे; तेथें लंगड्यापांगळ्यांची सोय कशी होणार ? पण या बाबतींत इतर सुधारलेल्या राष्ट्रांनीं काय केलें आहे व आपण काय करावयास हवें याची बरोबर कल्पना येण्यासाठीं या गोष्टीचा मुद्दाम येथें उल्लेख केला आहे.

ही जशी शारीरिक व्यंग असलेल्या माणसाची व्यवस्था झाली, तशी इतर प्रकारचे दोष किंवा व्यंगें असलेल्या माणसांबद्दल वैयक्तिक प्रयत्न होऊन त्यांचा परावलंबीपणा शक्यतितका नाहींसा करून त्यांना समाजाचे कर्तृत्ववान घटक बनविणें आवश्यक असतें. शारीरिक, मानसिक, बौद्धिक अशा अनेक प्रकारच्या दोषांमुळें कांहीं माणसांची प्रगति थांबते, तीं समाजांत मागें पडतात, समाजाच्या प्रगतीला अडथळा करतात आणि शेवटीं समाजाला भारभूत होतात. तसेंच कांहीं माणसांना कांहीं कारणांमुळें समाजाशीं जुळतें घेतां येत नसल्यामुळें तीं असंतुष्ट होतात, समाजावर रुष्ट होतात आणि शेवटीं समाजाला साहाय्य तर करीत नाहींतच; पण उलट आपला भार समाजावर टाकून समाजाच्या अडचणींत भर घालतात. अशा माणसांत गुन्हेगार वृत्तीच्या माणसांचा समावेश होतो. गुन्हे नेहमीं दुसऱ्याचा सूड उगवण्याकरतां करण्यांत येतात असें नाहीं. परिस्थिति आणि वैयक्तिक दोष हेहि गुन्हेगारीला कारणीभूत होतात. गुन्हेगारीला प्रवृत्त करणाऱ्या या गोष्टींना आळा घालणें शक्य असल्यामुळें अशा माणसांचा नुसता

तिरस्कार करून, त्यांचें नांव सोडून देऊन किंवा त्यांना दूर ठेवून त्यांचा किंवा समाजाचा कांहीं फायदा होत नाहीं. समाजाचे वैरी असले तरी तेहि त्याचे घटकच आहेत, याची जाणीव ठेवून त्यांच्या अडचणी, त्यांचे दोष, त्यांच्या दुर्वर्तनाचीं कारणें शोधून काढलीं पाहिजेत व तीं दूर करण्याचे प्रयत्न झाले पाहिजेत. हे प्रयत्न मुख्यतः गुन्हा घडण्यापूर्वी तसेंच गुन्हा करून मनुष्य तुरुंगांत गेल्यास तेथें आणि शेवटीं तुरुंगांतून सुटून तो मोकळा झाल्यावर समाजांत मिळून समाजाला उपद्रव देईनासा होईपर्यंत अनेक प्रकारें करण्यांत येतात. समाजस्वास्थ्यासाठीं अशा प्रयत्नांची आवश्यकता असल्यामुळें समाजसेवकाला या कार्यांत पुढाकार घ्यावा लागतो.

## सद्गुणांची वाढ आणि दुर्गुणांचा नाश

पण ही झाली कांहींतरी शारीरिक, मानसिक, बौद्धिक अशा प्रकारचे ढोबळ दोष असलेल्या माणसांची गोष्ट. ज्यांच्यांत असे विशेष दोष नाहींत, निदान बाह्यात्कारी तरी दिसत नाहींत, अशांचें व्यक्तिवैशिष्ट्य, त्यांच्या अंगचे चांगले गुण आणि विशिष्ट प्रवृत्ति शोधून काढून त्यांच्या विकासावर भर द्यावा. सारे सुधारणेचे प्रयत्न त्यांच्यावर केंद्रीभूत करावे आणि त्याच्या आधारें दुर्गुणांचा प्रभाव कमी करावा. अशा रीतीनें व्यक्ति आणि तिची सामाजिक परिस्थिति यांची यशस्वी रीतीनें सांगड घालून, तिच्या प्रगतीला अडथळा करणाऱ्या अडचणी दूर करून ती समाजाचा एक महत्त्वाचा, उपयोगी व कर्तृत्ववान् घटक होईल असें करणें हेंहि व्यक्तिगत समाजसेवेचें एक अंग आहे.

करमणूक आणि व्यापक दृष्टीनें तींत अंतर्भूत होणाऱ्या अनेक गोष्टी, यांनाहि समाजसेवेच्या कार्यांत फार मोठें स्थान आहे. माणसांची व त्यांच्या गटांची शारीरिक, मानसिक आणि बौद्धिक प्रगति करून, त्यांना अनिष्ट गोष्टींपासून परावृत्त करून, त्यांच्या वाढीला अनुकूल वातावरण तयार करून, व्यक्तींचें आणि समाजाचें जीवन समृद्ध आणि सुखी करण्यास करमणूक हें एक उपयुक्त आणि प्रभावी साधन आहे. तिचें वाढतें सामर्थ्य लक्षांत घेऊन समाजसेवेच्या कार्यांत तिला दिवसेंदिवस अधिक महत्त्व देण्यांत येत आहे, तें रास्तच आहे.

माणसाला हवें असतें तें काम किंवा उद्योगधंदा मिळतो, असें सामान्यतः होत नाहीं. अलिकडच्या विजेच्या साहाय्यानें चालणाऱ्या प्रचंड कारखान्यांतून हजारों लोकांना त्यांच्या इच्छेचा किंवा मनाच्या कलाचा विचार न करतां एक ठराविक काम सारखें करावें लागतें. मोटार, रेडियोसारख्या वस्तूंची नुसती जोडाजोड करण्याची पद्धति ( Assembly system ) ही तर अशी आहे कीं, तींत त्या वस्तूचा एखादा भाग, लहानसा तुकडा, एखादा स्क्रू, अगदीं लहानसा खिळा जोडण्याचें काम दिवसाचें दिवसच नव्हे; तर वर्षेंच्या वर्षें सारखें करावें लागतें. अशा प्रकारच्या कामामुळें कामगाराच्या शरीराच्या एखाद्याच अवयवावर फाजील ताण पडतो; तर दुसऱ्या अवयवांना

मुळीं हालचाल करण्याचा प्रसंगच येत नाहीं. याचा परिणाम असा होतो कीं ताण पडणाऱ्या अवयवाची फाजील, कधीं कधीं वेडीवांकडीहि, वाढ होते, तर दुसरे अवयव हालचालीच्या अभावीं सुस्त बनतात. कधीं कधीं त्यांना एखादी शारीरिक किंवा मानसिक व्यथा जडते, बुद्धिमांद्य येतें, कामाचा तिटकारा येऊन त्यांच्या वृत्तींत असमाधान, निराशा आणि अनुत्साह यांचें प्राबल्य होतें. ही त्यांची वृत्ति निरनिराळया प्रकारचे व्यायाम, खेळ, करमणुकीचे कार्यक्रम अशा साधनांच्या साहाय्यानें, अगदीं संपूर्णपणें जरी नाहींशी झाली नाहीं; तरी तिची तीव्रता कमी करतां येते. परिणामीं अशा वृत्तीच्या माणसांतहि नवी आशा आणि उत्साह अंकुरित होतो.

कांहीं माणसें गुन्हेगार वृत्तीचीं बनलेलीं असतात. तसेंच कांहींना मानसिक आणि शारीरिक स्वास्थ्य मिळत नाहीं. यामुळें मानसिक विकृति निर्माण होऊन स्त्री, पुरुष आणि मुलें कुमार्गाला लागण्याचा संभव असतो. अशा लोकांसाठीं बागा, नाट्यगृहें क्रीडांगणें, उपवनें, हस्तव्यवसाय, नृत्यगायनाचीं केंद्रें यांसारखीं करमणुकीचीं, व्यायामाचीं आणि खेळाचीं साधनें उपलब्ध करून दिल्यास त्यांची मानसिक विकृति कमी होण्यास निःसंशय मदत होते. या गोष्टींमुळें त्यांच्या मनाचा एकलकोंडेपणा जाऊन ते इतर लोकांत मिसळल्यास, दुसऱ्यांशीं सहकार्य करण्यास, परस्परांस साहाय्य करण्यास शिकतात. हळुहळू ते चारित्र्यसंपन्न, आरोग्यसंपन्न, प्रामाणिक आणि स्वावलंबी होऊन सामुदायिक रीतीनें कार्य करण्याची संवय आणि आपल्याबरोबरच दुसऱ्याच्या हक्कांविषयीं जागृत राहाण्याची वृत्ति त्यांच्यांत उत्पन्न होते.

माणसाची प्रगति करतांना त्याच्या अडचणी, त्याचीं दुःखें नाहीशीं करणें, त्याच्यावरचें दडपण, त्याच्यावर होणारे अन्याय दूर करणें हें तर महत्त्वाचें असतेंच; पण त्याच्याबरोबर त्याच्यांत महत्त्वाकांक्षा उत्पन्न करून ती त्याच्या स्वतःच्या प्रयत्नानें पूर्ण करण्यास उत्तेजन देणें, त्याला आपल्या स्वतःच्या सामर्थ्यावर आपलें ध्येय गांठण्यास प्रवृत्त करणें, त्याचें भाग्य त्याच्या हातीं आहे, त्यानें तसे प्रयत्न मात्र केले पाहिजेत हें त्याला पटवून देणें, हा त्याला साहाय्य करण्याचा खरा शास्त्रशुद्ध मार्ग आहे.

व्यक्तिविकासाचें हें कार्य करतांना आपल्या प्रयत्नांचें बरोबर मोजमाप करावें लागतें. आपल्या प्रयत्नामुळें व्यक्तींत बदल–तिची प्रगति–होत आहे कीं नाहीं, हें पाहाणें आवश्यक असतें. ज्या व्यक्तीला समाजसुधारक वळण लावीत असतो, तिच्यांत उत्साहीपणा, पुढाकार घेऊन कार्य करण्याची प्रवृत्ति उत्पन्न झाली आहे काय व तिला अनुरूप असा तिच्या राहाणींत आणि तिच्या संवयींत बदल झालेला आहे काय, तसेंच तिचे सामाजिक संबंध अधिक सलोख्याचे झाले आहेत काय, इत्यादि प्रश्नांच्या उत्तरावरून समाजसेवकाच्या कार्याचें मोजमाप होत असतें.

# नराचा नारायण होण्याची शक्ति माणसांत आहे !

सर्वांना सारखी संधि मिळून सर्वांची सर्वांगीण प्रगति म्हणजे सर्वोदय झाला पाहिजे, हें खरें. पण माणसामाणसांतील व्यक्तीगत फरक, व्यक्तिगत गुण, व्यक्तिगत परिस्थिति हींहि विचारांत घ्यावीं लागतात. मनुष्यप्राणी हा इतर सार्‍या प्राण्यांपेक्षां वेगळा आहे. तो पाळीव जनावर नाहीं. पशुपक्षी शिकविल्यास कांहीं गोष्टी करतात. पण कांहीं ठराविक मर्यादेपलिकडे त्यांची प्रगति होत नाहीं. पण मनुष्य हा एकच प्राणी असा आहे कीं, त्याच्या प्रगतीला सीमाच नसते. ती करावी तेवढी थोडीच. नराचा नारायण होण्याची शक्ति त्याच्यांत आहे. म्हणून त्याची सुधारणा करावयास निघालेल्या माणसांचा, मनुष्यप्राणी प्रगमशील आहे, प्रगतिपर आहे, तो सुधारावा तितका सुधारूं शकतो, या तत्त्वावर नितांत विश्वास असावा लागतो. व्यक्तीचें व्यक्तिमत्व ओळखावें लागतें. तिच्या इच्छाआकांक्षा लक्षांत घ्याव्या लागतात. मुक्या जनावराप्रमाणें सार्‍या गोष्टी निमुटपणें सहन करण्यास तो तयार नसतो आणि जोरजबरदस्ती करून कांहीं गोष्टी त्याच्यावर लादल्यास त्यामुळें त्याची प्रगति तर होत नाहींच; उलट त्याची प्रतिक्रिया होऊन त्याची परागति होण्याचा संभव असतो. म्हणून आपल्याला हव्या असलेल्या सुधारणा त्याला पटवून त्याच्या सहकार्यानें पुढें जाणें अवश्य असतें.

माणसाची ही सेवा किंवा सुधारणा त्याच्या जन्मापासून किंबहुना तो जन्मास येण्यापूर्वींच सुरू होते. तो जन्माला येतांना जगांतील दुसर्‍या कोणत्याहि प्राण्यापेक्षां पराधीन असतो आणि दुसर्‍या माणसांच्या साहाय्यावांचून जगूंच शकत नाहीं. पण त्याला एकदां वाढीला लावला कीं तो तितकाच आश्चर्यकारक रीतीनें स्वावलंबी होतो. तथापि दुसर्‍याच्या साहाय्यावांचून त्याचें कधींच चालत नाहीं. त्याला वाढीला लावण्याचें आरंभींचें अत्यंत बिकट कार्य त्याचें कुटुंब करतें. तेथें त्याच्या भावी आयुष्याची मुहूर्तमेढ रोंविली जाते. त्याच्या आयुष्याची दिशा ठरते. त्या दृष्टीनें त्याचें घर किंवा कुटुंब त्याच्या सार्‍या आयुष्यांत महत्त्वाचें असतें. पण एक गोष्ट निश्चित कीं तो एकटा वाढूं शकत नाहीं, आयुष्यभर दुसर्‍याच्या साहाय्याची त्याला कमीजास्त प्रमाणांत आवश्यकता असतेच.

अशा या बहुरूपी किंवा विविधस्वरूपी माणसाची सुधारणा करतांना किंवा सेवा करतांना ती एकाच मार्गानें नेहमीं करतां येईल, हें शक्य नसतें. माणूस जसा बहुरूपी आणि विविधस्वरूपी तसे त्याला सुधारण्याचे व त्याची सेवा करण्याचे मार्गहि बहुरूपी आणि विविधस्वरूपी असणें अपरिहार्य असतें. म्हणूनच एका स्थळीं, एका परिस्थितींत योजलेले मार्ग दुसर्‍या स्थळीं किंवा दुसर्‍या परिस्थितींत जसेच्या तसे सामान्यतः उपयोगीं पडूं शकत नाहींत. परिस्थित्यनुरूप कांहींना कांहीं फरक हा करावा लागतोच.

९०२२ अनुक्र ३३ नों. दि. २४/११

मात्र समाजसेवेच्या मूलभूत तत्त्वांना धरून ते मार्ग अवलंबावे लागतात. आणि त्या अवलंबिलेल्या मार्गानुसार त्या त्या व्यक्तीचा वेगवेगळा विकास होतो.

मग सर्व माणसें सारखीं आहेत, असें आपण म्हणतों त्याचा अर्थ काय, असा प्रश्न उत्पन्न होतो. त्याचा अर्थ इतकाच कीं दुसऱ्या प्रत्येक माणसाप्रमाणें आपल्यालाहि आपलें व्यक्तिवैशिष्ट्य राखण्याचा हक्क आहे. सर्वांबरोबर सारखी संधि मिळण्याचा आपल्याला हक्क आहे. ही सर्वांना सारखी संधि देतांना प्रत्येकाचें व्यक्तित्व ओळखणें, हें सारखेपणाचें खरें इंगित आहे. पण समानता (equality) म्हणजे एकजिनसीपणा (uniformity) मात्र नव्हे. समाजाची प्रगति करतांना हे फरक लक्षांत ठेवणें आवश्यक असतें. उदाहरणार्थ बेकारीचा प्रश्न घ्या. तो सोडवितांना कोणाला कामाचा अनुभव आहे, कोणाला अनुभव नाहीं, कोण अधूनमधून काम करणारा आहे, कोणाला मुळीं कसलेंच काम होण्यासारखें नाहीं, अशासारख्या भिन्न भिन्न अडचणी लक्षांत घेऊन, त्या त्या माणसाला त्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणें काम पाहून द्यावें लागतें. सर्वच बेकार खरे. त्या दृष्टीनें ते सारख्या परिस्थितींतले हेंहि खरें, तसेंच नोकरी मिळणें हा सर्वांचा हक्कहि खरा; पण प्रत्यक्ष त्यांना काम देतांना त्यांच्या या विशिष्ट परिस्थितीचा विचार करणें अपरिहार्य असतें. तसें न केल्यास त्यांत त्याचेंहि अनहित होण्याचा संभव असतो. तथापि खरा प्रश्न असतो तो अशा निरनिराळ्या प्रकारच्या सामाजिक परिस्थितींत असलेल्या लोकांच्या अडचणींना मार्ग सुचविण्याचा किंवा त्यांचा बाऊ न करतां त्या विशिष्ट परिस्थितीचा विचार करून तिला योग्य असें विशिष्ट तंत्र शोधून तें यशस्वी करून दाखविण्याचा.

पात्रापात्रतेचा विचार न करतां दान देण्यासारख्या जुन्या समाजसेवेच्या मार्गांत आतां बदल झाला पाहिजे. निष्काळजीपणानें किंवा भावनावश होऊन भिकाऱ्याला भीक घालून आपण त्याची अवनति करतों. इतकेंच नव्हे तर त्याला स्वाभिमानानें जगण्याचा मार्ग बंद करून त्याची प्रगति थांबवितों. दानाचा उपयोग आहे, नाहीं असें नाहीं; पण तो अगंदीं तात्पुरता. एखाद्याला अपघात झाल्यास डॉक्टर येईपर्यंत जसे आपण प्राथमिक उपचार करतों; तसा.

## लोकशाही समाजांत प्रत्येक घटकाला महत्त्व असतें

आज ज्ञानांत सारखी भर पडत आहे. परिस्थिति सारखी बदलत आहे. समाजसेवेच्या कल्पनांत व कार्यपद्धतींत सारखे बदल होत आहेत. प्रतिबंधक आणि विधायक स्वरूपाच्या कार्यावर विशेष भर देण्यांत येत आहे. एकंदर समाजाचा सर्वांगीण विकास होऊन सर्वांचें जीवन समृद्ध व सुखी होईल असे प्रयत्न झाले पाहिजेत. लोकशाही समाजव्यवस्थेंत समाजांतील प्रत्येक घटकाचें महत्त्व आहे, हें ओळखून तो स्वावलंबी,

प्रभावी, कार्यक्षम होईल असे प्रयत्न करणें ही आजच्या घटकेची निकड आहे. या कार्यांत समाजसेवकानें सर्वांत मोठा वांटा उचलला पाहिजे. त्याचें तें कर्तव्य आहे.

भारतांत आज अनेक प्रकारचीं समाजसेवेचीं कार्यें चाललेलीं आहेत. त्या सर्वांची प्रगति होणें व तीं अधिक कार्यक्षमतेनें चालणें अत्यंत आवश्यक आहे. या बाबतींत भारतसरकारनें एक मध्यवर्ती समाजहितकारी मंडळ नेमलें आहे. तें या कार्याचें निरीक्षण करीत आहे. समाजसेवेच्या प्रश्नाला मार्गदर्शन करण्याचें काम या मंडळामार्फत होऊं शकेल. समाजसेवेच्या प्रश्नांतील अडचणी सोडविण्यास हें मंडळ साहाय्यभूत होईल अशी आशा आहे.

आज समाजसेवेचें कार्य इतकें वाढलें आहे कीं, कितीहि केलें तरी तें संपण्यासारखें नाहीं. शिकंदर बादशहानें त्यावेळीं माहित असलेले जगांतले सर्व देश जिंकले आणि मग जिंकायला देशच राहिला नाहीं, म्हणून त्यानें अश्रु ढाळले, असें म्हणतात. पण समाजसेवेच्या क्षेत्रांत ही भीति नको. प्रचंड कार्य आपल्यासमोर पडलेलें आहे. एका परीनें आपण भाग्यवान् आहोंत. आपल्याला सामाजिक कार्य करायला हवी तेवढी संधि आहे. पण दुसऱ्या दृष्टीनें विचार केला तर मनाला खंत वाटल्यावांचून राहात नाहीं. आपला समाज सर्व दृष्टींनीं इतका मागासलेला असावा, त्याला अनेक बाबतींत सेवेची गरज भासावी, ही गोष्ट फारशी स्पृहणीय नाहीं. या गोष्टीवरून त्याची व्याधिग्रस्तताच दिसून येते. तथापि या गोष्टीची सतत जाणीव ठेवून आपण अधिक उत्साहानें कार्याला लागलें पाहिजे, हेंच यांतलें सार आहे.

# वेश्या व वेश्याव्यवसाय

लेखकः-पु. गो. नाईक

## या ग्रंथावरील कांहीं निवडक अभिप्राय

आज ज्यांचें नांव घेणें पाप समजलें जातें अशा वेश्यांच्या जीवनासंबंधीं श्री. नाईक यांनीं एक अति उत्कृष्ट प्रबंध लिहून मराठी वाचकांची दृष्टि या प्रश्नाच्या बाबतींत जास्त अन्तर्मुख बनेल अशा प्रकारची कलाकृति निर्माण केली आहे. + + मराठी वाङमयांत श्री. नाईक यांचें हें प्रबंधात्मक पुस्तक अजोड असें असून, त्यांचें या बाबतींत मुक्त कंठानें अभिनंदन करणें हें मराठी वाचकांचें, अभ्यासूंचें आणि राजकीय व सामाजिक कार्यकर्त्यांचें कर्तव्यच आहे.

लोकसत्ता, ता. १-११-४८

या पुस्तकाचें वैशिष्ट्य संयम आणि मानवता यांच्या संयोगानें या पुस्तकांत एक विशिष्ट जिव्हाळा निर्माण केला आहे हें होय. त्यांत शास्त्रीय कर्कशपणा नाहीं. प्रत्यक्ष गोष्टी पाहिल्यामुळें रंगेल गलिच्छपणाची छटाहि नाहीं किंवा उदासीन तिरस्काराची छायाही नाहीं. विचाराला चालना देणारें हें संयमपूर्ण पुस्तक लिहिल्याबद्दल लेखक अभिनंदनास पात्र आहे. मराठींत पुस्तक लिहून प्रकाशित केल्याबद्दल मराठी वाचकवर्ग लेखकास धन्यवादच देईल.

दैनिक लोकशक्ति पुणें ता. १ - ८ - ४९

समाजांत फैलावणाऱ्या या गर्ह्य व्यसनाकडे आणि घातुक प्रकारांकडे सर्वांचें लक्ष वेधलें जावें या उदात्त हेतूनें त्यांनीं या धंद्यातील किळसवाणे प्रकार चवाठ्यावर मांडले आहेत. परंतु असें करतांना अत्यंत संयम राखून शिष्टाचाराच्या मर्यादा ओलांडल्या नाहींत. त्यामुळें त्यांच्या विवेचनांत एक प्रकारचा जिव्हाळा उत्पन्न झाला आहे व हें पुस्तक समाजसेवकां-बरोबरच सामान्य जनांनाहि उपयुक्त झालें आहे.

तरुण भारत, नागपूर, ता. १ - ३ - ५०

या व्यसनाचें स्वरूप, कारणें, परिणाम, तीं नष्ट करण्याचे उपाय या सर्व दृष्टींनीं या पुस्तकांतील विवेचन अत्यंत उपयुक्त असून लेखक समाजसुधारणेच्या चळवळींत प्रत्यक्ष घस सोसलेला कार्यकर्ता असल्यामुळें त्याच्या विवेचनांत एक विशेष प्रकारचा जिव्हाळा व ठामपणा जागजागीं व्यक्त झालेला आहे. प्रत्येक समाजहितेच्छू पुरुषानें हें पुस्तक एक वार तरी नजरे-खालून अवश्य घालावें.

महाराष्ट्र, नागपूर ता. ४-६-५०

विषयाचा दीर्घकालीन प्रत्यक्ष अनुभव व अभ्यास यांच्या संगमानें श्री. नाईक यांच्या लेखणींतून उतरलेलें हें पुस्तक अत्यंत वाचनीय झालें असून, सामाजिक दृष्ट्या महत्त्वाच्या विषयाची इतकी शास्त्रशुद्ध व माहितीपूर्ण चर्चा इतरत्र क्वचितच मिळेल.

विविध वृत्त, ता. २१-११-१९४८.

ज्या कार्याबद्दल शिष्टजनांना फारशी आस्था नाहीं, अशा क्षेत्रांत प्रत्यक्ष कार्य करून, त्या विषयावर एक अत्यंत उपयुक्त व माहितीपूर्ण पुस्तक लिहिण्याचे श्रम घेतल्याबद्दल श्री. नाईक हे अभिनंदनास पात्र आहेत.

नवयुग, ता. ५-१२-१९४८

१९६०

या पुस्तकानें समाजीच्या एका दुर्धर अशा रोगावर वस्तुस्थितीचा प्रकाश पाडला असून समाजसुधारणेच्छु स्त्रीपुरुषांना हें पुस्तक अत्यंत उपयुक्त वाटेल.

केसरी, ता. २४–६–४९.

इतर समाजांतील लोकांपेक्षां गोमंतक मराठा समाजांतील व्यक्तींनीं या ग्रंथाकडे आदरानें पाहाण्याची अत्यंत जरूरी आहे. त्यांच्या दृष्टीनें हा एक इतिहास आहे. शिवाय, इतिहासापासून घ्यावयाचा बोधहि त्यामध्यें सांपडण्याजोगा आहे. श्री. नाईक यांच्या ग्रंथाचा गौरव इतर वृत्तपत्रांनीं केलेला आहे त्यापेक्षांहि अधिक व्हावयास हवा. समाजशास्त्र अभ्यासणाऱ्यांस ह्या पुस्तकाची बहुमोल मदत होणार आहे.

समाजसुधारक, ऑक्टोबर १९५०.

कर्मवीर कर्मयोगी म्हणून इतर पुष्कळांचा मोठा गौरव होतो. पण नाईकांची वेश्याव्यवसाय-उच्छेदनाची ही कामगिरी शब्दातीत कौतुकाची आहे असेंच मी म्हणतों. नाईकांच्या या ग्रंथाचा प्रत्येक घरांत अभ्यास झाला पाहिजे. स्त्रियांनीं, पुरुषांनीं, तरुणांनीं, तरुणींनीं त्याचें मनानें अध्ययन केलें पाहिजे.

प्रबोधनकार ठाकरे, भगिनी मासिक, पुणें. नोव्हेंबर १९४९

या धंद्याचें आजचें स्वरूप, त्यामुळें अनीति व रोग यांचा फैलाव, त्यांच्या अनुषंगानें गुंडवर्गाचें भयंकर आस्तित्व इत्यादि प्रकार या पुस्तकाचे लेखक श्री. नाईक यांनीं स्वानुभवानें वर्णन केले आहेत ते सर्व विचारी व समाजसुधारणेच्छु माणसांनीं वाचून मनन करण्यासारखे आहेत.

प्रा. त्र्यं. शं. शेजवलकर, नवभारत, जुलै १९४९.

Warm in human sympathy, sane in social outlook and critically balanced as regards the theoretical discussion. The causes of prostitution and the present social trends in the world are ably and convincingly discussed. The language is simple, direct and effective, without any rhetoric. Altogether a fine book, which should be read by all thoughtful men and women.

The Times of India, *21st January, 1949*

वैषयिक इच्छा, स्त्रीपुरुष–आकर्षण, विवाहसंस्था या गोष्टींची उत्पत्ति व स्थैर्य यांचा मानसशास्त्राच्या व समाजशास्त्राच्या भूमिकेवरून अभ्यास करून मगच वर्ण्य विषयास लेखकानें हात घातला असल्यानें त्या विषयाचें संशोधन अत्यंत शास्त्रशुद्ध झालें आहे. आणि विशेष स्वागतार्ह गोष्ट ही कीं ग्रंथांतील सर्व विवेचनाला उच्च नैतिक अधिष्ठान आहे. सामाजिक अभ्यास व कार्य करणारांना हें पुस्तक अत्यंत उपयुक्त होईल.

वसंत, फेब्रुवारी, १९४९

श्रमजीवी वर्गाच्या संघटनेचें व उन्नतीचें कार्य ज्यांना करावयाचें आहे त्यांनीं माहितीसाठीं आणि मार्गदर्शनासाठीं जवळ बाळगण्यासारखें हें पुस्तक आहे.

जनवाणी, २ जानेवारी, १९४९

★

अनुक्रम ९०२२८
विभाग १८१

REFBK-0008170